Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०५/२०११** **दिनांक १२.०६.२०११**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा रविवार दिनांक १२.०६.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-१२५७-२०११, दिनांक ०७ जुन,२०११ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १२.०६.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष
०२. मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग
०४. मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे
०५. श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव
०६. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
०७. मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये
०८. मा.डॉ.प्यारेलाल तिवारी
०९. मा.सौ.अलका बाळू शेजवळ

मा.किशोर रा.मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत सर्वश्री मा.ना.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.रमाकांत गणेश कर्णिक यांनी दुरध्वनीव्दारे व मा.श्री समि खतिब व मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा यांनी दूरध्वनीवरुन कळविले. त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१** **दिनांक २१.०५.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३३८** दिनांक २१.०५.२०११ रोजी शिर्डी (साईनिवास अतिथीगृह) येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करण्यात आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक ०६.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३३९** **सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.०३** **दिनांक २९.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३४०** दिनांक २९.०३.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) प्रसादालय व कॅंटीनकरीता सन २०११-१२ करीता किराणा माल खरेदी करणेकामी आलेल्या निविदा उघडणे व नमुने निवडणे बाबत**

सन २०११-१२ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व तांदुळ वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.०२.२०११ मध्ये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८.०२.२०११ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०१.०३.२०११ ते दि.१०.०३.२०११ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१२.०३.२०११ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे. व्यवस्थापन समितीचे दिनांक २६.०३.२०११ चे सभेत नंबर ०२ चा लिफाफा उघडणेत येवून ,आजचे सभेत मालाचे नमुने निवडणेत आले. निवडलेल्या नमुनाधारकांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम तसेच कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**सन २०११-१२ प्रसादालय व कॅन्टीन किराणा माल खरेदी... निविदा परिशिष्ट**

| शिर्डी कार्यालय | |
|---|---|
| १. | मे.रेणुका कॉफी वर्क्स, बेल्लारी |
| २. | मे.नाशिक टी कंपनी, नाशिक |
| ३. | मे. सुरेश पुनमचंद बागमार, पुणे |
| ४. | मे. कुणाल टी सेंटर, शिर्डी |
| ५. | मे. अग्रवाल एजन्सी, साकुरी |
| ६. | मे. संगमनेर ता.सह.दुध.उत्पा. व प्रक्रीया संघ, संगमनेर |
| ७. | मे. हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड |
| ८. | मे. कोठारी ब्रदर्स, कोपरगांव |
| ९. | मे. गोदावरी खोरे दुध उत्पा.संध, कोपरगांव |
| १०. | मे. देवीचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर |
| ११. | मे. धर्मपाल सत्यपाल लि., नोएडा-दिल्ली |
| १२. | मे. पवन पॅकेजिंग, कोल्हापुर |
| १३. | मे. पी.के.एम.फुड्स प्रा.लि., पुणे |
| १४. | मे. प्रभात डेअरी प्रा.लि., श्रीरामपुर |
| १५. | मे. सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपुर |
| १६. | मे.रुपेश ट्रेडर्स, हैद्राबाद |
| १७. | मे. हायटेक वेडींग, नाशिक |
| १८. | मे. सुपर प्लास्ट इंजि., नाशिक |
| १९. | मे.एस.के. ऑईल इंडस्ट्रिज, जळगाव |
| २०. | मे. वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| २१. | मे. सचिन ट्रेडर्स, कोल्हार |
| २२. | मे. डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे |
| २३. | मे. शैला इंटरप्रायझेस, नाशिक |
| २४. | मे. राजेश ड्राय प्रॉडक्ट्स, अहमदनगर |
| २५. | मे. आदर्श मल्टीप्लेक्स प्रा.लि., अहमदनगर |
| २६. | मे. गुरुकृपा सेल्स, कोपरगांव |
| २७. | मे. सरस प्लॅस्टिक, अहमदनगर |
| २८. | मे. मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| २९. | मे.पुखराज रामनिवास, जळगाव |
| ३०. | मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव |
| ३१. | मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव |
| ३२. | मे.आर.मुथा राईस हाऊस, औरंगाबाद |
| ३३. | मे.राहुल एन्टरप्रायझेस, नाशिक |
| ३४. | मे. वरद विनायक एन्टरप्रायझेस, सुपा |
| ३५. | मे.शिवकृपा फ्रुडर्स (इ.) प्रा.लि., अहमदाबाद |
| ३६. | मे. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ३७. | मे.योग बेव्हेरेजस प्रा.लि., नाशिक रोड |
| ३८. | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक |
| ३९. | मे. दगडूराम पिरचंद (एजन्सी विभाग), श्रीरामपुर |
| ४०. | मे.बाफना बाजार, नाशिक |
| ४१. | मे.पडतानी मिल, संगमनेर |
| ४२. | मे. नितिन सेल्स कार्पोरेशन, कोपरगाव |
| ४३. | मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक |
| ४४. | मे. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ४५. | मे. टेक्नो ॲक्वा प्रा.लि., मनमाड |
| ४६. | मे. गणेश ड्राय फ्रुडस, पुणे |
| ४७. | मे. स्टार पॅकेजिंग, दमन |
| ४८. | मे. धवल फुड प्रा.लि., मुंबई |
| ४९ | मे. मार्सन (इंडीया) इंडस्ट्रीज, मुंबई |
| ५०. | मे. बी.बी.सी.ट्रेडींग कंपनी, मुंबई |

**सन २०११-१२ प्रसादालय तांदूळ खरेदी... निविदा परिशिष्ट**

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | मे. गुरुनाथ राईस मिल प्रा.लि.,बेल्लारी |
| ०२ | मे. हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | |
|---|---|
| ०३ | मे. रुपेश ट्रेडर्स, हैद्राबाद |
| ०४ | मे. साई राईस इंडस्ट्रीज, बासापट्टना- कर्नाटक |
| ०५ | मे. वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०६ | मे. अन्नपुर्णा राईस इंडस्ट्रीज, गोंदीया |
| ०७ | मे. महेश कार्पोरेशन, हैद्राबाद (आशिर्वाद ट्रेड हाऊस) |
| ०८ | मे. मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ०९ | मे. कमलेश ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| १० | मे. केदारनाथ ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ११ | मे. मुथा राईस हाऊस, औरंगाबाद |
| १२ | मे. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| १३ | मे. बाफना बाजार, नाशिक |
| १४ | मे. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| १५ | मे.पडतानी मिल, संगमनेर |
| १६ | मे. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक |

आजचे सभेत निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या मालांच्या नमुन्यांच्या पिशव्यांचे आयटेमवाईज सॉर्टींग करण्यात आले. त्यानंतर मोठ्या प्लॅस्टिक पिशव्या आणून त्यामध्ये मालाच्या पिशव्या ठेवण्यात आल्या. त्यानंतर सदर पिशव्या सभेपूढे उघडून खरेदीसाठी स्विकारार्ह असे नमूने उपस्थित मा.विश्वस्तांमार्फत निवडण्यात आले. अशा रितीने निवडण्यात आलेले नमूने सादर केलेल्या खालील निविदासादरकर्त्यांना / पुरवठादारांना व्यवस्थापन समितीचे यापूढील बैठकीसमोर, त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत / किंमतीबाबत समक्ष वाटाघाटीसाठी, उपस्थित रहाणेसाठी बोलाविण्यात यावे अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

| अ.नं | मालाचे नांव | नमुनेधारकांचे नांव | जात/प्रकार |
|---|---|---|---|
| ०१ | हरबरा दाळ - बिगर पॉलीश<br>मागणी ८००० क्विंटल | १. वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड | ०२ |
| | | २. मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | ०२ |
| | | ३. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | ०३ |
| | | ४. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | B |
| | | ५. रुपेश ट्रेडर्स, सांगली | -- |
| | | ६. डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | -- |
| ०२. | तुरदाळ - लातुर फटका<br>मागणी १७०० क्विंटल | १. संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड | A |
| | | २. वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड | १ |
| | | | २ |
| | | ३. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | A |
| | | ४. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | A |
| | | ५. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | ६. मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | २ |
| ०३. | मुगदाळ - बोल्ड<br>मागणी २२० क्विंटल | १. डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | १ |
| | | | २ |
| | | २. संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | -- |
| | | ३. रुपेश ट्रेडर्स, सांगली | -- |
| | | ४. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | -- |
| ०४. | उडीददाळ<br>मागणी २ क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | -- |
| | | ३. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | -- |
| ०५. | वाटाणा - हिरवा, इंम्पोर्टेड<br>मागणी ६०० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | ३. रुपेश ट्रेडर्स, सांगली | -- |
| | | ४. नितिन सेल्स कार्पोरेशन, | -- |
| ०६. | मुग - आख्खा<br>मागणी ८०० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | १ |
| ०७. | मठ<br>मागणी ८०० क्विंटल | १. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | ३. नितिन सेल्स कार्पोरेशन | अ |
| | | ४. रुपेश ट्रेडर्स, सांगली | -- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०८. | रवा - मध्यम<br>मागणी ४५० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. पडतानी मिल, संगमनेर | -- |
| | | ३. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | A |
| ०९. | मैदा<br>मागणी ७०० क्विंटल | १. पडतानी मिल, संगमनेर | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | -- |
| १०. | हिरा बेसन<br>मागणी ४ क्विंटल | १. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ११. | गुळ- कोल्हापुरी, पिवळा<br>मागणी २५० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | -- |
| १२. | शेंगदाणा- वाळलेला, बोल्ड<br>मागणी ३५० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| १३. | साबुदाणा- डबलहत्ती, मिल्कव्हाईट<br>मागणी २६० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ४. नितिन सेल्स कार्पोरेशन, | -- |
| १४. | भगर<br>मागणी ६ क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं, नाशिक | -- |
| १५. | खोबरेवाटी, राजापुरी, काळी पाठ, वाळलेली<br>मागणी १०० क्विंटल | १. रुपेश ट्रेडर्स, सांगली | -- |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | -- |
| १६. | काजु पाकळी- २ पाकळी वाळलेली<br>मागणी १५० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | | B |
| | | | C |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ३. रुपेश ट्रेडर्स, सांगली | B |
| | | ४. गणेश ड्राय फ्रुट्स, पुणे | १ |
| १७. | मगज बी<br>मागणी ५ क्विंटल | १. देवीचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | -- |
| | | २. गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | -- |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | ४. पी.के.एम.फुड्स | -- |
| १८ | बदाम बी - मोठी साईज<br>मागणी ०.४० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | -- |
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| १९. | हळद - अखंड वाळलेली<br>मागणी १०० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | -- |
| | | ३. देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | -- |
| | | ४. बाफना बाजार, नाशिक | -- |
| २०. | मिरची - गुटूंर, अखंड, लाल<br>मागणी १७५ क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. राजेश फुड प्रॉडक्ट्स, अहमदनगर | -- |
| | | ४. धर्मपाल सत्यपाल | -- |
| २१. | धने - अखंड<br>मागणी- १५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | ३. पी.के.एम.फुडस, | इंदोरी |
| | | ४. हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | --- |
| २२. | हिरवी विलायची - बोल्ड<br>मागणी ४० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. देवीचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | --- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | A |
| २३. | जीरे - डायमंड कट<br>मागणी ५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | | B |
| | | २.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |
| | | | B |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| | | ४. राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | -- |
| २४. | सुंठ - वाळलेली<br>मागणी ६ क्विंटल | १. पी.के.एम.फुडस, | -- |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | ३. धर्मपाल सत्यपाल | -- |
| २५. | शहाजिरे<br>मागणी १.५० क्विंटल | १. धर्मपाल सत्यपाल | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| २६. | मसाला विलायची<br>मागणी १.५० क्विंटल | १. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | ४. पी.के.एम.फुडस, | -- |
| | | ५. धर्मपाल सत्यपाल | -- |
| २७. | लवंग<br>मागणी १ क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | २. धर्मपाल सत्यापाल | -- |
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| | | ४. बाफना बाजार, नाशिक | -- |
| २८. | दालचिनी<br>मागणी १.५० क्विंटल | १. पी.के.एम.फुडस | -- |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| २९. | खसखस<br>मागणी २.५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. राजेश फुडस प्रॉडक्टस, अहमदनगर | -- |
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| ३० | काळेमिरे<br>मागणी १.५० क्विंटल | १. धर्मपाल सत्यपाल | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ३. राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | -- |
| | | ४. पी.के.एम.फुडस, | -- |
| ३१. | नाकेश्वर<br>मागणी १.५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. पी.के.एम.फुडस, | -- |
| ३२. | तेजपान<br>मागणी १.५० क्विंटल | १. धर्मपाल सत्यपाल | १ |
| | | | २ |
| | | | ३ |
| ३३. | दगडफुल<br>मागणी १.५० क्विंटल | १. पी.के.एम.फुडस | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | चक्रीफुल<br>मागणी १.५० क्विंटल | १. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | -- |
| | | २. पी.के.एम.फुडस | -- |
| ३४.<br>३५. | जायफळ<br>मागणी ०.५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. धर्मपाल सत्यपाल | -- |
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| ३६. | जायपत्री<br>मागणी १.५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. धर्मपाल सत्यपाल | २ |
| | | ३. राजेश फुड प्रॉडक्ट, अहमदनगर | -- |
| ३७. | बडीशेप - हिरवी बारीक<br>मागणी ३ क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | २. पी.के.एम.फुडस, | -- |
| | | ३. धर्मपाल सत्यपाल | -- |
| ३८. | पापड - लिज्जत<br>मागणी ६० क्विंटल | १. पी.के.एम.फुडस | प्रकाश |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | लिज्जत |
| ३९. | हिंग पावडर, नागछाप ॲगमार्क<br>मागणी १२ क्विंटल | १. राजेश फुडस प्रॉडक्ट, अहमदनगर | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| ४०. | हिंग खडा, नागछाप ॲगमार्क<br>मागणी २.५० क्विंटल | १. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ४१. | मेथी<br>मागणी २ क्विंटल | १. सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ४. पी.के.एम.फुडस, | -- |
| ४२. | मोहरी<br>मागणी ४० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | | B |
| | | २. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | -- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ४३. | कच्चे पोहे<br>मागणी १० क्विंटल | १. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| | | २. पडतानी मिल, संगमनेर | -- |
| | | ३. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ४४. | भाजके पोहे<br>मागणी २५ क्विंटल | १. राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | डाळ्या<br>मागणी ५ क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| ४५. | चिंच - फोडलेली<br>मागणी १५ क्विंटल | नमुने पसंत नाहीत. | -- |
| ४६. | आमसुल<br>मागणी २० क्विंटल | १. पी.के.एम.फुडस, | -- |
| | | २. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | -- |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| ४७.<br>४८. | जिलेबी रंग- मार्सन लेमन फुड कलर, आयएसआय मागणी ०३ क्विंटल | १. मार्सन इंडिया प्रा.लि., मुंबई | -- |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | ३. पी.के.एम.फुडस | -- |
| | | ४. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | -- |
| ४९. | सुतळी - बारीक, थ्री प्लाय<br>मागणी ०५ क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ५० | पत्रावळ कप्प्याची सिल्वर कोटेड<br>मागणी १०,००,००० नग | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ५१ | खडे मीठ<br>मागणी २० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | |
| ५२<br>५३. | मसुर<br>मागणी ५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | A |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | -- |
| | | ३. पडतानी मिल्स, संगमनेर | -- |
| ५४. | कुंकु<br>मागणी ३ क्विंटल | १. देविचंद पुनमचंद छाजेड, अहमदनगर | १ |
| | | | २ |
| | | २. बाफना बाजार, नाशिक | -- |
| ५५ | मठदाळ<br>मागणी २० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | -- |
| | | २. पडतानी मिल्स, संगमनेर | -- |
| ५६. | खाद्यतेल - मका, रिफाईंड, ॲगमार्क<br>मागणी ३,५०० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | जेमिनी (सुर्यफुल) |
| | | | कॉर्नस्टार (मका) |
| | | २. राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | कार्नेलो (मका) |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | हेल्थ फिट (सुर्यफुल) |
| ५७. | वनस्पती तुप - जेमिनी<br>मागणी ३५० क्विंटल | १. बाफना बाजार, नाशिक | जेमिनी |
| | | २. सचिन ट्रेडर्स, | जेमिनी |
| | | ३. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | राग |
| ५८ | चहा पावडर - ब्रुकबॉण्ड/सपट/ओ चहा<br>मागणी १५० क्विंटल | १. हायटेक वेडींग, नाशिक | रेड लेबल |
| | | २. कुणाल टी सेंटर, शिर्डी | सपट हॉटेल डस्ट |
| | | | सह्याद्री |
| | | ३. शैला इंटरप्रायझेस, | ब्रुक बॉण्ड ताजा २ |
| | | | रेड लेबल |
| ५९ | कॉफी फ्लिटर - ब्रुकबॉण्ड<br>मागणी १५ क्विंटल | १. शैला इंटरप्रायझेस, | कॅफे गोल्ड |
| | | २. हायटेक वेडींग, नाशिक | कॅफे गोल्ड |
| ६०. | बिस्कीटे - पारले/ब्रिटानीया/सनफिस्ट ग्लुकोज व इतर | १. अग्रवाल एजन्सी, साकुरी | -- |
| | | २. दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर | -- |
| | | ३. कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | -- |
| | | ४. वरद विनायक, पारनेर | -- |
| ६१. | पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटर बाटली - आयएसआय, प्रमाणित<br>मागणी - ४,५०,००० बाटली | १. गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा |
| | | २. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस |
| | | ३. संगमनेर ता.सह.दुध.संघ, संगमनेर | राजहंस |
| | | ४. टेक्नो ॲक्वा, | निंबस |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ६२. | पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर ५०० मिली बाटली - आयएसआय, प्रमाणित<br>मागणी - १,५०,००० बाटली | १. गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा |
| | | २. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस |
| | | ३. संगमनेर ता.सह.दुध.संघ, संगमनेर | राजहंस |
| | | ४. टेक्नो ॲक्वा, | निंबस |
| ६३. | पॉलीकप - व्हर्जीन फुड ग्रेड, १०० मिली, वजन २ ग्रॅम मागणी १,७५,००,००० नग | १. सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपुर | -- |
| ६४. | प्लॅस्टिक पिशवी ४x६ प्लेन व्हर्जीन फुड ग्रेड एलडी<br>मागणी ३० क्विंटल | १. पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | -- |
| | | २. सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | -- |
| | | ३. आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | -- |
| | | ४. सुपार प्लास्ट इंजि. | -- |
| | | ५. स्टार पॅकेजिंग | -- |
| ६५. | प्लॅस्टिक पिशवी ५x६.५ लाडूसाठी, ४ रंगात छपाई, २०० गेज पीपी<br>मागणी ३८० क्विंटल | १. पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | -- |
| | | २. सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | -- |
| | | ३. आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | -- |
| | | ४. सुपार प्लास्ट इंजि. | -- |
| | | ५. स्टार पॅकेजिंग | -- |
| ६६. | प्लॅस्टिक पिशवी ८x१० छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज एलडी<br>मागणी १३० क्विंटल | १. पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | -- |
| | | २. सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | -- |
| | | ३. आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | -- |
| | | ४. सुपार प्लास्ट इंजि. | -- |
| | | ५. स्टार पॅकेजिंग | -- |
| ६७ | गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, ५०० मिली पॅकिंग, ३.५ ते ३.८ फॅट, ८.५ एसएनएफ, दिवसातून दोन वेळेस पुरवठा<br>मागणी अंदाजे दररोज २८०० लिटर | १. गोदावरी खोरे दुध उत्पा.संध, कोपरगांव | -- |
| | | २. संगमनेर तालुका दुध.उत्पा.संघ, संगमनेर | -- |
| | | ३. स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | -- |
| | | ४. प्रभात डेअरी, श्रीरामपुर | -- |
| ६८. | गावरान तुप ३५ कि.ग्रॅ.कॅन लुज किंवा १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग ॲगमार्क असलेला<br>मागणी ३५५० क्विंटल | १. गोदावरी खोरे दुध उत्पा.संघ, कोपरगांव | गोदावरी |
| | | २. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | श्री वल्लभ |
| | | ३. राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | करमास |
| | | ४. प्रभात डेअरी, श्रीरामपुर | प्रभात |
| | | ५. बाफना बाजार, नाशिक | हटसन A |
| | | | हटसन B |
| | | | मधुरतन B |
| | | | कान्हा C |
| | | | महारतन D |

**सन २०११-१२ वार्षिक प्रसादालय तांदुळ खरेदी कामी मा.व्यवस्थापन उप समितीने निवडलेले मालाचे नमुना तपशिल**

| अ.नं | मालाचे नांव | नमुनेधारकांचे नांव | जात/प्रकार |
|---|---|---|---|
| ०१. | तांदुळ - सोना मसुरी नवीन/जुना<br>मागणी ८००० क्विंटल | १. कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | A (जुना) |
| | | २. रुपेश ट्रेडर्स, सांगली | |
| | | ३. संदीप टेडींग कंपनी, नांदेड | A (जुना) |
| | | ४. केदारनाथ ट्रेडींग कंपनी, नांदेड | (जुना) |
| | | ५. साईराईस इंडस्ट्रीज, बेल्लारी | १ (जुना)<br>२ (नवा) |
| | | ६. आर. मुथ्था राईस हाऊस, औरंगाबाद | लॉट नं.२ |
| | | ७. हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | A (जुना) |
| | | ८. कमलेश ट्रेडींग कंपनी, नांदेड | (जुना) |
| | | ९. मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | २ (नवा) |
| | | १०. मे.बाफना बाजार, नाशिक | A |
| | | ११. जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपसमितीने खालीलप्रमाणे शिफारसी केल्या त्या मान्य करण्यात आल्या.

०१) निविदेसोबत ज्या पुरवठाधारकांनी बयाणा रक्कम (EMD) चेकच्या स्वरुपात सादर केलेल्या आहेत त्यांच्या निविदा, निविदेत नमुद केलेल्या अटीनुसार नामंजुर करण्यात याव्यात.

०२) निविदेमध्ये ज्या पुरवठाधारकांच्या कागदपत्रांची अपुर्तता आहे त्यांच्या निविदा, निविदेत नमुद केलेल्या अटीनुसार नामंजुर करण्यात याव्यात.

०३) ज्या पुरवठाधारकांचे नमुने स्विकारण्यात आलेले नाहीत, त्यांच्या निविदाही नाकारण्यात याव्यात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०४) ज्या मालाचा एकही नमुना पसंत झाला नाही, त्यासाठी फेरनिविदा काढून कार्यवाही करावी.

०५) नमुने स्विकारण्यात आलेल्या निविदाधारकांनाच पुढील उपसमितीचे सभेत बोलावून चर्चा/ वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा

०६) निविदेमध्ये नमूद केलेल्या मालाची जात/प्रकार याचा उल्लेख केलेला आहे त्यानुसारच त्याच प्रकारचा/जातीच्या मालाच्या खरेदी संबंधित विचार करण्यात यावा.(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं.०४** **दिनांक ०८.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार परिषद सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३४१** दिनांक ०८.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार परिषद सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**०१. मौजे नांदुर्खी बुद्रूक, तालुका राहाता येथील जमिनी संस्थानला अद्यावयत सोयी-सुविधायुक्त रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणेसाठी विनामुल्य उपलब्ध होणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही सार्वजनिक व धर्मादाय संस्था, मा. महाराष्ट्र शासनाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ या कायद्यानुसार पुर्नःगठीत झालेली असून, या अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन, श्री साईबाबांची शिकवण आणि बाबांनी त्यांचे हयातीत गरीब व गरजूंची केलेली रुग्णसेवा लक्षात घेऊन बाबांचा रुग्णसेवेचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी शिर्डी व परिसरातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोर-गरीब जनतेला वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी २०० खाटांचे साईनाथ रुग्णालय चालविलेले आहे. तसेच गंभीर आजारावरील उच्च दर्जाचे उपचारांचे सोयीसाठी २०० खाटांचे श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल माहे जून, २००६ पासून सुरु केलेले आहे.

सद्यःपरिस्थितीत उपलब्ध रुग्णालयांची सुविधा अत्यंत अपुरी पडत असल्याने, मा. व्यवस्थापन समितीने नव्याने ६०० खाटांचे सर्व अद्यावयत सोयी-सुविधेनेयुक्त असलेले रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणेचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने, मौजे नांदुर्खी बुद्रूक ग्रामपंचायतीचे दिनांक ०५ जून, २००९ रोजीचे ग्रामसभेत, समस्त गामस्थांच्या मालकीची गट नंबर ३३१ व गट नंबर ४४६ मधील अंदाजे १७ हे ८५ आर जमीन संस्थानला अद्यावयत सोयी - सुविधायुक्त रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणेसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत ठराव केलेला आहे.

सदर जमीन संस्थानला विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस दिनांक २१ फेब्रुवारी, २००७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, त्यांचेकडेस सदर प्रस्ताव मान्यतेस्तव अंतिम टप्प्यात आहे.

तरी मौजे नांदुर्खी बुद्रूक, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर येथील गट नंबर ३३१ (क्षेत्र १३ हेक्टर ७३ आर) व गट नंबर ४४६ (क्षेत्र ०१ हे ८७ आर) असे एकुण क्षेत्र १५ हेक्टर ६० आर संस्थानला अद्यावयत सोयी सुविधायुक्त रुग्णालय (हॉस्पीटल) उभारणे या प्रकल्पाच्या प्रयोजनार्थ विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**शासनाचे विविध विभागांना आवश्यक असणारे क्षेत्र राखीव ठेवणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सुचना मांडली.**

**यावर मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरची जमीन संस्थानला उच्च वैद्यकीय सोयी सुविधा ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांना उपलब्ध व्हाव्यात म्हणून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणी साठी आवश्यक आहे. त्यामुळे सदरची सर्व जमीन संस्थानला मिळणे अत्यंत गरजेचे आहे. संपूर्ण जमीन मिळेल असे गृहीत धरुन नियोजित रुग्णालयाचे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेचे काम सल्लागार संस्थेस देणेत आलेले आहे. त्यामुळे मौजे नांदुर्खी येथील संस्थानने प्रस्तावित केलेली संपूर्ण जमीन मिळावी, हे शक्य नसल्यास शासनास आवश्यक असणारी जमीन राखीव ठेवून जास्तीत जास्त जमीन संस्थानला तातडीने उपलब्ध करुन द्यावी, असे सांगितले. या संबंधाने मा.उपविभागीय अधिकारी यांनी त्वरीत प्रस्ताव मार्गी लावणेकामी कार्यवाही करणेची सूचना मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी दिली.**

**यावर मा.सल्लागार परिषदेने संस्थानला मौजे नांदुर्खी येथील प्रस्तावीत जमीनी पैकी जास्तीत जास्त जमीन उपलब्ध करुन देणेची शिफारस केली ती मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०२. मौजे येसगांव, तालुका कोपरगांव येथील ग्रामपंचायतीकडे निहीत केलेली १०आर जमीन संस्थानला पदयात्री पालखी थांबा (निवासस्थळ) उभारणेसाठी विनामुल्य उपलब्ध होणेबाबत.**

मा. सरपंच, ग्रामपंचायत येसगांव, तालुका कोपरगांव यांनी दिनांक २२ नोव्हेंबर, २००६ रोजीचे ग्रामसभेत, मौजे येसगांव येथील सर्व्हे नंबर २/११ मधील ०० हे १० आर जागा संस्थानला पालखी पदयात्री साईभक्तांना तात्पुरते निवासस्थळ उभारणीसाठी विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा ठराव करणेत आलेला आहे, असे कळविले होते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



येसगांव ग्रामसभेतील निर्णयानुसार, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, मौजे येसगांव ग्रामपंचायतीची सर्व्हे नंबर २/११ मधील ०० हे १० आर जागा संस्थानला पालखी थांबा (निवासस्थळ) उभारणेसाठी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी म्हणून मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस दिनांक ०१ फेब्रुवारी, २००७ रोजी विनंती प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

मौजे येसगांव येथे पालखी पदयात्री साईभक्तांचे सोयीसाठी निवासस्थळ उभारणेत आलेले तथापि अद्यापपावेतो सदर जमीन संस्थानचे नांवावर हस्तांतरीत करणेत आलेली नाही.

तरी मौजे येसगांव, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर येथील सर्व्हे नंबर २/११ पैकी मधील क्षेत्र ०० हेक्टर १० आर संस्थानला पदयात्री पालखी निवासस्थळ उभारणे या प्रकल्पाच्या प्रयोजनार्थ विनामुल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर मा.जिल्हाधिकारी यांनी मौजे येसगांव येथील जमीन मा.उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांचे अभिप्रायानुसार लवकरात लवकर संस्थानला उपलब्ध करुन देणेत येईल असे सांगितले.**

**यावर मा.सल्लागार परिषदेने, मौजे येसगांव येथील प्रस्तावित जमीन संस्थानला पालखी पदयात्री निवासस्थानासाठी लवकरात लवकर उपलब्ध करुन देणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना शिफारस केली ती मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०३. <u>मौजे शिर्डी येथील पाटबंधारे खात्याची कल्व्हर्ट ३३ व ३४ मध्ये तयार झालेली गाळपेर जमीन संस्थानला कायमस्वरुपी मिळणेबाबत..</u>**

संस्थानने सन १९८८ पासून, मौजे शिर्डी येथील स.नं. १६१/१ व १६१/२ पै लगतचे कल्व्हर्ट ३३ व ३४ मध्ये तयार झालेली पाटबंधारे खात्याची अंदाजे २९ आर गाळपेर जमीन भाडेपट्टयाने घेतलेली आहे. सदर गाळपेर जमिनीमध्ये संस्थान साईभक्तांच्या सोयी-सुविधेसाठी उभारलेल्या विविध भक्तनिवासस्थान व इतर प्रकल्पांना पाणी पुरवठा करणेसाठी जलकुंभ उभारणेत आलेला आहे.

सन २०१० मध्ये, सदर गाळपेर जमिनीचा दिनांक ०१ नोव्हेंबर, २००८ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ अखेर ०५ वर्षासाठी भाडेपट्टा नुतनीकरण करणेत आलेला असून, त्यापोटी पाटबधांरे खात्याकडे रुपये ९,१७,१२५/- मात्र भाडेपट्टा रक्कम म्हणून भरणा करणेत आलेली आहे.

वास्तविक पहातां, सर्व्हे नंबर ११४/१ पैकी जवळील पाटबंधारे खात्याची चारी क्रमांक १२ ही संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलजवळून वाहत आहे. सध्या संस्थान खर्चाने ही चारी बंदीस्त केल्याने या चारीतील पाण्याचा प्रवाह विनाअडथळा सुरळीत सुरु असून, त्यावरील बंदीस्त जागेचा वापर ही योग्य रितीने होत आहे. त्यामुळे त्याठिकाणी आता अतिक्रमण होण्याचाही संभव नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करुन, दरम्यानचे कालावधीत, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडेस, मौजे शिर्डी येथील कल्व्हर्ट ३३ व ३४ जवळील अंदाजे २९ आर गाळपेर जमीन तसेच येथील चारी क्रमांक १२ (साखळी क्रमांक ३/१२० ते ३/१७० किमी) सर्व्हे नंबर ११४/१ मधील बंदीस्त ६५० चौमी जागा संस्थानला कायमस्वरुपी उपलब्ध करुन देण्यात यावी म्हणून दिनांक १८ जुलै, २००१ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. सहाय्यक संचालक, मुल्यनिर्धारण व नगररचना विभाग, अहमदनगर यांनी जमिनीचे मुल्यांकन व इतर अनुषंगिक माहिती मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना कळविलेली असून, सदर प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

तरी मौजे शिर्डी येथील कल्व्हर्ट ३३ व ३४ मध्ये तयार झालेली अंदाजे क्षेत्र २९ आर गाळपेर जमीन संस्थानला कायमस्वरुपी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**मा.सल्लागार परिषदेने, उपरोक्त प्रस्तावाबाबत संस्थानने मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे कार्यालयाकडे संपर्क साधून प्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे ते तपासून, संबंधित विभागामार्फत प्रस्ताव लवकरात लवकर मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे मान्यतेस्तव सादर होईल याबाबत पाठपुरावा करावा, अशी शिफारस केली ती मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०४. <u>महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांच्या शिर्डी परिसरातील जमिनी संस्थानला विविध विकास प्रकल्प राबविणेसाठी उपलब्ध होणेबाबत.</u>**

श्री क्षेत्र शिर्डी येथे महान संत श्री साईबाबा यांचे समाधीचे दर्शनाकरीता संपुर्ण जगातील हजारो भक्तगण दर्शनासाठी येत असतात. याकरीता संस्थानला भक्तांच्या सेवा-सुविधेसाठी निवासस्थाने, भोजनगृह, वाहनतळे, वैद्यकिय सेवा, भक्तांना करमणुकीसाठीची साधने उपलब्ध व्हावीत म्हणून उद्याने आदि विकास प्रकल्प हाती घेण्याचे नियोजन आहे. तसेच शिर्डी परिसरातील स्थानिक नागरीकांसाठी शैक्षणिक संकुलाचा विस्तार करणे, रुग्णालय उभारणे आदि विकास प्रकल्पांसाठी जमिनीची आवश्यकता आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सध्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची शिर्डी परिसरात, राहाता व कोपरगांव तालुक्यात अंदाजे ३६०.७२ हेक्टर जमीन आहे. सदर जमिनी संस्थानला मिळाल्या तर, वाढीव सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी विविध विकास प्रकल्प राबविणे शक्य होईल.

मा.शासन स्तरावर माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये शेती महामंडळाची कर्मचाऱ्यांचे प्रश्नांसंबधी महसुल व महामंडळाचे सबंधीत अधिकारी व कामगार संघटनेचे प्रतिनिधी यांची बैठक झाली. सदर बैठकीत मा. सर्वोच्च न्यायालय येथे प्रलंबीत असलेल्या शेती महामंडळाच्या जमिनीचे संबंधित याचिका व अंतिम निर्णयास अधिन राहून कामगार संघटना, शासन व शेती महामंडळ यांचे दरम्यान समझोता करार करुन तो सर्वोच्च न्यायालयाकडे सादर करण्यात यावा, असे ठरलेले आहे.

दरम्यानचे कालावधीत, श्री साईबाबा संस्थान यांनी राहाता व कोपरगांव तालुक्यातील सुमारे ९११ एकर जमिनींचे मागणीचा प्रस्ताव शेती महामंडळाकडे सादर केलेला आहे. या प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस झालेल्या बैठकीत ठरलेनुसार, मा. सहसंचालक, नगररचना (मुल्यांकन), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरहू जमिनींचा मुल्यांकन अहवाल सादर केलेला आहे.

तरी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनींबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवि दिल्ली यांचेकडेस प्रलंबित असलेल्या दाव्यात शासनामार्फत तडजोड / समेट होऊन आणि सदर जमिनींचे मुल्यांकन होऊन, त्या किफायतशीर किंमतीस संस्थानला उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाबाबत मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत राज्यशासनाकडे पाठपुरावा करावा अशी शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०५. भूसंपादन कार्यवाहीसाठी संस्थानकडून वसुल करणेत येणारा आस्थापना खर्च माफ करणेबाबत.**

**(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी वेळोवेळी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस भूसंपादनाचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. सदर संस्थानचे भूसंपादन प्रस्तावाच्या कार्यवाहीसाठी तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाने, मा. उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचे कार्यालयात सन १९९९ मध्ये विशेष भूसंपादन कक्ष स्थापन करणेसाठी नायब तहसिलदार संवर्गातील व अव्वल कारकून वर्गातील प्रत्येकी एक तसेच त्यांचे मदतीसाठी कुशल ४ व अकुशल १ असे एकुण ०७ कर्मचारी उपलब्ध करुन दिलेले आहेत. सध्या मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, सध्या सदर विशेष भूसंपादन कक्षातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना वेळोवेळी मुदतवाढ व वेतनवाढ देणेत आलेली आहे. सध्या या विशेष भूसंपादन कक्षातील कर्मचाऱ्यांना दरमहा अंदाजे रक्कम रुपये ३३,२००/- मात्र (रुपये तेहतीस हजार दोनशे मात्र) इतका मेहनताना आदा करणेत येत आहे.

**(ब)** शासन, महसुल व वन विभाग, निर्णय क्रमांक एलएक्यु / ४३७५ / अे-२, दिनांक १३ डिसेंबर, १९७५ अन्वये भूसंपादनाच्या निवाडयाची रक्कम रुपये ५,०००/- पेक्षा जास्त होत असेल तर ३ टक्के आस्थापना खर्च वसूल केला जातो. सदर शासन निर्णयानुसार, आतापर्यन्त संस्थानने खाली नमुद केलेप्रमाणे आस्थापना खर्च मा. भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांचेकडेस आदा केलेले आहेत :

| **अ.नं.** | **भूसंपादनाचा तपशील** | **क्षेत्र** | **आदा करणेत आलेला आस्थापना खर्च** |
|---|---|---|---|
| ०१ | मौजे निमगांव कोऱ्हाळे- शेती महामंडळाची जमीन भूसंपादनाव्दारे संपादीत करणे | ४५ हे ६४ आर | २९,५८,७८३/- |
| ०२ | आरक्षण क्रमांक ०८ - प्राथमिक शाळा व क्रिडांगणासाठी भूसंपादन | ११ हे ५१ आर | ०१,२६,७४३/- |
| ०३ | सर्व्हे नंबर १०८ - भूसंपादन प्रस्तावापोटी (भूसंपादन प्रस्ताव रद्द केलेनंतरही) | ०३ हे ७८ आर | २१,१२,४९८/- |
| | | **एकुण** | **५१,९८,२०४/-** |
| ०४ | शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत प्रथम प्राधान्य गटातील ०९ रस्त्यांसाठी भूसंपादन प्रस्तावापोटी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकरीता व तर्फे आजपावेतो भरणेत आलेली अंदाजे ०३ टक्के रक्कम | -- | **७८,५२,८५७/-** |

संस्थानमार्फत मा. भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांना सन १९९९ पासून स्वतंत्र व विशेष भूसंपादन कक्षासाठी एकूण ०७ विविध पदावरील अधिकारी / कर्मचारी संस्थान खर्चाने उपलब्ध करुन दिलेले असून, त्यांचेवर दरवर्षी अंदाजे ४ लाख मात्र खर्च होत आहे. तथापि

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दुसऱ्या बाजुस, भूसंपादन प्रस्तावापोटी ०३ टक्के आस्थापना खर्च संस्थानकडून वसूल करणेत येत आहे, हा मोठा विरोधाभास लेखापरिक्षणाचे दृष्टीने दिसून येत आहे. तसेच संस्थान ही एक सार्वजनिक व धर्मादाय संस्था असून, शिर्डी येथे भेट देणाऱ्या भक्तांबरोबरच स्थानिक प्राधिकरणासाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी मोठया प्रमाणावर आर्थिक निधी उपलब्ध करुन देत आहे.

**(क)** उपरोक्त तपशीलाचा विचार करतां, संस्थानमार्फत सादर करणेत येणाऱ्या भूसंपादन प्रस्तावापोटी आकारणेत येणाऱ्या आस्थापना खर्चास कायमस्वरुपी माफी मिळणे उचित व योग्य आहे. तरी याबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत शासन स्तरावर प्रस्ताव सादरकरणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्ताव मागे घेण्यात यावा अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०६. <u>नगर -मनमाड रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेसाठी उभारणेत आलेली सिग्नल व्यवस्था सुरु करणेबाबत</u>**

शिर्डी शहरातून जाणा-या नगर -मनमाड या राजमार्गावर वाहतुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. गर्दीच्या काळात नेहमीच ट्रॅफीक जाम होते, किंबहुना सर्वांचा वेळ व इंधन वाया जाते व त्याचा साईभक्त व राज्य मार्गावरून जाणाऱ्या वाहनधारकांना त्रास होतो.

ट्रॅफीक जामच्या समस्येचे निराकरण करणे तसेच ट्रॅफीकचे नियोजन करणेसाठी शिर्डी शहरात खालीलप्रमाणे ठिकठिकाणी इलेक्ट्रॉनिक ट्रॅफिक सिग्नल बसविणे गरजेचे होते.

| अ.क्र. | ठिकाण | जंक्शन |
|---|---|---|
| ०१ | नविन श्री साई प्रसादालय (हॉटेल सिध्दांत जवळ ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०२ | नांदुर्खी - पिंपळवाडी रोड ( हरीप्रसाद हॉटेल जवळ ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०३ | एस.टी.स्टॅंड (स्वागत कक्ष ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०४ | ५०० रुम | थ्री आर्म क्रॉस जंक्शन (टी ) |

मा.व्यवस्थापन समितीच्या दि. ०८-०३-२००९ च्या सभेतील वेळचा विषय क्र. ७२ निर्णय क्र. २४१ अन्वये शिर्डी शहरातून नगर -मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी इलेक्ट्रॉनिक ट्रॅफिक सिग्नल बसविणेसाठी ठराव मान्य करण्यात आला होता. हे ट्रॅफिक सिग्नल बसविल्यानंतर ही मालमत्ता शिरडी नगरपंचायतीकडे हस्तांतरीत होत असल्याने सदर प्रस्तावास शिर्डी नगरपंचायतीची मान्यता असल्याबद्दल शिर्डी नगरपंचायतीने लेखी पत्र दिले आहे.

सदरचे कामासाठी जाहिर निविदा बोलाविणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात आली होती. दि. ०९-०८-२००९ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत या कामासाठी प्राप्त झालेली टेंडरस उघडून टेंडरधारकांशी वाटाघाटी / चर्चा करुन निर्णय घेण्यात आला असून मे. केल्ट्रॉन, मुंबई यांची रक्कम रु.२६,११,५४०.५० या निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले आहे. सोबत ठरावाची प्रत आपले माहितीसाठी जोडत आहोत. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९-०८-२००९ चे सभेतील विषय क्र. ०८ निर्णय क्र. ६६४ अन्वये मे. केरला स्टेट इलेक्ट्रॉनिक्स डेव्हलपमेंट कार्पो.लि., ( केल्ट्रॉन ), मुंबई यांचे निम्नतर दर मान्य करण्यात येऊन जा.नं.एसएसएस / विद्युत - ११८०८- २००९ दिनांक १९-०९-२००९ अन्वये रु.२६,११,५४०.५० इतक्या रक्कमेचा शिर्डी शहरातून नगर -मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणेकामी कार्यादेश देण्यात आलेला होता.

शिर्डी नगरपंचायतीचे अधिकारी, पोलीस विभागाचे अधिकारी तसेच संस्थानचे अधिकारी यांनी भेट देऊन पोलच्या जागा फायनल केल्यानंतर मे. केल्ट्रॉन, मुंबई यांनी काम सुरु करुन पुर्ण केलेले आहे. व सिग्नल यंत्रणा चालू करून ट्रायल दिलेली आहे.

शिर्डी नगरपंचायतीने पत्र पाठवून त्याअन्वये, शिर्डी हद्दीमध्ये नगर-मनमाड महामार्गावर श्री साईबाबा संस्थानमार्फत अनुदान स्वरुपात पथसिग्नल उभारणीचे काम करण्यात आलेले आहे. चौकातील रस्ते समोरासमोर करण्याकरीता तेथील दुभाजक हटविण्यात आलेले आहेत. दुभाजक हटविल्यामुळे दोन ठिकाणचे हायमास्ट पोल रस्त्यात आल्याने त्यांचा वाहतुकीस अडथळा होत असल्याने हे पोल संस्थानमार्फत शिफ्ट करुन मिळावेत,अशी विनंती संस्थानकडे केली होती. त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीच्या विनंतीवरुन नांदुर्खी-पिंपळवाडी महामार्ग क्रॉसिंग चौक याठिकाणचा एक हायमास्ट पोल व बसस्थानक-स्वागतकक्ष महामार्ग क्रॉसिंग चौक या ठिकाणचा एक हायमास्ट पोल असे दोन हायमास्ट पोल काढून घेतलेले आहेत. ते नविन जागेत शिफ्ट करावयाचे आहेत. त्याकरीता शिर्डी नगरपंचायती मार्फत हायमास्ट लॅम्पची जागा निश्चित करुन नियोजित हायमास्टचे पोलपर्यंत आपलेमार्फत सप्लाय केबल टाकून मिळावी, म्हणजे हायमास्ट पोल नविन ठिकाणी बसविण्याची कार्यवाही तातडीने करता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मे. केल्ट्रॉन, मुंबई यांनी संस्थानच्या तसेच पोलीस विभागाचे अधिकाऱ्यांच्या व शिरडी नगरपंचायतीचे मा. उपनगराध्यक्ष व मा. मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली काम पुर्ण केले असून आता या सिग्नलचे फायनल टाईमिंग निश्चित करणेसाठी मे. केल्ट्रॉन, मुंबई यांनी वरील संदर्भीय पत्रानुसार पोलीस विभागाकडे व मा.मुख्याधिकारी, शिरडी नगरपंचायत यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे.

परंतू अद्याप मे.केल्ट्रॉन यांना शिरडी पोलीस विभागाकडून तसेच शिर्डी नगरपंचायतीकडून उत्तर प्राप्त झालेले नाही.

तरी संस्थानमार्फत नगर -मनमाड रस्त्यावरील वाहतूक व्यवस्थेसाठी उभारणेत आलेली सिग्नल व्यवस्था सुरु करणेबाबत लवकरात लवकर कार्यवाही होणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उपपोलिस अधिक्षक,कोपरगांव यांनी याबाबत प्रत्यक्ष पहाणी करुन त्वरीत सिग्नल चालू करणेबाबत कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**याचवेळी नगर-मनमाड रस्त्यावर बसविण्यात आलेले हरीप्रसाद चौक व एस.टी. स्टॅन्ड जवळील हायमास्ट पोल सात दिवसाचे आत हलविण्यात यावे असे ठरले,त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०७. <u>संस्थान मार्फत शिर्डी पोलिस स्टेशनला उपलब्ध करुन देण्यात आलेल्या क्रेनचे दर ठरविणेबाबत.</u>**

दिनांक ०६.०२.२००९ रोजीचे मा.सल्लागार परिषद सभेत शिर्डी शहरातील रस्त्यावरील वाहनांचे अडथळे दुर करणेसाठी सध्या एक क्रेन संस्थानमार्फत भाड्याने देण्यात येत आहे. याकामी संस्थानमार्फत अद्ययावत क्रेन विकत घेऊन तो शिर्डी पोलिस स्टेशनकडे वर्ग करावा व त्याची दुरुस्ती व देखभाल शिर्डी पोलिस स्टेशन यांनी करावी. याबाबत शिर्डी पोलिस स्टेशन यांनी प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा, असा निर्णय झालेला आहे.

उपरोक्त निर्णयानुसार संस्थानने अद्ययावत क्रेन खरेदी करुन तो दिनांक १३.०६.२०१० पासून शिर्डी पोलिस स्टेशनला दिलेला आहे. सदर क्रेनचा इंधन, दुरुस्ती व चालक यासाठीचा सर्व खर्च संस्थान करित आहे. जुन- २०१० ते मार्च- २०११ अखेर या कालावधीत इंधन, दुरुस्ती व चालक मिळून रु.९५,३७७/- मात्र एवढा संस्थानचा खर्च झालेला आहे. पोलीस स्टेशनकडे चालू असलेल्या सदर क्रेनसाठी संस्थानला दरमहा सुमारे रुपये ७,९५०/- इतका खर्च येत आहे.

तरी शिर्डी पोलिस स्टेशनला देण्यात आलेल्या सदर क्रेनचे दराबाबत मा.जिल्हा पोलिस अधिक्षक यांचेकडून निश्चिती होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रत्येक वाहनामागे अहमदनगर-नाशिक या शहरामध्ये ज्याप्रमाणे दर आकारण्यात येतात त्याप्रमाणे दर आकारणेबाबत मा.पोलिस अधिक्षक यांनी आदेश पारित करावेत अशी शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**०८. <u>श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये पोलिस पोस्ट उभारुन पोलिस कॉन्स्टेबलची नेमणूक करणेबाबत.</u>**

श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईनाथ व श्री साईबाबा सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना विविध सेवा दिलया जातात. यामध्ये २४ तास अपघात विभाग चालू असतो. शिर्डी हे तीर्थक्षेत्र असल्याने येथे नेहमीच साईभक्तांची गर्दी असते. गर्दीमुळे जवळपास नेहमीच वाहनांचे अपघात होतात. अपघात होत असल्यामुळे येथे MLC चे प्रमाणही जास्त आहे. तसेच मारहाणीचे प्रकारामुळे जखमी झालेले रुग्ण, विषबाधा, सर्पदंश, बेवारस रुग्ण इ.अनेक प्रकारच्या केसेस मेडिकोलिगल या प्रवर्गात मोडतात.

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलपासून शिरडी पोलिस स्टेशन हे सुमारे १- १.२५ किमोमीटर अंतरावर असल्यामुळे वरीलप्रमाणे रुग्ण दाखल झाल्यास सदरची माहिती पोलिसांना कळविणेकामी पोलिस स्टेशनला सतत जावे जागते. तसेच पोलिस पंचनामा करणे, रुग्णाचा जबाब नोंदविणे इ. कामांसाठी दाखल होणाऱ्या रुग्ण व त्यांचे नातेवाईकांना थांबावे लागते.

तरी वरील सर्व बाबी विचारात घेऊन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पोलिस पोस्ट उभारुन तेथे कायमस्वरुपी पोलिस कॉन्स्टेबलची नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पोलिस पोस्ट उभारणेकामी सुयोग्य जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, तर मा.जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी कर्मचारी उपलब्ध करुन द्यावा, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/वैद्यकीय संचालक)

**०९. <u>संस्थानमार्फत चारी नंबर ११ वरुन विकसित करण्यात येणाऱ्या रस्त्याचे सुपरव्हिजन चार्जेस माफ करणेबाबत व अतिक्रमणे काढून मिळणेबाबत.</u>**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गोदावरी उजवा तट कालवा वितरीका क्रमांक ११ बंदिस्त करुन, त्यावरुन संस्थान खर्चाने रस्ता विकसीत करणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव पाटबंधारे खात्याकडे सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे नियामक मंडळाच्या बैठकीत ठराव क्रमांक ४३/२ नुसार मान्यता दिलेली आहे.

सदर निर्णयानुसार, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडील दिनांक १८ जानेवारी, २०११ चे पत्राने पाच वर्षाचे कराराने काही शर्तीना अधिन राहून विषयांकित रस्ता विकसित करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

पाटबंधारे खात्याचे मान्यतेनुसार, मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, विषयांकित चारी क्रमांक ११ वरील रस्ता विकसित करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेत येऊन, बांधकाम ठेकेदारास दिनांक ०८ मार्च, २०११ रोजी कार्यादेश पारित करणेत आलेला आहे. संबंधित बांधकाम ठेकेदार लवकरच कामास सुरुवात करणार आहेत.

तथापि, जलसंपदा विभागाकडील दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीचे ना हरकत प्रमाणपत्रात, संस्थानकडून चारी बंदिस्त करणेसाठी देखरेख खर्च (Supervision Charges) १५% आकारणेत येतील तसेच चारी बंदिस्त करुन रस्ता विकसीत करणेकामी जलसंपदा विभागाचे मालकीचे जागेत अतिक्रमण असल्यास ते संस्थानने स्वःखर्चाने काढून टाकावे तसेच भविष्यात अतिक्रमण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी अशा अटी नमूद केलेल्या आहेत.

वास्तविक पहातां, संस्थान ही एक सार्वजनिक व धर्मादाय संस्था असून, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ अन्वये शासनाने पुर्नःगठीत केलेली संस्था आहे. या अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन, साईभक्तांना तसेच स्थानिक रहिवाशांच्या सोयी-सुविधेसाठी, व्यापक सार्वजनिक हेतुने विषयांकित रस्ता विकसित करण्याचे काम हाती घेणेत आलेले आहे. सदर विकसित करणेसाठी संस्थानमार्फत स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था नेमून, अंदाजे रक्कम रुपये ०७.३० कोटी मात्र इतका खर्च संस्थान निधीतून करणेत येणार आहे. मा. शासनाकडे संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार, विषयांकित रस्ता संस्थान निधीतून विकसित करणेसाठी मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, तो मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

उपरोक्त सर्व बार्बीचा विचार करतां, ना हरकत प्रमाणपत्रात नमुद केलेनुसार, पाटबंधारे विभागामार्फत संस्थानकडून आकारणेत येणारा १५ टक्के देखरेख खर्च कायमस्वरुपी माफ होणे उचित व न्याय्य आहे. तसेच चारी क्रमांक ११ चे लगत असलेली अतिक्रमणे ही पाटबंधारे खात्याचे मालकीचे जागेतील असल्याने, ती हटविणेबाबत पाटबंधारे खात्यामार्फत उचित कार्यवाही होणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत चारी नंबर ११ वरुन रस्ता विकसित करण्यात करणेकामी चारीवर ज्या अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण केले आहे, त्यांना पाटबंधारे खात्यामार्फत अतिक्रमण काढून घेणेसाठी नोटीसा बजाविण्यात याव्यात तसेच विकसित करण्यात यावयाच्या रस्त्याचेसुपरव्हिजन चार्जेस माफ करणेबाबत राज्यशासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशी या समितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**१०. शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील सर्व्हे नंबर ११४/९ क्षेत्र २० आर व सर्व्हे नंबर १२५/३ क्षेत्र १२ आर अशी एकुण ३२ आर जागेच्या मोबदल्यात संस्थान मालकीची मौजे निमगांव को-हाळे शिवारातील गट नंबर ८७ पै व ८८ पै मधील ४० आर जागा कार्यालय, कर्मचारी निवासस्थाने आदि आवश्यक बांधकाम करुन देऊन हस्तांतरीत करण्यात यावी तसेच शासनाच्या मान्यतेसाठी जलसंपदा विभागाचे मान्यतेसह विहीत पध्दतीने प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरलेले आहे.

त्यानुसार, मा. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन व मा. विधी व न्याय विभाग यांचेकडेस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत आलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. जलसंपदा विभागाचे, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे दिनांक २२ जून, २०१० रोजीचे नियामक मंडळाचे बैठकीतील ठराव क्रमांक ४३/१ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि सदर निर्णयात, विषयांकित हस्तांतर हे मा. जिल्हाधिकारी यांचे सहमतीने व्हावे व संस्थानने आवश्यक ते बांधकाम करुन, हस्तांतर करुन दिलेनंतर अस्तित्वातील जागेचा ताबा द्यावा, असे नमूद केलेले आहे.

उपरोक्त विवेचनानुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेस्तव दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१० रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, सदरचा प्रस्ताव मा. शासनाचे मान्यतेसाठी विचाराधीन आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तथापि, मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, जलसंपदा विभागाच्या प्रस्तावित हस्तांतरणात मिळणाऱ्या ३२ आर जागेत उभारावयाच्या मध्यवर्ती माहिती केंद्र या प्रकल्पासाठी संस्थानमार्फत वास्तुविशारदाची नेमणुक करणेत आलेली असून, त्यांनी प्राथमिक बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

त्याअनुषंगाने, जलसंपदा विभागाची प्रस्तावित ३२ आर जमीन संस्थानला त्वरीत ताब्यात मिळाल्यास, संस्थानमार्फत जलसंपदा विभागाचे कार्यालयासाठी व कर्मचारी निवासस्थानांसाठी सध्या उपलब्ध असलेल्या संस्थान मालकीच्या इमारतीतून उचित व योग्य जागा उपलब्ध करुन देण्यात येईलअसा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करणेबाबत लवकरात लवकर कार्यवाही करणेत यावी अशी शिफारस करण्यात आली ती मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**११. <u>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर होणेबाबत.</u>**

शिर्डी हे भारतातील सर्वधर्मियांचे श्रध्दास्थान आहे. दररोज सुमारे ५० हजार तर उत्सवासाठी आणि सार्वजनिक सुट्टयांच्या कालावधीत दीड ते पाच लाख भक्त श्री साईंचे दर्शनार्थ शिर्डीस येतात. साहजिकच शिर्डी येथील विद्यमान सार्वजनिक सोयीसुविधा अपुऱ्या पडत आहेत. श्री साईबाबा महासमाधीचे शताब्दी वर्ष माहे सप्टेंबर, २०१७ ते ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. त्यावेळी वर्षभर प्रत्येक महिन्यात सुमारे पंचवीस लाख साईभक्त शिर्डीला भेट देतील असा अंदाज आहे.

सध्या साई संस्थानला सन १९८९ मध्ये कार्यान्वीत केलेल्या शिर्डी, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा होतो. या योजनेतील साठवण तलावाची क्षमता ३३२ दशलक्ष लिटर्स इतकी असून, अंदाजे ४५ दिवस पुरेल इतकी आहे. या योजनेची देखभाल संस्थानतर्फे करण्यात येत आहे. सन १९९२ मध्ये साधारणत: ५० ते ७५ हजार साईभक्त उत्सवकाळात येत होते. तत्कालीन भक्तांची संख्या विचारात घेऊन सदर योजनेसाठी ६० दिवस पाणी पुरेल इतकी साठवण तलावाची क्षमता ठरविणेत आलेली होती. संस्थानमार्फत २५०० नविन भक्तनिवास खोल्या उपलब्ध करुन दिल्याने व नविन साई प्रसादालयात दररोज ३० ते ३५ हजार भक्त प्रसाद भोजन करीत असल्याने साठवण क्षमता अत्यल्प (१५ दिवसांवर) पोहचली आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे साठवण क्षमता ६० दिवसांपर्यन्त वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

त्यामुळे साठवण तलावाची क्षमता वाढीबरोबरच नवीन वाढीव जलशुध्दीकरण केंद्र उभारणेही गरजेचे आहे. कारण सध्याची क्षमता (६.६ MLD) ही फारच अपुरी पडत आहे. सध्याचे योजनेतील जलवाहिन्या जुन्या झालेल्या असल्याने त्यामधुन वारंवार गळती होते, तसेच त्यांची क्षमता ही अपुरी पडते. त्यामुळे संस्थानसाठी खालील बाबींचा समावेश असलेली प्रस्तावीत नविन वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणे उचित ठरेल :

०१. विस्तारीत पाणीपुरवठा योजनेचे नियोजन हे येत्या २५ ते ३० वर्षात वाढणाऱ्या भक्तांच्या गर्दीचा (लोकसंख्येचा) अंदाज घेऊन करावे लागेल. त्यानुसार तळयाची क्षमता वाढविणे.

०२. सध्या १४ MLD इतकी क्षमता असलेला WTP आवश्यक आहे. पुढील १५ वर्षाचा विचार करता सुमारे २५ MLD क्षमतेच्या नवीन WTP ची उभारणी करणे आवश्यक आहे.

०३. गोदावरी उजवा तट कालव्यापासून तळयापर्यन्तची पाईपलाईन व गेटचे नुतनीकरण करणेसाठी खर्चाचा अहवाल तयार करणे.

०४. नवीन जलवाहिन्या, पंपींग मशिनरी व साठवण टाक्यांची उभारणी, नवीन वितरण पाईलपलाईन्स वगैरे सर्व खर्चाचा अहवाल तयार करणे.

वरीलप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना शासनाचे मार्फत हाती घेणे अत्यंत आवश्यक आहे. सदर योजनेवर होणाऱ्या एकुण अंदाजपत्रकीय रकमेच्या १० टक्के इतकी रक्कम लोकवर्गणीचे स्वरुपात शासनाकडे भरणेस संस्थान तयार आहे. तथापि संस्थानसाठी अशा प्रकारे स्वतंत्र वाढीव पाणीपुरवठा योजना मंजूर करणे अडचणीचे असल्यास, संस्थानसह कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव कोऱ्हाळे या गांवासह वाढीव पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वीत करणेसंदर्भात मा. शासनाकडे प्रस्तावाचे पृष्ठ्यर्थ अभिप्राय सादर करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानसह कनकुरी, पिंपळवाडी, निमगांव कोऱ्हाळे या गांवासह वाढीव पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वीत करणेसंदर्भात मा. शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा व त्याची प्रत मा.जिल्हाधिकारी यांना माहितीसाठी देण्यात यावी अशी समितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**१२. श्री साईबाबा संस्थानकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमार्फत एक्सप्रेस फीडर उपलब्ध होणेबाबत.**

शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व श्री साईबाबांचे चरणी श्रद्धा सुमन अर्पण करण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगभरातून हजारो साईभक्त दररोज सतत शिरडीत ये जा करीत असतात. कधी कधी हा आकडा लाखोच्या घरात जातो. श्री साईबाबांच्या भक्तांना ते दर्शनासाठी आल्यानंतर पिण्याचे पाण्यापासून ते निवासाचे सोयीपर्यंत सर्व सुविधा पुरवाव्या लागतात. श्री साईनाथ रुग्णालयात भक्तांना व पंचक्रोशीतील गावक-यांना अल्पदरात वैद्यकीय सेवा दिली जाते. सर्व सुविधा पुरवितांना वीजपुरवठयाची अत्यंत आवश्यकता असते. वीजेअभावी रुग्णालयातून वैद्यकीय सेवा पुरवितांना, पिण्याचे पाणी पुरवितांना, स्नान वगैरेसाठी अडचणी येतात.

इतर शहरापेक्षा शिरडी शहराची परिस्थिती वेगळी आहे. "श्रीं" च्या दर्शनासाठी येणारा साईभक्त शिरडी शहराशी अपरिचीत असतो. साईभक्तांना शिरडी शहरातील रस्त्यांची माहीती नसल्याने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर स्ट्रीटलाईट बंद होऊन अंधारामुळे साईभक्त रस्ता तसेच ते राहण्याचे ठिकाण / लॉज / हॉटेल शोधताना गोंधळून जातात.

संस्थानकरीता भारनियमन होऊ नये म्हणून तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे विविध अधिकाऱ्यांनी संस्थानकडे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने पत्र क्र. (१) काअ / संगम / तांत्रिक / ६३८५ दि.१८-०८-२००१, (२) काअ / संगम / तांत्रिक /७७४७ दि.०८-१०-२००१, (३) काअ / संगम / तांत्रिक /८८६४ दि.०१-०२-२००२ , (४) काअ / संगम / तांत्रिक / ६८१५ दि.१६-१०-२००२, (५) काअ / संगम / तांत्रिक / २६५५ दि.०७-०४-२००३, (६) अअ / नगर / संवसुम / ता / शिर्डी उपकेन्द्र / ६४३६ दि.२१-०६-२००३ या पत्रान्वये शिरडीत महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे उपकेंद्र हे श्री साईबाबा संस्थान, शिरडी व साईभक्त यांना सुरळीत व अखंडीत वीज पुरवठा करणेसाठी व सार्वजनिक प्रयोजनासाठी उभे करण्यात येत आहे व त्याचप्रमाणे सदर उपकेंद्रामुळे श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना खंडीत वीजपुरवठा कालावधीसाठी होणा-या आर्थिक खर्चामध्ये कपात होईल अशी लेखी स्वरुपात हमी देऊन याकामी आवश्यक असणारी जागा संस्थानने उपलब्ध करुन द्यावी अशी लेखी स्वरुपात मागणी केली होती.

त्यानुसार संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत याविषयी सविस्तर चर्चा होऊन मा.व्यवस्थापन मंडळाच्या दि.०९-१०/०८/२००३ रोजी झालेल्या ठराव क्रमांक ३७१ अन्वये शेती महामंडळाकडील भू-संपादनाने मिळालेली जमीनीपैकी दिलेल्या गट नंबर ८७ व ८८ मधील ६५ x ८० मीटर जागा नाममात्र रुपये १०१/- वार्षिक भाडयाने ११ वर्षे मुदतीच्या कराराने दिलेली आहे.

याकामी महाराष्ट्र राज्याचे मा. चॅरीटी कमिशनर, मुंबई यांचे दि. २३-०३-२००४ चे जजमेंटमध्येही शिरडीत महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे उपकेंद्र हे श्री साईबाबा संस्थान, शिरडी व साईभक्त यांना सुरळीत व अखंडीत वीज पुरवठा करणेसाठी व सार्वजनिक प्रयोजनासाठी उभे करण्यात येत आहे व त्याचप्रमाणे सदर उपकेंद्रामुळे श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना खंडीत वीजपुरवठा कालावधीसाठी होणा-या आर्थिक खर्चामध्ये कपात होईल अशी लेखी स्वरुपात महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने हमी दिल्याने याकामी आवश्यक असणारी जागा संस्थानने उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात असल्याचे स्पष्ट नमूद आहे. मा. चॅरीटी कमिशनर, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. २३-०३-२००४ चे जजमेंट आल्यानंतर त्याच्या आधारावर मा. दुय्यम सहाय्यक निबंधक, राहाता यांचेपुढे महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे मा.कार्यकारी अभियंता श्री. लक्ष्मण सखाराम खडके व संस्थानचे तत्कालीन कार्यकारी अधिकारी मा श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे यांनी नोंदणी पत्र केलेले आहे.

नोंद्णी झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने जागा ताब्यात घेऊन त्यावर ३३ के.व्ही/ ११ के.व्ही डाबाचे व ५ एम.व्ही.ए. २ क्षमतेचे सबस्टेशन उभारलेले आहे. परंतू सबस्टेशनचे काम पूर्ण झाल्यानंतर तत्कालीन महाराष्ट्र राज्य वीज मंडळाने व सध्याच्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने मा. चॅरीटी कमिशनर , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. २३-०३-२००४ चे जजमेंटकडे दुर्लक्ष करून शिर्डीत भारनियमन चालू केले. यानंतर संस्थानकरीता म.रा.वीज वितरण कंपनीच्या वीजपुरवठ्याचे भारनियमन बंद होणेबाबत संस्थानमार्फत वेळोवेळी पत्रव्यवहार करण्यात आला, पण याकडे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने दुर्लक्ष करून भारनियमन रद्द न करता उलट भारनियमनाचा कालावधी वाढविलेला आहे. सध्या संस्थानकरीता रोज ८ ते ९ तासाचे भारनियमन सुरू असून यामुळे भक्तांना पुरवाव्या लागणा-या सुविधांचे वेळापत्रक पुर्णपणे विस्कळीत झाले असून लाखो साईभक्तांची गैरसोय निर्माण झालेली आहे. याव्यतिरिक्त अंडर फ्रिक्वेन्सी, वेळोवेळी करावयाच्या दुरुस्त्या, निर्माण झालेले दोष व ओव्हर लोडींग या मुळेही वीजपुरवठा बंद ठेवला जातो. कित्येक वेळा दिवसातील १० तास ते ४८ तासापर्यंत अघोषित व अनपेक्षीत सलग भारनियमन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून होते. सध्या काही कालावधी करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून भारनियमन बंद झालेले आहे. पण ही परिस्थिती कायम राहणारी नाही.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



शिर्डी शहरातील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वाहिन्या सक्षम करणेसाठी संस्थानने यापूर्वी लाखो रुपये खर्च केलेले आहेत. शिर्डीच्या ३३/११ केव्ही उपकेन्द्रासाठी कोटयावधी रुपये किंमतीची जागा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला नाममात्र भाडयाने (रु.१०१/- फक्त) दिलेली आहे.

श्री साईबाबा संस्थानने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीला नेहमीच भरघोस व वेगवेगळया प्रकारे मदत केलेली असून त्याबदली फक्त संस्थानकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा पुरेसा व अखंडीत व्हावा, हीच माफक अपेक्षा संस्थानने ठेवलेली आहे.

याकरीता संस्थानसाठी वीजपुरवठ्याचे भारनियमन बंद होण्यासाठी स्पेशल एक्स्प्रेस फिडर टाकून मिळावा जेणेकरुन शिर्डी येथे श्री साईबाबांच्या दर्शनासाठी व चरणी श्रद्धा सुमन अर्पण करण्यासाठी संपूर्ण भारतातूनच नव्हे तर जगभरातून येणाऱ्या लाखो साईभक्तांची गैरसोय दूर होईल. व श्रींच्या आशिर्वादासोबतच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीजपुरवठ्याबाबत चांगला संदेश घेऊन श्री साईभक्त परत त्यांच्या गांवी आनंदाने जाऊ शकतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**श्रीसाईबाबा संस्थानकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमार्फत ३३ के.व्ही. दाबाचा एक्स्प्रेस फीडर उपलब्ध करुन देण्यात येईल, परंतु त्यासाठी संस्थानचे सध्या असलेले ११ के.व्ही. दाबाचे यंत्रणेमधील ट्रान्सफॉर्मर, ओ.सी.बी. हे सर्व बदलावे लागतील व ते ३३ के.व्ही. क्षमतेचे नविन बसवावे लागतील व याचा संपूर्ण खर्च संस्थानला करावा लागेल. असे मा.कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं., संगमनेर यांनी सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं., संगमनेर यांनी याकामी सविस्तर प्रस्ताव संस्थानला सादर करावा व या प्रस्तावावर व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा,अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**१३. संयुक्त घनकचरा प्रकल्पासाठी अखंडीत वीजपुरवठा उपलब्ध करुन देणेबाबत.**

राहाता नगरपरिषद हद्दीमध्ये स.नं. ३४१ येथे राहाता नगरपरिषद, श्री साईबाबा संस्थान शिरडी व नगरपंचायत शिरडी यांनी एकत्रित घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारलेला आहे. या प्रकल्पास महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनी कडून सी-५२ मुख्याधिकारी राहाता नगरपरिषद या नावाने, निमगांव-निघोज सबस्टेशन (ग्रामीण) मधून थ्री फेज कनेक्शन घेतलेले आहे. परंतू सदर विजपुरवठा ग्रामीण फीडरमधून जोडलेला असलेने भारनियमाचे प्रमाण जास्त आहे, त्यामुळे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प पुर्ण क्षमतेने चालविणे शक्य होत नाही. विजपुरवठया अभावी जमा झालेल्या कचऱ्यावर प्रक्रिया न झालेने परिसरामध्ये मोठया प्रमाणात दुर्गंधी पसरते सबब पिंपळवाडी ग्रामस्थांकडून सदरप्रकरणी वारंवार तक्रारी येत आहेत.

तरी नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्प प्रक्रियास जोडलेला विजपुरवठा राहाता अथवा शिरडी या शहरी फिडरमधून जोडण्यात यावा जेणेकरुन भारनियमनाचे प्रमाण कमी होऊन घनकचरा प्रक्रिया प्रकल्प नियमीत सुरु ठेवण्यास मदत होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर संयुक्त घनकचरा करारनाम्यानुसार सदर यंत्रणेची संपूर्ण जबाबदारी राहाता नगरपालिकेची असून पुढील कार्यवाही राहाता नगरपालिकेने पुर्ण करवुन घेऊन अखंडीत वीजपुरवठा चालु राहील याबाबत राहाता नगरपालिकेने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडे पाठपुरावा करावा व पावसाळयापूर्वी विजपुरवठा सुरळीत होईल अशी कार्यवाही करावी,अशी शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**१४. शिर्डी बसस्थानकाचे बांधकामातील अडचणीबाबत**

मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई यांचे मान्यतेनुसार तसेच मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००६/६०७/(८७)/का.सोळा, दिनांक १३ जानेवारी, २००९ नुसार शिर्डी येथील अद्यायवत बसस्थानक उभारणी प्रकल्पाचे अंदाजित खर्च रक्कम रुपये ७.६६ कोटी मात्रस मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, शिर्डी येथील बसस्थानक विकसित करण्याच्या बांधकामाचा कार्यादेश मे. पाटील कन्स्ट्रक्शन्स, पुणे यांना देणेत आलेला आहे. प्रवाशांच्या व परिवहन महामंडळाचे कामकाजासाठी तात्पुरत्या बसस्थानकाचे व वाहनतळाचे बांधकाम पूर्ण करणेत आलेले असून, त्याचा वापर ही सुरु करणे आलेला आहे.

तद्‌नंतर, बांधकाम ठेकेदार यांनी दिनांक ०५ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रत्यक्ष कार्यस्थळावर, मंजूर रेखांकनानुसार बांधकामाचे कामास सुरुवात केलेली आहे. तथापि, जुने बसस्थानक इमारतीत तसेच बसस्थानक परिसरात असणारे दुकान गाळे ( बुकस्टॉल, कॅन्टीन, पानस्टॉल, रसवंती, फ्रुट ज्युस सेंटर, झुणका भाकर केंद्र, एसटीडी बुथ आदि ) अद्यापी खाली करुन ताब्यात न मिळाल्याने, बांधकाम ठेकेदारास, नियोजित बसस्थानकाचे इमारतीचे मुळ ढाच्याचे / पायाचे काम करणे अशक्य झालेले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नियोजित इमारतीचे मुळ ढाच्याचे / पायाचे एकुण ८० आर.सी.सी. कॉलम्स त्यापैकी ७५ कॉलम्स उभारणीचे काम पूर्ण झालेले असून, केवळ जुन्या बसस्थानकाची उर्वरित जागा ताब्यात न मिळाल्याने ०५ कॉलम्स उभारणेचे काम बाकी आहे. त्यामुळे इमारतीचे उर्वरित बांधकाम वेगाने सुरु करणेस अडचणी येत आहेत.

उपरोक्त दुकान गाळेधारकांनी मा. न्यायालयात दावा दाखल केलेला असून, सदर दाव्यात मा. न्यायालयाने जैसे थे स्थिती ठेवणेबाबत आदेश दिलेले आहेत. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस जागा खाली करुन मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला असून, त्यावर कार्यवाही सुरु आहे, असे परिवहन महामंडळामार्फत कळविणेत आलेले आहे.

शिर्डी येथील बसस्थानकाचे काम वेगाने व वेळेत पुर्ण व्हावे म्हणून जुन्या बसस्थानक इमारतीबरोबरच बांधकामासाठी आवश्यक असणारा सर्व परिसर बांधकाम ठेकेदाराचे ताब्यात देणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे. त्याशिवाय बसस्थानक इमारतीचे बांधकाम पूर्ण वेगाने व वेळेत पूर्ण करता येणे अशक्य आहे.

उपरोक्त सर्व तपशीलाचा विचार करता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अहमदनगर विभाग यांचेमार्फत उचित कार्यवाही होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,यांचे इंजिनिअरने इमारतीचे दैनंदिन बांधकामावर पर्यवेक्षण करावे तसेच या ठिकाणी असणारे असणारे अतिक्रमणे काढणेबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी त्वरीत आदेश निर्गमित करणेत बाबत कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१५. **शिर्डी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्त्यावर उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना वीजपुरवठा करणेबाबत.**

शिरडी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे संस्थानमार्फत उभारणीसाठी विनंती करून शिरडी नगरपंचायत, डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या सर्वांनी या बसविण्यात येणाऱ्या सदर पथदिव्यांचे लाईट बील तसेच देखभाल व दुरुस्ती त्यांचे संस्थेमार्फत केली जाईल, असे लेखी दिलेले आहे.

यांनतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांच्या निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीमार्फत महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक-सासंवि २००७/९९२/(१७६)/का.सोळा दिनांक २० फेब्रुवारी,२००९ अन्वये त्यास मान्यता देताना काही अटी नमूद केलेल्या आहेत. या अटी पुढीलप्रमाणे-
०१) सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे, त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत / ग्रामपंचायतीची राहील.
०२) कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना कळविण्यात येते की, सदर बाबीकरीता येणारा खर्च श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांच्या विश्वस्त निधीतून करावा व या खर्चाबाबतचा कार्यपूर्ती अहवाल शासनास सादर करावा.

या पत्राच्या प्रती शासनामार्फत (१). मा.प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई, (२). मा.राज्यमंत्री (विधी व न्याय) यांचे खाजगी सचिव, (३). कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (४). अध्यक्ष, शिर्डी नगरपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (५). कार्यकारी अधिकारी, शिर्डी नगरपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (६). ग्रामसेवक, कनकुरी ग्रामपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, (७). ग्रामसेवक, डो-हाळे ग्रामपंचायत, ता.राहाता, जिल्हा अहमदनगर, या सर्वांना पाठविण्यात आलेल्या आहेत.

शिरडी नगरपंचायत, डोऱ्हाळे ग्रामपंचायत,कनकुरी ग्रामपंचायत या सर्वांनी शिरडी-कनकुरी-डोऱ्हाळे रस्त्यावर बसविण्यात येणाऱ्या पथदिव्यांना वीजपुरवठा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपंचायत) यांचेमार्फत करण्यात येऊन या पथदिव्यांचे लाईट बील तसेच देखभाल व दुरुस्ती त्यांचे संस्थेमार्फत केली जाईल, असे लेखी दिलेले आहे व आता शासनाने मान्यता देताना सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे, त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत/ग्रामपंचायतीची राहील. या अटीवरच मान्यता दिली आहे. व त्यानुसार संस्थानने शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून शिरडी - कनकुरी - डोऱ्हाळे रस्त्यावर पथदिवे उभारणीचे काम १ वर्षापूर्वीच पूर्ण केले आहे.

पण पथदिव्याची उभारणी पूर्ण झाल्यानंतर संस्थानने डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या दोन्ही ग्रामपंचायतीना पत्र क्र.(१) एसएसएस-विद्युत-१३१-२०१०दि.०१-०१-२०१०,(२) एसएसएस-विद्युत- ५१०७-२०१० दि.२५-०३-२०१०,(३) एसएसएस-विद्युत-७२६५-२०१० दि. १४-०५-२०१०,(४) एसएसएस- विद्युत-१०८१६-२०१० दि.०२-१२-२०१० अन्वये वारंवार लेखी विनंती करूनही डोऱ्हाळे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत या दोन्ही ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी या पथदिव्यांना वीजपुरवठा देण्यास नकार दर्शविला असून त्यामुळे अद्याप हे पथदिवे चालू होऊ शकलेले नाहीत. महाराष्ट्र शासनाने मान्यता देताना सदर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या पथदिव्यांचे वीजबिल भरणे,त्याचप्रमाणे त्यांची देखभाल व दुरुस्ती करणे याची जबाबदारी संबंधित नगरपंचायत/ग्रामपंचायतीची राहील, या अटीवरच मान्यता दिल्याने संस्थानने या पथदिव्यांना वीजपुरवठा केला,दरमहाचे वीजबील भरले, दुरुस्ती व देखभालीचा खर्च संस्थानने केला तर महाराष्ट्र शासनाच्या आदेशाचा अवमान होऊन ग्रामपंचायतींच्या व संस्थानच्या ऑडीट्मध्ये ही बाब नोंदली जाऊ शकते.

संस्थानमार्फत आम्ही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, ग्रामपंचायत हद्दीतील वीजबीलापोटी महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस १००% अनुदान मिळते. त्यामुळे कनकुरी व डो-हाळे ग्रामपंचायतींना पथदिव्यांसाठी वीजपुरवठा करण्यासाठी कोणताही वेगळा खर्च सहन करावा लागणार नाही. याबाबत या पूर्वी महाराष्ट्र शासनाकडून अशी रक्कम जिल्हा परिषदेकडे वर्ग झालेली आहे. त्यासंबंधीचे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने वेळोवेळी विविध परीपत्रक प्रसिद्ध केलेली आहेत.

(१) महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार संबंधित गावाच्या हद्दीत शिरडी नगरपंचायत, डोऱ्हाळे ग्रामपंचायत, कनकुरी ग्रामपंचायत यांच्या विनंतीनुसार संस्थानमार्फत उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घेण्याबाबत कार्यवाही त्वरीत पूर्ण करणेस संबंधित ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांना कळविणे गरजेचे आहे.

(२) महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार या कामाचा कार्यपूर्ती अहवाल शासनाला सादर करावयाचा असल्याने त्वरीत संबंधित गावाच्या हद्दीतील उभारण्यात आलेल्या पथदिव्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून वीजपुरवठा जोडून घेतल्याबाबतचा पूर्तता अहवाल संस्थानला प्राप्त होणे आवश्यक आहे.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, या पथदिव्यांना तातडीने आठ दिवसात सिंगल फेजिंग यंत्रणेव्दारे वीजपुरवठा उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता यांनी कार्यवाही करावी असे निर्देश मा.जिल्हाधिकारी साहेब यांनी दिले,त्याची नोंद घेण्यात आली.**

(कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**१६) <u>सल्लागार परिषदेच्या विनिमयाबाबत.</u>**

सल्लागार परिषदेचे तयार करण्यात आलेले विनिमयाच्या प्रती उपस्थित सदस्यांना पुरविण्यात येऊन त्याची नोंद घेण्यात आली.

**१७) <u>शिर्डी स.नं. ०१ त्रिकोणामधील दूकान गाळयांचे जागेसंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार पुढील कार्यवाहीबाबत.</u>**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार शिर्डी नगरपालिका शिर्डी यांनी लवकरात लवकर कार्यवाही करावी,अशी शिफारस करण्यात आली,त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-विधीअधिकारी)

**१८) <u>सल्लागार परिषद सभेच्या इतिवृत्त.</u>**

दिनांक १६.०४.२००५, दिनांक ०१.१०.२००५, दिनांक १३.०१.२००८ व दिनांक ०६.०२.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार परिषद सभांच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या ते वाचून कायम करण्यात आले

---

**विषय नं.०५** **दिनांक १०.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त.**

**निर्णय क्र.३४२** दिनांक १०.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**(०१) सन २०११-१२ या वर्षाकरिता प्रसादालय व कॅंटीन विभागासाठी वार्षिक किराणा माल खरेदी कामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

सन २०११-१२ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल व तांदुळ वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१३.०२.२०११ मध्ये तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२८.०२.२०११ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०१.०३.२०११ ते दि.१०.०३.२०११ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.१२.०३.२०११ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली होती. उपसमितीचे दिनांक २९.०३.२०११ रोजीचे सभेत प्राप्त नमून्यांमधून नमूने निवडलेले आहेत. निवडलेल्या नमूनाधारकांना आजचे सभेत समक्ष चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



यावर सविस्तर चर्चा होऊन उपसमितीने केलेल्या खालीलप्रमाणे शिफारशी मान्य करण्यात आल्या.

**सन २०११-१२ वार्षिक प्रसादालय व कॅन्टीन मालाचे निविदाधारकांनी मुळ दरावर सुट देऊ केलेल्या दरांचा तक्ता... (मालानुसार)**

| अ.नं. | निवडलेल्या नमुनेधारकांचे नांव | जात/ प्रकार | मुळ दर रु. (व्हॅटसह) | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| **०१.** | **तांदुळ - सोना मसुरी नवीन/जुना<br>मागणी ८००० क्विंटल (२००० क्विंटल जुना + ६००० क्विंटल नवा)** | | | |
| ०१. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | A old | २,२२५/- | २,१५०/- |
| ०२. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | २,३५७.८० | २,३००/- |
| ०३. | संदीप टेडींग कंपनी, नांदेड | A old | २,२५१/- | **२,१२५/-** |
| ०४. | केदारनाथ ट्रेडींग कंपनी, नांदेड | Old | २,३००/- | २,१७५/- |
| ०५. | साईराईस इंडस्ट्रीज, बसापट्टणम | १ old | २,७५०/- | २,७००/- |
| | | २ new | २,३५०/- | २,३००/- |
| ०६. | आर. मुथ्था राईस हाऊस, आ.बाद | २ | २,३९४/- | २,१७५/- |
| ०७. | हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | A old | २,४०१/- | २,४०१/- |
| ०८. | कमलेश ट्रेडींग कंपनी, नांदेड | Old | २,२७५/- | २,१७०/- |
| ०९. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | New | २,०८१/- | **१,९७५/-** |
| १०. | मे.बाफना बाजार, नाशिक | A | २,९०१/- | २,७६५/- |
| ११. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | २,६७५/- | २,४७५/- |
| **०२.** | **हरबरा दाळ - बिगर पॉलीश-मागणी ८००० क्विंटल** | | | |
| ०१. | वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड | **२** | ३,५००/- | ३,४००/- |
| ०२. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | **२** | ३,४७५/- | ३,३००/- |
| ०३. | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | **B** | ३,४२५/- | **३,२००/-** |
| ०४. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | B | ३,७५१/- | ३,४५०/- |
| ०५. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | ३,५६५/- | ३,२९१/- |
| ०६. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | ३,२५०/- | ३,४५०/- |
| **०३.** | **तुरदाळ - लातुर फटका-मागणी १७०० क्विंटल** | | | |
| ०१ | संदिप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६,४६०/- | ६,१००/- |
| ०२ | वृषभ ट्रेडींग कंपनी, नांदेड | १ | ६,५८०/- | ६,४८०/- |
| | | २ | ६,५५५/- | ६,४५५/- |
| ०३ | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं.,नाशिक | | ६,९००/- | ६,८००/- |
| ०४ | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | **A** | ६,४७५/- | **६,०५०/-** |
| ०५ | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | **A** | ७,०००/- | ६,४३५/- |
| ०६. | मयुरी ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६,५६५/- | ६,२५०/- |
| **०४.** | **मुगदाळ - बोल्ड-मागणी २२० क्विंटल** | | | |
| ०१. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | १ | ६,६००/- | ६,७००/- |
| | | २ | ६,०००/- | **६,०००/-** |
| ०२ | संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६,८७५/- | ६,८००/- |
| ०३ | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | ६,३२५/- | ६,३२५/- |
| ०४ | कैलास ट्रेडींग कंपनी, नांदेड | | ६,९००/- | ६,७७५/- |
| **०५.** | **उडीददाळ-मागणी २ क्विंटल** | | | |
| ०१. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | | ६,१००/- | **६,०००/-** |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं.नाशिक | | ६,५००/- | ६,४००/- |
| **०६.** | **वाटाणा - हिरवा, इंम्पोर्टेड-मागणी ६०० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | **A** | २,८५१/- | २,६३१/- |
| | | **B** | २,७५१/- | २,६००/- |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | **A** | २,८५१/- | **२,५८०/-** |
| ०३. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | २,७०२/- | २,७००/- |
| ०४. | नितिन सेल्स कार्पोरेशन, | | २,९७५/- | २,९७५/- |
| **०७.** | **मुग - आख्खा-मागणी ८०० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | **A** | ६,७५१/- | ६,७००/- |
| | | **B** | ६,६५१/- | ६,६००/- |
| ०२. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे | **१** | ५,९००/- | **५,८००/-** |
| **०८.** | **मठ-मागणी ८०० क्विंटल** | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं.,नाशिक | **A** | ४,२००/- | ४,१००/- |
| | | **B** | ४,०००/- | **३,९००/-** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | A | ५,२५१/- | ४,९५१/- |
| ०३. | नितिन सेल्स कार्पोरेशन | अ | ५,८७५/- | ५,१७५/- |
| .०४. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | ४,८३०/- | ४,८३०/- |
| **०९.** | **रवा - मध्यम-मागणी ४५० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | १,९००/- | १,८७५/- |
| | | B | १,९७५/- | **१,८५०/-** |
| ०२. | पडतानी मिल, संगमनेर | | २,०५०/- | २,०५०/- |
| ०३. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | A | १,९००/- | **१,८५०/-** |
| **१०.** | **मैदा-मागणी ७०० क्विंटल** | | | |
| ०१. | पडतानी मिल, संगमनेर | | २,०००/- | २,०००/- |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | १,८५०/- | **१,७७०/-** |
| ०३. | राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | | १,८००/- | १,७८०/- |
| **११.** | **हिरा बेसन-मागणी ४ क्विंटल** | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | ४,४००/- | ४,४००/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४,२०१/- | **४,२००/-** |
| **१२.** | **गुळ- कोल्हापुरी, पिवळ-मागणी २५० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | २,९५०/- | **२,६००/-** |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | २,६५१/- | **२,६००/-** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ३,५५१/- | ३,४३१/- |
| **१३.** | **शेंगदाणा- वाळलेला, बोल्ड-मागणी ३५० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | ७,३००/- + vat | ७,१००/- + vat |
| | | B | ७,१००/- + vat | ७,०००/- + vat |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ७,१५१/- + vat | **६,८५१/- + vat** |
| **१४.** | **साबुदाणा - डबलहत्ती, मिल्कव्हाईट-मागणी २६० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | ४,४५०/- + vat | ४,५००/- + vat |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | ४,१००/- + vat | **४,२००/- + vat** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ४,७५१/- + vat | ४,६५१/- + vat |
| ०४. | नितिन सेल्स कार्पोरेशन, | | ४,८५०/- + vat | ४,८५०/- + vat |
| **१५.** | **भगर-मागणी ६ क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ६,५५१/- + vat | **६,५००/-** |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं, नाशिक | | ६,७००/- | ६,७००/- |
| **१६.** | **खोबरेवाटी, राजापुरी, काळी पाठ, वाळलेली-मागणी १०० क्विंटल** | | | |
| ०१. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | | १०,८००/- + vat | १०,८००/- + vat |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | ८,१५०/- + vat | **८,१८०/- + vat** |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ९,९०१/- + vat | ९,३००/- + vat |
| **१७.** | **काजु पाकळी- २ पाकळी वाळलेली-मागणी १५० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | ४४,०००/- + vat | ५०,१००/- + vat |
| | | B | ४३,८००/- + vat | ४९,१००/- + vat |
| | | C | ४२,५००/- + vat | ४८,८००/- + vat |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४५,५०१/- + vat | ५२,०००/- + vat |
| ०३. | रुपेश ट्रेडर्स, सांगली | B | ४९,०००/- + vat | ४९,०००/- + vat |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४. | गणेश ड्राय फ्रुट्स, पुणे | | ४५,०००/- + vat | **४५,०००/- + vat** |
| | | | ४७,०००/- + vat | . |
| **१८.** | **मगज बी मागणी ५ क्विंटल** | | | |
| ०१. | देवीचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | २३,५००/- + vat | १९,०००/- + vat |
| ०२. | गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | २२,०००/- + vat | २१,०००/- + vat |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १७,५००/- + vat | **१५,०००/- + vat** |
| ०४. | पी.के.एम.फुड्स, पुणे | | २५,०००/- + vat | २५,०००/- + vat |
| **१९.** | **बदाम बी - मोठी साईज-मागणी ०.४० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ३८,१००/- + vat | ४२,३००/- + vat |
| ०२. | गणेश ड्राय फ्रुटस, पुणे | | ४२,०००/- + vat | **४१,५००/- + vat** |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ४५,०००/- + vat | ४५,०००/- + vat |
| **२०.** | **हळद - अखंड वाळलेली-मागणी १०० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | **A** | १८,०००/- | १४,८००/- + vat |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | १३,७००/- | **१३,६५०/-** |
| ०३. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १९,५००/- | १९,५००/- |
| ०४. | बाफना बाजार, नाशिक | | २०,५१०/- | १५,३००/- |
| **२१.** | **मिरची - गुटूंर, अखंड, लाल-मागणी १७५ क्विंटल** | | | |
| ०१ | बाफना बाजार, नाशिक | | ११,१००/- | १२,३००/- |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | १५,०००/- | १५,०००/- |
| ०३. | राजेश फुड प्रॉडक्ट्स, अहमदनगर | | १२,६००/- | **११,१००/-** |
| ०४. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | १३,०००/- | १३,०००/- |
| **२२.** | **धने - अखंड-मागणी- १५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | A | ९,५००/- | ९,५००/- |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | ७,५००/- | **७,६००/-** |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | इंदोरी | ९,२००/- | ९,२००/- |
| ०४. | हिरालाल चुन्नीलाल भराडीया, नांदेड | | ९,५००/- | ९,१००/- |
| **२३.** | **हिरवी विलायची - बोल्ड-मागणी ४० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | १,४३,०००/- + vat | १,२९,०००/- + vat |
| | | B | १,३८,०००/- + vat | **१,१८,०००/- + vat** |
| ०२. | देवीचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १,७७,५००/- + vat | १,७७,५००/- + vat |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | A | १,९५,१००/- + vat | १,६३,२००/- + vat |
| **२४.** | **जीरे - डायमंड कट-मागणी ५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | A | २०,१००/- + vat | २०,१००/- + vat |
| | | B | १९,५००/- + vat | १९,५००/- + vat |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | A | २२,५००/- + vat | २०,१००/- + vat |
| | | B | २२,१००/- + vat | **१९,१९०/- + vat** |
| ०३. | पी.के.एम.फुडस | | २४,०००/- + vat | २४,०००/- + vat |
| ०४. | राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | | २१,५००/- | १९,५००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | + vat | + vat |
| **२५.** | **सुंठ - वाळलेली मागणी ६ क्विंटल** | | | |
| ०१. | पी.के.एम.फुडस, पुणे | | २८,०००/- + vat | २८,०००/- + vat |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | २५,५००/- + vat | **२१,०००/- + vat** |
| ०३. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | ३१,०००/- + vat | २८,०००/- + vat |
| **२६.** | **शहाजिरे-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | ५१,०००/- + vat | ५०,८००/- + vat |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४२,५००/- + vat | **४२,५००/- + vat** |
| **२७.** | **मसाला विलायची-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | १,६०,०००/- + vat | १,६०,०००/- + vat |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | १,६५,१००/- + vat | १,६५,१००/- + vat |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १,४५,०००/- + vat | **१,३०,०००/- + vat** |
| ०४. | पी.के.एम.फुडस, पुणे | | १,५०,०००/- + vat | १,३५,०००/- + vat |
| ०५. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | १,४०,०००/- + vat | १,३२,५००/- + vat |
| **२८.** | **लवंग-मागणी १ क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | ७१,१००/- + vat | ६९,०००/- + vat |
| ०२. | धर्मपाल सत्यापाल, नोएडा | | ५२,५००/- + vat | **५२,५००/- + vat** |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ६८,०००/- + vat | ६८,०००/- + vat |
| ०४. | बाफना बाजार, नाशिक | | ५५,१००/- + vat | ५३,२००/- + vat |
| **२९.** | **दालचिनी-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | पी.के.एम.फुडस, पुणे | | १७,५००/- + vat | १७,५००/- + vat |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १५,१००/- + vat | **१३,०००/- + vat** |
| **३०.** | **खसखस-मागणी २.५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ४९,५०१/- + vat | **३३,५००/- + vat** |
| ०२. | राजेश फुडस प्रॉडक्टस, अहमदनगर | | ३६,०००/- | ३६,०००/- |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ३६,०००/- + vat | ३६,०००/- + vat |
| **३१.** | **काळेमिरे-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | ३१,५००/- + vat | **३१,२००/- + vat** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ३९,०००/- + vat | ३४,५००/- + vat |
| ०३. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | ३३,३००/- | ३३,३००/- |
| ०४. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ३२,५००/- + vat | ३२,५००/- + vat |
| **३२.** | **नाकेश्वर-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | १,५०,१००/- + vat | **८७,५००/- + vat** |
| ०२. | पी.के.एम.फुडस, पुणे | | १,३५,०००/- + vat | १,३५,०००/- + vat |
| **३३.** | **तेजपान-मागणी १.५० क्विंटल** | | | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | १. धर्मपाल सत्यपाल, नोएडा | १<br>२<br>३ | १०,५००/-<br>+ vat | **१०,५००/-<br>+ vat** |
| **३४.** | **दगडफुल -मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ३८,०००/-<br>+ vat | **३८,०००/-<br>+ vat** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ४३,१००/-<br>+ vat | ३८,५००/-<br>+ vat |
| **३५.** | **चक्रीफुल -मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ३५,०००/-<br>+ vat | **३५,०००/-<br>+ vat** |
| ०२. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ५५,०००/-<br>+ vat | ५५,०००/-<br>+ vat |
| **३६.** | **जायफळ-मागणी ०.५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ९३,१००/-<br>+ vat | ८२,३००/-<br>+ vat |
| ०२. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | ७५,५००/-<br>+ vat | **७५,०००/-<br>+ vat** |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ८२,०००/-<br>+ vat | ८२,०००/-<br>+ vat |
| **३७.** | **जायपत्री-मागणी १.५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | २,६५,१००/-<br>+ vat | २,११,१००/-<br>+ vat |
| ०२. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | २ | २,२५,०००/-<br>+ vat | २,२२,०००/-<br>+ vat |
| ०३. | राजेश फुड प्रॉडक्ट, अहमदनगर | | १,७०,१००/- | **१,५०,१००/-** |
| **३८.** | **बडीशेप - हिरवी बारीक-मागणी ३ क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १७,५००/-<br>+ vat | **१६,८००/-<br>+ vat** |
| ०२. | पी.के.एम.फुडस, पुणे | | १८,०००/-<br>+ vat | १८,०००/-<br>+ vat |
| ०३. | धर्मपाल सत्यपाल, नोएडा | | १९,५००/-<br>+ vat | १८,४००/-<br>+ vat |
| **३९.** | **पापड - लिज्जत-मागणी ६० क्विंटल** | | | |
| ०१. | पी.के.एम.फुडस, पुणे | प्रकाश | १४,०००/- | १४,०००/- |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | लिज्जत | १६,५००/- | १६,१००/- |
| **४०.** | **हिंग पावडर, नागछाप ॲगमार्क-मागणी १२ क्विंटल** | | | |
| ०१. | राजेश फुडस प्रॉडक्ट, अहमदनगर | | १८,०००/- | १८,०००/- |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | १७,९००/-<br>+ vat | १७,९००/-<br>+ vat |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १७,५००/-<br>+ vat | **१६,९००/-<br>+ vat** |
| **४१.** | **हिंग खडा, नागछाप ॲगमार्क-मागणी २.५० क्विंटल** | | | |
| ०१. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | १७,५००/-<br>+ vat | **१६,९००/-<br>+ vat** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ३६,१००/-<br>+ vat | १७,०००/-<br>+ vat |
| **४२.** | **मेथी-मागणी २ क्विंटल** | | | |
| ०१. | सुरेश पुनमचंद बागमार, पुणे | | ४,०००/- | ३,९५०/- |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | ५,०००/- | ४,८००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ७,४००/-<br>+ vat | ६,७००/-<br>+ vat |
| ०४. | पी.के.एम.फुडस, पुणे | | ५,४००/-<br>+ vat | ५,४००/-<br>+ vat |
| **४३.** | **मोहरी-मागणी ४० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | A | ४,९००/-<br>+ vat | ४,७००/-<br>+ vat |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | B | ४,५००/-<br>+ vat | **३,९५०/-<br>+ vat** |
| ०२. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ४,०००/-<br>+ vat | ४,०००/-<br>+ vat |
| **४४.** | **कच्चे पोहे-मागणी १० क्विंटल** | | | |
| ०१. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | २,६००/- | **२,६००/-** |
| ०२. | पडतानी मिल, संगमनेर | | २,७००/- | २,७००/- |
| ०३. | बाफना बाजार, नाशिक | | ३,७००/- | ३,५५०/- |
| **४५.** | **भाजके पोहे-मागणी २५ क्विंटल** | | | |
| ०१. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर | | २,८००/- | **२,८००/-** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | ५,५००/- | ५,३००/- |
| **४६.** | **डाळया -मागणी ०५ क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ५,५०१/-<br>+ vat | ४,९०१/-<br>+ vat |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | ४,५००/-<br>+ vat | **४,५००/-<br>+ vat** |
| **४७.** | **चिंच - फोडलेली-मागणी १५ क्विंटल** | | | |
| ०१. | - | - | - | - |
| **४८.** | **आमसुल<br>मागणी २० क्विंटल** | | | |
| ०१. | पी.के.एम.फुडस,पुणे | | ५,५००/-<br>+ vat | ५,५००/-<br>+ vat |
| ०२. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | | ४,८००/-<br>+ vat | ४,८००/-<br>+ vat |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | ३,८००/-<br>+ vat | **३,५००/-<br>+ vat** |
| **४९.** | **जिलेबी रंग- मार्सन लेमन फुड कलर, आयएसआय-मागणी ०३ क्विंटल** | | | |
| ०१. | मार्सन इंडिया प्रा.लि., मुंबई | | ३३,०००/-<br>+ vat | **३२,०००/-<br>+ vat** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | Bush | ६१,००१/-<br>+ vat | ५८,५००/-<br>+ vat |
| ०३. | पी.के.एम.फुडस, पुणे | Bush | ४५,०००/-<br>+ vat | ४५,०००/-<br>+ vat |
| ०४. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | Bush | ३९,१००/-<br>+ vat | ३९,१००/-<br>+ vat |
| **५०.** | **सुतळी - बारीक, थ्री प्लाय-मागणी ०५ क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ७,५०१/-<br>+ vat | **७,३००/-<br>+ vat** |
| **५१.** | **पत्रावळ-प्लेन -मागणी ६,००,००० नग** | | | |
| **५२.** | **पत्रावळ कप्प्याची सिल्वर कोटेड -मागणी १०,००,००० नग** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | Silver | १.६०<br>Per No. | **१.९०<br>Per No.** |
| **५३.** | **खडे मीठ-मागणी २० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ४५०/- | ४५०/- |
| ०२. | रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कं., नाशिक | | ३५१/- | **३४५/-** |
| **५४.** | **मसुर-मागणी ५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | A | ४,६५१/- | ४,५५१/- |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | | ४,३५०/- | **४,२००/-** |
| ०३. | पडतानी मिल्स, संगमनेर | | ४,८००/- | ४,७००/- |
| **५५.** | **कुंकु-मागणी ३ क्विंटल** | | | |
| ०१. | देविचंद पुनमचंद छाजेड, अ.नगर | १ | ५,०००/- | ५,०००/- |
| | | २ | २,०००/- | **२,०००/-** |
| ०२. | बाफना बाजार, नाशिक | | २६,०००/- | ९,५००/- |
| **५६.** | **मठदाळ-मागणी २० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | | ७,६५१/- | ७,३००/- |
| ०२. | पडतानी मिल्स, संगमनेर | | ६,५००/- | **६,७००/-** |
| **५७.** | **खाद्यतेल - मका, रिफाईंड, ॲगमार्क-मागणी ३५०० क्विंटल** | | | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | जेमिनी सुर्यफुल | ९,००१/- + vat | ८,९५०/- + vat |
| | | कॉर्नस्टार (मका) | ८,५०१/- + vat | ८,१५०/- + vat |
| ०२. | राहुल इंटरप्रायझेस, नाशिक | कार्नेलो (मका) | ८,४००/- + vat | **६,९५०/- + vat** |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | हेल्थ फिट सुर्यफुल | ८,८११/- + vat | ७,९००/- + vat |
| **५८.** | **वनस्पती तुप - जेमिनी-मागणी ३५० क्विंटल** | | | |
| ०१. | बाफना बाजार, नाशिक | जेमिनी | ८,१००/- + vat | ८,१००/- + vat |
| ०२. | सचिन ट्रेडर्स, | जेमिनी | ७,३७१.४३ + vat | **७,३००/- + vat** |
| ०३. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | राग | ८,५००/- + vat | ७,८००/- + vat |
| **५९.** | **चहा पावडर - ब्रुकबॉण्ड/सपट/ओ चहा-मागणी १५० क्विंटल** | | | |
| ०१ | हायटेक वेडींग, नाशिक | रेड लेबल | १८,०००/- + vat | १८,०००/- + vat |
| ०२. | कुणाल टी सेंटर, शिर्डी | सपट हॉटेल डस्ट | १९,०४८/- + vat | **१८,९५२/- + vat** |
| | | सह्याद्री | १८,७६२/- + vat | १८,६६७/- + vat |
| ०३. | शैला इंटरप्रायझेस, | ब्रुक बॉण्ड ताजा २ | १४,२८६/- + vat | १४,२८६/- + vat |
| | | रेड लेबल | १८,०९५/- + vat | १७,१४३/- + vat |
| **६०.** | **कॉफी फ्लिटर - ब्रुकबॉण्ड, मागणी १५ क्विंटल** | | | |
| ०१. | शैला इंटरप्रायझेस, | कॅफे गोल्ड | १७,१४३/- + vat | **१७,१४३/- + vat** |
| ०२. | हायटेक वेडींग, नाशिक | कॅफे गोल्ड | २५,०००/- + vat | २४,५००/- + vat |
| **६१.** | **बिस्कीटे - पारले/ब्रिटानीया/सनफिस्ट ग्लुकोज व इतर मागणी ---------------पुडे** | | | |
| ०१. | अग्रवाल एजन्सी, साकुरी | Parle | २% Discount against Company Rate + १२.५% Vat | |
| ०२. | दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर | Britania | **२% Discount against Company Rate + १२.५% Vat** | |
| ०३. | कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | Sunfeast | **३% Discount against Company Rate + १२.५% Vat** | |
| ०४. | वरद विनायक, पारनेर | Parle | **३% Discount against Company Rate + १२.५% Vat** | |
| **६२.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटर बाटली - आयएसआय, प्रमाणित मागणी - ४,५०,००० बाटली** | | | |
| ०१. | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा | ५.४५ + vat | **५.५०** |
| ०२. | स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | ६.२५ | **५.५०** |
| ०३. | संगमनेर ता.सह.दुध.संघ, संगमनेर | राजहंस | ६.२५ | ५.७० |
| ०४. | टेक्नो ॲक्वा,मनमाड | निंबस | ५.५६ + vat | ६.१४ |
| **६३.** | **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर ५०० मिली बाटली - आयएसआय, प्रमाणित मागणी - १,५०,००० बाटली** | | | |
| ०१. | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | साईगंगा | ३.९५ + vat | **४.४४** |
| ०२. | स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | राजहंस | ५/- | **४.४४** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | संगमनेर ता.सह.दुध.संघ, संगमनेर | राजहंस | ५/- | ४.७० |
| ०४. | टेक्नो ॲक्वा,मनमाड | निंबस | ४.१५ + vat | ४.५५ |
| **६४.** | **पॉलीकप - व्हर्जीन फुड ग्रेड, १०० मिली, वजन २ ग्रॅम -मागणी १,७५,००,००० नग** | | | |
| ०१. | सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपुर | | २३०/- + vat Per thousant | **२३०/- + vat Per thousant** |
| **६५.** | **प्लॅस्टिक पिशवी ४x६ प्लेन व्हर्जीन फुड ग्रेड एलडी -मागणी ३० क्विंटल** | | | |
| ०१. | पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | Plastic | १०,८५०/- + vat | **९,७५०/- + vat** |
| | | Bio-D | १२,८५०/- + vat | **११,२५०/- + vat** |
| ०२. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | Plastic | १२,०००/- + vat | ११,५००/- + vat |
| ०३. | आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | Plastic | १२,५००/- + vat | ११,८००/- + vat |
| | | Bio-D | १८,०००/- + vat | १७,०००/- + vat |
| | | Bio-D | १७,५००/- + vat | १६,५००/- + vat |
| ०४. | सुपार प्लास्ट इंजि. सिन्नर, नाशिक | Plastic | १०,८००/- + vat | १०,५००/- + vat |
| | | Bio-D | ३% to ५% increase by plastic bag. | |
| ०५. | स्टार पॅकेजिंग, दमन | Plastic | १२,०००/- | ११,४५०/- + ५% CST |
| | | Bio-D | | |
| **६६** | **प्लॅस्टिक पिशवी ५x६.५ लाडूसाठी, ४ रंगात छपाई, २०० गेज पीपी मागणी ३८० क्विंटल** | | | |
| ०१. | पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | Plastic | १५,६५०/- + vat | **१२,७५०/- + vat** |
| | | Bio-D | १७,६५०/- + vat | **१४,२५०/- + vat** |
| ०२. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | Plastic | १५,०००/- + vat | १३,५००/- + vat |
| ०३. | आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | Plastic | १५,५००/- + vat | १४,०००/- + vat |
| | | Bio-D | २३,०००/- + vat | २१,५००/- + vat |
| | | Bio-D | २६,०००/- + vat | २४,०००/- + vat |
| | | Bio-D | २२,०००/- + vat | २०,०००/- + vat |
| ०४. | स्टार पॅकेजिंग, दमन | Plastic | १४,५००/- + vat | १३,४५०/- + ५% CST |
| | | Bio-D | - | - |
| **६७** | **प्लॅस्टिक पिशवी ८x१० छपाईसह १ रंगात व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज एलडी मागणी १३० क्विंटल** | | | |
| ०१. | पवन पॅकेजिंग, कोल्हापुर | Plastic | १२,२००/- + vat | **१०,२००/- + vat** |
| | | Bio-D | १४,२००/- + vat | **११,७००/- + vat** |
| ०२. | सरस प्लॅस्टिक, अहमदनगर | Plastic | १३,०००/- + vat | १२,३००/- + vat |
| ०३. | आदर्श मल्टीप्लेक्स, अहमदनगर | Plastic | १३,५००/- + vat | १२,५००/- + vat |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Bio-D | २०,०००/- + vat | १९,०००/- + vat |
| | | Bio-D | १९,०००/- + vat | १८,०००/- + vat |
| ०४. | सुपार प्लास्ट इंजि. सिन्नर, नाशिक | Plastic | ११,८००/- + vat | ११,४००/- + vat |
| ०५. | स्टार पॅकेजिंग, दमन | Plastic | ११,७००/- + vat | ११,२००/- + ५% CST |
| | | Bio-D | - | - |
| **६८** | **गाय दुध होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड, ५०० मिली पॅकिंग, ३.५ ते ३.८ फॅट, ८.५ एसएनएफ, दिवसातून दोन वेळेस पुरवठा मागणी अंदाजे दररोज २८०० लिटर** | | | | |
| ०१. | गोदावरी खोरे दुध उत्पा.संध, कोपरगांव | | २४/- Per Liter | **२२.५० Per Liter** |
| ०२. | संगमनेर तालुका दुध.उत्पा.संघ, संगमनेर | | २३/- Per Liter | २२.७० Per Liter |
| ०३. | स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव | | २३/- Per Liter | **२२.५० Per Liter** |
| ०४. | प्रभात डेअरी, श्रीरामपुर | | २१.५० Per Liter | २१.५० Per Liter |
| **६९** | **गावरान तुप ३५ कि.ग्रॅ.कॅन लुज किंवा १५ कि.ग्रॅ.नवीन डबा पॅकिंग अॅगमार्क असलेला - मागणी ३५५० क्विंटल** | | | | |
| ०१. | गोदावरी खोरे दुध उत्पा.संध, कोपरगांव | गोदावरी ३५ Kg. | २५,९६१/- + vat | २५,४६०/- + vat |
| | | १५ Kg. | २६,९२३/- + vat | २६,५००/- + vat |
| ०२. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | श्री वल्लभ | २४,९५०/- + vat | २४,७००/- + vat |
| ०३. | राहुल एंटरप्रायझेस, नाशिक | करमास | २७,९००/- + vat | २६,२००/- + vat |
| ०४. | प्रभात डेअरी, श्रीरामपुर | प्रभात | २६,०००/- + vat | २५,५००/- + vat |
| ०५. | बाफना बाजार, नाशिक | हटसन A | २९,१००/- + vat | २७,१००/- + vat |
| | | हटसन B | २९,१००/- + vat | २७,१००/- + vat |
| | | मधुरतन B | २९,१००/- + vat | २७,१००/- + vat |
| | | कान्हा C | २८,५००/- + vat | २६,४००/- + vat |
| | | महारतन D | २८,१००/- + vat | २६,५००/- + vat |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपसमितीने खालीलप्रमाणे केलेल्या शिफारशी मान्य करण्यात आल्या.

०१. गडद केलेले न्युनतम दर स्विकारण्यात यावे.

०२. ज्या किराणा माल साहित्यासाठी मालाचे नमुने हे एकाच पुरवठाधारकाचे आल्याने व ते योग्य असल्याने एकच दर असूनही स्विकारण्यात यावेत.

**०३. बिस्कीटे :-** पुर्वीप्रमाणेच बिस्कीटे कंपनी दराप्रमाणेच विक्री करण्यात यावीत.

**०४. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर :-** पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर १ लिटर रु.८/- व ५०० मिली रु.५/- प्रति बाटली याप्रमाणे विक्री करण्यात यावी.

**०५. सपट हॉटेल डस्ट चहा :-** मागील तीन वर्षापासून सपट कंपनी यांचा चहाचा पुरवठा होत आहे. त्यांचे सदर चहाबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे तुलनेने सदर चहाचे दर हे सर्वाधिक असले तरी मान्य करण्यात आलेले आहेत.

**०६. पापड :-** निविदेमध्ये फक्त लिज्जत पापडची मागणी केलेली होती. त्याप्रमाणे मे.बाफना बाजार, नाशिक यांचे लिज्जत पापडबाबतचे दर हे द्वितीय न्युनतमधारक असले तरी स्विकारण्यात यावेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०७. मेथी :-** निवडलेल्या नमुन्यांमधून मेथीची पुन्हा पाहणी करण्यात आली. त्यामुळे नमुना योग्य न वाटल्यामुळे व फक्त २ क्विंटलची मागणी असल्यामुळे मेथी निविदेमधून रद्द करुन मोंढयावरुन लिलाव पद्धतीने खरेदी करावी.

**०८. दुध :-** मे.गोदावरी खोरे दुध संघ व स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगांव यांचे चर्चा/वाटाघाटीचे दर द्वितीय असले तरी गुणवत्तेचे आधारे स्विकारण्यात यावेत.

**०९. व्हॅट :-** शासन निर्णयानुसार व्हॅट रक्कम आदा करण्यात येईल.

**१०. गावरान तुप :-** नमुने तपासणीचा अहवाल आल्यानंतर खरेदीबाबत पुढील निर्णय घ्यावा, तो पर्यंत मागील पुरवठाधारकाकडून आहे त्याच दराने गावरान तुप खरेदी करण्यात यावे.

(कार्यवाही-अधिक्षक खरेदी)

०२) **श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयाकरीता आवश्यक परिचारिकांची पदे भरती संदर्भात दिनांक ०६.०४.२०११ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत**

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६१ नुसार दोन्ही रुग्णालयांसाठी बिंदु नामावलीनुसार जात प्रवर्गाप्रमाणे आवश्यक तेवढ्या एकूण ६७ परिचारीकांची पदे भरणेकरीता अर्ज मागविणेसाठी दि.२५/१२/२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

जाहिरातीस अनुसरुन, दि. १०/०१/२०११ अखेर मुदतीमध्ये शिर्डी कार्यालयाकडे ३३९ अहमदनगर सेवायोजन कार्यालयाकडून ६८ व पूणे सेवा योजन कार्यालयाकडून १७८ असे एकूण ५८५ अर्ज प्राप्त झालेले आहे.

दि. १३/०२/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. सध्या ०६ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीव्दारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रु. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन, जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवाराची लेखी परिक्षा घेण्यात यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७० % गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारास प्रात्यक्षीक परिक्षेकरीता बोलविणेत यावे. प्रात्यक्षीक परिक्षेतुन प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरीता पहिले ०५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे, असा निर्णय झालेला आहे.

स्टाफ नर्स पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जापैकी ५६४ उमेदवाराना दि. ०६/०४/२०११ रोजी घेण्यात येणाऱ्या लेखी परिक्षेसाठी कॉल देण्यात आलेले होते.

त्यानुसार दि. ०६/०४/२०११ रोजी संस्थान शैक्षणिक संकुलाचे श्री साईबाबा इंग्लीश मिडीयम स्कुल व श्री साईबाबा कन्या विद्यामंदिर येथे ५० गुणांची बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेसाठी कॉल देण्यात आलेल्या ५६४ उमेदवारांपैकी ३३९ उमेदवार हजर होते व २२५ उमेदवार गैरहजर होते. जात प्रवर्गानुसार भरावयाची पदे, परिक्षेस बोलविण्यात आलेले उमेदवार व प्रत्यक्ष परिक्षेस उपस्थित असलेले उमेदवार यांची विगतवारी पुढीलप्रमाणे-

| तपशील | अनु. जमाती ST | विमुक्त जाती VJ | भटक्या जमाती NT-B, C, D | विशेष मागास प्रर्वा SBC | इत्तर मागास प्रर्वा OBC | अपंग | खुला प्रर्वा OPEN | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदांची संख्या-** | **१६** | **०६** | **१३** | **०५** | **२०** | **०५** | **०२** | **६७** |
| **परिक्षेस बोलविण्यात आलेले उमेदवार** | १५ | ०९ | ७१ | १७ | १७६ | ०७ | २६९ | **५६४** |
| **परिक्षेस उपस्थित असलेले उमेदवार** | १० | ०२ | ३३ | १० | ८३ | ०३ | १९८ | **३३९** |

परिक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा झालेनंतर त्याच दिवशी इनकॅमेरा पेपर्स तपासणीचे कामकाज करुन अंतीम गुणवत्ता यादी तयार करण्यात आलेली आहे. तपासलेल्या उत्तर पत्रिका व गुणवत्ता यादी स्वतंत्र लिफाफ्यात मा. कार्यकारी अधिकारी व मा.उपकार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने सिलबंद करण्यात आलेले आहे. सिलबंद गुणवत्ता यादी मा. व्यवस्थापन समितीसमोर उघडून प्रात्यक्षिक परिक्षा दोन्ही रुग्णालयांमध्ये अंदाजे दि.२५/०४/२०११ पासून उमेदवारांच्या संख्येनुसार बॅचेस तयार करुन घेण्याचे नियोजन करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

दिनांक ६.०४.२०११ रोजी स्टाफ नर्स पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेमधील तपासलेल्या उत्तर पत्रिका व गुणवत्ता यादीचा सिलबंद लिफाफा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आला. या गुणवत्ता यादी नुसार अनु.जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग,इतर मागास प्रवर्ग व अपंग या प्रवर्गातील ज्या उमेदवारांना लेखीपरिक्षेमध्ये

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



किमान ४०% गुण मिळालेले आहे अशा उमेदवारांना संख्येनुसार बॅचेस तयार करुन प्रात्यक्षिक परिक्षेकरिता बोलविण्यात यावे. खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीनुसार ज्या उमेदवारांना किमान ६०% गुण मिळालेले आहेत अशा उमेदवारांना प्रात्यक्षिक परिक्षेकरिता बोलविण्यात यावे. तसेच संस्थानचे दोन्ही रुग्णालयामध्ये सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक दिलेल्या २३ स्टॉफ नर्सेस यांनाही प्रात्यक्षिक परिक्षेसाठी बोलविण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०३) **दर्शल लाईनमधील भक्तांसाठी एअर कुलर खरेदी करणेसाठी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

मा.व्य.समितीचे दि. २७-०२-२०११ चे सभेतील निर्णय क्र.१९६ अन्वये दर्शन लाईनमधील भक्तांसाठी एअर कुलर खरेदी करणेसाठी रुपये ४,७८,१२५ /- इतका खर्चास मान्यता मिळालेली असून या कामासाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला होता.त्यानुसार कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाली आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे. मॅट्रीक्स इंडस्ट्रीज, मुंबई |
| ०२) | मे. श्री गणेश इलेक्ट्रॅनिक्स, नासिक |
| ०३) | मे. रिपेअर-ओ -मॅट्रीक्स, नाशिक |
| ०४) | मे. कॅपसन रिसोर्सेस कार्पोरेशन, अहमदाबाद |

उपरोक्त प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | निविदेतील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे.मॅट्रीक्स इंडस्ट्रीज,मुंबई | ४,८०,०००/- | ४,३२,०००/- |
| ०२. | श्री गणेश इलेक्ट्रॉनिक्स,नाशिक | ४,६५,०००/- | अनुपस्थित |
| ०३.. | मे.रिपेअर ओ मॅट्रीक्स,नाशिक | ४,४०,०००/ | ४,३०,०००/- |
| ०४. | मे.कॅपसन रिसोर्सेस कार्पोरेशन,अहमदबाद | ४,२५,०००/- | ४,००,०००/- (स्टॅण्डसह) |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.कॅपसन रिसोर्सेस कार्पोरेशन,अहमदबाद यांचे निम्नतम दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

०४) **श्री रामनवमी उत्सव-२०११ मध्ये कुस्त्यां व तमाशा आयोजनाबाबत.**

शिरडी ग्रामस्थांनी दिनांक ०७/०४/२०११ चे अर्जाने खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

श्री साईबांबानी शिरडीत सुरु केलेल्या रामनवमी उत्सवास १०० वर्षे पूर्ण होत असलेने प्रथापरंपरे प्रमाणे चालू वर्षी कुस्त्यांच हगामा मोठया प्रमाणात आयोजित करावा असे आपल्या व विश्वस्त कमीटी बरोबर झालेल्या चर्चेत ठरले आहे. यानुसार खालील प्रमाणे कुस्त्यांचे नियोजन करण्यात आलेले आहे.

**श्री साई केसरी -**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | श्री रोहीत पटेल रु. १,१०,०००<br>( महान भारत केसरी) | x | श्री मनजीत सिंग रु ७०,०००<br>(पंजाब केसरी) |

**उप श्री साई केसरी**

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | श्री समाधान घोडके रु. ५०,०००<br>(महाराष्ट्र केसरी) | x | श्री रवि कुमार रु. ३०,०००<br>(राष्ट्रीय विजेता) |
| ०३ | श्री योगेश पवार,पुणे रु. २०,००० | x | श्री राकेशकुमार रु.२०,००० |
| ०४ | श्री कुलदिप सिंग रु २०,००० | x | श्री विकास जाधव रु. २०,००० |
| ०५ | श्री अमित गाडे रु १५,००० | x | श्री रिहान खान रु. १५,००० |
| ०६ | श्री संग्राम पाटील रु १०,००० | x | श्री अजय धुळगडे रु. १०,००० |
| ०७ | श्री साईनाथ रानवडे रु.१०,००० | x | श्री तात्या घोडके रु. १०,००० |
| ०८ | श्री कृष्णा फिरगे रु १०,००० | x | श्री गणेश वाघमोडे रु. १०,००० |
| ०९ | श्री मंच्छींद्र जपे रु ७,५०० | x | श्री राजन उपाध्ये रु. ७,५०० |
| १० | श्री सचिन सातव रु ७,५०० | x | श्री अनिल जाधव रु. ७,५०० |
| ११ | श्री भाऊसाहेब अहिरे रु ५००० | x | श्री अविनाश गव्हाणे रु ५००० |

| | |
|---|---|
| **उपरोक्त कुस्त्याकरीता एकुण मानधन** | रु. **४,७०,०००/-** |
| **इतर कुस्त्यांकरीता** | रु. १,००,०००/- |
| **कुस्ती निवेदक मानधन** | रु १५,०००/- |
| **हलगी वादक मानधन** | रु. १५,०००/- |
| **प्रचार व प्रसिध्दी.** | रु. २०,०००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| (अ. डिजीटल बोर्ड, | रु. | १४०००/- |
| (ब) पत्रक | रु | ५०००/- |
| (क) रिक्षा अनाऊंसमेट | रु | १०००/- |
| **पंच मानधन.** | रु | ६,०००/- |
| **कुस्त्याकरीता एकुण खर्च** | **रु.** | **६,२६,०००/-** |

या शिवाय यात्रा कालावधीमध्ये श्रीं समोर तमाशा कलाकारांची हजेरी होत असते. येत्या रामनवमी उत्सवात लोककलेला प्रोत्साहन देणे करीता सदरचे तमाशे मोफत आयोजीत करण्यात येणार आहेत. या तमाशा कलाकारांना मानधन म्हणून रु २,००,०००/- दयावे लागणार आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे कुस्त्यां व तमाशाचे आयोजना करीता येणारा एकुण खर्च रु ८,२६,००० संस्थान मार्फत करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

टी.डी.एस.चे नियमानुसार रु.१० हजार पेक्षा जास्तचे मानधनावर रु ३० टक्के टी डी एस कपात करावी लागेल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,कुस्ती हगामा व रामनवमी उत्सवाकरिता नेहमीच्या परंपरेनुसार एकूण रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख) मात्र आदा करण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

०५) **नाट्यगृह व त्यासमोरील जागा धार्मिक कार्याकरीता देणे बाबत**

विविध साई भक्तांना नाटयगृह व त्यासमोरील जागा धार्मिक कार्याकरीता मागणी केलेली आहे त्याबाबत तपशिलवार माहीती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | मागणी करणारांचे नाव व गांव | करावयाचा कार्यक्रम | मागणीचा तपशिल | मागणी कालावधी |
|---|---|---|---|---|
| ०१ | दत्त करुना ट्रस्ट गुरुडू आंध्र प्रदेश | यज्ञ (हवन) | नाटयगृह व त्यासमोरील जागा | १९/०४/११ ते २२/०४/११ |
| ०२ | श्री राजव मल्हन नवि दिल्ली | साई भजन संध्या | नाटयगृहासमोरील जागा | २१/०४/२०११ |
| ०३ | श्री पारस जैन शिरडी | साई भजन संध्या | नाटयगृहासमोरील जागा | २३/०४/२०११ |

उपरोक्त प्रमाणे अं.नं. १ चे साई भक्तांनी नाटयगृह व त्यासमोरील जागा वापरास परवानगी मागणी केलेली आहे तर अं.नं. २ ते ३ यांनी फक्त नाटयगृहासमोरील जागा मिळणेस विनंती केलेली आहे.

यापूर्वी नाटयगृह गणेशोत्सव , नवरात्र , दिवाळी फराळ विक्री व साईनामजप सप्ताह अशा विविध कार्यक्रमांस देण्यात आलेले आहे. नाटयगृह वापरास परवानगी दिलेले साईभक्त कार्यक्रमाचेवेळी त्यासमोरील जागेचाही वापर करतात. उपरोक्त भक्तांची मागणी श्री रामनवमी उत्सवानंतरचे कालावधीची आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त साईभक्तांना फक्त नाट्यगृह व त्यासमोरील जागा धार्मिक कार्याकरीता देण्यात यावी वीजपूरवठा व ध्वनीक्षेपनाची व्यवस्था त्यांनी करावी अशी उपसमितीची शिफारस आहे. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

०६) **मोफत योग व प्राणायम शिबीरास शैक्षणिक संकुलाचे स्टेज व ग्राऊंड देणे बाबत**

अर्जान्वये, " पंतजली योग समिति राहाता , शिर्डी नगरपंचायत , साई निर्माण ग्रुप शिरडी यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक १४/०४/२०११ ते १९/०४/२०११ या कालावधीत पहाटे ५ ते ७ या वेळेत मोफत योग व प्राणायाम शिबीर आयोजित केले आहे. तरी या शिबीराच्या आयोजनासाठी साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेच्या समोरील लॅान व स्टेज वापरण्यास परवानगी मिळावी." अशी विनंती केलेली आहे.

मागील वर्षी या कार्यक्रमास उपरोक्त मागणी प्रमाणे स्टेज व लॅान वापरास परवानगी देण्यात आलेली होती. त्यांचे कार्यक्रमाचा कालावधी उत्सवानंतर तसेच वेळ सकाळी लवकर आहे

यावर सविस्तर चर्चा होऊन, " पंतजली योग समिति राहाता, शिर्डी नगरपंचायत, साई निर्माण ग्रुप शिरडी यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक १४/०४/२०११ ते १९/०४/२०११ या कालावधीत पहाटे ५ ते ७ या वेळेत मोफत योग व प्राणायाम शिबीरासाठी साईबाबा कन्या विद्या मंदिर शाळेच्या समोरील लॅान व स्टेज वापरण्यास परवानगी देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली..

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

०७) **साईआश्रम प्रकल्पाकरीता कॉट खरेदी करणे बाबत**

शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत इमारतींचे बांधकाम देणगी दाखल करण्यात येत आहे. व प्रकल्पातील परिसर विकसाचे काम श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. सदरहू बांधकामे अंतिम टप्प्यात आहे. साई भक्तांना कमी दरांमध्ये उत्तम प्रकारची निवासव्यवस्था उपलब्ध करण्याचे दृष्टीने प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे. दि.२४/१२/२०१० रोजीचे उपसमिती सभेत साई आश्रम प्रकल्पासाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कॉट खरेदी करणेकामी गोदरेज, खिरा व स्टीलकेस या नामांकित कपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात यावी. तत्पुर्वी स्थानीक विश्वस्त यांनी शेगांव देवस्थानास भेट देऊा तेथील कॉटची पाहणी करावी असे ठरले होते. त्यानुसार दि.०२/०२/२०११ रोजी श्री क्षेत्र शेगांव येथे मा.व्यवस्थापन समिती स्थानिक विश्वस्त मा. श्री. सुरेश वाबळे पा. मा. डॉ. एकनाथ गोंदकर, यांचेसह प्रशासकीय अधिकारी श्री.बी.डी.साबळे, शाखा अभियंता, श्री.डी.एम. देसाई यांनी भेट दिली. सदर भेटीबाबतचा वृतांत दि.२७/०२/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमध्ये यापूर्वी साईबाबा भक्तनिवास, साईनिवास अतिथीगृह, व्दारावती या इमारतीकरीता खरेदी केले कॉट फर्निचरची पाहणी मा. व्यवस्थापन उप समितीचे स्थानीक विश्वस्तांनी करावी व तद्नंतर साई आश्रम प्रकल्पाचे फर्निचर खरेदीचा निर्णय घ्यावा असे ठरले आहे.

दि.०६/०३/२०११ रोजीचे मा. स्थानिक विश्वस्त यांची हॉस्पीटल व्हीजटचे वेळेस भक्तनिवास येथील कॉटची पाहणी मा. विश्वस्त यांनी केली. याकामी येणारे खर्चास व विहीत पध्दतीने नामांकित कंपन्याकडून (गोदरेज, खिरा, स्टिलकेस) दरपत्रके मागवून कॉट खरेदी करणेबाबत चर्चा झाली.

दि.०४/०४/२०११ रोजी मा.अध्यक्ष व विश्वस्त मा.डॉ. गोंदकर,मा. श्री. वाबळे यांचेशी कॉट बाबत चर्चा झाली त्यावेळी साई आश्रम प्रकल्पाचे भाग-I येथे अॅटच टॉयलेट बाथरुम असलेले रुम असलेकारणाने तेथे लाकडी कॉट व साई आश्रम भाग II हॉलकरीता लोखंडी फ्रेम व प्लायवूड असलेले कॉट खरेदी करणेबाबत चर्चा झाली. त्यानुसार लाकडी डबल बेड साईड टेबलसह कॉट तसेच सिंगल बेड सी.आर.सी. फ्रेम (लोखंडी) असलेले कॉट पहाणीसाठी साईनिवास येथे ठेवण्यात आले आहे.

तरी साईआश्रम प्रकल्पाकरीता मागविण्यात आलेल्या लाकडी व लोखंडी कॉटस्ची पाहणी होऊन कॉट खरेदीबाबत निर्णय होणेस विनंती. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी सनमायका / लाकडी कॉटची तसेच सी. आर. सी. फ्रेमसह प्लायवूड असलेल्या कॉटची पहाणी केली. त्यास अनुसरुन, व्दारावती इमारतीतील वातानुकूलित ८० खोल्यांसाठी सध्याचे साईनिवास अतिथीगृहात असलेल्या लाकडी सनमायका-प्लायवूड कॉटप्रमाणे आवश्यकतेनुसार डबल व सिंगल कॉटस् तयार करणेत यावेत. तसेच साईआश्रम प्रकल्पातील खोल्या व हॉल (Dormitory) करीता गोदरेज कंपनीने तयार केलेल्या सी.आर.सी.फ्रेमसह प्लायवुडचे सिंगल कॉटस् तयार करणेत यावेत. यासाठी तांत्रिक बाबींसह सविस्तर आराखडे बनविणेत यावेत. सदर कॉटस् बनविणेकामी आवश्यक असणारे साहित्य पुरविणे / खरेदीसाठी तसेच खरेदी करण्यात आलेल्या साहित्यापासून मंजूर आराखडयानुसार कॉटस् बनविणेसाठी मजुरी दराच्या स्वतंत्र दोन निविदा मागविणेत याव्यात. याप्रमाणे दोन स्वतंत्र निविदा मागवितांना, नामांकित उत्पादक कंपन्या, त्यांचे अधिकृत विक्रेते यांना प्राधान्य मिळणेसाठी तसेच मजुरी दराचे कामासाठी फर्निचर उत्पादक क्षेत्रातील ज्या कंपन्यांकडे स्वत:ची फर्निचर तयार करण्याची अद्यायवत यंत्रसामुग्री, कुशल व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध आहे अशा नामांकित कंपन्यांनी / मजूरी दराचे काम करणाऱ्या संस्थांनी सहभाग घ्यावा म्हणून, निविदा पूर्वपात्रतेत यासंबंधी योग्य व उचित अटी शर्ती नमुद करणेत याव्यात. तसेच या अशा पध्दतीने कॉटस तयार करुन घेणेसाठी निविदा प्रक्रियेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यास, वर नमूद केलेप्रमाणे आवश्यक सिंगल व डबल तयार कॉटस् खरेदीकामी थेट नामांकित उत्पादक कंपन्यांकडून निविदा मागविणेत याव्यात. याकामी येणारे सर्वसमावेशक व अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०८) **<u>श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडील शैक्षणिक वर्ष २०११-१२ स्कुल बस शुल्क (फी) वाढीबाबत</u>**

सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षात स्कुलबस शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ रोजीचे सभेत निर्णय क्र.४१५ अन्वये मान्यता मिळालेली असून बसेसच्या सध्याचे फीमध्ये ३०% वाढ करण्यात यावी, असे ठरले.

सन २००४-०५ व सन २००८-०९ स्कुलबस शुल्काबाबतचा तक्ता-

| अ.नं. | बसस्टॉपचे नाव | सन २००४-०५ स्कुलबस फी | सन २००८-०९ स्कुलबस फी |
|---|---|---|---|
| १ | शिरडी नगरपालिका हद्द | ९००/- | ११७०/- |
| २ | शिव साकुरी | ९००/- | ११७०/- |
| ३ | कनकुरी | १०००/- | १३००/- |
| ४ | कृष्णमंदिर नांदुर्खी रोड | १०००/- | १३००/- |
| ५ | लुटे वस्ती पिंपळवाडी रोड | १०००/- | १३००/- |
| ६ | साईबाबा गृहनिर्माण निघोज | १०००/- | १३००/- |
| ७ | बिरेगाव | १०००/- | १३००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ८ | पिंपळवाडी | १२००/- | १५६०/- |
| ९ | साकुरी | १२००/- | १५६०/- |
| १० | निघोज-निमगाव | १२००/- | १५६०/- |
| ११ | सावळीविहीर | १२००/- | १५६०/- |
| १२ | झगडेफाटा | १७५०/- | २२७५/- |
| १३ | पोहेगाव | २२५०/- | २९२५/- |
| १४ | राहाता | १२००/- | १५६०/- |
| १५ | गोदावरी वसाहत | १०००/- | १३००/- |
| १६ | रुई बारहाते वस्ती | १७५०/- | २२७५/- |
| १७ | बोरावके वस्ती | १७५०/- | २२७५/- |

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुलकडील स्कुलबस शुल्कात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०३.२०११ रोजीचे सभेत वैधानिक लेखापरिक्षणातील अभिप्रायानुसार तूट भरुन काढण्याइतकी वाढ करण्यास मान्यता मिळालेली आहे.

सन २०१०-११ मधील स्कुलबस शुक्ल व खर्च याबाबतचा तपशीलवार तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| स्कुलबसने ये-जा करणारी एकुण विद्यार्थी संख्या | स्कुलबस इंधन, दुरुस्ती खर्च, कर्मचारी पगार, विमा खर्च व टॅक्स खर्च | एकुण जमा झालेले स्कुलबस शुल्क | तूट |
|---|---|---|---|
| १०४८ | २३,९२,०८६/- | १३,९४,३००/- | ९,९७,७८६/- |

उपरोक्त तक्त्याचा विचार केला असता, सन २०१०-११ मध्ये संस्थेला स्कुलबस खर्चात एकूण रु.९,९७,७८६/- मात्रचा निव्वळ तोटा सहन करावा लागला आहे.

सन २०१०-११ व सन २०११-१२ स्कुलबस शुल्क वाढीबाबतचा सुधारीत तक्ता-

| **अ.नं.** | **बसस्टॉपचे नाव (१)** | **सन २०१०-११ स्कुलबस फी (२)** | **सन २०११-१२ स्कुलबस फी (३)** |
|---|---|---|---|
| १ | रुई बारहाते वस्ती | २२७५/- | ३८७०/- |
| २ | निमगाव- निघोज- सावळीविहीर | १५६०/- | २६५०/- |
| ३ | राहाता | १५६०/- | २६५०/- |
| ४ | पिंपळवाडी | १५६०/- | २६५०/- |
| ५ | बन (बिरेगाव) | १३००/- | २२१०/- |
| ६ | नांदुर्खी | १३००/- | २२१०/- |
| ७ | कनकुरी | १३००/- | २२१०/- |
| ८ | डोऱ्हाळे | १८२०/- | ३०९०/- |
| ९ | चारी नं.११/ पोलिस स्टेशन | १३००/- | २२१०/- |
| १० | श्रीखंडे वस्ती/ गोदावरी वसाहत | १३००/- | २२१०/- |
| ११ | लुटे वस्ती | १३००/- | २२१०/- |
| १२ | शिरडी/ परिसर | ११७०/- | १९९०/- |
| १३ | चांदेकसारे (पानमळा वस्ती) | २४८०/- | ४२२०/- |

स्कुलबसवरील एकूण खर्च रु.२३,९२,०८६/- चे तुलनेत तूट ४१% आहे. जमा होणाऱ्या बस शुल्काच्या तुलनेत हे प्रमाण ७१% आहे. सबब लेखापरिक्षणातील अभिप्राय व मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार सध्याचे बस शुल्कात ७०% वाढ केल्यास स्कुलबसवर होणारा खर्च भरुन निघेल. तरी सध्याचे स्टॉपवाईज बस शुल्कात वाढ करुन सुधारीत दर आकारावे लागतील.

तरी सन २०११-१२ मध्ये प्रत्येक स्टॉपकरीता उपरोक्त स्तंभ क्र. ३ नुसार स्कुलबस शुल्क (फी) आकारणेबाबत निर्णय होणेस विनंती. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

०९) **<u>साईनगर मैदानावर गृहस्थसंत प.पू. श्री देवप्रभाकर शास्त्रीजी (दद्याजी) यांच्या सानिध्यात ५३ वा सव्वा करोड शिवलिंग निर्माण, महारुद्र यज्ञ महारुद्राभिषेक व श्रीमद भागवत ज्ञान सप्ताह व १८ पुराण पारायण हा धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी साईनगर मैदान तसेच कार्यक्रमासाठी लागणारी वीज, पाणी, रुम उपलब्ध करुन देणे बाबत.</u>**

श्री तरुणसिंग बघेल, प्रमुख कार्यवाहक दद्याजी शिष्य मंडळ भारत वर्ष यांनी दिंनाक २८/०३/२०११ चे अर्जान्वये "गृहस्थसंत प.पू. श्री देवप्रभाकर शास्त्रीजी (दद्याजी) यांच्या सानिध्यात ५३ वा सव्वा करोड शिवलिंग निर्माण, महारुद्र यज्ञ महारुद्राभिषेक व श्रीमद भागवत ज्ञान सप्ताह व १८ पुराण पारायण हा धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी दिनांक ०९/०५/२०११ ते १५/०५/२०११ या कालावधीसाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



साईनगर मैदान , लाईट , पाणी इत्यादी सुविधा मिळणेस विनती केलेली आहे. तसेच सदरचे मैदानावर मंडप उभारणी करीता सदर मैदानाचा ताबा दिनांक १५/०४/२०११ पासून मिळणेस विनंती केलेली आहे." या कार्यक्रमात दररोज सायंकाळी गृहस्थसंत प.पू. श्री देवप्रभाकर शास्त्रीजी (दद्याजी) यांचे श्रीमदभागवत कथा होणार आहे. या कार्यक्रमासाठी लागणारा सर्व खर्च मंडळ करण्यास तयार आहे. त्यांनी याकामी खालील प्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

| अ.नं. | तपशिल | दिनांक | रुम | कार्यालयीन शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | मैदानाचा ताबा | २१/४/२०११ ते १५/५/२०११ | | मैदान वापराचा सेवा आकार घ्यावा किंवा कसे ? घ्यावयाचा असलेस प्रतीदिन किती घ्यावा ? या बाबत निर्णय होणेस विनंती. |
| ०२ | भक्तांसाठी पाणी पुरवठा | ८/५/२०११ ते १५/५/२०११ | | उत्सवा करीता पाणी पुरवठा व्यवस्था केलेली असते ती व्यवस्था तशीच ठेवता येईल. |
| ०३ | विज पुरवठा | १५/०४/२०११ ते १५/५/२०११ | | संस्थान हॅास्पिटलचा विजेचा वापर अधिक असलेने संयोजकास विद्युत व्यवस्था स्वत: करावी लागेल असे कळविता येईल. |
| ०४ | भक्तांसाठी रुम व्यवस्था साईबाबा भक्तनिवास | ७/५/२०११ ते १६/५/२०११ | १०० रुम | ०१.कार्यक्रम मे महिन्यात आहे. ०२.मे महिना सुटीचा कालावधी असलेने साई भक्तांची गर्दी राहील ०३. या काळात खोल्या / हॅाल राखीव ठेवता येणार नाहीत ०४.उपलब्धते नूसार खोल्या / हॅाल सशुल्क देता येतील. |
| ०५ | भक्तांसाठी रुम व्यवस्था साईबाबा भक्तनिवास | ८/५/२०११ ते १६/५/२०११ | २०० रुम | |
| ०६ | भक्तांसाठी रुम व्यवस्था व्दारावती भक्तनिवास | ७/५/२०११ ते १६/५/२०११ | १५० एसी व ८० नॅान एसी रुम | |
| ०७ | भक्तांसाठी हॅाल व्यवस्था साई उद्यान | ८/५/२०११ ते १६/५/२०११ | १० हॅाल | |
| ०८ | साईनाथ माध्यमिक विद्यालय शिर्डी | ८/५/२०११ ते १६/५/२०११ | पटागंणासह शाळा | या बाबत शाळेसी संपर्क साधावा असे आयोजकास सांगता येईल. |

यावर सविस्तर चर्चा होऊन, गृहस्थसंत प.पू. श्री देवप्रभाकर शास्त्रीजी (दद्याजी) यांच्या सानिध्यात ५३ वा सव्वा करोड शिवलिंग निर्माण, महारुद्र यज्ञ महारुद्राभिषेक व श्रीमद भागवत ज्ञान सप्ताह व १८ पुराण पारायण हा धार्मिक कार्यक्रम करण्यासाठी दिनांक ०९/०५/२०११ ते ०५/०५/२०११ या कालावधीसाठी साईनगर मैदान व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात यावी तसेच सदर मैदानावर मंडप उभारणी करीता मैदानाचा ताबा २१.०४.२०११ पासुन देण्यात यावा, व त्यांचे मागणी नुसार निवासस्थानाकडील खोल्या सशुल्क देण्यात याव्यात अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**१०) मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात याव्यात असे ठरले.

०१) श्री साईबांबाचे जीवन व कार्य यांचा प्रचार व प्रसार व्हावा या उदात्त हेतून शिर्डी परिसरात व परिसराबाहेर साईचरित्राचे पारायण करण्यात येते. या पारायणासाठी संयोजक साईचरित्र ग्रंथांची मागणी करतात. याकरीता १००० साईचरित्र ग्रंथांना उत्कृष्ट पध्दतीने लॅमीनेशन करुन ते साईचरित्र पारायण करणाऱ्या वाचकांना उपलब्ध करुन द्यावेत, याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग )

०२) C.V.T.S व C.R.U ओ.टी.साठी आवश्यक असणारे आया व वॅार्डबॅाय कंत्राटदारांकडून घेण्यात यावेत. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०३) श्री साईबाबा रुग्णालयातील वाढता कामाचा व्याप विचारात घेता परफ्युजनिस्ट या पदावर एक ऐवजी दोन व्यक्तीची ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्यात यावी.

कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०४) संस्थानकरिता नविन वाढीव पाणीपुरवठा योजना करणेबाबत दिनांक ०१.०३.२०११ रोजी माननीय मंत्रीमहोदय, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचेकडे अनुदान मंजूर होणेकामी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

सदर प्रस्ताव मंजूरीसाठी किती कालावधी लागेल याबाबत माहिती घेऊन पाठपुरवा करणेत यावा. सदर प्रस्तावात साठवण तलावाची क्षमता वाढविणेचाही समावेश आहे. त्यासाठी भविष्यातील विकास

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्रकल्प व लोकसंख्या वाढ विचारात घेऊन यापूर्वी सल्लागार इन्फ्राप्लॅन इंजि.सर्व्हिसेस यांनी निश्चित केलेप्रमाणे पाण्याचा वाढीव कोटा मंजूरीसाठी जलसंपदा विभागास प्रस्ताव सादर करावा.

कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख/बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६ दिनांक २२.०४.२०११ रोजी शिर्डी येथे झालेल्या वैद्यकीय उपसमिती सभेचे इतिवृत्त.**
**निर्णय क्र.३४३ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.**

---

**विषय नं.०७ (अ) नोंद घेण्याचे विषय.**

**०१ (अ) माहे मार्च-एप्रिल-मे-२०११ मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**
**(ब) माहे मार्च- एप्रिल-मे-२०११ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(A)** माहे मार्च-एप्रिल-मे-२०११ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या अनुक्रमे मार्च रु. ११,३२,७७,९८४/-, एप्रिल रु. ११,९२,९५,२७७/- व मे रु. १०,७०,१४,२२८/- देणगीचा तक्ता, माहे मार्च-एप्रिल-मे-२०११ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा अनुक्रमे मार्च रु. २,१२,९३७/-, एप्रिल रु. ३,३६,३६७/- व मे रु. १,८३,८१३/- चा अहवालाच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

---

**०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये फेब्रुवारी -२०११ या महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(B)** श्री साईबाबा रुग्णालयात माहे फेब्रुवारी -२०११ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये २४,४१,९६४/- देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०३. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अपोलो फार्मसी यांना चालविण्यास दिलेल्या मेडीकल स्टोअरचे माहे जानेवारी -२०११ चे उत्पन्नाची नोंद घेणे बाबत.**

**(C)** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये मे.अपोलो फार्मसी, एंटरप्राईजेस लि.,चेन्नई यांना ना नफा ना तोटा तत्वावर चालविण्यास दिलेल्या मेडिकल स्टोअर्स पोटी माहे जानेवारी-२०११ या महिन्यात रुपये ७,५८,११८/- मात्र देणगी चेक प्राप्त झाले आहेत

**निर्णय क्र.३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०४. श्री साईनाथ रुग्णालयात माहे मार्च-एप्रिल-२०११ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**(D)** श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे मार्च-एप्रिल-२०११ या महिन्यात अनुक्रमे मार्च रु.३५,२५,००४/- व एप्रिल रु.३०,३३,८५०/- मात्र देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०५. श्री साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी -मार्च -एप्रिल २०११ मध्ये गरीब रुग्णांना बीलात दिलेल्या सवलतीची नोंद घेणे.**

**(E)** साईनाथ रुग्णालयात माहे फेब्रुवारी-मार्च-एप्रिल २०११ मध्ये अंतररुग्ण व बाह्यरुग्ण अनुक्रमे फेब्रुवारी रु. ८२,५५५/-, मार्च रु. ७०,२५१/- व एप्रिल रु. ४६,८५९/- थॅलसेमिया व हिमोफेलिया अनुक्रमे फेब्रुवारी रु. ५१,४००/-, मार्च रु. ४८,०५०/- व एप्रिल रु. ३९,१००/- वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र. ३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**०६. माहे मार्च-एप्रिल २०११ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**(F)** माहे मार्च-एप्रिल २०११ संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे मार्च ४६,८७२ व एप्रिल ४६,३९० मनुष्य दिनांच्या कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या.

**निर्णय क्र.३४४ नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**०७. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३४४** (G) नोंद घेण्यात येऊन तक्ता "ब" मधील खालीलप्रमाणे बांधकामाची अंतिम बिले आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(०१) मौजे नांदुर्खी येथील संस्थानला दिलेल्या जमिनीला तार कंपाऊंड करणेकामी मे.मिलींद एस.पाचोरकर, निफाड यांचे अंतिम बील रुपये ४,२३,९३८/- आदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(०२) श्री साईनाथ रुग्णालयातील जुन्या ऑपरेशन थिएटर करिता ॲल्युमिनीयम पार्टीशन करणेकामी मे.रविंद्र रबर प्रॉडक्टस ॲण्ड फॅबीकेशन, श्रीरामपूर यांचे अंतिम बील रुपये ७९,४२६/- मात्र आदा करणेस मान्यता देणेत आली.

(०३) साईटेक प्रकल्पांतर्गत डेटा सेंटर करिता जिप्सम पार्टीशनमध्ये केबल करणेबाबत मे.मगर जायभावे असोशिएटस्, श्रीरामपूर यांचे रु. ६,२९,६८६/- मात्र रकमेचे अंतीम बिल आदा करणेस मान्यता देणेत आली.

(०४) सर्व्हे नं.४/२१ (केशव मंदिराकरिता कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे) कामी मे.महेंद्र आर.टाटीया, श्रीरामपूर यांचे अंतिम बील रुपये ३,०१,०९१/- मात्र आदा करणेस मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**०८. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र.३४४** नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ०८** **गुरुपौर्णिमा उत्सव मंडप उभारणीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी गुरुवार दि. १४ जूलै, २०११ ते दि. १६ जूलै, २०११ अखेर "श्रीं " चा गुरुपौर्णीमा उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान परिसर, धर्मशाळा परिसर, प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप, पार्टीशन, बॅरेकेटींग, स्टेज, कनात इ. अनुषंगीक व्यवस्था करणे आवश्यक आहे. तसेच पावसाळ्याचे दिवसांत साईभक्तांचे सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये मंडप व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे मंडप व इतर व्यवस्थेची उभारणी करणे आवश्यक आहे.

**अ) श्री गुरुपौर्णीमा उत्सव २०११ निमीत्त करावयाची व्यवस्था : (कालावधी दि. १४.०७.२०११ ते दि. १६.०७.२०११ अखेर ०३दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल / ठिकाण | परिमाण / एकक | अंदाजे दर रुपये प्रति दिवस प्रति चौ. फुट / रनिग फुट | अंदाजे रक्कम रुपये ०३ दिवसाची |
|---|---|---|---|---|
| ०१ | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप:-** समाधी मंदिर, चावडी, लेंडीबागेत, नंदादिप, शनि, महादेव व गणपती मंदिर, शनिमंदिर, महादेव मंदिर, व्दारकामाई ते रथ पालखी गेट, मंगल कार्यालय, साईउद्यान, १६ आर जागेत, जुने प्रसादालय, साईनगर, साईबाबा भक्तनिवासस्थान इ. परिसरात तसेच पालखी स्वागतासाठी व पालखी पदयात्रींसाठी पोलिस स्टेशन, स्वागत कक्ष, नगरपंचायत जवळ , निर्मळ पिंप्री, गुहा व शिंगवे येथे मंडप व्यवस्था. | १,१२,०९५.२८ चौरस फुट | १.७० | ५,७१,६८५.९३ |
| ०२ | **बाथरुमसाठी पत्र्याचे पार्टीशन व्यवस्था :-** साईनगर मैदानावर | ३००.०० रनिंग फुट | ५.०० | ४५००.०० |
| ०३ | **स्टेज व्यवस्था :-** मंदिर परिसरामध्ये कलाकारांचे कार्यक्रमासाठी | ३८४.०० चौरस फुट | १२.०० | १३८२४.०० |
| ०४ | **बॅरेकेटींग व्यवस्था :-** दर्शन रांगेकरीता व श्री साई प्रसादालय येथे. | १४००.०० रनिग फुट | ६.०० | २५२००.०० |
| ०५ | **दर्शन रांगेच्या बाजूने कनात बांधणे.** | ८००.०० रनिंग फुट | ३.०० | ७२००.०० |
| | | | एकुण अपेक्षित खर्च रुपये (अ) | ६,२२,४०९.९३ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**ब) पावसाळी ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप व्यवस्था : (दि. ०१.०७.२०११ ते दि. ३०.०९.२०११ अखेर एकुण ९२ दिवस)**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल / ठिकाण | परिमाण / एकक | अंदाजे दर रुपये प्रति दिवस प्रति चौ. फुट / रनिंग फुट | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | **ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडपः-** समाधी मंदिर परिसरात, सभाकुंड, गुरुस्थान मंदिर, शनि, महादेव व गणपती मंदिरा समोर, गेट नं. ०३ समोर, दर्शन रांगेकरीता, लाडू विक्री काउंटर, साई कॉम्प्लॅक्स मधील देणगी, साई प्रसाद निवासस्थान कार्यालया समोर, मंदिर परिसरात कॅलेंडर विक्री काउंटर समोर. | १६,१५०.०० चौरस फुट | ०.५० | ७,४२,९००.०० |

वरीलप्रमाणे **"अ"** नुसार श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०११ निमीत्ताने मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी रु. ६,२२,४१०/- मात्रचे खर्चास तसेच **"ब"** नूसार पावसाळा ॠतूत मंडप व्यवस्था करणेकामी अंदाजे रुपये ७,४२,९००/**-** मात्र खर्च येईल. करीता याकामी येणारे खर्चास व सदरहू कामी अशा प्रकारचे मंडप व इतर व्यवस्थेसाठी खालील मंडप ठेकेदार यांचेकडून सिलबंद निविदा मागविणेत येत आहे.

| | |
|---|---|
| ०१. | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०२. | शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर |
| ०३. | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर |
| ०४. | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०५. | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०६. | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला |
| ०७. | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर |
| ०८. | शरद साबु डेकोरेटर्स, इंदौर |
| ०९. | जीस आयडीयाज प्रा. लि., मुंबई |

तरी श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०११ व पावसाळा ॠतूत मंडप व्यवस्था करणेकामी एकूण रू.१३,६५,३१०/- खर्चास व उपरोक्त मंडप ठेकेदार यांचेकडून प्राप्त होणाऱ्या निविदा उघडून त्यावर चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. आजचे सभेपुढे उपरोक्तपैकी खालील सात निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०२ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर |
| ०३ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर |
| ०४ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर |
| ०५ | स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर |
| ०६ | नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला |
| ०७ | शरद साबु डेकोरेटर्स, इंदौर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ. नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | व्यवस्थेचा तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **अ) श्रीगुरुपौर्णीमा उत्सव निमीत्ताने व्यवस्था. ०३ दिवस** | | | | | | **ब) पावसाळा ॠतूत मंडप** | |
| | | एम. एस. पाईप व बल्ल्या वापरुन मंडप ७३१३० चौ. फुट | एम. एस. पाईप व कैच्या वापरुन मंडप ३८९६५.२८ चौ. फुट | सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था. ३८४ चौ. फुट | बाथरुम करीता पार्टीशन ३०० रनिंग फुट | दर्शन रांगेसाठी बॅरेकेटींग १४०० रनिंग फुट | दर्शन रांगेच्या बाजूने कनात ८०० रनिंग फुट | एम. एस. पाईप व बल्ल्या वापरुन मंडप १२२५० चौ. फुट | एम. एस. पाईप व कैच्या वापरुन मंडप ३९०० चौ. फुट |
| | | **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०१** | **०२** |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | | | | | | | | |
| निविदेतील दर | | ३५/- प्र. दि. प्र. चौ. फुट | ३५/- प्र. दि. प्र. चौ. फुट | १५/- प्र. दि. प्र. चौ. फुट | ८/- प्र. दि. प्र. र. फुट | १२/- प्र. दि. प्र. र. फुट | १२/- प्र. दि. प्र. र. फुट | १.७५ प्र. दि. प्र. चौ. फुट | ३.०० प्र. दि. प्र. चौ. फुट |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | | **३/-** | **९/-** | १०/- | **५/-** | ७/- | ७/- | ०.४० | ०.४० |
| **०२** | **रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर** | | | | | | | | |
| निविदेतील दर | | ४०/- | ४०/- | १०/- | १०/- | ११/- | १०/- | २/- | ३/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | ३.२५ | १०/- | <u>८/-</u> | ९/- | ७/- | <u>**५/-**</u> | ०.३५ | १.५० |
| **०३** **बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर** | | | | | | | | |
| निविदेतील दर | ३८/- | ३८/- | १४/- | २०/- | १२/- | ७/- | १.८० | ३.४० |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | ३.२५ | ९/- | १२/- | १५/- | <u>**७/-**</u> | ७/- | ०.३५ | <u>**०.३५**</u> |
| **०४** **लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर** | | | | | | | | |
| निविदेतील दर | ४२/- | ४२/- | १२/- | १२/- | १५/- | १२/- | २.५० | ३.२५ |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | २०/- | -- | १५/- | १०/- | १०/- | ५/- | <u>**०.३०**</u> | ३.०० |
| **०५** **स्वस्तिक मंडप वर्क्स, अहमदनगर** | | | | | | | | |
| निविदेतील दर | ३६/- | ३६/- | २५/- | १५/- | १२/- | ७/- | ०.९० | १.२० |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | १५/- | १८/- | २२/- | १२/- | १०/- | ५/- | ०.७५ | ०.९० |
| **०६** **नाना उजवणे मंडप कॉन्ट्रक्टर ॲण्ड डेकोरेशन, अकोला** | | | | | | | | |
| निविदेतील दर | ४.७७ | -- | १७/- | ५/- | १७/- | ५/- | ०.४७ | -- |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | ४.७७ | -- | १७/- | ५/- | १७/- | ५/- | ०.४७ | -- |
| **०७** **शरद साबु डेकोरेटर्स, इंदौर** | | | | | | | | |
| निविदेतील दर | -- | -- | -- | -- | -- | -- | ०.७५ | १.०० |
| चर्चा वाटाघाटीनंतरचे दर | -- | -- | -- | -- | -- | -- | ०.६० | ०.९० |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या दरामध्ये सदर व्यवस्थेसाठी खालील ठेकेदार यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत.

| अ. नं. | निम्नतम ठेकेदाराचे नांव | व्यवस्थेचा तपशिल | दर | कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **(अ) श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०११ व्यवस्था. ०३ दिवस** | | | | | |
| **०१** | **कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर** | ताडपत्रीचे छत असलेल एम. एस. पाईप / बल्ल्या वापरुन कापडी मंडप उभारणे ७३१३० चौ. फुट | ३/- प्रती दिवस प्रती चौ. फुट | | ६,५८,१७०.०० |
| **०२** | | एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर वापरुन ताडपत्रीचे छत असलेल कापडी मंडप उभारणे ३८९६५.२८ चौ. फुट | ९/- प्रती दिवस प्रती चौ. फुट | दि. १४.०७.२०११ ते दि. १६.०७.२०११ अखेर <u>०३ दिवस.</u> | १०,५२,०६२.५६ |
| **०३** | | बाथरुम करीता पार्टीशन ३०० र. फुट. | ५/- प्रती दिवस प्रती रनिंग फुट | | ४,५००.०० |
| **०४** | **रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर** | मंदिर परिसरा मध्ये सभाकुंड येथे स्टेज व्यवस्था करणे. ३८४ चौ. फुट | ८/- प्रती दिवस प्रती चौ. फुट | | ९,२१६.०० |
| **०५** | | दर्शन रांगेच्या बाजूने कनात ८०० र. फुट | ५/- प्रती दिवस प्रती रनिंग फुट | | १२,०००.०० |
| **०६** | **बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर** | दर्शन रांग बॅरेकेटींग १४०० र. फुट | ७/- प्रती दिवस प्रती रनिंग फुट | | २९,४००.०० |
| | | | | एकुण रुपये.. (अ) | १७,६५,३४८.५६ |
| **ब) पावसाळा ऋतूत मंडप.** | | | | | |
| **०१** | **लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर** | एम. एस. पाईप / बल्ल्या वापरुन ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे १२,२५० चौ. फुट | ०.३० प्रती दिवस प्रती चौ. फुट | दि. १८.०६.२०११ ते दि. ३०.०९.२०११ अखेर <u>१०५ दिवस</u> | ३,८५,८७५.०० |
| **०२** | **बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर** | एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर वापरुन ताडपत्रीचे छत असलेले कापडी मंडप उभारणे ३९००चौ. फुट | ०.३५ प्रती दिवस प्रती चौ. फुट | दि. १८.०६.२०११ ते दि. ३०.०९.२०११ अखेर <u>१०५ दिवस</u> | १,४३,३२५.०० |
| | | | | एकुण रुपये (ब).. | ५,२९,२००.०० |

**निर्णय क्र.३४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, वरिलप्रमाणे निम्नतम दराने सदरचे काम करुन घेणेस मान्यता देणेत आली. दरपत्रकातील अ. नं. ०२ चे व्यवस्थेसाठी कैलास मंडप व बाबला टेन्ट हाऊस, अ. नं. ०४ चे व्यवस्थेसाठी कैलास मंडप व नाना उजवणे व अ. नं. ०५ चे व्यवस्थेसाठी कैलास मंडप, रोशनी मंडप, बाबला टेन्ट व अ. नं. ०६ करीताचे व्यवस्थेसाठी रोशनी मंडप, लोकप्रिय मंडप, स्वस्तिक मंडप, नाना उजवणे यांचे दर समान स्वरुपाचे आले. काम सुरळीत व सोयीस्कर होणेचे दृष्टीने परिशिष्ट अ मधील सदरहू कामे अ. नं. ०२ व ०४ चे काम कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर, अ.नं.०५ चे**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**काम बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर व अ.नं.०६ चे काम रोशनी मंडप अ‍ॅण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेत आली. तसेच निविदेतील ब प्रमाणे पावसाळी मंडप उभारणीचे काम दि.१८.०६.२०११ पासून करुन घेणेचे ठरले. श्रीगुरुपौर्णीमा उत्सव-२०११ तसेच पावसाळी ॠतूत मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करुन घेणेकामी उपरोक्त प्रमाणे येणारे खर्चास तसेच उत्सव व पावसाळयाचे दिवसात साईभक्तांचे सोयीसाठी वाढीव मंडप व इतर व्यवस्थेची आवश्यकता भासल्यास मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणारे योग्य त्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ श्री साई प्रसादालय कॉन्फरन्स हॉल, मेन भोजन हॉल डोममध्ये श्री साईनाथ रुग्णालयाजवळील कॅंटीनमध्ये तसेच भक्तनिवासस्थान येथे बसविणेकरीता वॉल फॅन खरेदीकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून कोटेशनधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०-१०-२०१० चे सभेतील (१) आयत्या वेळचा विषय नं. ०२ निर्णय ८३२ अन्वये श्री साई प्रसादालय कॉन्फरन्स हॉल, मेन भोजन हॉल डोममध्ये तसेच श्री साईनाथ रुग्णालयाजवळील कॅन्टीनमध्ये बसविणेकामी वॉल फॅनची खरेदी करणेकामी रु. १,५०,७५९/-इतक्या खर्चास तसेच त्यासाठी कोटेशन मागविणेस व (२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ चे सभेतील आयत्या वेळचा विषयान्वये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे बसविणेकामी वॉल फॅनची खरेदी करणेकामी रु.१,४१,३५६/- इतक्या खर्चास तसेच त्यासाठी कोटेशन्स मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दोन्ही विभागाच्या वॉल फॅनसाठी मागणी एकत्रित करून कोटेशन मागविण्यात आली होती. प्राप्त झालेल्या कोटेश्न्सचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.समता इलेक्ट्रीकल्स, राहाता. |
| ०२) | मे.भनसाळी मोटर्स, साकुरी-राहाता. |
| ०३) | मे.समर्थ इलेक्ट्रीकल्स्, राहाता. |
| ०४) | मे.सुयश इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर |
| ०५) | मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालय कॉन्फरन्स हॉल, मेन भोजन हॉल डोममध्ये, श्री साईनाथ रुग्णालयाजवळील कॅन्टीनमध्ये तसेच भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे बसविणेकरीता वॉल फॅनची खरेदी करणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्स सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये | मागणी | होणारी किंमत | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे.समता इलेक्ट्रीकल्स, राहाता. | | | | | |
| | साईज -४५० एम.एम. | ५८५०/- | ५८५०/- | १५ नग | ८७,७५०/- | ३,८०,२३०/- |
| | साईज -६०० एम.एम. | ७३१२/- | ७३१२/- | ४० नग | २,९२,४८०/- | |
| ०२ | मे.भनसाळी मोटर्स, साकुरी-राहाता. | | | | | |
| | साईज -४५० एम.एम. | ६२००/- | ६२००/- | १५ नग | ९३,०००/- | ४,०१,०००/- |
| | साईज -६०० एम.एम. | ७७००/- | ७७००/- | ४० नग | ३,०८,०००/- | |
| ०३ | मे.समर्थ इलेक्ट्रीकल्स्, राहाता. | | | | | |
| | साईज -४५० एम.एम. | ६७००/- | ६७००/- | १५ नग | १,००,५००/- | ४,३२,५००/- |
| | साईज -६०० एम.एम. | ८३००/- | ८३००/- | ४० नग | ३,३२,०००/- | |
| ०४ | मे.सुयश इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर | | | | | |
| | साईज -४५० एम.एम. | ६३००/- | ६३००/- | १५ नग | ९४,५००/- | ३,९८,५००/- |
| | साईज -६०० एम.एम. | ७६००/- | ७६००/- | ४० नग | ३,०४,०००/- | |
| ०५ | मे.इंटरनॅशनल इलेक्ट्रीकल्स्, अहमदनगर | | | | | |
| | साईज -४५० एम.एम. | ६१५०/- | अनुपस्थित | १५ नग | ९२,२५०/- | ३,८८,८५०/- |
| | साईज -६०० एम.एम. | ७४१५/- | अनुपस्थित | ४० नग | २,९६,६००/- | |

**निर्णय क्र.३४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.समता इलेक्ट्रीकल्स राहाता यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१० गुंतवणूकीविषयी निर्णय घेणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** माहे **मे,२०११** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | आंध्र बॅंक, शिर्डी ( NPAY ) | १७/०५/२०११ | ३२,४१,२५५.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०२ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे मे २०११ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | १०,००,००,०००.०० |
| | एकूण रक्कम रुपये | १०,३२,४१,२५५.०० |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम **रु. १०.३२ कोटी** गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. तथपी अ.नं.१ रक्कम रु.३२,४१,२५५/- नित्यप्रसादालय अन्नदान योजनेतील असल्याने या योजनेतील अटी नुसार सदरची रक्कम ही आंध्र बँक, शिर्डी यांचेकडेच त्यांचेकडील प्रचलीत व्याजदराने गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम वजा जाता एकुण रक्कम रु.१० कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकेल.

उपलब्ध होणारी रक्कम रु.१० कोटी ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याज दराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बॅक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) कॅनरा बँक, शिर्डी
११) युको बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम **रु.१०** कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी व अ.नं.१ आंध्र बँक, शिर्डी ( NPAY) यांचेकडील मुदतपुर्तीची रक्कम त्यांचेकडेच पुनर्गुंतवणूक करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३४७ (अ) यावर सविस्तर चर्चा होऊन, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, तसेच अ.नं.१ आंध्र बँक, शिर्डी ( NPAY) यांचेकडील मुदतपुर्तीची रक्कम त्यांचेकडेच पुनर्गुंतवणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**(ब)** माहे **जुन,२०११** अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) | ०६/०६/२०११ | ७९,८१,५०९.०० |
| ०२ | विजया बँक, शिर्डी | ०६/०६/२०११ | १३,२७,७१,१६३.०० |
| ०३ | GOI ८ % Saving ( Taxable ) Bonds | १६/०६/२०११ | ५,००,००,०००.०० |
| ०४ | GOI ८ % Saving (Taxable) Bonds | ८/०६/२०११ | ५,००,००,०००.०० |
| ०५ | दैनंदिन खर्च वजा जाता माहे जुन २०११ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी अंदाजे रक्कम | | १०,००,००,०००.०० |
| | | **एकूण रक्कम -** | ३४,०७,५२,६७२.०० |

वरील तपशीलानुसार साधारणत: रक्कम रु. ३४.०७ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. तथापी अ.नं.१ रक्कम रु.७९,८१,५०९/- नित्यप्रसादालय अन्नदान योजनेतील असल्याने या योजनेतील अटी नुसार सदरची रक्कम ही आंध्र बँक, शिर्डी यांचेकडेच त्यांचेकडील प्रचलीत व्याजदराने गुंतवावी लागणार आहे. त्यामुळे सदरची रक्कम वजा जाता एकुण रक्कम रु.३३.२७ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकेल.

उपलब्ध होणारी रक्कम रु.३३.२७ कोटी ही नियमित सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे उच्चतम व्याजदराने गुंतविल्यास त्यांचेकडून संस्थानला जास्तीत-जास्त सेवाही मिळविता येतील. विश्वस्तव्यवस्थेचे वैधानिक लेखापरिक्षण करतेवेळी गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम ही

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



स्थानिक राष्ट्रीयीकृत/सेवा देणा-या बँकेकडेच जास्तीत-जास्त व्याजदराने गुंतविण्यात यावी असे लेखापरिक्षक यांनी सुचविले असल्याने, संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या खालील बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे सदरची गुंतवणूक करता येईल असे नम्र मत आहे :-

१) युनियन बँक ऑफ इंडीया, शिर्डी
२) सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी
३) आंध्र बँक, शिर्डी
४) स्टेट बँक ऑफ इंडीया, शिर्डी
५) बँक ऑफ बरोडा, कोपरगांव
६) बँक ऑफ बरोडा, नासिक
७) बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी
८) विजया बँक, शिर्डी
९) युनायटेड बँक ऑफ इंडीया, शिर्डी
१०) कॅनरा बँक, शिर्डी
११) युको बँक, शिर्डी

तरी वरील अ.नं. १ ते ११ या बँकांकडून जसजशी गुतवणूकीसाठी रक्कम उपलब्ध होईल तसतसे व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या बँकेकडे उपरोक्तप्रमाणे उपलब्ध होणारी रक्कम रु. ३३.२७ कोटींची टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यासाठी व अ.नं.१ आंध्र बँक, शिर्डी ( NPAY ) यांचेकडील मुदतपुर्तीची रक्कम त्यांचेकडेच पुनर्गुंतवणूक करण्यासाठी निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३४७** **(ब) यावर सविस्तर चर्चा होऊन, गुंतवणूकीसाठी उपलब्ध होणारी रक्कम वरीलप्रमाणे अ.नं.०१ ते ११ बँकांकडून व्याजदर मागवुन जास्तीत-जास्त व्याजदर देणाऱ्या बँकेकडे टप्प्या-टप्प्याने गुंतवणूक करण्यात यावी, तसेच अ.नं.१ आंध्र बँक, शिर्डी (NPAY) यांचेकडील मुदतपुर्तीची रक्कम त्यांचेकडेच पुनर्गुंतवणूक करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.११** **सोने व चांदी नाण्यांच्या विक्री किंमतीचे बदलाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्रींची प्रतिमा असलेली सोन्याची ५ ग्रॅम, १० ग्रॅम वजनाची व चांदीची २० ग्रॅम वजनाची नाणी तसेच २.५ ग्रॅम सोन्याचे पेंडन्टस साईभक्तांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८ जुलै, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५९८ अन्वये, सोने-चांदीच्या बाजाराभावात वेळोवेळी जसजशी वाढ अथवा घट होईल त्याप्रमाणात यांच्या विक्री मुल्यात वाढ अथवा घट करण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये, दिनांक ०१ डिसेंबर, २०१० ते १० मे, २०११ या कालावधीत सोने व चांदीचे बाजारभावात वाढ तथा घट (संदर्भ:- दैनिक सकाळ) झाल्याने मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात वेळोवेळी, सोने-चांदी नाणी व पेडंन्टसच्या विक्री मुल्यात बदल करण्यात आलेला आहे. उपरोक्त प्रमाणे विक्री मुल्यात केलेल्या बदलाचे विवरण खालील प्रमाणे-

| अ. क्र. | दरात बदल केल्याची दिनांक | सोने २.५ ग्रॅम | सोने ५ ग्रॅम | सोने १० ग्रॅम | चांदी २० ग्रॅम |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | ८/१२/२०१० | ५,६५०/- | ११,०५०/- | २१,८५०/- | १,१५०/- |
| ०२. | २३/०२/२०११ | - | - | - | १,२००/- |
| ०३. | ५/०३/२०११ | ५,९००/- | ११,६००/- | २२,९००/- | १,३००/- |
| ०४. | ७/०४/२०११ | ५७००/- | ११,१५०/- | २२,१००/- | १,४५०/- |
| ०५. | १९/०४/२०११ | ५८००/- | ११४००/- | २२,५५०/- | १,५५०/- |
| ०६. | २७/०४/२०११ | ५,९००/- | ११,६००/- | २२,९००/- | १,६५०/- |
| ०७. | १०/०५/२०११ | ६,०००/- | ११,७००/- | २३,१००/- | १,४००/- |

तरी सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दिनांक १ डिसेंबर, २०१० ते १० मे, २०११ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सोने-चांदीच्या बाजारभावात झालेल्या बदलाच्या पार्श्वभुमीवर सोने व चांदीचे नाणी व पेडंन्टसच्या विक्रीमुल्यामध्ये दि. ०१ डिसेंबर, २०१० ते दि.१० मे, २०११ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या बदलास कार्योत्तर मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा फाऊंडेशनचे नांवे असलेली गुंतवणूक संस्थानखाती वर्ग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा फाऊंडेशन हा ट्रस्ट सार्वजनिक न्यास नोंदणी कायदा १९५० नुसार सन १९६८ मध्ये दिनांक ३० एप्रिल १९६८ रोजी नोंदणी क्रमांक ई-३७४२(मुं.) अंतर्गत नोंदविण्यात आलेला आहे. श्री साईबाबा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



फाऊंडेशनच्या मुख्य कार्यालयाचा नोंदणीकृत पत्ता साईनिकेतन, दादर, मुंबई (संस्थानचे मुंबई कार्यालय) असा आहे. सदर न्यासाचे उद्दीष्ट साधारण शैक्षणिक सुविधा, वैद्यकीय मदत, इतर सार्वजनिक कार्य वगैरे या प्रमाणे आहेत. न्यास नोंदणीचे वेळचे संस्थापक विश्वस्त खालीलप्रमाणे आहेत.

१. मा.श्री.एस.के. वानखेडे - अर्थमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.श्री. पी.के.सावंत - कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा.श्री.एस.बी.चव्हाण - पाटबंधारेमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. मा.श्री.व्ही.एस.पागे - सभापती, महाराष्ट्र राज्य, विधानपरिषद, मुंबई
५. मा.श्री.टी.एस.भारदे - अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. मा.श्री.जे.आर.मुधोळकर - न्यायाधिश, नवी दिल्ली
७. मा.श्री. पी.जे. चिन्मुलगुंड-सचिव गृहमंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. मा.श्री.जी.बी.नेवालकर-मुंबई
९. मा.श्री.एन.डी.साहूकर-मुंबई
१०. मा.श्री.बी.आर.ढेकणे-प्राचार्य, सिडन्हम वाणिज्य महाविद्यालय, मुंबई
११. मा.श्री.डी.डी.पाटणकर-विश्वस्त/सचिव,श्री साईबाबा संस्थान, शिर्डी

श्री साईबाबा फाऊंडेशनच्या मुंबई येथील पत्त्यावर मा. सहाय्यक लेखाधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, मुंबई यांनी पाठविलेल्या पत्र क्र. ४०९२/०२.०५.१९९६ अन्वये न्यासाची लेखा विवरण पत्रे त्यांचे कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेली नसून ती, १० दिवसात दाखल करणेकामी कळविले होते. सदर पत्रास संस्थानने जा.क्र. एसएसएस/वशी-लेखा/६८८२/९६ दि. १७.०६.१९९६ अन्वये उत्तर दिलेले असून त्यात सदर न्यासाची कागदपत्रे दप्तरी आढळून येत नसल्यामुळे त्याबाबत शोध घेण्याचे काम चालू आहे तसेच मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडे कागदपत्रांच्या नकला मिळणेबाबत अर्ज दाखल केला असून कागदपत्रे प्राप्त होताच हिशोब सादर करण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे कळविले होते.

उपरोक्त पत्रानुसार मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयाकडून दि.२९.५.९७ व दि. ०२.१.९८ रोजी कागदपत्रे मिळविली असून त्यात न्यासाची घटना, उपरोल्लेखीत विश्वस्तांची नावे नमुद करण्यात आलेली होती. सदर मा. विश्वस्तांच्या यादीतील बरेसचे विश्वस्त आज हयात नाहीत, असे वाटते. सदरची कागदपत्रे प्राप्त झालेनंतर सुद्धा शिर्डी व मुंबई कार्यालयात सदर न्यासाचे पूर्वीची कागदपत्रे, रजिस्टर्सचा तसेच रेकॉर्डचा शोध घेतला असता कोणतेही कागदपत्रे, रजिस्टर्स, रेकॉर्ड प्राप्त झाले नाही.

श्री साईबाबा फाऊंडेशन या ट्रस्टचे नांवे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शाखा खोदादाद सर्कल, दादर, मुंबई व स्टेट बँक ऑफ इंडिया, दादर, मुंबई यांचेकडे काही डिपॉझिट ठेवलेले होते. सदर डिपॉझिट पावत्या आढळून आल्यामुळे प्रत्येक वेळेस व्याजाचे नुकसान होऊ नये म्हणून मुदत संपण्याचे तारखेस या पावत्यांचे वेळोवळी मा.कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे सहीने पत्र देवून नुतनीकरण करुन घेण्यात आलेले आहे. तसेच ठेवीवर मिळणाऱ्या व्याजामधून कर कपात होऊ नये म्हणून फॉर्म क्र. १५ एच देखील बँकेकडे देण्यात येत होता. तथापि, श्री साईबाबा फाऊंडेशनचा पॅन क्रमांक नसल्याने तसेच कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध नसलेने, आयकर कायद्याच्या पूढील अडचणी लक्षात घेता, फॉर्म क्र. १५ एच पाठविणे बंद केलेले आहे.

श्री साईबाबा फाऊंडेशन, मुंबई नोंदणी क्र.ई-३७४२(मुंबई) व साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी नोंदणी क्र.ई-६९(अहमदनगर) हे दोन्ही स्वतंत्र न्यास असुन या दोन्ही न्यासांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. फक्त साईबाबा फाऊंडेशन, मुंबईचा मा.धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी केलेला पत्ता हा संस्थानच्या मुंबई कार्यालयाचा जो पत्ता आहे तोच असल्यामुळे मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचेकडून येणारी पत्रे संस्थानच्या मुंबई कार्यालयाकडे प्राप्त होतात. तसेच डिपॉजीटच्या पावत्या संस्थानच्या मुंबई कार्यालयात आढळुन आल्यामुळे त्या पावत्यांचे वेळोवेळी मा.कार्यकारी अधिकारी यांचे सहीने नुतनीकरण करुन घेण्यात आलेले आहे. कायदेशीर दृष्टया या दोन्ही न्यासाचा एकमेकांशी काहीही संबंध नाही.

मा.धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयातील अधिकाऱ्यांशी यापूर्वी चर्चा केली असता सदर न्यास रद्द करणे, रक्कम संस्थानकडे वर्ग करणेबाबत न्यासाच्या विश्वस्तांचे तसे पत्र सादर करणे आवश्यक आहे. त्या पत्रावरुन/अर्जावरुन मा. धर्मादाय आयुक्त हे योग्य ती कार्यवाही करु शकतील असे त्यांनी चर्चेत सांगितले आहे.

आज अखेर श्री साईबाबा फाऊंडेशन या नावे सेंट्रल बँक ऑफ इंडिया, खोदादाद सर्कल, मुंबई यांचेकडे रु. २३,०३,९०४/- व स्टेट बँक ऑफ इंडिया, दादर, मुंबई यांचेकडे रु. ६,०२,८२८/- एवढे डिपॉझिट असून त्यांची मुदत अनुक्रमे दि. ०९.०२.२०१२ व दि. १२.०८.२०११ रोजी संपत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



परंतू, सदर न्यासाचे सध्या कोणीही विश्वस्त हयात नसल्यामुळे सदर न्यासाचे नावावरील डिपॉझिट रक्कम दरवर्षी फक्त नुतणीकरण करुन घेण्याऐवजी श्री साईबाबा संस्थानचे बँकेकडील खात्यामध्ये जमा करुन घ्यावी किंवा कसे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. मुदत ठेवींचे नुतनीकरण आतापर्यंत मा. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे सहीने वेळोवेळी करुन घेतलेले असल्याने मा. कार्यकारी अधिकारी यांचे सहीने पत्र देऊन चेकद्वारे रक्कम मिळणेबाबत बँकेला विनंती करता येईल. चेक प्राप्त होताच तो संस्थानचे बचत खात्यावर जमा करुन घेऊन सदर रक्कम संस्थानचे ट्रस्ट कॉर्पस खाती जमा करावी असे वाटते.

तरी उपरोक्तप्रमाणे करावयाच्या कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी सादर.

**निर्णय क्र.३४९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१३ आयकर कायद्यातील तरतुदीन्वये दि.३१.०३.२०१० अखेर शिल्लक असलेल्या अखर्चीत उत्पन्नाच्या विनियोगाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीस सर्व माध्यमांव्दारे मिळणारे उत्पन्न हे आयकर कायदा १९६१ चे कलम १०(२३)(सी)(v) अन्वये करमुक्त आहे. या कलमांतर्गत तरतूदींमध्ये सन २००२ मध्ये सुधारणा झालेल्या असून, सुधारित तरतूद पुढीलप्रमाणे आहे : -

Provided also that the fund of trust or institution [ or any university or other educational institution or any hospital or other medical institution ] referred to in sub-clause (iv) or sub-clause (v) [ or sub-clause (vi) or sub-clause (VIA) ]

e) applied its income, or accumulates it for application, wholly and exclusively to the objects for which it is established and in a case where more than fifteen percent of its income is accumulated on or after the 1st day of April-2002, the period of the accumulation of the amount exceeding fifteen percent of its income shall in no case exceed five years."

उपरोक्त सुधारीत तरतुदीनुसार एका आर्थिक वर्षात मिळालेल्या एकूण उत्पन्नापैकी ८५ % उत्पन्न हे त्याच आर्थिक वर्षात न्यासाच्या ध्येय व उद्दीष्टांवर खर्च करणे बंधनकारक आहे. तथापि ते शक्य न झाल्यास ८५ % उत्पन्नापैकी अखर्चित राहिलेली रक्कम त्यापुढील ५ आर्थिक वर्षामध्ये खर्च करता येईल व दरम्यान या रकमेची आयकर कलम ११ अन्वये विहित पध्दतीने गुंतवणूक करावी लागेल. पुढील ५ वर्षाच्या मुदतीत ही अखर्चित रक्कम पूर्णपणे खर्च न झाल्यास सहाव्या आर्थिक वर्षात ती करपात्र म्हणून हिशोबात धरली जाईल व त्या रकमेवर आयकर कायदयातील तरतूदीनुसार त्या आर्थिक वर्षासाठी लागू असलेल्या महत्तम आकारणी दराने आयकर आकारणी केली जाईल.

आयकर कायदा, १९६१ चे तरतुदी अन्वये संस्थानचे आयकर रिटर्न दर वर्षी आयकर कार्यालयाकडे दाखल करण्यात येते. आयकर रिटर्न दाखल करताना त्या-त्या वर्षाचे शिल्लक असलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात कोणकोणत्या उद्दीष्टांवर खर्च करण्यात येईल याबाबतची मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयासह सविस्तर यादी सोबत जोडणे आवश्यक असते व त्या उद्दीष्टांवरच अखर्चित उत्पन्न खर्च करणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यातुन दर्शविलेला खर्च ग्राहय धरण्यात येत नाही.

आयकर कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेल्या रिटर्न नुसार संस्थानचे मागील चार वर्षाचे उत्पन्न, ८५ % करावयाचा खर्च, प्रत्यक्ष खर्च व कमी झालेल्या खर्चाची सविस्तर आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपये कोटीमध्ये)

**तक्ता क्र.१**

| अक्र | आर्थिक वर्ष | एकूण उत्पन्न | ८५% करावयाचा खर्च | प्रत्यक्ष खर्च | | कमी झालेला खर्च | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | रक्कम | % | रक्कम | % |
| १ | २००६-०७ | १०१.८१ | ८६.५४ | ५९.२६ | ५८% | २७.२८ | २७% |
| २ | २००७-०८ | १४१.१८ | १२०.०० | ५४.२९ | ३८% | ६५.७१ | ४७% |
| ३ | २००८-०९ | १९१.१५ | १६२.४८ | ६९.२५ | ३६% | ९३.२३ | ४९% |
| ४ | २००९-१० | २१३.३९ | १८१.३८ | ७२.९८ | ३४% | १०८.४० | ५१% |

संस्थानचे सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण व्हावयाचे असुन, लेखापरिक्षण झालेल्या व आयकर कार्यालयाकडे दाखल करण्यात आलेल्या आयकर रिटर्न नुसार दिनांक ३१ मार्च २०१० अखेर खाली नमुद केल्याप्रमाणे वर्षनिहाय अखर्चित उत्पन्न खर्च करणे अद्याप शिल्लक आहे.

**तक्ता क्र.२**

| अ.क्र | आर्थिक वर्ष | शिल्लक अखर्चित रक्कम (रुपये ) | खर्च करावयाची अंतिम मुदत |
|---|---|---|---|
| १ | २००६-०७ | ३,६६,२९,३३८ | ३१.०३.२०१२ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| २ | २००७-०८ | ६३,५२,०१,७१४ | ३१.०३.२०१३ |
| ३ | २००८-०९ | ९३,२२,८३,७८० | ३१.०३.२०१४ |
| ४ | २००९-१० | १०८,४०,२६,३९८ | ३१.०३.२०१५ |
| | **एकूण** | **२६८,८१,४१,२३०** | |

उपरोक्त तक्ता क्र.१ पहाता, असे निदर्शनास येते की, कोणत्याही वर्षात एकूण उत्पन्नाच्या पूर्ण ८५% खर्च झालेला नाही. तसेच प्रत्येक वर्षी प्रत्यक्ष खर्चाची टक्केवारी कमी कमी होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अखर्चित उत्पन्नाचा आकडा दरवर्षी वाढत गेलेला असुन दि.३१.३.२०१० रोजी एकुण अखर्चित उत्पन्न तक्ता क्र.२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे रु.२६८.८१ कोटीवर पोहोचले आहे. सन २०१०-११ या आर्थिक वर्षातही खर्चाचे प्रमाण कमी असुन लेखापरिक्षणानंतर सदर वर्षाचे अखर्चित उत्पन्नही साधारणपणे रु.११० कोटी पर्यंत असेल, म्हणजे एकुण अखर्चित उत्पन्न रु.३७८.८१ कोटी एवढे होईल. अशाप्रकारे दरवर्षी खर्चाचे प्रमाण कमी राहिल्यास / अपेक्षित खर्च न झाल्यास संस्थानला या अखर्चित उत्पन्नावर मोठया प्रमाणात आयकर भरावा लागेल व तसे होणे संस्थानच्या दृष्टीने हितावह नाही.

सन २०१०-११ अखेर एकत्रित अखर्चित उत्पन्न रक्कम रु. ३७८.८१ कोटी एवढे होऊन ते टप्प्या-टप्प्याने खर्च करावयाची मर्यादा दिनांक ३१.३.२०१६ पर्यंत आहे. म्हणजे यापुढील सन २०११-१२ ते सन २०१५-१६ या प्रत्येक वर्षाच्या उत्पन्नाच्या ८५% खर्चा व्यतिरिक्त आणखी साधारणपणे दरवर्षी रु.७५ कोटीपर्यंत अधिक खर्च करणे जरुरीचे आहे. याचाच अर्थ वरील प्रत्येक वर्षात रु.२७५/- कोटी खर्च होणे आवश्यक आहे. जेणे करुन उपरोक्त नमुद अखर्चित उत्पन्न रु.३७८.८१ कोटी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाअखेर खर्च होऊ शकेल व तसे झाल्यास आयकर भरण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. अन्यथा संस्थानला आयकर भरणे अटळ होईल.

तरी उपरोक्त टिपणीत नमुद केल्याप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या उत्पन्नाचे ८५% अधिक रु.३७८.८१ कोटी मात्र दिनांक ३१ मार्च २०१६ अखेर खर्च करणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. अन्यथा खर्च न झालेल्या अखर्चित उत्पन्नावर त्या-त्या वर्षासाठी नमुद केलेल्या जास्तीत जास्त दराने आयकर भरावा लागेल.

तरी प्रत्येक वर्षात वाढणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणात खर्चातही त्याप्रमाणात वाढ होणे आवश्यक असुन वर नमुद केल्याप्रमाणे करावयाचे खर्चाबाबत धोरणात्मक निर्णय होणेकामी सादर.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली, व याबाबत पूर्वी वेळोवेळी केलेल्या व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार खर्चाचे नियोजन करण्यात यावे,तसेच मंदीर परिसर नूतनीकरण प्रकल्प त्वरीत सुरु करावा, असे ठरले.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१४** **कार्पोरेशन बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणे बाबत**

**प्रस्ताव-** कार्पोरेशन बँक,यांची शाखा शिर्डी येथे दि. १२ एप्रिल , २०११ रोजी सुरू झालेली असून, सदर बँकेत संस्थानचे बचतखाते उघडणेबाबत बँकेने विनंती केलेली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम २० अन्वये संस्थानची रक्कम फक्त राष्ट्रीयकृत बॅकेतच ठेवण्याचे बंधन आहे, व कार्पोरेशन बँक ही राष्ट्रीयकृत आहे.

सदर बँकेस जा.नं. एसएसएस/वशी-लेखा/५०६/२०११, दि. २५ एप्रिल, २०११ रोजीच्या पत्रान्वये, संस्थानला आवश्यक असणाऱ्या बँक सेवा पुरविण्याबाबत कळविलेले असून, त्यांनी त्यांचे दि. ११ मे, २०११ चे पत्रान्वये संस्थानला आवश्यक त्या सेवा विनामुल्य देणेबाबत संमती दर्शविलेली आहे.

**निर्णय क्र.३५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्पोरेशन बँक, शाखा शिर्डी येथे संस्थानचे बचत खाते उघडणेस तसेच त्यांचेकडून इतर बँकाप्रमाणे संस्थानला सेवा घेण्यास व गुतवणूकीकामी त्यांचेकडून व्याजदर मागविण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१५** **संस्थान नियुक्त अंतर्गत लेखापरिक्षक, पूर्व लेखापरिक्षक यार्चे वाढीव फी मागणी बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच त्या अनुशंगाने आर्थिक व्यवहारातही मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारांवर योग्य नियंत्रण रहावे यासाठी लेखाशाखे कडून अदा करण्यात येणारे प्रत्येक देयक आदा करणे पूर्वी पूर्व लेखापरिक्षक (Pre Auditor) यांचे मार्फत परिक्षण झाल्यास नजर चुकीने होणा-या चुका व काही संभाव्य त्रुटी टाळणे शक्य होतील. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखा परिक्षक स्वत: हजर राहणार असल्यामुळे, वैधानिक लेखा परिक्षणातही त्यांची मदत होवून, वैधानिक लेखा परिक्षंकाच्या आक्षेपांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल यासाठी संस्थान मधील सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासना अंतर्गत पुरेसा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून पूर्व लेखा परिक्षक (Pre Audit) व अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Audit) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



संस्थानचे व्यवहार हे महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार होतात की नाही हे पाहण्याचे सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखा परिक्षकांवर देण्यात आलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१३ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ७८ अन्वये संस्थानचे अंतर्गत लेखपरिक्षक म्हणुन श्री.अभय.ए.शास्त्री चार्टर्ड अकौंटंट व पुर्व लेखापरिक्षक म्हणुन श्री ए.जी.लोंगाणी चार्टर्ड अकोटंटस कोपरगाव यांची प्रत्येकी रु.१,७५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंचाहत्तर हजार मात्र) तसेच रुग्णालये विभागासाठी अंतर्गत लेखापरिक्षक म्हणुन श्री.सुरेश.डी.डौले चार्टर्ड अकोटंट व पुर्व लेखापरिक्षक म्हणुन श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंट श्रीरामपुर यांची प्रत्येकी रु.१,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र) मानधनावर सन २०११-१२ या आर्थिक वर्षासाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

तथापी त्यांनी दि.२०.०४.२०११ चे पत्रान्वये आम्ही ४ वर्षापासुन लेखापरिक्षणाचे काम करीत असुन संस्थानच्या आर्थिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. नविन प्रसादालय, व्दारावती निवासस्थान, श्री साईबाबा सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटलचे विस्तारीकरण या सारख्या नविन विभागांची भर पडली आहे.

यामुळे संस्थानचे दैनंदीन कामकाज व व्यवहार वाढले असुन व्हावचरचे संख्येत दुप्पटीने वाढ झालेली आहे. मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. परंतु लेखापरिक्षकाच्या फी मध्ये कोणत्याही प्रकारे वाढ झालेली नाही. दि. २०एप्रिल,२०११ चे पत्रानुसार अंतर्गत लेखपरिक्षक श्री.अभय.ए.शास्त्री चार्टर्ड अकौंटंटस पुणे, पुर्व लेखापरिक्षक श्री ए.जी.लोंगाणी चार्टर्ड अकौंटंट कोपरगाव, रुग्णालये विभाग अंतर्गत लेखापरिक्षक श्री.सुरेश.डी.डौले चार्टर्ड अकौंटंट व पुर्व लेखापरिक्षक श्री.व्ही.व्ही.कोठारी चार्टर्ड अकौटंट श्रीरामपुर यांनी खालील प्रमाणे वाढीव फीची मागणी केलेली आहे.

| **अ.क्र** | **तपशिल** | **सध्याचे मानधन** | **अपेक्षित मानधन** | **वाढीव मानधन** |
|---|---|---|---|---|
| ०१. | संस्थान अंतर्गत लेखापरिक्षक | १,७५,०००/- | ४,००,०००/- | २,२५,०००/- |
| ०२. | संस्थान पुर्व लेखापरिक्षक | १,७५,०००/- | ३,००,०००/- | १,२५,०००/- |
| ०३. | रुग्णालये अंतर्गत लेखापरिक्षक | १,५०,०००/- | ३,५०,०००/- | २,००,०००/- |
| ०४. | रुग्णालये पुर्व लेखापरिक्षक | १,५०,०००/- | ३,००,०००/- | १,५०,०००/- |

त्यानुसार सदर वाढीव फी बाबत निर्णय होणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर

**निर्णय क्र.३५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१३ फेब्रुवारी,२०११ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ७८ अन्वये संस्थान नियुक्त अंतर्गत लेखापरिक्षकाचे व पुर्व लेखापरिक्षकाचे फी मध्ये अनुक्रमे २५% व १५% खालीलप्रमाणे पुर्णांकित वाढ करणेत यावी, असे ठरले.**

| अ.नं. | तपशिल | सध्याचे मानधन रुपये | वाढीव मानधन (%) | एकूण मानधन रुपये | पुर्णांकित एकूण मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | संस्थान अंतर्गत लेखापरिक्षक | १,७५,०००/- | २५ % | २,१८,७५०/- | २,२०,०००/- |
| ०२ | संस्थान पूर्व लेखापरिक्षक | १,७५,०००/- | १५ % | २,०१,२५०/- | २,००,०००/- |
| ०३ | रुग्णालय अंतर्गत लेखापरिक्षक | १,५०,०००/- | २५ % | १,८७,५००/- | १,९०,०००/- |
| ०४ | रुग्णालय पूर्व लेखापरिक्षक | १,५०,०००/- | १५ % | १,७२,५००/- | १,७५,०००/- |

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१६ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामधील मशिनरी/ इक्वीपमेंट दुरुस्ती व देखभाल करणेसाठी कन्झ्युमेबल स्पेअरपार्ट खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३५३ सदरहू विषयावरील चर्चा व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०५.२०११ चे सभेतील निर्णय क्र.३०६ अन्वये चर्चा होऊन निर्णय पारित झाला असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डीयाक ओ.टी. विभागासाठी पोर्टेबल क्ष - किरण (१०० MA) मशिन खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३५४ सदरहू विषयावरील चर्चा व्यवस्थापन समितीचे दिनांक २१.०५.२०११ चे सभेतील निर्णय क्र.३०७ अन्वये चर्चा होऊन निर्णय पारित झाला असल्याने सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.१८ श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Ultra Sonic Instrument Cleaner Machine खरेदीबाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र.७०१ अन्वये श्री साईनाथ रुग्णालयातील पॅथोलॉजी विभाग, श्री साईबाबा रुग्णालयातील आर्थोपडीक, जनरल व न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने मागणी केलेल्या मशिनरी / उपकरणे / फर्नीचर खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.१८,७२,८०५/- चे खर्चास व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली होती. त्यामध्ये उपरोक्त Ultra Sonic Instrument Cleaner Machine खरेदीकामी रु.४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१८/१०/२०१० अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन ६ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. उपरोक्त ०६ तांत्रिक बाबींच्या सिलबंद निविदा मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० रोजीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यांचा तांत्रिक बाबींचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला होता. त्यामध्ये Ultra Sonic Instrument Cleaner Machine खरेदीकामी कुणाचेही दर प्राप्त न झाल्यामुळे याकामी मा. व्यवस्थापन समिती सभा दि.१३/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८६ अन्वये फेर कोटेशन मागविणेस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ७२३३ दि.१०/०३/२०११ अन्वये एकुण १४ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.२५/०३/२०११ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन खालीलप्रमाणे ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत-

१. M/s. Kalelkar Surgicals Pvt. Ltd., Mumbai. (कोटेशन प्राप्त दि.०५/०४/२०११)
२. M/s. S.B. & Co., Mumbai (कोटेशन प्राप्त दि. ०५/०४/२०११)
३. M/s. Mangesh Enterprises, Pune (कोटेशन प्राप्त दि.०५/०४/२०११)

वरीलपैकी अ.नं. २ व ३ यांना कोटेशन मागणी पत्र पाठविलेले नसताना देखील त्यांनी कोटेशन पाठविले असून प्राप्त सर्व कोटेशन हे बंद स्थितीत आहे व तुलनात्मक दर मिळविण्याच्या दृष्टीने त्याचा फायदा होऊ शकेल. प्राप्त बंद कोटेशन दि. १२/०४/२०११ रोजी वैद्यकिय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Mangesh Enterprises, Pune Rate Per in Rs. | S. B. & Co., Mumbai Rate Per in Rs. | Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai Rate Per in Rs. | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Ultra Sonic Instrument Cleaner Machine | 1 | 75000.00 | 75500.00 | **73125.00** | **73125.00** |
| | **Warranty -** | | Not Given | Not Given | **One Year** | |
| | | | | **Total Amt. in Rs.** | | **73125.00** |

उपरोक्त तुलनात्मक दरांचे तक्त्यात मे. कालेलकर सर्जिकल प्रा. लि., मुंबई यांचे दर निम्नत्तम येतात, त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी रक्कम रु. ७३,१२५/- इतका खर्च येईल. सदरचा खर्च हा मंजुर रक्कम रु. ४०,०००/- पेक्षा जास्त असल्याने एकुण खर्च रु. ७३,१२५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३५५ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. कालेलकर सर्जिकल प्रा.लि. मुंबई यांचेकडून श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Ultra Sonic Instrument Cleaner Machine मशिन १ नग खरेदी करणेस व यकामी येणारे रक्कम रु.७३१२५/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.१९ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड / विभागाकरीता लॉकर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड / विभागाकरीता २९ लॉकर्स विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,८९,९७१/- चे खर्चास मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० चे सभेत निर्णय क्र. ६९५ अन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार इकडील पत्र क्र. ३५७७ दि.२८/०९/२०१० अन्वये एकुण १२ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि.१६/१०/२०१० अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सात कोटेशन प्राप्त झालेले होते. ते खालीलप्रमाणे -

१. M/s. Godrej & Boyce Mfg. Co. Ltd., Pune.
२. M/s. K. B. Electronics, Mumbai.
३. M/s. PSN Instrumentation Pvt. Ltd., Delhi.
४. M/s. R. T. Karachiwala, Ahmednagar.
५. M/s. Royal Steel Products, Mumbai.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



६. M/s. Sai Enterprises, Shrirampur.
७. M/s. Jalaram Steel Furniture Pvt. Ltd., Surat.

प्राप्त कोटेशन मधून अ.नं. १ ते ६ यांनी १८ गेजचे दर दिलेले असल्यामुळे त्यांना दि.०५/१२/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते तर अ.नं. ७ यांनी २० गेजचे पत्र्याचे दर दिलेले होते त्यामुळे त्यांना बोलविण्यात आलेले नव्हते. त्यानुसार उर्वरीत १ ते ६ पैकी खालील ३ पुरवठाधारक दि.०५/१२/२०१० चे सभेपुढे हजर होते.

१. M/s. K. B. Electronics, Mumbai.
२. M/s. PSN Instrumentation Pvt. Ltd., Delhi.
३. M/s. Sai Enterprises, Shrirampur.

उपरोक्त कोटेशनधारका सोबत चर्चा / वाटाघाटी होऊन सदरचे लॉकर खरेदीकामी गोदरेज कंपनीचे प्राप्त निम्नतम दर स्विकारण्यात यावे असे ठरले.

त्यानुसार गोदरेज कंपनीचे निम्नतम दर असलेले कोटेशनधारक मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांना प्रती नग रु.९३००/- याप्रमाणे २९ लॉकरचा इकडील पत्र क्र.५७७१ दि.२८/१२/२०१० अन्वये रु.२६९७००/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता.

मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांनी त्यांचे पत्र क्र.२००४ दि.१९/०२/२०११ चे पत्रान्वये उपरोक्त लॉकरचे दर प्रती नग रु.१०४३०/- (सर्व करांसह) इतके झालेले असून त्यांचे नविन दरानूसार प्रती लॉकर खरेदीकामी रु.११३०/- याप्रमाणे २९ लॉकर खरेदी कामी रु.३२७७७/- इतका जास्तीचा खर्च येणार आहे.

दि.०५/१२/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.९५४ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डीयाक ओ.टी. साठी मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांना इकडील पत्र क्र.६०१७ दि.०६/०१/२०११ अन्वये १० नग लॉकर प्रती नग रु.८८४१/- या प्रमाणे रु.८८,४१०/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आला होता व त्यांना प्रथम प्रत्येक फर्निचरचा एक नमूना पाठविण्यास सांगितले होते त्यातील लॉकरचा नमूना समक्ष पाहिल्यानंतर समाधानकारक वाटला.

त्यामुळे उपरोक्त २९ लॉकर्स मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचे लॉकर खरेदी केल्यास त्याकामी गोदरेज कंपनीच्या मंजूर दरापेक्षा कमी खर्च येईल. तेंव्हा मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचे लॉकर खरेदी करणेस हरकत नाही, असे मत आहे. मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचेकडून प्रती नग रु.८८४१/- या प्रमाणे २९ नग लॉकर खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.२,५६,३८९/- चे खर्च येणार आहे. सदर खर्च हा गोदरेज कंपनीच्या लॉकरसाठीच्या मंजूर रक्कम रु. २,६९,७००/- पेक्षा कमी (म्हणजेच रु.१३,३११/- इतका कमी) खर्च येणार आहे.

उपरोक्त लॉकर २९ नग मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांचे ऐवजी मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचेकडून खरेदी करण्यात आलेली असून याकामी कुठलाही जादा खर्च आलेला नाही.

तरी सदर लॉकर खरेदीची नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील वॉर्ड / विभागाकरीता लॉकर २९ नग मे.आर.टी. कराचीवाला, अहमदनगर यांचे ऐवजी मे. जलाराम स्टिल फर्निचर, सुरत यांचेकडून खरेदी करण्यात आलेला आहे त्यांची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Harmonic Scalpet set देणगी स्वरुपात स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि. २३/०४/२०११ रोजी श्री. अशोक मिरपुरी, साईभक्त - मुंबई यांनी वैद्यकिय संचालक यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा करुन रु. १२ लाखापर्यंत रुग्णालयास उपयुक्त अशा मशिनरी / उपकरणे देणगी देण्याची इच्छा व्यक्त केलेली आहे.

श्री साईबाबा रुग्णालयाचे जनरल ऑपरेशन थिएटरमध्ये Laparoscopic शस्त्रक्रिया करणेसाठी लागणाऱ्या Harmonic Scalpel Set ची त्यांना आवश्यकता आहे. सदरचे मशिनची अंदाजे किंमत रु. १२,००,०००/- असून त्यासाठी लागणाऱ्या कन्झुमेबल मटेरीयलची किंमत पुढील ५ वर्षाकरीता कंपनीने देऊ केलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

<table>
<tr><th>Sr. No</th><th>Name of Equipment</th><th>Name of Company & Address</th><th>Name of Contact Person & Phone No.</th><th>Make / Model</th><th>App. Rate Per in Rs.</th></tr>
<tr><td>1</td><td>Harmonic Scalpel System – Qty.01 No.</td><td>Johnson & Johnson Ltd., Ethicon Endo Surgery, Johnson House, 64-66, Senapati Bapat Marg,</td><td>Mr. Abbas Patel, District Manager,<br><br>Mob.No. 9371410114</td><td>Make -Johnson & Johnson<br><br>Model – New Harmonic ACE 5mm & Wave18mm Shears<br><table><tr><th>Product Code</th><th>Product Description</th><th>Qty.</th></tr><tr><td>GEN04</td><td>Generator</td><td>1</td></tr></table></td><td>12,00,000/-</td></tr>
</table>

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



<table>
<tr><td></td><td></td><td>Mahim (West),<br>Mumbai-<br>400 016.</td><td></td><td>
<table>
<tr><td></td><td>220 V</td><td></td></tr>
<tr><td>FSW01</td><td>Footswitch & cable</td><td>1</td></tr>
<tr><td>HP054</td><td>Handpiece 220 V</td><td>1</td></tr>
<tr><td>HST02</td><td>Test Tip</td><td>1</td></tr>
<tr><td>TLB01</td><td>Wrench</td><td>1</td></tr>
<tr><td>ACE36E</td><td>Harmonc ACE Ergonomic 36cms 5mm</td><td>3</td></tr>
<tr><td>WAVE 18S</td><td>HS Wave 18 cms open Shears</td><td>1</td></tr>
</table>
The rate contract for ACE36E-Rs 35000/- per piece & WAVE18S - Rs. 22900/- per piece for next 5 years excluding Taxes.<br>Warranty – 2 Year</td><td></td></tr>
</table>

तरी वरीलप्रमाणे Harmonic Scalpel Set देणगी म्हणून स्विकारलेले असून नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Harmonic Scalpet set देणगी स्वरुपात स्विकारणेत आला त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२१ मुदतबाहय औषधे नष्ट करणेस व संगणकातून नोंदी निर्लेखीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ हॉस्पिटलचे औषध भांडार व विविध वॉर्डमध्ये दि.०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीमध्ये एकुण रु. ४१,८९०/- ची औषधे मुदतबाह्य झालेली आहे. त्यांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे-

अ) मुख्य औषधे भांडारातील एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| १ | Main Store - expired medicines / surgicals | २३१९१.०० |
| २ | Non Moving medicines / surgicals | ९७२३.०० |
| | **Total Amt.in Rs.--** | **३२९१४.००** |

ब) दोन्ही रुग्णालयाचे विविध वॉर्डमधून जमा झालेले एकुण औषधे -

| Sr.No. | Name of Wards / Section | Total Amt.in Rs. |
|---|---|---|
| १ | All Wards Saibaba Hospital | ३७११.०० |
| २ | Sainath Sub Store & Wards | ५२६४.७९ |
| | **Total Amt.in Rs.--** | **८९७५.७९** |

**<u>अ + ब = पुर्णांकित रक्कम रु.४१,८९०.००</u>**

उपरोक्तप्रमाणे दोन्ही रुग्णालयाचे मुख्य औषध भांडार व विविध वॉर्डमधील औषधे दि.०१/०४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीत रु. ४१,८९०/- इतक्या रुपयांची मुदतबाह्य झालेली आहे. सदर कालावधीमध्ये जी औषधे / सर्जिकल साहित्य मुदतबाहय होतील असा अंदाज होता किंवा होणार आहे यासाठी संबंधित कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना तीन तर काही ठिकाणी सहा महिने अगोदर पत्रव्यवहार करुन परत घेण्याबाबत विनंती करणेत आलेली होती, त्यानुसार एकुण रु.१९,५३,३४८.५३ इतक्या रुपयांची औषधे कंपन्याना परत करुन त्याबदली क्रेडीट नोट घेऊन उपयोगी औषधे घेतलेली आहेत. उपरोक्त औषधांची संख्या एकदम कमी प्रमाणात आहे. याकामी संबंधित कंपनी / विक्रेते यांना परत देणेकामी तगादा करण्यात आलेला होता, परंतु कंपनीच्या धोरणामुळे तसेचऔषधांची संख्या खुपच कमी व Loose असल्यामुळे परत घेतलेले नाही.

सन २०१०-११ या आर्थिक वर्षामध्ये रु.२२,१३,९८,२५३/- ची औषधे खरेदी करण्यात आलेली आहे. त्यानुसार मुदतबाह्य औषधांची टक्केवारी ०.०००१८ इतकी आहे. सदरची यादी अंतर्गत लेखा परिक्षक (Auditors) यांचेकडून तपासून घेतलेली आहे.

गतवर्षी रु. ६०,९४१.८२ ची औषधे मुदत बाह्य झालेली होती. त्याचा विचार करता सन २०१०-११ मध्ये मुदतबाह्य झालेल्या औषधांचे प्रमाण तसे फारच कमी झालेले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी उपरोक्त प्रमाणे औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर औषधे जमिनीत खोलवर खड्डा घेऊन नष्ट करण्यास व सदरचा मुदतबाह्य औषधसाठा भांडारातील संगणकामधून कमी करणेस मान्यता देण्यात आली. तसेच पुढील सभेमध्ये साईबाबा रुग्णालयाचे मागील नऊ महिन्याचा जमा खर्चाचा तक्ता व प्रत्यक्षात झालेल्या तोट्याचा तपशील सभेपुढे ठेवण्यात यावा तसेच औषधे मुदत बाह्य होणेपूर्वी संबंधीत कंपनीस परत करण्यात यावी ज्या कंपन्या औषधे परत घेणार नाहीत त्यांची नावे काळ्या यादीत टाकण्यात यावीत असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२२** **स्टाफ नर्स भरतीप्रक्रियेकामी घेण्यात आलेल्या परिक्षेची गुणयादी उघडून त्यानुसार प्र-वर्गाप्रमाणे मुलाखतीकरिता बोलावयाचे उमेदवारांची संख्या, मुलाखतीची तारीख व वेळ निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६१ नुसार दोन्ही रुग्णालयांसाठी बिंदु नामावलीनुसार जात प्रवर्गाप्रमाणे आवश्यक तेवढ्या एकूण ६७ परिचारीकांची पदे भरणेकरीता अर्ज मागविणेसाठी दि.२५/१२/२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

दि. १३/०२/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेमधील निर्णय क्र. ०३ अन्वये स्टाफ नर्स पदासाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ५६४ उमेदवाराना दि. ०६/०४/२०११ रोजीचे ५० गुणांची बहुपर्यायी लेखी परिक्षेसाठी कॉल देण्यात आलेले होते. त्यानुसार ५० गुणांची बहुपर्यायी लेखी परिक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेसाठी कॉल देण्यात आलेल्या ५६४ उमेदवारांपैकी ३३९ उमेदवार हजर होते. परिक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा झालेनंतर त्याच दिवशी पेपर्स तपासणीचे कामकाज करुन अंतीम गुणवत्ता यादी तयार करुन सिलबंद गुणवत्ता यादी मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि. १०/०४/२०११ रोजीचे सभेमध्ये समक्ष उघडण्यात येऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

दि. ०६/०४/२०११ रोजी स्टाफ नर्स पदासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेमधील गुणवत्ता यादीनुसार अनु. जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास प्रवर्ग व अपंग या प्रवर्गातील ज्या उमेदवारांना लेखी परिक्षेमध्ये किमान ४०% गुण मिळालेले आहे, अशा उमेदवाराना संख्येनुसार बॅचेस तयार करुन प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावेत. खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीनुसार ज्या उमेदवारांना किमान ६०% गुण मिळालेले आहे, अशा उमेदवारांना प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. तसेच संस्थानचे दोन्ही रुग्णालयांमध्ये सध्या ११ महिने कालावधींसाठी नेमणूकीस असलेले २३ स्टाफ नर्स यांनाही प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावेछ. या निर्णयास अनुसरुन, दि. २७/०४/२०११ व दि. २८/०४/२०११ रोजी घेण्यात येणाऱ्या ४० गुणांच्या प्रात्यक्षिक परिक्षेकरीता १९० उमेदवारांना कॉल देण्यात आले.

एका बॅचमध्ये एक अंतर्गत परिक्षक व एक बाहेरील परिक्षक हे २५ उमेदवारांची प्रात्यक्षिक परिक्षा घेऊ शकतात. त्यानुसार दोन्ही रुग्णालयांत ४ अंतर्गत व ४ बाहेरील परिक्षक नेमून दि. २७/०४/२०११ रोजी दोन बॅचेस व दि. २८/०४/२०११ रोजी दोन बॅचेस अशा दोन दिवसांत ८ बॅचेसमध्ये १९० उमेदवारांची ४० गुणांची प्रात्यक्षिक परिक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. सदर परिक्षेकरीता दि. २५/०४/२०११ रोजी प्र. वैद्यकिय संचालक यांचे मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिक परिक्षेचे विविध प्रकारचे चार प्रश्नसंच तयार करुन ते सिलबंद करण्यात आले.

उपरोक्त नियोजनाप्रमाणे संस्थानचे दोन्ही रुग्णालयांत दि. २७/०४/२०११ व दि. २८/०४/२०११ रोजी प्रात्यक्षिक परिक्षा घेण्यात आली. याकामीअंतर्गत परिक्षक म्हणून सौ. मंदा संजय थोरात-सहा. अधिसेविका, श्री साईनाथ रुग्णालय, सौ. नजमा नूरमहंमद सय्यद-सिस्टर इन्चार्ज, श्री साईनाथ रुग्णालय, सौ. सुचिता राजीव मुठाळ-सिस्टर इन्चार्ज, श्री साईबाबा हॉस्पीटल, सौ. विद्या विजय कदम-सिस्टर इनचार्ज, श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांची नेमणूक करण्यात आली होती. तसेच बहिस्थ परिक्षक म्हणून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे इंस्टीट्यूट ऑफ नर्सीग एज्यूकेशन, अहमनगर येथील श्रीमती कविता विजय ठोकळ, श्री. सुचीत दिवाकर सगळगिळे, सौ. विद्या महेश कुऱ्हे, सौ. इस्थर सॅमसंन तेलधूने यांची नेमणूक करण्यात आली होती. परिक्षेस हजर असलेल्या सर्व उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र तपासण्यात आले. त्यातून दोन उमेदवार अपात्र आढळले.

प्रात्यक्षिक परिक्षेचे अंतर्गत परिक्षक व बहिस्थ परिक्षक यांनी उमेदवारांचे तयार केलेले इव्हॅल्यूएशन सिटस् मॉडरेटर यांचेकडून तपासून घेतल्या. मॉडरेटीगचे कामकाज वैद्यकिय अधिक्षक डॉ. एम.आर. घोरपडे व वैद्यकिय प्रशासक डॉ. कौशिक मकवाना यांनी केले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



सदर इव्हॅल्यूएशन सिटस् व उत्तरपत्रिका वैद्यकिय संचालक यांचे उपस्थितीत सिलबंद करण्यात आले आहे. त्यानंतर दोन्ही दिवसांचे सिलबंद इव्हॅल्यूएशन सिट्स व उत्तरपत्रिका दि. २९/०४/२०११ रोजी वैद्यकिय संचालक यांचे समक्ष उघडून त्यावरुन प्रवर्गानुसार प्रात्यक्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांनुसार गुणयादी तयार करुन, सदर यादी लिफाफ्यात वैद्यकिय संचालक यांचे समक्ष दि. २९/०४/२०११ रोजी सिलबंद केली.

प्रात्यक्षिक परिक्षेस उपस्थित असलेल्या उमेदवारांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| तपशील | अनु. जमाती ST | विमुक्त जाती VJ | भटक्या जमाती NT-B, C, D | विशेष मागास प्रवर्ग SBC | इतर मागास प्रवर्ग OBC | अपंग | खुला प्रवर्ग OPEN | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भरावयाचे पदांचा तपशील | १६ | ०६ | १३ (ब-०४+ क-०६+ ड- ०३) | ०५ | २० | ०५ | ०२ | ६७ |
| प्रात्यक्षिक परिक्षेस बोलविण्यात आलेले उमेदवार संख्या | ०८ | ०२ | ३१ (ब-०९+ क-१४ + ड-०८) | १० | ७५ | ०३ | ६१ | १९० |
| प्रात्यक्षिक परिक्षेस हजर पात्र उमेदवार संख्या | ०५ | ०२ | ३० (ब-०९+ क-१३+ ड- ०८) | १० | ६८ | ३ | ६० | १७८ |

सिलबंद गुणयादी मा. व्यवस्थापन समितीसमोर उघडून त्यानुसार मुलाखतीसाठी प्रवर्गानुसार बोलविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या, मुलाखतीची तारीख व वेळ निश्‍चित करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, असे मत आहे.

१. आरक्षित प्रवर्गानुसार प्रात्यक्षिक परिक्षेच्या गुणयादीतील गुणवत्ताक्रमानुसार (मिरीटनुसार) एका पदाकरीता दोन उमेदवार मा. व्यवस्थापन समितीसमोर मुलाखतीकरीता बोलवावे, असे मत आहे.

२. ज्या उमेदवारांनी अर्ज करतेवेळी जी.एन.एम. चे अंतिम निकाल यादीची झेरॉक्सप्रत जोडली होती, त्यांना प्रात्यक्षिक परिक्षा / मुलाखतीपूर्वी एम.एन.सी. रजिस्ट्रेशन सर्टीफिकेट सादर करणेच्या अटीवर लेखी व प्रात्यक्षिक परिक्षेस बोलविण्यात आले होते. परंतु यापैकी ज्या उमेदवारांनी अद्यापपर्यंत एम.एन.सी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट झेरॉक्स प्रत जमा केलेल्या नाहीत, त्यांना मुलाखतीस बोलविणेत येऊ नये, असे मत आहे.

३. अनुसुचीत जमाती, विमुक्त जाती, अपंग या प्रवर्गातील भरावयाचे पद संख्येपेक्षा प्रात्यक्षिक परिक्षेस बसलेल्या उमेदवारांची संख्या कमी असल्याने सदर प्रवर्गातील काही जागा रिक्त राहणार आहे. याकरीता खुल्या प्रवर्गातील प्रात्यक्षिक परिक्षेच्या गुण यादीतील पहिले १० उमेदवार व सध्या ११ महिने कालावधीकरीता तात्परते स्वरुपात कार्यरत असलेल्या परिचारक / परिचारीका यांना मुलाखतीकरीता बोलवावे, असे मत आहे.

तरी, उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५९** **दिनांक २७-२८/०४/२०११ रोजी परिचारक/परिचारिका भरतीकरीता घेण्यात आलेल्या प्रात्यक्षिक परिक्षेसाठी प्रवर्गानुसार हजर पात्र सर्व उमेदवारांच्या मुलाखती तीन टप्प्यात दिनांक २२/०६/२०११, २८/०६/२०११ व २९/०६/२०११ रोजी मा. वैद्यकीय उपसमितीसमोर घेण्यात याव्यात व निवड केलेल्या उमेदवारांना नेमणूक आदेश देण्यात यावेत असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२३** **डॉ.वहिदा वजिउद्दीन इनामदार यांचा वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेद) या पदावर नेमणूक करणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** डॉ. वहिदा वजिउद्दीन इनामदार यांनी विश्‍वस्त मा. डॉ. ई.बी. गोंदकर यांचेकडे श्री साईबाबा संचलीत रुग्णालयात डॉक्टर या पदावर नियुक्ती होणेसाठी अर्ज सादर केलेला असून, सदर अर्जात मी साईबाबा संस्थान संचलीत शैक्षणिक संकुलाची माजी विद्यार्थीनी असून, नुकतेच मी B.A.M.S. परिक्षा उत्तीर्ण झाले आहे. तसेच मी एक वर्ष संगमनेर, अहमदनगर जिल्हा रुग्णालयात Internship पूर्ण केलेली आहे. या दरम्यान (स्त्रीरोग, बालरोग, कायाचिकित्सा, इ.एन.टी., सर्जरी,डिसप्रेनसरी) मी विविध नामवंत डॉक्टरांकडे काम केलेले आहे. मी शिरडी येथील रहिवासी असून, आपल्या श्री साईबाबा संस्थान संचलीत रुग्णालयात मी सेवा करु इच्छिते. तरी, मला संस्थान सेवेत श्री साईबाबा संचलीत रुग्णालयात नोकरी करण्याची संधी मिळावी ही विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कु. वहिदा इनामदार यांचे अर्जावर विश्वस्त मा. डॉ. ई. बी. गोंदकर यांनी वैद्यकिय संचालक यांचे नावे पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. "डॉ. वहिदा इनामदार या मुलीने आपले संस्थेमधूनच शिक्षण पूर्ण केलेले आहे. श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये डॉ. शेळके यांना पदोन्नती झालेमुळे त्यांची जागा रिक्त आहे. तरी त्या जागेवर डॉ. इनामदार यांना काम करण्याची संधी द्यावी. सोबत त्यांचे मातोश्री इनामदार मॅडम यांचा विनंती अर्ज आहे. तरी व्यवस्थापन मंडळासमोर विषय ठेवावा किंवा आपले अधिकारात शक्य असेल तर काम करण्याची संधी द्यावी.

डॉ. वहिदा वजिउद्दीन इनामदार यांची माहिती पुढीलप्रमाणे-

पूर्ण नाव : डॉ. वहिदा वजिउद्दीन इनामदार
जन्मतारीख : ०५/१२/१९८५
शिक्षण : एच.एस.सी.-२००३
बी.ए. एम. एस.-२००९

श्री साईनाथ रुग्णालयासाठी मंजूर असलेल्या कर्मचारी आकृतीबंधामध्ये आयुर्वेद या पदाच्या ०२ जागा मंजूर असून, शैक्षणिक पात्रता बी. ए. एम. एस व सुधारित वेतनश्रेणी १५६००-३९१०० व ग्रेड पे ५४०० अशी आहे. सदर मंजूर दोन जागेपैकी एका जागेवर डॉ. संदीप ज्ञानेश्वर शेळके यांची खुल्या प्रवर्गातून नेमणूक करण्यात आलेली असून, आरक्षणाच्या नियमानुसार दुसऱ्या पदावर अनुसुचीत जाती प्रवर्गातील उमेदवाराची नेमणूक करावी लागेल.

वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) या पदाबाबत वैद्यकिय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. "श्री साईनाथ रुग्णालयात कर्मचारी आकृतीबंधानुसार ०२ वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) यांची पदे मंजूर असून, सदर पदावर यापूर्वी डॉ. एस.बी. गोंदकर, हे वरिष्ठ वैद्यकिय अधिकारी म्हणून तसेच डॉ. संदीप ज्ञानेश्वर शेळके, हे कंत्राटी पध्दतीने आयुर्वेद विभागात एकत्रित वेतनावर कार्यरत होते. डॉ. एस.बी. गोंदकर हे सेवानिवृत्त झालेले असून, त्यांचे रिक्त पदी डॉ. संदीप ज्ञानेश्वर शेळके यांची वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. त्यामुळे सध्या आयुर्वेद विभागात एकच वैद्यकिय अधिकारी कार्यरत असून, एक पद रिक्त आहे. सदर रिक्त पदावर वैद्यकिय अधिकारी (आयुर्वेद) स्त्री कर्मचारी यांची आवश्यकता असून, सदर रिक्त पद भरणे गरजेचे आहे.

आयुर्वेद विभागातील दैनंदिन ओपीडी व पुरविण्यात येणाऱ्या सुविधाबाबत वैद्यकिय अधिक्षक यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिलेली आहे-

१. आयुर्वेद ओपीडी रुग्ण संख्या- अंदाजे ३० ते ४०.

२. आयुर्वेद विभागात दिल्या जाणाऱ्या सुविधा- या विभागात आयुर्वेद पंचकर्म सुविधा पुरविल्या जात असून, त्यात वमन, शिरोधारा, रक्तमोक्षण, बस्ती, नष्य आदि. सुविधा दिल्या जातात. याशिवाय स्वेदन, सर्वांग स्नेहन स्वेदन, तर्पण, कटिबस्ती, हृदयबस्ती, जानूबस्ती, मन्याबस्ती या उपकर्म सुविधा दिल्या जातात.

३. व्हिजिटींग वैद्यकिय अधिकारी- डॉ. रामदास आव्हाड, आयुर्वेद तज्ञ-कोपरगाव हे दर आठवड्यातील दर गुरुवारी विनामुल्य सेवा देतात. दर गुरुवारी ओपीडी १२५ ते १५० असते. ही सेवा डॉ आव्हाड हे गेली १० वर्षापासून देत आहे. या सेवेमध्ये ते आयुर्वेद उपचाराबरोबरच संपूर्ण पंचकर्माच्या व त्यांच्या उपक्रमांच्या सुविधा रुग्णांना देतात.

शासन मान्य कर्मचारी आकृतीबंधामध्ये शासन निर्णयात खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**अटी-शर्ती क्र.०३)** सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

**अटी-शर्ती क्र. ०८** समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

उपरोक्तप्रमाणे रिक्त पदावर नियुक्ती करावयाची झाल्यास अनु. जाती प्रवर्गाचे उमेदवारासाठी जाहिरात द्यावी लागेल.

तरी, डॉ. वहिदा वजिउद्दीन इनामदार यांचे अर्जाबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयुर्वेद विभागासाठी स्त्री वैद्यकीय अधिकाऱ्याची आवश्यकता आहे किंवा कसे ? याबाबत डॉ.रामदास आव्हाड, मानद वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेद ) यांचा अभिप्राय घ्यावा असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२४** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबतचे प्रस्तावावर फेर विचार होणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०३/२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र.२५६ अन्वये संस्थान मार्फत नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी तात्काळ पाठविण्यात यावा, असे ठरले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



इंडीयन नर्सिंग कौन्सिल, नवी दिल्ली व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई यांच्या प्रचलित नियमानुसार नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी खालील प्राथमिक बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(१) नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबतचा प्रस्ताव ३१ जुलै पूर्वी महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडे तसेच ३१ ऑक्टोबर पूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

(२) परिचारिका प्रशिक्षण केंद्रासाठी स्वतंत्र इमारतीची व्यवस्था करणे.

(३) विद्यार्थ्यांच्या निवासासाठी किमान ७० स्केअर फुट जागा प्रत्येक विद्यार्थीसाठी याप्रमाणे वसतीगृह इमारतीची व्यवस्था करणे.

(४) प्रत्येकी १०८० स्केअर फुट याप्रमाणे दोन स्वतंत्र वर्गाची व्यवस्था करणे. स्वतंत्र ग्रंथालय, प्राचार्यांचे कार्यालय, शिक्षकांसाठी स्टाफ रुम, प्रशासकीय कार्यालय, बहुउद्देशीय हॉल, वार्डन कार्यालय, रिक्रियशन रुम, डायनिंग हॉल, इत्यादींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

(५) १० विद्यार्थ्यांसाठी ०१ शिक्षक याप्रमाणे शिक्षकांची भरती करणे.

(६) प्रस्तावानंतरचा पत्रव्यवहार फक्त प्राचार्यांच्या स्वाक्षरीने होऊ शकेल. त्याकरिता प्राचार्यांची नियुक्ती तातडीने करावी लागेल.

उपरोक्त बाबी विचारात घेता, नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी उपरोक्तप्रमाणे इमारत व वसतीगृहासाठी जागा तातडीने उपलब्ध करावी लागेल. तसेच प्राचार्यांचीही नियुक्ती करुन पुढील कामकाजाचे नियोजन करावे लागेल. यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करावी लागेल.

सध्याचे दोन्ही रुग्णालयांतील रुग्णांची संख्या बघता सध्याची इमारतीतील जागाच अपुरी पडत आहे. त्यामुळे अनेक रुग्णांची गैरसोय होत आहे. तसेच रुग्णालयातीलच अनेक विभागांसाठी अपु-या जागेमुळे कामकाजात व रुग्णसेवेत अडचणी येत आहे. यास्तव, सध्याच्या रुग्णालय संकुलामध्ये नर्सिंग कॉलेजसाठी स्वतंत्र इमारत व वसतीगृह यासाठी जागा उपलब्ध नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन सध्या नर्सिंग कॉलेज सुरु करण्याचा प्रस्ताव प्रलंबित ठेऊन नव्याने प्रस्तावित नांदुर्खी येथील नवीन रुग्णालय संकुलामध्ये सदर नर्सिंग कॉलेज सुरु करण्यासाठी योग्य ती व्यवस्था करता येऊ शकेल, असे मत आहे. तरी उपरोक्त प्रस्तावावर फेर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नर्सिंग कॉलेज सुरु करण्यासाठी इंडियन नर्सिंग कौन्सिल,नवी दिल्ली व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई यांच्या नियमानुसार लागणारी स्वतंत्र कॉलेज इमारत,वसतीगृह, स्वतंत्र ग्रंथालय तसेच उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे इतर बाबींची पूर्तता झाल्यानंतर नर्सिंग कॉलेज सुरु करणेबाबतचा प्रस्ताव तयार करुन तो महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नासिक व शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा,असें ठरलें.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२५** **सन २०१०-११ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे सर्जिकल व कन्झ्युमेबल साहित्य अतिरिक्त खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१०-२०११ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ११३ पुरवठा धारकांना एकुण रक्कम रु.१६,२९,५७,७१२/- चे दि.२०/०७/२०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्यापैकी काही आयटमचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही तर काही आयटमचा साठा पुरेसा नसल्यामुळे सदरचे औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे. रुग्णालयात पेशंटच्या सततच्या वाढणाऱ्या संख्येमुळे औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याचा वापर देखील वाढलेला आहे.

त्यामुळे तुर्तास तीन महिने पुरु शकेल इतकी औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य खरेदी करावी लागणार आहेत. त्याचा तपशिल सोबतच्या तक्त्यात दर्शविलेला आहे. पुढील वर्षासाठी लागणाऱ्या औषधांसाठी दि.२६/०३/२०११ चे मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यता मिळालेली आहे. ती उपलब्ध होण्यास साधारणत: ३ महिन्याचा कालावधी लागेल तो पर्यंत ज्या आवश्यक औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य इ.ची गरज भासेल ती मा. व्यवस्थापन समिती सभेचे मंजुर दराने (सन २०१०-११) खरेदी करावी लागणार आहे.

सदर औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी रु.१७,४९,४४४.७४ इतका खर्च येणार आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०७/०८/२०१० निर्णय क्रमांक ६१३ (१) Clause No.९ अन्वये वार्षिक मागणी व्यतिरीक्त अजुन काही औषधांची अतिरीक्त गरज भासलेस ती वार्षिक मंजुर दराने मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे प्रस्ताव मा.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे. सदर निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी रु.२५,०००/- पेक्षा जास्त खर्च येणार आहे.

तरी औषधे व सर्जिकल साहित्य वरीलप्रमाणे वार्षिक मंजुर दराने खरेदी करुन झालेल्या खरेदीस व याकामी पुर्णांकित रक्कम रु. १७,४९,४४५/- इतका खर्च आलेला आहे.

सदर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.३६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१०-११ मधील वार्षिक खरेदीमधील औषधे सर्जिकल व कन्झ्युमेबल साहित्य अतिरिक्त खरेदीस व याकामी पुर्णांकित रक्कम रु. १७,४९,४४५/- इतका आलेल्या खर्चाची नोंद घेणेत आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.२६** **डेन्टल विभागातील मॅक्झीलोफेशिअल सर्जन डॉक्टरांचे दर वाढीबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्य.स.समिती निर्णय क्रं.१९६/०८/०३/२००९ अन्वये सुधारीत दर पत्रकास मान्यता मिळाली आहे. यामध्ये डेंन्टल विभागाचे ओ.पी.डी. चार्जेस डेंन्टीस्ट (BDS) रु ३०/- व मॅक्झीलोफेशिअल सर्जन (MDS) डॉक्टरांसाठी आय.पी.डी. व्हिजीट चार्जेस रु ५०/- असे आहे. डेन्टल विभागात एकुण दोन डेंन्टीस्ट व एक मॅक्झीलोफेशिअल सर्जन आहे. मॅक्झीलोफेशिअल सर्जन यांनी त्यांचे दर वाढविण्याबाबत सुचविले आहे. डेंन्टल विभागांचे दर व केलेली मागणी व त्यास अनुसरून प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-

| अ.क्रं. | तपासणी | सध्याचे दर | डॉक्टरांची मागणी | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | ओ.पी.डी. दर (मॅक्झीलोफेशिअल सर्जन (MDS) | ३०/- | ११०/- | ६०/- |
| २ | आय.पी.डी. व्हीजिस्ट दर (मॅक्झीलोफेशिअल सर्जन (MDS) | ५०/- | ११०/- | ६०/- |

तरी मॅक्झीलोफेशिअल सर्जन डॉक्टरांचे ओ.पी.डी. व आय.पी.डी. दर रु.६०/- करण्याबाबतचा प्रस्ताव मा.व्य.स.समितीचे सभेपुढे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डेन्टल विभागातील मॅक्झीलोफेशिअल सर्जन डॉक्टरांचे दर रुपये ६०/- करणेस मान्यता देण्यता आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२७** **ज्यु.रेडिओलॉजिस्ट डॉ.आश्विनी भाऊराव राजगुरु (गोरे) यांना मासिक फिक्स इन्सेंन्टीव्ह देणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये रेडीओलॉजी विभागात नियोजित कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे दोन सि. रेडीओलॉजिस्ट व दोन ज्यु.रेडीओलॉजिस्ट अशी नियोजित पदे आहे. रेडिओलॉजी विभागातील तपासण्यांच्या रिपोर्टवर सि. रेडिओलॉजिस्ट यांना १०% व ज्यु. रेडिओलॉजिस्ट यांना फिक्स रु.१५,०००/- मासिक वेतनाव्यतिरीक्त इन्सेंन्टीव्ह देणेबाबत मा.व्य.स.सभा निर्णय क्रं. ७९८/१९.०९.२००९ संमत झाला आहे.

डॉ. राजगुरु आश्विनी भाऊराव (गोरे), शिक्षण:- DMRE-CPS Mumbai, दि.२६/११/२०१०, यांची ज्यू. रेडिओलॉजिस्ट म्हणून दि.०३/१२/२०१० पासून रु.२७,०००/- फिक्स मासिक वेतनावर नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी दि.०७.१२.२०१० चे पत्राद्वारे सोनोग्राफी तपासण्यांवर ४०% इन्सेंन्टींव्हची मागणी केली आहे. ठरावास अनुसरुन सि. रेडिओलॉजीस्ट यांना १०% व ज्यू. रेडिओलॉजिस्टला रु.१५,०००/- फिक्स इन्सेंन्टींव्ह देण्यात येत आहे.

सि. रेडिओलॉजिस्ट यांना १०% व ज्यू. रेडिओलॉजिस्ट यांना ४०% इन्सेंन्टींव्ह असा भेदभाव होईल त्यामुळे पुर्वीच्या ज्यू.रेडिओलॉजिस्ट यांना देत असलेल्या मासिक रु.१५,०००/- फिक्स इन्सेन्टीव्ह मध्ये काही प्रमाणात वाढ करुन रु.२०,०००/- दयावे असे मत आहे. तरी डॉ. राजगुरु आश्विनी भाऊराव (गोरे), ज्यू.रेडिओलॉजिस्ट यांना रुजू झालेल्या तारखेपासुन मासिक वेतनाव्यतिरीक्त मासिक फिक्स रु.२०,०००/- इन्सेन्टीव्ह देण्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.व्य.स.चे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.३६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. राजगुरु आश्विनी भाऊराव (गोरे), ज्यू.रेडिओलॉजिस्ट यांना रुजू झालेल्या तारखेपासुन मासिक वेतनाव्यतिरीक्त मासिक फिक्स रु.२०,०००/- इन्सेन्टीव्ह देण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२८** **श्री साईनाथ रुग्णालयातील व्हेंटीलेटर मशिन दुरुस्तीबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रूग्णालयातील ऑपरेशन थिएटर मधील अत्यवस्थ रूग्णांना कृत्रीम श्वासोच्छवास देण्यासाठी मॅक्स - ५० पोर्टेबल व्हेंटीलेटर हे मशीन मे. मॅक्स कॉर्पोरेशन, बडोदा, यांचेकडून सन २००४ मध्ये डोनेशन मिळालेले आहे. कंपनीने दिलेला मशीनचा एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपला असुन पुढील कालावधीत मशीन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता मे. मॅक्स कॉर्पोरेशन बडोदा यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे.एक्सेल सर्व्हिसेस, मुंबई या कंपनीकडे दि. ०१/०४/२०१० ते दि. ३१/०३/२०११ या

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कालावधीकरीता एकुण रू ३५,०००/- इतक्या रकमेत क्रॉम्प्रेहेन्सीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेत आले आहे. सदर कालावधीत Mother Board, Power Supply Board व Electronics PCB हे स्पेअर पार्ट कंपनी स्वखर्चाने बदलणार आहे. परंतु उर्वरीत कन्झ्युमेबल व स्पेअर पार्टची किमंत संस्थानला वेगळी अदा करावी लागणार आहे. कंपनीचे इंजिनीअर त्यांचे नियमीत व तातडीच्या भेटी देउन दुरुस्ती व देखभाल करीत आहेत.

सध्या सदर मशीन नादुरूस्त झाल्यामुळे मे.एक्सेल सर्व्हिसेस, मुंबई यांचे सर्व्हीस इंजिनीअर यांनी मशिनचे Pressure & Trigger Sensor व $Fio_2$ Sensor हे कन्झ्युमेबल पार्ट खराब झाल्याचे कळविले आहे. त्यासाठी कंपनीने पत्र क्र. EX/BC/०५८/११-१२ दि. २४/०३/२०११ अन्वये मशीनचे स्पेअर पार्ट बदलणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. ४९,८७५ /- (अक्षरी रु एकोणपन्नास हजार आठशे पंच्याहत्तर मात्र) इतका रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर स्पेअर पार्ट करीता कंपनी सहा महिन्याची वॉरंटी देत आहे. सदर मशिनचे स्पेअर पार्ट मे. मॅक्स कॉर्पोरेशन बडोदा यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे.एक्सेल सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी मे.एक्सेल सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडुन व्हेंटीलेटर मशीन दुरुस्त करुन घेणेकामी येणाऱ्या एकुण रु. ४९,८७५ /- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील व्हेंटीलेटर मशिन मे.एक्सेल सर्व्हिसेस, मुंबई यांचेकडुन दुरुस्त करुन घेणेकामी येणाऱ्या एकुण रु. ४९,८७५ /- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.२९ सन २०१०-११ या वार्षिक औषधे खरेदीमधील Disp. Sterile Hamd Gloves चे पुरवठयाबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणाऱ्या Disp. Sterile Hand Gloves करीता सन २०१०-२०११ या वर्षाकरीता मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांना इकडील पत्र क्र. १८११ दि.२०/०७/२०१० अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr.No. | Name of Item | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| १ | Disp. Sterile Hand Gloves No.५ | NULIFE | १००० | ७.४५०० | ७४५०.०० |
| २ | Disp. Sterile Hand Gloves No.८ | NULIFE | १०००० | ७.४५०० | ७४५००.०० |
| ३ | Disp. Sterile Hand Gloves No.६ | NULIFE | ३०००० | ७.४५०० | २२३५००.०० |
| ४ | Disp. Sterile Hand Gloves No.६.५ | NULIFE | ५०००० | ७.४५०० | ३७२५००.०० |
| ५ | Disp. Sterile Hand Gloves No.७ | NULIFE | १००००० | ७.४५०० | ७४५०००.०० |
| ६ | Disp. Sterile Hand Gloves No.७.५ | NULIFE | १००००० | ७.४५०० | ७४५०००.०० |
| | | | | **Total Amt. in Rs.** | **२१,६७,९५०.००** |

मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांनी उपरोक्त पुरवठा आदेशातील काही मटेरीयलचा पुरवठा केलेला आहे, तर उर्वरीत मटेरीयल पुरवठा करण्याबाबत तगादा करण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांचे दि. २०/०४/२०११ चे ई-मेल पत्राव्दारे कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे उर्वरीत मटेरीयलकरीता दर वाढवून मिळावेत असे कळविले आहे. त्यांचे नविन दर हे प्रती नग रु. २.८३ ने वाढलेले असून विशेष बाब म्हणून रु. १.७५ चे नुकसान सहन करणार असून फक्त शासनाने वाढविलेले Excise Duty ची फक्त ते मागणी करत आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Recei-ved Qty. | Balance Qty. | Total Amt. in Rs. as per old Rate | New Rate | Total Amt. in Rs. as per new Rate |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Disp. Sterile Hand Gloves No.5 | 1000 | 7.45 | 0 | 1000 | 7450.00 | 8.9775 | 8977.50 |
| 2 | Disp. Sterile Hand Gloves No.8 | 10000 | 7.45 | 10000 | 0 | 0.00 | 8.9775 | 0.00 |
| 3 | Disp. Sterile Hand Gloves No.6 | 30000 | 7.45 | 15000 | 15000 | 111750.00 | 8.9775 | 134662.50 |
| 4 | Disp. Sterile Hand Gloves No.6.5 | 50000 | 7.45 | 35000 | 15000 | 111750.00 | 8.9775 | 134662.50 |
| 5 | Disp. Sterile Hand Gloves No.7 | 100000 | 7.45 | 56400 | 43600 | 324820.00 | 8.9775 | 391419.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | Disp. Sterile Hand Gloves No.7.5 | 100000 | 7.45 | 50100 | 49900 | 371755.00 | 8.9775 | 447977.25 |
| | | | **Total Amt. in Rs.** | | | **927525.00** | | **1117698.75** |
| | | **Differential Amt. in Rs. (1117698.75 – 927525.00) =** | | | | | | **190173.75** |

यापुर्वी रुग्णालयात B. Braun कंपनीचे Gloves वापरात होते व त्यामुळे उर्वरीत Gloves खरेदीकामी तुलनात्मक दरांचे तक्त्यातील मे. बी. ब्रॉन मेडीकल (इंडीया) प्रा. लि., मुंबई यांना वार्षिक निविदेतील दराने पुरवठा करणेबाबत विचारले असता त्यांनी दि. ३०/०४/२०११ रोजीचे फॅक्स पत्रान्वये त्यांचे नविन दर प्रती नग रु. १३.८३ असे कळविले आहे. तर तुलनात्मक दरांचे तक्त्यातील अजुन एक सरकारी उत्पादक कंपनी मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड, मुंबई यांना देखील सदरचे Gloves पुरवठयाबाबत विचारणा केली असता त्यांनी देखील दि.२९/०४/२०११ रोजीचे फॅक्स पत्रान्वये प्रती नग रु. १३.२२ असे दर कळविले आहेत, म्हणजे दोन्ही पुरवठा धारकांपेक्षा मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांचेच दर निम्नत्तम येतात. सदर Gloves चे दराबाबत बाजारात चौकशी केली असता कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे दरात वाढ झालेली आहे.

नविन वार्षिक औषधे खरेदी २०११-१२ Gloves ची मागणी केलेली आहे, परंतु ते उपलब्ध होण्यास २-३ महिन्याचा कालावधी लागु शकेल त्यामुळे सदर Gloves वाढीव दराने खरेदी करावे लागणार आहेत कारण Gloves हे सर्वच विभागात दैनंदिन वापरासाठी अत्यावश्यक असतात. सध्या असलेला स्टॉक हा जास्तीत जास्त १ महिना पुरु शकेल. त्यामुळे उर्वरीत Gloves मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांचेकडूनच खरेदी करावे लागणार आहे. त्यासाठी रक्कम रु.१,९०,१७३.७५ इतका जास्तीचा आलेला असून सदरचे खरेदीकामी आलेल्या जास्तीच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांच्याकडून Disp. Sterile Hand Gloves खरेदीस व याकामी येणाऱ्या जास्तीचा खर्च रक्कम रु.१,९०,१७३.७५ चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३०** **कु.विजया ज्ञानदेव दिघे या रुग्णास संस्थानतर्फे हार्मोन्सचे इंजेक्शन खरेदी करुन देणे बाबत.**

**प्रस्ताव-** कु. विजया ज्ञानदेव दिघे राहणार परमुरी ता. दिंडोरी जि. नाशिक वय वर्ष १३ हिच्या शरीरात हार्मोन्सची कमतरता आहे. त्यासाठी त्यांनी नाशिक येथील डॉ. सुजित चंद्रात्रे यांना दाखविले होते. डॉ. चंद्रात्रे यांनी रक्ताच्या तपासण्या केल्या नंतर तिच्या रक्तात हार्मोन्सची कमतरता असल्यामुळे डॉक्टरांनी तिला Inj.Ganadotrophin Harmones 2.5IV दररोज एक या प्रमाणे १८३ दिवस घेण्यास सांगितलेले आहे. सदर इंजेक्शनची अंदाजे किंमत रु.७००/- अशी असून ते विकत घेण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसल्याने ते शिर्डी संस्थानकडून मिळणेबाबत त्यांनी मा. ना. छगनरावजी भूजबळ साहेब यांना तिचे वडील श्री ज्ञानेश्वर कारभारी दिघे यांनी पत्राद्वारे विनंती अर्ज केलेला आहे.

मा. ना. छगनरावजी भूजबळ यांचे स्विय्य सहाय्यक यांनी त्यांचे पत्र क्र.जा.क्र.खा.स./सा.बां. व पर्यटन/नोट १२१/२०११ दि.०४/०३/२०११ अन्वये संस्थानकडून योग्य ती वैद्यकिय मदत व सहकार्य करणे बाबत मा. मंत्री महोदयांनी निर्देशित केले असून त्याप्रमाणे सुविधा पुरविण्यात याव्यात असे पत्र दिलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे संस्थान तर्फे इंजेक्शन खरेदी करुन द्यावयाची झाल्यास १८३ दिवसांकरीता एकूण रु.१,२८,१००/- (अक्षरी - एक लाख अठ्ठावीस हजार शंभर मात्र) इतका खर्च येईल. अशा प्रकारे प्रदीर्घ उपचारासाठी यापूर्वी संस्थानकडून वैद्यकिय आर्थिक मदत देण्यात आलेली नाही किंवा याबाबतची अशी धोरणात्मक नियमावली देखील नाही.

तेंव्हा सदरचे इंजेक्शन सदर रुग्णास खरेदी करुन द्यावयाचे किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३१** **श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाकरीता निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ) या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६/०३/२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८३ नुसार रुग्णालयांकरिता निवासी वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ.) या पदासाठी विश्वस्त डॉ. ई. बी. गोंदकर यांनी श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये खालील उमेदवारांच्या मुलाखती घेतलेल्या असून, त्यांना आर एम ओ या पदांवर नेमणुक आदेश देणेस मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार दि. २३/०२/२०११ व दि. ०७/०३/२०११ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये खालील उमेदवारांना नेमणूक आदेश देणेत आलेले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | वैद्यकिय अधिकाऱ्याचे नाव | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश क्र. | दिलेले पदनाम | एकत्रित मानधन/ वेतन | रुग्णालय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. राहुल चंद्रभान कानवडे | एम.बी.बी.एस.-०९ | जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ७१६०/ २०११ दि.०३.०३.११ | आर.एम.ओ. | मासिक रु. २७,०००/- | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| २ | डॉ. पवन दागा सुर्यवंशी | एम.बी.बी.एस.-१० | जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ७१६१/ २०११ दि.०३.०३.११ | आर.एम.ओ. | मासिक रु. २७,०००/- | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| ३ | डॉ. राजेश उत्तमराव राजुळे | एम.बी.बी.एस.-०४ एम.एस. (आर्थो)-०८ | जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ७१६२/ २०११ दि.०३.०३.११ | आर.एम.ओ. | मासिक रु. २७,०००/- | श्री साईनाथ रुग्णालय |
| ४ | डॉ. रिना प्रकाश घोरपडे | एम.बी.बी.एस.-१० | जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ७४०२/ २०११ दि.१९.०३.११ | आर.एम.ओ. | मासिक रु. २७,०००/- | श्री साईबाबा हॉस्पीटल |
| ५ | डॉ. चेतन मोहनलाल छल्लारे | एम.बी.बी.एस.-१० | जा.नं. एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ ७४०३/ २०११ दि.१९.०३.११ | आर.एम.ओ. | मासिक रु. २७,०००/- | श्री साईबाबा हॉस्पीटल |

उपरोक्तप्रमाणे मुलाखती घेण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या पदांवर नेमणूक आदेश देण्यात आलेले आहेत. सदर नेमणूकांस कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान रुग्णालयाकरीता निवासी वैद्यकीय अधिकारी (आर.एम.ओ) या पदावर देण्यात आलेल्या नेमणूकांस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३२** **श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी जुने Blood Gas Analyser Buyback करुन नवीन मशिन खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात नविन कार्डीयाक ऑपरेशन थिएटर लवकरच कार्यान्वित करणेत येत आहे. सदर विभागात दाखल होणाऱ्या रुग्णांच्या शस्त्रक्रियापुर्वी व शस्त्रक्रियेनंतर रक्ताच्या विविध प्रकारच्या तपासण्या करणे गरजेचे असते. त्यासाठी श्री साईबाबा रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागाने अजुन एक Fully Automatic Blood Gas Analyser ची दि. १९/०३/२०११ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

सध्या त्यांचेकडे तिन प्रकारचे मशिन आहे पैकी Roche कंपनीचे जुने मशिन Model Omni C हे ६ वर्षापुर्वीचे असून ते सतत नादुरुस्त होते व त्यामुळे कामाची गैरसोय होते, तेंव्हा ते बदलून (Buyback) नविन मशिन घेण्याची मागणी केलेली आहे. सदर मशिनची खरेदीची किंमत रु. ६,७५,०००/- असून घसारा वजा जाता त्याची किंमत रु.१,८६,८७७/- इतकी होते. सध्याची कार्डीयाक ओ.टी. व इतर वॉर्डातील रुग्णांच्या तपासण्या करण्यात येतात, तसेच नविन कार्डीयाक ओ. टी. कार्यान्वित झाल्यानंतर रुग्णांचे संख्येत अजुन वाढ होईल व त्यामुळे सध्या आहे त्या मशिनवर कामाचा बोजा वाढेल. जुने मशिन जर अचानक बंद पडले तर ते कार्यान्वित होईपर्यंत कामाची गैरसोय होईल.

सध्याचे ३ मशिनवर एका वर्षात आतापर्यंतचे आकडेवारीवरुन १४४०० इतक्या तपासण्या झालेल्या आहेत, त्यामुळे ६ वर्षापुर्वीचे मशिन बायबॅक करुन नविन मशिन प्रयोगशाळा विभागास खरेदी करुन देणे योग्य होईल असे मत आहे.

सदर नविन मशिनची अंदाजे किंमत रु. ६,००,०००/- (अक्षरी रु. सहा लाख) पर्यंत असून जुने मशिन बायबॅक करुन नविन मशिन खरेदीस मान्यता मिळाल्यानंतर जुन्या मशिनची घसारा वजा जाणारी किंमत ही रु. ५०,०००/- पेक्षा जास्त असल्याने महाराष्ट्र शासनास प्रस्ताव सादर करुन विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदी करता येईल.

तरी जुने Fully Automatic Blood Gas Analyser मशिन Model Omni C बदलून (Buyback) व महाराष्ट्र शासनास प्रस्ताव पाठविण्यास तसेच नविन मशिन विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.६,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या असलेले मशिन तसेच ठेवून नविन मशिन विहित पध्दतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.६,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३३ श्री साईबाबा रुग्णालयातील न्युरो ओ.टी. विभागासाठी हॅन्डपीस व कटर खरेदीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयाचे न्युरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०८/०३/२०११ रोजीचे मागणी पत्रान्वये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी लागणारे Electrically Operated Angled Hand Piece ची मागणी केलेली आहे. सदर हॅन्डपीस त्यांचेकडे उपलब्ध नसून सध्या त्यांना शस्त्रक्रियेचे वेळेस श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागाकडून हॅन्डपीस आणावा लागतो. सध्या न्युरो ओ. टी. विभागामध्ये ९०० ते १००० पर्यंत शस्त्रक्रिया दरवर्षी होतात. त्यामुळे श्री साईबाबा रुग्णालयाचे न्युरो ओ. टी. विभागासाठी एक नग खरेदी करुन देणे योग्य होईल. याकामी अंदाजे खर्चासाठी M/s. Confident Sales India Pvt. Ltd., Bangalore यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दि. २१/०३/२०११ चे ई-मेल पत्रातील दरानुसार सदरचे हॅन्डपीससाठी अंदाजे रु.३६,५००/- पर्यंत खर्च येईल.

तसेच सदर विभागात मनमन हया कंपनीचे ड्रिल मशिन वापरात असून त्यासाठी मनमन हया कंपनीचेच Craniotome Cutter दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी वापरावे लागत असतात. सदर कटर हे सतत वापरुन खराब होतात, त्यामुळे त्यांनी २० सेट (१ Set = ५ Nos.) ची मागणी केलेली आहे. त्यानुसार मे. मनमन, पुणे यांचेकडे दराबाबत विचारणा केली असता, त्यांनी दि. १५/०३/२०११ चे फॅक्स पत्रान्वये सदरचे एका सेटची अंदाजे किंमत रु. ५५००/- इतकी कळविलेले असून २० सेटकरीता रु.१,१०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. असा दोन्ही मिळून अंदाजे एकुण रु. १,४६,५००/- इतका खर्च येईल. त्यानुसार सदरची खरेदी ही विहित पध्दतीने कोटेशन मागवून करता येईल.

तरी सदर हॅन्डपीस व कटर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या अंदाजे खर्च रु.१,४६,५००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७० यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरचे हॅन्डपीस व कटर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे खर्च रु.१,४६,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३४ कु.खैरनार निता अनिल, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीमुळे पटावरुन नांव कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** कु. खैरनार निता अनिल या दि. ०५/०९/२००८ पासून परिचारीका या पदावर श्री साईबाबा हॉस्पिटलकडे कार्यरत आहेत. त्या दि. १६/०८/२०१० ते दि. ०२/१०/२०१० या कालावधीत विनापरवानगी गैरहजर होत्या. त्याबद्दल त्यांना यापूर्वी सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. त्यानंतर त्या दि. २७/१२/२०१० ते दि. ०९/०२/२०११ असे एकूण ४५ दिवस गर्भपात कारणासाठीच्या रजेवर होत्या. सदरची रजा उपभोगल्यानंतर त्यांनी दि. १०/०२/२०११ रोजी कामावर हजर होणे आवश्यक होते. परंतू त्या दि. १०/०२/२०११ पासुन सतत, सलग, विनापरवानगी, रजा अर्जा शिवाय कामावरुन गैरहजर आहेत. त्यामुळे रुग्णालयाचे दैनंदीन कामकाजात अडचणी येतात. तसेच रुग्ण सेवेवर विपरीत परिणाम होतो. याबद्दल इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/६९९६/२०११. दि. २५/०२/२०११ अन्वये रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून त्यांना कळविण्यात आले आहे की, सात दिवसांच्या आत विनापरवानगी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर करुन कामावर हजर व्हावे. सदरची नोटीस त्यांना दि. २८/०२/२०११ रोजी प्राप्त झालेली आहे. परंतू कु. खैरनार यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा सादर केलेला नाही तसेच त्या कामावर देखील हजर झालेल्या नाहीत. त्याबद्दल पुन्हा त्यांना जा. नं. एसएसएस/वशी ७बी/७५२८/२०११ दि. २३/०३/२०११ अन्वये रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे अन्यथा संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. सदरचे पत्र त्यांना दि. २६/०३/२०११ रोजी प्राप्त झालेले आहे. त्यानंतर इकडील जा. नं. एसएसएस/वशी ७बी/२५७/२०११ दि. १८/०४/२०११ अन्वये रजिष्टर ए. डी. पोस्टाव्दारे पत्र पाठवून कळविण्यात आले आहे की, अंतिम संधी म्हणून तुम्ही सदरचे पत्र मिळताच दोन दिवसांचे आत कामावर हजर व्हावे, अन्यथा तुम्हास संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजुन तुमचे नाव संस्थानचे हजेरी पटावरुन कमी करण्यात येईल. परंतू कु. खैरनार अदयापपर्यंत कामावर हजर झालेल्या नाहीत तसेच त्यांनी गैरहजेरीबाबत लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही.

येणे प्रमाणे कु. खैरनार संस्थानचे पत्रांची दखल घेत नाहीत. यावरुन त्यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजण्यास हरकत नाही. अशा परिस्थितीत कु. निता अनिल खैरनार यांना संस्थान सेवेत स्वारस्य नाही असे समजून त्यांचे नावं संस्थानचे हजेरीपटावरुन कमी करता येईल.

**निर्णय क्र.३७१ यावर सविस्तर चर्चा होऊन, .खैरनार निता अनिल, परिचारीका, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे विनापरवानगी गैरहजेरीबाबत संस्थानचे कायदे सल्लागार ॲडव्होकेट श्री अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.३५** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधुन गहाळ झालेल्या ४ मॉनिटर केबलची नुकसान भरपाई वसूली बाबत.**

**प्रस्ताव-** दि. २२/०५/२००६ रोजी संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल मधून ४ नग मॉनिटर केबल चोरी / गहाळ झालेल्या आहेत. त्याची त्यावेळची किंमत रु. ८१,०००/- आहे. सदरची बाब तत्कालीन वैद्यकीय संचालक यांचे दि. १२/०७/२००६ रोजी निर्देशनास आलेली आहे. दि. २९/०३/२००७ रोजी तत्कालीन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर प्रकरणी तत्कालीन प्रशासकीय अधिकारी श्री प्र. प्र. देशपांडे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करुन प्राथमिक चौकशी करण्याचा आदेश दिला होता. त्यास अनुसरुन तत्कालीन प्रशासकीय अधिकारी तथा चौकशी अधिकारी श्री प्र. प्र. देशपांडे यांनी प्राथमिक चौकशी करुन दि. २६/०१/२००८ रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केला. दि. १८/०२/२००८ रोजीच्या आदेशान्वये संबंधित १८ कर्मचाऱ्यांचे वेतनातुन रु. ८१,०००/- समप्रमाणात तीन हप्त्यात वसुल करण्याबाबतचा आदेश पारित करण्यात आला होता.

त्यानंतर संबंधित कर्मचारी यांनी दि. २१/०२/२००८ रोजी वसुली स्थगिती बाबत विनंती अर्ज सादर केला होता. त्यास अनुसरुन मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदरची वसुली तात्पुरती स्थगित करणे बाबतचा आदेश पारीत केला होता. तसेच याकामी संबंधित कर्मचाऱ्यांची मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे कक्षात मा. कार्यकारी अधिकारी सो. याचे समक्ष दि. ०६/०३/२००८ रोजी बैठक झाली. त्यातील चर्चेनुसार मा. कार्यकारी अधिकारी सो. यांनी सदर प्रकरणी फेर चौकशी करणेबाबत तत्कालीन प्रशासकीय अधिकारी तथा चौकशी अधिकारी श्री प्र. प्र. देशपांडे यांना सांगितले. त्यास अनुसरुन चौकशी अधिकारी यांनी सदर प्रकरणी फेर चौकशी करुन दि. ३१/१२/२००८ रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे. चौकशी अधिकारी यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, "सदर प्रकरणी कोणा एका व्यक्तीस जबाबदार धरणे योग्य होणार नाही. वास्तविक तत्कालीन वैद्यकीय संचालक यांनी त्यावेळी सदर प्रकरणी शिर्डी पोलीस स्टेशन, शिर्डी यांचेकडे तक्रार नोंदविणे आवश्यक होते. परंतू त्यांनी तसे केले नाही. तथापि, सर्व संबंधितांना जबाबदार धरावे किंवा कसे याबाबत विचार होणेस विनंती."

सदर प्रकरणी संबंधित असलेल्या १८ कर्मचाऱ्यांपैकी सध्या तीन कर्मचारी संस्थान सेवेत नाहीत. गहाळ / चोरी झालेल्या वस्तुंचे घसारा वजा जाता एकुण किंमत रु. ६०,७५०/- असले बाबत लेखाशाखा विभागाने कळविले आहे.

सदरची रक्कम १५ कर्मचाऱ्यांकडून वसुल करावी.

किंवा

१८ कर्मचारी संख्येचा विचार करुन त्या प्रमाणात प्रत्येकाच्या हिस्स्याला येणारी रक्कम वसुल करावी.

किंवा

नुकसान भरपाईची रक्कम राईट अप करावी.

**निर्णय क्र.३७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा हॉस्पिटल मधुन गहाळ झालेल्या ४ मॉनिटर केबलची नुकसान भरपाई वसूलीबाबत संस्थानचे कायदे सल्लागार ॲडव्होकेट श्री अशोक पाटील यांचा सल्ला घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३६** **श्री साईबाबा हॉस्पिटलचे विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये अंदाजे ५२ कंपन्यांचे अंदाजे रु. २८,८०,३०,७६०/- इतक्या रकमेचे अंदाजे ४९६ मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी १८७ मशिन्सचे २६ संबंधीत कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०११ अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षिक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते ४८ अन्वये एकुण २६ कंपन्यांच्या १८७ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेची आवश्यकता आहे. सदरकामी दरवर्षीप्रमाणे तसेच मा. व्य. समितीच्या दि. १८/०४/२०१० चे सभेतील निर्णयाप्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय प्रशासक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण १८७ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील वरीलप्रमाणे एकुण १८७ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी मा.वैद्यकीय प्रशासक व वैद्यकीय संचालक यांचे समक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३७** **श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयामध्ये अंदाजे ३२ कंपन्यांचे अंदाजे रु. १,५४,३७,५७७.८१/- इतक्या रकमेचे अंदाजे ३१२ मेडीकल इक्विपमेंटस खरेदी करणेत आले असुन नियमीत वापरात आहेत. सदर मशीन्स पैकी ५४ मशिन्सचे २४ संबंधीत कंपन्यांकडे दुरुस्ती व देखभालीकरीता मा. व्य. समितीच्या विविध निर्णयांन्वये दरवर्षी कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करण्यात येत आहे. सदर वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत कंपन्या नियमीत तसेच आवश्यकतेनुसार तातडीच्या भेटी देउन दुरूस्ती व देखभाल करीत असुन सर्व मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहेत. सध्या काही मशीन्सचे वॉरंटी कालावधी संपलेले असुन माहे मार्च २०११ अखेर काही मशीन्सचे कॉन्ट्रॅक्ट कालावधी संपत आहेत.

वार्षीक सर्व्हिस कॉट्रॅक्टबाबत मा. व्य. समितीच्या दि. २०/०५/२००७ च्या सभेतील विषय क्र. ३३ निर्णय क्र. ३८६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"दरवर्षी संस्थानमधील महत्वाच्या मशीनरींचे (यामध्ये उदा. प्रसादालयातील विविध मशीनरी, विद्युत विभागातील विविध मशीनरी, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध मशीनरी, एअरकंडीशनर्स, वायुवीजन यंत्रणा, वगैरे) वार्षीक मेन्टेनन्स सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट अथवा रिस्क प्रोटेक्शन टाईप सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट हे त्या त्या मशीनरीच्या उत्पादक कंपनीला अथवा संबंधीत मशीनरीच्या उत्पादक कंपनीने निर्देशीत केलेल्या त्यांच्या अधिकृत सर्व्हिस डीलरला देण्यात यावे असे ठरले."

सोबतच्या तक्त्यामध्ये दिलेल्या अ. क्र. १ ते २४ अन्वये एकुण २४ कंपन्यांच्या ५४ नग मशीन्सचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट / वॉरंटी कालावधी माहे मार्च २०११ अखेर संपत आहेत. पुढील कालावधीत सदर मशिन्सचे दुरुस्ती व देखभालीकरीता संबंधीत कंपन्यांकडे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणे आवश्यक असुन सदरकामी मा. व्य. समितीच्या दि. १८/०४/२०१० चे सभेतील निर्णयाप्रमाणे कंपन्यांच्या प्रतिनीधींना वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावुन दिलेल्या दरांबाबत चर्चा / वाटाघाटी करुन वार्षीक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचे दर निश्चीत करता येतील असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील वरीलप्रमाणे एकुण ५४ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय उप-संचालक व वैद्यकिय संचालक यांचे समक्ष प्रत्यक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील मधील वरीलप्रमाणे एकुण ५४ नग मशीन्सचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता संबंधीत कंपन्यांनी दिलेल्या दरांबाबत कंपनी प्रतिनीधींशी मा.वैद्यकीय संचालक व वैद्यकीय अधिक्षक यांचे समक्ष वाटाघाटी करुन दर निश्चीत करणेस व त्यानुसार येणाऱ्या एकुण रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा रुग्णालयातील निरुपयोगी लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलचे लिनन विभागामध्ये सर्व वॉर्ड/ ओ.टी.चे अतीशय जीर्ण व रक्ताच्या डागांनी खराब झालेले तर काही फाटलेल्या अवस्थेत निरुपयोगी कपडे जमा झाले आहेत. सदरचे लिनन हे २००८ साली खरेदी करण्यात आलेले असुन त्यास आता दोन वर्षाचा कालावधी झालेला आहे त्यामुळे ते वापरुन खराब झालेले आहे.

यापुर्वी दिनांक ०१/०४/२०१० ते ३०/०९/२०१० पर्यंतचे सर्व वॉर्ड/ओ.टी.चे लिनन मा.व्यवस्थापन सभा दिनांक ०५/१२/२०१० निर्णय क्रमांक ९६३ अन्वये रु.३,२०,१४८/- रकमेचे लिनन नष्ट केलेले असुन, दिनांक ०१/१०/२०१० ते ३१/०३/२०११ पर्यंतचे विविध वॉर्ड/ओ.टी.तुन निकामी लिनन जमा झालेले आहे त्याचा तक्ता सोबत सादर केला आहे. सदर लिनन खरेदीची एकुण किंमत रु.२,९५,८९६/- इतकी आहे, परंतु सदर लिनन हे फाटलेल्या व खराब अवस्थेत असल्याने सध्या परिस्थितीत त्याची किंमत शुन्य आहे. सदरचे लिनन वापरण्यास निरुपयोगी असलेबाबतची

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com   For evaluation only.



सहा.अधिसेविका व वैद्यकीय संचालक यांनी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. सदरचे लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करणे गरजेचे आहे.

तरी लिनन हे साठा रजिष्टरमधुन निर्लेखीत करुन नष्ट करणेस तसेच सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटलमधील लिनन वापरण्यास योग्य नसल्यामुळे ते नष्ट करुन लिनन साठा रजिष्टरमधून निर्लेखित करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.३९** **रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई यांचेकडून श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटल मधील डॉक्टर्स, तंत्रज्ञ व नर्से स यांना पुरविणेत येणाऱ्या टी.एल.डी कार्ड सर्व्हिसचे बिलाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, तंत्रज्ञ व नर्सेस यांना हॉस्पिटलमधील क्ष-किरण, कॅथलॅब, सी आर्म, (ओ.टी.) इत्यादी विभागामध्ये काम करताना किरणोत्सर्ग होऊन, शरीरास त्यामुळे हानी पोहचू शकते, याकरिता शरीरात होणाऱ्या किरणोत्सर्गाचे मोजमाप होऊन त्यावर नियंत्रन ठेवणेकामी रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई यांचेकडून टी.एल.डी. कार्ड सेवा पुरविली जाते. त्यामुळे शरीरात होणाऱ्या किरणोत्सर्गाचे प्रमाण मोजले जाते व पुढील संभाव्य धोक्यापासून वेळेत बचाव करणे शक्य होते. सध्या श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एकुण ५८ कर्मचारी यांना ही सेवा पुरविली जाते व ही सेवा तीन महिन्यातून एकदा याप्रमाणे वर्षातुन ४ वेळा पुरविली जाते.

शासन नियमानुसार अशा विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना टी.एल.टी.कार्ड वापरणे बंधनकारक आहे.

रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई ही संस्था भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर, भारत सरकार या संस्थेशी संलग्न असून, सदर संस्थेकडून पुरविल्या जाणाऱ्या टी.एल.टी.कार्ड सर्व्हिसचे कामी येणाऱ्या खर्चास दि.१०.१२.२००८ रोजीचे टिपणी अन्वये रु.२५०००/- पर्यंतचे खर्चास मंजूरी घेणेत आलेली आहे.

परंतू दिवसेंदिवस दोन्ही हॉस्पिटलमधील टी.एल.टी.कार्डची सेवा घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढली असून, काही कर्मचारी नव्याने रुजू होत असतात, अशा कर्मचाऱ्यांनाही ही सेवा देणे अनिवार्य असल्याने, या सेवेवर येणाऱ्या खर्चास दिवसेंदिवस वाढ होत असून, सदर खर्च रु. २५०००/- चे वर जात आहे.

आता भाभा ॲटोमिक रिसर्च सेंटर (रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि.) मुंबई यांनी टी.एल.टी.कार्ड चे मॉनिटरींग सर्व्हिस चार्जमध्ये दि.०१.०४.२०११ पासून रु.१००/- वरुन रु.१२५/- अशी वाढ केली असल्याचे कळविले आहे. तसेच सदर पत्राबरोबर जोडलेल्या प्रोफार्मा इनव्हाईस नुसार दि.०१.०४.२०११ ते दि.३१.०३.२०१२ चे बिल रु.२९,०००/- व मागील बाकी रु.२८७०/- असे एकूण रु.३१,८७०/- इतके बील कंपनीने कळविलेले आहे. त्यामुळे यापुढे एकूण खर्चात वाढ होत राहणार असून सदर खर्च हा रु.२५०००/- पेक्षा नेहमीच जास्त होणार आहे. तसेच सदर सेवा घेणे व त्यावर खर्च करणे अनिवार्य आहे.

तरी सन २०११-१२ या कालावधीत प्रोफार्मा प्रमाणे बील रु.३१८७०/- रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई यांना अदा होणेस तसेच यापुढे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, तंत्रज्ञ व नर्सेस यांना रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई या संस्थेकडून पुरविणेत येणाऱ्या टी.एल.टी.कार्ड सर्व्हिसचे सेवेवर येणाऱ्या वार्षिक खर्चास व त्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०११-१२ या कालावधीत प्रोफार्मा प्रमाणे बील रु.३१८७०/- रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई यांना अदा होणेस तसेच यापुढे श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील डॉक्टर्स, तंत्रज्ञ व नर्सेस यांना रेनटेक लॅब्रोटरी प्रा.लि. मुंबई या संस्थेकडून पुरविणेत येणाऱ्या टी.एल.टी.कार्ड सर्व्हिसचे सेवेवर येणाऱ्या वार्षिक खर्चास व त्यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४०** **डॉ. योगेश भाऊसाहेब गाडेकर यांचा मानद मानसोपचार तज्ञ या पदावर नेमणूक करणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ. योगेश भाऊसाहेब गाडेकर यांनी दि. १९/०४/२०११ रोजी मानद मानसोपचार तज्ञ या पदावर नेमणूक होणेबाबत अर्ज केलेला आहे.

त्यांची माहिती खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| **संपूर्ण नाव** | : | **डॉ. योगेश भाऊसाहेब गाडेकर** |
| **शैक्षणिक पात्रता** | : | **एमबीबीएस-२००४** |
| | | **डी.पी.एम. (सी.पी.एस.)-२००९** |
| **जन्मतारीख व वय** | : | **१५/०१/१९८० वय:३१ वर्षे ३ महिने** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डॉ. योगेश गाडेकर यांनी श्री साईनाथ रुग्णालयाकडे मानद मानसोपचार तज्ञ म्हणून नेमणूक होणेस विनंती केली आहे. सदर अर्जावर वैद्यकिय अधिक्षक यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

In Shri Sainath Hospital the flow of pt. is increasing day by day and many pts. are required psychiatric t/t. So I request you, kindly accept this application and give Hon. Post to this psychiatrist.

श्री साईनाथ रुग्णालयाचे मंजूर कर्मचारी आकृतीबंधामध्ये मानसोपचार तज्ञ या पदाचा समावेश नाही. श्री साईबाबा हॉस्पीटलचे मंजूर कर्मचारी आकृतीबंधामध्ये या पदाचा समावेश असून सदरचे पद रिक्त आहे.त्याबाबत माहिती पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | पदाचे नाव | हॉस्पीटल | मंजूर पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | मानसोपचार Psychiatrist | श्री साईबाबा हॉस्पीटल | १ | सुधारित वेतनबॅन्ड १५६००-३९१०० ग्रेडवेतन ६६०० |

डॉ. योगेश गाडेकर यांना आठवड्यातून तीन दिवस व्हीजीटसाठी बोलविण्यात यावे व त्यांना प्रती व्हिजीट रु. १,०००/- प्रमाणे मानधन देण्यात यावे, असा अभिप्राय वैद्यकिय संचालक यांनी दिलेला आहे.

तरी, वैद्यकिय अधिक्षक व वैद्यकिय संचालक यांचे अभिप्राय विचारात घेता डॉ. योगेश भाऊसाहेब गाडेकर यांची मानद मानसोपचार तज्ञ म्हणून नेमणूक करणेच्या निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. योगेश भाऊसाहेब गाडेकर, मानसोपचार तज्ञ हे डिप्लोमाधारक असल्याने त्यांचे अर्जाचा विचार करण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४१ श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅन्टीन भाडेतत्वावर चालविणेस देणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २२/०५/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४५२ नुसार श्री साईबाबा हॉस्पीटलमधील कॅन्टीन श्री प्रदीप रमेश येवले, सध्याचा पत्ता- श्री साईप्रभा अपार्टमेंट फ्लॅट नं. ४ श्री साईश्रध्दा हो. सो. जवळ, शिर्डी. ता. राहाता जि. अहमदनगर यांना दि. १८/०६/२०१० पासून पुढे १२ महिने कालावधीसाठी मासिक रु. १८,०००/- भाडेतत्वावर चालविणेस देण्यात आलेली आहे. त्यांचेकडील पदार्थ, पेय यांचा दर्जा चांगला असून, त्यांनी सदर कालावधीत चागंली सेवा दिलेली आहे.

सदर १२ महिन्यांची मुदत दि. १७/०६/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधीसाठी कॅन्टीन चालविणेस देणेकामी विविध वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देऊन निविदा मागवाव्या लागणार आहे. तसेच कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणारे पदार्थ, पेय यांचे विक्रीचे नवीन दरपत्रक निश्चित करावे लागणार आहे.

**सध्याचे दरपत्रकांबाबत माहिती पुढीलप्रमाणे आहे.**

**(अ) अल्पोपहार (नाष्टा) पदार्थ**

| अ.नं. | पदार्थाचे नाव | नग | प्रमाण (वजन) | सध्याचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | बटाटे वडा रसा व दोन पाव | ०२ | प्रत्येकी १०० ग्रॅम | १२=०० |
| २ | इडली सांबर, चटणी | ०२ | प्रत्येकी १५० ग्रॅम | १२=०० |
| ३ | साधा डोसा | ०१ | १५० ग्रॅम | १५=०० |
| ४ | मसाला डोसा | ०१ | २५० ग्रॅम | २०=०० |
| ५ | उत्तपा | ०१ | २०० ग्रॅम | १२=०० |
| ६ | पोहे | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | ०८=०० |
| ७ | शिरा | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | १२=०० |
| ८ | साबूदाना खिचडी | ०१ प्लेट | १२० ग्रॅम | १२=०० |
| ९ | पुरी भाजी (पुरी ०४ नग) | ०१ प्लेट | २०० ग्रॅम | १५=०० |
| १० | पंजाबी डिशेस (करी सह) | ०१ प्लेट | --- | ३५=०० |
| ११ | आलु परोठा व पालक परोठा | ०१ नग | --- | १५=०० |
| १२ | व्हेज बिर्याणी | ०१ प्लेट | --- | २५=०० |
| १३ | दही वडा | ०२ नग | प्रत्येकी १०० ग्रॅम | १५=०० |
| १४ | प्लेन राईस | ०१ प्लेट | --- | १०=०० |
| १५ | चिप्स, बिस्किट, चॉकलेट | --- | स्टॅंडर्ड ब्रॅन्ड | प्रिंटेड दराने |
| १६ | आईस्क्रिम | --- | | प्रिंटेड दराने |
| १७ | गुलाबजामून | ०१ प्लेट | १५० ग्रॅम | ०७=०० |
| १८ | पाव वडा | ०१ नग | प्रत्येकी १५० ग्रॅम | ०७=०० |
| १९ | फुल जेवण (निवासी डॉक्टरांसाठी) | ०१ प्लेट | --- | ३५=०० (मासिक दोन वेळा १३००/- प्रती महा) |
| २० | दही भात | ०१ प्लेट | --- | १५=०० |
| २१ | भजी (मिक्स) | ०१ प्लेट | --- | ०८=०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२ | मेदु वडा | ०२ नग | प्रत्येकी १०० ग्रॅम | १५=०० |

**(ब) मर्यादित भोजनातील (राईस प्लेट) पदार्थ (दर रुपये १८/-)**

(मासिक तत्वावर भोजनाचा दर निवासी डॉक्टरांसाठी रु.१०००/- राहील.)

**सुधारीत दर रुपये-**

| **अ.नं.** | **पदार्थाचे नाव** | **नग** | **मागणीनुसार जादा** |
|---|---|---|---|
| १ | चपाती अथवा पुरी | चपाती ०४ नग/ पुरी ०६ नग | प्रती नग ३ रुपये |
| २ | साधा भात | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये |
| ३ | सुकी भाजी | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये |
| ४ | सांबर | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये |
| ५ | रसा भाजी | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये |
| ६ | दही | एक वाटी | प्रती वाटी ५ रुपये |
| ७ | पापड | एक नग | प्रती नग ५ रुपये |
| ८ | लोणचे | आवश्यकतेनुसार | |

**(क) पेये**

| **अ.नं.** | **पेयाचे नाव** | **नग** | **प्रमाण (मिली )** | **सध्याचे दर** |
|---|---|---|---|---|
| १ | चहा | ०१ कप | १०० मिली | ०४=०० |
| २ | कॉफी | ०१ कप | १०० मिली | ०७=०० |
| ३ | दुध | ०१ कप | १०० मिली | ०७=०० |
| ४ | मिनरल वॉटर व थंड पेये | --- | --- | प्रिंटेड दराने |
| ५ | सोडा | --- | --- | प्रिंटेड दराने |
| ६ | चहा<br>कॉफी<br>दूध | ०१ कप<br>०१ कप<br>०१ कप | १०० मिली<br>१०० मिली<br>१०० मिली | ०३=००<br>०५=००<br>०५=०० |

**(ड) इतर पेय व पदार्थ-**

| **अ.नं.** | **पदार्थाचे नाव** | **प्रमाण (वजन)** | **सध्याचे दर** |
|---|---|---|---|
| १ | ज्यूस (संत्री, मोसंबी,अननस) | ३०० मिली लिटर | २०=०० |
| २ | मिल्क शेक<br>(चॉकलेट, चिकू,कोल्ड कॉफी) | ३०० मिली लिटर | २५=०० |
| ३ | शहाळे | ०१ नग | १२=०० |
| ४ | साधी पावभाजी | १५० ग्रॅम व ०२ पाव | २०=०० |
| ५ | स्पेशल पावभाजी | १५० ग्रॅम व ०२ पाव | २५=०० |
| ६ | जादा पाव | ०२ नग | ०४=०० |

सध्या कॅन्टीन चालविणेस देण्यात आलेली मुदत दि. १७/०६/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने, दि. १८/०६/२०११ पासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कॅन्टीन चालविणेस देणेकामी निविदा मागविणेसाठी वर्तमान पत्रांत जाहिरात देणेस व त्याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यतेसाठी तसेच कॅन्टीनमध्ये ठेवण्यात येणाऱ्या पदार्थांचे, पेयांचे सुधारित दरपत्रक निश्चितीबाबत निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.३७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन,सध्याचे कँन्टीन कॉन्ट्रॅक्टर श्री प्रदिप येवले, शिर्डी यांची सेवा चांगली असून त्यांचेकडील पेय व खाद्य पदार्थाचा दर्जा चांगला आहे. त्यामूळे त्यांना पूर्वीचेच अटी शर्तीस अधिन राहून व कँटीन मध्ये २४ तास चहा, कॉफी, दुध उपलब्ध ठेवण्याचे अटीवर दिनांक १८/०६/२०११ पासून पूढे एक वर्षे कालावधीसाठी कँन्टीन चालविण्यास मुदतवाढ देण्यात यावी व त्यांचेकडून तसा करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४२** **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्यमा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | कर्मचाऱ्याशी नाते | आजाराचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रदिप विश्वनाथ त्रिभुवन | आई | डायबेटीज व ब्लड प्रेशर | श्री साईनाथ रुग्णालय | २९०१.०० | २९०१.०० |
| ३ | श्री. नागरे प्रभाकर विश्वनाथ | वडील | डायबेटीज | | ११८८.०० | ११८८.०० |
| ३ | डॉ.सौ.प्रणोती रुपेश जडगे | स्वत: | | श्री साईबाबा हॉस्पिटल | १५७.०० | १५७.०० |
| | | मुलगा | | श्री साईनाथ रुग्णालय | १२३१.०० | १२३१.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. | १३८८.०० | १३८८.०० |
| ४ | सौ.कल्पना रघुनाथ मुसमाडे | मुलगा | | श्री साईनाथ रुग्णालय | २१०.०० | ११५.०० |
| ५ | श्री. केशव भुजंग जरांगे | पत्नी | ब्लड प्रेशर | श्री साईबाबा हॉस्पिटल | ५७५५.०० | ५३३७.०० |
| | | | | **एकुण रक्कम रु.** | **११४४२.००** | **१०९२९.००** |

मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०९/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक १९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकिय बीले वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा.विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांनी तपासून त्यांचे शिफारशीनूसार अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावीत, असे ठरले आहे.

त्यानुसार वरील बीले ही मा. विश्वस्त श्री. डॉ. ए. भा. गोंदकर साहेब व श्री. डॉ. तिवारी साहेब यांना दाखवून घेतलेली आहे व त्यावर मा. विश्वस्त श्री. डॉ. ए. भा. गोंदकर साहेब यांनी रु.१०,०००/- पर्यंतची बीले देण्याबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचा निर्णय झालेला आहे. तरी ठरलेल्या रक्कमेच्या किती % (टक्के) जादा रक्कम देता येईल किंवा कसे याकरीता व्यवस्थापन मंडळापुढे निर्णयासाठी सादर करावे कारण कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढणारी आहे. असा अभिप्राय दिलेला आहे.

**निर्णय क्र.३७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त कर्मचाऱ्यांचे जादा वैद्यकीय बिले आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४३** **श्री साईनाथ रक्तपेढी विभागाकरीता व कॅथलॅब विभागाकरीता Split A/C खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रक्तपेढी विभाग हा ऑक्टोबर - २००० पासून कार्यान्वित आहे. FDA च्या नियमानुसार रक्तपेढी विभागातील प्रत्येक रुममध्ये स्वतंत्र A/C असणे आवश्यक असतो. त्यानुसार त्यावेळी प्रत्येक रुममध्ये A/C बसविले होते. परंतु सध्या सदर A/C व्यवस्थित काम देत नाहीत, त्यामुळे विदयुत विभागाकडून वारंवार दुरुस्त करुन घ्यावे लागतात. तसेच Cold Room मधील A/C वारंवार बंद पडले तर रक्त पिशव्या खराब होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे Cold Room मध्ये ४ ते ५ फ्रिज किंवा डिप फ्रिज ठेवलेले असतात व त्यासाठी रुमचे तापमान व्यवस्थित राखण्यासाठी A/C अत्यावश्यक असतो. तेंव्हा वारंवार A/C नादुरुस्त होऊन चालणार नाही.

सध्याचे A/C हे Split A/C Floor mounted आहेत. त्यामुळे जागासुध्दा खुप आडते. त्यामुळे सध्याचे सर्व A/C बदलून नविन Wall mounted A/C - १३ नग मिळणेबाबत रक्तपेढी विभागाने दि. १०/०१/२०११ रोजीचे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

तसेच कॅथलॅब विभागाने डी. पी. क्रमांक ३१८९ दि.२३/०२/२०११ अन्वये २ नग Split A/C ची मागणी केलेली आहे. कॅथलॅब व कार्डीयाक ओ. टी. मिळून एकत्रित सेंट्रल A/C आहे. त्यामुळे तेथे व्यवस्थित कुलींग होत नाही व तापमान २४° च्या वर जाऊन Infection (प्रादुर्भाव) वाढते. कॅथलॅब विभागात दोन Split A/C बसविले तर, संपुर्ण सेंट्रल A/C चा flow कार्डीयाक ओ. टी. विभागासाठी देऊन Infection कमी होईल.

सदरचे दोन्ही मागणीवर संस्थानचे विदुयत विभागाचे दि. १०/०१/२०११ चे टिपणीवरील आदेशाप्रमाणे अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यावर विदयुत विभागाने दि. २६/०२/२०११ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे त्यांचा अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब व CVTS या दोन्ही ओ.टी. करीता एकत्रित एकच सेंट्रल ए.सी. प्लांट आहे, त्यामुळे दोन्ही ओ.टी. मध्ये शस्त्रक्रिया चालु असताना एकच युनीटमुळे तापमान नियंत्रित होत नाही परिणामी ह्दयाचा अति महत्वाच्या शस्त्रक्रियांवर गंभीर परिणाम झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत, म्हणून स्वतंत्र CVTS O.T. करीता सेंट्रल ए.सी. प्लांटचा एअर flow ठेवून कॅथलॅब ओ.टी. करीता स्वतंत्र २ नग ए.सी. मागणी करण्यात आलेली आहे. सध्या विदयुत विभागाकडे नविन

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



ए.सी. शिल्लक नसल्याने आपणाला जुने १३ ए.सी. बायबॅक करुन नविन १३ नग ए.सी. साईनाथ रक्तपेढी विभाग व कॅथलॅब करीता खरेदी करुन बसवावे लागणार आहे.

श्री साईनाथ रक्तपेढी विभाग व कॅथलॅब करीता नविन २ टनी स्प्लिट टाईप ए.सी. बसविणे गरजेचे आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | मागणी | दर प्रती नग अंदाजे रु. | अंदाजे एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्होल्टास मेक, स्प्लिट टाईप, वॉल माऊंटेड एअर कंडीशनर क्षमता - २ टन, मॉडेल - व्हर्टीस प्लस | १३ नग | ३७,०००.०० | ४,८१,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम रु.** | **४,८१,०००.००** |

उपरोक्तप्रमाणे विदुयत विभागाचे अभिप्रायानुसार एकुण १३ नग जुने ए.सी. बायबॅक करुन नविन १३ नग ए.सी. खरेदीकामी अंदाजे रु.४,८१,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. उपरोक्तप्रमाणे १३ नग ए.सी. संस्थानचे खरेदी विभागाकडून खरेदी करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३८० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे १३ नग Split A/C खरेदीसाठी Voltas कंपनी बरोबर इतर नामांकित कंपनींचे देखील दर मागवून विहीत पध्दतीने खरेदी करण्यास व याकामी येणारे अंदाजे रु.४,८१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४४ श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन सी.व्ही.टी.एस ऑपरेशन थिएटरकरीता वॉशिंग मशिन खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात नविन सि.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर लवकरच कार्यान्वित करणेत येत आहे. सदर विभागाने दि.२६/०४/२०११ चे मागणी पत्रान्वये एक नग Fully Automatic Washing Machine ची मागणी केलेली आहे.

दि.०५/१२/२०१० रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ९५७ अन्वये श्री साईबाबा रुग्णालयातील जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता - ०१ नग व श्री साईनाथ रुग्णालयातील नविन इ.एन.टी. / ऑप्थलमिक ओ.टी. करीता ०१ नग विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामी मान्यता मिळाली होती, त्यानुसार दि. १०/०१/२०११ रोजीचे मंजुर टिपणीन्वये मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांना इकडील पत्र क्र. ६४८० दि. २८/०१/२०११ अन्वये प्रती नग रु. २८,९९०/- याप्रमाणे LG कंपनीच्या ११ किलो क्षमतेच्या दोन मशिनकरीता रु. ५७,९८०/- इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. पुरवठा आदेशाप्रमाणे त्यांनी मशिनचा पुरवठा केलेला असून ते व्यवस्थित कार्यान्वित आहे.

श्री साईबाबा रुग्णालयात नविन सि.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटरकरीता तातडीने पाहिजे असल्यामुळे त्याच मंजुर दराने १ वॉशिंग मशिन खरेदी करता येईल. कारण त्यांनादेखील ११ किलो क्षमतेचे Fully Automatic Washing Machine ची आवश्यकता आहे. मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांना दि. २७/०४/२०११ रोजी दुरध्वनीवरुन सदरचे मशिन मागील दराने पुरवठा करु शकता का? याबाबत विचारणा केली होती, त्यानुसार त्यांनी मागील मंजुर दर रु.२८,९९०/- याप्रमाणे पुरवठा करण्यास तयार आहोत असे सांगितले. त्यांचे दरानुसार सदरचे ०१ नग खरेदीकामी रु.२८,९९०/- इतका खर्च येईल.

तरी मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांचेकडून LG कंपनीचे ११ किलो क्षमतेचे ०१ नग Fully Automatic Washing Machine मागील मंजुर दर प्रती नग रु. २८,९९०/- याप्रमाणे खरेदी करण्यात आलेले असून नोंद घेण्यासाठी सविनय सादर.

निर्णय क्र.३८१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. कोठारी इलेक्ट्रॉनीक्स, कोपरगाव यांचेकडून LG कंपनीचे ११ किलो क्षमतेचे ०१ नग Fully Automatic Washing Machine मागील मंजुर दर प्रती नग रु. २८,९९०/- याप्रमाणे खरेदी करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेणेत आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४५ सन २०१०-११ या वार्षिक औषधे खरेदीमधील Latex Examination Gloves चे पुरवठ्याबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणाऱ्या Latex Examination Gloves करीता सन २०१०-२०११ या वर्षाकरीता मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांना इकडील पत्र क्र. १८११ दि.२०/०७/२०१० अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr.No. | Name of Item | Make | Qty. | Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Latex Examination Gloves Medium | Nulife | 150000 | 1.66 | 249000.00 |
| 2 | Latex Examination Gloves Small | Nulife | 150000 | 1.66 | 249000.00 |
| | | | | Total Amt. in Rs. | 498000.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांनी उपरोक्त पुरवठा आदेशातील काही मटेरीयलचा पुरवठा केलेला आहे, तर उर्वरीत मटेरीयल पुरवठा करण्याबाबत तगादा करण्यात आल्यानंतर त्यांनी त्यांचे दि. ३०/०४/२०११ चे ई-मेल पत्राव्दारे कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे उर्वरीत मटेरीयलकरीता दर वाढवून मिळावेत असे कळविले आहे. त्यांचे नविन दर हे प्रती नग रु. ०.४७ ने वाढलेले आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr. No. | Name of Item | Qty. | Rate Per in Rs. | Recei-ved Qty. | Balance Qty. | Total Amt. in Rs. as per old Rate | New Rate | Total Amt. in Rs. as per new Rate |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Latex Examination Gloves Medium | 150000 | 1.66 | 101000 | 49000 | 81340.00 | 2.13 | 104370.00 |
| 2 | Latex Examination Gloves Small | 150000 | 1.66 | 100100 | 49900 | 82834.00 | 2.13 | 106287.00 |
| | | | | | **Total Amt. in Rs.** | **1,64,174.00** | | **2,10,657.00** |
| | | | | | | **Differential Amt. in Rs. (2,10,657 – 1,64,174) =** | | **46,483.00** |

त्यामुळे तुलनात्मक दरांचे तक्त्यातील सरकारी उत्पादक कंपनी मे. एचएलएल लाईफकेअर लिमिटेड, मुंबई यांना सदरचे Gloves पुरवठयाबाबत विचारणा केली असता त्यांनी दि.२९/०४/२०११ रोजीचे फॅक्स पत्रान्वये प्रती नग रु.३.१५ असे दर कळविले आहेत, म्हणजे मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांचेच दर निम्नत्तम येतात. सदर Gloves चे दराबाबत बाजारात चौकशी केली असता कच्च्या मालाच्या किंमती वाढल्यामुळे दरात वाढ झालेली आहे.

नविन वार्षिक औषधे खरेदी २०११-१२ या वर्षाकरीता Latex Examination Gloves ची मागणी केलेली आहे, परंतु ते उपलब्ध होण्यास २-३ महिन्याचा कालावधी लागु शकेल, त्यामुळे सदर Gloves वाढीव दराने खरेदी करावे लागणार आहेत, कारण Gloves हे सर्वच विभागात दैनंदिन वापरासाठी अत्यावश्यक असतात. सध्या असलेला साठा हा जास्तीत जास्त १ ते २ महिने पुरु शकेल. त्यामुळे उर्वरीत Gloves मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांचेकडूनच खरेदी करावे लागणार आहे. त्यासाठी रक्कम रु. ४६,४८३/- इतका जास्तीचा खर्च आलेला आहे, तरी सदरचे खरेदीकामी आलेल्या जास्तीच्या खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई यांच्याकडून Latex Examination Gloves खरेदीस व याकामी आलेल्या जास्तीचा रक्कम रु. ४६,४८३/- मात्रचे जास्तीच्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४६** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता देणगी स्वरुपात मशिनरी स्विकारणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयात दि. १९/०४/२०११ रोजी मा. खासदार श्री. बी. आर. वाकचौरे साहेब हे भेटीस आले होते. सदर भेटीचे दरम्यान त्यांनी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता रु. २५ ते ३० लाखा पर्यंत देणगी स्वरुपात मशिनरी देण्यास इच्छुक आहे, असे सांगितले.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता Colonoscope व Fiber Optic Bronchoscope with Light Source खरेदी करावयाचे आहे, तर श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी Cell Counter Machine खरेदी करावयाचे आहे. त्यामुळे सदरचे मशिन त्यांचेकडून देणगीच्या स्वरुपात स्विकारता येईल. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of Equipment</th><th>Name of Company & Address</th><th>Name of Contact Person & Phone No.</th><th>Make / Model</th><th>Rate Per in Rs.</th></tr>
<tr><td>1</td><td>Colonoscope<br>Qty. 01 No.</td><td>M/s. Mitra<br>Medical Devices LLP,<br>A-226,<br>Okhala Industrial Area,<br>Phase 1,<br>New Delhi –<br>110 020.</td><td>Mr. Dharmesh Mehta,<br>Regional Manager – West<br>Mob.No.<br>91-9619197872</td><td>Fujifilm Video Colonoscope with Accessories
<table>
<tr><th>Cat. No.</th><th>Description</th><th>Qty.</th><th>Unit Price in Rs.</th></tr>
<tr><td>EC-201 WL</td><td>Video Colonoscope</td><td>1</td><td>1071630/-</td></tr>
<tr><td>EDX-2500</td><td>Video Processor with Xenon Light Source</td><td>1</td><td></td></tr>
<tr><td>LT-7</td><td>Leakage Tester</td><td>1</td><td></td></tr>
<tr><td>WT-2</td><td>Water Rank</td><td>1</td><td></td></tr>
<tr><td>TV</td><td>LG T.V. 23”</td><td>1</td><td></td></tr>
<tr><td>WS2</td><td>Disposable</td><td>2</td><td></td></tr>
</table></td><td>10,50,630/-</td></tr>
</table>

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | 422 BWH – Biopsy Forceps Oval With Needle (Colon)<br>WS2423DT25 – Polydectomy Snare – 2 | |
| 2 | Cell Counter Machine<br><br>Qty. 02 Nos. | M/s. Transasia Bio-Medicals Ltd.,<br>Transasia House, 8 Chandivali Studio Road,<br>Andheri (E),<br>Mumbai 400 072. | Mr. Ketan Salgaonkar<br>Zonal Manager,<br><br>Mob. No. 9373599837 | **Make –**Sysmex Corporation, Japan<br><br>**Model –**<br>Fully Automated 3 Part Differential 18 parameter Haematology KX-21 | Rs. 4,85,000/- Per Item |
| 3 | Fiber Optic Bronchoscope with Light Source<br><br>Qty. 01 No. | M/s. Healthware Private Limited,<br>53, Sai Krupa,<br>Tarun Bharat CHS J.B. Nagar,<br>Andheri (East),<br>Mumbai – 400 099. | Mr. Atul Deshpande<br>Asst. Manager (GI)<br>Mob. No. 9324926399 | Cat. No. – Description – Qty.<br>BF – TE2 – BF Type TE2 OES Bronchofiberscope with Standard Accessories – 1<br>CLK-4 2320V – CLK-4 Cold Light Supply 220V – 1<br>MB-155 – Leakage Tester – 1 | 5,25,200/- |

तरी उपरोक्तप्रमाणे मशिनरी देणगी म्हणून स्विकारण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मशिनरी देणगी म्हणून स्विकारणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४७ पडद्यासाठी नवीन कापड खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये नवीन C.V.T.S ओ.टी. लवकरच कार्यान्वित होणार असुन सदर विभागासाठी लागणाऱ्या पडदयासाठी त्यांनी दिनांक ०२/०१/२०११ डि.पी.नं.१५१२ अन्वये नवीन एकुण ४० नग पडदयांची मागणी केली आहे.

साईबाबा रुग्णालयासाठी यापुर्वी सन २००६ साली एकुण ३२०० मीटर कापड पुर्ण रुग्णालयातील पडदयांकरीता खरेदी करुन पडदे शिवुन घेतले होते. सदरील पडदयांना ५ वर्षे झाले असुन काही पडदे धुवून रंग फिक्कट झाला आहे, त्यामुळे नवीन C.V.T.S ओ.टी करीता त्यांनी नवीन प्लेटचे पडदे मिळावेत अशी मागणी केली आहे. त्यामुळे सदरील विभागांना प्लेटचे पडदे शिवुण देण्याकरीता खालीलप्रमाणे कापड लागणार आहे.

| अ.नं. | विभागाचे नाव | एकुण पडदे | अंदाजे लागणारे कापड |
|---|---|---|---|
| १ | C.V.T.S O.T | ४० | ५०० मीटर |
| | | **एकुण** | **५०० मीटर** |

प्रती मीटर रु.६४/- याप्रमाणे एकुण ५०० मीटर कापड खरेदीकरीता अंदाजे रु.३२,०००/- खर्च अपेक्षीत आहे. ऑपरेशन नंतरच्या रुग्णांना ठेवण्यासाठी असलेल्या नविन CRU साठी तसेच ओ.टी.लवकरच कार्यान्वित होणार असल्याने कापड लवकरात लवकर खरेदी करणे गरजेचे आहे कापड घेऊन पडदे लिनन विभागातील टेलर कडुन शिवुण देता येतील.

उपरोक्तप्रमाणे कापड विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणारे रु.३२,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८४ श्री साईबाबा हॉस्पिटलचे C.V.T.S O.T साठी आवश्यक असणारे पडदे तयार करणेकामी कापड विहित पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.४८ पेसमेकरचे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात कु. प्रशांत आबासाहेब निकाळजे वय ५ वर्षे या पेशंटला दि.२६/०२/२०११ रोजी St. Jude Co. चा Pacemaker Microny II VVI हा विशिष्ट

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ.बजाज यांनी वरील रुग्णाकरीता पेसमेकरची मागणी केली होती. त्यानुसार M/s. Affiance Medi Tech Pvt. Ltd., Nashik यांचेकडून बील क्र.६७६/२०१०-११ दि.०५/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.२४ दि.२६/०२/२०११) अन्वये एक नग रु.९०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२६/०२/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणसाठी रु.१,९२,४१०/- इतका खर्च आलेला असून महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/ ६६३६-३७/२०११ दि.२४/०२/२०११ अन्वये जीवनदायी योजने अंतर्गत Microny II VVI पेसमेकर करीता मंजुरी मिळालेली होती, त्यानुसार Microny II VVI पेसमेकर करीता रु.१,५०,०००/- इतकी रक्कम मंजुर झालेली आहे, तर उर्वरीत रक्कम रु.४२४१०/- पैकी रु.१०,०००/- ही त्यांनी बील नं ४१३६० दि.०७/०३/२०११ अन्वये भरलेली असून रक्कम रु.३२४१०/- इतक्या रक्कमेसाठी रुग्णालयाकडून सवलत देण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.९०,०००/- M/s. Affiance Medi Tech Pvt. Ltd., Nashik यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर पेसमेकर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**(ब)** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात कु. कला जीभाऊ देवरे वय ३ वर्षे या पेशंटला दि.२५/०३/२०११ रोजी St. Jude Co. चा Pacemaker Microny II VVI हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. सदर पेसमेकर करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ.वर्मा यांनी वरील रुग्णाकरीता पेसमेकरची दि.२३/०३/२०११ चे पत्रान्वये मागणी केली होती. त्यानुसार M/s. Affiance Medi Tech Pvt. Ltd., Nashik यांचेकडून बील क्र.७२०/२०१०-११ दि.२५/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.३० दि.२५/०३/२०११) अन्वये एक नग रु.९०,०००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२५/०३/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे.

सदर पेसमेकर बसविणसाठी रु.१,१२,४३५/- इतका खर्च आलेला असून रक्कम रु.४३५/- ही त्यांनी पावती नं.२१०३७९५७ अन्वये भरलेली असून उर्वरीत रक्कम रु.१,१२,०००/- करीता महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/९१७२७३/२०११ दि.१४/०३/२०११ अन्वये जीवनदायी योजने अंतर्गत Microny II VVI पेसमेकर करीता मंजुरी मिळालेली होती, त्यानुसार Microny II VVI पेसमेकर करीता रु.१,१४,०००/- इतकी रक्कम मंजुर झालेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे पेसमेकरचे बीलाची रक्कम रु.९०,०००/- M/s. Affiance Medi Tech Pvt. Ltd., Nashik यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर पेसमेकर खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त "अ" व "ब" प्रमाणे पेसमेकर खरेदी व खर्चाची नोंद घेणेत आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ४९** **श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता सर्जिकल साहित्य खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभागाने जनरल सर्जरी व गायनिक सर्जरीकरीता काही जनरल सर्जीकल इन्स्ट्रुमेंटची तर काही लॅप्रोस्कोपीक इन्स्ट्रुमेंटची मागणी दि.०३/१२/२०१०, २८/१२/२०१० व २९/१२/२०१० चे मागणी पत्रकान्वये सुरवातीस तत्कालीन प्रभारी वैद्यकिय अधिक्षक डॉ. बी. बी. साबळे यांचे मार्फत सादर केलेली होती परंतु नविन कायमस्वरुपी वैद्यकिय अधिक्षक डॉ. घोरपडे यांची नियुक्ती झाल्यामुळे पुन्हा सदरील मागणी तपासून त्यातील सर्व इन्स्ट्रुमेंटची मागणी आवश्यक आहेत का? यातील जुने इन्स्ट्रुमेंटचा वापर होऊ शकतो का? अथवा सर्व मागणी नविनच आहे? याबाबत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सखोल माहिती घेऊन वैद्यकिय अधिक्षक यांचा सविस्तर अभिप्राय दि.२२/०३/२०११ चे पत्रान्वये मागविण्यात आलेला होता.

त्यावर वैद्यकिय अधिक्षक यांनी दि.१९/०४/२०११ चे पत्रान्वये सर्व इन्स्ट्रुमेंटची आवश्यकता असून, सर्व मागणी नविनच आहे. तसेच सदरची सर्जिकल इन्स्ट्रुमेंट तातडीने खरेदी करुन मिळावेत असे म्हटले आहे. त्यांचे मागणी प्रमाणे सर्व इन्स्ट्रुमेंटसाठी अंदाजे खर्चासाठी दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार सर्व विभागाची मागणी (Gen. O.T., Ortho O.T. & Gynec O.T.) एकत्रित करुन त्यासाठी अंदाजे रु.६१,४६,२७१/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे.

तरी सोबतच्या यादीप्रमाणे जनरल सर्जिकल इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६१,४६,२७१/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जनरल सर्जिकल इन्स्ट्रुमेंट विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६१,४६,२७१/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ५०** **श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डियाक ओ.टी. विभागाकरीता इन्स्ट्रूमेंट खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील नविन कार्डीयाक ओ.टी. विभागाने त्यांचे दि.२६/०४/२०११ चे मागणी पत्रान्वये काही इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली असून ती इंडीयन कंपनीची देखील चालतील. सदर इन्स्ट्रुमेंटची त्यांनी ओ.टी. साठी लागणाऱ्या नविन इन्स्ट्रुमेंट सोबत मागणी केलेली नव्हती.

सदर इन्स्ट्रुमेंटची तातडीने आवश्यकता असल्यामुळे अंदाजे खर्चासाठी मे. कालेलकर सर्जिकल इंडस्ट्रीज, मुंबई यांचेकडून दर मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन मे. कालेलकर सर्जिकल इंडस्ट्रीज, मुंबई यांनी दि.०२/०५/२०११ चे ई-मेल पत्राद्वारे दर पत्रक दिलेले आहे. सदरचे मागणीनुसार व दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे खरेदीचा प्रस्ताव आहे.

| Sr. No. | Name of Item | Qty. | App. Rate Per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| | Make - Indian | | | |
| 1 | Nerve Hook Fine Tip (Sharp Tip) | 6 | 514.50 | 3087.00 |
| 2 | S.S. Scale | 4 | 388.13 | 1552.50 |
| 3 | Bone Nibbler | 2 | 2846.25 | 5692.50 |
| 4 | Lux Forcep (Crocodile forcep) | 2 | 997.50 | 1995.00 |
| 5 | Czerney's Retractor | 4 | 351.75 | 1407.00 |
| 6 | Vascular Clamp (Aortic clamp) size – 24cm/9.50” | 2 | 3622.50 | 7245.00 |
| 7 | Vascular Clamp (Aortic clamp) size – 27cm/10.75” | 2 | 3984.75 | 7969.50 |
| 8 | Curved Vascular Clamp | 2 | 3622.50 | 7245.00 |
| 9 | Sponge Holder (Big) | 8 | 472.50 | 3780.00 |
| 10 | Metal Bulldog Straight | 4 | 1144.50 | 4578.00 |
| 11 | Metal Bulldog Curved | 4 | 1144.50 | 4578.00 |
| 12 | Yakubian | 4 | 2000.00 | 8000.00 |
| 13 | Coronary Probe | 8 | 1250.00 | 10000.00 |
| 14 | Nerve Hook 6/0 | 2 | 514.50 | 1029.00 |
| 15 | Nerve Hook 7/0 | 2 | 514.50 | 1029.00 |
| 16 | Steel Bowl (Medium size) | 6 | 135.00 | 810.00 |
| 17 | Tube Organizer | 4 | 4201.88 | 16807.50 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **86805.00** |

उपरोक्त इन्स्ट्रुमेंट हे नविन कार्डीयाक ओ.टी. मध्ये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी आवश्यक आहे. सदर इन्स्ट्रूमेंट खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु.८६,८०५/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे इन्स्ट्रुमेंट विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.८६,८०५/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं. ५१** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर करीता Burrs खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयाने नविन इ.एन.टी. व ऑप्थलमिक ओ.टी. करीता दि.११/०१/२०११ रोजीचे मागणी पत्रकान्वये (खरेदी विभागाकडे प्राप्त दि.२२/०२/२०११) तसेच श्री साईबाबा रुग्णालयातील न्यूरो ऑपरेशन थिएटर विभागाने दि.०८/०३/२०११ रोजीचे मागणी पत्रकान्वये खालील साईजेसच्या Burrs ची मागणी केलेली आहे. त्यांचेकडे असलेले Burrs हे दैनंदिन वापरामुळे खराब झाल्यामुळे त्यांनी नविन Burss ची मागणी केलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सदर Burrs खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी एकूण १० पुरवठाधारक / अधिकृत विक्रेते यांचेकडून इकडील पत्र क्र.७५४४ दि.१२/०३/२०११ अन्वये दर मागविण्यात आले होते. त्यास अनूसरुन मे. कालेलकर सर्जिकल इंडस्ट्रीज, मुंबई यांनी दि.१५/०४/२०११ चे ई-मेल पत्राद्वारे दर पत्रक दिलेले आहे. सदरचे दरपत्रक संबंधित डॉक्टरांना दाखवून त्यांचे मागणीनुसार व दरपत्रकानुसार खालीलप्रमाणे खरेदीचा प्रस्ताव आहे.

| Sr. No. | Code No. | Description | Qty. | | Total Qty. | App. Rate Per in Rs. | App.Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Sainath E.N.T. | Saibaba Neuro | | | |
| 1 | 22.D091.08 | Bur, Cutting. IMP. Round. 0.8mm. Str. 7cm | 10 | 0 | 10 | 255.00 | 2550.00 |
| 2 | 22.D091.23 | Bur, Cutting. IMP. Round. 2.3mm. Str. 7cm | 10 | 0 | 10 | 235.00 | 2350.00 |
| 3 | 22.D091.31 | Bur, Cutting. IMP. Round. 3.1mm. Str. 7cm | 10 | 0 | 10 | 375.00 | 3750.00 |
| 4 | 22.D091.40 | Bur, Cutting. IMP. Round. 4mm. Str. 7cm | 10 | 10 | 20 | 495.00 | 9900.00 |
| 5 | 22.D091.50 | Bur, Cutting. IMP. Round. 5mm. Str. 7cm | 10 | 10 | 20 | 590.00 | 11800.00 |
| 6 | 22.D091.60 | Bur, Cutting. IMP. Round. 6mm. Str. 7cm | 10 | 10 | 20 | 1025.00 | 20500.00 |
| 7 | 22.D096.23 | Bur, T/Carbide. IMP. Round. 2.3mm. 7cm | 10 | 0 | 10 | 1100.00 | 11000.00 |
| 8 | 22.D096.27 | Bur, T/Carbide. IMP. Round. 2.7mm. 7cm. | 10 | 0 | 10 | 1770.00 | 17700.00 |
| 9 | 22.D096.31 | Bur, T/Carbide. IMP. Round. 3.1mm. 7cm. | 10 | 0 | 10 | 1770.00 | 17700.00 |
| 10 | 22.D096.35 | Bur, T/Carbide. IMP. Round. 3.5mm. 7cm. | 10 | 0 | 10 | 2450.00 | 24500.00 |
| 11 | 22.D096.40 | Bur, T/Carbide. IMP. Round. 4mm. 7cm. | 10 | 0 | 10 | 2450.00 | 24500.00 |
| 12 | 22.D096.45 | Bur, T/Carbide. IMP. Round. 4.5mm. 7cm. | 10 | 5 | 15 | 2745.00 | 41175.00 |
| 13 | 22.D096.50 | Bur, T/Carbide. IMP. Round. 5mm. 7cm. | 10 | 5 | 15 | 2745.00 | 41175.00 |
| 14 | 22.D093.10 | Bur, Diamond. IMP. Round. 1mm. Str. 7cm | 5 | 0 | 5 | 1300.00 | 6500.00 |
| 15 | 22.D093.23 | Bur, Diamond. IMP. Round. 2.3mm. Str. 7cm | 5 | 0 | 5 | 1300.00 | 6500.00 |
| 16 | 22.D093.31 | Bur, Diamond. IMP. Round. 3.1mm. Str. 7cm | 5 | 0 | 5 | 1430.00 | 7150.00 |
| 17 | 22.D093.40 | Bur, Diamond. IMP. Round. 4mm. Str. 7cm | 5 | 10 | 15 | 1560.00 | 23400.00 |
| 18 | 22.D093.50 | Bur, Diamond. IMP. Round. 5mm. Str. 7cm | 5 | 10 | 15 | 1690.00 | 25350.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | | | **2,97,500.00** |

उपरोक्त Burrs हे दोन्ही ओ.टी. मध्ये दैनंदिन शस्त्रक्रियेसाठी आवश्यक आहे. सदर Burrs खरेदीकामी अंदाजे एकुण रक्कम रु. २,९७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे Burrs विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९७,५००/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

**निर्णय क्र.३८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, Burrs विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.२,९७,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५२** **श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. करीता इन्स्ट्रुमेंट खरेदी बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ. भालेराव यांनी दि.२८/१२/२०१० रोजीचे मागणी पत्रान्वये सर्जिकल इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली होती. कारण त्यांचेकडे सध्या असलेली इन्स्ट्रुमेंट ही सन २००१ मध्ये मे. कालेलकर सर्जिकल, मुंबई यांचेकडून खरेदी करण्यात आलेले होते. दैनंदिन वाढत्या शस्त्रक्रियेमुळे सदरचे इन्स्ट्रुमेंट हे वापरुन खराब झालेले असून त्यातील बरेचशे इन्स्ट्रुमेंट हे दुरुस्त सुध्दा होऊ शकत नाही.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता विहित पध्दतीने निविदा मागवून आर्थोपेडीक इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी दि. २७/०२/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रमांक १३२ अन्वये एकुण १० पुरवठा धारकांना रु.१६,६५,८२३/- इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री साईबाबा रुग्णालयाकरीता खरेदी केलेल्या इन्स्ट्रुमेंटची यादी श्री साईनाथ रुग्णालयातील डॉ.भालेराव - आर्थोपेडीक सर्जन यांना दाखविण्यात आली असता, त्यांनी सदरचे इन्स्ट्रुमेंटपैकी त्यांना आवश्यक असणारे इन्स्ट्रुमेंटची मागणी केलेली आहे. त्यानुसार दि. २७/०२/२०११ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुर दराने श्री साईनाथ रुग्णालयाकरीता डॉक्टरांचे मागणीनुसार इन्स्ट्रुमेंट खरेदी करता येतील. त्याची यादी सोबत सादर केलेली असून त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| S.N. | Name of Supplier | Purchase Order Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1 | M/s. Aarya Enterprises, Pune | 94,122.00 |
| 2 | M/s. Kalelker Surgicals Pvt. Ltd., Mumbai | 1,47,231.00 |
| 3 | M/s. Medical Development & Engg., Pune | 3,85,000.00 |
| 4 | M/s. Zenith Surgical Company, Mumbai | 9,536.00 |
| | Total Amt. in Rs. | 6,35,889.00 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



डॉ. भालेराव यांनी मागणी केल्याप्रमाणे इन्स्ट्रुमेंट खरेदीकामी रु. ६,३५,८८९/- इतका खर्च येणार आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लागणारे इन्स्ट्रुमेंट मागील मंजुर दराने खरेदीस व सदरचे खरेदीकामी येणाऱ्या रु. ६,३५,८८९/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक ओ.टी. करीता इन्स्ट्रुमेंट मागील मंजुर दराने खरेदीस व सदरचे खरेदीकामी येणाऱ्या रु. ६,३५,८८९/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५३** **Supralimus हा ड्रग्ज कोटींग स्टेन्ट On Consignment Basis वर ठेवणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात ॲन्जीओप्लास्टीच्या शस्त्रक्रियेसाठी लागणारे ड्रग्ज कोटींग स्टेन्टसाठी सन २०१०-११ चे निविदेस अनुसरुन व मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०५/०९/२०१० निर्णय क्रमांक ६७८(१) अन्वये चर्चा / वाटाघाटी होऊन रु.६०,०००/- ते ६५,०००/- पर्यंत किंमतीचे खालील ४ निविदा धारकांचे ड्रग्ज कोटींग स्टेन्ट हे On Consignment basis वर ठेवण्यात आलेले आहेत.

| Sr. No. | Name of Supplier | Make | Brand Name | Rate Per in Rs. | Amt. to be Donated to SST |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Advance Technologies, Bhopal | ALCO MEDICAL GERMANY | RAPAMYCIN (SIROLIMUS) ALIES CE APPROVED | 64749.0000 | 5000.0000 |
| 2 | Affiance Medi Tech Pvt.Ltd, Nashik | BIOSENSORS | EXCEL | 65000.0000 | 10000.00 |
| 3 | Advance Vascular Technologies, Thane(W) | MIV THERAPEUTIC S INDIA PVT | GENXSYNC | 59850.0000 | 3000.00 |
| 4 | Vascular Concepts Ltd., Mumbai | EUCATECH GERMANY | PRONOVA | 60000.00 | 3000.00 |

परंतु उपरोक्तपैकी अ.नं. १ यांचा स्टेन्ट वापरल्यानंतर तो Block होतो व तो रुग्णालयाकरीता योग्य प्रकारचा स्टेन्ट नाही, याबाबत श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीओलॉजीस्ट डॉ. हरीष बजाज व डॉ. गौरव वर्मा यांनी दि. १५/०२/२०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे सदर स्टेन्ट वापरण्याचे सध्या बंद करण्यात आलेले आहे, तर अ.नं. २ करीता M/s.Affiance Medi Tech Pvt.Ltd, Nashik यांनी निविदा भरलेली होती, परंतु सदरची फर्म बंद झाल्याचे समजते, त्यामुळे त्यांचेकडून सध्या मालाचा पुरवठाच होत नाही.

उपरोक्त ४ प्रकारचे स्टेन्ट एकाच वेळेस उपलब्ध राहिल्यास दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या सर्व साईजेस डॉक्टरांना उपलब्ध होतात, परंतु सध्या दोन कंपन्याचा पुरवठा बंद केल्यामुळे अ.नं. ३ व ४ यांचे स्टेन्टमध्ये सर्व साईजेस उपलब्ध होत नाही व कधी कधी वेळेत पुरवठा झाला नाही तर कॅथलॅबमध्ये शस्त्रक्रिया करताना अडचणी येतात, त्यामुळे सध्या सन २०११-१२ या वर्षीचे पुढील आदेश जाईपर्यंत साधारणत: ३ महिन्याचा कालावधी लागेल, त्यामुळे सन २०१०-११ या वर्षातील तुलनात्मक दरांचे तक्त्यातील खालील स्टेन्ट On consignment basis वर ठेवण्यास मान्यता असावी, जेणेकरुन सर्व प्रकारच्या साईजेस उपलब्ध होण्यास मदत होऊन दैनंदिन कामात अडचणी होणार नाही.

| Name of Supplier | Make | Brand Name | Packing / Sizes | Rate Per in Rs. | Amt. to be Donated to SST |
|---|---|---|---|---|---|
| Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat | SAHAJANANAD MEDICAL | SUPRALIMUS | 2.50 x 11,16,19,23,29,33,39MM<br>2.75 x 11,16,19,23,29,33,39MM<br>3.00 x 11,16,19,23,29,33,39MM<br>3.50 x 11,16,19,23,29,33,39MM | 60000.00 | 5000.00 |

उपरोक्त स्टेन्टकामी M/s.Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat यांनी दि.१२/०५/२०११ चे फॅक्स पत्रान्वये रु. ६०,०००/- या दराने पुरवठा करण्यास व रु. ५०००/- संस्थानला देणगी देण्यास तयार आहोत, तसेच सदर स्टेन्टचा पुरवठा अधिकृत विक्रेते मे. मंथन इंक, मुंबई यांचेकडून केला जाईल, असे कळविले आहे.

सदरील स्टेन्ट हा सन २००९-१० या वर्षात On consignment basis वर १०८ नग वापरलेले आहे. परंतु २०१०-११ या वर्षात डॉक्टरांनी त्यासाठी शिफारस केलेली नव्हती, म्हणून पुरवठा आदेश देण्यात आलेला नव्हता, तेंव्हा सन २०१०-११ या वर्षाकरीता On consignment basis वर ठेवण्यात आलेला नव्हता.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी सन २०११-१२ या वर्षाचे ड्रग्ज कोटींग स्टेन्ट उपलब्ध होईपर्यंत M/s.Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat यांचा Supralimus स्टेन्ट On consignment basis वर ठेवण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे Supralimus हा ड्रग्ज कोटींग स्टेन्टकरीता सन २०११-१२ या वर्षाचे ड्रग्ज कोटींग स्टेन्ट उपलब्ध होईपर्यंत M/s Sahajananad Medical Technologies Pvt. Ltd., Surat यांचा स्टेन्ट On consignment basis वर ठेवण्यास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५४** **स्टेंन्ट व बलूनचे तातडीने केलेल्या खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कॅथलॅब विभागात श्री अमोल नामदेव कपाळे या पेशंटला दि.२०/०३/२०११ रोजी Cordis कंपनीचा Balloon Dialation Catheter हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग तर Numed कंपनीचा C.P. Stent Bare हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे. तसेच कु. सोनाली सुभाष शिरसाठ या पेशंटला दि.२०/०३/२०११ रोजी Cordis कंपनीचा Balloon Dialation Catheter हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग तर Numed कंपनीचा C.P. Stent Bare हा विशिष्ट प्रकारचा ०१ नग वापरलेला आहे.

सदर Balloon व Stent करीता वार्षीक खरेदीमध्ये On Consignment Basis वर पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही. परंतू मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २८/०७/२००७ निर्णय क्र. ५३३ अन्वये रुग्णालयामध्ये लागणारे विविध प्रकारचे व विविध साईजचे तसेच नविन प्रकारचे व नविन कंपन्याचे स्टेन्ट, व्हाल्व, बलून, पेसमेकर आदी तत्सम साहित्य जर रुग्णांना बसविण्याची गरज असेल तर ती वैद्यकिय संचालक यांनी संबंधित डॉक्टर यांचेशी विचार विनिमय करुन वैद्यकिय संचालक यांनी रुग्णालयात On Consignment Basis वर बाजारातून खरेदी करुन वापरलेल्या साहित्याचे बील संबंधितास अदा करण्यात यावे, असे ठरले आहे.

डॉ.वर्मा यांनी वरील दोन्ही रुग्णाकरीता स्टेंन्ट व बलूनची डि.पी. नं.३१९७ दि.०५/०३/२०११ अन्वये मागणी केली होती. त्यानुसार श्री अमोल नामदेव कपाळे या पेशंटकरीता M/s. Advanced Lifesciences Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून बील क्र.६५९-A/२०१०-११ दि.२१/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.१०C दि.२०/०३/२०११) अन्वये एक नग Balloon रु.१०५००/- इतक्या रक्कमेत तर बील क्र.६५९/२०१०-११ दि.२१/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.१० दि.२०/०३/२०११) अन्वये एक नग Stent रु.६७५००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२०/०३/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे. दोन्ही साहित्यासाठी एकत्रित रु. ७८०००/- इतका खर्च आलेला आहे.

सदर स्टेंन्ट व बलून बसविणेसाठी श्री अमोल नामदेव कपाळे यांना रु.१,७४,४८०/- इतका खर्च आलेला असून महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/ ३५२९-३०/२०१० दि.०२/०२/२०११ अन्वये जीवनदायी योजने अंतर्गत Drug Eluting Stent करीता रु.९९,०००/- इतक्या रक्कमेस मंजुरी मिळालेली होती, तर रक्कम रु.७९८०/- इतक्या रक्कमेसाठी संस्थानचे रुग्णालयाकडून सवलत देण्यात आलेली असून उर्वरीत रक्कम रु.६७,५००/- इतकी रक्कम वित्त विभागात पावती नं.९८०१८३५३ व ९८०१८३५४ अन्वये भरण्यात आलेली आहे.

तसेच कु. सोनाली सुभाष शिरसाठ या पेशंटकरीता M/s. Advanced Lifesciences Pvt. Ltd., New Delhi यांचेकडून बील क्र.६६०-A/२०१०-११ दि.२१/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.१०B दि.२०/०३/२०११) अन्वये एक नग Balloon रु.१०५००/- इतक्या रक्कमेत तर बील क्र.६६०/२०१०-११ दि.२१/०३/२०११ (डिलेव्हरी चलन नं.१०A दि.२०/०३/२०११) अन्वये एक नग Stent रु.६७५००/- इतक्या रक्कमेत खरेदी करुन रुग्णास दि.२०/०३/२०११ रोजी शस्त्रक्रिया करुन बसविण्यात आलेला आहे. दोन्ही साहित्यासाठी एकत्रित रु.७८०००/- इतका खर्च आलेला आहे.

सदर स्टेंन्ट व बलून बसविणेसाठी कु. सोनाली सुभाष शिरसाठ यांना रु.१,७४,४६०/- इतका खर्च आलेला असून महाराष्ट्र शासन, उपसंआसे नाशिक/लेखा-५/जीवनदायी योजना/१००८४-८५/२०११ दि.१७/०३/२०११ अन्वये जीवनदायी योजने अंतर्गत Drug Eluting Stent करीता मंजुरी मिळालेली होती, त्यानुसार Drug Eluting Stent करीता रु.९९,०००/- इतकी रक्कम मंजुर झालेली आहे, तर रक्कम रु.७९६०/- इतक्या रक्कमेसाठी संस्थानचे रुग्णालयाकडून सवलत देण्यात आलेली असून उर्वरीत रक्कम रु.६७,५००/- इतकी रक्कम वित्त विभागात पावती नं. ९८०१८३५५ व ९८०१८३५६ अन्वये भरण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे दोन्ही रुग्णांसाठी वापरलेल्या प्रत्येकी १ नग याप्रमाणे स्टेंन्ट २ नग व बलून २ नगाच्या बीलाची एकूण रक्कम रु.१,५६,००० /- M/s. Advanced Lifesciences Pvt. Ltd., New Delhi यांना यांना अदा करण्यात आलेली आहे.

तरी सदर स्टेंन्ट व बलून खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यासाठी सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.३९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या स्टेंन्ट व बलून खरेदीची व खर्चाची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५५** **साईनगर मैदानावरील विविध सांस्कृतीक,धार्मिक लग्नकार्ये इत्यादी सार्वजनिक कार्यक्रमातील लाऊड स्पीकरच्या आवाजामूळे रुग्णांना होणाऱ्या त्रासाबाबत**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये दि.०९/०५/२०११ ते दि.१५/०५/२०११ या काळात साईनगर मैदानावर शिवलिंग निर्माण हा सार्वजनिक कार्यक्रम झालेला आहे. सदर कार्यक्रमात दिवसा तसेच रात्रीच्या वेळी लाऊड स्पीकर मोठया आवाजात लावला जात होता. एरवी सुध्दा वर्षभरात अनेक सार्वजनिक कार्यक्रम होतच असतात. साईनगर मैदानालगतच श्री साईबाबा हॉस्पिटल असून ॲडमिट असलेल्या रुग्णांना सदर आवाजाचा त्रास होतो. रुग्णांवर उपचार चालू असल्याने त्यांना लाऊड स्पीकरच्या मोठया आवाजामुळे त्यांच्या प्रकृतीवर प्रतिकुल परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच हॉस्पिटलच्या दैनंदिन कामकाजातही व्यत्यय निर्माण होतो.

तरी येथूनपुढे साईनगर मैदानावर होणा-या विविध कार्यक्रमामधील लाऊड स्पीकरचा वापर टाळल्यास किंवा येथे होणा-या कार्यक्रमांचे स्थळ बदलल्यास रुग्णांना त्रास होणार नाही तसेच हॉस्पिटलच्या कामकाजातही व्यत्यय येणार नाही. शासन नियमानुसार सुध्दा रुग्णालयांशेजारी अशा प्रकारचे सार्वजनिक कार्यक्रम करण्यास मज्जाव करण्यात येतो. त्यामुळे उपरोक्त विषयावर चर्चा होऊन योग्य तो निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन नियमाप्रमाणे किती डेसिबल (आवाजाचे प्रमाण) व रात्री किती वाजेपर्यंत लाऊडस्पिकर लावण्याची परवानगी आहे याबाबत माहिती घेऊन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णर्थ सादर करण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**विषय नं.५६** **श्री साईश्रध्दा आर्थोटिक्स सर्जिकल,राहाता यांना आर्थोटिक्स व प्रॉस्थोटिक्स कृत्रिम साहित्याची कार्यशाळा चालविणेकामी जागा देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय मध्ये अस्थिरोग विभाग, न्युरोसर्जरी विभाग, फिजिओथेरॅपी विभागातील गरजू रुग्णांना त्यांचे डायग्नोसिस नुसार आर्थोटिक्स सपोर्टींग ब्रेसेस (बेल्ट), मानेचे कंबरेचे, फॅक्चर मणके व हात, पाय फ्रॅक्चर किंवा ऑपरेशन नंतर दिले जाणारे कृत्रिम साहित्य / बेल्ट तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने आवश्यक असलेले साहित्य मोजमाप करुन रुग्णांसाठी तयार करुन द्यावे लागतात. सध्या अशा प्रकारची साहित्य रुग्णांना दोन्ही रुग्णालयातून लिहून दिल्यानंतर नाशिक, अहमदनगर किंवा इतर शहरातून इ. ठिकाणी खरेदीसाठी जावे लागते परंतु आपणाकडे येणारे बरेच रुग्ण हे अशिक्षित व जाणकार नसल्यामुळे त्यांना नाशिक व नगर किंवा इतर शहरात जाऊन येथून साहित्य आणणे जिकरीचे होते.

तेंव्हा जर असे साहित्य बनविण्याची कार्यशाळेसाठी जर दोन्ही रुग्णालयाचे मध्यवर्ती भागात जागा उपलब्ध करुन दिल्यास रुग्णांना जास्त वेळा नाशिक व नगर येथे जाण्याची गरज पडणार नाही. तसेच मोजमापे घेतल्यानंतर रुग्णांना कमी खर्च व कमी वेळ लागून साहित्य लवकर उपलब्ध होण्यास मदत होईल.

श्री साईश्रध्दा आर्थोटिक्स सर्जिकल, राहाता हे अशाप्रकारचे साहित्य तयार करतात व त्यांनी संस्थानकडे दि.०७/०२/२०११ चे अर्जान्वये अशा प्रकारची कार्यशाळा चालविणेकामी संस्थानचे परीसरात जागा मिळणे बाबत विनंती केलेली असून त्यांचे अर्जावर मा.अध्यक्ष महोदय यांनी जागा देणे बाबत पाहणी करावी असे आदेश दिलेले आहे.

दोन्ही रुग्णालयातील रुग्णाच्या दृष्टीने अत्यंत जवळ होऊन रुग्णांची गैरसोय दूर होणेकामी सध्या श्री साईनाथ रुग्णालयाचे कॅन्टीनचे इमारतीत असलेल्या गाळ्यापैकी काही गाळे संस्थानचे पतपेढी साठी तर काही गाळे अपोलो हॉस्पिटल एंटरप्राईजेस, चेन्नई यांना औषध दुकान चालविणेकामी देण्यात आलेले आहे. तेथे आणखी एक गाळा शिल्लक असून सदर गाळ्यामध्ये लाईट, पाणी कनेक्शन आवश्यकतेनुसार देता येईल. श्री साईश्रध्दा सर्जिकल, राहाता यांनी समक्ष पाहिला असून त्यांना तितकी जागा पुरेशी आहे.

सदर साहित्याची होणारी किंमत ही रुग्ण स्वत: श्री साईश्रध्दा सर्जिकल, राहाता यांना देतील. श्री साईश्रध्दा सर्जिकल, राहाता यांना एक गाळा ११ महिन्याकरीता देऊन त्यांचेकडून सध्याचे बाजारभावाने दरमहा भाडे घेता येईल असे मत आहे किंवा मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा होऊन जे दरमहा भाडे निश्चित होईल त्याप्रमाणे आकारता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर पुढील आदेश होणेस विनंती.

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय अमान्य करणेत आला.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.५७** **साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर व बूक स्टॉल तसेच मंदिर परिसरातील दैनंदिन व दिनदर्शिका विक्री काऊंटरचे ठिकाणी अॅवेनिंग शेडची उभारणी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मंदिर परिसराचे पुर्वेकडील १६ आर जागेलगत (आरक्षण क्र. १० मध्ये) शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी उभारलेले साई कॉम्प्लेक्स इमारतीमध्ये संस्थानला तळमजल्यावर ०४ दुकानगाळे मिळालेले असून, त्यापैकी दोन (०२) गाळ्यांमध्ये प्रकाशने विभागामार्फत एका गाळयामध्ये बुक स्टॉल विक्री व लेखाशाखा विभागामार्फत दुसऱ्या गाळयात देणगी काउंटर सुरु करणेत आले असून, सदरचे गाळयांचा दर्शनी भाग पश्चिम बाजूने असल्याने सदरहू गाळयांमध्ये नेहमीच उन, वारा व पाऊस येण्याची शक्यता असल्याने तेथे जनसंपर्क कार्यालयासमोर केलेले अॅवेनिंग शेड प्रमाणेचे शेड तयार करणे आवश्यक आहे. तसेच मंदिर परिसरामध्ये अॅल्युनियम पार्टीशन तयार करुन तेथे संस्थान प्रकाशीत दैनंदिनी व दिनदर्शीकांची विक्री करणेत येत तेथेही बाहेरील बाजूने उन व पावसापासून साईभक्तांचे संरक्षण होणेचे दृष्टीने अॅवेनिंग शेडची उभारणी करणे गरजेचे आहे.

करीता साई कॉम्प्लेक्स मधील बुक स्टॉल व देणगी काउंटर तसेच मंदिर परिसरातील दैनंदिनी व दिनदर्शीका विक्री काउंटर या ठिकाणी खालील तपशिलानूसार अॅवेनिंग शेडची उभारणी करुन घेता येईल. त्यासाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| S. No. | Description / Size | Qty / Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| | Providing and fixing Awning with double sided PVC coated Spanish strip fabric, fabricated fitted with all accessories & fitting isstalled at site (fully powder coated) including fastening with alluminium arms, front channel gear box system, M. S. bracket ect. Complet. | | | |
| ०१ | बुकस्टॉल व देणगी काउंटर येथे. ३६'x८' | २८८.०० | | |
| ०२ | मंदिर परिसरामध्ये दैनंदिनी व दिनदर्शिका विक्री काउंटर समोर २२'x६' | १३२.०० | | |
| | **Total Sq. ft.** | ४२०.०० | १७५.०० | ७३,५००.०० |
| | Total Amount | | | ७३,५००.०० |

वरिल तपशिलानूसार अॅवेनिंग शेडची उभारणी करुन घेणेकामी अंदाजे रु. ७३,५००/- मात्र इतका अपेक्षित खर्च येईल.

तरी याकामी येणारे अंदाजे रु. ७३,५००/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन दरपत्रके मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर व बूक स्टॉल तसेच मंदिर परिसरातील दैनंदिन व दिनदर्शिका विक्री काऊंटरचे ठिकाणी अॅवेनिंग शेडची उभारणी करणेकामी येणारे अंदाजे रु. ७३,५००/- मात्रचे अपेक्षित खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन दरपत्रके मागवून करुन घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५८** **स्वर्गीय श्री होमजद् बी जंगलवाला यांचे मालमत्तेपैकी व रोख रकमेपैकी काही भाग संस्थानला दान देणे बाबत श्रीमती अरनी पी लाव्हिया, टेक्सास (अमेरिका) यांचे पत्राबाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्रीमती अरनी पी. लाव्हिया, राहणार २३०१, मॅकोन्डा लेन, हॉस्टन, टेक्सास - ७७०२७ (अमेरिका) या श्री. होमजद् बी. जंगलवाला यांच्या मृत्यूपत्र व मालमत्तेच्या स्वतंत्र कार्यवाहक असून, त्या श्री. जंगलवाला यांच्या पुतणी आहेत. श्रीमती लाव्हीया, टेक्सास यांनी दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजीचे पत्राने खाली नमूद केलेप्रमाणे काही बाबी कळविलेल्या आहेत :

०१. श्री. होमजद् बी. जंगलवाला हे माहे डिसेंबर, २०१० मध्ये मयत झालेले आहेत.
०२. स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूपत्रानुसार, संस्थान त्यांचे मालमत्तेचे १/४ हिस्सेदार आहेत.
०३. स्वर्गीय जंगलवाला यांचे परदेशी बँकांमध्ये तसेच मुंबई स्थित बॅकांमध्ये मोठया प्रमाणावर निधी आहे. तसेच त्यांची मुंबई स्थित एक सदनिका (निवासस्थान) व इतर काही बाबी ही आहे. या सर्व बाबींचे व निधीचे वाटप करणेस काही वर्षांचा कालावधी लागणार आहे.
०४. स्वर्गीय जंगलवाला यांना कोणी ही वारस अगर मुले अगर जिवीत पालक इत्यादी नाहीत.
०५. स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूपत्रानुसार त्यांची सर्व संपत्ती / मालमत्ता एकूण चार धर्मादाय संस्थांना देणेत येणार असून, त्यापैकी संस्थान ही एक संस्था आहे.
०६. स्वर्गीय जंगलवाला यांच्या मालमत्तेसंबंधीत सर्व बाबी एकत्रित करणेस, अंतिम करणेस काहीसा वेळ लागणार आहे.
०७. या पत्रात शेवटी, श्रीमती लाव्हिया, टेक्सास यांनी या सर्व बाबींसाठी खाली नमूद केलेली माहिती संस्थानने द्यावी म्हणून विनंती केलेली आहे.

(१) संस्थेचे अध्यक्ष किंवा मुख्य विश्वस्त किंवा संस्थेचे प्रमुख यांची नांवे व पत्रव्यवहाराचे पत्ते.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



(२) संस्थेच्या लेखा विभागाचे प्रमुखाचे नांव व पत्ता.
(३) संस्थेमार्फत, संस्थेच्या हितचिंतकांकडून देणगी, दाननिधी अनुदान स्वीकारणाऱ्या व्यक्तिचे नांव व पत्ता
(४) संस्थेमार्फत कायदेशीर बाबी हाताळणाऱ्या कायदे सल्लागार अथवा संस्थेचे कायदेविषयक काम पाहणाऱ्या संस्थेचे नांव व पत्ता.
(५) उपरोक्त प्रकारचे विनामुल्य आणि सर्वभारमुक्त किंवा आहे त्या अटीनुसार कोणत्याही परिस्थितीत दान स्वीकारणेबाबत संस्थेची मान्यता.
(६) अ.नं. ०१ मध्ये नमूद केलेल्या बार्बीस प्रतिसाद देणाऱ्या व्यक्तीचा संकेतस्थळाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक इत्यादी माहिती.

तसेच, श्रीमती लाव्हिया, टेक्सास यांनी सदर पत्राव्दारे अशी ही विनंती केली आहे की, स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूपत्रानुसार, उपरोक्त बाबी पार पाडणेसाठी त्यांचेमार्फत अन्य अनुषंगिक कार्यवाहक नेमणेपुर्वी उपरोक्त प्राथमिक बाबींची माहिती कळवावी. तसेच स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यपत्राची अंमलबजावणी करणेसाठी अन्य कुठल्याही व्यक्तीची कायदेशीररित्या नेमणुक करण्यात आलेली नाही.

**(ब)** श्रीमती लाव्हिया दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ रोजीचे पत्रात वर नमुद केलेप्रमाणे स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूपत्रानुसार मालमत्तेचे / संपत्तीचे वाटप करणेसाठी संस्थानची आवश्यक ती माहिती पाठविणेस सांगितलेले आहे. तथापि स्वर्गीय जंगलवाला यांची अंदाजे किती मालमत्ता आहे, ती कोठे व कोणत्या स्वरुपात आहे याबाबत कुठलीही माहिती दिलेली नाही तसेच पत्रासोबत मृत्यूपत्राची प्रत ही नाही किंवा स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूचे प्रमाणपत्र ही जोडलेले नाही.

श्रीमती लाव्हिया यांचे म्हणणे नुसार, स्वगीय जंगलवाला यांची परदेशीस्थित बँकांत / परदेशात स्थावर मालमत्ता असल्यास, ती स्वीकारणेसाठी केंद्र शासनाच्या वित्त, विदेश अथवा त्यासंबंधीत काम पाहणारे शासकीय विभागाची मान्यता घ्यावी लागेल किंवा कसे तसेच त्याबाबत यथायोग्य कार्यवाही पार पाडणेसाठी संस्थानमार्फत कायदा सल्लागार संस्थेची / व्यक्तिची नेमणूक करणे गरजेचे राहील.

तूर्त, श्रीमती लाव्हिया, टेक्सास (अमेरीका) यांचेकडून, मा. कार्यकारी अधिकारी यांचे नांव संस्थानचे प्राधिकृत अधिकारी म्हणून तसेच मुंबई स्थित संस्थान वकील ॲड. श्रीमती मीनाक्षी एम. जयस्वाल व ॲड. श्री. सचिन एस. शानबाग यांची नांवे तसेच स्वर्गीय जंगलवाला यांचे मृत्यूपत्र व मालमत्तेविषयक काही माहिती व त्या पृष्ठर्थ माहिती पाठविणेबाबत पत्र देणेत आलेले आहे.

श्रीमती लाव्हिया यांनी अशा प्रकारची देणगी/ मालमत्ता स्वीकारणेसाठी संस्थानचे ना हरकत पत्र/ मान्यता पत्राची मागणी केलेली आहे, त्यामुळे अशा प्रकारची देणगी / स्थावर मालमत्ता स्वीकारणेसाठी मान्यता पत्र देणे, त्यासंबंधीत कामकाज पार पाडणेसाठी कायदा सल्लागार संस्थेची नेमणूक करणे, याकामी संस्थानचे प्रतिनिधी म्हणून मा. कार्यकारी अधिकारी यांना प्राधिकृत करणे आदि बाबींसाठी मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३९५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विश्वस्त श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय हे त्यांचे कामानिमित्त अमेरिका येथे जात असतात. त्यावेळेस त्यांनी श्रीमती अरनी पी. लाव्हिया यांची समक्ष भेट घेऊन त्यांना स्वर्गीय श्री होमजद् बी जंगलवाला यांचे मालमत्तेपैकी व रोख रकमेपैकी काही भाग संस्थानला दान देणार आहेत याबाबत त्यांचेशी चर्चा करावी व सविस्तर माहिती मिळणेबाबत संस्थानचे पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.५९** **संस्थानचे वाहन विभागाचे वाहनतळ व वाहनतळाकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा भक्त निवासस्थानचे (५०० खोल्या ) पूर्वेकडील गौरी शेड जवळील जागेत (सर्व्हे नं. १०९) वाहन विभाग स्थलांतरीत करणेत आलेले आहे. वहान तळाचे जागेत तुर्त मुरुम व रॅबीट मटेरीअलची भर टाकून व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाहन विभागाचे कार्यालयाकरीता रुमचे बांधकाम करणेत आले आहे. तसेच मुख्य रस्त्यापासून वाहन विभागाकडे जाणारा रस्ता हा मुरुम टाकून तयार करणेत आलेला आहे.

वाहन विभागाने पार्किंग शेडमध्ये ब्लॉक बसविणे तसेच वाहनतळ व वाहनतळास मुख्य रस्त्यापासून जोडणारा रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करुन मिळणेबाबत कळविले आहे.

वाहन विभागाचे पार्किंग शेड, वाहनतळ व वाहनतळाकडे जाणारे रस्त्यावर पावसाळ्यात पाणी साचून चिखल होऊ नये याकरीता प्रथम खडीकरण करुन त्यावर डांबरीकरण करता येईल. याकामी सोबतचे अंदाज पत्रकानुसार रक्कम रु.२०,०३,२८२.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी वाहन तळाचे व रस्त्यांचे खडीकरण करुन डांबरीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.२०,०३,२८२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.३९६ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे वाहन तळाचे व रस्त्यांचे खडीकरण करुन डांबरीकरण करणेकामी येणारे रक्कम रु.२०,०३,२८२/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६० साईनाथ रुग्णालय लॉण्ड्री विभागासमोरील जागेत पी.सी.सी करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थान रुग्णालयांकरीता स्वतंत्र लॉण्ड्री विभाग सुरु करण्यात आला आहे. लॉण्ड्री विभाग समोरील जागेत कपडे सुकवणे कामी पी.सी.सी. करणे आवश्यक आहे. याकरीता उपरोक्त संदर्भिय डि.पी.नुसार लॉण्ड्री विभागाने कळविले असून सदर कॉंक्रीटीकरणास खालील तपशिलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | खोदाई | ३५.५५ | घ.मिटर | ८२.५० | २,९३२.८७ |
| ०२ | सोलिंग | ४०.६३ | घ.मिटर | २२५/- | ९,१४१.७५ |
| ०३ | कॉंक्रेट (१:३:६) पी.सी.सी. | २०.३१ | घ.मिटर | २१८१/- | ४४,२९६.११ |
| | | | | एकूण रुपये | ५६,३७०.७३ |
| | | | | Contingencies Add ५% | २८१८.५४ |
| | | | | **पूर्णांकीत रक्कम** | **५९,१९०.००** |

उपरोक्त तपशिलाप्रमाणे लॉण्ड्री विभागासमोरील जागेत कॉंक्रेटीकरणास अंदाजे रु.५९,१९०.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदरचे काम विभागामार्फत विहीत पध्दतीने मटेरीअल खरेदी करुन स्थानिक लेबर ठेकेदारांकडून कोटेशन मागवून काम करुन घेता येईल. सदरकामी येणाऱ्या रक्कम रु.५९,१९०.०० मात्रचे खर्चास मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३९७ यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनाथ रुग्णालय लॉण्ड्री विभागासमोरील जागेत पी.सी.सी. काम विभागामार्फत विहीत पध्दतीने मटेरीअल खरेदी करुन स्थानिक लेबर ठेकेदारांकडून कोटेशन मागवून काम करुन घेण्यास व सदरकामी येणाऱ्या रक्कम रु.५९,१९०.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६१ साई आश्रम प्रकल्पातील खोल्या/हॉलसाठी व व्दारावती निवासस्थानातील वातानूकुलित खोल्यांसाठी कॉटस तयार करणे बाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन उपसमितीचे दिनांक १० एप्रिल, २०११ रोजीचे सभेत सादर करणेत आलेल्या प्रस्तावानुसार, साई आश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ मधील खोल्या / हॉल्समध्ये भक्तांना निवासासाठी उपलब्ध करुन द्यावयाचे कॉटस् खरेदीकामी मागविणेत आलेल्या कॉटस्ची पहाणी मा. व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्षसो. यांनी मा. उपसमिती सदस्य श्री. अभंग, डॉ. गोंदकर, श्री. वाबळे पा., श्री. कुटे यांचेसह संस्थान अधिकाऱ्यांनी पहाणी केली. त्यानुसार मा. उपसमिती सभेने खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे :

.. .. मा. व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी सनमायका / लाकडी कॉटची तसेच सी. आर. सी. फ्रेमसह प्लायवूड असलेल्या कॉटची पहाणी केली. त्यास अनुसरुन, व्दारावती इमारतीतील वातानुकूलित ८० खोल्यांसाठी सध्याचे साईनिवास अतिथीगृहात असलेल्या लाकडी सनमायका-प्लायवूड कॉटप्रमाणे आवश्यकतेनुसार डबल व सिंगल कॉटस् तयार करणेत यावेत. तसेच साईआश्रम प्रकल्पातील खोल्या व हॉल (Dormitory) करीता गोदरेज कंपनीने तयार केलेल्या सी.आर.सी.फ्रेमसह प्लायवुडचे सिंगल कॉटस् तयार करणेत यावेत. यासाठी तांत्रिक बाबींसह सविस्तर आराखडे बनविणेत यावेत. सदर कॉटस् बनविणेकामी आवश्यक असणारे साहित्य पुरविणे / खरेदीसाठी तसेच खरेदी करण्यात आलेल्या साहित्यापासून मंजूर आराखडयानुसार कॉटस् बनविणेसाठी मजुरी दराच्या स्वतंत्र दोन निविदा मागविणेत याव्यात. याप्रमाणे दोन स्वतंत्र निविदा मागवितांना, नामांकित उत्पादक कंपन्या, त्यांचे अधिकृत विक्रेते यांना प्राधान्य मिळणेसाठी तसेच मजुरी दराचे कामासाठी फर्निचर उत्पादक क्षेत्रातील ज्या कंपन्यांकडे स्वत:ची फर्निचर तयार करण्याची अद्यायवत यंत्रसामुग्री, कुशल व तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध आहे अशा नामांकित कंपन्यांनी / मजूरी दराचे काम करणाऱ्या संस्थांनी सहभाग घ्यावा म्हणून, निविदा पूर्वपात्रतेत यासंबंधी योग्य व उचित अटी शर्ती नमुद करणेत याव्यात. तसेच या अशा पध्दतीने कॉटस तयार करुन घेणेसाठी निविदा प्रक्रियेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यास, वर नमूद केलेप्रमाणे आवश्यक सिंगल व डबल तयार कॉटस् खरेदीकामी थेट नामांकित उत्पादक कंपन्यांकडून निविदा मागविणेत याव्यात. याकामी येणारे सर्वसमावेशक व अनुषंगिक खर्चास मान्यता देणेबाबत शिफारस करणेत आली.

मा. व्यवस्थापन उपसमितीचे शिफारशीनुसार, आवश्यक असणाऱ्या कॉटस्ची रेखांकने तयार करणेत आलेली असून, त्याबाबत दि. २६.०४.२०११ चे टिपणी अन्वये कार्यवाही करणेत येत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करतानां कॉटस् बनविणेसाठी संस्थानमार्फत देणेत येणाऱ्या साहित्यावर नियंत्रण ठेवणे, त्याची आवक-जावक नोंद ठेवणे यासाठी आवश्यक असणारे कुशल व अकुशल मनुष्यबळ याशिवाय कॉटस तयार करतांना वाया जाणारे साहित्य तसेच खरेदी करणेत यावयाच्या साहित्यावर व त्या साहित्यापासून तयार करुन ताब्यात मिळणारे वस्तूंवर आकारणेत येणारे शासकीय कर वगैरे बाबी क्लिष्ट ठरण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करता, साहित्य देवाण-घेवाण, वाया जाणारे साहित्य यामुळे संस्थानमार्फत साहित्य खरेदी करुन मजुरी दराने कॉट तयार करवून घेणे जिकिरीचे व अडचणीचे होईल.

दि. ०५ मे, २०११ रोजी मा. विश्वस्त, श्री. सुरेशराव वाबळे पा. यांची मा. अध्यक्ष यांचेशी सदरहू फर्निचर बाबत चर्चा झाली. त्यानूसार दि. ०६ मे, २०११ रोजी मा. विश्वस्त, श्री. सुरेशराव वाबळे पा. व शाखा अभियंता, श्री. डी. एम. देसाई यांनी पुणे येथील लॉग्ज ॲण्ड लुम्बर्स प्रा. लि., या अद्यावत यंत्रसामुग्री व कुशल व तांत्रीक मनुष्यबळ उपलब्ध असलेल्या नामांकीत कंपनीची पहाणी करणेत आली आहे. त्याबाबतचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

०१. एकबोटे लॉग्ज ॲण्ड लुम्बर्स प्रा. लि., ही कंपनी पुणे शहारापासून जवळच राजने या गांवी प्रशस्त जागेत असून, कंपनीमध्ये अद्यावत यंत्र सामुग्री व कुशल मनुष्यबळ असल्याचे दिसून आले.

०२. सदर कंपनीमध्ये फर्निचरसाठी येणारे Steam back लाकूड हे मलेशिया येथून मागविले असल्याचे व सदरचे लाकूड पूर्णपणे वाळलेले असल्यामुळे बेंन्ड होत नाही. तसेच त्यावर किटक नाशक प्रक्रिया करणेत येत असल्यामुळे फर्निचरला किड लागत नाही, असे कंपनीचे संचालक, श्री. गणेश एकबोटे यांनी सांगीतले.

०३. फर्निचरचे वेगवेगळे भाग अद्यावत मशिनरीव्दारे कटींग, बेंन्डीग, होल करणे, जॉईन्ट करणे, गोलाई करणे इ. सर्व प्रक्रीया ह्या मशिनवर कुशल कारागीरामार्फत करण्यात येतात.

०४. लॅमिनेट फिक्सींग व पॉलिशिंग इ. कामे कुशल कारागीरामार्फत मशिनरीवर करण्यात येतात.

०५. मटेरियलची गुणवत्ता तपासणीसाठी स्वतंत्र लॅब.

०६. मटेरियल फिक्सींग, पॅकींग इ. कामे कुशल कारागीरामार्फत करणे.

०७. कंपनीमध्ये आलेले मटेरियल हे उच्च दर्जाचे व योग्य प्रकारे ठेवले होते.

०८. सर्व कामे ही अत्याधुनिक यांत्रीकी पध्दतीने होत असल्यामुळे फर्निचरमध्ये एकसारखेपणा व फिनीशिंग उच्च दर्जाचे होते.

०९. फर्निचरची सर्व कामे मशिनरीवर होत असल्यामुळे कमीत कमी कुशल कारागीरामार्फत कमी कालावधीत जास्तीत जास्त फर्निचर तयार होत असल्याचे आढळून आले.

करीता संस्थानमार्फत मटेरियल खरेदी करुन मजूर ठेकेदारामार्फत फर्निचर तयार केल्यास जादा कालावधी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे नामांकीत कंपन्यामार्फत मटेरियल व मजूरीसह एकत्रित निविदा मागविणे उचित राहील असे मत मा. विश्वस्त, श्री. सुरेश वाबळे पा. यांनी व्यक्त केले.

तरी मा. व्यवस्थापन उपसमितीचे दि. १०/०४/२०११ चे शिफारशीनुसार मटेरियल व मजुरीचे स्वतंत्र कोटेशन मागविणे अथवा सदरहू फर्निचरसाठी ज्या कंपनीकडे स्वतः फर्निचर तयार करावयाची अद्यावत यंत्रसामुग्री, कुशल व तांत्रीक मनुष्यबळ उपलब्ध आहे. अशा नामांकीत कंपन्यामार्फत निविदा मागविणेबाबत निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३९८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम प्रकल्पातील खोल्या/हॉलसाठी व व्दारावती निवासस्थानातील वातानूकुलित खोल्यांसाठी कॉटस तयार करणेकामी ज्या कंपनीकडे स्वतः फर्निचर तयार करावयाची अद्यावत यंत्रसामुग्री, कुशल व तांत्रीक मनुष्यबळ उपलब्ध आहे. अशा नामांकीत कंपन्यांकडून कॉटस् खरेदी करणेकामी निविदा मागविणेत याव्या, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख )

---

**विषय नं.६२** **श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारित तयार केलेल्या प्रसंग चित्रांना फ्रेम तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांचे जीवनचरीत्रावर आर्ट गॅलरी तयार करणेकामी आर्टिस्ट श्री.व्ही.व्ही.सपार, सोलापूर, श्री. सुनिल शेगांवकर पुणे, श्री हेमंत वाणी, शिर्डी व श्री. राजेंद्र जाधव, पुणे यांचेकडून ६ फुट X४ फुट या आकारात एकूण ४५ जीवन चित्र तयार करुन घेण्याचे मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये ठरले आहे. त्यानूसार वरिल आर्टीस्ट यांचेकडून विविध प्रसंगावर अधारीत एकुण २० प्रसंग चित्र तयार करुन घेणेत येऊन, संस्थान परिसरात बसविणेत आलेली आहेत. त्यापैकी काही प्रसंग चित्रे मंदिर परिसरामध्ये श्री सत्यनारायण हॉलमध्ये, देणगी काउंटरमध्ये, साईबाबा हॉस्पीटलमध्ये बसविणेत आलेले आहेत.

याबाबत आर्टिस्ट, श्री. शेगांवकर यांनी त्यांचेकडील दि. १७.०३.२०११ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, सत्यनारायण हॉलमध्ये श्री साई सत्यनारायण पुजा होत असल्याने तेथे वापर होणाऱ्या उदबत्ती, निरंजन यापासून चित्रांवर काजळी बसून चित्रे काळवंडण्याची शक्यता आहे. करीता तेथील

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



चित्रांना काचेची फ्रेमींग व माउटींग करणे आवश्यक असून, तसेच सदरची चित्रे प्रसादालय किंवा मंदिराच्या इतर पॅसेजमध्ये हलवून सरंक्षीत करावे. व भक्तांच्या दर्शनार्थ होतील अशा प्रकारे बसवावीत तसेच चित्रांना फेमींग व माउटींग करणेकरीता रु. ४ ते ५ लक्ष मात्र खर्च येईल असे कळविले आहे.

करीता श्री साई सत्यनारायण हॉलमधील एकुण ८ चित्रे तेथील दैनंदिन पुजेच्या वेळी वापर होणारे उदबत्ती, निरंजन यापासून तयार होणाऱ्या कार्बनमुळे चित्रांवर परिमाण होऊ नये याकरीता काचेचे फ्रेमींग व माउंटींग करुन घेता येतील. या करीता अंदाजे रु. ४.०० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. याकरीता आवश्यक तपशिल श्री. शेगांवकर यांचेकडून घेवून सदरचे काम अशा प्रकारचे काम करणारे ठेकेदार यांचेकडून विहित पध्दतीने कोटेशन मागवून तयार करुन घेता येईल.

तरी याकामी येणारे अंदाजे रु. ४.०० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.३९९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे जीवन चरित्रावर आधारित तयार केलेल्या प्रसंग चित्रांना फ्रेम तयार करणे ऐवजी लॅमिनेशन करता येईल किंवा कसे ? याबाबत चौकशी करुन लॅमिनेशन करता येत नसल्यास, उपरोक्तप्रमाणे फ्रेमचे काम करुन घेणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६३** **श्री साई प्रसादालय येथील सन्माननीय अतिथी भोजन कक्षातील व विशेष भोजन कक्षामधील खुर्च्यांची दुरुस्ती करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालय हे दि. ०८.०१.२००९ पासुन श्री साईभक्तांसाठी प्रसादभोजन घेणेकरीता खुले करण्यात आलेले आहे. श्री साई प्रसादालय इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये सन्माननीय व्यक्ती, देणगीदार भक्त, सरकारी उच्च पदस्थ अधिकारी वैगरे मान्यवरांकरीता भोजन घेणेकरीता बैठक व्यवस्था करणेत आलेली आहे. मान्यवरांकरीता भोजन घेणेकामी व्ही.आय.पी. कक्ष हॉल क्र. ०२ मध्ये एकुण २५० व्यक्तींची बैठक व्यवस्था करणेकामी ६० टेबल्स व २५० खुर्च्या याप्रमाणे फर्निचर करण्यात आलेले आहे. तसेच व्ही.व्ही.आय.पी. चे भोजन कक्षामध्ये एकुण ७० नग खुर्च्या व ३५ टेबल अशाप्रकारे फर्निचर तयार करणेत आलेले आहेत. सदरहु तयार करणेत आलेल्या फर्निचरचा तपशिल व दुरुस्ती कामासाठी अपेक्षीत खर्च खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Descriptoin | Qty | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Executive dining chairs manufactured out of seasoned Teakwood framed of clear size of 38"x18"with joinery with marine plywood base. All exposed wooden surface will be polished with melamine polish of required shape with backcushion of moulded high density P.U. foam (hot Pressed) Seat cushion moulded 42 density P.U. foam (hot Pressed) ( Completed Item cost Rs – 3600/- Per No)<br>a) Replacing white Regzin of back & Seat Cushion of chairs | 70 | No | 1,438 | 1,00,660.00 |
| | OR<br>b) Replancing fabric of back & seat cushion | 70 | No | 1,688 | 1,18,160.00 |
| 02 | S.S. framed Fixed Type Leather Chairs with round cushion back 32 density moulded foam half inch for back & one & half inches seat with B.W.P. Plywood base cushion in composite leather of approved makes & colour, Bottom stand in s/s finished, Nylon bottom shoe directly attached with frame, chair fram 18 SWG thick round CRC Pipe.<br>Completed Item cost Rs. 2700/Nos<br>a) Replacing black Regzin of back & Seat Cushion of chairs | 250 | No | 1,578.75 | 379687.50 |
| | OR<br>b) Replancing fabric of back & seat cushion | 250 | No | 1,688 | 422000.00 |

अ) व्ही.व्ही.आय.पी. कक्षामधील खुर्च्यांचे पुर्विचेच रेगझीनप्रमाणे लेदर रेगझीन व फोम बदलणेकामी रु.१,००,६६०/- मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे. तसेच रेगझीन ऐवजी fabric मध्ये दुरुस्ती करणेकामी १,१८,१६०/- मात्र अंदाजे मात्र खर्च अपेक्षित आहे.

ब) हॉल क्रं.२ व्ही.आय.पी. कक्षामधील खुर्च्यांचे पूर्वीचेच रेगझीनप्रमाणे दुरुस्ती कामी रु.३,७९,६८८.०० मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.तसेच लेदर रेगझीन ऐवजी fabric मध्ये दुरुस्ती करणेकामी रु.४,२२,०००.०० मात्र खर्च अपेक्षित आहे.

व्ही.आय.पी. कक्षामधील खुर्च्यांचे रेगझीनला मागील बाजुने चेन बसविण्यात आलेल्या आहेत. लहान मुले सदरचे चेन खाली वर करत असतात तसेच नखाने रेगझीन कुरतडतात.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी व्ही.व्ही.आय.पी. व व्ही. आय. पी. भोजन कक्षातील खराब खुर्च्यांचे लेदर रेगझीन ऐवजी फॅब्रीक बसवून दुरुस्ती करावी असे मत आहे. याकामी अंदाजे रु.५,४०,१६०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरीलप्रमाणे खर्चास व याकामी कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४००** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय येथील सन्माननीय अतिथी भोजन कक्षातील व विशेष भोजन कक्षामधील खुर्च्यांची दुरुस्ती करणेऐवजी नवीन खुर्च्या खरेदी करणेत याव्या, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६४** **शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्याबदल्यात जलसंपदा विभागास मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. ८७ (पै), ८८ (पै) मधील संस्थानचे जागेवर आवश्यकती बांधकामे करुन देणेकामी वास्तुविशारद नियुक्तीस व सदर बांधकामासाठी निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०५/२०१० रोजीचे सभेत नि.क्र.५१५ अन्वये जलसंपदा विभागास त्यांचे शिर्डी येथील ३२ आर जागेच्या बदल्यात मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं.८७ व ८८ मधील ४० जागा कार्यालय, कर्मचारी निवासस्थाने आदि आवश्यक बांधकामे करून हस्तांतरीत करणेस मान्यता देणेत आली आहे तसेच या कामी जलसंपदा विभागाचे मान्यतेसह शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले. त्यानुसार इकडील पत्र क्र.एसएसएस/ बांधकाम/ भुसंपादन/ १०३१६/२०१० दि.०६/११/२०१० अन्वये सदर जागांचे हस्तांतरणास व बांधकाम प्रकल्पास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडेस सादर केलेला आहे. त्याबाबत चालू डी.एस.आर. दरांनुसार अंदाजपत्रक सादर करणेबाबत शासनाने कळविले असून त्याविषयी पुर्तता करणेत येत आहे.

यापुर्वी दि.०८/०२/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.९१ अन्वये उपरोक्त प्रकल्पासाठी वास्तुविशारदाची नेमणूक होणेस व त्याकामी येणाऱ्या सर्वसमावेशक खर्चास तसेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार सदरहू प्रस्ताव मा.विधी व न्याय विभागाकडे पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन सदर प्रकल्पासाठी दि.२५/०६/२०१० चे मंजूर टिपणी अन्वये आर्कीटेक्ट सुरेश बाबू अँड पार्टनर्स, मुंबई यांची नेमणूक करणेत येवून त्यांचेमार्फत जलसंपदा विभागाचे आवश्यकतेनुसार बांधकाम करावयाचे कार्यालय, विश्रामगृह व कर्मचारी निवासस्थाने आदि इमारतींचे तपशीलवार आराखडे तयार करणेत आलेले होते. सदरहू आराखडे मा.नामदार श्री अजित पवार, जलसंपदा मंत्री यांचेसमोर सादर करणेत आले. त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार सदर आराखडयात सुधारणा करुन ते अंतिम करण्यात आलेले आहेत. आर्किटेक्ट यांनी वरीलप्रमाणे एकूण १६५७.३९ चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकामासाठी रु.४,११,४६,३५६/- मात्र रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

सदर प्रकल्पाचे आर्किटेक्ट सुरेश बाबू अँड पार्टनर्स, मुंबई यांनी तयार केलेले बांधकाम आराखडे जलसंपदा विभागास पाठविणेत आले आहेत. तसेच सदर बांधकाम आराखडयांना बांधकाम परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपुर यांचेकडे इकडील पत्र क्र.एसएसएसटी/ बांधकाम/ ७८६/ २०११ दि.०५/०५/२०११ अन्वये पाठविणेत आला आहे. उपरोक्त आराखडयांनुसार आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक व कोरे निविदा फॉर्म तयार करण्यात येत आहेत.

तरी आर्किटेक्ट सुरेश बाबू अँड पार्टनर्स, मुंबई यांचे नियुक्तीस तसेच त्यांना सध्या संस्थानला सेवा पुरविण्याऱ्या इतर आर्किटेक्ट प्रमाणे कामाचे किंमतीच्या २% दराने फी अधिक प्रचलित दराने सर्व्हिस टॅक्स आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरचे बांधकामांसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील जलसंपदा विभागाची जागा संस्थानला हस्तांतरीत करुन त्याबदल्यात जलसंपदा विभागास मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. ८७ (पै), ८८ (पै) मधील संस्थानचे जागेवर आवश्यकती बांधकामे करुन देणेकामी आर्किटेक्ट सुरेश बाबू अँड पार्टनर्स, मुंबई यांचे नियुक्तीस तसेच त्यांना सध्या संस्थानला सेवा पुरविण्याऱ्या इतर आर्किटेक्ट प्रमाणे कामाचे किंमतीच्या २% दराने फी अधिक प्रचलित दराने सर्व्हिस टॅक्स आदा करणेस व सदर बांधकामासाठी निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू विषयाबाबत मा.कार्यकारी अधिकारी यांनी पुरवणी टिपणीद्वारे सादर केलेल्या प्रस्तावानुसार उपरोक्त बांधकामासाठी येणारे एकुण अंदाजे रु.६,०१,७१,८०१/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.६५** **श्री साईबाबा हॉस्पिटल मधील आर एम ओ होस्टेल इमारतीत अंतर्गत फेरबदल करुन रुग्णाकरीता वार्ड बनविणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. उपाध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे सो., यांनी दि.०६/०४/२०११ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटल मधील पहाणी करुन इन डोअर पेशंट करीता खाटांची संख्या वाढविणे गरजेचे असल्याने ५० बेडसची वाढीव व्यवस्था निर्माण करणेसाठी RMO होस्टेलचे जागेवर वॉर्ड बनविणेबाबत तसेच पेशंटचे नातेवाईकांकरीता शौचालय बनवणेस व शेडस् बनवणेस सूचना केल्या होत्या. याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०४/२०११ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. यावेळी मा. उपाध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे, मा. विश्वस्त श्री. सुरेश वाबळे, डॉ. एकनाथ गोंदकर, श्री. अशोक खांबेकर, डॉ. प्यारेलाल तिवारी, सौ. अलका शेजवळ तसेच कार्यकारी अधिकारी श्री. किशोर मोरे व उप कार्यकारी अधिकारी डॉ. यशवंतराव माने उपस्थित होते. सदरहू सभेत याबाबत खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

सध्याचे RMO होस्टेल इमारतीत राहणाऱ्या डॉक्टरांची निवास व्यवस्था (५०० रुम ) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे करुन सदर इमारतीचे पहिल्या व दुसऱ्या मजल्यामधे रुग्णांकरीता अंदाजे ४२ बेडचे वॉर्ड तयार करणेस तसेच पेशंटचे नातेवाईकांकरीता शौचालयाची व्यवस्था करणेस व रुग्णालय समोरील शेड मधे फ्लोरींग करणे याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देणेत आली. याकामी संस्थानचे आर्किटेक्ट पॅनल वरील आर्किटेक्ट भुतडा, श्रीरामपूर यांचेकडून सदर कामासाठी आर्किटेक्चरल व स्ट्रक्चरल डिझाईनींग सर्व्हीसेस घेणेस मान्यता मिळाली आहे. RMO होस्टेल इमारतीत वॉर्ड व लिफ्टची सुविधाकरणेसाठी अंदाजे रक्कम रु.८,१९,६४५/- मात्र खर्च येईल. तसेच रुग्णांचे नातेवाईकांकरीता शौचालय बांधकाम करणे व शेडचे फ्लोरींग करणेसाठी अंदाजे रक्कम रु.५,७९,२१०/- मात्र खर्च येईल. तरी याप्रमाणे येणारे एकूण रु.१३,९८,८५५/- मात्रचे खर्चास व सदरहू कामे करणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४०२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं ६६** **सौ. किरण राजेश भनसाळी व श्री सोमेश दत्तात्रय वाबळे, राहाता यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. २०७/२ क्षेत्र ८० आर जमिन खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे, राहणार राहाता यांनी खाली नमूद केलेली जमीन संस्थानने विकत घ्यावी, म्हणून दिनांक १७ मे, २०११ रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तु:स्थिती आहे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र व आकार | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | २०७/२ | **किरण राजेश भनसाळी**<br>**सोमेश दत्तात्रय वाबळे** | **०० हे ८० आर**<br>आकार **रु. ३=६०** | ०१. इतर हक्कात कोणतीही नोंद नाही.<br>०२. पिक पहाणीस खरीप - सोयाबीन नोंद आहे.<br>**०३. अर्जदार सर्व जमीन खरेदी देऊ इच्छित आहेत.** |

**(ब)** **जमिनीची भौगोलिक स्थिती :**

उपरोक्त जमिनीचा सर्व्हे नंबर पुर्वीचे बिरेगांव हद्दीतील आहे. बिरेगांव हे शिर्डी गांवात, शिर्डी नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झालेले आहे. सदर जमीन बिरेगांव-साकुरी-शिर्डी शीव रस्त्याचे पश्चिमेस, साईश्रध्दा हौसिंग सोसायटीच्या पुर्वेस आहे. सदर जमीन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरापासून अहमदनगर-मनमाड रस्त्याने साधारणत: ०२ किलोमीटर तर समाधी मंदिर परिसरापासून ०३ किमी अंतरावर आहे. सध्या जमीन हरीत प(यात (शेती विभागात) आहे. तसेच सदर सर्व्हे नंबर २०७ पैकी मधील जमीन प्रस्तावित विकास आराखडयामध्ये वाहनतळासाठी दर्शविण्यात आलेली आहे / आरक्षित आहे. तथापि सदरचा प्रस्तावित विकास आराखडयामध्ये अद्याप अंतिम नाही.

**(क)** **जमिनीच्या किंमतीबाबत :**

सन २०११ चे मुल्यांकन तक्त्यामध्ये पुर्वीचे बिरेगांव चे जे सर्व्हे नंबर आहेत, ते सामील केलेले नाहीत. त्यामुळे सन २०११ चे शासकीय मुल्यांकन तक्त्यामध्ये सदर जमिनीच्या किंमती नमुद केलेल्या नाहीत.

मात्र, सदरचे जमिनीचे पश्चिमेस शीव रस्त्याचे पलिकडे लगत असलेल्या शिर्डी गावांतील सर्व्हे नंबर १०० चा मुल्यांकन तक्त्यामध्ये रहिवास विभागात दर रुपये ४२००/- प्रति चौरस मीटर, उत्तरेस असणारा सर्व्हे नंबर १७२ चा नाविकास विभागात दर रुपये ७२०/- प्रति चौरस मीटर तर उत्तर-पश्चिम दिशेस (वायव्य दिशेस) असणारा सर्व्हे नंबर ९६ चा नाविकास विभागात दर रुपये १३००/- प्रति चौरस मीटर असा दर्शविण्यांत आलेला आहे. अर्जदारांनी जमिनीचा दर रुपये ७,००,०००/- मात्र प्रती गुंठा / आर मिळावा म्हणून विनंती केलेली आहे. याबाबत जमीनमालकाशी चर्चा वाटाघाटी करुन जमिनीची किंमत ठरविणे उचित राहील.

**(ड)** उपरोक्त परिच्छेदात विवेचन केलेनुसार, खालील बाबींबाबत निर्णय होणेस विनंती आहे :

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०१. सौ. किरण राजेश भनसाळी व श्री. सोमेश दत्तात्रय वाबळे रा. राहाता यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर २०७/२ क्षेत्र ०० हे ८० आर खरेदी करणेत यावे किंवा कसे, जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकाशी चर्चा-वाटाघाटीव्दारे जमिनीची प्रति आर किंमत ठरविणे.

०२. जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमिनीचे खरेदीखताचे वेळेस जमिनीचे होणाऱ्या एकूण किंमतीचे ८० टक्के रक्कम आदा करणे व उर्वरित २० टक्के रक्कम संस्थानमार्फत सरकारी मोजणी झालेनंतर ताब्यात मिळणारे जमिनीच्या प्रमाणात रक्कम आदा करणेस मान्यता देणे. तसेच जमीन खरेदीसाठी जमिनीची किंमत आदा करणे, मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, सरकारी मोजणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे तसेच इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.४०३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सौ. किरण राजेश भनसाळी व श्री सोमेश दत्तात्रय वाबळे, राहाता यांची मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं. २०७/२ क्षेत्र ८० आर जमिनीची स्थानिक मा.विश्वस्तांनी पहाणी करुन प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ६७** **मौजे जवळके येथील ग्रामपंचायत मालकीची गट नं. ३१२ व ३४३ पैकी मधील ३० एकर (१२ हेक्टर) जमिन संस्थानला विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबत ग्रामपंचायत जवळके यांचे सुधारित प्रस्तावाबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ) विषयाची पुर्वपीठीका :**

**०१.** सरपंच व ग्रामसेवक, ग्रामपंचायत जवळके, तालुका कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांनी मा. अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या दिनांक ०३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे पत्रात असे नमूद केले होते की,

.. .. मौजे जवळके शिवारात वावी शिर्डी मुख्य रस्ता लगत शिर्डीपासून ११ कि. मी. अंतरावर ग्रा. प. मालकीचे ४४ एकर क्षेत्र आहे. सदर क्षेत्रात आपले संस्थान मार्फत विविध प्रयोजनार्थ व विकासात्मक कामासाठी सदर जागेची आपले संस्थानास गरज पडल्यास ग्रामपंचायत सदर जागा साईबाबा संस्थानास विनाअट देण्यास तयार आहे. तरी आपले साईबाबा संस्थानमार्फत सदर जागेवर गावाच्या विकासाच्या दृष्टीने योग्य त्या प्रयोजनार्थ वापरण्यात यावी. त्यास आमची काहीही हरकत नाही.

तसेच, उपरोक्त पत्रासोबत, दिनांक २६ जानेवारी, २०११ रोजीचे मौजे जवळके ग्रामसभेत मंजूर झालेल्या विषय क्रमांक ०९ / ठराव क्रमांक ०९ ची नक्कल जोडली होती, त्या ठरावात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

विषय क्र. ०९ : मौजे जवळके हद्दीतील ग्रा. प. मालकीचे ४४ एकर क्षेत्र साईबाबा संस्थान यांना देणेबाबत.

ठराव क्र. ०९ : आजच्या ग्रामसभेत असा ठराव करणेत येतो की, मौजे जवळके शिवारात ग्रामपंचायत मालकीची गट नंबर २१३ व २४३ मध्ये ४४ एकर क्षेत्र असुन सदरचे क्षेत्रामध्ये साईबाबा संस्थान मार्फत गावाच्या विकासासाठी काही ही शासकीय व संस्थानमार्फत योजना राबवयाच्या असल्यास सदरची जागा संस्थान यांना देण्यास काहीही हरकत नाही. त्यास आजची ग्रामसभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

मौजे जवळके ग्रामपंचायतीने सादर केलेला उपरोक्त जमीन विनाअट स्वीकारणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सदर सभेतील निर्णय क्रमांक १२१ नुसार खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आला :

.. .. यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे जवळके ग्रामपंचायतीची, मौजे जवळके, तालुका कोपरगांव हद्दीतील गट नंबर २१३ व गट नंबर २४३ मधील अंदाजे ४४ एकर जमीन संस्थानचे लोकोपयोगी विकास प्रकल्पांसाठी विनाअट स्वीकारणेत यावी, असे ठरले. ”

**०२.** मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, कामगार तलाठी, मौजे जवळके यांचेकडून मौजे जवळके ग्रामपंचायतीने कळविलेप्रमाणे गट नंबर २१३ व गट नंबर २४३ चे ७/१२ उतारे व फेरफार उतारे मागविणेत आले असतां, कामगार तलाठी, मौजे जवळके यांनी असे निदर्शनास आणून दिले की, ग्रामपंचायत मालकीचे गट नंबर २१३ व गट नंबर २४३ असे नसून, सदरचे गट नंबर ३१२ व गट नंबर ३४३ असे आहेत.

उपरोक्तप्रमाणे कामगार तलाठी, मौजे जवळके यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार आणि गट नंबर ३१२ व गट नंबर ३४३ चे ७/१२ उताऱ्यानुसार, मा. सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत जवळके यांना इकडील विभागाकडील पत्र दिनांक ०८ एप्रिल, २०११ नुसार, ग्रामपंचायत जवळके यांचे येत्या ग्रामसभेत सुधारीत ठराव मंजूर करुन तो संस्थानकडे सादर करणेबाबत कळविणेत आले.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३ फेब्रुवारी, २०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार करणेत आलेल्या कार्यवाहीस अनुसरुन, मा. सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत जवळके यांनी इकडील विभागास आवक नंबर २१२१ / दिनांक ०३ मे, २०११ ने

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्राप्त झालेल्या पत्रासोबत, दिनांक २२ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या मौजे जवळके ग्रामसभेतील विषय क्रमांक ०३ / ठराव क्रमांक ३ ची प्रत सादर केली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:

**विषय क्र. ०३** : मौजे जवळके हद्दीतील ग्रा.प.मालकीचे ४४ एकर क्षेत्रापैकी ३० एकर क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणेबाबत.

**ठराव क्र. ०३** : मौजे जवळके ग्रा. प. हद्दीतील गट नं. ३१२ क्षेत्र ७.७५ आर हेक्टर व गट नं. ३४३ मधील क्षेत्र १०.११ हे. असे एकूण क्षेत्र १७.८६ आर हे. आहे. सदर क्षेत्रापैकी जवळके ग्रा.प. सार्व. प्रयोजनार्थ १४ एकर क्षेत्र राखीव ठेवून उर्वरित ३० एकर क्षेत्र पुर्व बाजूने वेस बहादराबाद रस्त्यालगत पुर्वेकडून पश्चिमेकडे देण्यास तयार आहे. त्या क्षेत्रात श्री साईबाबा संस्थानने लोकोपयोगी, सार्वजनिक, शैक्षणिक, निमसार्वजनिक विकास प्रकल्प राबविण्यासाठी विनामोबदला उपलब्ध करुन देण्यास तयार आहे. सदरहू जमीन देण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, अ.नगर यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी याखेरीज वनविभाग व इतर संबंधीत शासकीय विभागाकडून ना हरकत दाखले मागविणेसाठी संस्थानला ग्रा.पं. मार्फत सर्वोतपरी सहाय्य करण्यास तयार असुन सदर क्षेत्र विकास प्रकल्प राबविण्यापुर्वी जवळके ग्रामपंचायतीस / ग्रामसभेस विश्वासात घेण्यात यावे. त्यास आजची ग्रामसभा सर्वानुमते मान्यता देत आहे.

मौजे जवळके ग्रामपंचायतीचे ग्रामसभेतील उपरोक्त निर्णयात नमुद केलेल्या, मौजे जवळके येथील गट नंबर ३१२ व गट नंबर ३४३ चे ७/१२ उताऱ्यांचे अवलोकन केलेला असता, त्यातील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे:

| अ.नं. | गट नंबर | क्षेत्र | इतर नोंदी |
|---|---|---|---|
| ०१ | **३१२** | ०७ हे ७५ आर पोटखराबा | ०१. इतर हक्कात गुरे चरण मोफत अशी नोंद आहे.<br>०२. पीकपहाणीस खुद्द ७.७५ गवत पड झाडे लागवड अशी नोंद आहे. |
| ०२ | **३४३** | १० हे ११ आर पोटखराबा | ०१. इतर हक्कात गुरे चरण मोफत अशी नोंद आहे.<br>०२. पीकपहाणीस ग्रामपंचायत १०.११ वनीकरण झाडे लागवड अशी नोंद आहे. |
| | **एकुण** | **१७ हे ८८ आर पोटखराबा** | |

थोडक्यात, मौजे जवळके ग्रामपंचायत दिनांक २२ एप्रिल, २०११ रोजीचे सभेतील ठराव क्रमांक ०३ नुसार, वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे, गट नंबर ३१२ व ३४३ मधील एकुण १७ हे ८८ आर (अंदाजे ४४.५ एकर) क्षेत्रापैकी १२ हेक्टर (३० एकर) जमीन संस्थानला विविध लोकोपयोगी, सार्वजनिक, शैक्षणिक, निमसार्वजनिक विकास प्रकल्प राबविण्यासाठी विनामोबदला उपलब्ध करुन देण्यास तयार आहे, तथापि सदर उपलब्ध होणाऱ्या जमिनीत संस्थानमार्फत विकास प्रकल्प राबविणेपुर्वी ग्रामपंचायतीस / ग्रामसभेस विश्वासात घेण्याची नवीन अट घातली आहे.

**(क)** तरी आता, उपरोक्त परिच्छेद ब मध्ये नमूद केलेनुसार, मौजे जवळके ग्रामपंचायत यांनी देऊ केलेली गट नंबर ३१२ व ३४३ पैकी मधील ३० एकर (१२ हेक्टर) जमीन संस्थानचे विविध लोकोपयोगी, सार्वजनिक, शैक्षणिक अथवा निमसार्वजनिक कामासाठी (जसे साईभक्त पदयात्रींसाठी पालखी थांबा उभारणे, वृध्दाश्रम, दवाखाना, शैक्षणिक संकुल, सांस्कृतिक केंद्र आदि) मौजे जवळके ग्रामपंचायत / ग्रामसभेस विश्वासात घेऊन योग्य व उचित विकास प्रकल्प राबविणेसाठी विनामोबदला उपलब्ध करुन घेणेस व त्याकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४०४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे जवळके येथील ग्रामपंचायत मालकीची गट नं. ३१२ व ३४३ पैकी मधील ३० एकर (१२ हेक्टर) जमिन संस्थानचे लोकोपयोगी विकास प्रकल्पासाठी विनाअट स्विकारणेत यावी. याकामी विहीत पध्दतीने मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत यावा. तत्पुर्वी ग्रामपंचायत तयार असल्यास तार कंपाऊंड करणेसाठी निविदा/ दरपत्रक मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.६८** **श्री. हेमंत नानासाहेब डांगे यांची मौजे दहिगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गट नं. १०० पैकी मधील क्षेत्र ०० हे ७६ आर (पोटखराब्यासह) खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. हेमंत नानासाहेब डांगे, राहणार दहिगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचे मालकीची मौजे दहेगांव कोऱ्हाळे, तालुका राहाता येथील गट नंबर १०० पैकी मधील क्षेत्र ०० हे ७६ आर (पोटखराबासह) ही जमीन संस्थानने खरेदी घ्यावी म्हणून दिनांक ०८ एप्रिल, २०११ रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. सदर अर्जासोबत जोडलेल्या गट नंबर १०० च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे:

| अ.नं. | गावाचे नांव / गट नंबर | ७/१२ नुसार गट नंबरचे एकूण क्षेत्र हे-आर-चौमी | भोगवटादार सदरी असलेल्या नोंदी | इतर हक्क व पीक पहाणीच्या नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | दहेगांव | ०१-२२-०० | हेमंत नानासाहेब डांगे (अर्जदार) | ०१. दहिगांव सो.प्र.प.क.घे. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | को-हाळे/ गट नंबर १०० | ००-३४-०० पोख ०१-५६-०० आकार रुपये ०३=३५ | क्षेत्र ०-४२ + पोख ०-३४ आ. ०१ =५५ अप्पासाहेब लक्ष्मण डांगे क्षेत्र ०-२० आ. ०=६० संपत लक्ष्मण डांगे क्षेत्र ०-२६ आ. ०=६० सिताराम लक्ष्मण डांगे क्षेत्र ०-२७ आ. ०=६० | ०२. विहीर - हेमंत यांची. ०३. पीकपहाणीस - हेमंत नानासाहेब - सोयाबीन ०-४२ आ.न.ऊस ०-४२ |

पीकपहाणीस अर्जदार श्री. डांगे यांची नोंद असल्याने, त्यांचे हिश्श्याची जमीन त्यांचे ताब्यात असून, वहिवाट देखील ते करतात, असे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार श्री. डांगे यांनी अर्जात जमिनीमध्ये विहीर असल्याचा उल्लेख केलेला नाही, तथापी ७/१२ उताऱ्यानुसार, जमिनीत विहीर असून ते विहीरीसह जमीन विकणार आहे, असे गृहीत धरणेत आलेले आहे.

तसेच अर्जदार श्री. डांगे यांनी त्यांचे दिनांक ०८ एप्रिल, २०११ रोजीचे अर्जात असे ही नमुद केले आहे की, त्यांची प्रकृती ठिक नसल्याने जमीन कसणे अडचणीचे होते तसेच वैद्यकिय उपचाराकरीता पैशाची अत्यंत गरज आहे, त्यामुळे त्यांच्या हिश्श्याची जमीन संस्थानला विकण्याची त्यांची इच्छा आहे. अर्जदार यांनी अर्जासोबत, टाटा मेमोरिअल हॉस्पीटलाच्या केसपेपरची छायांकित प्रत जोडलेली आहे.

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

अर्जदार यांनी अर्जासोबत, गावनकाशावरुन तयार करणेत आलेल्या, जमिनीच्या चतु:सिमा दर्शविणाऱ्या नकाशाची छायांकित प्रत सादर केली आहे. त्यावरुन गट नंबर १०० कडे जाण्यासाठी ओढयातून रस्ता दिसत आहे, म्हणजेच विषयांकित जमिनीकडे जाणेसाठी स्वतंत्र रस्ता नाही, असे दिसून येते.

प्राप्त नकाशानुसार, गट १०० चे उत्तरेस, ओढा व त्यापलीकडे गट नंबर ९९ असून, गट नंबर ९९ चे उत्तरेस, जमिनीपासून अंदाजे १५० फुट अंतरावर पिंपळस - दहिगांव को-हाळे रस्ता आहे. विषयांकित जमीन शिर्डी पासून साकुरी - पिंपळस मार्गे ०५ किलोमीटर अंतरावर आहे.

विषयांकित जमीन हरित क्षेत्रात आहे, त्यामुळे सदरची जमीन निवासी क्षेत्रात समाविष्ट होत नाही, तोपर्यन्त तेथे बांधकाम अनुज्ञेय नाही.

**(क) जमिनीची किंमत :**

अर्जदार श्री. डांगे यांनी दिनांक ०८ एप्रिल, २०११ रोजी दिलेल्या विनंती अर्जात, सदरहु जमिनीची रुपये ८० लाख मात्र किंमत मिळावी, जेणेकरुन वैद्यकिय उपचार घेता येईल, असे नमूद केलेले आहे. थोडक्यात, जमिनीची किंमत अंदाजे पूर्णांकिंत रक्कम रुपये १,०५,०००/- मात्र प्रति आर मिळावी अशी त्यांची इच्छा आहे.

मौजे दहिगांव को-हाळे येथील गट नंबर १०० पैकी मधील उपरोक्त ७६ आर जमीन (पोटखराबासह) विहीर बागायत आहे. ७/१२ उताऱ्यातील सन २०१०-११ चे पीक पहाणीनुसार, जमिनीमध्ये सोयाबीन व ऊस हे बारामाही पीक घेतल्याचे दिसून येत आहे.

सन २०११ च्या शासकीय मुल्यांकन तक्त्यात मौजे दहिगांव को-हाळे हे गांव राहाता तालुक्यात विभाग २ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. गट नंबर १०० चा दर हेक्टरी सारा रु.२=७४ असा येत आहे. मुल्यांकन तक्त्यानुसार, सदर जिराईत जमिनीचा दर प्रति हेक्टरी रुपये १,६४,०००/- मात्र म्हणजेच प्रति आर रुपये १६४०/- मात्र येत आहे. गट नंबर १०० मधील प्रस्तावित क्षेत्र ०० हे ४२ आर हे बागायत असल्याने, सदरचा दर दुप्पट धरण्यात येतो, त्याप्रमाणे तो रुपये ३,२८०/- मात्र येत आहे. तसेच विषयांकित जमिनीमध्ये ३४ आर पोटखराबा असल्याने, मुल्यांकन तक्त्यातील जिरायत दराच्या ७५ टक्के दर धरण्यात येतो. त्याप्रमाणे प्रस्तावित जमिनीतील पोटखराबा असलेल्या जमिनीचा दर रुपये १,२३०/- मात्र प्रति आर येत आहे.

थोडक्यात, विषयांकित मौजे दहिगांव को-हाळे येथील गट नंबर १०० मधील अर्जदार श्री. डांगे यांच्या मालकीच्या ७६ आर (पोटखराबासह) जमिनीची किंमत, ४२ आर साठी बागायत जमिनीचा दर रुपये ३,२८०/- प्रति आर याप्रमाणे रुपये १,३७,७६०/- अधिक ३४ आर पोटखराबा जमिनीचा दर रुपये १,२३०/- मात्र याप्रमाणे रुपये ४१,८२०/- मात्र अशी एकूण रुपये १,७९,५८०/- मात्र इतकी येत आहे.

यापुर्वी विषयांकित जमिनीच्या पश्चिमेस अंदाजे ०३ किलोमीटर असलेल्या, मौजे को-हाळे, तालुका राहाता येथील सौ. गिताबाई जयराम चौधरी व सौ. शैला भारत चौधरी यांची विहीर बागायत असलेली ०१ हे ६२ आर जमिन रुपये १,२५,०००/- मात्र प्रति आर या दराने माहे जानेवारी, २०११ मध्ये खरेदी करणेत आलेली आहे.

**(ड) कायदेशीर बाबीबाबत :**

अर्जदार श्री. डांगे यांनी अर्जासोबत सादर केलेल्या फेरफार उताऱ्यांचे अवलोकन केले असता, त्यांचेकडे कोणत्याही वित्तीय संस्थेची कर्जबाकी / थकबाकी दिसून येत नाही. अर्जदाराचे आजोबा श्री. भागवत दशरथ डांगे यांनी दहिगांव को-हाळे सोसायटीकडून वेळोवेळी कर्ज घेतलेले आहे, असे दिसून

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



येते. अर्जदार यांची जमिनी खरेदी करावयाची ठरल्यास, संबंधित संस्थेकडून उचित माहिती घेऊन कर्जफेड करणेबाबत विहीत पध्दतीने कार्यवाही करता येईल. तसेच अर्जदार श्री. डांगे यांना जमीन मृत्यूपत्राव्दारे मिळालेली आहे, मृत्यूपत्रात काही अटी शर्ती नमूद केलेल्या आहेत किंवा कसे याबाबत त्यांचेकडून मृत्यूपत्राची प्रत प्राप्त करवुन, जमीन निर्धोक असलेबाबत संस्थान वकिलांचा अभिप्राय घेणेत येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावांस अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. हेमंत नानासाहेब डांगे यांची मौजे दहिगांव को-हाळे येथील गट नंबर १०० पैकी मधील त्यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०० हे ७६ आर (पोटखराबासह) खरेदी करणेत यावे किंवा कसे,

०२. सदरहू जमीन खरेदी करण्याचे ठरल्यास, जमिनीचे दराबाबत अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन निर्णय घेणे.

०३. उपरोक्त जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकांस जो दर मान्य होईल, त्या दरानुसार जमिनीची खरेदी करणेस, जमीन खरेदी करणेपुर्वी मा. दुय्यम निबंधक, राहाता व संस्थान वकिल यांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे, वृत्तपत्रात नोटीस प्रसिध्द करुन हरकती मागविणे व त्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे तसेच खरेदीखत नोंदविणेसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४०५ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. हेमंत नानासाहेब डांगे यांची मौजे दहिगांव को-हाळे ता.राहाता येथील गट नं. १०० पैकी मधील क्षेत्र ०० हे ७६ आर (पोटखराब्यासह) जमिनीची स्थानिक मा.विश्वस्तांनी पहाणी करुन प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ६९ संस्थानचे दादर, मुंबई येथील साईनिकेतन इमारतीचे नव्याने बांधकाम करणेपूर्वी इमारतीत रहाणाऱ्या भाडेकरुसमवेत करावयाचे करारनाम्याबाबत व नियोजित साईनिकेतन टॉवर बांधकामासाठी अपेक्षित असलेल्या खर्चाबाबत**

**प्रस्ताव- अ) भाडेकरु समवेत करावयाचे करारनाम्याबाबत :-**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची दादर, मुंबई येथिल 'साईनिकेतन' ही जुनी इमारत पाडून त्या ठिकाणी अद्ययावत अशा नवीन विस्तारीत इमारतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. याकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०२ ऑक्टोंबर, २००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१७ अन्वये ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट राहुल पी आंबेकर) या संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४ ऑक्टोंबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०३ अन्वये आर्किटेक्ट राहुल आंबेकर यांना उपरोक्त प्रकल्पासाठी सेवा पुरविणेकरीता ०३ (तीन) टक्के आर्किटेक्ट फी अधिक प्रचलीत दराने सर्व्हीस टॅक्स अदा करणेसाठी मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार आर्कि. राहूल आंबेकर यांनी नियोजीत इमारतीचे आराखडे व ढोबळ अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

दि.१० जानेवारी, २००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समिती सभेत वरीलप्रमाणे नवीन इमारत बांधकामाचे प्रस्तावास तत्वतः मान्यता देणेत आलेली आहे. तसेच या इमारतीचे बांधकामाबाबत सर्वकष अटी शर्तीसह प्रस्ताव तयार करावा या प्रस्तावाबाबत कायदेशीर बाबी तपासून पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले आहे. सदर प्रकल्पासाठी ॲड. सचिन शानभाग, मुंबई यांचेकडून कायदेविषयक सल्लासेवा घेणेत येत आहे.

याबाबत सदर इमारतीतील भाडेकरुंसमवेत दि.२३/०३/२०११ रोजी रुईया कॉलेज हॉल, माटुंगा, मुंबई येथे मा.अध्यक्षसो.व मा.उपाध्यक्षसो., मा.विश्वस्त श्री.कुटे सो. तसेच मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, वरिष्ठ मुख्य अभियंता, आर्किटेक्ट राहूल आंबेकर व ॲड. सचिन शानभाग यांचे उपस्थितीत भाडेकरुंसमवेत बैठक झाली. सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संस्थानचे कायदेविषयक सल्लागार ॲड. सचिन शानभाग , मुंबई यांनी करारनामा मसुदा तयार केलेला असून दि.१९/०४/२०११ चे मेलद्वारे संस्थानला पाठविला आहे. दि.२३/०३/२०११ रोजी भाडेकरु यांनी मागणी केलेले बांधकाम क्षेत्र, कॉर्पस फंड इत्यादी माहीती खालीलप्रमाणे कळविली आहे.

| अ. क्र. | भाडेकरुचे नाव | लोकेशन | सध्या राहात असलेल्या भाडेकरुचे नाव | सध्याचे खोली/ फ्लॅटचे क्षेत्रफळ (आर्किटेक्ट यांनी घेतलेल्या मोजमापानुसार व कळविल्यानुसार) | भाडेकरु यांनी नविन इमारतीत मागणी केलेले खोली/फ्लॅटचे क्षेत्रफळ | भाडेकरु यांनी मागणी केलेला कॉर्पस फंड | भाडेकरु यांनी मागणी केलेला वाहतुक व स्थलांतरण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती बच्छी होमी मिस्त्री | फ्लॅट क्र. ०६ दुसरा मजला | श्रीमती बच्छी होमी मिस्त्री | १८९०.३५ चौ. फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | श्रीमती बी.पी.गांधी व श्री.डी.आर.गांधी | फ्लॅट क्र. ०४ पहिला मजला | - | १८९०.३५ चौ. फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |
| ०३ | श्री.एफ.के. बलसारा | फ्लॅट क्र. ०१ तळ मजला | श्री.एफ.के. बलसारा | १६७५.१७४ चौ. फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |
| ०४ | श्रीमती अनुसया व श्री.कमलेश जे.शाह | फ्लॅट क्र. ०३ पहिला मजला | श्रीमती अनुसया व श्री.कमलेश जे.शाह | १८९०.३५ चौ. फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |
| ०५ | श्री.एस .डी .पांडे | फ्लॅट क्र. ०५ दुसरा मजला | श्री.एस .डी . पांडे | १८९०.३५ चौ. फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |
| ०६ | श्रीमती महारुख जिम्मी बानाजी | फ्लॅट क्र. ०२ तळ मजला | श्रीमती महारुख जिम्मी बानाजी | १६७५.१७४ चौ.फुट | २५६३.२५७१ चौ.फुट | २५ लक्ष | १.५० लक्ष प्रतिमाह |

आर्किटेक्ट राहूल आंबेकर यांनी भाडेकरुंच्या मागणीप्रमाणे तयार केलेले नकाशा संस्थानकडे सादर केला आहे. दि.२३/०३/२०११ रोजीचे बैठकीत ठरल्यानुसार नियोजीत सदनिका बांधकाम नकाशाची प्रत भाडेकरु यांना मुंबई कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. काररनाम्यासोबत जोडणेकरीता रायडरचा मसुदा ॲड. सचिन शानभाग यांनी दि.१६/०४/२०११ रोजी ई-मेलव्दारे मुंबई कार्यालयास पाठविला होता. मुंबई कार्यालयामार्फत रायडर मधिल मोकळ्या जागा भरुन दि.१९/०४/२०११ रोजी भरलेले रायडर इ-मेलव्दारे आर्की. राहूल आंबेकर यांना पाठविणेत आले. दि.२१/०४/२०११ रोजी आर्कि. आंबेकर यांनी इ-मेल व्दारे रायडरमध्ये दुरुस्ती सुचवून रायडर योग्य असल्याचे नमूद केले आहे.

**ब) नियोजीत बांधकामाचा तपशिल व अपेक्षित असलेल्या खर्चाबाबत :-**

ऑरगॅनिक्स, मुंबई (आर्किटेक्ट श्री.राहुल पी. आंबेकर) यांनी नियोजीत साईनिकेतन टॉवर इमारतीचे संपूर्ण विकसन करणेकामी प्रत्यक्ष जागेची पहाणी करून व मोजमापे घेऊन बांधकाम आराखडे तयार केलेले आहेत. आर्कीटेक्ट यांनी सदरहू बांधकाम आराखडे , अपेक्षित खर्चाचे प्राथमिक अंदाजपत्रक व दि.२३.०३.२०११ रोजी भाडेकरुंसमवेत झालेल्या बैठकीचा तपशिल दि.१८/०४/२०११ (आवक क्र. २०७४, दि.०४/०५/२०११ ) चे पत्राव्दारे सादर केला आहे.

Proposed Utilities and Floorwise Area Statement

| Sr.no. | Floor | Utility | Proposed Occupant | SBUA in sqft |
|---|---|---|---|---|
| 1 | Ground | Entrance Lobby, Hall No.01 & Executive Cabin for Sansthan, Car Lifts (2), Passenger Lifts (4) Staircase (2) | Sansthan | 4242.62 |
| 2 | 1st | Car Parking (6 Cars) | Tenants | 3154.16 |
| 3 | 2nd | Car Parking H1 (6 Cars) | Sansthan | 3456.68 |
| 4 | 3rd | Car Parking H2 (7Cars) | Sansthan | 3419.63 |
| 5 | 4th | Car Parking H3 (7 Cars) | Sansthan | 3419.63 |
| 6 | 5th | Car Parking H4 (7 Cars) | Sansthan | 3419.63 |
| 7 | 6th | Car Parking H5 (7 Cars) | Sansthan | 3419.63 |
| 8 | 7th | Hall No.02 & Two Executive Cabins | Sansthan | 3419.63 |
| 9 | 8th | Hall No.03 & Two Executive Cabins | Sansthan | 3706.62 |
| 10 | 9th | Hall No.04 & Two Executive Cabins | Sansthan | 3706.62 |
| 11 | 10th | Sansthan Office & Two Executive Rooms | Sansthan | 3706.62 |
| 12 | 11th | Two Dormitories, two Executive Rooms & Pantry | Sansthan | 3706.62 |
| 13 | 12th | Flat for three out house tenants & 2 BHK flat for Sansthan | Sansthan/Tenants | 2848.55 |
| 14 | 13th | Flat for Tenant No. 01 (4BHK & Study) | Tenants | 3454.98 |
| 15 | 14th | Flat for Tenant No. 02 (4BHK & Study) | Tenants | 3261.09 |
| 16 | 15th | Flat for Tenant No. 03 (4BHK& Study) | Tenants | 3261.09 |
| 17 | 16th | Flat for Tenant No. 04 (4BHK & Study) | Tenants | 3261.09 |
| 18 | 17th | Flat for Tenant No. 05 (4BHK & Study) | Tenants | 3261.09 |
| 19 | 18th | Flat for Tenant No. 06 (4BHK & Study) | Tenants | 3261.09 |
| 20 | Terrace | Lift Machine Room , Staircase room and one toilet | -- | 496.3 |
| | | | Total Super Built up Area (SBUA) : | 65883.48 |

सध्याचे इमारतीत संस्थान व भाडेकरुंकडे असणाऱ्या व प्रस्तावीत साईनिकेतन इमारतीत संस्थान व भाडेकरुंकरीता असणाऱ्या क्षेत्रफळाचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

Comparison between Existing & Proposed area for Tenants

| Sr. No. | Particulars | Existing area in sft. | Proposed area in sft. |
|---|---|---|---|
| 1 | Tenant -1 | 1675.17 | 2563.25 |
| 2 | Tenant -2 | 1675.17 | 2563.25 |
| 3 | Tenant -3 | 1890.35 | 2563.25 |
| 4 | Tenant -4 | 1890.35 | 2563.25 |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| 5 | Tenant -5 | 1890.35 | 2563.25 |
| 6 | Tenant -6 | 1890.35 | 2563.25 |
| 7 | Tenant- 1(Out House) | 216.62 | 412.66 |
| 8 | Tenant- 2(Out House) | 216.62 | 391.45 |
| 9 | Tenant- 3(Out House) | 216.62 | 391.45 |
| **A** | **Total Area with The Tenants** | **11561.62** | **16575.12** |
| **B** | **Total Area with Sansthan** | **1890.35** | **24165.47** |

प्रस्तावित साईनिकेतन टॉवर इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट राहूल आंबेकर यांनी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु.२५ कोटी मात्र इतक्या रकमेचे ब्लॉक एस्टीमेट सादर केले आहे.

भाडेकरुंसाठी अदा करावयाचा प्रस्तावित कॉर्पस फंड व वाहतूक व स्थलांतरण खर्च खालिलप्रमाणे अपेक्षित आहे.

| Sr. No. | Particulars | | Amount in Rs. |
|---|---|---|---|
| B | **Deposit to Corpus (Rs. 25 lakh to each tenant)** | | **150 Lakh** |
| | For OHT- 3 Nos x Rs. 6.25 lakh | | 18.75 lakh |
| C | **Transit Accomodation** | | |
| | for tenant in Main building 1.5 lakh pm X 6 Tenants | Rs 9,00,000/- | |
| | For Out House Tenants Rs.12500/- pmx3 | Rs.37,500/- | |
| | Transit Accomodation cost per Month for all tenants is approximately | Rs.9,37,500/- | |
| | For Project duration of 30 Months | | **281.25 lakh** |
| | **Total Cost:** | | **450.00 lakh** |

तरी वरीलप्रमाणे ॲड. शानभाग यांनी कळविलेप्रमाणे रायडरचा समावेश करुन भाडेकरुंसमवेत करारनामा करणेसाठी व नियोजीत साईनिकेतन टॉवर बांधकामासाठी अपेक्षीत असलेल्या खर्चाबाबत आर्किटेक्ट राहूल आंबेकर यांनी कळविलेप्रमाणे प्रथम मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सदर प्रस्तावावर खालिल बाबींविषयी निर्णय होणे आवश्यक आहे.

**अ)** मुख्य इमारतीतील सहा भाडेकरुंना नियोजीत इमारतीत त्यांनी मागणी केलेले प्रत्येकी २५६३.२५७१ चौ.फुट इतके फ्लॅटचे क्षेत्रफळ (Carpet Area) देणे. तसेच आऊट हाऊसमधिल तिन भाडेकरुंपैकी एका भाडेकरुस आर्कि. आंबेकर यांनी नकाशात दर्शविलेनुसार ४१२.६६०३ चौ.फुट इतके व दोन भाडेकरुंना प्रत्येकी ३९१.४५८६ चौ.फुट इतके फ्लॅटचे क्षेत्रफळ (Carpet area) देणे.

**ब)** संस्थानतर्फे मुख्य इमारतीतील सहा भोकरुंकरीता प्रत्येकी रु.२५ लक्ष मात्र इतका कॉर्पस फंड अदा करणेसाठी एकूण रु.१.५० कोटी मात्र खर्चास मान्यता.

**क)** मुख्य इमारतीतील सहा भाडेकरुंकरीता त्यांनी मागणी केलेला वाहतुक व स्थलांतरण खर्च प्रत्येकी रु.१.५० लक्ष प्रतिमाह अदा करणेसाठी व त्यानुसार ३० महिन्यांकरीता येणारे एकूण रु.२.७० कोटी मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता.

**ड)** यापुर्वी जा.नं. ७७७९, दि.२२/०६/२००९ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे उपरोक्त प्रकल्पाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यात नमूद केलेप्रमाणे प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार प्रकल्पासाठी एकूण अंदाजे रु.१८.८७ कोटी मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामध्ये हाऊट हाऊस मधिल तिन भाडेकरुंसाठी प्रत्येकी रु.६,२५,०००/- याप्रमाणे कॉर्पस फंड तसेच स्थलांतर खर्च प्रत्येकी रु.१२,५००/- प्रति माह याप्रमाणे नमूद केलेला आहे. तथापी ॲड. शानभाग यांनी पाठविलेल्या उपरोक्त रायडरमध्ये आऊटहाऊस मधिल भाडेकरुंसाठी रायडर पाठविलेली नाहीत. तरी आऊटहाऊस मधिल तिन भाडेकरुंकरीता कॉर्पस फंड व वहातुक आणि स्थलांतर खर्चाची रक्कम ठरविणे आवश्यक आहे.

**इ)** आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या नियोजीत इमारतीचे बांधकाम नकाशांना मान्यता देणे

**फ)** नियोजीत इमारतीचे बांधकाम करण्यासाठी आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार येणारे रक्कम रु.२५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता देणे.

**ग)** मुंबई महानगरपालीका यांचे विकसन शुल्क, इतर कर इ. अनुषंगिक खर्चास मान्यता देणे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०६ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावातील क्र. अ ते ग मध्ये निर्णयार्थ नमूद केलेल्या बाबींना मान्यता देणेत आली. तसेच त्यापैकी क्र. ड मध्ये नमूद केलेप्रमाणे आऊट हाऊस मधील भाडेकरुंसाठी रु.६,२५,०००/- मात्र इतका कॉर्पस फंड तसेच स्थलांतर खर्च प्रत्येकी रु.१२,५००/- प्रति माह याप्रमाणे अदा करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ७० मौजे रुई, ता.राहाता येथील बक्षिसपत्राने मिळालेल्या गट नं. २९३ मधील जमिनीमध्ये शैक्षणिक व अध्यात्मीक विकास प्रकल्प उभारणेकामी राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट,मुंबई यांचे समवेत समझोता करारनामा (MOU) करणे बाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई या संस्थानला बक्षिसपत्राव्दारे दिलेल्या मौजे रुई तालुका राहाता येथील गट नंबर २९३ क्षेत्र ०७ हे ३२ आर जमिनीमध्ये विकसित करावयाचे प्रकल्पासाठी वास्तुविशारद म्हणून आर्क्टिकेट पुष्कर कानविंदे, पुणे यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसर आर्किटेक्ट पुष्क्रर कानविंदे यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१० रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीपुढे नियोजित विकास प्रकल्पाचे बांधकाम आराखडे सादर केले. त्यावेळेस श्री. प्रेम दर्यानानी हे ही सभेपुढे उपस्थित होते. यावर सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्रमांक ८३१ अन्वये सदर बांधकाम आराखडयांना मान्यता देणेत आलेली आहे.

वरिल क्षेत्रापैकी १० एकर क्षेत्रामध्ये उभारणी करावयाचे आध्यात्मिक केंद्राचे बांधकाम राधा कलियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचे खर्चाने देणगी दाखल करणेबाबत कार्यकारी विश्वस्त श्री. प्रेम दर्यानानी यांनी दिनांक ०२ डिसेंबर, २०१० रोजीचे पत्राव्दारे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ डिसेंबर, २०१० रोजीचे सभेत चर्चा होऊन, निर्णय क्रमांक १००४ अन्वये दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टची विनंती मान्य करण्यात यावी, असे ठरले.

श्री. प्रेम दर्यानानी, कार्यकारी विश्वस्त, राधा कलियनदास दर्यानानी ट्रस्ट, मुंबई यांनी त्यांचेमार्फत वरीलप्रमाणे देणगी दाखल करावयाचे बांधकामासाठी संस्थान व त्यांचे दरम्यान करावयाच्या समझोता करारनाम्याचा मसुदा (MOU) चा विचारार्थ सादर केला आहे. सोबत, सदर करारनाम्याचा मसुदा माहितीस्तव तथा अवलोकनार्थ सादर केला आहे.

तरी सदरहू समझोता करारनाम्यातील अटी शर्ती बाबत विचार विनिमय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०७ यावर सविस्तर चर्चा होऊन, MOU मधील कलम ८ वगळणेत यावे, तसेच संस्थान वकिलांच्या सल्ल्याने करारनामा करणेसाठी मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ७१ शिर्डी शहरातून जाणारे अहमदनगर-मनमाड लगत असणारे पूर्व व पश्चिम भाग जोडणेसाठी भुयारी मार्ग तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री क्षेत्र शिर्डी हे महान संत श्री साईबाबांचे जागतिक किर्तीचे देवस्थान म्हणून नांवारुपास आलेले आहे. श्री साईंच्या दर्शनार्थ शिर्डी येथे दररोज हजारो साईभक्त देश-विदेशातून येत असतात. शिर्डी हे शहर मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद इत्यादी मोठया शहरांना जोडणाऱ्या अहमदनगर-मनमाड या राज्यमार्गावर / लगत आहे.

शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांसाठी, शहरातील स्थानिक नागरीकांना रस्त्याने पायी येणे-जाणे सुखकर व्हावे तसेच पायी चालणाऱ्या भक्तांना, नागरीकांना वाहतुकीचा त्रास होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत उपलब्ध करवून देण्यात आलेल्या निधीतून सन २००० मध्ये शिर्डी शहरातून जाणाऱ्या अहमदनगर-मनमाड या राज्यमार्गाचे अंदाजे १६५० मीटर लांबीच्या रस्त्याचे रुंदीकरणासह मजबुतीकरण व डांबरीकरण करण्यात आलेले आहे. रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करतांना या रस्त्याचे दोन्ही बाजूस अंतर्गत भुयारी गटर व सर्व्हिस डक्ट तयार करून त्यावर सुशोभित अशा पेव्हींग ब्लॉक्सचे फुटपाथ तयार करण्यात आलेले आहेत.

या राज्यमार्गाचे पुर्व बाजूस श्री साईबाबा समाधी मंदिर, भक्तनिवासस्थाने आदि परिसर असून पश्चिम बाजूस श्री साई प्रसादालय, रुग्णालये व कर्मचारी निवासस्थाने आहेत. त्यामुळे सदरचा राज्यमार्ग ओलांडणाऱ्या साईभक्त व स्थानिक नागरिक पादचाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. दिवसेंदिवस वाढणारी भक्तांची गर्दी व वाहतुकीमुळे भक्तांसह स्थानिक नागरीकांना सदरचा राज्यमार्ग ओलांडणे अत्यंत कठीण व जिकिरीचे झालेले आहे.

तसेच अहमदनगर- मनमाड या राज्यमार्गालगत, शिर्डी- निमगांव शीव रस्त्याचे दक्षिणेस मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीत संस्थानमार्फत भक्तांना प्रसाद भोजनाची व्यवस्था उपलब्ध व्हावी याकरीता श्री साई प्रसादालय उभारणेत आलेले आहे. सदर प्रसादालयाकडे जाणाऱ्या भक्तांना साखळी क्रमांक ९२/१५६ या पुलावरुनच जावे लागते / ओलांडून जावे लागते. तसेच याच पुलाचे जवळ संस्थानचा जुन्या प्रसादालयाचा परिसर असून याठिकाणी भक्तांना उपहारगृह, निवासस्थान तसेच भक्तनिवासस्थान व प्रसादालयाकडे जाणेसाठी विनामुल्य बससेवा आदि सुविधा करुन देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या परिसरात नेहमीच मोठया प्रमाणावर गर्दी असते. तथापि सध्या दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या गर्दीमुळे सदरचा राज्यमार्ग सहजासहजी ओलांडणे मोठे कठिण व जिकिरीचे झालेले आहे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदातील विवेचनास अनुसरुन, सदरचे राज्यमार्गाचे मजुबतीकरणासह विस्तारीकरणाचे काम शासनामार्फत सुरु आहे, त्यास अनुसरुन शिर्डी शहरातून जाणाऱ्या राज्यमार्गावर खालील ठिकाणी रस्ता ओलांडणेसाठी प्रशस्त भुयारी मार्ग (Underpass / Subway) असणे अत्यंत आवश्यक आहे :

०१. श्री साईप्रसादालयाकडे जाणाऱ्या रस्त्यासमोर (निमगांव शीव रस्त्याचे चौफुलीजवळ)
०२. जुना पिंपळवाडी रस्त्यासमोर (हॉटेल साईबाबा इंटरनॅशनल व साईप्रसाद इमारतीजवळ)

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



०३. नविन पिंपळवाडी रस्त्यासमोर ( श्री हरी कॉम्प्लेक्स / कनकुरी रस्त्याचे चौफुलीजवळ)

०४. शिर्डी बसस्थानकाजवळ ( श्री साईबाबा हॉस्पीटल चौफुलीजवळ)

०५. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्यांचे इमारतीचे) प्रवेशव्दारासमोर.

उपरोक्तप्रमाणे भुयारी मार्ग उपलब्ध करुन देणेकामी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र शासन तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग (जागतिक बँक प्रकल्प) यांना विनंती-वजा-प्रस्तावित करणेत आलेले आहे.

**(क)** शिर्डी शहरातून जाणारे अहमदनगर - मनमाड या राज्यमार्गावर, उपरोक्त नमुद केलेल्या ठिकाणी भुयारी मार्ग तयार करणेसाठी काही ठिकाणी खाजगी जागांचे भूसंपादन करावे लागण्याची शक्यता आहे तसेच भुयारी मार्ग उपलब्ध करुन देणेसाठी मोठया प्रमाणावर बांधकाम खर्च येण्याचा संभव आहे. साईभक्तांसह स्थानिक नागरीकांच्या सोयी-सुविधेसाठी उपरोक्तप्रमाणे भुयारी मार्ग तयार करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक असून, या भुयारी मार्गामुळे पादचारी व हलक्या-जड वाहनांची या राज्यमार्गावरील वाहतुक व दळणवळण विनाअडथळा व सुलभतेने होणेसाठी हा खर्च करणे आवश्यक आहे.

वर नमुद केलेल्या विवेचनास अनुसरुन, संस्थानमार्फत व संस्थान खर्चातून अहमदनगर - मनमाड या राज्यमार्गावर, भुयारी मार्ग तयार करणेसाठी प्रकल्प सल्लागार संस्था नेमून त्यांचेकडून प्राथमिक बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेता येतील. सदर बांधकाम आराखडयांना सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेऊन, त्यांचे मार्गदर्शनानुसार व सहकार्याने तसेच मा. शासनाचे मान्यतेने संस्थानमार्फत विहीत पध्दतीने निविदा मागवून भुयारी मार्ग विकसित करता येतील.

**किंवा**

उपरोक्त नमूद केलेल्या ठिकाणी भुयारी मार्ग विकसित करणेसाठी थेट सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उचित कार्यवाही करुन, त्याकामी आवश्यक असणारा आर्थिक निधी मा. शासनाचे मान्यतेने सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देता येईल. तसेच सदरचा पर्याय हा संस्थानला भुयारी मार्गासाठी करावे लागणारे भूसंपादन, तांत्रिक मान्यता, त्यासाठी लागणारे मनुष्यबळ आदि बाबींच्या दृष्टीने उचित व योग्य राहील.

**निर्णय क्र.४०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे निधीतून अहमदनगर- मनमाड या राज्यमार्गावर, भुयारी मार्ग तयार करणेसाठी प्रकल्प सल्लागार मे.सी.व्ही कांद,कन्सल्टंट प्रा.लि.,पुणे यांची नेमणूक करण्यात यावी. याकामी त्यांना २ %+ सर्व्हिस टॅक्स इतकी फी देण्यास मान्यता देण्यात आली.सदर बांधकाम आराखडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेसाठी तसेच मा. शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व सार्वजनिक बांधकाम विभाग यांची तांत्रिक मान्यता व मार्गदर्शनानुसार त्यांचेमार्फत भुयारी मार्ग विकसित करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ७२** **शिर्डी येथील नाल्यावर साईभक्तांसाठी पादचारी लोखंडी पूल तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी नगरपंचायत हद्दीतून जाणाऱ्या अहमदनगर- मनमाड या राज्यमार्गावर, लक्ष्मीनगर वसाहतीजवळून शीव नाला पश्चिम-पूर्व वाहत असून, या शीव नाल्यावर रस्त्याचे दुपदरीकरणांतर्गत दक्षिणोत्तर छोटासा पूल उभारणेत आलेला असून, या पुलाचे पश्चिमेस पुर्वीचा रस्ता छोटया पुलापेक्षा अंदाजे ०८-१० फुट खाली आहे.

अहमदनगर-मनमाड या राज्यमार्ग क्रमांक १० चे मजबुतीकरणासह डांबरीकरण व चौपदरीकरणाचे काम शासनामार्फत / सार्वजनिक बांधकाम विभाग (जागतिक बँक प्रकल्प) मार्फत सुरु आहे. सदर कामांतर्गत या शीव नाला साखळी क्रमांक ९२/१५६ वरील चौपदरी पुलाच्या बांधकामाचा समावेश आहे. तथापि, सध्या सदरचे रस्त्याचे काम पूर्णपणे बंद असून, ते पुन्हा कधी सुरु होईल याबाबत शाश्वती नाही.

अहमदनगर - मनमाड या राज्यमार्गालगत, शिर्डी - निमगांव शीव रस्त्याचे उत्तरेस मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीत संस्थानमार्फत भक्तांना प्रसाद भोजनाची व्यवस्था उपलब्ध व्हावी याकरीता श्री साई प्रसादालय उभारणेत आलेले आहे. सदर प्रसादालयाकडे जाणाऱ्या भक्तांना साखळी क्रमांक ९२/१५६ या शीव ओढयाचे पुलावरुनच जावे लागते / ओलांडून जावे लागते. तसेच याच पुलाचे जवळ संस्थानचा जुन्या प्रसादालयाचा परिसर असून याठिकाणी भक्तांना उपहारगृह, निवासस्थान तसेच भक्तनिवासस्थान व प्रसादालयाकडे जाणेसाठी विनामुल्य बससेवा आदि सुविधा करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच या ठिकाणी स्थानिक लक्ष्मीनगर वसाहत असल्यामुळे या परिसरात नेहमीच मोठया प्रमाणावर गर्दी असते. त्यामुळे सध्या दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या गर्दीमुळे सदरचा राज्यमार्ग सहजासहजी ओलांडणे मोठे कठिण व जिकिरीचे झालेले आहे.

या सर्व बाबींचा विचार करता, पायी चालणाऱ्या साईभक्तांसह स्थानिक रहिवाशांसाठी सदर शीव ओढयाचे / नाल्याचे पश्चिमेस पादचारी लोखंडी पुल (साकव) उभारणेचे प्रस्तावित आहे. प्रस्तावित लोखंडी पुलाची लांबी अंदाजे १५ मीटर, रुंदी ०३ मीटर व उंची जमिनीपासून आवश्यकतेनुसार उचित व योग्य प्रमाणात ठेवणेत येईल. सदर पुलाचा प्लॅटफॉर्म एम.एस. चेकर्स प्लेटस्चा राहील तसेच पुलाचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



प्लॅटफॉर्मचे दोन्ही बाजूस संरक्षक लोखंडी कठडे अंदाजे ०४ फुट उंचीचे असतील. प्रस्तावित पुलाचे दोन्ही बाजूस चढ / उताराचे ठिकाणी पेव्हींग ब्लॉक्स बसविणेत येतील.

तथापि, सदर तात्पुरत्या स्वरुपाचा पुल उभारणेसाठी शिडी नगरपंचायत, शिर्डी व संबंधित विभागांकडून परवानगी घेता येईल. याकामी स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे यांचेकडून स्ट्रक्चरल डिझाईन करुन घेणेत आलेले आहे. त्यानुसार तात्पुरत्या पादचारी लोखंडी पूल उभारणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ६,१०,०००/- मात्र इतका खर्च येईल. तरी सदरहु कामी स्ट्रक्चरल कन्सल्टंट म्हणून श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे यांची नेमणूक करणेस व सदरचा तात्पुरत्या स्वरुपाचा लोखंडी पादचारी पुल उभारणेसाठी येणाऱ्या आवश्यक त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी येथील नाल्यावर साईभक्तांसाठी स्ट्रक्चरल कन्सल्टंट श्री. आर. आर. कुलकर्णी, पुणे यांनी तयार करुन दिलेल्या स्ट्रक्चरल डिझाईननुसार तात्पुरता पादचारी लोखंडी पूल उभारणेत यावा, याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.६,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळेस नगर-मनमाड रस्त्याचे कॉन्ट्रॅक्टर सदरहू नाल्यावरील पुलाचे बांधकाम करणार नसेल तर सदरहू पुल संस्थानमार्फत करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं. ७३** **जुने प्रसादालय परिसरात पिंपळवाडी रस्त्यालगत साईभक्तांना चालणेसाठी पथ वे तयार करणे बाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिर परिसराचे उत्तर बाजुला असलेल्या जुना पिंपळवाडी रस्त्यावरुन दर्शन रांगेकरीता प्रवेश देण्यात येतो. तसेच उर्वरीत रस्त्यावरुन मोठ्या वाहनांची वर्दळ असते व साईभक्तांना चालणेसाठी रस्त्याच्या उत्तर बाजुकडील ५' रुंदीचा फुटपाथचा वापर करावा लागतो. मा. अध्यक्ष सो यांनी दि.३१/०५/२०११ रोजी कार्यकारी अधिकारी व वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे समवेत सदरहू परिसराची पहाणी केली. साईभक्तांना सदरचे रस्त्यावरुन चालणेस अडचण होते. याकरीता संस्थानचे जुने प्रसादालय परिसरातून जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या फुटपाथच्या बाजुने १० फुट रुंदीचा पाथ-वे करणेस सूचना केल्या आहेत. सध्या संस्थान मालिकीचे जागेत (जुने प्रसादालय परिसराचे आतिल बाजुने) म्हणजे नगर-मनमाड रोड ते तिर्थप्रसाद लॉज पर्यंत सदर पाथ-वे तयार करता येईल. यासाठी उत्तरेकडून रिटेनिंग वॉल (आर.सी.सी. पडदी)बांधून मुरुम फिलींग, दगडाचे सोलींग, पी. सी.सी. व पॉलीमर कोटेड पेव्हींग ब्लॉक बसवून प्रथम टप्प्यात पाथे- वे तयार करता येईल. याकामी रक्कम रु.१२,४५,०००/-मात्र खर्च येईल, तिर्थ प्रसाद लॉजपासून उर्वरीत पाथ - वे करणेसाठी शिर्डी नगर पंचायत यांचेकडे प्रस्ताव सादर करता येईल.

तरी साईभक्तांचे सुविधेसाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या (अभिनेते मनोज कुमार गोस्वामी पथ) उत्तर बाजुने संस्थान हद्दीतून १० फुट रुंदीचा व १०२ मी.लांबीचा पाथ- वे करणेसाठी व याकामी येणारे रक्कम रु.१२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्तांचे सुविधेसाठी जुन्या पिंपळवाडी रस्त्याच्या (अभिनेते मनोज कुमार गोस्वामी पथ) उत्तर बाजुने संस्थान हद्दीतून १० फुट रुंदीचा व १०२ मी.लांबीचा पाथ- वे करणेसाठी व याकामी येणारे रक्कम रु.१२,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७४** **कॅन्टीन विभागासाठी वॉकर टाईप स्टेनलेस स्टिल रेलिंग तयार करणे बाबत.**

**प्रस्ताव-** साईभक्तांच्या सोयीसाठी चहा कॅन्टीन २४ तास कार्यरत असून साईभक्तांची चहा, कॉफी, दुध, बिस्किटे व सिलबंद पिण्याचे पाण्याची बाटली घेणेकरीता साईभक्तांची सतत गर्दी असते व त्याचबरोबर पाकिटमार सकाळपासून ते रात्रीपर्यंत (अंदाजे रात्री ११ ते १२ वाजेपर्यंत) वावर असतो. चहा तिकिटे घेणेचा बहाणा करुन पाकिटमार भक्तांच्या रांगेत घुसून साईभक्तांची पाकीटे मारतात. पाकिटमारांना विरोध करणा-या साईभक्तांना मारहाण करणे, शिवीगाळ करणे असे प्रकार नेहमी घडत आहे. मध्यंतरी मेनरोडवर पाकिटमारांमध्ये मारामारी होऊन एक पाकिटमार जखमी अवस्थेत कॅन्टीनमध्ये येऊन पडला होता. साईभक्तांचे पैसे व पाकिटे चोरणे, भक्तांनी त्यांना विरोध केल्यास शिवीगाळ करणे, भक्तांना मारहाण करणे हे प्रकार नित्याचेच झाले आहे.

कॅन्टीनमध्ये सरासरी चहा कॅन्टीनचा भरणा ३० ते ३५ हजार रुपयांपर्यंत व लाडू विक्रीचा भरणा सरासरी अंदाजे रु. ४ लाख ते रु. ५ लाखापर्यंत असतो. तसेच अन्नपाकिटांचा दररोज अंदाजे भरणा रु. १५ ते २० हजार रुपये पर्यंत असतो. कॅन्टीन विभागाच्या रकमेस सुरक्षितता देणे गरजेचे असून कॅन्टीन व साईप्रसाद परिसरात पाकिटमार गटागटाने फिरुन दहशत निर्माण करतात. सदरची बाब अतिशय गंभीर स्वरुपाची असल्याने चहा कॅन्टीन विभागात बुकिंग काऊंटर व चहा वाटप काऊंटर समोर १५ नग वॉकर टाईप स्टेनलेस स्टील रेलींग तयार करुन मिळणेकामी मागणी करण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



चहा कॅन्टीन विभागात बुकिंग काऊंटर व चहा वाटप काऊंटर समोर १५ नग वॉकर टाईप स्टेनलेस स्टील रेलींग बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून करुन घेणेकामी खालीलप्रमाणे मटेरीअल व खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | तपशील / साईज | मागणी | दर(अंदाजे) | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- ५० mm x १४ SWG. | १,००० फूट | रु. ३४५.००<br>(प्रति फूट) | ३,४५,०००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील स्क्वेअर पाईप,<br>साईज :- २५ mm x १४ SWG. | १९५० फूट | रु. १४०.००<br>(प्रति फूट) | २,७३,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील बॉटम फ्लॅट पाईप,<br>साईज :- ४० mm x १० SWG. | ०७५० फूट | रु. १८०.००<br>(प्रति फूट) | १,३५,०००.०० |
| | | | एकुण :-<br>वॅट १२.५% | ७,५३,०००.००<br>९४,१२५.०० |
| | | | रक्कम :-<br>+ ४०% मजुरी | ८,४७,१२५.००<br>३,३८,८५०.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **११,८५,९७५.००** |

उपरोक्तप्रमाणे चहा कॅन्टीन विभागात बुकिंग काऊंटर व चहा वाटप काऊंटर समोर १५ नग वॉकर टाईप स्टेनलेस स्टील रेलींग बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी अंदाजे रक्कम रुपये ११,८५,९७५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस व वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा बोलाविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४११ यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू मागे घेण्यात आला.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७५ श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील नेटवर्क रुमकरीता ए.सी. खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे सर्व विभागांसाठी संगणक व संगणकीय साहित्य पुरविण्यात आलेले आहे. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथे एक नेटवर्क रुम तयार करण्यात आलेली आहे. नेटवर्कींग रुममध्ये स्विचेस व युपीएस बसविण्यात आलेले आहे. नेटवर्कींगचे स्विचेस गरम होतात. स्विच गरम झाल्यानंतर ते बंद पडतात. त्यामुळे सदरचे रुममध्ये नेटवर्कींग प्रणाली सुस्थितीत चालावी याकरीता ए.सी.बसविणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून विद्युत विभागाकडून ए.सी.बसवून मिळणेची मागणी करण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील नेटवर्क रुमकरीता ए.सी. बसविणेकामी सद्या विद्युत विभागाकडे ए.सी.शिल्लक नसल्याने नविन खरेदी करावा लागणार आहे. सदर ए.सी. खरेदीचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) रु. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| ०१. | व्होल्टास मेक, स्प्लिट टाईप,<br>वॉल माऊंटेड एअर कंडिशनर,<br>क्षमता :- २ टन,<br>मॉडेल :- व्हर्टीस प्लस | ०१ नग. | ४०,०००.०० | ४०,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **४०,०००.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील नेटवर्क रुमकरीता ए.सी. खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी सदरच्या ए.सी.ची खरेदी कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१२ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील नेटवर्क रुमकरीता आवश्यक असणारा ए.सी. कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय न.७६ संरक्षण विभाग, बॅगेज स्कॅनर मशिनकरीता दोन कॅबीनमध्ये व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील मध्यवर्ती औषधे भांडार विभागात असलेल्या मिटींग हॉलमध्ये बसविणेकामी नवीन ए.सी खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सुरक्षा साहित्य पुरवठादार यांचेमार्फत शांतीगेट (मुख्य प्रवेश दर्शनरांग) येथे भक्तांकडील साहित्यांची चेकींग करणेकामी दोन बॅगेज स्कॅनर मशीन बसविण्यात आलेले आहेत. सदर बॅगेज स्कॅनर मशिन हे दर्शनरांगेत मोकळया जागेत असल्यामुळे दर्शन रांगेत साफसफाई करतांना उडलेली धुळ व बाहेरील बाजूस असलेल्या वहातुकीमुळे निर्माण होणारी धुळ यामुळे बॅगेज स्कॅनर मशीन जवळील संगणक संच या इलेक्ट्रॉनिक्स वस्तूचे पॉईंट लवकर खराब होऊन नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. तसेच बॅगेज स्कॅनर मशीन सतत कार्यान्वित ठेवल्याने स्पेअरपार्ट गरम होतील. याकरीता बॅगेज स्कॅनर मशिनकरीता दोन प्लायवुडचे कॅबीन व प्रत्येक कॅबीनमध्ये एक ए.सी.मशिन बसविणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदर मशिन सुरक्षित राहून त्याची

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कार्यक्षमता अबाधित राहील. तरी बॅगेज स्कॅनर मशिनच्या सुरक्षिततेसाठी कॅबीनमध्ये एक १.५ टन क्षमतेचे ०२ नग ए.सी.बसवून मिळणेकामी संरक्षण विभागाने जा.न. / २१७A / २०११ दि.२६-०४-२०११ अन्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार दोन नग ए.सी.खरेदी करावे लागणार आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागात असलेल्या मिटींग हॉलमध्ये मा.व्यवस्थापन समिती / उपसमितीच्या सभा होत असतात. सदर विभागात ए.सी.नसल्यामुळे तेथे ए.सी.बसविणेकामी प्रत्यक्ष पाहणी करुन किती टन क्षमतेचे बसवावे लागतील याबाबत श्री साईबाबा हॉस्पीटलने अहवाल मागितला असता त्यानुसार प्रत्यक्ष पाहणी केली असता व्होल्टास कंपनीचे वॉल माऊंटेड टाईप, व्हर्टीस प्लस मॉडेल प्रत्येकी ०२ टन क्षमतेचे ०३ नग स्प्लिट ए.सी.बसवावे लागतील असा अहवाल दिलेला आहे. त्यानुसार त्यांनी उपरोक्त संदर्भ क्र.०२ अन्वये याठिकाणी २ टन क्षमतेचे ०३ नग स्प्लिट ए.सी.उपलब्ध असतील तर तातडीने बसवून मिळणेकामी मागणी केलेली आहे. परंतू सदरचे ए.सी.शिल्लक नसून नवीन ए.सी.खरेदी करावे लागणार आहे.

संरक्षण विभाग, बॅगेज स्कॅनर मशीनकरीता दोन कॅबीनमध्ये एक १.५ टन क्षमतेचे ०२ नग ए.सी. व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागात असलेल्या मिटींग हॉलमध्ये प्रत्येकी ०२ टन क्षमतेचे ०३ नग स्प्लिट ए.सी.बसविणे गरजेचे आहे. त्यासाठी ते खालीलप्रमाणे खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | ठिकाण | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | संरक्षण विभाग, बॅगेज स्कॅनर मशीनकरीता दोन कॅबीन करीता ए.सी.खरेदी. | व्होल्टास मेक, स्प्लिट टाईप, वॉल माऊंटेड एअर कंडिशनर, क्षमता :- १.५ टन, मॉडेल:-व्हर्टीस प्लस | ०२ नग. | रु.४०,०००/- | ८०,०००/- |
| ०२) | श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागात असलेल्या अर्ध्या मिटींग हॉल करीता ए.सी. खरेदी. | व्होल्टास मेक, स्प्लिट टाईप, वॉल माऊंटेड एअर कंडिशनर, क्षमता :- २ टन, मॉडेल :- व्हर्टीस प्लस | ०३ नग. | रु.४५,०००/- | १,३५,०००/- |
| | | | | **एकुण रक्कमः-** | रु.२,१५,०००/- |

उपरोक्तप्रमाणे संरक्षण विभाग, बॅगेज स्कॅनर मशीनकरीता दोन कॅबीनमध्ये व श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागात असलेल्या मिटींग हॉलमध्ये बसविणेकामी नवीन ए.सी.ची खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरचे नविन ए.सी.कोटेशन मागवून खरेदी करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संरक्षण विभाग, बॅगेज स्कॅनर मशीनकरीता दोन कॅबीनमध्ये बसविणेकामी आवश्यक असणारे ए.सी. कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली. तसेच श्री साईबाबा हॉस्पीटलमधील मध्यवर्ती औषध भांडार विभागात असलेल्या मिटींग हॉलमध्ये ए.सी. बसविणेत येऊ नये, असे ठरले.**

(कार्यवाही- विद्युत विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७७** **शिर्डी रेल्वे स्टेशनकरीता पाणीपुरवठा करणे बाबत**

**प्रस्ताव-** शिर्डी रेल्वे स्टेशन, शिर्डी यांना दैनंदिन वापरासाठी दररोज ५०,००० लिटर्स पाणी व त्यासाठी पाईपलाईन टाकुन व्यवस्था करावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

सध्या आपले पाणी पुरवठा योजनेतून पिंपळवाडी, कनकुरी या गावांना पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच आपले संस्थानचा पुर्ण परिसर व हौसींग सोसायटया, पोलीस स्टेशन कार्यालय व वसाहत, पाटबंधारे कार्यालय व वसाहत इत्यादींना पाणी पुरविले जाते. सध्याचा पाणी साठा व त्यामधून शुध्दीकरण केलेले पाणी आहे. त्यावापरासाठीच कमी पडत असुन पाणी वापरात काटकसर चालू आहे. सध्याचा दररोज पाण्याचा वापर ३५ ते ४५ लाख लिटर्स आहे. याकरीता सतत २४ तास पाणी पुरवठा पंप मशिनरी चालवावी लागत आहे. फिल्टेरेशन् प्लॅन्ट वापर सुमारे १९ वर्षापासुन चालू आहे. त्यामुळे फिल्टेरेशन् प्लॅन्टची क्षमताही कमी झाली आहे.

याकरीता वाढीव पाणी पुरवठा योजना तयार करणे बाबत कार्यवाही चालू आहे. परंतू त्यास विलंब लागेल आपला संस्थानचा वाढता परिसर व वाढती श्री साईभक्तांची गर्दी याचा विचार करता रेल्वे स्टेशनला पाणी दररोज ५० हजार लिटर्स पाणी पुरविणे शक्य नाही. वाढीव पाणी पुरवठा योजना पुर्ण झाले नंतर पाणी देणे शक्य होईल. तरी शिर्डी रेल्वे स्टेशनला पाणी पुरवावे किंवा कसे ? याबाबत योग्य तो आदेश होणेसाठी सविनय सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.४१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मध्य रेल्वे,सोलापूर विभाग/अहमदनगर कार्यालय यांचेकडून साईनगर शिरडी रेलवे स्टेशन करीता दररोज अंदाजे ५०,००० लिटर्स पाण्याची मागणी करणेत आलेली आहे.तथापी संस्थानच्या पाणीपुरवठा तलावाची क्षमता व सस्थानला भविष्यात लागणारी पाण्याची गरज विचारात घेता ,तूर्त मध्य रेल्वे ,साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशन यांना त्यांनी मागणी केलेल्या मागणीच्या २० टक्के किंवा जास्तीत जास्त १०,००० लिटर्स पाणी पुरविण्यात यावे. सदर पाणीपुरवठा करीता टाकावी लागणारी उचित क्षमतेची जलवाहिनी ,त्यासाठी करावी लागणारी खोदाई आदि,पाणीमापण मीटर व इतर अनुषंगिक साहित्याचा तसेच करानाम्याचा सर्व खर्च मध्य रेल्वेने करावा .तसेच मध्य रेल्वे यांचेकडून साईनगर शिर्डी रेल्वे स्टेशनला करण्यात येणारा पाणी पुरवठयाचे बिल शासकिय नियम व दराप्रमाणे वार्षिक पध्दतीने वसूल करणेत यावे आणि याकामी प्रथमतः ५ वर्षासाठी करारनामा करणेत यावा.पाच वर्षानतर संस्थानकडे असणा-या पाण्याची उपलब्धता व गरज लक्षात घेऊन करारनाम्याचे नुतनीकरण विहीत पध्दतीने मान्यता घेउन करणेत यावे,असे ठरले.** ( कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७८** **इलेक्ट्रीक मोटारींचे रिवायडींग करणेकरीता खरेदी करावयाच्या मटेरिअलची सन २०११-१२ करीता वार्षिक दर मंजूर करणे बाबत**

**प्रस्ताव-** पाणी पुरवठा विभागाकडे संस्थान परिसराकरीता पाणी पुरवठा करणेसाठी व विविध इमारतींचे टाक्या हौद भरणेसाठी ठिकठिकाणी इले.मोटारी बसविण्यात आलेल्या आहेत. पाणी पुरवठा विभागांतर्गत अंदाजे १५० मोटारींचे रिवायडींग व मेन्टेनंस करणेचे काम करण्यात येते. तसेच प्रसादालय विभाग, बगीचा विभाग, आय.टी.आय विभाग, हॉस्पिटल विभाग अशा इतर विभागाकडील इले.मोटारींचे रिवायडींग सुध्दा पाणी पुरवठा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदरच्या मोटारींचे रिवायडींग करणेकरीता त्यासाठी आवश्यक मटेरियल खरेदी करण्यात येवून मोटारींचे रिवायडींग करण्यात येते.

प्रत्येक वेळी वेगवेगळया साईजची वाईडिंग वायर असलेली मोटार वायडींग व मेन्टेनंस करण्यासाठी येते. त्यामुळे पुर्ण वर्षाची वार्षिक खरेदी करता येत नाही. विशिष्ट गेजची वायडींग वायर खरेदी केल्यास तसेच तिचा वापर न झाल्यास ती वायर तशीच शिल्लक राहते. तसेच प्रत्येक वेळी मंजुरी घेणे, कोटेशन मागविणे, आलेल्या कोटेशनवर कार्यवाही करणे व नंतर ऑर्डर देणे यामध्ये बराच कालावधी निघून जातो. प्रसादालय विभागातील व पाणी पुरवठा विभागातील काम बंद ठेवता येत नाही. यामुळे कामात अडथळे निर्माण होतात.

याकरीता मोटारींचे वायडींग करीता आवश्यक असलेले मटेरियल खरेदी करणेसाठी संबंधीत दुकानदारांकडून मटेरियलचे वार्षिक भाव घेवून त्यांना स्टँडिंग ऑर्डर दिल्यास प्रत्येक वेळी मंजुरी घेवून मटेरियल खरेदी करणेसाठी वेळ जाणार नाही व कामात अडथळे येणार नाही.

सन २०१०-२०११ करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४-०७-२०१० चे सभेत विषय नं.५४, निर्णय क्रं.५७५अन्वये मान्यता घेवून रिवायडींग मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन मागवून व निम्नतर दराचे कोटेशनधारक में.महेश इलेक्ट्रिकल्स, कोपरगांव यांना ऑर्डर देण्यात आलेली होती.

सन २०१०-२०११ मध्ये में.महेश इलेक्ट्रिकल्स,कोपरंगाव यांचेकडुन वेळोवेळी एकुण रुपये २४,४००/- मात्रचे आपणास आवश्यक मटेरियल आणण्यात आलेले आहे.

तरी यावर्षी सन २०११-२०१२ करीता इले.मोटारींचे रिवायडींगसाठी लागणारे मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन बोलविण्यास व न्युनतम कोटेशन धारकास मटेरियल पुरविणेस वार्षिक ऑर्डर देणेसाठी सदरच्या विषयास मंजुरी मिळावी ही विनंती.

याकरीता येणारा खर्च पाणी पुरवठा विभाग मशिनरी दुरुस्ती देखभाल खर्च सन २०११-२०१२ चे बजेटमध्ये रु.८८,०००/- मात्रचे रकमेची तरतूद करण्यात आलली आहे.

**निर्णय क्र.४१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणी पुरवठा विभागासाठी सन २०११-२०१२ करीता इले.मोटारींचे रिवायडींगसाठी लागणारे मटेरियल एक वर्षाकरीता पुरविणेसाठी कोटेशन मागवून न्युनतम दराने खरेदी करणेस मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभाग प्रमुख)

---

**विषय नं.७९** **स्टीम बॉयलरकरीता फोटोसेल व क्वाईल खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयात दर्‌रोज सरासरी सुमारे ३०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. तसेच गर्दीचे कालावधीमध्ये ७०,००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेतात. श्री साई प्रसादालयात दैनंदिन प्रसाद भोजन तयार करणेकरीता लागणा-या वाफेची निर्मीती सोलर प्रकल्पाद्वारे तसेच थरमॅक्स कंपनीच्या बॉयलरद्वारे केली जाते. सन १९९८ पासून स्टिम निर्मीतीकरीता थरमॅक्सचा एक बॉयलर ४०० कि.ग्रॅ/तास क्षमतेचा तसेच जानेवारी २००९ पासून ८५० क्रि.ग्रॅ./तास क्षमतेचा दुसरा बॉयलर कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. तेंव्हापासून आजपर्यंत बॉयलर सुरळीत कार्यान्वीत आहे. बॉयलर व्यवस्थीत चालू

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



रहाणेसाठी थर्मेक्स कंपनीचे सर्व्हीस डिलर मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना गेल्या सहा वर्षापासून बॉयलर सर्व्हीसींगचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे.

दि.२५.३.२०११ रोजी RXD- ८५० स्टीम बॉयलरची क्वाईल लिकेज झाली होती. क्वाईल लिकेज झालेमुळे बॉयलर बंद झाला होता. तातडीने क्वाईल वेल्डींग करुन लिकेज बंद केलेले आहे. यापुर्वी दोन ते तीन वेळेस क्वाईल लिकेज झालेने वेल्डीग केलेले आहे. सदरील क्वाईल विक झालेमुळे वारंवार लिकेज होत आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन वापराने फोटो सेल खराब होऊन स्टिम बॉयलर बंद राहु शकतो. त्यामुळे क्वाईल लिकेज होऊन व फोटो सेल अभावी स्टिम बॉयलर बंद राहू नये म्हणुन नविन क्वाईल व फोटो सेल खरेदी करणे आवश्यक आहे. फोटो सेल व क्वाईल स्पेअर ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कारण डिलर मार्फत थर्मेक्स प्रा. लि. कंपनीस ऑर्डर दिल्यानंतरही अंदाजे दोन महिने कालावधी स्पेअरपार्ट मिळणेस लागतो.

तसेच थर्मेक्स बॉयलरचे स्पेअरपार्ट सर्व्हीस डिलर मार्फतच मिळत असलेने व इतरत्र बाजारात मिळत नसलेमुळे अचानक बॉयलर ब्रेकडाऊन झाल्यास लागणा-या स्पेअरपार्ट अभावी बॉयलर बंद राहून प्रसादालयातील प्रसादभोजनेच्या सेवेवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे क्वाईल संदर्भात मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांना दि. २६.३.२०११ रोजी दुरध्वनीव्दारे दरपत्रक पाठविणेस कळविणेत आलेले होते. त्यानुसार दिनांक १२.४.२०११ रोजी त्यांचेकडुन दरपत्रक प्राप्त झालेले आहे. फोटोसेल दरासंदर्भात दि. ११.४.२०११ रोजी मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद (श्री हाके) यांचेशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता त्यांनी सुमारे १ वर्ष पुर्वी (दि.१२.४.२०१०) पुरवठा केलेल्या दरानेच आता फोटोसेलचा पुरवठा करु असे सांगितले. त्यानुसार त्यांचे दरपत्रकानुसार खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कोटेशन नं. / दिनांक | कोड नंबर | स्पेअरपार्टचे नाव | नग | दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २४२७/ १२.४.२०११ | ८६०३११२४०० | Photoresistor QRA१०C | ०१ | २४०५३ | २४०५३ |
| | | | Excise @१०.२४% | | | २४६३.०३ |
| | | | M. Vat @१२.५% | | | ३००६.६३ |
| | | | Packing & forward ३% | | | ७२१.५९ |
| | | | **Total =** | | | **३०२४४.२५** |
| २. | २८६०/२६.३.२०११ | PGRX२६२१२२ | Coil For Rxd-८५० | ०१ | १२३८१३ | १२३८१३.०० |
| | | | M. Vat @१२.५% | | | १५४७६.६३ |
| | | | Packing & forward@४ % | | | ४९५२.५२ |
| | | | Freight | | | ५५००.०० |
| | | | **Total =** | | | **१४९७४२.१५** |
| | | | **Total (१+२) =** | | | **१,७९,९८६.००** |

(अक्षरी रुपये एक लाख एकोणऐंशी हजार नऊशे शहाऐंशी मात्र.)

वरीलप्रमाणे फोटो सेल व क्वाईल मे. मॅक्झीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करता येतील.

तरी वरीलप्रमाणे स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,७९,९८६/-(अक्षरी रुपये एका लाख एकोणऐंशी हजार नऊशे शहाऐंशी मात्र) चे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे फोटोसेल व क्वॉईल स्पेअरपार्ट मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,७९,९८६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय)

---

**विषय नं.८०** **इंडियन ऑईल कॉर्पो.लि. यांचेकडील एल.पी.गॅस खरेदीकामी ॲडव्हान्स रक्कमेत वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.१३/०३/२००७ चे सभेतील निर्णय क्र.२४९ (९) व मा.व्यवस्थापन समिती दि.११/०८/२००७ चे सभेतील निर्णय क्रं.६८४ चे अन्वये श्री साईप्रसादालयामध्ये प्रसादभोजन, मोतीचूर लाडू व बर्फी, नाष्टा पॅकेट तयार करणेसाठी भारत पेट्रोलियम कार्पो.लि.,इंडिया ऑईल कार्पो.लि. व हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. या कंपन्यापैकी गॅस दरात सुट देतील त्यांचेकडून एल.पी.गॅस खरेदीस व त्याकामी एक टँकर गॅसचे रक्कमेएवढी रक्कम ॲडव्हान्स म्हणून देणेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार प्रसादालयाकडील दि.२८/११/२००८ चे मंजूर टिपणीनुसार इंडियन ऑईल कार्पो.लि.याना रक्कम रु.७,००,०००/- एवढी रक्कम ॲडव्हान्स म्हणून देण्यात आलेली आहे.

श्री साई प्रसादालयामध्ये दररोज सरासरी ३०,००० साईभक्त प्रसादभोजन घेतात. गर्दीचे प्रमाणानूसार सुमारे २२,००० ते ६५,००० साईभक्त प्रसादभोजन घेतात. त्याप्रमाणे दररोज सरासरी ६५०० अन्नपाकिटे व २५ क्विंटल साखरेचे लाडू तयार करण्यात येतात. गर्दीचे प्रमाणानुसार ५,५०० ते १२,००० अन्नपाकिटे व २५ ते ५० क्विंटल साखरेचे लाडू तयार करावे लागतात. उपरोक्तकामी दररोज सुमारे १००० ते २००० किलो. एल.पी.गॅसचा वापर होतो. त्यानुसार प्रत्येक ६-७ दिवसानंतर गॅसचा टँकर(११टन क्षमता असलेला) मागवावा लागतो. पूर्वी गर्दी कमी असल्याने प्रतीदिनी ८०० ते १२०० किलो गॅस खर्च

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



होत असल्याो सुमारे १०-१२ दिवसाांतर गॅसचा टँकर मागविणेत येत असे.परंतु भक्तांचे गर्दीचे प्रमाण वाढते असलेमुळे ६-७ दिवसानंतर गॅस टँकर मागवावा लागतो.

गॅस टँकर आल्यानंतर गॅस बीलाची दप्तरी नोंद घेणे, प्रशासकिय मान्यता घेऊन बीले लेखाशाखेत पाठविणे,लेखाशाखेकडून बीलाची तपासणी होऊन बीलाची रक्कम R.T.G.S द्वारे इंडिया ऑईल कार्पो.लि. वर्ग करणेस सुमारे ८-१० दिवसाचा कालावधी जातो. त्यादरम्यान भक्तांच्या गर्दीत वाढ झाल्यांतर गॅस टँकरची मागणी करावी लागल्यास व पूर्वीचे बीलाचे रक्कम कंपीकडे वर्ग झालेली न-सल्यास टँकर भरुन मिळत नाही. गॅसचा साठा मर्यादेपेक्षा कमी झाल्यास गॅसचा प्रेशर कमी होतो.त्यामुळे गर्दीच्या वेळी किचनमध्ये मोठया प्रमाणात अडचणी येतात. त्यामुळे दरवेळेस बीलाची रक्कम कंपनीकडे वर्ग करण्यास घाई करावी लागते. घाई- गर्दीत बीलाची रक्कम वर्ग करतांना चुक होऊ नये म्हणून आणखी एक टँकर गॅसची रक्कम रु.७,००,०००/- (रु.सात लाख मात्र) इडियां ऑईल कार्पो.लि.या कंपनीकडे ॲडव्हान्स म्हणून ठेवणे गरजेचे आहे.

तरी इंडियन ऑईल कार्पो.लि.यांचेकडील एल.पी.गॅस खरेदीकामी ॲडव्हान्स रक्कमेत वाढ करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४१७ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.८१ जुन्या प्रसादालयाकडील ओपन गॅस प्लॅन्टचे स्थलांतर तूर्त स्थगित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन १९८८-८९ पासून जुन्या प्रसादालयामध्ये इंधन म्हणुन एल.पी. गॅसचा वापर करणेत येत होता. एल. पी. गॅसचा साठा करणेसाठी प्रत्येकी १० टन क्षमतेच्या दोन टाक्या बसविण्यात आलेल्या आहेत.

०८ जानेवारी २००९ रोजी प्रसादालय नवीन जागेत स्थलांतर झाल्यानंतर जुन्या प्रसादालयाची व एल. पी. गॅस प्लॅन्टची जागा भविष्यात इतर विकास कामासाठी उपयोगात येणार असल्याने एल.पी.गॅस प्लॅन्ट साईप्रसादालयात स्थलांतर करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दिनांक १०/१०/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ८१४ अन्वये जा. नं. एसएसएस/वशि/प्रसाद/१०८८७/१० दि.०१/१२/२०११ नूसार श्री तपन सरकार द्वारा मे. टिस्टा कन्स्ट्रक्शन प्रा. लि. नोएडा यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेत आलेली आहे. सल्लागार यांनी सदर टँकची तपासणी करुन दिनांक २५/७/२०१० चे लेखी अभिप्रायामध्ये सदर स्टोअरेज टँक तांत्रिक दृष्टया भक्कम असुन आणखी १५-२० वर्ष वापर करता येईल असे कळविले होते. सल्लागार यांच्या अभिप्रायानूसार मा.व्यवस्थापन समिती दि.१३.२.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५५ ने जुन्या प्रसादालयातील एल. पी. गॅस प्लॅन्ट नविन श्री साईप्रसादालयाकडे स्थलांतर करणेस व त्याकामी अंदाजे रक्कम रु. ३५,००,०००/- पर्यंतच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

परंतु दिवसेंदिवस साईभक्तांचे गर्दीचे प्रमाणात वाढ होत असल्याने भक्तांना गर्दीचे प्रमाणात आवश्यक प्रसाद लाडू तयार करणे एका ठेकेदारास शक्य होत नसल्यामुळे मा.व्यवस्थापन समिती दिनांक २६/०३/२०११ चे सभेतील निर्णय क्रं. ५५ चे मंजूरीनूसार मोतीचुर लाडु प्रसाद व बर्फी बनविणेकामी दोन ठेकेदार यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. दोन ठेकेदार यांच्या नियुक्तीमुळे जुने व नविन प्रसादालयामधील किचनचा वापर करणेत येत आहे. नविन प्रसादलयातील लाडु किचन एका ठेकेदारास व जुन्या प्रसादालयातील लाडु किचन दुसऱ्या ठेकेदारास वापरास देण्यात आलेला आहे. त्यामुळे जुन्या प्रसादालयातील लाडु किचनकरीता जुना गॅस प्लॅन्टचा वापर प्रसाद लाडू तयार करणेसाठी होत असल्याने व पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे तुर्त गॅस प्लॅन्ट स्थंलातर करता येणार नाही.

तरी जोपर्यंत मोतीचूर लाडू प्रसाद बनविणेसाठी नविन स्वतंत्र किचन व अनुषंगिक व्यवस्था होत नाही तोपर्यंत जुन्या प्रसादालयाकडील एल.पी.गॅस प्लँन्ट श्री साई प्रसादालयाकडे स्थलांतर करता येणार नसल्याने तुर्त गॅस प्लँन्ट स्थलांतर स्थगित ठेवणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.८२ प्लास्टीक पॅलेट ( स्टँण्ड) व परफोरेटेड ट्रे खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साई प्रसादालयामध्ये दर्‌रोज सरासरी ३०,००० साईभक्त प्रसादभोजन घेत असून दर्‌रोज सुमारे २० ते २५ क्विंटल साखरेचे ९४,००० ते १,१७,५०० मोतीचूर लाडू व ६५०० अन्नपाकीटे तयार करुन विक्रीसाठी देण्यात येतात. उपरोक्तकामी वापरण्यात येणारा किराणा माल (उदा. गहु,तांदुळ, डाळी, तेल, तुप, साखर, धान्य- कडधान्य वगैरे) ठेवणेसाठी लोखंडी व प्लास्टीक पॅलेटचा (स्टॅण्ड) वापर करण्यात येतो. अन्न औषध प्रशासन व आय.एस.ओ. ९००१-२००८ च्या नियम/अटीनूसार कोणताही किराणा माल थेट जमिनीवर न ठेवता पॅलेटवर ठेवणे बंधनकारक आहे. त्यानूसार दि.२०/०२/२००२ रोजी ४५ लोखंडी स्टॅण्ड व दिनांक २९/०९/२००७ रोजी ७५ नग प्लास्टीक पॅलेटस्‌ खरेदी केलेले आहेत. सदर पॅलेटस्‌ कमी पडतात. त्यामुळे काही किराणा माल थेट जमिनीवर ठेवावा लागतो. किराणा माल थेट जमिनीवर न ठेवता

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



पॅलेटवर ठेवणेकामी आणखी ७५ पॅलेटस्‌ची आवश्यकता आहे. त्याकामी प्रती नगास अंदाजे रु.२७५०/- प्रमाणे रु.२,०६,२५०/- खर्च अपेक्षित आहे.

दररोज सरासरी २० ते २५ क्विंटल साखरेचे ९४,००० ते १,१७,५०० लाडू तयार करण्यात येतात. सदर लाडू वळल्यानंतर परफोरेटेड ट्रे मध्ये ठेवण्यात येतात. त्याकामी सन २००७ मध्ये ४०० नग प्लास्टीकचे परफोरेटेड ट्रे खरेदी करण्यात आलेले आहेत. ३१ मार्च पर्यंत लाडू तयार करणेकामी १ ठेकेदार असे. त्यामुळे त्यांना सदर ४०० ट्रे पुरेसे होते. आता १ एप्रिल २०११ पासून लाडू तयार करणेसाठी २ ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर ४०० ट्रे अपुरे पडतात. ट्रे अपुरे असल्यामुळे ट्रे मधील ओले लाडू ताडपत्रीवर टाकल्यास लाडूचा आकार गोल रहात नाही. सबब आणखी २०० ट्रे ची आवश्यकता आहे. त्याकामी प्रती नगास अंदाजे रु.३००/- प्रमाणे रु.६०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे किराणामाल (धान्य,कडधान्य,) ठेवणेसाठी प्लास्टीक पॅलेटस्‌ (स्टॅण्ड) नग ७५ व लाडू वळल्यानंतर ठेवणेसाठी प्लास्टीक परफोरेटेड ट्रे नग २०० खरेदी करणेस व अनुक्रमे रु. २,०६,२५०/- + रु.६०,०००/- = २,६६,२५०/- चे खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे किराणामाल (धान्य,कडधान्य,) ठेवणेसाठी प्लास्टीक पॅलेटस्‌ (स्टॅण्ड) ७५नग व लाडू वळल्यानंतर ठेवणेसाठी प्लास्टीक परफोरेटेड ट्रे २०० नग खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२,६६,२५०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

**विषय नं.८३** **जादा खरेदी केलेल्या हरबऱ्यास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१३.०२.२०११ चे सभेतील निर्णयानुसार सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरीता प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक असणारा गहू, हरबरा, मोहरी, मेथी, सफेद तिळ व भाजीपाला इत्यादीची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव/राहाता इ. ठिकाणच्या मोंढयावरुन मा.विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये खालील परिमाणाप्रमाणे खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रु.३,०१,३७,०००/- मात्रस तत्वतः मान्यता मिळालेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| गहू - | ११००० क्विंटल | मेथी- | २.०० क्विंटल |
| हरबरा- | १००० क्विंटल | सफेद तीळ- | १.०० क्विंटल |
| खिसमिस- | १०० क्विंटल | मोहरी- | ४०.०० क्विंटल |
| भाजीपाला - | आवश्यकतेनुसार | | |

त्यानुसार दि.०७.०४.२०११ रोजी राहाता /कोपरगांव कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गहु, हरबरा खरेदी चालु करण्यात आली असून खालीलप्रमाणे माल खरेदी करण्यात आलेला आहे.

| | **गहू (क्विं.)** | **हरबरा(क्विं.)** | **मोहरी(क्विं.)** | **मेथी(क्विं.)** |
|---|---|---|---|---|
| राहाता मार्केट यार्ड | ६४१८.०३ | ८३४.०४ | -- | --- |
| कोपरगावं मार्केट यार्ड | ३९७१.९४ | ४२१.९६ | ०.३३ | --- |
| **एकूण खरेदी** | १०३८९.९७ | १२५६.०० | ०.३३ | --- |

मार्केट यार्डवर मेथीची आवक न झाल्याने मेथी खरेदी करता आली नाही. तसेच मोहरी फक्त ३३ किलो उपलब्ध झाली. वार्षिक खरेदी टेंडरमध्ये मोहरीचा समावेश करण्यात आलेला आहे. हरबरा मुळ मंजुरी १००० क्विंटलची असून त्याची २५६ क्विंटल जादा खरेदी झालेली आहे. सध्या दिवसेंदिवस साईभक्तांची वाढती गर्दी लक्षात घेता, तसेच बऱ्याच वेळा हिरावा भाजीपाला आवश्यकतेप्रमाणे उपलब्ध नसल्यामुळे हरबऱ्याचा साठा असणे गरजेचे आहे.

तरी जादा खरेदी केलेला २५६ क्विंटल हरबरा खरेदीस व त्याकामी प्रति क्विंटल रु.२३००/- नुसार ५,८८,८००/- मात्र आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस व सदरचा खर्च प्रसादालय खर्च खाते वर्ग करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, जादा खरेदी केलेला २५६ क्विंटल हरबरा खरेदीस व त्याकामी प्रति क्विंटल रु.२३००/- नुसार ५,८८,८००/- मात्र आलेल्या खर्चास व सदरचा खर्च प्रसादालय खर्च खाते वर्ग करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

---

**विषय नं. ८४** **पारले जी कंपनीचे बिस्कीटे खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ प्रसादालय व कॅन्टीन विभाग वार्षिक किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.०४.२०११ रोजीचे सभेत पुरवठाधारकांशी चर्चा व वाटाघाटी करुन निर्णय होऊन न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आले आहेत. पैकी कॅन्टीन विभागासाठी आवश्यक बिस्कीटांबाबत खालील प्रमाणे चर्चा व वाटाघाटी करण्यात आली होती.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| ०१ | बिस्कीटे - पारले/ब्रिटानीया/सनफिस्ट ग्लुकोज व इतर | | |
|---|---|---|---|
| ०१. | अग्रवाल एजन्सी, साकुरी | Parle | २% Discount against Company Rate + १२.५% Vat |
| ०२. | दगडूराम पिरचंद, श्रीरामपुर | Britania | **२% Discount against Company Rate + १२.५% Vat** |
| ०३. | कोठारी ब्रदर्स, कोपरगांव | Sunfeast | **३% Discount against Company Rate + १२.५% Vat** |
| ०४. | वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा | Parle | **३% Discount against Company Rate + १२.५% Vat** |

उपरोक्त प्रमाणे चर्चा व वाटाघाटीनुसार पारले कंपनीचे बिस्कीटांसाठी मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांनी कंपनी दरावर ३% सुट देऊ केल्यामुळे पारले कंपनीचे बिस्कीटे पुरविणेबाबत मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांना इकडील जा.नं.७२८/०३.०५.२०११ नुसार अशंतः बिस्कीटे पुरविणेबाबत पुरवठा आदेश देणेत आला आहे.

परंतू मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांनी त्यांचेकडील दि.०६.०५.२०११ रोजीचे पत्रान्वये मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी हे शिर्डी हद्दीतील पारले-जी बिस्कीटाचे अधिकृत विक्रेते असल्यामुळे त्यांना सदरचा पुरवठा आदेश देणेत यावा असे कळविले आहे.

मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी हे द्वितीय न्युनतमधारक असल्याने त्यांना पुरवठा आदेश देण्याचे झाल्यास मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेऊन संस्थानची दिशाभूल करुन बिस्कीटे पुरविणेस नकार दिल्यामुळे निविदेमधील शर्त व अट क्र.२७ तसेच पुरवठा आदेशातील शर्त व अट क्र.१३ नुसार निविदेसोबत भरलेली बयाणा रक्कम संस्थान खाती जमा करुन त्यांचे नावे काळ्या यादीत समाविष्ठ करता येईल. तसेच मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी हे गेली ०२ वर्षापासून विनातक्रार व मागणीनुसार पारले कंपनीचे बिस्कीटांचा पुरवठा करत होते.

तरी मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांना पारले कंपनीचे बिस्कीटे पुरविणेबाबत दिलेला पुरवठा आदेश रद्द करुन द्वितीय न्युनतमधारक मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांना देणेस तसेच मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, पारनेर यांनी माल पुरविण्यास नकार दिल्यामुळे त्यांची निविदेसोबत भरलेल्या बयाणा रक्कमेपैकी अशंतः बयाणा रक्कम संस्थान खाती जमा करुन त्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४२१** **मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, सुपा यांना पारले कंपनीचे बिस्कीटे पुरविणेबाबत दिलेला पुरवठा आदेश रद्द करुन द्वितीय न्युनतमधारक मे.अग्रवाल एजन्सी, साकुरी यांना देणेस तसेच मे.वरद विनायक इंटरप्रायझेस, पारनेर यांनी माल पुरविण्यास नकार दिल्यामुळे त्यांची निविदेसोबत भरलेल्या बयाणा रक्कमेपैकी ५%रक्कम बयाणा रक्कम संस्थान खाती जमा करुन त्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ठ करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**विषय नं. ८५** **सन २०११-१२वार्षिक जनरल व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाई बाबत**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ मध्ये संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक छापील स्टेशनरीकामी विभागांकडून माहिती मागविणेत आलेली होती.

त्यानुसार दि.३१.०५.२०११ अन्वये विविध विभागांनी केलेल्या मागणीबाबत परिशिष्ट सोबत जोडलेले आहे. त्यानुसार विभागवार छपाई करावयाचे जनरल व संगणक स्टेशनरीकामी खालीलप्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| **अ.न** | **विभागाचे नांव** | **जनरल स्टेशनरी छपाई खर्च** | **प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरी छपाई खर्च** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासन शाखा | १,६३,७५०/- | - | १,६३,७५०/- |
| ०२. | लेखाशाखा | २,२०,०५०/- | २५,८७,५००/- | २८,०७,५५०/- |
| ०३. | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ७९,१००/- | १,२५,०००/- | २,०४,१००/- |
| ०४. | नविन भक्तनिवासस्थान विभाग | १,८७,६००/- | २,७०,०००/- | ४,५७,६००/- |
| ०५. | द्वारावती विभाग | ४३,९००/- | ७५,०००/- | १,१८,९००/- |
| ०६. | वाहन विभाग | १४,६५०/- | - | १४,६५०/- |
| ०७. | विदयुत विभाग | ५२,०००/- | - | ५२,०००/- |
| ०८. | खरेदी विभाग | ७,०००/- | - | ७,०००/- |
| ०९. | भांडार विभाग | ५,०००/- | - | ५,०००/- |
| १०. | प्रसादालय विभाग | २,६२,५००/- | ३,५४,२४०/- | ६,१६,७४०/- |
| ११. | कॅंटीन विभाग | १६,७०,०००/- | ३,००,०००/- | १९,७०,०००/- |
| १२. | ध्वनीक्षेपण विभाग | २,२००/- | - | २,२००/- |
| १३. | सरंक्षण विभाग | ४,६००/- | - | ४,६००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | जनसंपर्क कार्यालय | २१,१५०/- | - | २१,१५०/- |
| १५. | आरोग्य विभाग | १,५००/- | - | १,५००/- |
| १६. | पाणी पुरवठा विभाग | १,७००/- | - | १,७००/- |
| १७. | जनरल छपाई | ८३,५००/- | - | ८३,५००/- |
| | **एकुण रक्कम रुपये** | **२८,२०,२००/-** | **३७,११,७४०/-** | **६५,३१,९४०/-** |
| | | | **पुर्णांकित अंदाजे एकुण रक्कम रु.** | **६५,५०,०००/-** |

उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु.६५,५०,.०००/- मात्र खर्च येईल. सदरचा खर्च हा अंदाजे नमुद केलेला आहे. खर्चास तत्वत: मान्यता मिळालेनंतर जनरल व प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरी छपाईसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागणी करुन छपाई करुन घेता येईल. तरी वरीलप्रमाणे छपाईस व त्याकामी येणारे खर्चास तत्वत:मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. सन २०११-१२ वार्षिक जनरल व प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.८६** **गावरान तूप खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०११-१२ करिता संस्थान प्रसादालयासाठी खरेदी करणेत येत असलेले गावरान तुपाचे नमुने मा.व्य.समितीचे दि.२९.०३.२०११ रोजीचे सभेत निवडण्यात आले आहेत. तसेच दि.१०.०४.२०११ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेत गावरान तुपाकरिता निवडलेल्या नमुनेधारकांशी मा.विश्वस्तांनी दरांबाबत चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी मुळ दरमध्ये सुट देऊ केलेली आहे.

सदरचे नमुने रासायनिक तपासणीकरिता जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणी करिता पाठविले होते. सदर गावरान तुपाबाबतचा मा.जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेचा अहवाल दि.११.०४.२०११ रोजीचा प्राप्त झालेला आहे. तसेच तसेच डॉ..आर.डी.कोकणे, प्राध्यापक, मुंबई व्हेटर्नरी कॉलेज, यांचेकडे जा.नं.एसएसएस/खरेदी/४९०/२०११ दि.२३.०४.२०११ अन्वये तुपाचे नमुने लॅब तपासणीस पाठविले होते त्यांचा दि.२५.०४.२०११ व २९.०४.२०११ चा अहवाल प्राप्त झाला आहे.

तसेच प्राप्त गावरान तुपाच्या नमुन्यांमधील तुप प्रसादालय विभागास वापरासाठी देऊन त्यापासून समप्रमाणात साहित्य वापरुन लाडू तयार करण्यात आले. सदरचे लाडू मा.विश्वस्तांना तसेच मा.कार्यकारी अधिकारी सो., मा.उप कार्यकारी अधिकारी सो., सर्व प्रशासकिय अधिकारी सो. यांना अभिप्रायासाठी देण्यात आले होते. त्याबाबत त्यांनी चवी नुसार विगतवारी करुन क्रमवारी नमुद करुन अहवाल दिलेले आहेत.

तद्नंतर दि.२७.०५.२०११ रोजी स्थानिक विश्वस्त यांनी वरीलप्रमाणे प्रयोगशाळेंचे अहवाल व लाडूंच्या चवींचा अहवाल याची पाहणी करुन मे.प्रभात डेअरी, श्रीरामपुर व मे.बाफणा बजार, नाशिक यांचेशी सायंकाळी ०४.०० वा. संस्थानचे साईनिवास मिटींग कक्षात चर्चा केली. चर्चेस खालील मा.विश्वस्त, अधिकारी उपस्थित होते.

१. मा.श्री.एकनाथराव गोंदकर सो. — विश्वस्त
२. मा.श्री.अशोकराव खांबेकर सो. — विश्वस्त
३. मा.डॉ.यशवंतराव माने — उप कार्यकारी अधिकारी
४. मा.श्री.बी.डी.साबळे — प्रशासकीय अधिकारी
५. श्री.आर.व्ही.जोशी — लिपीक टंकलेखक, खरेदी विभाग

मा.विश्वस्तांच्या उपस्थितीमध्ये उपरोक्तप्रमाणे पुरवठाधारकांशी त्यांचे उत्पादन योग्यता, क्षमता इ.बाबत सविस्तर चर्चा करुन त्यांचेशी दरांबाबत पुन्हा चर्चा/वाटाघाटी करण्यात आली. चर्चेत वरीलप्रमाणे दोन्ही पुरवठाधारकांनी दरांबाबत व कालावधीबाबत पत्र दिलेले आहे.

पुर्वीचे दर व चर्चेअंती दिलेले दरपत्रकांची माहिती खालीलप्रमाणे :-

| अ. क्र | पुरवठाधारकाचे नांव | तुपाचे ब्रॅण्ड | निविदेमध्ये दिलेला दर (प्रति क्विंटल) | दि.१०.०४.११ रोजी देऊ केलेला दर (प्रति क्विंटल) | दि.२७.०५.११ रोजी देऊ केलेला दर (प्रति क्विंटल) | पुरवठा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | मे.प्रभात डेअरी, श्रीरामपुर | प्रभात | २६,०००/- + ५% व्हॅट | २५,५००/- + ५% व्हॅट | २७,०००/- + ५ % व्हॅट | नोव्हें.-११ पावेतो |
| ०२. | मे.बाफणा बजार, नाशिक | हटसन | २९,१००/- + ५% व्हॅट | २७,१००/- + ५% व्हॅट | २७,०००/- + ५% व्हॅट | मार्च-१२ पावेतो |

उपरोक्तप्रमाणे चर्चा व वाटाघाटी केल्यानंतर दोन्ही पुरवठाधारकांनी प्रति क्विंटल रु.२७,०००/- + ५% व्हॅट या दराने गावरान तुप पुरविण्याचे मान्य केल्यामुळे, तसेच दि.२१.०५.२०११ रोजी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मा.विश्वस्तांनी मे.प्रभात डेअरी, श्रीरामपुर येथे समक्ष जाऊन पाहणी केली असून , तसेच मे.बाफणा बजार, नाशिक यांनी त्यांचा पुरवठा कालावधी हा मार्च-२०११ अखेर संपलेला असतांना देखील केवळ साईभक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून मागील मान्य दरातच आजपावेतो हटसन गावरान तुपाचा पुरवठा विनातक्रार केल्याने व जिल्हा प्रयोगशाळा अहमदनगर यांचेकडील गावरान तुप तपासणी अहवाल, मा.विश्वस्तांनी लाडूच्या चवीची दिलेली गुणवत्ता व पुरवठाधारकांनी देऊ केलेले दर या सर्व घटकांचा विचार करुन दोन्ही पुरवठाधारक वेळेवर व ताजा माल पुरविणार असल्याने दोन्ही पुरवठाधारकांना सम प्रमाणात तुपाचा पुरवठा आदेश देणेत यावा तसेच मे.बाफणा बजार, नाशिक हे मागील वर्षी हटसन कंपनीचे तुप पुरवित असून त्या तुपापासून बनविलेले लाडूचेबाबत कुणा भक्ताची तक्रार नाही. म्हणजेच हटसन ब्रॅण्ड तुपाची प्रतवारी चांगली असल्याने व कान्हा ब्रॅण्डचे तुप व हटसन ब्रॅण्डचे तुप यांचा दर एकच सांगितलेने मे.बाफना बजार, नाशिक यांचे हटसन ब्रॅण्डचे तुप घ्यावे, असे मा.विश्वस्त डॉ.गोंदकर सो. व श्री.खांबेकर सो. यांनी अभिप्राय दिले आहे.

तरी जिल्हा प्रयोगशाळा अहमदनगर यांचेकडील गावरान तुप तपासणी अहवाल, मा.विश्वस्तांनी लाडूच्या चवीची दिलेला गुणवत्ता अहवाल व पुरवठाधारकांनी देऊ केलेले दर या सर्व घटकांचा विचार करुन व मा.विश्वस्त डॉ.गोंदकर सो. व मा.विश्वस्त श्री.खांबेकर सो. यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार मे.प्रभात डेअरी, श्रीरामपुर यांचे प्रभात ब्रॅण्डचे गावरान तुप व मे.बाफणा बजार, नाशिक यांचे हटसन ब्रॅण्डचे गावरान तुप प्रति क्विंटल रु.२७,०००/- + ५% व्हॅट या दराने एकुण ३५५० क्विंटल मागणी सम प्रमाणात माहे सप्टेंबर-२०११ अखेर विभागून देणेस तसेच या कालावधी नंतर कोणत्या महिना अखेर पर्यंत कोणास पुरवठा आदेश देणेत यावा याबाबत मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, एक महिना कालावधीसाठी आवश्यक असणारे ५० टन गावरान तुप मे.प्रभात डेअरी, श्रीरामपूर यांचेकडून प्रति क्विंटल रु.२७,०००/- + ५% व्हॅट या दराने खरेदी करणेत यावे, दरम्यानचे काळात गावरान तुप पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या निविदा सादरकर्त्यांचे तुप नमुने बाजारातून खरेदी करुन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणेत यावेत व त्यानंतर अंतीम निर्णय घेणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.८७** **सिक्युरिटी सिस्टमच्या बॅगेज स्कॅनर मशिनकरीता ॲल्यूमिनियम पार्टीशन करणे बाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदीर परिसरात सेंट्रलाईज कंन्ट्रोल सिस्टम अंतर्गत मशीन शांतीनिवास इमारत दर्शनरांग गेट येथे साईभक्तांकडील साहीत्यांची तपासणी करणेकरीता दोन बॅगेज स्कॅनर मशीन बसविणेत आलेले आहेत. सदर बॅगेज स्कॅनर मशीन दर्शनरांगेत मोकळ्या जागेत असल्यामुळे दर्शन रांगेत साफ-सफाई करतांना उडणारी धुळ व बाहेरील बाजूस असलेल्या वहातूकीमुळे निर्माण होणारी धुळ यामुळे बॅगेज स्कॅनर मशीन जवळील संगणक संच या इलेक्ट्रीक वस्तूचे पॉईट लवकर खराब होऊन नादुरुस्त होण्याची शक्यता आहे. करीता सदर ठिकाणी दोन प्लायवूडचे कॅबीन तयार करुन मिळणेबाबत संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील दि. २६.०४.२०११ रोजीचे टिपणी अन्वये कळविले आहे.

सदरचे बॅग स्कॅनर मशीन बाहेरील बाजूने राहणार आहे त्यामुळे सदरची कॅबीन सुशोभित दिसण्याचे दृष्टीने ॲल्युमिनीयम केबीन तयार करुन घेणे योग्य राहील. त्यासाठी अंदाजे रु. ६७,१५८/- मात्र खर्च अपेक्षित आहे. करीता सदरचे काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेता येईल.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु. ६७,१५८/- मात्रचे खर्चास व सदरहू काम विहित पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिक्युरिटी सिस्टमच्या बॅगेज स्कॅनर मशिनकरीता ॲल्यूमिनियम पार्टीशन विहीत पध्दतीने कोटेशन मागवून करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.६७,१५८/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

---

**विषय नं.८८** **पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेली प्रकाशने किंमतीसह कमी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-२०११ या कालावधीत संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष,सदस्य,मा.कार्यकारी अधिकारी,मा उपकार्यकारी अधिकारी यांनी तसेच संस्थानअंतर्गत खात्यांचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना व वेगवेगळ्या क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीत जनसंपर्क कार्यालयामार्फत उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, सिने कलावंत, नामांकित लेखक, चावडी शताब्दी महोत्सवानिमित्त महापारायण सोहळा, साईभक्त संमेलनात मान्यवरांना भेट म्हणून खालील दर्शविल्याप्रमाणे पुस्तके/फोटो व सी.डी प्रकाशने विभागाकडून माहे १ एप्रिल २०१० ते माहे ३१ मार्च २०११ या कालावधीत मोफत देण्यात आलेले आहेत.

| कोड नं. | पुस्तकाचे नाव | भाषा | मोफत नग | छपाई दर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं. १ | श्री साई सच्चरीत्र | मराठी | ५२९४ | ७२.२८ | ३८२६५०.३२ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं..२ | श्री साई सच्चरीत्र | हिदी | ३० | २९.२० | ८७६.०० |
| पी यु बी.नं..३ | श्री साई सच्चरीत्र | इंग्रजी | १३ | २४.४२ | ३१७.४६ |
| पी यु बी.नं.४ | श्री साई सच्चरीत्र | गुजराथी | ०३ | ४३.०१ | १२९.०३ |
| पी यु बी.नं. ५ | श्री साई सच्चरीत्र | कन्नड | १ | २५.३५ | २५.३५ |
| पी यु बी.नं.६ | श्री साई सच्चरीत्र | तेलगू | ११ | ३३.७० | ३७०.७० |
| पी यु बी.नं.७ | श्री साई सच्चरीत्र | तामीळ | १२ | ४०.७६ | ४८९.१२ |
| पी यु बी.नं.९ | श्री साई चरित्र | सिंधी | ०१ | ४१.७० | ४१.७० |
| पी यु बी.नं.११ | श्री साईलीलामृत | हिंदी | ०१ | १३.६० | १३.६० |
| पी यु बी.नं. १४ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | ०१ | २.०७ | ०२.०७ |
| पी यु बी.नं. १८ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | तेलगु | २६ | ६.७५ | १७५.५० |
| पी यु बी.नं. १९ | श्री साई स्तवन मंजरी | मराठी | ५८०० | १.७५ | १०१५०.०० |
| पी यु बी.नं. २३ | चार अध्याय | मराठी | १ | ४.७५ | ०४.७५ |
| पी यु बी.नं. ३१ | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | १ | ४.९६ | ०४.९६ |
| पी यु बी.नं. ३६ | साई दी सुपरमॅन | इंग्रजी | २ | ६.४० | १२.८० |
| पी यु बी.नं. ३९ | खापर्डे डायरी | इंग्रजी | २ | ९.०० | १८.०० |
| पी यु बी.नं. ४१ | गुरुपाठाचे अभंग | मराठी | १ | २.८५ | ०२.८५ |
| पी यु बी.नं. ४३ | श्री साई सतचरित्र स्टोरी (निंबाळकर) | मराठी | ७ | ७७.०० | ५३९.०० |
| पी यु बी.नं. ४७ | श्री साई स्तवन मंजरी (झरीन) | कन्नड | १ | २.६० | ०२.६० |
| पी यु बी.नं. ४९ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती (झरीन) | इंग्रजी | ४ | १०.६५ | ४२.६० |
| पी यु बी.नं. ५३ | श्री साईबाबा ॲन इपिक | इंग्रजी | २ | ३४.९५ | ६९.९० |
| पी यु बी.नं. ५६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | हिदी | २ | ६.७८ | १३.५६ |
| पी यु बी.नं. ५९ | शिलधी | मराठी | १ | ५.५० | ०५.५० |
| पी यु बी.नं. ६० | शिकवण व तत्वज्ञान | मराठी | ५ | ११.५० | ५७.५० |
| पी यु बी.नं..६२ | श्री साई चरित्र | बंगाली | २ | ३८.५० | ७७.०० |
| पी यु बी.नं. ६३ | श्री साई महात्म्य | मराठी | १ | १२.९५ | १२.९५ |
| पी यु बी.नं. ६४ | श्री साई ललित चरित्र | मराठी | १ | ३१.५४ | ३१.५४ |
| पी यु बी.नं. ६५ | तेलगू पोथी (मनीअम्मा) | तेलगू | ६ | ७४.७२ | ४४८.३२ |
| पी यु बी.नं.७३ | एक फकीर की पाठशाला | हिदी | १ | २८.४४ | २८.४४ |
| पी यु बी.नं. ७४ | श्री साई समर्थ चरित्र | इंग्रजी | ३ | ९२.०० | २७६.०० |
| पी यु बी.नं.७९ | दैनंदिन साईबोध | गुजराथी | २४ | ६०.६० | १४५४.४० |
| पी यु बी.नं. ८० | शिकवण व तत्वज्ञान | गुजराथी | २१ | १३.३३ | २७९.९३ |
| पी यु बी.नं..८४ | जीवन | हिंदी | ५३ | ३२.०० | १६९६.०० |
| पी यु बी.नं..८५ | श्री साईचरित्र -स्टर्लिंग | इंग्रजी | १०३ | २३.३० | २३९९.९० |
| पी यु बी.नं.८६ | श्री साई सतचरित्र | नेपाळी | २ | ४८.०१ | ९६.०२ |
| पी यु बी.नं.८७ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | १ | २.९० | ०२.९० |
| | | | | **एकूण रु.** | **४०२८१८.२७** |

| पी यु बी नं. | फोटोचे नांव | आकार | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं.११३ | समाधी फोटो रंगीत | १४x२० | १ | २.६६ | ०२.६६ |
| पी यु बी.नं.१३० | पालखी फोटो | २० x २८ | १ | ५.६५ | ०५.६५ |
| पी यु बी.नं. १३१ | मुर्ती फोटो थ्रीडी | २.५ X३.५ | ३१५८ | ६.५० | २०५२७.०० |
| पी यु बी.नं.१३८ | श्री साईबाबा ॲक्रेलिक फोटो स्टॅन्डसह | १२ x १७ | ५ | ३९५.०० | १९७५.०० |
| पी यु बी.नं. १४० | श्री साईबाबा पालखी फोटो थ्रीडी | २.५ X ३.५ | ११ | ६.५० | ७१.५० |
| पी यु बी.नं. १४१ | दगडावर बसलेले बाबा फोटो थ्रीडी | २.५ X ३.५ | २५ | ६.५० | १६२.५० |
| | | | | **एकूण रु.** | **२२७४४.३१** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| पी यु बी नं. | सी.डी चे नांव | प्रकार | मोफत नग | छपाई दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| पी यु बी.नं.२०७ | साईबाबा ग्रेट संत | Com CD | ३ | २३.६३ | ७०.८९ |
| पी यु बी.नं.२०८ | साई मंदिरातील आरत्या | Vcd | ७ | ३४.१३ | २३८.९१ |
| पी यु बी.नं.२०९ | शिर्डी दर्शन | Vcd | २ | १८.२५ | ३६.५० |
| पी यु बी.नं.२१० | साई मंदिरातील आरत्या | DVD | ८ | ४५.१५ | ३६१.२० |
| पी यु बी.नं.२१४ | मंदिर आरती | MP३ | १ | १५.७५ | १५.७५ |
| | | | | **एकूण रु.** | **७२३.२५** |

| | |
|---|---|
| एकुण मोफत दिलेल्या पुस्तकांची रक्कम | **४०२८१८.२७** |
| एकुण मोफत दिलेल्या फोटोची रक्कम | **२२७४४.३१** |
| एकुण मोफत दिलेल्या सी डी रक्कम | **७२३.२५** |
| एकुण रक्कम | **४२६२८५.८३** |

उपरोक्तप्रमाणे मोफत देण्यात आलेले पुस्तके,फोटो,सी.डी. पोस्टेज स्टॅाकमधून मोफत देण्यात आलेली असल्याने त्यासाठी पुर्णांकित रक्कम रु.४२६२८६/- इतका खर्च झाला आहे. सदर खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२५ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.**(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.८९ सन २०१२ ची श्री साई दैनंदिनी (डायरी) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर) छपाई करुन विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ समितीची कर्तव्य अधिकाराबाबत कलम नं. १७ (२) ठ मध्ये खालील प्रकारे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

प.पुज्य श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार-प्रसार करणेच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी, मार्फत श्री साई दैनंदिनी (डायरी) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर ) छपाई करुन किफायतशीर किंमतीला विक्री केल्या जातात.

सन २०११ चे श्री साई दैनंदिनी ( डायरी ) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर ) छपाईकामी वृत्तपत्रात जाहिरात न देता प्रकाशने विभाग दि. २३.०६.२०१० चे मंजूर प्रस्तावाने संस्थान अधिकृत निवडक यादीतील २५ प्रेसधारकांकडून दरपत्रके मागविणेत आली होती.

**अ)** मुंबई, पुणे येथील खाली नमुद केलेले प्रेसधारक संस्थान प्रकाशित पुस्तके,फोटो,श्री साई दैनंदिनी व श्री साई दिनदर्शिका छपाई कामे करण्यास तयार आहेत. सदर प्रेधारकांची वार्षिक उलाढाल दोन कोटी व त्यापेक्षा जास्त आहे. संस्थानचे छपाई कामासाठी यापूर्वी ज्या प्रेसधारकांची वार्षिक उलाढाल दोन कोटी किवा त्यापेक्षा जास्त आहे.अशा प्रेसधारकांना निवडक यादी समाविष्ट करणेत आलेले आहे.

| अ.नं. | प्रेसधारकांचे नांव | वार्षिक उलाढाल तपशिल |
|---|---|---|
| ०१ | शिवानी प्रिंटर्स, पुणे | चार्टड अकाऊन्टंट यांचे प्रमाणपत्रानुसार वार्षिक उलाढाल २ कोटी आहे. |
| ०२ | सन ग्राफिक्स,पुणे | चार्टड अकाऊन्टंट यांचे प्रमाणपत्रानुसार वार्षिक उलाढाल २ कोटी ५४ लाख आहे. |

**ब)** संस्थान प्रकाशित सन २०१२ चे श्री साई दैनंदिनी ( डायरी ) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर ) छपाई कामी २६ अधिकृत निवडक प्रेसधारक + "अ " मध्ये नमुद केलेले २ प्रेसधारक असे एकूण २८ प्रेसधारकांकडून चालू वर्षी सन २०१२ चे श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी दरपत्रके मागविणेची कार्यवाही करता येईल.

**क)** खालील तपशिलाप्रमाणे दि.०१ जानेवारी २०१२ ते डिसेंबर २०१२ या कालावधीची साई दैनदिनी तसेच दिनदर्शिका छपाई करणे आहे.

| **अ.नं.** | **तपशिल** | **छपाई संख्या** | **अंदाजे छपाई दर रुपये** | **एकूण अपेक्षित खर्च रुपये** |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी २०१२ | २,५०,००० | ६०/- | १५०,००,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१२ - १ पानी- मोठी साईज १९"X२९" | ३,००,००० | १५/- | ४५,००,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा दिनदर्शिका २०१२ - १ पानी- लहान साईज १७"X२२" | ३,००,००० | १०/- | ३०,००,०००/- |
| | | | एकूण अंदाजे खर्च रुपये | २२५,००,०००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



वरील प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका २०१२ छपाई करणेकामी रुपये २२५,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी, पंचवीस लाख) मात्र इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त "अ" मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रेसधारकांची नांवे संस्थानचे अधिकृत निवडक यादीत समाविष्ट करुन घेणेस, "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे २८ अधिकृत निवडक प्रेसधारकाकडून श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी दरपत्रके मागविणेस तसेच " क " प्रमाणे सन २०१२ श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका छपाई करुन घेणेस व त्याकामी चे रुपये २२५,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी, पंचवीस लाख) मात्र चे अपेक्षित खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सन २०१२ ची श्री साई दैनंदिनी (डायरी) व श्री साईबाबा दिनदर्शिका (कॅलेंडर) छपाई कामी अधिकृत निवडक प्रेसधारकांकडून कोटेशन मागणी करणेस, मान्यता देणेत आली. तसेच, सन २०१२ ची श्री साई दैनंदिनी (डायरी) छपाई करणेपुर्वी प्रेसधारकांकडून मार्केटमध्ये विक्री करणेत येणारे नेहमीचे नमुने घेण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.९० चेन्नई येथील माहिती केंद्रातील विक्री काऊंटरवरील श्री साई चरित्र व इतर पुस्तकांवर २०% सवलत न देता विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६७८ नुसार रु.१०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सुट द्यावी तसेच रु.१०/- व त्यापेक्षा कमी छापील किंमतीची पुस्तके छापील विक्री किंमतीलाच विक्री करणेस मान्यता देण्यात आली आहे.

चेन्नई व सिंकदराबाद येथे माहिती केंद्र सुरु करण्यात आले आहे, त्याठिकाणी रु. १०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सुट देण्यात येते, तसेच रु.१०/- व त्यापेक्षा कमी छापील किंमतीची पुस्तके छापील विक्री किंमतीलाच विक्री करण्यात येतात.

सदर कार्यालयात संस्थान प्रकाशीत पुस्तके,फोटो सर्व भक्तांना/खरेदीदारांना विक्रीसाठी ठेवण्यात येतात.चेन्नई कार्यालय हे पटटीपूलम येथे आहे.संस्थानमार्फत पाठविण्यात आलेले पुस्तके मे.घाटगे पा ट्रान्सपोर्ट, चेन्नई येथे उतरविले जातात, ट्रान्सपोर्ट कार्यालय ते पटटीपूलम यातील अंतर ६० कि.मी.आहे. वाहन भाडे देतांना वाहन चालकास येणे व जाणे यांचे भाडे (१२० कि.मी.) आदा करावे लागते.

संस्थान मार्फत पुस्तके पाठविण्यासाठी मे घाटगे पा. ट्रान्सपोर्ट कोपरगांव शाखा यांना भाडेखर्च रु.७४९०/- रक्कम अदा केली आहे. व ट्रान्सपोर्ट कार्यालय ते संस्थान माहिती केंद्र पट्टीपुलम पुस्तके वाहतुक भाडे वाहतुक खर्च रु.३६००/-असे एकूण ११०९० रुपये मात्र खर्च आलेला आहे.

| अ. न. | पुस्तके /फोटो | संख्या | छपाई दर | छपील दर | २० ०/० डिस्काऊंट | डिस्काऊंट रक्कम | जमा रक्कम | **डिस्काऊंट न दिल्यास जमा होणारी जादा रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री साई चरित्र तामिळ | १००० | ४०.७६ | ५९/- | ५०/- | ९/- | ५०,०००/- | **९०००/-** |
| २ | श्री साईचरित्र इंग्रजी | ९५२ | २४.४२ | ३५/- | २८/- | ७/- | २६,६५६/- | **६६६४/-** |

पुस्तके/फोटो वाहतुक खर्चाचा विचार करता, संस्थान माहिती केंद्र पटटीपूलम चेन्नई व सिकंदराबाद येथील विक्री केंद्रावर रु. १०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सुट न देता संस्थान पुस्तकावरील छापील विक्री किंमतीप्रमाणे पुस्तकांची विक्री केल्यास अल्प प्रमाणात पुस्तके पाठविण्यासाठी येणारा संस्थानचा भाडेखर्च वसुल होऊ शकेल असे नम्र मत आहे.

सबब संस्थानचे पट्टीपुलम व सिकंदराबाद येथील माहिती केंद्रावर पुस्तके/फोटो रु. १०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सुट न देता पुस्तकांचे छपाई किंमतीप्रमाणे विक्री करणेस मान्यता असावी

**निर्णय क्र.४२७ यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलप्रमाणे नमूद खर्च विचारात घेता, संस्थानचे पट्टीपुलम व सिकंदराबाद येथील माहिती केंद्रावर पुस्तके/फोटो रु. १०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सुट न देता पुस्तकांचे छपाई किंमतीप्रमाणे विक्री करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.९१ मे. मदर्स ग्राफिक्स (इं ) प्रा.लि., मुंबई यांचेकडील श्री साई सच्चरित तेलगू व फोटो छपाई व आता पर्यंत केलेल्या पुरवठयात झालेल्या नुकसानीबाबत.**

**प्रस्ताव-** मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांनी दि. २२.०३.२०११ चे पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

श्री साईचरित्र - तेलगू आवृत्ती क्र. २१ काही तांत्रिक अडचणीमुळे आपण दिलेल्या मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही. त्याची दि. ०१.०४.२०११ ही अंतिम मुदत असून आम्हांला कृपया दोन महिने मुदत वाढ मिळावी व दुसरे दगडावर बसलेले बाबा या फोटोची अंतिम मुदत दि. ०९.०१.२०११ असून त्याचीसुध्दा कृपा करुन दोन महिने मुदत वाढ मिळावी अशी संस्थानास नम्र विनंती आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांनी दि. २६.०३.२०११ पत्रात खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई ने पुस्तकांचे आदेशान्वये आतापर्यंत केलेल्या पुरवठयात १८.९० लाख रुपयाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. केवळ स्त्रियांनीच चालवले जात असणा-या मदर्स ग्राफिक्ससारख्या छोटया ऑर्गनायझेशनसाठी ही बाब अत्यंत गंभीर आहे.आम्ही टेंडरप्रमाणेच उत्तम पेपर व बाईंडिंगची गुणवत्ता राखण्यात आली आहे. आम्ही केलेल्या कामाच्या गुणवत्तेकडे बघून आमचे कच्च्या मालामध्ये झालेल्या नुकसानाबाबत कृपया साकल्याने विचार करावा ही विनंती.

**अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ६०९ नुसार मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७५/२०१० दि.१०.०७.२०१० अन्वये खालील प्रमाणे चरित्रे व पुस्तकांचा छपाई कामाचा आदेश देण्यात आलेला आहे. इकडील जा.नं.एसएसएस/वशी /प्रकाशने/११९४८/२०११दि.०५/०२/२०११ अन्वये प्रुफ तपासणी करुन अंतिम मुदत देण्यात आली आहे.

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | मंजूर दर रुपये पैसे | आदेशीत छपाई संख्या | जमा छपाई संख्या | येणे छपाई संख्या | दिलेली अंतिम मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ०१ | श्री साई सच्चरित - मराठी आवृत्ती क्र. २८ | ७२.२८ | ३०,००० | २९११८ | ८८२ | दि.१७.२.२०११ | आदेश अपूर्ण |
| ०२ | श्री साईचरित्र - तेलगू आवृत्ती क्र. २१ | ३३.७० | १,००,००० | ३९७१० | ६०२९० | दि.०१.४.२०११ | आदेश अपूर्ण |
| ०३ | श्री साईचरित्र - तामिळ आवृत्ती क्र. १५ | ४०.७६ | ४०,००० | ४०००० | -- | दि.०१.४.२०११ | आदेश पूर्ण |
| ०४ | श्री साई सच्चरित - तेलगू (पोथी) आवृत्ती क्र. ३ | ७४.७२ | १०,००० | १०००० | -- | दि.१७.२.२०११ | आदेश पूर्ण |
| ०५ | मुलांचे साईबाबा इंग्रजी आवृत्ती क्र. १३ | ०४.९६ | १०,००० | १०००० | -- | दि.२८.५.२०११ | आदेश पूर्ण |
| ०६ | गुरुपाठाचे अभंग- मराठी आवृत्ती क्र. २ | २.८५ | ५,००० | ५००० | -- | दि.२८.५.२०११ | आदेश पूर्ण |

प्रकाशने विभागाचे सबस्टोअर मध्ये दि.०२.०४.२०११ अखेर खालीलप्रमाणे साठा शिल्लक आहे.

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | मासिक विक्री खप | सबस्टोअर शिल्लक | भांडार शिल्लक संख्या | एकुण शिल्लक संख्या | शिल्लक किती महिने पुरेल |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | श्री साई सच्चरित -मराठी | २६१६ | ५५६९ | १७७७२ | २३३४१ | ९ महिने |
| ०२ | श्री साईचरित्र - तेलगू | ११४३८ | ९०२९ | ४८१६ | १३८४५ | १ महिना |

वरील पुस्तके व फोटो छपाई आदेशातील अट क्र. ३ व ९ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**अट क्र. ३** वरील पुस्तके छपाई कामाचा पुरवठा आदेशातील संबंधीत पुस्तकांचे अंतिम प्रुफ आपणास तपासून दिलेल्या दिनांकापासून ६ महिन्यात विनाविलंब टप्या टप्याने सत्वर पूर्ण करावे लागेल. सदर मुदतीनंतर पुरवठा केल्यास दंडात्मक कारवाईबाबत विचार करण्यात येईल किंवा विलंब झाल्यास प्रसंगी इतर प्रेसधारकांकडून छपाई करुन घेण्यात येईल व त्यासाठी येणारा जादा खर्च आपले बिलातून वसुल करण्यात येईल.

**अट क्र. ९** आपणास दरपत्रकामध्ये नमुद केलेला दर मान्य झाल्याने त्यानुसारच छपाई करुन द्यावी लागेल त्यामध्ये कोणत्याही कारणास्तव वाढ मिळणार नाही. आपण पुरवठा करावयाचे नाकारल्यास दरपत्रकासोबतची सुरक्षा अनामत रक्कम संस्थान खाते जमा करुन घेण्यात येईल, तसेच आपले फर्मचे नाव संस्थानचे निवडक प्रेसधारकांचे यादीतून वगळणेबाबत विचार करण्यात येईल. याबाबत आपली तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

श्री रामनवमी २०११ हे शताब्दी वर्ष असल्याने दि.१७ ते १९ जानेवारी २०११ या मुदतीत संस्थानने श्री साईसच्चरित महापारायणाचे आयोजन केले होते. यानिमित्ताने साईसच्चरितातील एकूण ओव्या ९३९३ नुसार तेवढे साईभक्त पारायणासाठी बसण्याचा संकल्प होता. अशा अडचणीच्या प्रसंगी मे मदर ग्राफिक्स मुंबई यांनी त्यांना दिलेल्या मराठी साईसच्चरित छपाईचा वेळोवेळी पाठपुरावा करुनही पुरेसा पुरवठा न केल्याने ऐनवेळी मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर यांना संदर्भ क्र.७ नुसार २०००० मराठी साईसच्चरित छपाईचा कार्यादेश देऊन त्यांचेकडून छपाई करुन घ्यावी लागली. मे.मदर्स ग्राफिक्स प्रा.लि.,मुंबई यांनी पुरेसा पुरवठा न केल्याने संस्थानचे कामकाजात अडचण आली.

मे.मदर्स ग्राफिक्स प्रा.लि.,मुंबई यांना दिलेल्या कार्यादेशानुसार त्यांनी तेलगू साईचरित्राचा पुरेसा पुरवठा न केल्याने प्रिमेअर प्रेस सिकंदराबाद यांना संदर्भ क्र. ८ नुसार ५०००० तेलगू साईचरित्र छपाईचा कार्यादेश दयावा लागला. त्यांचेकडून पुढील आठवडयात १५,००० प्रती उपलब्ध होणार आहेत.

संस्थानने मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना दि. १०.०७.२०१० रोजी वरील ६ पुस्तके व २ फोटोचा छपाई आदेश देणेत आलेला आहे. सदर आदेशातील अट क्र. ३ नुसार जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/ ११९४८ / २०११दि.०५/०२/२०११ ने अंतिम छपाई कामाची मुदत

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



देण्यात आले होते . त्यांचेकडून वरील **अ** मध्ये नमुद केलेले अ.नं.१ श्री साई सच्चरित - मराठी च्या ८८२ प्रती छपाई होवून येणे आहे . त्याची छपाई दर रु. ७२.२८ पैसे प्रमाणे रु.६३७५१/- तर अ.नं. २ श्री साईचरित्र - तेलगू ६०२९० प्रती दर रु. ३३.७० पैसे प्रमाणे रु. २०,३१,७७३/- अशी एकूण रु.२०,९५,५२४/- मात्र रक्कमेची चरित्रे व फोटो छपाईची रक्कम रु.८,४०,०००/- मात्र याप्रमाणे एकूण रक्कम रु. २९,३५,५२४/- मात्र रक्कमेची छपाई होऊन येणे आहे.

प्रकाशने विभाग दि. १८.०३.२०११ चे प्रस्तावाने श्री साई सच्चरित मराठी पोथी ९६८३ प्रती मुदतीनंतर छपाई करुन दिल्याने त्यांचे रु.६,९९,८८७/-रक्कमेवर १% दंडात्मक प्रमाणे रु. ६,९९८.८७ पैसे पुर्णांकित रु. ६९९९/- एवढी रक्कम त्यांचे अनामत रकमेतून नियमाप्रमाणे वसूल करणेत येईल.

(I) मे.मदर्स ग्राफिक्स प्रा.लि.,मुंबई यांची झालेली ओढताण विचारात घेता त्यांना त्यांचे विनंतीनुसार अ.नं.१व २ चे छपाईकामी २ महिने मुदतवाढ देण्यात आली आहे. तथापी या मुदतीत पुरवठा न झाल्यास त्यांचेकडून दंडात्मक रक्कम वसुल करावी लागेल.

**ब)** मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांना इकडील जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७६/२०१० दि.१०.०७.२०१० नुसार त्यांना खालील प्रमाणे फोटो छपाई कामाचा आदेश देण्यात आला आहे.

| अ. नं.<br>१ | फोटोंचे नाव<br>२ | मंजूर दर रुपये पैसे<br>३ | आदेशीत छपाई संख्या<br>४ | जमा छपाई संख्या<br>५ | मसिक खप<br>६ | दि. २.४.११ शिल्लक साठा<br>७ | किती महिने पुरेल<br>८ | येणे छपाई संख्या<br>९ | दिलेली अतिम मुदत<br>१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | द्वारकामाई बसलेले बाबा फोटो ४ रंगात साईज १४"X२०" | २.७० | १ लाख | -- | ७३१६ | ६८२३४ | ९ | १,००,००० | २८.०५.११ |
| २ | दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात साईज २०"X २८" | ५.७० | १ लाख | -- | २७०० | ३४ | ० | १,००,००० | ९.०१.११ |

वरील फोटो छपाई आदेशातील अट क्र. १३ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**अट क्र. १३** आपण दरपत्रकामध्ये नमुद केलेला दर हा सारासार विचार करुन दिलेला असल्याने आपणास दिलेला आदेश रद्द करता येणार नाही. आदेश रद्द केल्यास दरपत्रकासोबत जोडलेली बयाना रक्कम संस्थान खाते जमा करुन घेण्यात येईल तसेच आपले फर्मचे नाव संस्थानचे निवडक प्रेसधारकांचे यादीतून वगळण्यात येईल. याबाबत आपली तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

अद्यापपावेतो उपरोक्त दोन्हीही फोटोंचा पुरवठा केलेला नाही. अ.नं. १ च्या फोटोची अंतिम पुरवठयाची मुदत २८.५.२०११ आहे. त्यांनी दि. २२.०३.२०११ पत्राने अ.नं. २ दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात साईज २०"X २८" च्या फोटो छपाई कामासाठी २ महिने मुदतवाढ मागीतली आहे.

**(II)** मे.मदर्स ग्राफिक्स प्रा.लि.,मुंबई यांची झालेली ओढताण विचारात घेता त्यांना त्यांचे विनंतीनुसार अ.नं.२चे फोटो छपाईकामी २ महिने मुदतवाढ देणेत आली आहे. तथापी या मुदतीत पुरवठा न झाल्यास त्यांचेकडून दंडात्मक रक्कम वसुल करावी लागेल.

मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांनी दि. २६.०३.२०११ पत्राने त्यांना झालेल्या नुकसानीबाबत साकल्याने विचार करावा अशी विनंती केली आहे.

**(III)** उपरोक्त परिस्थिती विचारात घेता मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचेकडील दि. २६.०३.२०११ चे पत्रासोबत खालील माहिती सादर केली आहे.

१) मे. शामभाऊलाल ए.शाह ॲण्ड कंपनी,मुंबई यांचेकडून बल्लारपूर कंपनीचा कागद खरेदीचे बिल सादर केले आहे.

२) मे.एमएम बायडर,मुंबई यांचेकडून चरित्रांचे हार्ड बाउंड बाईंडिंग करुन घेतल्याचे बिल सादर केले आहे.

३) मे. साईल प्रिंट आर्ट,मुंबई यांचेकडून चरित्रांचे गॅली फिटींग व पुस्तकांचे बायडिंग चे बिल सादर केले आहे.

सदर वरील माहितीवरुन असे दिसून येते की, सदर प्रेसधारकाकडे स्वत:चे प्रेसमध्ये कामे करुन घेण्याच्या सुविधा नाहीत. त्यामुळे ते संस्थानचे छपाईचे काम करण्यास सक्षम नसल्याचे निदर्शनास येत आहे.

उपरोक्त पुस्तके व फोटो छपाईकामी निवडक प्रेसधारकाकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि., मुंबई यांचे न्युनतम दर असल्याने त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याच दरानुसार त्यांनी छपाई करुन देणे आवश्यक आहे. सबब नियमानुसार त्यांना त्यापेक्षा जादा रक्कम अदा करता येणार नाही असे नम्र मत आहे. पुस्तके छपाई आदेशातील अट क्र. ९ मधील व फोटो छपाई

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आदेशातील अट क्र. १३ मधील तरतुदीनुसार जादाची वाढीव रक्कम अदा करता येणार नाही. निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. मदर्स ग्राफिक्स (इं ) प्रा.लि., मुंबई यांची विनंती अमान्य करण्यात आली.**
(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.९२ पोस्टेज स्टॉकमधून भेट देण्यात आलेले श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका २०११ किंमतीसह कमी करणेबाबत व सन्माननीय साईभक्तांना संस्थानतर्फे प्रकाशने/फोटो/दैनंदिनी/दिनदर्शिका, बाबांची मुर्ती/सी.डी. सप्रेम भेट देण्याच्या पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची स्थायी मान्यता घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.११.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ९१७ नुसार खालीलप्रमाणे श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका विनामुल्य भेट देणेस मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशील | दैनंदिनी संख्या | दिनदर्शीका १ पानी संख्या | श्री साई दिनदर्शीका १ पानी मोठी संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | मा.विधिमंडळ सदस्य | ५०० | ५०० | ० |
| ०२ | मा. अध्यक्ष महोदय | १०० | १०० | १०० |
| ०३ | मा. उपाध्यक्ष महोदय | १०० | १०० | १०० |
| ०४ | मा. सदस्य ( १०० प्रमाणे) | १४०० | १४०० | १४०० |
| ०५ | मा. कार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० |
| ०६ | मा.उपकार्यकारी अधिकारी महोदय | १०० | १०० | १०० |
| ०७ | प्रशासकीय अधिकारी ४ (प्रत्येकी २५ प्रमाणे) | १०० | १०० | १०० |
| ०८ | पत्रकार | २५० | ० | ० |
| ०९ | विविध विभाग प्रमुख यांचे मागणीप्रमाणे | ८९० | ६४८ | ० |
| | **एकूण संख्या** | **३५४०** | **३०४८** | **१९००** |
| | विक्री दर | ५५.०० | ५.०० | १०.०० |
| | **एकूण रक्कम** | १९४७०० | १५,२४०.०० | १९,०००.०० |

उपरोक्त प्रमाणे श्री साई दैनंदिनी/दिनदर्शिका २०११ चे एकूण रु. २,२८,९४०/- मात्र खर्च झाला आहे.

वरील निर्णयानुसार संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, व सदस्यांनी वेळोवेळी समक्ष मागणी केलेप्रमाणे वेगवेगळया क्षेत्रातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तिंना त्यांचे शिर्डी भेटीअंती जनसंपर्क कार्यालयामार्फत यात उच्चपदस्थ शासकीय अधिकारी, राजकिय नेते,सिने कलावंत, नामांकित लेखक, आंतरराष्ट्रीय खेळाडू, विविध दुरचित्र वाहिन्यांचे वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच हिवाळी अधिवेशनातील विधीमंडळ सदस्य, यांना भेट म्हणून देण्यात आले आहे.

मा.कार्यकारी अधिकारी व मा. प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी दिलेल्या मान्यता प्राप्त आदेशानुसार संस्थानअंतर्गत ज्या ज्या खात्याचे संबंधीत संपर्कातील अधिका-यांना मोफत भेट म्हणून देण्यात आले आहे.

२) मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.११.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ९१७ निर्णयानुसार संस्थानचे मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष, व सदस्य यांना मंजूर केलेल्या संस्थान प्रकाशित प्रत्येकी १०० नगापेक्षा जादा डाय-या व कॅलेंडरची वेळोवेळी समक्ष मागणी करीत असल्याने देण्यात आल्या आहेत. खाली दर्शविल्याप्रमाणे प्रकाशने विभागाकडून प्रत्यक्ष मोफत वरील निर्णयाव्यतिरिक्त श्री साई दैनंदिनी (डायरी) व दिनदर्शिका (कॅलेंडर) २०११ चे जादा देण्यात आलेल्या आहेत.

| अ.नं. | तपशिल | एकूण मोफत संख्या | विक्री दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई डायरी - २०११ | १३० | ५५.०० | ७,१५०.०० |
| ०२ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पानी लहान - २०११ | ० | ० | ०.०० |
| ०३ | श्री साईबाबा कलेंडर १ पानी मोठे - २०११ | ८५ | १०.०० | ८५०.०० |
| ०४ | श्री साईबाबा टेबल कॅलेंडर - २०११ | ०९ | १५०.०० | १,३५०.०० |
| ०५ | श्री साईबाबा कॅलेंडर ८ पानी - २०११ | १९३ | २००.०० | ३८,६००.०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्री डी वॉल कॅलेंडर - २०११ | १९२ | २७०.०० | ५१,८४०.०० |
| | | | **एकूण रु.** | **९९,७९०.००** |

३) खालील दर्शविल्याप्रमाणे श्री साई दैनंदिनी (डायरी) व दिनदर्शिका (कॅलेंडर) २०११ प्रकाशने विभागाकडून माहे एप्रिल २०१० ते माहे मार्च २०११ या कालावधीत प्रत्यक्ष मोफत देण्यात आलेल्या आहेत.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | तपशिल | शिर्डी कार्यालय मोफत संख्या | मुंबई कार्यालय मोफत संख्या | एकुण मोफत संख्या | विक्री दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई डायरी - २०११ | ३४०३ | २६७ | ३६७० | ५५.०० | २०१८५०.०० |
| ०२ | श्री साईबाबा कॅलेंडर १ पानी लहान - २०११ | २७२७ | -- | २७२७ | ५.०० | १३६३५.०० |
| ०३ | श्री साईबाबा कलेंडर १ पानी मोठे - २०११ | १८३५ | १५० | १९८५ | १०.०० | १९८५०.०० |
| ०४ | श्री साईबाबा टेबल कॅलेंडर - २०११ | ०९ | -- | ०९ | १५०.०० | १३५०.०० |
| ०५ | श्री साईबाबा कॅलेंडर ८ पानी - २०११ | १९३ | -- | १९३ | २००.०० | ३८६००.०० |
| ०६ | श्री साईबाबा थ्री डी वॉल कॅलेंडर - २०११ | १९१ | ०१ | १९२ | २७०.०० | ५१८४०.०० |
| | | | | | **एकुण रु.** | **३,२७,१२५.००** |

**अ)** उपरोक्तप्रमाणे मोफत देण्यात आलेले श्री साई दैनंदिनी (डायरी) व दिनदर्शिका (कॅलेंडर)२०११ पोस्टेज स्टॉकमधून भेट म्हणून देण्यात आलेने पोस्टेज स्टॉकमधून कमी होणेस व प्रकाशने विभाग (Publication expenses) खाती किंमतीसह खर्ची टाकणेस तसेच त्याचे एकूण रक्कम रु.३,२७,१२५/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**ब)** सन्माननीय साईभक्तांना संस्थानतर्फे वेळोवेळी प्रकाशने/फोटो/दैनंदिनी/दिनदर्शिका,बाबांची मुर्ती/सी.डी. उपलब्धतेप्रमाणे सप्रेम भेट देण्याची प्रथा आहे. तसेच सन्माननीय साईभक्तांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार करण्यात येतो. तथापी त्याबाबतची मा.व्यवस्थापन समितीची स्थायी मान्यता दप्तरी नाही. सदर पध्दतीस मा.व्यवस्थापन समितीची स्थायी मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२९ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाची नोंद घेणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय न.९३ श्री साईलीला नियतकालिकाचे अंकासाठी पाकिटे तयार करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** जा.क्र. एसएसएस/वशी/मुंबई /२५८६/२०११ दि.३०.०३.२०११अन्वये मुंबई कार्यालय यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) साईलीला मराठी अंकाकरीता ८०,००० पाकीटे व श्री साईलीला हिन्दी- इंग्रजी अंकाकरीता १,२०,००० पाकीटे छपाई करुन मिळावेत.

२) साईलीला अंक सभासदांना पाकीटातून पोस्टाने पाठविली जातात. सदर पाकिटेसुध्दा साईलीला अंक छपाई करणा-या प्रेसकडूनच तयार करुन घेतल्यास, ते स्वस्त पडतील. ही पध्दत स्विकारल्यास पोस्टाने पाठविण्यासाठी लागणारी पाकीटे या कार्यालयात साठविण्याची गरज राहणार नाही.तसेच वर्षभर साठवण केल्यामुळे काही प्रमाणात पाकीटे खराब होतात, ती या पध्दतीमुळे होणार नाहीत.

३) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पुढील दोन महिन्यात टपालाने पाठवयाच्या अंकाचे पाकीटे त्यांनी कार्यालयास पुरवठा केल्यास, त्यावर पत्ते चिकटविणे इत्यादी आवश्यक कामे वेळीच पूर्ण करुन घेता येतील व महिन्याच्या पहिल्या आठवडयात प्राप्त झालेला अंक पोस्टाव्दारे साईलीला सभासदांना त्वरीत व सहजतेने पाठविता येईल.

४) तेंव्हा, उपरोक्त पध्दत स्विकारणे संस्थानच्या अर्थिक हिताचे होईल. तसेच प्रत्येक महिन्यास नवीन पाकीटे उपलब्ध झाल्यास साईलीला सभासदांनासुध्दा नवीन पाकीटात अंक पोहोच होईल.

५) तेंव्हा,अंकाची छपाई व अंक पोस्टाव्दारे पाठविण्यासाठी लागणरी पाकीटे एकाच प्रेसकडून छपाई व तयार करुन घेतल्यास, त्यात संस्थानचा आर्थिक फायदा होईल.

**अ)** जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७७/२०१० दि.१०.०७.२०१० नुसार मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांना संस्थान प्रकाशित " श्री साईलीला" द्वैमासिक नियतकालिक मराठी व हिंदी -इंग्रजी या आवृत्तींच्या छपाईकामी माहे जुलै-ऑगस्ट २०१० ते मे-जून २०११ या कालावधीसाठी "श्री साईलीला" द्वैमासिक नियतकालिक मराठीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक १ मराठी असे एकुण ६ अंक व हिंदी -इंग्रजीचे ५ अंक अधिक पुण्यतिथी विशेषांक १ हिंदी-इंग्रजी असे ६ अंक छपाई करुन देणेबाबत आदेश देण्यात आलेला आहे.

**ब)** जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/८२७२/२०१० दि.१०.०७.२०१० नुसार मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि., मुंबई यांना मागिल वर्षी संस्थान प्रकाशित " श्री साईलीला" द्वैमासिक नियतकालिक मराठी व हिंदी -इंग्रजी या अकांसाठी आवश्यक लागणारी पाकीटे साईलीला मराठी अंकाकरीता ८०,००० पाकीटे निम्नतम दर रु. ०.८५ पैसे व श्री साईलीला हिन्दी- इंग्रजी अंकाकरीता १,२०,००० पाकीटे निम्नतम दर रु. ०.८० पैसे छपाई करुन देणेबाबत आदेश देण्यात आलेला होता.

सबब मे. टॅको व्हीजन प्रा.लि.मुंबई यांचेकडे **"अ"** मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान प्रकाशित "श्री साईलीला" द्वैमासिक नियतकालिक मराठी व हिंदी -इंग्रजी अंकांचे छपाईचे काम चालू असल्याने, त्यांचेकडून वरील **"ब"** मध्ये नमुद केलेप्रमाणे आवश्यक लागणारी पाकीटे साईलीला मराठी अंकाकरीता

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



८०,००० पाकीटे व श्री साईलीला हिन्दी- इंग्रजी अंकाकरीता १,२०,००० पाकीटे छपाई कामाचा पुरवठा आदेश देणेस व त्याकामी येणारे रु. १,६४,०००/- खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४३०. यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलीला नियतकालिक मराठी व्दैमासिक सन २०११-१२ अंकासाठी आवश्यक असणारे ८०,००० पाकिटे व श्री साईलिला हिंदी/ इंग्रजी सन-२०११-१२ अंकाकरिता १,२०,००० पाकिटे छपाई मे.टॅको व्हिजन प्रा.लि., मुंबई यांचेकडून मागील वर्षाच्या मान्य दराने छपाई करुन घेणेस व याकामी येणारे रक्कम रु.१,६४,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने )

---

**विषय नं.९४ श्री साईसतचरित्र हिंदी ग्रंथाची ऑडीओ सी.डी संस्थानचे काऊंटरवर विक्री करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री प्रविण कौशल यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना अग्रेषित केलेल्या दि.०७.०३.२०११ चे इमेलनुसार प्रामुख्याने खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

१) श्री निरज कुमार, दिल्ली यांची मा. अध्यक्ष महोदय यांचेशी दि.०५.०३.२०११ रोजी श्री साईसतचरित्र -हिंदी ग्रंथाची ऑडीओ सी.डी. बाबत चर्चा झालेली आहे.

२) श्री प्रविण कौशल हे सारेगमा इंडिया लि., या कंपनीत कार्यरत आहेत. १९२९ मध्ये संस्थान प्रकाशित श्री साईसतचरित्र -हिंदी ग्रंथाची ५१ अध्यायाची श्री शैलेंद्र भारती- मुंबई यांचे आवाजातील ऑडीओ सी.डीची निर्मिती ऐश साई म्युझिक कंपनीमार्फत निर्मिती केली आहे.

३) जगातील साईभक्तांनी सदर सी.डीला चांगल्या प्रकारे प्रतिसाद दिलेला आहे.

४) ५१ अध्यायाच्या १५ सी.डी.चा १ संचाची किंमत रु.१५००/- राहिल.

५) सदर सी.डी. संस्थानचे विक्री काऊंटरवर विक्री करता ठेवावी.

६) विक्री किंमतीवर ६०% डिस्काऊंन्ट देण्यात येईल.

सध्या संस्थानमार्फत निर्मिती करुन विक्री करण्यात येत असलेल्या ऑडीओ, व्हिडीओ व डी.व्ही.डी. ची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | संच तपशिल | निर्मिती दर रु. पैसे | देणगी (विक्री ) मुल्य रु. पैसे | देणगी (विक्रीतून) प्रती नग मिळणारी रक्कम रु. पैसे | प्रति दिन सरासरी विक्री |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित मराठी ग्रंथ | ४ ऑडीओ सी.डी. संच (एम.पी.३) | ७०.५१ | १००.०० | २९.४९ | ७ |
| ०२ | श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथ | ३ ऑडीओ सी. डी. संच (एम.पी.३) | ६४.५८ | ९०.०० | २५.४२ | १७ |
| ०३ | श्री साई सत् चरित्र-तेलगू ग्रंथ | २ ऑडीओ सी.डी. संच (एम.पी.३) | ५२.०० | ८०.०० | २८.०० | २८ |
| ०४ | गुरुपाठांचे अभग | २ ऑडीओ सी.डी. संच | ३३.०८ | ५०.०० | १६.९२ | ८ |
| ०५ | श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार | २ सी.डी.चा संच (व्हिडिओ.) | ३४.१३ | ७५.०० | ४०.८७ | ५० |
| ०६ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार | १ सी.डी. (एम.पी.३) | १५.७५ | ३०.०० | १४.२५ | ४३ |
| ०७ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार | १ डी.व्ही.डी. | ४५.१५ | १००.०० | ५४.८५ | २३ |
| ०८ | शिर्डी श्री साईबाबा की संपूर्ण शिर्डी दर्शन | १ व्ही.सी.डी. | १८.०० | ५०.०० | ३२.०० | २८ |
| ०९ | साईबाबा दि ग्रेट संत ऑफ शिर्डी | १ सी.डी.रोम (वाचन) | २३.६३ | ५०.०० | २६.३७ | ९ |
| १० | 'श्री साई की आरतीयाँ ' | १ ऑडीओ सी.डी. | १५०.०० | १८०.०० | ३०.०० | १२ |

संस्थानने प्रकाशित होणा-या प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४.०५.२००८ चे सभेत "इतर कुठल्याही अन्य खाजगी प्रकाशनांचे हक्क स्वीकारण्यात येऊ नयेत" असा निर्णय क्र.४१५ झालेला आहे.

श्री प्रविण कौशल,यांनी त्यांचे पत्रात ५१ अध्यायाच्या १५ सी.डी.च्या एका संचाची किंमत रु.१५००/- कळविली आहे. विक्री किंमत रु.१५००/- वर ६०% डिस्काऊन्टची रक्कम रु.९००/- होते. सदरची रक्कम वजा जाता कंपनीला प्रती संच रु.६००/- प्रमाणे रक्कम अदा करावी लागेल. रु.१५००/- चे विक्री किंमतीवर साईभक्तांना ४०% डिस्काऊन्ट ने रु. ६००/- सवलत दिल्यास भक्तास सदर संच ९०० रुपयास विक्री करता येईल.

**अ)** मा.व्यवस्थापन समितीचा उपरोक्त निर्णय तसेच उपरोक्त वस्तुस्थीती विचारात घेता संबंधीतांचा प्रस्ताव स्वीकारार्हाय नाही असे नम्र मत आहे. यावर विचार होणेचे निर्णयार्थ सविनय सादर.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**ब)** संबंधींच्या सी.डी. संस्थान विक्री काऊंटरवर विक्री करणेस मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेतल्यास प्रायोगिक तत्वावर ५०० संच संस्थान विक्री काऊंटरवर विक्रीसाठी ठेवणेबाबत विचारार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४३१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसतचरित्र हिंदी ग्रंथाची ऑडीओ सी.डी. मा.स्थानिक विश्वस्तांना दाखवून त्यानंतर अंतीम निर्णय घेणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं. ९५** **श्री साई सत् चरित्र ओरीया छपाईबाबत**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०३.२००९ चे सभेतील निर्णय क्र.२९३ नुसार श्री सत्य खाडगरया, कटक यांना ओरीया भाषेतील साईचरित्र स्वत:मार्फत छपाई करुन प्रकाशित करुन ओरीया साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणेस परवानगी देण्यात आली होती.

सन २००९ मध्ये साईचरित्रात युनिव्हर्सिटी चे प्रमाणपत्र चरित्रात छपाई करावी अशी तरतुद नव्हती. संस्थानकडे जास्तीत जास्त भाषेत श्री साईबाबांचे जीवनावरील श्री साईसच्चरित उपलब्ध असणे हे संस्थानला भुषणावह आहे. संस्थानकडे सध्या १२ भाषेत श्री साईबाबांचे जीवनावर साई चरित्रे उपलब्ध आहेत.

संस्थानकडे ओरिया भाषेत श्री साई सत् चरित्र नसल्याने श्री सत्य खाडगरया, कटक यांना ओरीया भाषेतील चरित्र संस्थानमार्फत प्रकाशित करावयाचे असल्याने प्रकाशनाचे हक्क संस्थानला देणे विषयी व ओरिया युनिव्हर्सिटी चे प्रमाणपत्र सादर करणेविषयी चर्चा करणेत आली. श्री सत्य खाडगरया हे संस्थानला प्रकाशनाचे हक्क संस्थानला देणे विषयी संमती दर्शविली परंतु ओरिया युनिव्हर्सिटी चे प्रमाणपत्र देऊ शकत नसल्याचे सांगितले होते.

श्री सत्य खडगरया यांनी दि.०८.०३.२०११ चे इमेलमध्ये श्री साई सत् चरित्र - ओरीया भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत विनंती केली आहे, व त्यांनी संस्थानला श्री साई सत्चरित्र ओरीया भाषेत छपाईकामी मजकूराची सी.डी. पाठविलेली आहे व संस्थानला प्रकाशनाचे सर्व हक्क देण्यास तयार आहेत. श्री साई सत् चरित्र - ओरीया मधे युनिव्हर्सिटीचे लेटरहेडवर संस्थान प्रकाशित श्री साई सत्चरित्र हिंदीतील मजकूराप्रमाणे ओरीया भाषेत तयार केलेल्या चरित्रात मजकुरात कोणताही बदल नसलेबाबत युनिव्हर्सिटीचे प्रमाणपत्र सादर करणेविषयी दि.१६.०५.२०११ रोजी चर्चा केली असता ते १० दिवसात प्रमाणपत्र पाठविणार आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.१०.२०१० चे सभेतील निर्णय क्र.८२० नुसार संस्थानव्दारा ओरिया भाषेत चरित्र प्रकाशित करावयाचे असल्याने सदर वेळी श्री कमल लोचनी कुंदीनीगी, मडसा यांचा प्रस्ताव मंजूर होऊन त्यांचेकडील श्री साई सत् चरित्र ओरिया छपाईकामीची सी.डी.मे. अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे यांना आदेशासोबत देण्यात आली होती.

श्री साई सत् चरित्र ओरियात युनिव्हर्सिटी प्रमाणपत्र छपाई करावयाचे असल्याने त्याबाबत श्री कमल लोचनी कुंदीनीगी यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१२८८५/ दि.२९.०३.२०११ अन्वये संस्थान प्रकाशित श्री साई सत्चरित्र हिंदीतील मजकूराप्रमाणे ओरीया भाषेत तयार केलेल्या चरित्रात मजकुरात कोणताही बदल नसलेबाबत युनिव्हर्सिटीचे प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

श्री कमल लोचनी कुंदीनीगी यांनी दि.१८.०४.२०११ व दि.१.०५.२०११ रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) ओरीसा युनिव्हर्सिटी चे प्रमाणपत्र सादर करता येणार नाही,यापूर्वी दिलेले गव्हर्नमेंट कॉलेजमधील प्रोफेसरयांचेकडील प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात यावे.

२) मे. अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे यांचेकडील दि. १४.०५.२०११ रोजी चे फॅक्स पत्राने ओरिया भाषेतील श्री साई सत् चरित्राची सी.डी. ओपन होत नाही.त्यामुळे छपाईचे काम करता येत नाही. असे कळविले आहे.

**अ)** उपरोक्त १ व २ मधील बाबी विचारात घेता श्री कमल लोचनी, कुंदीनीगी - मडासा यांचे ओरिया भाषेतील श्री साई सत् चरित्र प्रकाशित करणेस विचार करता येत नसलेबाबत पत्र देऊन कळविणेस मान्यता असावी.

**ब)** श्री सत्य खडगरया यांचे श्री साई सत् चरित्र - ओरीया भाषेत संस्थानमार्फत प्रकाशित करणेचे अधिकार संस्थानला देत असल्याने तसेच ते ओरिया युनिव्हर्सिटीचे प्रमाणपत्र सादर करणार असल्याने त्यांचेकडील श्री साई सत् चरित्र - ओरीया छपाई कामाची सी.डी.नुसार श्री साई सत् चरित्र - ओरीया भाषेत प्रकाशित करणेस मान्यता असावी.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.४३२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं. ९६ ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ स्टॅण्ड छपाई करुन घेणे बाबत**

**प्रस्ताव-** अ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.०४.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४५(३)साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/७६३३/२०१० दि.३१.०५.२०१० अन्वये खालील प्रमाणे "३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड "छपाई कामाचा साईभक्तांना विक्री करणेकामी आदेश देण्यात आला आहे .

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या नग | मंजूर दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये | देणगी मुल्य रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड आकार ३.५"X २.५ | १०,००० | ३८.०० | ३,८०,०००/- | ४०.०० |
| ०२ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड आकार ७"X ५" | ५,००० | १३०.०० | ६,५०,०००/- | १३५.०० |
| | | | एकूण रुपये | १०३०,०००/- | |

**ब)** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०.१०.२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१७ अन्वये मे. साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/९९५१/२०१० दि.१५.१०.२०१० अन्वये खालील प्रमाणे "३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड "छपाई कामाचा आदेश देण्यात आला होता.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या नग | मंजूर दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये | देणगी मुल्य रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड आकार ७"X ५" | ४,००० | १३०.०० | ५,२०,०००/- | १३५.०० |

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १०.१०.२०१० चे सभेतील निर्णय क्र.८१७ नुसार ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड फोटो ४००० नग व मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३.०२.२०११ चे सभेतील निर्णय क्र.२ (५) अन्वये ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड आकार ७"X ५" चे २००० फोटो असे एकूण ६००० नग लंडन येथील साई भजनसंध्या कार्यक्रमात उपस्थित साईभक्तांना सप्रेम भेट म्हणून देण्यात आले होते.उर्वरित ३००० नगांची साईभक्तांना विक्री करण्यात आले आहे. सदरचा साठा संपलेला आहे.

मे.साईग्रेस फान्डेशन, मुंबई यांचेकडून ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड या फोटोस साईभक्तांकडून चांगली मागणी आहे. सदरचे साहित्य तयार करुन घ्यावे असे वाटते.

जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/७६३३/२०१० दि.३१.०५.२०१० चे छपाई कामाचे आदेशातील अट क्र. ७ मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"अट क्र.०७ -मध्ये आदेशात दिलेल्या संख्येपेक्षा जादा छपाई करता येणार नाही. तथापी संस्थानला आवश्यकता भासल्यास व मागणी केल्यास त्याच दरात, त्याच अटी व शर्तीने जादा ॲक्रेलिक व फायबर फ्रेम विनाअट तयार करुन द्यावी लागेल."

मे.साईग्रेस फान्डेशन, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.०४.०५.२०११ चे पत्रान्वये व आदेशातील शर्ती अटीनुसार मंजूर दराने तयार करुन देणेस तयार असल्याचे कळविले आहे.

**क)** मे.साईग्रेस फान्डेशन, मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे साहित्य तयार करुन घेणे आहे.

| अ.नं. | तपशिल | छपाई संख्या नग | मंजूर दर रुपये पैसे | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्डआकार ३.५"X २.५ | १०,००० | ३८.०० | ३,८०,०००/- |
| ०२ | ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ ॲक्रेलिक स्टॅन्ड आकार ७"X ५" | ५,००० | १३०.०० | ६,५०,०००/- |
| | | | एकूण रुपये | १०३०,०००/- |

मे. साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई यांचेकडून वर "क " मध्ये नमुद केलेप्रमाणे साहित्य तयार करुन घेणेस व त्याकामी येणारे रु.१०,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४३३ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मे. साईग्रेस फाऊन्डेशन.,मुंबई यांचेकडून ३D श्री साईबाबा फोटो प्रिंट वुईथ स्टॅण्ड छपाई करुन घेणेस व याकामी येणारे रु.१०,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं. ९७** **श्री साईबाबा दिनदर्शिका -२०१२ छपाईबाबत**

**प्रस्ताव-** मागिल वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०७.०८.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ६७५ अन्वये मे. साइग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून खालीलप्रमाणे श्री साईबाबा दिनदर्शिका २०११ चे छपाई करुन साईभक्तांना विक्री काऊंटरवर उपलब्ध करुन देण्यात आले होते.त्यास साईभक्तांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.

**अ)** श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका -२०११ (८ पेजेस ) आकार २२"X ३५"- ३०,००० नग प्रती छपाई दर रु.१८०/- प्रमाणे छपाईकामीचा पुरवठा आदेश देणेत आला होता. साईभक्तांना अल्प दरात रु.२००/- प्रमाणे विक्री करण्यात आले होते. श्री साईबाबा दिनदर्शिका ३०,००० नगापैकी २८,५६८ नगांची छपाई करुन घेण्यात आली आहे.

**ब)** श्री साईबाबा थ्रीडी ७ शिटर डेस्क कॅलेंडर २०११ आकार ९.७५" ( W ) X ०७" ( H ) ६- १५,००० नग प्रती छपाई दर रु.१४०/- प्रमाणे छपाईकामीचा पुरवठा आदेश देणेत आला होता. साईभक्तांना अल्प दरात रु.१५०/- प्रमाणे विक्री करण्यात आले होते. श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका १५,००० नगापैकी १४,९०८ नगांची छपाई करुन घेण्यात आली आहे.

**क)** श्री साईबाबा थ्रीडी - कॅलेंडर २०११ आकार १९" X १९" पॅड आकार - १९" X ६" या आकारात ३०,००० नग प्रती छपाई दर रु.२६१/- प्रमाणे छपाईकामीचा पुरवठा आदेश देणेत आला होता. साईभक्तांना अल्प दरात रु.२७०/- प्रमाणे विक्री करण्यात आले होते. श्री साईबाबा दिनदर्शिका ३०,००० नगापैकी २५,४५८ नगांची छपाई करुन घेण्यात आली आहे.

मे. साइग्रस फाऊन्डेशन, मुंबई यांनी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक - २१.०५.२०११ चे सभेत वरील संदर्भिय पत्र क्र. २ दिनांक:- २०.०५.२०११ चे पत्र सादर केले त्यात खालीलप्रमाणे श्री साईबाबा दिनदर्शिका २०१२ छपाई करुन संस्थानला दिनदर्शिका विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. सदर पत्रावर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषय सभेत सादर करणेस निर्देशित केले आहे.

खालील "अ","ब" व "क" प्रमाणे मे. साइग्रस फाऊन्डेशन, मुंबई हे श्री साई दिनदर्शिकांना चांगल्या प्रकारचे फोटो ग्राफ, उत्कृष्ट डिझाईन, आकारबद्ध, चांगल्या प्रकारचा उच्च दर्जाचा कागद वापरुन छपाई करुन दिनदर्शिका सुबक आकर्षक तयार करणार आहेत.

श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१२ छपाई तपशिल खालील प्रमाणे.

| | तपशिल | छपाई संख्या | छपाई दर रुपये | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| अ) | श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१२ (८ पेजेस ) आकार २२"X ३५" | ३०,००० | १८०/- | ५४,००,०००/- |
| ब) | श्री साईबाबा थ्रीडी - ७ शिटर डेस्क कॅलेंडर २०१२ आकार ९.७५"X ०७" | २०,००० | १४०/- | २८,००,०००/- |
| क) | श्री साईबाबा थ्रीडी - वॉल कॅलेंडर २०१२ आकार १९" X १९" | २५,००० | २६१/- | ६५,२५,०००/- |
| | | | एकूण रु. | १,४७,२५,०००/- |

मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांनी श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१२ छपाई कामी विशेष तंत्रज्ञान वापरुन तयारकरण्यात आलेले असल्याने दर पत्रके मागविण्याची अट शिथील करुन वरीलप्रमाणे कार्यादेश देऊन कार्यादेशाच्या एकूण रक्कमेच्या ५% रक्कम अनामत म्हणून घेण्यात यावी. कार्यादेशापैकी सुरुवातीस मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांनी दि.२०.०५.२०११ चे पत्रात नमुद केलेप्रमाणे कार्यादेश द्यावेत व पुढील आवश्यक विक्री खपानुसार छपाई करुन घ्यावी असे वाटते तसेच कार्यादेशाप्रमाणे संपूर्ण पुरवठा मिळाल्यावर संस्थानकडे जमा असलेली अनामत त्यांना परत करावी.

साईभक्तांना संस्थानव्दारा वरील प्रमाणे श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका उपलबध करुन देणे असल्याने मे. साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून दिनदर्शिकेवर संस्थानचे नाव,संस्थान लोगो, देणगी मूल्य छपाई करुन घ्यावे.

वरील "अ","ब" व "क" मध्ये नमुद केलेनुसार श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१२ छपाईकामी रु. १,४७,२५,०००/- इतका अपेक्षित खर्च येणार आहे.

**निर्णय क्र.४३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका-२०१२ मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांचेकडून छपाई करुन घेणेस व याकामी येणारे रु.१,४७,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.** (कार्यवाही- अधिक्षक, प्रकाशने)

---

**विषय नं.९८** **मान्यवरांचे सत्कार करणेकामी खरेदी विभागामार्फत संस्थान प्रिंटेड शॉल खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.व्ही.आय.पी. व महत्वाचे पदसिद्ध अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वतीने शॉल, श्रीफळ, देऊन सत्कार केला जातो. त्यांचे सत्काराकामी संस्थानचे वतीने शॉल देण्याची पूर्वापार पद्धत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



माहे-एप्रिल-२०१० ते माहे-मार्च-२०११ या आर्थिक वर्षामध्ये मान्यवरांच्या सत्कारासाठी लागणारी संस्थान प्रिंटेड कॉटन शॉल, खरेदी विभागामार्फत खरेदी करुन मंदिर विभागाचे मागणीनुसार पुरविण्यात आलेली आहे व वरिष्ठांच्या सुचनेनुसार वेळोवेळी खर्ची घातलेली आहे. सदरची कॉटन शॉल २२५ से.मी. लांबी x १०५ से.मी. रुंदी (श्री साईबाबा समाधी मंदिर कळसाचे चित्र असलेली, रंग पिवळा) असून प्रति एक नग शॉल खरेदीस रुपये ३८/- प्रमाणे खरेदी केल्या आहे. सदर शॉल खरेदीचे आदेश मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने मे.सुपर डाईंग ॲण्ड कॉटन मॅन्यु, कं.प्रा.लिमीटेड, सातारा यांना देण्यात आले होते. त्यांनी मागणीनुसार चांगल्याप्रकारे शॉल पुरवठा केला असुन त्यांनी पुरविलेल्या शॉलही चांगल्या दर्जाच्या आहे.

आता पुढील दि.०१/०४/२०११ ते दि.३१/०३/२०१२ या आर्थिक वर्षासाठी खरेदी विभागामार्फत १०,००० नग संस्थान प्रिंटेड शॉल खरेदी करणे कामी कोटेशन्स मागविणेस व त्याकामी होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळाणेस विनंती. तसेच सदर प्राप्त कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर ठेवणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. प्रिंटेट शॉल खरेदीकामी होणा-या खर्चाची तरतूद खरेदी विभागाचे बजेट मधुन करण्यात येईल. तरी याबाबत निर्णय व्हावा.

**निर्णय क्र.४३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०४/२०११ ते दि.३१/०३/२०१२ या आर्थिक वर्षासाठी मान्यवरांचे सत्कार करणेकामी आवश्यक असणाऱ्या प्रिंटेड शॉल १०,००० नग कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**याचवेळेस शॉली खरेदी करताना वेगवेगळया डिझाईन मागवून त्यामधून निवड करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर/ अधिक्षक, खरेदी)

---

**विषय नं.९९** **श्री साईबाबा समाधी मंदिर व व्दारकामाई मंदिरामध्ये देणगी दाखल झुंबर बसविणे बाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. संजयसिंग यांनी त्यांचेकडील दि. १८ फेब्रुवारी, २०११ व दि. २२ मार्च, २०११ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे असे कळविले आहे की,

".. .. श्री. यदुपत्ती सिंघानिया, चेअरमन, जे के व्हाईट सिमेंट हे श्री साईचे समाधी मंदिर व व्दारकामाई मंदिरासाठी सुशोभित असे ०३ झुंबर देणगी दाखल देणेस तयार असून, या ०३ झुंबरांची किंमत अंदाजे ७५ लाख ते ०१ कोटी मात्र असू शकते." तरी कृपया सकारात्मक प्रतिसाद द्यावा, ही विनंती.

श्री. संजय सिंग यांनी दि. १३ फेब्रुवारी, २०११ रोजी आपले शिर्डी भेटीत श्री साई समाधी मंदिर व श्री व्दारकामाई मंदिरातील छताची व जागेची पहाणी करुन खालील ०३ (तीन) जागा सुशोभित झुंबर लावणेसाठी सचित केल्या आहेत :-

समाधी मंदिरातील नंदीचे मागील बाजूचे नविन सभामंडपात अंदाजे १४ फुट लांबीचे व श्रीं चे मुकूटाशी साधर्म्य असलेले अंदाजे ६०० ते ७०० किलो वजनाचे.

श्री साईबाबा समाधी मंदिर - स्टेजजवळ नव्याने केलेल्या आर.सा.सी. स्लॅबला मध्यभागी - जमिनीपासुन २१'.६" उंचीवर १२' लांबीचे व पिवळसर रंगाचे झुंबर अंदाजे ४०० ते ५०० किलो वजनाचे.

द्वारकामाईमध्ये सध्या असलेल्या लोखंडी कैचीचे(Truss) मध्ये - जमिनीपासुन १६'.११" उंचीवर ७' लांबीचे व पिवळसर रंगाचे झुंबर अंदाजे २५० ते ३०० किलो वजनाचे.

**(ब)** श्री. सजंयसिंग इच्छुक देणगीदार श्री. सिंघानिया यांचे प्रतिनिधी यांनी वर नमुद केलेल्या विनंती अनुसरुन, मंदिर परिसर तथा सभा मंडपाचे आर्किटेक्ट मे. माथूर ॲण्ड काप्रे असोशिएटस्, नवि दिल्ली यांचा, झुंबराचे वजन, स्लॅबची क्षमता व त्याचे फिटींग याबाबत सविस्तर अभिप्राय घेऊन मंदिराचे सभामंडपात व व्दारकामाई मंदीरात देणगी दाखल सुशोभित झुंबर बसविणेत यावेत किंवा कसे याबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी मंदिरासमोरील नंदीचे पाठीमागील हॉलमध्ये देणगीदाखल मिळालेले झुंबर बसविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर/विद्युत विभागप्रमुख)

---

**विषय नं.१००** **श्रींचे व्दारकामाई धुनीसाठी लागणारी गोवरी खरेदीचे बिल आदा करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्रींचे द्वारकामाईमध्ये धूनीसाठी सरपण व राणशेणी गोवऱ्यांचा वापर केला जातो. या धूनीमधून काढलेली उदी साईभक्तांना देण्यात येते. मा.व्यवस्थापन मंडळाचे उपसमितीचे दि.२५/०२/२०१० रोजीचे सभेत सदरचे कोटेशन उघडून त्यापैकी निम्मतर दर असलेले गोवरी पुरवठाधारक श्री साईबाबा गोवरी विक्री केंद्र प्रोप्रा.श्री.विजय पितांबर देवरे, मालेगांव यांचेकडून प्रति किलो दर रु.४/- (अक्षरी रुपये चार मात्र) प्रमाणे राणशेणी गोवरी खरेदी करणेस मान्यता देणेत आलेली आहे. याबाबत जा.एसएसएस/मंदिर/५१६९/०९, दि.२६/०३/२०१० अन्वये त्यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. त्यांचा पुरवठा आदेश साधारण १,००,००० गोवरीचा माहे-मार्च २०११ अखेर संपला आहे. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०२/२०११ चे सभेत श्री.देवरे यांचेकडून आहे त्याच भावात गोवरी खरेदी करणेबाबत विषय

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



ठेवण्यात आला होता, परंतु, सदर विषय नामंजूर करुन कोटेशन्स मागवावे असे ठरले आहे. त्यानुसार गोवरी पुरवठा धारकांकडुन माहे-एप्रिल-२०११ ते माहे-मार्च-२०१२ या आर्थिक वर्षासाठी गोवरी खरेदी करणेकामी कोटेशन्स मागविण्यात आलेले आहे. पावसाळ्याचे कालावधीत गोवरी ओली होते त्यामुळे सदर काळात गोवरी पुरवठा केला जात नाही. करीता उन्हाळा संपण्यापुर्वी काही प्रमाणात साठा करणे आवश्यक व गरजेचे आहे. तरी पुढील गोवरीचे कोटेशन्स मंजूर होईपर्यंत व खरेदी आदेश होईपर्यंत श्री विजय पितांबर देवरे, रा.मालेगाव यांचेकडुन थेट गोवऱ्या रु.०४/- प्रति किलो प्रमाणे खरेदी करणेस व लेखाशाखेकडुन सदर बील अदा होणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. तरी याबाबत निर्णय होणेस विनंती आहे. तसेच दि.०३/०४/२०११ अखेर रु.५५,१००/-(अक्षरी रुपये पंचावन्न हजार शंभर मात्र) च्या गोव-या खरेदी केलेल्या आहेत. त्याचे बील समाविष्ट केलेले आहे. त्यासाठी कार्योत्तर मंजूरी मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, मंदिर)

---

**दिनांक १२.**

**विषय नं.१०१** **लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता इंधन खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकडील लॉण्ड्रीमध्ये साईप्रसाद निवासस्थान,द्वारावती निवासस्थान, साईबाबा भक्तनिवासस्थान,मंदिर,वाहन इ. विभागाकडील चादर, बेडशीट, रग, गादीकव्हर, उशीकव्हर, बसेसचे शीटकव्हर,आदी कपडे धुवून इस्त्री करुन देण्यात येतात. याकामी लॉण्ड्रीकडे कामकाज दोन पाळयांमध्ये करण्यात येत आहे. सदरचे कपडे धुण्याचे कामी २ युनिट (दोन मशिनरी) कार्यान्वित करण्यात आलेले आहे. त्याद्वारे प्रतिदिवशी साधारणपणे १५०० नग कपडे धुवून इस्त्री केले जातात.

धुण्यासाठी येणाऱ्या कपडयामध्ये प्रामुख्याने निवासस्थाने विभागाकडील व्ही.आय.पी.खोल्यांचे धुतलेले टॉवेल सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो तसेच पावसाळा व हिवाळा सिझनमध्ये उन्हाचे प्रमाण कमी असते अशा वेळी धुतलेले कपडे सुकविण्यासाठी ड्रायर मशिनचा वापर केला जातो त्यासाठी स्टीम बॉयलरव्दारे स्टीम देवून कपडे सुकविले जातात. धुतलेल्या कपडयांना इस्त्रीकरणेसाठी कॅलेंडर मशिनचा दैनंदिन वापर केला जातो कपडे इस्त्रीकरणेसाठी कॅलेन्डरींग मशिनला स्टीम सोडावी लागते त्यानंतर कपडा सुकून इस्त्री होवून बाहेर पडतात यासर्व मशिनरीसाठी स्टीम बॉयलर कार्यान्वित आहे. त्याकरीता डिझेल, आईल, ग्रीस श्री साई सर्व्हिस सेन्टर, सावळीविहीर यांचे पेट्रोल पंपावरुन ४६०० लिटर डिझेल आवश्यकते नुसार खरेदी करुन वापरण्यात आलेले आहे.

स्टीम बॉयलरसाठी दररोज सरासरी २५ लिटर डिझेल प्रमाणे दरमहा ७५० लि. डिझेल लागते व वाषिक ९२०० लिटर डिझेल तसेच वर्षाकरीता १० लिटर ऑईल व ५ किलो ग्रीस लागते.

तरी माहे जुलै-२०११ ते माहे जुन-२०१२ या एका वर्षाचे कालावधीकरीता अंदाजे ९२०० लिटर डिझेल स्टीम बॉयलरसाठी व कॅलेंडरींग मशिनसाठी १० लिटर ऑईल व लॉड्रीतील सर्व मशिनरीसाठी ५ किलो ग्रीसची आवश्यकता असुन त्याकामी रु.४,२०,०००/- (अक्षरी रुपये चार लाख वीस हजार) मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचे डिझेल, आईल, ग्रीस साई सर्व्हीस सेटंर,सावळीविहीर येथील पेट्रोल पंपावरुन खरेदी करता येईल.

सन २०११- २०१२ चे अंदाजपत्रकीय तरतुदीमध्ये धुलाई व गणवेश खर्च याबाबीकरीता रुपये. १०,०००००/- मात्रची तरतुद आहे.

वरीलप्रमाणे इंधन खरेदीस अंदाजे रुपये ४,२०,०००/- (अक्षरी रु.चार लाख वीस हजार ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे लॉण्ड्रीतील स्टीम बॉयलरकरीता इंधन खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ४,२०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान)

---

**विषय नं.१०२** **श्री देवकुमार शंकर साळवे निदेशक टूल ॲण्ड डायमेकर प्रत्यक्ष काम पर्यवेक्षक श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**प्रस्ताव-** दि. १६/०९/१९९६ चे आदेशाने श्री साळवे यांची श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र येथे निदेशक टुल व डायमेकर या पदावर २ वर्षे प्रोबेशन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली होती. परंतू त्यांना प्रत्यक्षात प्रशिक्षणार्थ्यांना थेरी व प्रॅक्टीकल शिकविता येत नसल्यामुळे दि. ३०/०१/१९९७ रोजी भारतीय विद्यार्थी परिषद यांनी आंदोलन छेडले होते. त्यानंतर श्री साळवे यांना संस्थान सेवेतून कमी न करता त्यांचे विनंती वरुन तेच पदनाम ठेवून विद्युत विभागाकडे त्यांची बदली करण्यात आली. तेथेही त्यांचे काम समाधानकारक नसलेने त्यानंतर त्यांची विविध विभागात पर्यवेक्षकीय कामासाठी बदल्या करण्यात आल्या. त्या प्रत्येक विभागातुन श्री साळवे यांच्या विरुध्द अनेक तक्रारी आलेल्या आहेत. सध्या त्यांचेकडे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री साईबाबा भक्त निवासस्थान विभागात पर्यवेक्षकाचे काम सोपविण्यात आलेले आहे. त्यांना सध्या ९,३००-३,४८० पे बँड मध्ये ग्रेड पे ४,२०० वेतन अदा केले जात आहे.

श्री साळवे यांनी टुल अँड डायमेकर निदेशक या पदावर पूर्ववत नेमणूक मिळावी यासाठी मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं. ५६४/१९९६ दाखल केले होते. परंतू मा. न्यायालयाने सदरचे रिट पिटीशन मेंटेनेबल नसल्याने डिसमिस केलेले आहे. दरम्यानचे काळात श्री साळवे यांनी पदोन्नती व पगारवाढ मिळणेसाठी अनेक अर्ज सादर केले. त्या बाबतचा प्रस्ताव मा. अस्थापना उपसमितीचे दि. १८/१०/२००८ रोजीचे सभेत विचारार्थ सादर केला होता. त्यात असा निर्णय झाला आहे की, "याबाबत कामगार कायदे सल्लागार श्री अशोक पाटील यांचा सल्ला घेऊन खाते चौकशी पूर्ण करुन अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा."

श्री देवकुमार शंकर साळवे, निदेशक, टुल ॲण्ड डायमेकर प्रत्यक्ष काम- पर्यवेक्षक, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांनी पर्यवेक्षक (दुरुस्ती व देखभाल) श्री साईनाथ रुग्णालय येथे कामास असताना खालील प्रमाणे गंभीर गैरशिस्त वर्तन केलेले आहे. त्याबद्दल जा. नं. एसएसएस/वशी ७ए/३२२/२००६ दि. ०२/०२/२००६ अन्वये त्यांच्यावर आरोपपत्र ठेवण्यात आलेले आहे. जा. नं. एसएसएस/वशी ७ए/३२३/२००६ दि. ०२/०२/२००६ अन्वये सदरच्या आरोपपत्राच्या खाते चौकशीकामी ॲड. बी. वाय. काळवाघे, कोपरगाव यांची खाते चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांनी नियमाप्रमाणे खाते चौकशी पूर्ण करून दि. २३/१२/२०१० रोजीचा निष्कर्ष अहवाल सादर केलेला आहे. खाते चौकशीत श्री साळवे यांचेवरील आरोप शाबीत झाल्याने ते दोषी आढळून आलेले आहेत. श्री साळवे यांचेवर आरोपपत्रात खालीलप्रमाणे आरोप ठेवण्यात आलेले आहेत.

१. श्री साळवे श्री साईनाथ रुग्णालयात कामास असतांना श्री साईनाथ रुग्णालयामध्ये वेळोवेळी जमा होणारे रुग्णांचे निष्कृष्ट अवयव इन्सीनरेटर मशिनचे साहयाने नष्ट करणे, मशिनची देखभाल व दुरुस्ती करणे, संबंधित रेकॉर्ड मेंन्टेन करणे वगैरे कामे श्री साळवे यांचेवर सोपविलेली होती. दि. १४/१०/२००५ रोजी प्रदुषण नियंत्रण कक्ष, अहमदनगर येथील अधिकाऱ्यांनी श्री साईनाथ रुग्णालयाचे इन्सीनरेटर विभागास भेट देवून कामकाजाची व कागदपत्रांची तपासणी केली. त्यावेळी त्या अधिकाऱ्यांनी श्री साळवे यांचे कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. श्री साळवे विनापरवानगी गैरहजर राहतात, कामावर आल्यानंतर उशिराने रजा अर्ज सादर करतात, कामावर असतांना कामाच्या ठिकाणी न थांबता इतरत्र फिरत असतात. दि. १५/१०/२००५ रोजी वरिष्ठांनी श्री साळवे यांच्याकडे कामाबाबत विचारणा केली असता श्री साळवे यांनी उध्दट उत्तरे दिली की, "ते काम माझ्याकडून काढून इतरांना दयावे."
२. श्री साळवे यांचे काम असमाधानकारक असल्याने प्रदुषण नियंत्रण कक्ष, नाशिक यांनी संस्थानला शोकॉज नोटीस बजावलेली आहे. त्यामुळे संस्थानच्या नावाची बदनामी झालेली आहे. शासनास माहिती पाठविणेकामी श्री साळवे यांचेकडे इन्सीनरेटर विभाग सुरु करण्याविषयीच्या परवान्याच्या छायांकित प्रतीची मागणी केली होती. परंतू ती त्यांनी न दिल्याने शासनास माहिती पाठविणेस विलंब झाला. दि. २९/१०/२००५ रोजी इन्सीनरेटर विभाग बंद करुन श्री साळवे इतरत्र फिरत होते. त्यामुळे रुग्णालयातील वेस्टेज मटेरियल वेळेवर जाळलेले नाही.
३. श्री साळवे यांनी परवान्याच्या छायांकित प्रतीची मागणी करुनही न देता ते रजेवर निघून गेले.
४. श्री साळवे यांना नोटीस पत्र बजावणेसाठी पाठविले असता दि. ०७/११/२००५ रोजी इन्सीनरेटर विभाग बंद असल्याचे आढळून आले.
५. वरिल गैरवर्तनाबाबत श्री साळवे यांना कारणे दाखवा नोटीसा काढल्या असता त्या त्यांनी स्विकारण्याचे नाकारले व स्विकारल्या नाहीत. दि. ११/०१/२००६ रोजी श्री साळवे रजेवर असतांना त्यांनी कार्यालयास कुलूप लावून त्या कुलुपाची चावी अनाधिकारे स्वतःचे घरी घेवून गेले. श्री साळवे यांना वरिष्ठांनी वेळोवेळी सुचना दिलेल्या असतानाही त्यांच्या कामात व वर्तनात सुधारणा झाली नाही.

अशाप्रकारे वरिष्ठांच्या योग्य आज्ञेचे पालन न करणे, जाणून-बुजून उद्यामपणा करणे, कामात वेळकाढूपणा व टाळाटाळ करणे, विनापरवानगी गैरहजर राहून नंतर उशिराने रजा अर्ज सादर करणे, वरिष्ठांना उलट, उध्दट उत्तरे देणे, वरिष्ठांशी व सहकर्मचाऱ्यांशी विनाकारण वाद घालणे, कामावर असतांना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय व योग्य कारणाशिवाय कामाच्या जागी गैरहजर राहणे, कारणे दाखवा नोटीसा स्विकारणेस नकार देणे, कार्यालयाची चावी अनाधिकारे स्वतःचे घरी घेवून जाणे, यापूर्वी अनेकवेळा शासन झालेले असतानाही तशाच प्रकारच्या गैरवर्तनाची पुनरावृत्ती करणे ही श्री साळवे यांची कृत्ये स्थायी आदेशानुसार गंभीर गैरशिस्त वर्तनात मोडतात. त्यांना आतापर्यंत गैरशिस्त वर्तनाबद्दल ३७ वेळा शासन झालेले आहे. त्यापैकी ८ वेळा त्यांनी विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी यांना उलट, उध्दट उत्तरे देणे, त्यांना अरेरावीच्या भाषेत शिवीगाळ करणे, जीवे मारण्याची धमकी देणे, यासाठी शासन झालेले आहे. श्री साळवे यांना दि. २१/१०/२००२ रोजी मा. कार्यकारी अधिकारी साो. यांनी त्यांचे कक्षात

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



बोलावून श्री साळवे यांना त्यांचे कामकाजाबाबत विचारणा केली असतांना श्री साळवे यांनी मा. कार्यकारी अधिकारी साो. यांना मोठमोठया आवाजात आरडा-ओरड करुन अरेरावीची भाषा वापरली आहे.

खाते चौकशी चालू असतांना दि. ०१/०९/२००८ रोजी श्री साळवे कामावर असतांना वरिष्ठांच्या परवानगीशिवाय, योग्य कारणाशिवाय कामाची विहीत वेळ संपण्यापूर्वी कामावरुन निघून गेले. दि. २१/०८/२००८ रोजी श्री साळवे यांनी भक्तनिवासस्थान विभागातील अंतर्गत दूरध्वनीवरून आस्थापना अधिक्षक यांना उपरोधात्मक भाषेत दमबाजी केली.

द इंडस्ट्रीयल अम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम २५(१) नुसार गैरवर्तनाबद्दल दोषी असलेल्या कर्मचारी / अधिकारी यांना खालीलप्रमाणे शिक्षा सुचित केलेल्या आहेत.

अ. ताकीद दयावी किंवा ठपका दयावा.

ब. पेमेंट ऑफ मेजेस ॲक्ट १९४६ च्या तरतुदीच्या मर्यादेत राहून आणि त्यानुसार दंड करावा.

क. चार दिवसांपेक्षा जास्त नाही इतका काळ त्या व्यवस्थापकाच्या सहीच्या आदेशाने सस्पेंड करावे.

ड. नोटीसीशिवाय बडतर्फ करावे.

श्री साळवे यांना करावयाचे शिक्षे बाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री देवकुमार शंकर साळवे निदेशक टूल ॲण्ड डायमेकर प्रत्यक्ष काम पर्यवेक्षक श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत द इंडस्ट्रीयल अम्प्लॉयमेंट (स्टॅंडींग ऑर्डर्स) ॲक्ट १९४६ चे कलम २५(१) नुसार नोटीसीशिवाय बडतर्फ करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**विषय नं. १०३** **श्री विलास शामराव घोडेराव, बडतर्फ मदतनीस, प्रसादालय विभाग यांचे विरुध्द संस्थान निवासस्थान खाली करुन घेणेकामी मा.दिवाणी न्यायालय (सि.डी) कोपरगांव येथे दावा /कोर्ट केस दाखल करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री.विलास शामराव घोडेराव हे प्रसादालय विभागात मदतनीस म्हणून सेवेत असतांना त्यांचेकडून गैरशिस्त वर्तन घडले होते. सदर गैरशिस्त वर्तनाबाबत श्री.घोडेराव यांना आरोपपत्र देवून, त्यांची खातेचौकशी करणेत आली. खाते चौकशीमध्ये श्री.घोडेराव हे अंशतः दोषी असल्याचा निष्कर्ष अहवाल ॲडव्होकेट श्री.बी.वाय.काळवाघे, चौकशी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास अनुसरून श्री.घोडेराव यांना मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९-०८-२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०० नुसार व जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१०१९९/२००९ दि.१३-०८-२००९ रोजीचे आदेशान्वये दि.१४-०८-२००९ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे. दरम्यानचे काळात श्री.घोडेराव यांनी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे बडतर्फी आदेशा संदर्भात संस्थान विरूध्द रेफरंन्स (आय.डी.ए.)क्र.४०/२०१० ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. सदर कोर्ट केस संबंधीत न्यायालयात सध्या प्रलंबीत असून, न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.घोडेराव हे संस्थान सेवेत कार्यरत असतांना त्यांना व त्यांचे कुटुंबीयांना निवासासाठी संस्थानचे समर्पण इमारतीमधील खोली क्र.१८ हे निवासस्थान संस्थान सेवेत असे पर्यंत तात्पुरते स्वरूपात परवानाधारक या नात्याने देण्यात आले आहे. त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत दि.१४-०८-२००९ पासून संस्थान सेवेतून कायम स्वरूपी बडतर्फ (डिसमिस) करणेत आलेले आहे. तथापि, त्यांनी त्यांचे ताब्यात असलेले संस्थानचे निवासस्थान अद्यापपर्यंत खाली करून, श्री साई प्रसाद निवासस्थान विभागाकडे जमा केलेले नाही.

म्हणून श्री.घोडेराव यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३४३९/२०१० दि.२१-०६-२०१० रोजीचे नोटीशी अन्वये त्यांचे ताब्यात असलेले संस्थानचे समर्पण इमारत, रूम नं.१८ हे निवासस्थान आठ दिवसांचे आंत खाली करून दयावे असे कळविणेत आले होते. तथापि, त्याबाबत त्यांना अनेकवेळा तोंडी सुचना देणेत आलेल्या आहेत. तथापि, त्यांनी संस्थानचे सदर निवासस्थान अद्यापपर्यंत खाली करून श्री साई प्रसाद निवासस्थान यांचे ताब्यात दिलेले नाही.

संस्थान सेवेतून सेवामुक्त/बडतर्फ केलेल्या कर्मचाऱ्यांचे ताब्यातील संस्थानचे निवासस्थान खाली करून, ताब्यात घेणेसंदर्भात संस्थान कामगार कायदे सल्लागार श्री.अशोकराव पाटील, ॲडव्होकेट, अहमदनगर यांचा दि.२६-०७-२०१० रोजीचा लेखी कायदेशीर अभिप्राय घेणेत आला. त्यात त्यांनी "It is a settle position of law that the employee having accommodation by management is a licensee and not a tenant therefore it is advisable to file applications in pending cases on our behalf for getting the quarters vacated and seek the orders of the court. If we go for forceful evacuation by doing panchnama then it may give birth to certain false criminal cases and therefore it is better and advisable to take the decision for filling application before the court" असे म्हटलेले आहे. श्री.घोडेराव यांचे विरूध्द मा.दिवाणी न्यायालय, (सि.डी.), कोपरगांव येथे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दाखल करावयाचे दाव्याचा/कोर्ट केसेसचा मसुदा ॲडव्होकेट श्री.मिलींद पी.गुजराथी, कोपरगांव यांचेकडून तयार करून घेणेत आलेला आहे.

सबब, श्री.विलास शामराव घोडेराव यांचे ताब्यातील संस्थानचे समर्पण इमारतीमधील रूम नं.१८ हे निवासस्थान खाली करून,त्याचा ताबा संस्थानला मिळावा याकरीता संस्थानचे वतीने श्री.घोडेराव यांचेविरूध्द मा.दिवाणी न्यायालय (सि.डी.), कोपरगांव येथे ॲडव्होकेट श्री.मिलींद गुजराथी, कोपरगांव यांचेमार्फत दावा/कोर्ट केस दाखल करणेस व त्याकामी येणाऱ्या कोर्ट फी स्टॅम्प व इतर कोर्ट खर्चास मान्यता असावी. तसेच श्री.घोडेराव यांचेविरूध्द दावा दाखल करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देणेस मान्यता असावी.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.विलास शामराव घोडेराव यांचे ताब्यातील संस्थानचे समर्पण इमारतीमधील रूम नं.१८ हे निवासस्थान खाली करून,त्याचा ताबा संस्थानला मिळावा याकरीता संस्थानचे वतीने श्री.घोडेराव यांचेविरूध्द मा.दिवाणी न्यायालय (सि.डी.), कोपरगांव येथे ॲडव्होकेट श्री.मिलींद गुजराथी, कोपरगांव यांचेमार्फत दावा/कोर्ट केस दाखल करणेस व त्याकामी येणाऱ्या कोर्ट फी स्टॅम्प व इतर कोर्ट खर्चास तसेच श्री.घोडेराव यांचेविरूध्द दावा दाखल करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना देणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-कामगार अधिकारी)

---

**विषय नं.१०४** **विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघाला श्री साईबाबांचे सोन्याचे नाणे भेट देणेबाबत.**

**प्रस्ताव-** भारतीय क्रिकेट संघाने नुकताच विश्वचषक जिंकलेला आहे. यामुळे सर्व भारतीयांना मोठा आनंद झालेला असून विविध संस्था, सरकारांकडून खेळाडूंचा बहुमान होत आहे. विजयी भारतीय संघातील जे खेळाडू श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येतील त्यांचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करावा व सन्मानार्थ १० ग्रॅम वजनाचे श्री साईबाबांचे सोन्याचे नाणे दर्शनासाठी येणा-या खेळाडूस भेट द्यावे, अशा सूचना मा.अध्यक्ष सो.यांनी दिलेल्या आहेत. भारतीय संघातील खेळाडू श्री.सुरेश रैना दिनांक ०४.०४.२०११ रोजी श्री साईबाबांचे दर्शनासाठी आले असता त्यांना वरीलप्रमाणे १० ग्रॅम सोन्याचे नाणे देवून सत्कार केलेला आहे.

तसेच मास्टर ब्लास्टर श्री.सचिन तेंडूलकर यांचेही क्रिकेटमध्ये मोठे योगदान असून तेही विजयी संघातील वरिष्ठ खेळाडू आहेत. शिवाय ते महाराष्ट्राचे असल्याने सर्वानाच त्याचा अभिमान आहे. त्यांनी क्रिकेटमध्ये वेगवेगळे विश्वविक्रम केलेले आहेत. यानिमित्ताने श्री.सचिन तेंडूलकर यांना साईबाबा संस्थानच्या वतीने "साईरत्न" पुरस्कार देवून गौरविण्यात येणार असल्याची घोषणा मा.अध्यक्ष सो.यांनी दिनांक ०४.०४.२०११ रोजी केलेली आहे.

सोन्याच्या १० ग्रॅमचे नाण्याची आजची किंमत रुपये २२,९००/- अशी आहे. संघातील १६ खेळाडूंना वरील प्रमाणे सोन्याचे नाणे देण्यास अंदाजे रुपये ३,६६,४००/- खर्च येईल व त्या त्या वेळी असणा-या विक्री किमतीनूसार खर्च टाकता येईल.

मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, विश्वचषक विजेत्या भारतीय क्रिकेट संघातील १६ खेळाडूंना प्रत्येकी १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे नाणे देण्यास व याकामी येणारा खर्च त्या त्या वेळी असणा-या विक्री किमतीनूसार खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी३/मुख्य लेखाधिकारी)

---

**विषय नं.१०५** **साईटेक प्रकल्पाअंतर्गत विकसीत करण्यात येणाऱ्या ऑनलाईन सर्व्हिसेससाठी घ्यावयाच्या धोरणात्मक निर्णयाबाबत.**

**प्रस्ताव-** साईटेक प्रकल्पाअंतर्गत भक्तांना पुरविण्यात येणा-या विविध सुविधेअंतर्गत,इंटरनेटवर ऑनलाईन रुम रिझर्वेशन , डोनेशन,बुकशॉप,मेंबरशिप इ.सेवा पुरविण्यात येणार आहेत.याचाच पहिला टप्पा म्हणून प्रायोगिक तत्वावर सुविधा भक्तांना उपलब्ध करुन दयावयाची असल्याने काही धोरनात्मक निर्णय प्रायोगिक तत्वावर घ्यावे लागणार आहे. त्याचा गोषवारा खालील प्रमाणे-

**I. ऑनलाईन रुम रिझर्वेशन :**

इंटरनेटवर ऑनलाईन सर्व्हिसेससाठी मुल्यांकन दर ५०/- रुपये इतका घेण्यात यावा असे निर्देश सल्लागार समितीचे अध्यक्ष मा.श्री.के.व्ही.रमणी सो व मा.अध्यक्ष यांनी दिले होते. सदरची रक्कम ही सर्वसाधारण देणगी खाती जमा करण्यात यावी, असे ठरले.

इंटरनेटवरुन व माहीती सुविधा केंद्रावरुन आरक्षणासाठी ठरावीक खोल्यांचा कोटा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सदरच्या खोल्यांचे नियोजन व्यवस्थीत करता यावे या दृष्टीने, इंटरनेटद्वारे आरक्षीत करण्यासाठी उपलब्ध असलेले रुम साईभक्तांनी शिरडीस येण्याचे अगोदर किमान ०३ दिवस आरक्षीत करणे गरजेचे राहील, त्यानंतर (१ किंवा २ दिवस) सदरची रुम आरक्षीत करता येणार नाही, तसेच पुढील जास्तीत जास्त ६० दिवसांपर्यंतचेच खोलीचे आरक्षण उपलब्ध असेल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपलब्ध खोल्यांचा उपयोग जास्तीत जास्त साईभक्तांना घेता यावा या दृष्टीने इंटररनेटवरुन अथवा माहीती केंद्रावरुन एका भक्तास जास्तीत जास्त ०२ रुमचे रिझर्व्हेशनची सुविधा उपलब्ध करुन द्यावी, तसेच एका खोलीस १ दिवस आरक्षण व १ दिवस आवश्यक असल्यास अतिरीक्त असे फक्त ०२ दिवसाचे आरक्षण देता येईल.

इंटरनेटवरुन अथवा माहीती केंद्रावरुन आरक्षीत केलेली रुम साईभक्तास रद्द करावयाची असल्यास त्याने सदरचे रुम आरक्षण किमान तीन दिवस अगोदर रद्द करणे गरजेचे राहील जेणेकरुन सदरची रुम दूसऱ्या साईभक्तांस उपलब्ध करुन देणे सोपे होईल. रुम रद्द केल्यास सर्व्हिस चार्जेस वगळता, रुमसाठी घेण्यात आलेल्या रक्कमेच्या ५०% रक्कम चेक/डीडीने परत करता येईल.

इंटरनेटवरुन अथवा माहीती केंद्रावरुन आरक्षीत केलेल्या रुमचे नियोजन व्यवस्थीतरित्या करता यावे या दृष्टीने आरक्षणसाठी उपलब्ध करुन दिलेल्या रुमसाठी एकच चेक आऊट टाईम (दुपारी ३.००) ठेवण्यात यावा, असे नम्र मत आहे. तसेच इंटरनेटवरुन अथवा माहीती केंद्रावरुन आरक्षीत केलेली रुम ठरवून दिलेल्या वेळेनंतर कमाल एक तासाचे आत ताब्यात घेणे आवश्यक आहे. आरक्षीत केलेली रुम वेळेवर ताब्यात न घेतल्यास सदरची रुम आवश्यकतेप्रमाणे स्थानिक कोठयाधून उपलब्ध करुन देण्यात यावी व त्या रुमचा चेक-आऊट टाईम दुपारी ०३.०० वा. चा ठेवावा, जेणेकरुन सदरच्या रुमचे पुढील आरक्षण केलेल्या भक्तास रुम वेळेवर मिळेल.

इंटरनेटवरुन अथवा माहीती केंद्रावरुन आरक्षणसाठी सद्यस्थिीत पुढीलप्रमाणे रुम उपलब्ध कराव्यात, आवश्यकता व प्रतिसाद पाहुन भविष्यात मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदरच्या रुम कमी-जास्त करण्यात येईल.

सध्या प्रायोगिक तत्वावर खालीलप्रमाणे रुम भक्तांसाठी On-Line (माहिती केंद्र व इंटरनेटवर) उपलब्ध करता येईल.

| | |
|---|---|
| व्दारावती (AC) | - ३० |
| नविन भक्तनिवासस्थान(AC) | - ३० |
| व्दारावती (Non-AC) | - ६० |
| नविन भक्तनिवासस्थान (Non-Ac) | - ३० |
| **एकुण** | **१५०** |

रुम सोडण्यासाठी ठरवून दिलेल्या वेळेनंतर एक तास अतिरीक्त वेळ देण्यात यावा व त्यानंतर पुर्ण भाडे आकारण्यात यावे. तसेच इंटरनेट व माहीती सुविधा केंद्रावर प्रिंट करावयाच्या पावत्यांचा फॉर्मेट लेखाशाखा विभागाने निश्चित करावा. रुम साठी देणगी देणाऱ्या भक्तांसाठी रुम आरक्षणाची सुविधा सद्यस्थितीत फक्त माहिती केंद्रावर उपलब्ध करुन देता येईल.

**II. दर्शन पास :**

माहीती केंद्र व इंटरनेटवरुन पुढील जास्तीत जास्त ६० दिवसांपर्यंतचे आरती अथवा दर्शनाचे बुकिंग उपलब्ध करता येईल. इंटरनेट व माहीती सुविधा केंद्रावरुन सद्यस्थितीत फक्त दर्शनाचे बुकींग उपलब्ध करुन देण्यात यावे. इंटरनेट व माहीती केंद्रावरुन पाहीजे त्या टाईम स्लॉटमधील (उपलब्ध असल्यास) बुकिंगची सुविधा असेल.

**III. प्रसाद भोजन कुपन योजनाः**

या योजनेअंतर्गत साईभक्तास माहीती केंद्र अथवा इंटरनेटवरुन देणगी द्यावयाची असल्यास किमान १५ दिवस अगोदर देणगी देणे गरजेचे आहे. इंटरनेट व माहीती सुविधा केंद्रावरती उपलब्ध तारखा दर्शविणारे पुढील दोन वर्षाचे कॅलेंडर उपलब्ध करुन देता येईल.

**IV. माहीती व सुविधा केंद्र :**

माहीती व सुविधा केंद्राची कार्यालयीन वेळ सकाळी १०.०० ते ०६.०० असी असेल. तसेच तेथे जमा होणाऱ्या रक्कम ही स्थानिक बँकेत जमा करता येईल.

**V. Single Window (एक खिडकी )**

मा.के.व्ही.रमणी साो. यांनी साईभक्तांच्या सोयीसाठी संस्थानमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवा एकाच ठीकाणी उपलब्ध करुन द्याव्यात असे सुचविले आहे, यासाठी त्यांनी नविन प्रसादलयातील तळ माळयावरील हॉल तसेच साई आश्रम येथील जागा सुचविल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे साईटेक प्रकल्पाअंतर्गत विकसीत करण्यात येणाऱ्या ऑनलाईन सर्व्हिसेसच्या कार्यप्रणालीचे प्रायोगिक तत्वावर सुरु करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४४२ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली, तसेच साईभक्तांसाठी ५० टक्के ऑनलाईन आरक्षण व ५० टक्के वाटप शिर्डी येथे आल्यावर समक्ष करण्याची पध्दती ठेवण्यात यावी तसेच शिर्डीतून करण्यात येणारे खोली आरक्षण विचारात घेऊ नये,रुपये १००/-**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**पेक्षा जास्त सेवाआकार असणाऱ्या खोल्यांसाठी इंटरनेटवर ऑनलाईन सर्व्हिसेससाठी मुल्यांकन दर रुपये १०/- आकारण्यात यावे,असें ठरले.** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०६ HP कंपनीस Brahm Device ला लाईव्ह दर्शन सिग्नल पुरविणेबाबत.**

**प्रस्ताव-** टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांचेमार्फत श्रींचे Live Darshan सुविधा सुरु करणेत आलेली आहे. यासाठी त्यांना संस्थानमार्फत सिग्नल पुरविण्यात आलेले आहे. एचपी कंपनीच्या Brahma Device वर Live Darshan सुविधा सुरू करणेसाठी टाटा कम्युनिकेशन्स मार्फत सिग्नल मिळणेसाठी विनंती केलेली आहे. परंतू यापुर्वी एचपी कंपनीला सदर Live Darshan चे सिग्नलची घेणेकामी प्रायोगिक तत्वार सिग्नल मिळावे व त्या बदल्यात संस्थानला रुपये एक लाख रॉयल्टी देणार होते. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव, मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०९/२००९ रोजीचे सभेत सादर केला असता सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ०२ नुसार, एचपी कंपनीच्या Brahma नावाचे Device बाजारात येणार असून त्यावर श्रींचे Live Darshan ची सुविधा देणेचा फेर प्रस्ताव दिनांक २१/११/२०१० चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केला असता. एची पी कंपनीला टाटा कम्युनिकेशन्स लि. मुंबई यांचेमार्फत लाईव्ह सिग्नल तीन महिने कालावधीसाठी विना मोबदला ट्रायल बेसीसवर देण्यात यावे, सदर सिग्नलचा किती लोक वापर करतात, याची तपासणी करुन रक्कम ठरविणेत यावी, असे ठरले. त्यानुसार एचपी कंपनीने Brahma नावाचे Device बाजारात आणले असून दिनांक २१/११/२०१० पासून त्यावरलाईव्ह दर्शन सुविधा सुरु केलेली होती. टाटा कम्युनिकेशन्स लि., मुंबई यांनी फक्त दोन महिन्याची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. ०५ ने दिलेली आहे. सदरच्या कालावधीत Brahma Device चे अंदाजे २२०० नगांची विक्री झालेली आहे. एक नगाची किंमत त्यांनी १९,९९९/- असी ठेवलेली आहे.

मा. अध्यक्ष सो. यांनी टाटा कम्युनिकेश यांचे प्रतिनिधी श्री पराग बावस्कर यांचेशी दुरध्वनीव्दारे चर्चा करुन सदरचे लाईव्ह दर्शन बंद करणेस सांगितलेले होते. परंतू त्यांनी ते बंद न करता तीन माहिन्यांची मुदत संपलेनंतरच दिनांक २१/०२/२०११ पासून ते बंद केलेबाबत दिनांक २५/०२/२०११ रोजीचे ई-मेलव्दारे इकडील विभागास कळविलेले आहे.

तरी, एचपी कंपनीस त्यांचे Brahma Device वर श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा टाटा कम्युनिकेशन्स यांचे मार्फत सुरु करणेच्या यथा-योग्य निर्णयार्थ सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीची सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४४३ यावर सविस्तर चर्चा होऊन, एचपी कंपनीस त्यांचे Brahma Device वर श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधाचे प्रात्यक्षिकाचे सादरीकरण पूढील सभेपुढे करणेस सांगण्यात यावे व अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले** (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०७ अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेच्या वार्षिक दुरुस्ती व देखभाल कराराचे नुतनीकरण करणे बाबत**

**प्रस्ताव-** संस्थानची अंतर्गत दुरध्वनी व्यवस्था अधिक गतीमान व अत्याधूनीक होणेसाठी तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाने दि.३१/०३/२००४ रोजी घेतलेल्या निर्णय क्र. १७९ नूसार, Siemens Hipath ४३०० IP हि २००० लाइन्स क्षमतेची अद्ययावत डिजीटल ईपीबीएक्स यंत्रणा मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडून खरेदी करून, दि.२२ जुलै,२००४ रोजी कार्यान्वीत केलेली आहे. सदर कार्यादेशातील वर्णनाप्रमाणे दुरध्वनी यंत्रणेचा हमी कालावधी २१ जुलै,२००६ रोजी संपले नंतर पुढील कालावधीकरीता वार्षीक दुरूस्ती व देखभाल करार करणेकामी दुरध्वनी यंत्रणा खरेदिच्या एकुण किंमतीच्या ९% रक्कम अदा करणेत यावी, असे कार्यादेशातील नूसार ठरलेले आहे.

कार्यादेशाचा हमी कालावधी संपलेनंतर दि.२२ जुलै २००६ ते दि.२२ जुलै२०१० अखेर सलग ०४ वर्षे दुरूस्ती देखभालीचे काम संबंधीत कंपनीला देण्यात आलेले आहे. परंतू जुलै,२०१० अखेर कंपनीकडून दुरूस्ती देखभालीची जी कामे बाकी होती ती त्यांनी करून द्यावी म्हणून त्यांना सन २०१० ते सन २०११ पर्यंतचे दुरूस्ती देखभालीचे काम दिलेले नाही. परंतू वरील कालावधीत कंपनीने शिल्लक कामे पुर्ण करून दिलेली आहेत.

सन २०११-१२ या कालावधीत दुरूस्ती देखभालीसाठी कंपनीने कळविल्याप्रमाणे व संस्थानकडे उप्लब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे, संस्थानने कंपनीकडून आत्तापर्यंत २७,६१,४५७.१४ रूपयांची यंत्रणा खरेदि केलेली आहे. त्यांची दुरूस्ती देखभालीची फि ९%प्रमाणे रू.२,४८,५३१.१४ + ३%सर्व्हीस टॅक्स २५,५९८.७१ रू. असे एकुण २,७४,१२९.८५ चे पुर्णांकीत रू.२,७४,१३०.०० होत आहे.

Siemens Hipath ४३०० IP हि अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा नविन डिजीटल तंत्रज्ञानावर आधारीत आहे, यंत्रणेच्या दुरूस्ती देखभालीसाठी आवश्यक असलेले स्पेअरपार्ट कंपनी इतर कुणालाही देत नाही. दुरध्वनी यंत्रणा विनाव्यत्यय नियमीतपणे चालू असावी यासाठी दुरूस्ती देखभालीचे काम संबंधीत कंपनीला देणे आवश्यक आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



सबब २२ जुलै, २०११ ते २२ जुलै,२०१२ अखेर दुरूस्ती देखभालीकामी सदर कंपनीला रू.२,७४,१३०/- (अक्षरी रू.दोन लाख चव-याहत्तर हजार एकशेतीस) अदा करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.४४४ यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानचे Siemens Hipath ४३०० IP या अंतर्गत दुरध्वनी यंत्रणेचे २२ जुलै, २०११ ते २२ जुलै,२०१२ अखेर दुरूस्ती देखभालीचे काम मे. सिमेन्स ली. मुंबई यांचेकडून करुन घेण्यास व याकामी येणारे रक्कम रुपये २,७४,१३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं. १०८ एल.ई.डी टिव्ही खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** समाधी मंदिरात नंदिपासून स्टेजपर्यंतच्या भव्य हॉलमध्ये साई भक्तांना कुठल्याही ठिकाणाहून टीव्हीच्या स्क्रीनवर श्री साईंच्या चारही मंदिरातील दृष्ये व्यवस्थीत दिसावेत यासाठी नंदिच्या दोन्ही बाजूस एल.जी. कंपनीचे ६० इंची प्लाइमा टाइप टीव्ही लावलेले आहेत.

१. सदरचे टीव्ही मुंबई येथिल पोर्णीमा इस्टेट डेव्हलपर्स व तकशीला बील्डर्स यांनी दि.०७/०४/२००७ रोजी प्रत्येकी किंमत ३,८०,०००/- रूपये प्रमाणे देणगी दिले आहेत. तेव्हापासून सदर टीव्ही सकाळी ३.३० ते रात्रौ ११ वाजेपर्यंत नियमीत चालु असतात. सदर टीव्ही दोन वेळा बंद पडले असताना कंपनीचे प्रतिनीधींकडून टीव्ही चालु करवून घेतले आहेत.सदर टी.व्ही. काही दिवसात बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही, याकरीता तेथिल टीव्ही बदलविणे आवश्यक आहे. सोनी कंपनीने एल.सी.डी. ऐवजी एल.इ.डी. हे नविन तंत्रज्ञानाचे टीव्ही माकेटमध्ये आणले आहेत. हे टीव्ही उजेडात,उन्हातही सुस्पष्ट दिसतात. या टीव्हींना शार्पनेस, रिझॉल्युशन एल.सी.डी. टीव्हींपेक्षा जास्त असल्यामूळे हे टीव्ही अधिक सुस्पष्ट दिसतात. जूने टीव्ही बदलवून वरील ठिकाणी ६०" एल.इ.डी. टीव्ही बसविणे योग्य होइल. त्यांची प्रत्येकी किंमत सुमारे ४,००,०००/- असून तुर्त ०१ टीव्ही खरेदिसाठी सुमारे ४,००,०००/- रू. खर्च येण्याची शक्यता आहे.

२. आय.टी. विभागाने डाटा सेंटर येथे NOC रूममध्ये सॉफटवेअर डेमो किंवा पुर्ण नेटवर्क मॉनीटरींगसाठी तेथे सोनी कंपनीचे ५५ इंची एल.इ.डी. टीव्ही लावणे योग्य होइल या टीव्हीची किंमत १,८०,०००/- इतकी आहे.

३. साई निवास अतिथीगृह येथे व्हीआय पी रूम नं.१ व २ चे एकत्रीत नुतनीकरण झालेले आहे, तेथे ३२ इंची एल.सी.डी. टीव्ही बसविणे योग्य होइल. त्याची किंमत सुमारे ४५,०००/-रू याप्रमाणे एका टीव्हींसाठी ४५,०००/-रू. खर्च येण्याची शक्यता आहे.

वरीलप्रमाणे १+२+३ अन्वये तीन टीव्ही खरेदिसाठी अंदाजे ४,००,०००.००+ १,८०,०००.००+ ४५,०००.०० =६,२५,०००.०० (अक्षरी रक्कम रूपये सहा लाख पंचवीस हजार) चे खर्चास व टीव्ही खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने खरेदि करण्यास मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.४४५ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे तीन नग एल.ई.डी टि.व्ही खरेदी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०९ मशिनरींच्या सुरक्षीततेसाठी फ्लाईट केस बनविणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईंबाबांच्या उत्सवात तसेच वर्षभरातील विशीष्ट कार्यक्रमांसाठी निमंत्रीत कलाकारांचे कार्यक्रम सादर होतात. कार्यक्रमासाठी जमलेल्या श्रोत्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता यावा यासाठी संस्थानने वेळोवेळी उच्च प्रतिची साउंड सीस्टीम व इतर यंत्रणा खरेदि केलेली आहे. सदर सीस्टीम अंतर्गत असलेले स्पिकर्स,ॲम्प्लीफायर्स व इतर मशीनरी या नाजूक असून जापान, यु.एस.ए. मेड व जास्त किमतीच्या आहेत.

अशा मशीनरींनी दिर्घकाळ काम द्यावे, धुळीपासून तसेच त्याची ने-आण करताना त्यांचे बॉडीचे संरक्षण व्हावे यासाठी फ्लाइट केसेस बनवून घ्यावयाच्या आहेत, अशा केसेस अमेरीकन प्लायवूडपासून व चांगल्या असोसीरीजपासून बनविल्या जातात. आता ॲम्प्लीफायर्स, मॉनीटर स्पिकर व इतर मशीनरींसाठी फ्लाइट केसेस तयार करावयाच्या आहेत. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

| अ.नं. | मशीनरी/स्पिकर्स वर्णन | नग | अंदाजे एकुण दर |
|---|---|---|---|
| ०१ | **A)** क्राउन ॲम्प्लीफायर ३६०० VZ ०२ नग<br>**B)** क्राउन ॲम्प्लीफायर MAI९००० ०१ नग | ०१ कॅबीनेट (फलाइट केस) पुढील व मागील बाजूने कव्हर ओपन करता आले पाहीजे, वरील बाजूने दोन फॅन लावणेसाठी व साइडला इले. बोर्ड लावणेसाठी जागा आवश्यक तसेच खालील बाजूस उच्च प्रतीचे व्हील व लॉक | २५,०००.०० |
| ०२ | **A)** QSC ॲम्प्लीफायर RMX२४५<br>**B)** स्टुडीओ मास्टर ॲम्प्लीफायर. १.५<br>**C)** स्टुडीओ मास्टर ॲम्प्लीफायर २.० | ०१ कॅबीनेट वरील प्रमाणे | २५,०००.०० |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | जे बी एल मॉनीटर स्पिकर SRX७१२m V२ दोन नग स्पिकर साठी | ०१ फलाइट केसमध्ये दोन स्पिकर | २०,०००.०० |
| ०४ | यामाहा मॉनीटर स्पिकर१०V २ नग स्पिकरसाठी | ०१ फलाइट केसमध्ये दोन स्पिकर | १८,०००.०० |
| ०५ | **A)** कंट्रोल सिस्टीम DBX २६०<br>**B)** इक्व्यालायझर यामाहा Q२०३१B<br>**C)** सोनी डीव्हीडी प्लेयर | ०१ कॅबीनेट फलाइट केसमध्ये तीनही मशीनरी | ८,०००.०० |
| ०६ | **A)** कंट्रोल सीस्टीम क्रॉस ओव्हर AG२३B<br>**B)** प्रोसेसर मॉडेल DSP१६<br>**C)** जादा स्पेस | ०१ कॅबीनेट फलाइट केसमध्ये तीनही मशीनरी | ८,०००.०० |
| ०७ | १२छx१२छx१०छ फलाइट केस | ०१ फ्लाइटकेस बॉक्स(कॉड व ॲसेसीरीजसाठी) | ६,०००.०० |
| ०८ | **DISC** mic-shure- exg१८ ०२ नगासाठी | ०१ केस (बॉक्स) | १३,०००.०० |
| ०९ | सनायझर वायरलेस माइक ew ३६५ G२ | ०१ पेटी | ४,०००.०० |
| १४ | सनायझर माइक EW११२G३ | ०२ पेटी | ८,०००.०० |
| १५ | सनायझर प्रझेंटेशन सेट ew११०G३ | ०१ पेटी | ४,०००.०० |
| | | एकुण | १,३९०००.०० |
| | | वॅट १२.५% | १७,३७५.०० |
| | | **एकुण** | **१,५६,३७५.००** |

वरील यंत्रणेच्या व मॉनीटर स्पिकरच्या केसेस तयार करवून घेणेसाठी सुमारे १,५६,३७५.०० रू.चे पुर्णांकीत १,६०,०००/- रू. (अक्षरी रूपये एक लाख साठ हजार रूपये) खर्च येत आहे. तरी कृपया खरेदी विभागामार्फत मुंबई येथून कोटेशन मागवून केसेस/कॅबीनेट तयार करवून घेणेस मान्यता मिळावी हि विनंती.

**निर्णय क्र.४४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, ध्वनीक्षेपना विभागाचे मशिनरींच्या सुरक्षीततेसाठी फ्लाईट केस कोटेशन्स मागवून तयार करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-ध्वनीक्षेपन विभागप्रमुख)

---

**विषय नं.११० भंगार वस्तूच्या लॉटची जाहिर लिलावाने विक्री केलेल्या कार्यवाहीचा अहवाल**

**प्रस्ताव-** **अ)** गुरूवार, दि.१६/१२/२०१० रोजी जाहीर लिलावाने विक्री केलेल्या लॉटची माहीती खालीलप्रमाणे-

| लॉट नं. | लॉटचा तपशील | पावती नं. | दिनांक | रक्कम | खरेदी करणा-या व्यापा-याचे नांव/पत्ता/फो.नं. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | इलेक्ट्रीक गिझर्स-२८ नग | १४४३,<br>२१५८,<br>२१८२. | २०/१२/२०१०,<br>३०/०३/२०११,<br>३१/०३/२०११.<br>**एकुण-** | ४०,०००.००<br>१,००,०००.००<br>५०,०००.००<br>**१,९०,०००.००** | मे.अभिषेक इलेक्ट्रीकल, मु.पो.ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर. मो.नं.९८२२६३०५१९. | संबंधीतांनी लॉटची तीनवार बोली रक्कम संस्थान फंडात जमा केलेली असून त्यांना त्यांचे साहित्य ताब्यात देण्याचे काम चालू आहे. |
| ०२ | नादुरूस्त मशिनरी (हॉट वॉटर बॉयलर, केअर फ्री कॅटेलिक वॉटर कन्डीशनर, क्लोरिनेटर) | १४१०,<br>१६६४. | १६/१२/२०१०,<br>२८०१/२०११.<br>**एकुण-** | ५०,०००.००<br>१,८६,७८६.०<br>**२,३६,७८६.००** | न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, सय्यद हुसेन शमा, मु.पो.ता.कोपरगांव, जि.अ.नगर. मो.नं.९८५०८८१२१८. | संबंधीतांनी लॉटची तीनवार बोली रक्कम संस्थान फंडात जमा करून त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. |
| ०३ | नादुरूस्त झेरॉक्स मशिनरी | १४१२,<br>१६५६. | १६/१२/२०१०,<br>२६/०१/२०११.<br>**एकुण-** | २,०००.०० ६,०००.००<br>**८,०००.००** | मे.सिमा स्क्रॅप सेंटर, मु.पो.ता.कोपरगांव, जि.अ.नगर. मो.नं.९८९०६५४७९४. | संबंधीतांनी लॉटची तीनवार बोली रक्कम संस्थान फंडात जमा करून त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. |
| ०४ | लोखंडी कपाटे-५१० नग. | १४४४,<br>१४५२,<br>१४६७,<br>१४९२,<br>१५२५,<br>१५२९,<br>१५४९,<br>१५८२,<br>१५८९,<br>१५९९,<br>१६६१,<br>१४१७, | २०/१२/२०१०,<br>२२/१२/२०१०,<br>२७/१२/२०१०<br>३०/१२/२०१०,<br>०३/०१/२०११,<br>०४/०१/२०११,<br>०५/०१/२०११,<br>११/०१/२०११,<br>१२/०१/२०११,<br>१४/०१/२०११,<br>२७/०१/२०११,<br>१६/१२/२०११.<br>**एकुण-** | ४९,८०८.००<br>७२,४०६.००<br>८४,४५५.००<br>४३,९७९.००<br>५८,०९४.००<br>५०,८९५.००<br>४५,००१.००<br>५१,२२१.००<br>५७,०७२.००<br>३६,५४०.००<br>२७,५६८.००<br>१,९४,०००.००<br>**७,७१,०३९.००** | श्री.चंदन विठ्ठल लुटे, मु.पो. साकुरी, ता.राहाता, जि.अ.नगर. मो.नं.९८८१५९६६६९. | सदरचे लॉटची बोली प्रति किलो रू.२१.७५ अशी झालेली आहे. ५१० नग कपाटांचे तसेच निखळून पडलेल्या दरवाजांचे एकुण वजन-३५,४५० किलो भरलेले असून (३५४५० x २१.७५)= **रू.७,७१,०३९.००** रक्कम लेखा- शाखेत जमा करणेत आली आहे. संबंधीतांनी त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. |
| ०५ | इन्सीनेटर मशिन | १४११,<br>१४८६. | १६/१२/२०१०,<br>२९/१२/२०१०.<br>**एकुण-** | ८,०००.००<br>२४,०००.००<br>**३२,०००.००** | मे.सिमा स्क्रॅप सेंटर, मु.पो.ता.कोपरगांव, जि.अ.नगर. मो.नं.९८९०६५४७९४. | संबंधीतांनी लॉटची तीनवार बोली रक्कम संस्थान फंडात जमा करून त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. |
| ०६ | जुने स्टील टी.व्ही. स्टॅन्ड-९० नग | १४१८,<br>१५९७. | १६/१२/२०१०,<br>१३/०१/२०११.<br>**एकुण-** | ६,०००.००<br>८६,०००.००<br>**९२.०००.००** | मे.युनायटेड स्टील फर्निचर, मु.पो.साकुरी, ता.राहाता, जि.अ.नगर. मो.नं.९८८१५९६६६९. | संबंधीतांनी लॉटची तीनवार बोली रक्कम संस्थान फंडात जमा करून त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**ब)** लॉट नं.०१ इलेक्ट्रीक गिझर्स-२८ नग हया साहित्याचा लॉट तीन वार लिलाव बोली मे.अभिषेक इलेक्ट्रीकल,श्रीरामपूर यांचे नावाने मंजूर करण्यात आलेला आहे. संबंधीत व्यापा-यांनी साहित्य वेळेत न उचललेमुळे त्यांना सहानूभूती म्हणून वेळोवेळी दुरध्वनीवरून तसेच पत्रव्यवहार करून तगादा लावणेत येऊन तसेच काही मुदत देण्यात आली होती. त्यानुसार त्यांचेकडून दि.३१/०३/२०११ पर्यंत लॉटची संपुर्ण रक्कम रू.१,९०,०००/- मात्र संस्थानमध्ये जमा करणेत आली आहे. त्यानंतर त्यांचे साहित्य ताब्यात देण्याचे काम चालू आहे.

**क)** लॉट नं.०४ मधील निरूपयोगी लोखंडी कपाटे व त्यांचे निखळून पडलेले दरवाजे यांचे संस्थानचे इलेक्ट्रॉनिक काटयावर वजन करणेत येवून त्यांची लिलावात मंजूर झालेल्या तीन वार बोली रू.२१.७५ प्रति किलो प्रमाणे एकुण-३५,४५० किलो वजनांची नियमाप्रमाणे रू.७,७१,०३९.०० रक्कम संस्थान फंडात जमा करून सदर लॉटमधील साहित्य संबंधीत व्यापा-याचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

**ड)** झालेल्या लिलावाची कार्यवाही विधी व न्याय विभागास कळविणेत यावी असे विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचेकडील जा.क्र.सासंवि-२००५/३८९/(११६)/ सोळा दि.०३/०१/२००६ च्या पत्राने निर्देश दिलेले आहेत, त्यानुसार त्यांना कार्यवाही बाबत कळविणेत येईल, मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४४७ यावर सविस्तर चर्चा होऊन, भंगार वस्तूच्या लॉटची जाहिर लिलावाने विक्री केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. सदर कार्यवाही अहवाल विधी व न्याय विभाग मंत्रालय,मुंबई यांना कळविण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,अभिलेखा विभाग)

---

**विषय नं.१११ श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ निमित्ताने समाधी मंदीर व मंदीर परिसरास फुलांची सजावट करणे बाबत.**

**प्रस्ताव-** व्ही.एस.एल, इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड,बंगलोर. यांनी कळविले की, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०११ निमित्ताने ते श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास, मंदिर परिसरातील व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट करण्यास तयार आहे. फुलांची सजावट करणेसाठी त्यांनी संस्थान कडे परवानगी मागीतलेली आहे.

संस्थान, संस्थान मार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या उत्सवासाठी समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी , गुरुस्थान या ठिकाणी फुलांची सजावट करण्यात येते. सदरची सजावट ही संस्थान खर्चाने किंवा कोणी साईभक्त देणगी म्हणुन सजावट करण्यास तयार असल्यास त्यांना सजावटीची परवानगी देण्यात येते.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१०.मध्ये बंगलोर येथील साईभक्त श्री.के.सी. सुब्रामनी राजु , दिपावली साठी श्री राजेंद्र तलवार, श्री दत्त जयंती साठी श्री राजेंद्र डंग,दिल्ली., नववर्ष निमित्ताने कै.रामदास तुकाराम तुपे प्रतिष्ठाण,मांजरी बु //, मकर संक्रात-२०११ या निमित्ताने साई फ्लोरिस्ट डेकोरेटेर्स,नवी मुंबई, श्रीमती. लोहिया मॅडम,विश्वस्त यांनी श्री रामनवमी उत्सव -२०११. साठी व श्री तान्हाजी आनंदराव चव्हाण जि.सांगली यांना हनुमान जयंती निमित्ताने मंदिर व मंदिर परिसरात फुलाची सजावट करणेस परवानगी देण्यात आलेली आहे.

व्ही.एस.एल, इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड,बंगलोर यांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०११ निमित्ताने श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास, मंदिर परिसरातील व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट करणेकामी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची व भोजनाची सोय विनामुल्य करता येईल.

**निर्णय क्र.४४८ यावर सविस्तर चर्चा होऊन, व्ही.एस.एल, इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड,बंगलोर यांचेकडून श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ निमित्ताने श्री साईबाबांचे समाधी मंदिरातील गाभाऱ्यास, मंदिर परिसरातील व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान इ. ठिकाणी फुलांची सजावट करण्यात यावी. सदर सजावटीकामी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची राहण्याची व भोजनाची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी असे ठरले.**
(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

---

**विषय नं.११२ नविन दोन ईनोव्हा वाहनांचे वाढीव दराबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१३/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.११५ (अ) अन्वये, वाहन विभागाकडील जुनी १२ वाहने जाहीर लिलावाने विक्री करणेस व या वाहनांऐवजी नवीन दोन ईनोव्हा, एक स्विफ्ट डिजायर, एक बोलेरो, दोन रुग्णवाहीका एक मालवाहतुक अशी एकुण सात वाहने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.एक कोटी मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली होती.

दि.२६/०३/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.२०८अन्वये, नवीन दोन ईनोव्हा वाहने खरेदी करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडण्यात येवुन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले होते.

| **अ.नं.** | **पार्टीचे नांव** | **वाहनप्रकार** (INNOVA २.५ VX) | **निविदेतील दर(रु.) (हॅण्डलिंग / सीआरटीएम चार्जेससह)** | **चर्चा / वाटाघाटी अंती देउ केलेले दर (रु.)** |
|---|---|---|---|---|
| ०१) | डीएसके मोटर्स लि., अहमदनगर | DD (७S) | १२,०८,१७५.०० | १२,०८,१७५.०० |
| | | DQ (८S) | १२,१२,१७१.०० | **१२,१२,१७१.००** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०२) | मिलेनियम टोयोटा, ठाणे. | DD (७s) | १२,३२,६९०.०० | टोयोटा कंपनीचे निर्बंधामुळे अ.नगर जिल्ह्याकरीता वाहन देता येणार नसलेचे कळविले. चर्चेस अनुपस्थित |
| | | DQ (८s) | १२,३६,६८०.०० | |

यावर सविस्तर चर्चा होउन, संस्थानकरीता सात सिटर INNOVA -२.५ VX DD (७s) ऐवजी आठ सिटर INNOVA-२.५ VX DQ (८s) दोन वाहने खरेदी करावीत व याकामी टोयोटा कंपनीचे अहमदनगर जिल्ह्याकरीताचे अधिकृत डिलर डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांचे निम्नतम दर प्रति वाहन रु.१२,१२,१७१/- मात्र स्विकारण्यात येवुन त्यांना दोन INNOVA-२.५ VX DQ (८s) वाहने खरेदीचा कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

उपरोक्त निर्णयान्वये, दोन ईनोव्हा वाहने खरेदी कामी डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/ वाहन/२१४/२०११, दि.०८/०४/२०११ ने पुरवठा आदेश देण्यात आला होता.
दि.०१/०४/२०११ पासून उत्पादक कंपनी टोयोटा यांनी प्रति वाहन शोरुम दरात रु.१८,४२४/- ने वाढ केलेली असल्याचे डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांचे दि.१६/०५/२०११ चे ईमेल पत्राद्वारे कळविले आहे. नवीन दिलेले दर खालील प्रमाणे.

| तपशिल | चर्चा वाटाघाटी नंतर ठरलेले दर (रु.) | वाढ झालेली रक्कम (रू.) | नवीन किंमत (रू.) |
|---|---|---|---|
| प्रति ईनोव्हा करीता | १२,१२,१७१.०० | १८,४२४.०० | १२,३०,५९५.०० |
| दोन ईनोव्हा करीता | २४,२४,३४२.०० | ३६,८४८.०० | २४,६१,१९०.०० |

डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांचे दि.१७/०३/२०११ चे कोटेशन मधील अटीमध्ये Terms & Conditions No.०३) Prices rulling at the time of delivery will be only applicable. असे नमुद केलेले आहे.

डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांचे पत्रानुसार दोन ईनोव्हा वाहनांकरीता रु.३६,८४८/- मात्र वाढीव रक्कम अदा करावी लागणार आहे.

तरी नवीन दोन ईनोव्हा वाहनांच्या वाढीव दरास मान्यता बाबतचा निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४४९ यावर सविस्तर चर्चा होऊन डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांना दोन ईनोव्हा वाहनांकरीता रु.३६,८४८/- मात्र वाढीव रक्कम अदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**संस्थान करीता दोन टोयोटा ईनोव्हा वाहने खरेदी करणे कामी डीएसके मोटर्स, अहमदनगर यांना जा.नं.एसएसएस/वाहन/२१४/२०११, दि.०८/०४/२०११ ने पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. तथापि आजपावेतो, डीएसके मोटर्स, अहमदनगर यांचेकडुन वाहने संस्थानचे ताब्यात मिळालेले नाहीत. वाहने ताब्यात मिळणे करीता आणखी एक ते दीड महिण्याचा कालावधी लागणार आहे.**

**भोपाळ (म.प्र.) येथील टोयोटा कंपनीचे अधिकृत डिलर, राजपाल अभिकरण (भोपाळ) प्रा. लि. हे संस्थान करीता खास बाब म्हणुन डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांनी देवु केलेल्या दरात (दोन वाहनांकरीता रु.२४,६१,१९०/- मात्र) तात्काळ वाहने उपलब्ध करुन देत आहेत. त्यामुळे डीएसके मोटर्स लि., अहमदनगर यांना देण्यात आलेला पुरवठा आदेश रद्द करुन राजपाल अभिकरण (भोपाळ) प्रा. लि. यांना दोन टोयोटा कंपनीचे ईनोव्हा वाहने खरेदीचा पुरवठा आदेश देण्यात यावा व पुरवठा आदेश सोबत पुर्ण रक्कम रु.२४,६१,१९०/- मात्र रक्कमेचा डी.डी. देण्यात यावा.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**विषय नं.११३ कनिष्ठ महाविद्यालयात नियुक्त असलेल्या पूर्णवेळ शिक्षणसेवक, प्रयोगशाळा सहाय्यक तसेच अर्धवेळ शिक्षणसेवक यांच्या सन २०११-१२ मधील नेमणुकां बाबत.**

**प्रस्ताव-** सन २०१०-११ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयतात इ.११वी व इ.१२वी च्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शांखाच्या प्रत्येकी दोन वर्गतुकडया अशा एकूण १२ वर्गतुकडया या मध्ये ९८२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

**(अ) पुर्णवेळ शिक्षणसेवक व प्रयोगशाळा सहाय्यक ( ३ वर्षासाठी नेमणूक असलेले )**

या वर्गाच्या अध्यापनासाठी नियुक्ती करावयाच्या स्टाफ करीता ऑगस्ट २००८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन, त्यानुसार या मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधित कर्मचाऱ्यांना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून दि. ३० एप्रिल २०११ अखेर तीन शैक्षणिक वर्षाकरीता नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.

| अ. नं. | नांव | पदनाम | शैक्षणिक पात्रता | विषय | नेमणूका तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष निवृत्ती दंडवते (OBC) | शिक्षण सेवक | एम.एस्सी.बी.एड | रसायनशास्त्र | दि.४/९/२००८ |
| २ | भाऊसाहेब एकनाथ अनाप (OBC) | शिक्षण सेवक | एम.एस्सी.बी.एड.एम.फील | जीवशास्त्र | दि.४/९/२००८ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | दत्तात्रय सोपानराव शेळके (OBC) | शिक्षण सेवक | एम.एस्सी.बी.एड | रसायनशास्त्र | दि.४/९/२००८ |
| ४ | अनिता प्रमोद पवार (open) | शिक्षण सेवक | एम.एस्सी.बी.एड | भौतिकशास्त्र | दि.४/९/२००८ |
| ५ | मच्छिंद्र हरीभाऊ दरेकर (open) | शिक्षण सेवक | एम. बी.एड. | अर्थशास्त्र | दि.४/९/२००८ |
| ६ | संतोष मच्छिंद्र चौधरी (open) | शिक्षण सेवक | एम.एस्सी.संगणकशास्त्र | माहिती तंत्रज्ञान | दि.८/९/२००८ |
| ७ | दिलीप विठ्ठलराव संगमनेरे (open) | शिक्षण सेवक | एम.कॉम. बी.एड. | वाणिज्य | दि.१७/९/२००८ |
| ८ | कैलास रामचंद्र शेळके (NT) | शिक्षण सेवक | बी.एस्सी. फिजिकल ( एम.पी.एड) | शारिरीक शिक्षण | दि.१४/११/२००८ |
| ९ | विलास अशोकराव आंबेकर (open) | प्रयोगशाळा सहाय्यक भौतिकशास्त्र | एम.एस्सी. | | दि.५/९/२००८ |
| १० | मिनिनाथ भाऊसाहेब कोते (open) | प्रयोगशाळा सहाय्यक रसायनशास्त्र | बी.एस्सी. | | दि.५/९/२००८ |

वरील (अ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे १ ते १० कर्मचाऱ्यांचा ३ वर्षाचा कालावधी दि.३०/०४/२०११ अखेर संपत असून सदर कालावधीत त्यांचे नेमणूक कालावधीत काम व वर्तणूक समाधानाकारक आहे. शाळा संहिता व शासनपूरक पत्र क्रमांक एसएसएन/१०९९(३४०/९९)माशि-२/ दि. १० जून २००५ नुसार ३ शैक्षणिक वर्षे अथवा ३० महिन्यांच्या समाधानकारक कालावधीनंतर नियमित वेतनश्रेणी देय होते. ६ व्या वेतन आयोगानुसार अ. नं.१ ते ८ यांना वेतनबँड ९३००-३४८०० + ४६०० ग्रेड वेतन होत आहे. तसेच अ.नं. ९ व १० यांना वेतनबँड ५२००-२०२००+२००० ग्रेड वेतन देय होत आहे.

**(ब) अर्धवेळ शिक्षणसेवक व प्रयोगशाळा सहाय्यक (वार्षिक नेमणूक असलेले)**

ऑगस्ट २००८ मध्ये मा. व्यवस्थापन समितीने मुलाखती घेऊन प्रवर्गनिहाय आरक्षण विचारात घेऊन,त्यानुसार या मुलाखतीमध्ये निवड झालेल्या खालील संबंधित वर्षाकरीता त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदनाम व मानधनानुसार नेमणूका देण्यात आलेल्या आहेत.सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामधील या नेमणूका कालावधी दि.३० एप्रिल २०११ अखेर पुर्ण होत आहे.

| अ. नं. | नांव | शैक्षणिक पात्रता | विषय | नेमणूक तपशील | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ |
| १ | दत्तु अशोक लांडे | एम.ए. बी.एड | अर्थशास्त्र | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) |
| २ | संगिता रंगनाथ बनसोडे | एम.एस्सी बी.एड | जीवशास्त्र | तासिका तत्वावर शिक्षणसेवक(मानधन रु.७२ प्रति घ.तास) | तासिका तत्वावर शिक्षणसेवक(मानधन रु.७२ प्रति घ.तास) | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) |
| ३ | उषा कोंडाजी गायके | एम.सी. एम | माहिती तंत्रज्ञान | तासिका तत्वावर शिक्षणसेवक( मानधन रु.७२प्रति घ. तास) | तासिका तत्वावर शिक्षणसेवक( मानधन रु.७२प्रति घ. तास) | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) |
| ४ | प्रमोद भिवसेन चौधरी | एम.एस्सी बी.एड | भौतिकशास्त्र | ................ | तासिका तत्वावर शिक्षणसेवक( मानधन रु.७२प्रति घ. तास) | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) |
| ५ | रंगनाथ चांगदेव रहाणे | एम.ए. बी.एड | भूगोल | ................ | | अर्धवेळ शिक्षणसेवक (मानधन रु.२५०० प्रति माह प्रमाणे ) |
| ६ | वैशाली प्रशांत देवरे | बी.एस्सी. | जीवशास्त्र | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) (मानधन रु.२५०० प्रती माह प्रमाणे ) | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र)(मानधन रु.२५०० प्रती माह प्रमाणे ) | प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) (मानधन रु.२५०० प्रती माह प्रमाणे ) |

**वरील**

**(१)** वरील (ब) मधील अ.नं. १ यांनी सलग तीन वर्षे अर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून मानधन रु.२५०० प्रती माह प्रमाणे काम केलेले आहे. नेमणूक काळात त्यांचे काम समाधानकारक आहे. शाळा संहिता व शासनपूरक पत्र क्रमांक एसएसएन / १०९९ (३४०/९९/) माशि -२ / दि.१० जून २००५ नुसार त्यांना उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी लागू असलेल्या (वेतन बँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४६००) च्या अर्धे (वेतनबँड ४१५०-१७४००+ ग्रेड वेतन २३०० मूळ मध्ये वेतन ६२७०+ ग्रेड वेतन २३०० नुसार सुरुवातीचे एकूण वेतन रु.१२४२७/-) वेतन देय होत आहे. अर्धवेळ कर्मचाऱ्यांसाठी घरभाडे भत्ता लागू नसल्याने सदरचे वेतन देतांना फक्त मूळवेतन व महागाई भत्ता देय होईल. त्यानुसार दि.१३ जून २०११ पासून पुढील आदेश होईपर्यत तात्पुरती नेमणूक देता येईल.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(२)** अ.नं.२ व ३ यांनी सलग तीन वर्षे काम केलेले असून यापैकी २ वर्षे तासिका तत्वावर शिक्षणसेवक आणि १ वर्षे अर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून काम केलेले आहे. तसेच अ.नं.४ व ५ यांनी सलग दोन वर्षे काम केलेले असून यापैकी १ वर्षे तासिका तत्वावर शिक्षणसेवक आणि १ वर्षे अर्धवेळ शिक्षण सेवक म्हणून काम केलेले आहे. नेमणूक काळात या सर्वाचे काम समाधानकारक आहे.

शाळा संहितेनुसार व शिक्षणसेवकांसाठी असलेल्या शासन निर्णयानुसार तीन शैक्षणिक वर्षे पुर्णवेळ अथवा अर्धवेळ पदावर काम केल्यास चौथ्या वर्षी पूर्णवेळ अथवा अर्धवेळ पदानुसार वेतनश्रेणी देय होते . त्यानुसार वरील २ ते ५ यांना दि.१३जून २०११ पासून दि.३० एप्रिल २०१२ पर्यत शैक्षणिक वर्षासाठी तात्पुरती रु.२५०० या मानधनावर अर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून नेमणूक देता येईल.

**(३)** प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) हे पद अनुसुचित जातीच्या (SC)/अनुसुचित जमातीच्या(ST) प्रवर्गा साठी राखीव असून सौ. वैशाली प्रशांत देवरे या भटक्या जमातीच्या(NT) प्रवर्गातील आहेत. त्यामुळे सौ. देवरे यांना सन २००८-०९,२००९-१० व २०१०-११ मध्ये प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरीता दरवर्षी ३० एप्रिल अखेर प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) म्हणून रु.२५०० या मानधनावर तात्पुरती नेमणूक देण्यात आली होती. सध्या दि.३० एप्रिल २०११ अखेर पर्यत त्यांची नेमणूक आहे.

**तरी,**

**(१)** वरील(अ)मध्ये नमूद केल्याप्रमाणे १ ते १० कर्मचाऱ्यांचा ३ वर्षाचा कालावधी दि.३०/०४/२०११ अखेर संपत असून सदर कालावधीत त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असल्याने त्यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे वेतन बँड देण्यास मान्यता असावी.

**(२)** वरील(ब)मधील अ.नं.१ यांनी सलग तीन वर्षे अर्धवेळ शिक्षणसेवक म्हणून काम केलेल असून त्यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असल्याने त्यांना प्रस्तावित केल्याप्रमाणे अर्धवेळ शिक्षकांसाठी देय वेतन बँड देण्यास मान्यता असावी.

**(३)** वरील(ब) मधील अ.नं. २ ते ५ यांचे काम व वर्तणूक समाधानकारक असल्याने त्यांना सध्याच्याच अटी -शर्तीनुसार शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये नेमणूक देण्यास मान्यता असावी.

**(४)** वरील(ब) मधील अ.नं. ६ प्रयोगशाळा सहाय्यक (जीवशास्त्र) या पदावरील सौ. वैशाली प्रशांत देवरे या भटक्या जमातीच्या (NT) प्रवर्गातील असून हे पद अनुसूचित जातीच्या (SC)/अनुसुचित जमातीच्या (ST) प्रवर्गासाठी राखीव असल्याने जाहिरात देऊन अर्ज मागणी करावी लागेल.

प्रस्तावावर विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.४५० यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/प्राचार्य,श्री साईबाबा ज्युनिअर कॉलेज)

---

**विषय नं.११४ इंग्लिश मिडीयम स्कुल करीता नवीन बेंचेस खरेदी करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये ज्यु.केजी ते इयत्ता १० वी पर्यतचे वर्ग आहेत. या सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना वर्गात बसणेकामी एकूण ७८९ बेंच आहेत. त्यापैकी ज्यु.केजी ते इ.२ री पर्यतचे बेंचेस चांगले आहेत. परंतू इ.३ री ते इ.७ वी पर्यतचे वर्गातील जवळपास २०० बेंचेस तुटलेले / निकामी झालेले आहेत. सदरचे बेंचेस विदयूत व बांधकाम विभागाकडून आतापर्यत वेळोवेळी दुरुस्त करुन घेण्यात आलेले आहेत. माहे जुन २०११ पासून शाळा सुरु होत आहे.

तरी जिल्हा परिषद शाळेकरीता संस्थानचे वतीने देणगी स्वरुपात देण्यात आलेल्या गोदरेज बेंचेसच्या नमुन्याप्रमाणे इ. ३ री ,४ थी या वर्गासाठी १०० नग व इ. ५ वी ते ७ वी या वर्गासाठी १०० नग असे एकूण २०० नग नवीन बेंच खरेदी करावे लागणार आहेत.

त्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे एकूण रुपये ५,९२,७००/- ( अक्षरी रुपये पाच लाख ब्यान्नव हजार सातशे) इतका खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No. | Item | Qty | Unit Rate | Total Value |
|---|---|---|---|---|
| 01 | 2 Seated Desk cum Bench for the students of std. 3-4 | 100 Nos. | Rs. 2,789/- | Rs. 2,78,900/- |
| 02 | 2 Seated Desk cum Bench for the students of std. 5-7 | 100 Nos. | Rs. 3,138/- | Rs. 3,13,800/- |
| | Total- | 200 Nos. | | Rs. 5,92,700/- |

तरी वरीलप्रमाणे २०० नग बेंचेस मे. गोदरेज यांचे कडून मान्य दराने खरेदीस व येणाऱ्या रु.५,९२,७०० /-खर्चास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४५१ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे इंग्लिश मिडीयम स्कुल करीता नवीन बेंचेस २०० नग मे. गोदरेज यांचे कडून मान्य दराने खरेदीस व येणाऱ्या रु.५,९२,७०० /-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.११५ शिकाऊ उमेदवारी योजना अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतन दर वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या विद्युत विभाग, वाहन विभाग,आय.टी.विभाग,लेखाशाखा,श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय व आय.टी.आय या वेगवेगळया विभागामध्ये शिकाऊ उमेदवारांची व्यवसायानुसार एक व दोन वर्षासाठी शिकाऊ उमेदवार म्हणून भरती केली जाते. या जागा दरवर्षी भरावयाच्या असतात.

सदर उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी काळात प्रतीमहा शासनाच्या नियमांनुसार विद्यावेतन देण्यात येते. पुर्वीच्या विद्या वेतनामध्ये शासनाने त्यांचे कडील पत्र जा.क्रं.औप्रसं/ मुप्रतअंसु/ प्रशि/ २०११/ २४ नुसार दि.१८/१०/२०१० पासून वाढ केलेली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| वर्षे | पुर्वीचे दर | सध्याचे (वाढीव दर ) |
|---|---|---|
| प्रथम वर्षे | रु. १०९०/- | रु. १४९०/- |
| व्दितीय वर्षे | रु. १२४०/- | रु. १७००/- |
| तृतिय वर्षे | रु. १४४०/- | रु.१९७०/- |
| चतुर्थ वर्षे | रु. १२३०/- | रु. २२२०/- |

सदरील शासन निर्णयाप्रमाणे वाढीव विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना दि.१८/१०/२०१० पासून आदा करण्यात यावे, व तसा अहवाल शासकिय कार्यालयास सादर करावा असे शासनाने कळविलेले आहे. आपले आस्थापनेमध्ये खालील व्यवसायांचे शिकाऊ उमेदवार वेगवेगळया विभागामध्ये भरती केलेले आहेत.

| अ.नं | व्यवसाय | शिकाऊ उमेदवार संख्या | सध्याचे/ मानधन प्रतीमहा | वाढीव मानधन प्रतिमहा | वाढीव दराने प्रतिमहा प्रति उमेदवार | | एकुण वाढीव बोजा प्रतिमहा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रतिमहा | एकुण | |
| **१** | **२** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| १ | वेल्डर | --- | १२४० | १७०० | -- | -- | **१३०८०** |
| २ | मेकॅ.ट्रॅक्टर | ०२ | १२४० | १७०० | ४६० | ९२० | |
| | | ०२ | १४४० | १९७० | ५३० | १०६० | |
| ३ | कोपा/पासा | ८ | १२४० | १७०० | ४६० | ३६८० | |
| ४ | मोटार मेकॅनिक | ०४ | १४४० | १९७० | ५३० | २१२० | |
| ५ | विजतंत्री | ०५ | १४४० | १९७० | ५३० | २६५० | |
| ६ | मेकॅ.आर.ए.सी | ०२ | १४४० | १९७० | ५३० | १०६० | |
| ७ | आय.टी.ॲण्ड ई.एस. एम | ०५ | १४४० | १९७० | ५३० | २६५० | |

तरी वरील शासन निर्णयानुसार शिकाऊ उमेदवारांना वाढीव मानधन दि.१८/१०/२०१० पासून देण्यास मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४५२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे शिकाऊ उमेदवारी योजना अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतन दर वाढविणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

---

**विषय नं.११६ भक्तनिवासस्थान इमारतीत कृषी माहिती केंद्रासाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत.**

**प्रस्ताव-** १) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१० चे सभेतील विषय क्र. ७२ व निर्णय क्र. ५९३ अनुसरुन जा.क्र. एसएसएस/वशी-विधी/८९३८/२०१०, दि. १२/०८/२०१० चे आदेशाने नविन भक्त निवासस्थान येथील अे विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. १८ दि.०६/०६/२०१० ते दि. ०५/०५/२०११ अखेर (११ महिने कालावधीसाठी ) मासिक परवाना फी रु. ७३७/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन लिव्ह अँड लायसन्स तत्वावर महात्मा फुले कुषी विद्यापीठ, राहूरी यांना कृषी माहीती केंद्रासाठीचे वापरांस देण्यात आला आहे.

२) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना देण्यात आलेल्या गाळयाचा ११ महिने कालावधीचा करारनामा करण्यात आलेला असून गाळयाची मुदत दि.०५/०५/२०११ रोजी संपुष्टात येत असल्याने. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी पुढील कालावधीसाठी दि.०६/०५/२०११ ते दि.०५/०४/२०१२ अखेर ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळावी, अशी विनंती दि.१९/०४/२०११ चे अर्जाने केलेली आहे.

विद्यापीठाचे कृषी माहिती केंद्राकडून शिर्डी परिसरातील गांवामध्ये शेतकरी मेळावे, माती व पाणी नमुने तपासणी व इतर कृषि विषयक माहिती घेतली जाते तसेच विद्यापीठाची विविध प्रकाशने शेतकरी / भक्तांसाठी स्टॉलव्दारे विक्री करुन चांगली सुविधा प्राप्त होते. त्यांचेकडून संस्थानला बगीचा

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



व तत्सम उपक्रमासाठी मोफत सल्ला, मार्गदर्शन घेता येईल.याबाबतचा विचार करता सर्व्हे नं. १०९ नविन भक्तनिवासस्थान इमारतीमधील अे विंग बाहेरील बाजूचा गाळा नं. १८ क्षेत्र २२ चौ.मी. त्यांचे वापरास यापुर्वी दिलेला गाळा नव्याने लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने कालावधीसाठी दि.०६/०५/२०११ ते दि.०५/०४/२०१२ पावेतो नव्याने देता येईल. याकामी त्यांच्या पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ म्हणजे ( पुर्वीचे मासिक परवाना फी रुपये- ७३७/- मध्ये १०% वाढ + ७४ = ८११/- अक्षरी रुपये- आठशे अकरा मात्र ) इतकी रक्कम तसेच विद्युत बील वेगळे आकारुन महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना नविन भक्तनिवासस्थान ( ५०० रुम ) इमारतीमध्ये प्रस्तुत गाळा वापरास देणे बाबतचा विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवासस्थान इमारतीत कृषी माहिती केंद्रासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांना लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर देण्यात आलेल्या गाळयास पुर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन ( पुर्वीचे मासिक परवाना फी रुपये- ७३७/- मध्ये १०% वाढ +७४ =८११/-) आकारुन तसेच विद्युत बील वेगळे आकारुन दिनांक ०६.०५.२०११ ते ०५.०४.२०१२ अशी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.११७** **मा.सुप्रीम कोर्टातील स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) नं.२७९८८,२८२३५,२९६८३-२९६८५/ २०१० व इतर यांची वकील फी आदा करणे बाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे मंदिर परिसराचे दक्षिणेकडील शिर्डी मोफत सर्व्हे नं. १ पैकी ३० गुंठे जागेबाबत सदर जागेवरील दुकानदार व संस्थान यांचे विरुध्द खालील रिट पिटीशन दाखल केले होते.

१) रिट पिटीशन नं. १७०४/२००९, चांदमल गोपालदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान इ.
२) रिट पिटीशन नं. १७०५/२००९, सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान इ.
३) रिट पिटीशन नं. २९५२/२००९, गंगाधर काशीनाथ तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान इ.
४) रिट पिटीशन नं. ५४५१/२००९, सोमनाथ गणपत कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन, संस्थान इ.

सदर रिट पिटीशनचा निकाल मा.उच्च न्यायालय मुंबई , खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर दि.०५/०७/२०१० रोजी झाला असून सदर निकालाचे नाराजीने दुकानदारांच्या वतीने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे खालील लेटर पेटंट्स अपिल महाराष्ट्र शासन व संस्थानच्या विरुध्द दाखल करण्यात आले.

१) लेटर पेटंट अपिल नं. २२९/२०१०, चांदमल गोपालदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन.
२) लेटर पेटंट अपिल नं. २३२/२०१०, सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन.
३) लेटर पेटंट अपिल नं. २२७/२०१०, गंगाधर काशीनाथ तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन.
४) लेटर पेटंट अपिल नं. २३१/२०१०, सोमनाथ गणपत कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन.

मात्र सदर ४ लेटर पेटंट अपिलचा निकाल दि. १५/०९/२०१० रोजी मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी दिला, त्यामध्ये प्रस्तुतचे लेटर पेटंट अपिलस् फेटाळण्यात आले. त्यानंतर मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर, विरुध्द तहसीलदार, राहाता. व संस्थान यांचे विरुध्द स्पेशल लिव्ह पिटीशन सिव्हिल नं. २७९८८/२०१० अंतरिम आदेश प्राप्तीचे अर्जासह प्रकरण दुकानदारांनी दाखल केलेले आहे. सदर प्रकरणामध्ये संस्थानने जा. क्र एसएसएस / वशी - विधी / ९४५६ / १०, दि. १७ /०९/२०१० चे पत्राने श्री संजय खर्डे ॲडव्होकेट, सुप्रिम कोर्ट यांचेकडे संस्थानचेवतीने काम पहाणेसाठी वकीलपत्र व इतर कागदपत्र पुढील यथायोग्य कार्यवाहीसाठी सादर केले आहे.

प्रकरणी दिनांक २८/०२/२०११ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयासमोर तारीख नेमणेत आली होती. प्रकरणी मा.कोर्टाने खालील प्रमाणे आदेश दिलेला आहे.

"As there appears no chances of settlement, the Sansthan is permitted to withdraw the amount if any deposited by it before High Court. Leave granted. The order of status-quo to continue subject to the clarification in favour of the Municipal Council made on १३-१२-२०१० "

प्रकरणी उपरोक्त ४ केस मध्ये दि. २८/०२/२०११ रोजीचे मा.कोर्टातील कामकाजाबाबत ॲड.श्री. संजय खर्डे यांचेमार्फत खालीलप्रमाणे बिले दि. ०८/०३/२०११ चे पत्रा सोबत सादर केलेली आहे. तसेच ॲड.श्री. अरविंद व्हि.सावंत यांचे दि. २८/०२/२०११ चे बील तसेच ॲड. श्री अरुन रामनाथ पेडणेकर यांनी दि. ११/०३/२०१० ( इकडे प्राप्त दि. १८/०३/२०११ ) चे बील सादर केले आहे.

| अ.नं. | वकीलाचे नांव | तपशील | फी रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | ॲडव्होकेट<br>श्री संजय खर्डे,<br>दि. २८/०२/२०१० | स्पेशल लिव्ह पिटीशन(सिव्हील) नं. २८२३५/२०१० कृष्णराव विरुध्द तहसिलदार, राहाता | रु. ३५,०००/- |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | |
|---|---|---|---|
| ०२. | ॲडव्होकेट<br>श्री संजय खर्डे,<br>दि. २८/०२/२०१० | स्पेशल लिव्ह पिटीशन(सिव्हील) नं. २९६८३-२९६८५/२०१० गंगाधर काशिनाथ तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर. | रु. ३५,०००/- |
| ०३. | ॲडव्होकेट<br>श्री संजय खर्डे,<br>दि. २८/०२/२०१० | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर यावर दि.१८/१०/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल.गोखले, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. ३५,०००/- |
| ०४. | ॲडव्होकेट<br>श्री. अरविंद व्हि.सावंत,<br>दि.२८/०२/२०११ | स्पे.लि.पे.(सि.) नं. २७९८८/२०१० - सैय्यद रतनभाई सैय्यद व इतर विरुध्द तहसिलदार रहाता व इतर<br>०१) दि.२७/०२/२०११ रोजी श्री. संजय खर्डे व श्री अरुण पेडणेकर, ॲडव्होकेटस् सुप्रिम कोर्ट यांचे समवेत सभा.<br>०२) दि.२८/०२/२०११ रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश ए.के.पटनाईक, सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी | रु. ५०,०००/-<br>रु. १,००,०००/-<br>+<br>१० % रु. १५,०००/-<br>लिपीक चार्ज |
| ०५ | ॲडव्होकेट<br>श्री अरुन रामनाथ पेडणेकर,<br>दि. ११/०३/२०१० चे बील. | ०१) ॲड.श्री अरविंद व्ही सावंत सुप्रिम कोर्ट यांचे समवेत सभा व दि.२८/०२/२०१० रोजी मा. न्यायाधीश आर.व्ही.रविंद्रन व मा. न्यायाधीश एच.एल.गोखले जज्ज सुप्रीम कोर्ट यांचेसमोर सुनावणी. | रु. २५,०००/- |
| | | **एकूण रक्कम रुपये** | **२,९५,०००/-** |

यापुर्वी याच प्रकरणामध्ये दि. ०१/१०/२०१० रोजीचे कामकाजाबाबत श्री अरुण आर. पेडणेकर, श्री अरविंद सावंत, श्री विनोद बोबडे ॲडव्होकेट यांनी रु. ५,००,०००/- ची मागणी केलेली बीले त्यांना जा.क्र. एसएसएस / विधी /११३२५/२०१० दि. ३०/१२/२०१० चे पत्रा सोबत चेकने अदा केलेले आहेत.

प्रस्तुत प्रकरणी श्री सावंत, ॲडव्होकेट, श्री पेडणेकर, ॲडव्होकेट व श्री खर्डे, ॲडव्होकेट यांना केस मधील कामकाजाबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१०/१०/२०१० चे सभेत विषय नं. १५ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ८४५ ने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दि. २१/११/२०१० चे सभेत विषय नं. ७३ सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ९२१ ने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे ॲडव्होकेट फी अदा करणेस मान्यता देणेत आली. मान्यता मिळालेनंतर सदर बिले अदा केलेली आहे.

श्री संजय खर्डे, ॲडव्होकेट यांनी आता दि. ०८/०३/२०११ रोजी चे पत्र ( आवक नं. ४०२६८ ) सोबत दि. २८/०२/२०१० चे बीले सादर केली आहे. ( बीलाची तारीख २८/०२/२०११ बरोबर असावी ) त्यात त्यांनी उपरोक्त तक्त्याप्रमाणे ॲड.श्री संजय खर्डे यांना १,०५,०००/- ( एक लाख पांच हजार मात्र ) ॲड. श्री अरुण पेडणेकर यांना रक्कम रु. २५,०००/- ( अक्षरी रु. पंचविस हजार मात्र ) ॲड.श्री अरविंद व्ही. सावंत यांना रु. १,६५,०००/-( एक लाख पासष्ट हजार मात्र ) कळविलेले आहे. तरी त्याप्रमाणे एकुण रक्कम रु. २,९५,०००/- ( अक्षरी रु. दोन लाख पंच्यान्नव हजार मात्र ) संबंधीत ॲडव्होकेट यांना अदा करणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५४ यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.सुप्रीम कोर्टातील स्पेशल लिव्ह पिटीशन (सिव्हील) नं.२७९८८, २८२३५, २९६८३-२९६८५/ २०१० या केसमध्ये मागणीप्रमाणे ॲडव्होकेट श्री संजय खर्डे व इतर उपरोक्त दोन वकीलांची वकील फी एकुण रक्कम रु. २,९५,०००/- आदा करणेस मान्यता देण्यात आली.**
(कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.११८ स्टेट बँक ऑफ इंडीया यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील जागेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.२१/११/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. ६५ स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील वापरांस दिलेले जागेस मुदतवाढीबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ९१३ अन्वये स्टेट बँक ऑफ इंडिया, यांचे अधिकाऱ्यांना पुढील सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले होते. त्याप्रमाणे जा.नं. एसएसएस वशी -विधी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



/१२०३४/२०११ दि. ०९/०२/२०११ ने त्यांना दि. १३/०२/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. श्री मकरंद भास्कर क्षिरसागर, ( चिफ मॅनेजर जनरल बँकींग ) व श्री सतीष पितळे, (असिस्टंट जनरल मॅनेजर पुणे ) हे शिर्डीस चर्चेसाठी आले होते. प्रकरणी त्यांनी मा.अध्यक्ष सो. यांचेशी चर्चा केली. चर्चे मध्ये.-

**१)** स्टेट बँक ऑफ इंडिया यांना संस्थानचे सिटी सर्व्हे नं. ३२३ मधील साईनाथछाया इमारती मधील पहिल्या माजल्यावरील १६२.८८ स्क्वे.मी. जागेस १ वर्ष कालावधी साठी ( दि.११/११/२०१० ते दि. १०/१०/२०११ पावेतो ) लिव्ह अँड लायसन्स तत्वावर मासिक परवाना फी रु.३०,०००/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन जागा वापरांस परवानगी देण्यात यावी. तसेच

**२)** मंदीर परिसरातील ए.टी.एम. मंदीर परिसरा- बाहेर बँकेकडून स्थलांतरीत करणे आहे. साईनाथछाया इमारतीमधील तळमजल्यावरील १ गाळा ए.टी.एम.साठी वापरांस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर देणेत यावा. त्यासाठी मासिक परवाना फी गाळ्याचे प्रती स्क्वेअर मिटरला रु. ४०० प्रमाणे आकारण्यात यावा व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुण ए.टी.एम साठी जागा ११ महिने कालावधी साठी देण्यात यावी. जागेचा वापर पुर्वीचेच अटी /शर्ती प्रमाणे राहील. या प्रस्तावास बँकेकडून सहमती / तयारी दर्शविली आहे.

मा.अध्यक्ष सो. यांचेशी स्टेट बँकेचे प्रतिनिधींनी दि. १३/०२/२०११ रोजी समक्ष चर्चा केलेली आहे. प्रकरणी अ.क्र. नं. १ व २ वरील प्रमाणे प्रस्तावास उभयंतांकडून संमती दर्शविण्यात आलेली आहे.

**निर्णय क्र.४५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे स्टेट बँक ऑफ इंडीया यांना संस्थानचे साईनाथछाया इमारतीतील जागेस दिनांक ०१/११/२०१० ते दि. १०/१०/२०११ अखेर प्रस्तावित केलेप्रमाणे मासिक परवाना फी आकारुन मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**

**तसेच मंदीर परिसरातील ए.टी.एम. मंदीर परिसराबाहेर बँकेकडून स्थलांतरीत करुन साईनाथछाया इमारतीमधील तळमजल्यावरील १ गाळा ए.टी.एम.साठी वापरांस लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर वापरास देणेत यावा. त्यासाठी मासिक परवाना फी गाळ्याचे प्रती स्क्वेअर मिटरला रु. ४०० प्रमाणे आकारण्यात यावी व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन ए.टी.एम साठी जागा ११ महिने कालावधीसाठी गाळा देण्यात यावा. जागेचा वापर पुर्वीचेच अटी / शर्ती प्रमाणे चालू ठेवावा असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.११९** **प्रसारभारती ब्रॉडकास्टींग कार्पो. ऑफ इंडीया, मुंबई यांना भाडेपट्याने देण्यात आलेल्या जागेच्या मासिक परवाना फी मध्ये वाढ करणे व पुढील एक वर्षाचा करारनामा करणेस मान्यता देणेबाबत.**

**प्रस्ताव-** १) दि.२१/११/२०१० रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं. ६४ प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना भाडे पट्ट्याने देण्यात आलेल्या जागेच्या मासिक परवाना फी मध्ये वाढ करणे व पुढील एक वर्षाचा ( म्हणजे दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ कालावधीचा ) करारनामा करणेस मान्यता देणेबाबतचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र. ९१२ अन्वये प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांचे अधिकाऱ्यांना पुढील सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले होते. त्याप्रमाणे जा.नं. एसएसएस वशी -विधी /१२०३३/२०११ दि. ०९/०२/२०११ ने त्यांना दि. १३/०२/२०११ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चेसाठी बोलविण्यात आले होते. श्री राजेश बारापत्रे ( आय ई एस) व श्री बी.ए.जपे, ( असिस्टंट इंजिनीअर ) हे शिर्डीस चर्चेसाठी आले होते. प्रकरणी त्यांनी मा.अध्यक्ष सो. यांचेशी चर्चा केली. चर्चे मध्ये.-

**१)** सन दि. २१/०८/२००६ ते दि. २०/०८/२००९ या कालावधी साठी मुळ ( मासिक भाडे ) रेट रु. ३३२५/- मध्ये १०% वाढ करुन म्हणजे रु. ३६५७-५० निश्चीत करुन त्याप्रमाणे फरकाची रक्कम प्रसार भारती यांचेकडून वसुल करणेत यावी.

**२)** दि.२१/०८/२००९ पासून ३ वर्षासाठी मासिक परवाना फी रुपये ३६५७-५० मध्ये १०% वाढ करुन ( म्हणजे रु. ४,०२४/- प्रती महा ) रेंट निश्चीत करुन त्याप्रमाणे फरकाची रक्कम प्रसार भारती यांचेकडून वसुल करणेत यावी.

**३)** प्रसारभारती दुरदर्शन, मुंबई यांना १५ वर्षासाठी जागा भाड्याने देणेबाबत मंजूरी आहे, परंतू संस्थानच्या सन २००४ च्या अधिनियमाचे तरतुदीस आधीन राहून प्रसारभारती यांना १ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. करीता प्रसारभारती यांना पुढील टप्प्यासाठी दि.२१/०८/२०१० ते दि. २०/०८/२०११ पावेतो मासिक परवाना फी रु. ४,०२४/- ( अक्षरी रु. चार हजार चोवीस मात्र ) व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन कराराचे नुतनीकरण करणेसाठी मान्यता देण्यात आली.

या प्रस्तावास प्रसारभारती कडून सहमती / तयारी दर्शविली आहे.

मा.अध्यक्ष सो. यांचेशी प्रसारभारतीचे प्रतिनिधींनी दि. १३/०२/२०११ रोजी समक्ष चर्चा केलेली आहे. प्रकरणी अ.क्र. नं. १,२ व ३ वरील प्रमाणे प्रस्तावास उभयंतांकडून संमती दर्शविण्यात आलेली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**निर्णय क्र.४५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसारभारती ब्रॉडकास्टींग कार्पो. ऑफ इंडीया, मुंबई यांचे प्रतिनिधींना पुढील सभेपूढे समक्ष चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२०** **ॲड श्री आर.एन.धोर्डे यांची त्रिकोणातील जागेच्या लेटर पेटंट अपिलाची वकील फी बिलाबाबत**

**प्रस्ताव-** १) शिर्डी येथील मोफत स.नं. १ मधील ३० गुंठे जागेतील दुकानदारांनी महाराष्ट्र शासन व संस्थान चे विरुध्द मा.कोपरगांव येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात रे.मु.नं. केस ६०० / १९७६ दाखल केलेली होती. त्यामध्ये दि. २०/०८/१९७९ रोजी सुलेनामा झाला होता. प्रस्तुतच्या सुलेनाम्याची अंमल बजावणी व्हावी म्हणून दुकानदारांच्या वतीने रेग्यूलर दरखास्त नं. ५/१९९० दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये बदललेल्या परिस्थीतीचा विचार करता रे.मु.नं. ६००/१९७६ मधील सुलेनामा निष्फळ झाला आहे. त्याची अंमल बजावणी करता येणार नाही. असा दरखास्त नं. ५/१९९० मध्ये दि. ०९/०३/२००९ रोजी मा.कोर्टाने निकाल दिला आहे. प्रस्तुतचे निकालाचे नाराजीने दुकानदारांनी पुन्हा मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे खालील प्रमाणे ४ रिट पिटीशन दाखल केले होते.

१) रिट पिटीशन १७०४/२००९ चांदमल लोकचंदानी विरुध्द संस्थान.
२) रिट पिटीशन १७०५/२००९ सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द संस्थान.
३) रिट पिटीशन ५४५१/२००९ सोमनाथ कोळपकर विरुध्द संस्थान.
४) रिट पिटीशन २९५२/२००९ गंगाधर तुरकणे विरुध्द संस्थान

उपरोक्त चार रिट पिटीशन महाराष्ट्र शासन व संस्थानचे विरोधात दाखल करण्यात आले होते. प्रस्तुतच्या रिट पिटीशनचे कामकाज पहाण्यासाठी ॲड. श्री आर. एन. धोर्डे यांना वकीलपत्र दिले होते. प्रस्तुतच्या रिट पिटीशन मध्ये दि.०५/०७/२०१० रोजी मा.कोर्टाने रे.मु.नं. ६००/१९७६ मधील हुकूम नाम्याची अंमलबजावणी न होण्यासाठी वादी व प्रतिवादी सर्वच कारणीभूत आहेत. त्यामुळे मोफत सर्व्हे नं. १ क्षेत्र ३० आर जागेतील मोठ्या दुकानदारांना रक्कम रु.३ लाख व छोट्या दुकानदारांना रक्कम रु. २ लाख प्रमाणे भरपाई देणेत यावी. सदरची रक्कम शासनाने निम्मी व संस्थानने निम्मी अदा करावी असा निकाल दिला आहे.

२) उपरोक्त निकालाचे नाराजीने दुकानदारांनी पुन्हा ४ अपिल व संस्थानने ४ अपिल मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे लेटर पेटंट अपिल दाखल केले होते.
( संस्थानने दाखल केलेले लेटर पेटंट अपिले मा. ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांचेशी चर्चा विनीमय करुन काढून घेतलेले आहेत.)

१) लेटर पेटंट्स अपिल नं. २२९/२०१०. चांदमल लोकचंदानी विरुध्द संस्थान.
२) लेटर पेटंट्स अपिल नं. २३२ / २०१०. सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द संस्थान
३) लेटर पेटंट्स अपिल नं. २३१/२०१० सोमनाथ कोळपकर विरुध्द संस्थान
४) लेटर पेटंट्स अपिल नं. २२७/२०१० गंगाधर तुरकणे विरुध्द संस्थान

दुकानदारांनी याप्रमाणे ४ लेटर पेटंट्स अपिल दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये दि.१५ / ०९ / २०१० रोजी मा.उच्च उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद ( डबल बेंच ) यांनी दुकानदारांचे विरुध्द निकाल दिला आहे. व सदर निकालाचे नाराजीने मा.सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे संबंधीत दुकानदारांनी दाखल केलेले होते.

दि. १०/१०/२०१० रोजीचे संदर्भीय पत्राने ॲड. श्री आर.एन धोर्डे यांनी संस्थानने दाखल केलेले लेटर पेटंट अपिल नं. --/२०१० ( मागे घेतले असल्याने नंबर नाही. ) व दुकानदारांनी दाखल केलेले ४ लेटर पेटंट अपिला मध्ये खालील प्रमाणे रक्कमेची मागणी केलेली आहे. प्रस्तुतची फी लेटर पेटंट अपिलांची आहे. ( मुळ रिट पिटीशनची फी अद्याप त्यांनी मागणी केलेली नाही. असे मागणी पत्रावरुन दिसून येते.)

**संस्थानने दाखल केलेले अपिल.**

| अ.नं. | रिट पिटीशन मधील लेटर पेटंट अपिलाबाबत. | वादी/प्रतिवादी | मागणी केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१. | रिट पिटीशन नं. १७०४/२००९ मधील लेटर पेटेंट अपिला बाबत. | श्री साईबाबा संस्थान शिर्डी विरुध्द महाराष्ट्र शासन व चॉदमल गोपाळदास लोकचंदानी | २०,०००/- |
| ०२. | रिट पिटीशन नं. १७०५/२००९ मधील लेटर पेटेंट अपिला बाबत. | श्री साईबाबा संस्थान शिर्डी विरुध्द महाराष्ट्र शासन व सय्यद रतनभाई सय्यद | २०,०००/- |
| ०३. | रिट पिटीशन नं. २९५२/२००९ मधील लेटर पेटेंट अपिला बाबत. | श्री साईबाबा संस्थान शिर्डी विरुध्द महाराष्ट्र शासन व गंगाधर तुरकणे | २०,०००/- |
| ०४. | रिट पिटीशन नं. ५४५१/ २००९ मधील लेटर पेटेंट अपिला बाबत. | श्री साईबाबा संस्थान शिर्डी विरुध्द महाराष्ट्र शासन व सोमनाथ कोळपकर | २०,०००/- |

**दुकानदारांनी दाखल केलेले अपिल.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | ले. पे.अपिल नं. | वादी/प्रतिवादी | मागणी केलेली रक्कम रु. |
|---|---|---|---|
| ०१. | रिट पिटीशन नं. १७०४/२००९ मधील २२९/२०१० बाबत. | चॉंदमल गोपाळदास लोकचंदानी विरुध्द महाराष्ट्र शासन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी रिस्पॉन्डंट नं.४ | १५,०००/- |
| ०२. | रिट पिटीशन नं. १७०५/२००९ मधील २३२/२०१० बाबत. | सय्यद रतनभाई सय्यद विरुध्द महाराष्ट्र शासन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी रिस्पॉन्डंट नं. ४ | १५,०००/- |
| ०३ | रिट पिटीशन नं. २९५२/२००९ मधील २२७/२०१० बाबत. | गंगाधर तुरकणे विरुध्द महाराष्ट्र शासन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी रिस्पॉन्डंट नं.४, | १५,०००/- |
| ०४. | रिट पिटीशन नं. ५४५१/२००९ मधील २३१/२०१० बाबत. | सोमनाथ कोळपकर विरुध्द महाराष्ट्र शासन, श्री साईबाबा संस्थान शिर्डी रिस्पॉन्डंट नं.४ | १५,०००/- |

उपरोक्त प्रमाणे संस्थानने दाखल केलेले ४ लेटर पेटंट अपिलांचे रु. ८०,०००/- व दुकानदारांनी दाखल केलेले ४ लेटर पेटंट अपिलामध्ये रु. ६०,०००/- असे एकुण रक्कम रु. १,४०,०००/- ( अक्षरी रु. एक लाख चाळीस हजार मात्र ) ची मागणी केलेली आहे. संस्थानच्या वकील फी शेड्युलमध्ये हायकोर्ट प्रकरणाबाबत किती वकील फी द्यावी, याबाबत तरतुद नाही. आता पर्यंत उच्च न्यायालयातील रिट पिटीशन मध्ये जास्तीत जास्त रक्कम रु. १५,०००/- ( अक्षरी रु. पंधरा हजार ) मात्र एवढी वकील फी ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांना अदा केलेली आहे.

बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणी गोवा दि. १६/०८/२००५ च्या वकील फी शेड्युल नुसार १० वर्षा पेक्षा जास्त प्रॅक्टीस केलेल्या वकीलाला If the amount or value exceeds Rs. १,००,०००/- च्या दाव्या मध्ये रु. १५,०००/- अदा करणेची तरतूद आहे. तसेच लेटर पेटंट अपिला मध्ये In appeals from Orders or in civil application or proceedings other than applications & proceedings necessary for the progress of as suit or appeal & other than applications arising in or out of applications. रु. १५,०००/- अदा करणेची तरतूद आहे.

याप्रकरणात नगरपंचायत शिर्डी देखील पक्षकार आहे. व उच्च न्यायालयाचे वकीलांसाठी या प्रमाणेच त्यांचे मार्फत वकील फी अदा करणेत येते.

उपरोक्त रिट पिटीशन मध्ये ५६ दुकानदार व ४५ दुकानदार यांनी वेगवेगळे रिट पिटीशन दाखल केले होते. त्यांची मागणी दरखास्त नं. ५/१९९० चे निकालावर आधारीत असली तरी व काही मुद्दे सारखेच असले तरी दाव्याचे स्वरुप वेगळे होते. त्यामुळे प्रकरण गुंतागूंतीचे होते.

अशा परिस्थीतीत उल्लेख केलेले ८ लेटर पेटंट्स अपिल (मोफत सर्व्हे नं. १ पैकी ३० आर जागेतील) मध्ये श्री आर.एन.धोर्डे यांना यापुर्वी कुठल्याही प्रकारची रक्कम अदा केलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचे ४ + ४ = ८ लेटर पेटंट्स अपिला मध्ये प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु. १,२०,०००/- ( अक्षरी रु. एक लाख वीस हजार मात्र ) अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५७ यावर सविस्तर चर्चा होऊन, ॲड श्री आर.एन.धोर्डे यांची त्रिकोणातील जागेच्या संदर्भातील उपरोक्त लेटर पेटंट अपिलाची संस्थानतर्फे केलेल्या वकीला कामकाजाची वकील फी रुपये १,२०,०००/- मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**विषय नं. १२१ ए.टी.एम. साठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर बॅंकेस जागा/गाळे वापरांस देणे बाबत**

**प्रस्ताव-** बॅंक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिर्डी यांनी दि.०४/११/२०१० रोजीचे पत्राने ए.टी.एम. साठी जागा मिळणेस विनंती केलेली आहे. शिर्डी हे भारतातील पवित्र तिर्थक्षेत्र आहे. संपूर्ण जगातून श्री साईबाबांचे दर्शनासाठी अनेक साईभक्त शिर्डी येथे येतात. साईभक्तांच्या सोयीसाठी ए.टी.एम. सुविधा उपलब्ध करुन देणेची त्यांची इच्छा असून संस्थानला देणगी देणेसाठी साईभक्तांना ए.टी.एम. ची मदत होईल. त्यासाठी बॅंकेने मंदिर परिसरात कंम्पौंडला लागून ए.टी.एम.साठी जागा उपलब्ध करुन द्यावी. अशी विनंती त्यांनी उपरोक्त संदर्भीय पत्राने केलेली आहे. जागेचे वापराचे डिपॉझीट फी व लायसन्स फी किती देणार तसेच आवश्यक जागेचे क्षेत्र याचा उल्लेख मात्र त्यांचे पत्रात नाही.

बॅंक ऑफ महाराष्ट्र च्या उपरोक्त पत्रावर साईप्रसाद निवासस्थान विभागाने मंदिर परिसरात कोणतेही दुकान किंवा बॅंकेला जागा देऊ नये, म्हणून शासनाच्या संरक्षण यंत्रणेने संस्थानला कळविलेले आहे. असा अभिप्राय पाठवला आहे; तसेच सेवाधाम इमारत, साईप्रसाद नं.०१, ०२ या इमारतीचे नुतनीकरणाची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत चालू असल्याने तेथेही जागा देणे शक्य नाही. संस्थानला साई कॉम्प्लेक्समध्ये चार गाळे दिलेले आहेत. पैकी एक गाळा किंवा श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये अतिरिक्त असलेल्या जागेमध्ये ए.टी.एम.साठी जागा उपलब्ध करुन देता येईल, असे कळविले आहे. त्याच प्रमाणे संरक्षण विभागाने सध्या समाज विघातक कृत्य करणाऱ्या इसमांचे लक्ष धार्मिक देवस्थानांवर असुन याबाबत पोलिस व शासनाच्या पत्रानुसार मंदिर परिसरात असलेले सर्व

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



खाजगी स्टॉल, रेल्वे बुकींग काऊंटर्स, स्टेट बँकेचे ए.टी.एम. सेंटर मंदीर परिसराचे बाहेर हलविणे सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने बँक ऑफ महाराष्ट्र यांना ए.टी.एम. सेंटरसाठी मंदीर परिसराचे बाहेर संस्थान सल्लग्न परिसरात संबंधीत अधिक्षक यांचे अभिप्राया नुसार परवानगी देणे योग्य राहिल. असे कळविले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे परवानगीने लेखाशाखेमार्फत इतर बँकेस (यूनियन बँक ऑफ इंडिया, स्टेट बँक ऑफ इंडिया ) ए.टी.एम.साठी जागा वापरांस देणेत आलेली आहे.

प्रस्तुत विषयांचे संदर्भात प्रकाशने विभाग यांचे ताब्यात साईनाथ छाया इमारती मधील तळमजल्यावरील दोन गाळे रिकामे आहेत; त्यांचा सध्या वापर केला जात नाही. असे प्रकाशने विभागाने कळविलेले आहे. तसेच साई कॉम्प्लेक्स येथील संस्थानला प्राप्त झालेल्या ४ गाळ्यांपैकी एक गाळा ए.टी.एम.साठी जागा देता येईल. असे लेखाशाखा, बांधकाम विभाग व साईप्रसाद निवासस्थान विभागाचा अहवाल आहे.

ए.टी.एम. ची सुविधा साईभक्तांसाठी उपयुक्त रहाणार आहे. मात्र एकट्या बँक ऑफ महाराष्ट्र सारख्या इतर राष्ट्रीयकृत बँकाही ए.टी.एम साठी जागा / गाळा मागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थीतीत खालील ठिकाणी ए.टी.एम.साठी बँकेस गाळे / जागा उपलब्ध करुन देता येईल.

१) साई कॉम्प्लेक्स मधील १ गाळा ( १६ आर जागे जवळील )
२) साईनाथ छाया इमारतीतील तळमजल्यावरील १ गाळा.(सध्या या ठिकाणी ए.टी.एम.आहे त्याचे जवळ)
३) नविन भक्तनिवासस्थान इमारतीतील बाहेरचे २ गाळे.

प्रस्तुत गाळे / जागा लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर ११ महिने कालावधी साठी फक्त बँकेचे ए.टी.एम. चे व्यवसाया करीता देणेसाठी १) वृत्तपत्रात लिलाव जाहिरात देवून लिलाव पध्दतीने लिलावांत जास्तीत जास्त मासिक परवाना फी व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार देईल त्या बँकेस प्रस्तुतचा गाळा चालविण्यास देता येईल. किंवा

२) शिर्डी येथील स्थानिक राष्ट्रीयकृत बँकेकडून ११ महिने कालावधीसाठी जागा ए.टी.एम.साठी वापरांस देणे कामी जास्तीत जास्त लायसन्स फी किती देणार याबाबतचे कोटेशन मागवून गाळा वापरांस देता येईल.

तरी राष्ट्रीयकृत बँकांना उपरोक्त ३ ठिकाणी गाळा/ जागा वापरास देणे बाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा शिर्डी यांना श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरात ११ महिने कालावधीसाठी ए.टी.एम चालू करणेस परवानगी देण्यात यावी त्यासाठी मासिक परवाना फी गाळयाचे प्रती स्क्वेअर मिटरला रु. ४०० प्रमाणे यावा व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारण्यात यावा. तसेच इतर बँकाचे एटीएम प्रमाणे झालेल्या कराराप्रमाणेच अटी /शर्ती ठेऊन लिव्ह अॅण्ड लायसेन्स तत्वावर वापरास द्यावा असे ठरले.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**विषय नं.१२२** **वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालुक्यातील शाळांना दुरुस्तीसाठी दिलेला निधी सन २०१०-११ या वर्षात खर्ची टाकणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्षा,सौ.शालिनीताई विखे,जिल्हा परिषद अहमदनगर यांनी त्यांचे दि.११/०६/०७ चे पत्राने, दि.१ व २ जुन २००७ रोजी नेवासा तालुक्यातील वांजोळी येथील व नगर तालुक्यातील गजानन वसाहतीमधील जिल्हा परिषदेच्या शाळांच्या वर्ग खोल्यांचे वादळाने नुकसान झालेले आहे. सदर खोल्यांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी रु.३०,१२,९८५/- (रुपये तिस लाख बारा हजार नऊशे पंच्यांशी मात्र.) खर्चाचे अंदाजपत्रक सादर केलेले असुन सदरचे अनुदान श्री साईबाबा संस्थानमार्फत उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती केली होती.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०७/२००७ रोजीचे सभेत निर्णय क्र.५९२ अन्वये, प्रस्तावास मान्यता दिलेली असल्याने सदरचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/५५७/(५१)-का सोळा, विधी व न्याय विभाग,मुंबई दि.३१ ऑगस्ट २००९ अन्वये, सदर शाळांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी रु.३०,१२,९८५/-इतकी रक्कम अधिनियमाच्या कलम १७ (२)(ण) नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या निधीतून सन २००९-२०१० या वर्षात खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे.

सदरचा खर्च सन २०१०-२०११ या वर्षात झालेला असल्याने, सन २०१०-२०११ या वर्षात खर्ची दाखविण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वादळाने नुकसान झालेल्या जिल्हा परिषदेच्या नेवासा व नगर तालुक्यातील शाळांना दुरुस्तीसाठी दिलेला निधी सन २०१०-११ या वर्षात खर्ची टाकणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.१२३** **चि.विदीत संतोष गुजराथी नाशिक यास बुध्दीबळ खेळाचे प्रशिक्षण व आंतराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**प्रस्ताव-** डॉ.संतोष गुजराथी, नाशिक यांनी त्यांचे दि.१७/११/२००८ चे पत्रान्वये, माझा मुलगा १४ वर्षाचा असून त्याने बुध्दीबळ या क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगिरी केली आहे. नुकत्याच व्हिएतनाम येथे झालेल्या बुध्दीबळ स्पर्धेत ज्युनिअर गटात त्याने आंतरराष्ट्रीय मास्टर हा किताब मिळविला आहे. विदीतला या क्षेत्रात उंच भरारी घेऊन देशाचे नांव उज्वल करण्याची इच्छा आहे. विदीतला ग्रॅण्डमास्टर होणेसाठी (आंतरराष्ट्रीय परिक्षकाकडून प्रशिक्षण व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग मिळून) रुपये २० लाखाच्या आसपास खर्च आहे. तरी याकरीता आर्थिक मदत मिळावी, अशी विनंती केली होती.

दि.२५/१२/२००८ च्या मागील पत्राची झेरॉक्स प्रत देऊन पुनश्च आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१ (२) (एक)- नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी, अनुदान देण्याची तरतुद आहे. सदर तरतुदीमध्ये वैयक्तीकसाठी अनुदान देण्याचा समावेश नाही.

तथापी यापुर्वी शासनाच्या मंजूरीने खालील प्रकरणी वैयक्तीकरित्या विशेष बाब म्हणून आर्थिक अनुदान देण्यात आलेले आहे.

| अ.नं. | लाभार्थिचे नांव | प्रयोजन | दिलेले आर्थिक अनुदान |
|---|---|---|---|
| १ | कु.शितल कमलाकर महाजन, पुणे. | दक्षिण ध्रुवावर पॅराशुट जम्प करण्याच्या जागतिक विक्रम करणेसाठी. | रु.१० लाख. |
| २ | श्री.अप्पासाहेब भिमराज ढुस, रा.देवळाली प्रवरा, ता.राहुरी. | स्कायडायव्हिंग खेळाचे प्रशिक्षण, साहित्य व इंटरनॅशनल पायलेट लायसेन्स प्राप्त करून विश्वविक्रम करणेसाठी. | रु.७.५ लाख. |
| ३ | चि.शार्दुल व चि.शाल्मली आण्णासाहेब गागरे, रा.राहुरी जिल्हा-अहमदनगर. | बुध्दीबळ खेळातील आंतरराष्ट्रीय मास्टर व ग्रँडमास्टर प्रशिक्षणासाठी. | रु.६ लाख. |

चि.विदीत संतोष गुजराथी या बाल बुध्दीबळ पटुचा आर्थिक अनुदान मागणी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करता येईल. सदर प्रस्तावा मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळाल्यास प्रस्ताव वैयक्तीक असल्याने पुढील निर्णयासाठी राज्य शासनाकडे पाठविता येईल.
प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६०** **चि.विदीत संतोष गुजराथी नाशिक यास बुध्दीबळ खेळाचे प्रशिक्षण व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी आर्थिक मदत देणे बाबतची विनंती अमान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

---

**विषय नं.१२४** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०११ साजरा करणेस व त्यासाठी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन सन २००४ च्या अधिनियम क्र.१४ च्या कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संथान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे. ही समितीची कर्तव्ये असतील. "
त्याप्रमाणे रुढी परंपरेनुसार धार्मिक पूजा विधी, उत्सव साजरे केले जातात.

सालाबाद प्रमाणे यावर्षी श्री गुरुपौर्णिमा उत्सव गुरुवार दिनांक १४/०७/२०११ ते शनिवार दिनांक १६/०७/२०११ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

उत्सवाचा मुख्य दिवस शुक्रवार दिनांक १५/०७/२०११ आहे.

**<u>या उत्सवासाठी पुढील प्रमाणे तयारी करावी लागणार आहे.</u>**

| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| ०१. | उत्सव निमंत्रण पत्रिका | संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्याप्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ६० हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,२०० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज अॅटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात येईल. |
| ०२. | उत्सव व्यवस्था- | अ) कलाकार कार्यक्रम :- |
| | गुरुवार, | सायंकाळी ७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं. | तपशील | उत्सवात करावयाची कामे |
|---|---|---|
| | **दिनांक-१४/०७/२०११ ( प्रारंभ दिवस)** | साईनगर मैदान स्टेजवर |
| | **शुक्रवार दिनांक १५/०७/२०१० ( मुख्य दिवस)** | १) सायंकाळी ०७.३० ते रात्रौ. ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर.)<br>२) रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत (२६/०७/२०१०)कलाकारांची सेवा हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | **शनिवार, दिनांक १६/०७/२०११ ( सांगता दिवस)** | सायंकाळी ०७.३० ते ११.०० पर्यंत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम (साईनगर मैदान स्टेजवर)<br>उत्सवांचे तीनही दिवसाकरीता निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम ठरावयाचे आहेत.<br>**इच्छूक कलाकारांची पत्रे व तक्ता नंतर सादर केला जाईल.** |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | गुरुवार १४/०७/११<br>शुक्रवार १५/०७/११<br>शनिवार १६/०७/११ | श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी तीन दिवस कीर्तन कार्यक्रम ठेवावयाचा आहे. निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवास व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदिर विभागामार्फत अदा करण्यात येईल. **किर्तनकार निश्चीती करावयाची आहे.** |
| ०३. | **श्री साईसत्यव्रत (सत्य-नारायण ) पूजा व अभिषेक पूजा** | उत्सवकाळात दि. १४/०७/२०११ ते दि. १६/०७/२०११ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा **बंद** राहतील. |
| ०४) | **विद्युत रोषणाई** | समाधी मंदिर, द्वारकामाई , चावडी, गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री गुरुपौर्णिमा उत्सवात श्री साईराज डेकोरेटर्स,मुंबई विनामुल्य रोषणाई करीत असतात. त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन व चहा-नाष्ट्याची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येते. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात येणार आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ०५. | **अखंड पारायण व्यवस्था** | उत्सव काळात दिनांक १४/०७/२०११ रोजी सकाळी ०५.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक १५/०७/२०११ रोजी सकाळी ०५.०० वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक १३/०७/२०११ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदिर कर्मचा-याकडे नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्तांची नांवे ठरविणे आहेत. सोबत कोरा तक्ता जोडलेला आहे. तसेच श्री रामनवमी उत्सव सन २०११ मध्ये पोथी, विणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा घेतलेल्या मा. विश्वस्तांचे नावाचा तक्ताही सोबत जोडलेला आहे. **विश्वस्त सहभाग या सभेत निश्चित करणे आहे.** |
| ०६) | **पालखी व रथ मिरवणूक** | उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दिनांक १४/०७/२०११ रोजी श्रींचे पालखीची गांवातून रात्रौ ९.१५ वाजता मिरवणूक होईल, शुक्रवार दिनांक १५/०७/२०११ रोजी रात्रौ ०९.१५ वाजता रथाची गांवातून मिरवणूक होईल. |
| ०७) | **संरक्षण व्यवस्था** | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपणचे परवानगीबाबत मा.पोलीस निरीक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| ०८) | **प्रसाद - भोजन व्यवस्था** | उत्सव काळात प्रसादाल्यात मिष्टांन्नासह रुपये १०.०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना व निमंत्रीत कलाकरांना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाईल. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅंटीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात येईल. तसेच श्री रामनवमी उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन दिले होते, त्यानुसार श्री गुरुपौर्णिमा उत्सवात येणा-या पालखीधारकांना एकवेळचे जेवण संस्थानमार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे. श्री रामनवमी उत्सवात सन २०११ तिनही दिवसाचे मिष्टांन्न पदार्थ पुढील प्रमाणे ठेवण्यात आले होते.<br>०१) प्रथम दिवस - शिरा (०२) मुख्य दिवस - जिलेबी (०३) सांगता दिन - बुंदी<br>**या उत्सवात देखील यानूसार तीन दिवस तीन मिष्टांन्न देण्यात येतील.** |
| ०९) | **लिलाव** | श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात येईल. |
| १०) | **देणगी काऊंटर्स** | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदिर रात्रभर उघडे असल्याने देणगी काऊटर्स तीन शिफ्टमध्ये ठेवण्यात येतील. |
| ११) | **जादा कंत्राटी कर्मचारी** | उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |
| १२) | **रुग्णालय व्यवस्था** | संस्थानमार्फत दोन ठिकाणी चोवीस तास प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्ज अशी रुग्णवाहिका मंदिर परिसरात ठेवण्यात येईल. |
| १३) | **पाणीपुरवठा** | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल.<br>नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १४) | **भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था** | संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, साईऊदयान , मंगलकार्यालय, द्वारावती , भक्तनिवासस्थान, इ. इमारतीमधून तसेच साईनगर, साईप्रसाद निवासस्थान व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून पालखी पदयात्रींसाठी व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल. उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ. व मंडपही टाकावयाचे आहेत. आवश्यकतेनंसार व गरजेनुसार त्यात वाढ करावी लागेल. |
| १५) | **पालखी व्यवस्था** | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था मंगल कार्यालय, साईउद्यान, परिसरात करण्यात येते व पालखी सोबत येणा-या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, इ. इमारतीत तसेच साईनगर मैदानात, जुन्या प्रसादालयचे, न.भ.निवासाचे मोकळ्या जागेत मंडप/शामियाने इ.मध्ये करण्यात येते. या वर्षीही नेहमीप्रमाणे ती व्यवस्था करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. यावर्षी कडक उन्हाळा असल्याने पायी येणा-या भक्तांची आवश्यकतेनुसार शिंगवे, गुहापाट, पिंप्री निर्मळ येथे संस्थानतर्फे टॅंकरने पिण्याचे पाणी पुरविण्याची व्यवस्था यंदाही करावी लागणार आहे. |
| १६) | **कार्यक्रमाची सांगता** | गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील. |
| १७) | **खर्चाचे अंदाज पत्रक** | श्री गुरुपौर्णिमा उत्सव - २०१० मध्ये प्रत्यक्ष खर्च रुपये **२८,७५,२१५**/-(अक्षरी **रु. पंचवीस लाख पंचाहात्तर हजार दोनशे पंधरा** मात्र) इतका खर्च झाला होता. श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन २०११ करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रुपये **३६,००,०००.००** (अक्षरी **रु. छत्तीस लाख हजार मात्र)** खर्च अपेक्षीत आहे. |

| **अ.नं.** | **तपशील** | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१०** | | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०११** |
|---|---|---|---|---|
| ०१) | मंडप कमानी स्टेज | ८,००,०००/- | ४,६९,२०२/- | ८,००,०००/- |
| ०२) | कलाकार बिदागी कीर्तनकारासह | २,००,०००/- | ७७,५०७/- | २,००,०००/- |
| ०३) | मिष्टान्न खर्च -मजूरीसह | ३,७५,०००/- | ४,०२,३४९/- | ५,००,०००/- |
| ०४) | विद्युत रोषणाई ,जनसेट भाडे , इंधन खर्च इ. | १,००,०००/- | ५१,८७८/- | १,२५,०००/- |
| ०५) | निमंत्रण पत्रिका, जाहिरात, पोष्टेज, उदी-प्रसादासह | १८,००,०००/- | १५,८९,३६१/- | १६,००,०००/- |
| ०६) | जादा कंत्राटी कर्मचारी स्वयंसेवक(विद्यार्थी) मानधन | ३,००,०००/- | १,३०,६८९/- | २,००,०००/- |
| ०७) | इतर खर्च - मंदिर रंगकाम मंदिर प्रसाद, प्रसादालय फर्निचरभाडे, गेस्ट हाऊस, व्ही.डी.ओ. शुटींग, फोटोग्राफी,पेंटर बीले इत्यादी | १,००,०००/- | ८,४३२/- | १,००,०००/- |
| ०८) | पालख्यांचे पिण्याचे पाण्याची व्यवस्था खर्च | १०,०००/- | १०,०९९/- | ४५,०००/- |
| ०९) | भक्तांसाठी रांगेत वाटण्यात येणा-या पिण्याचे पाण्याचे पाऊचचा खर्च. | ६५,०००/- | ०० | १०,०००/- |
| १० | मंदिर व मंदिर परीसर फुलांचे डेकोरेशन | १,५०,०००/- | ०० | १०,०००/- |
| ११ | प्रथमोपचार केंद्राकरीता तातडीचे औषध खरेदी | ३०,०००/- | १,३५,६९८/- | १०,०००/- |
| | | **३९,३०,०००/-** | **२८,७५,२१५/-** | **३६,००,०००/-** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तरी उपरोक्तप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०११ साजरा करणेस, त्यासाठी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये ३६,००,०००.०० (अक्षरी रू छत्तीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे श्री गुरुपौर्णिमा उत्सव गुरुवार दिनांक १४/०७/२०११ ते शनिवार दिनांक १६/०७/२०११ असा तीन दिवस साजरा करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३६,००,०००.००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१२५** **श्रावण मासानिमित्त श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करणे बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम नं. १७(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**समितीची कर्तव्ये व अधिकार - १७.(१)** राज्य शासनाच्या कोणत्याही सर्व साधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

**१७. (२) ठ** - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) नाट्य रसिक संच, शिर्डी यांचे मदतीने गेल्या १६ वर्षापासून दरवर्षी सामुदायीक श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित केला जातो. यात सुमारे २,००० साईभक्त सहभाग घेत असतात. दर वर्षी पारायण सोहळयाची रुपरेषा खालील प्रमाणे असते.

(०१) दररोज सकाळी ७.०० ते ११.०० - साई सच्चरिताचे पारायण,
(०२) दररोज दुपारी ४.०० ते ५.०० - प्रवचन ,
(०३) दररोज रात्रौ ७.३० ते ९.३० - निमंत्रीतांचे कीर्तन/व्याख्यान/इतर करमणुकीचे कार्यक्रम.
(०४) आठव्या दिवशी साईचरित्र ग्रंथाची गांवातुन शोभा यात्रा ,
(०५) नवव्या दिवशी कालाकीर्तन व महाप्रसाद भंडारा.

नाटय रसिक संच शिर्डी यांनी दिनांक ०१/०५/२०११ चे पत्राने "या वर्षी श्रावण शुध्द १ ते श्रावण शुध्द १० शके १९३३, म्हणजे रविवार, दि.३१/०७/२०११ ते वार सोमवार , दि.०८/०८/२०११ अखेर साजरा करणे करीता परवानगी मागणी केलेली असून यापत्रात संस्थानमार्फत खालील बाबीवर खर्च करणेस विनंती केलेली आहे."

"०१. वाचकासाठी प्रशस्त, सुसज्ज मोठा हॅाल किंवा भक्कम असा भव्य मंडप पावसाळा असलेने मंडपात पाऊस गळणार नाही असा वरुन व कडेने बदिस्त मंडप ०२. मंडप व स्टेज फुले डेकोरेशन ०३) नियोजित किर्तनकार, कलाकार बिदागी, जाणे येण्याचे प्रवास खर्चासह ०४) मिरवणुक खर्च बँड व वाद्य इत्यादी ०५) पारायाणार्थींना चहा व नाष्टा ०६) पत्रिका, हॅन्डबील , बॅनर इत्यादी छपाई ०७) पारायण समाप्ती नंतर महाप्रसाद भंडारा खर्च "

नाटय रसिक संच फक्त वाचकांचे नोंदणी व बॅचेचा खर्च करणार आहेत.

मागीलवर्षी श्रावण मासानिमित्त आयोजित पारायण सोहळयास संस्थान मार्फत आलेला खर्च व यावर्षी पारायण आयोजित करावयाचे असल्यास या कामी संस्थानला येणारा अंदाजे खर्च याची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशील | २०१० चा प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षाचे कार्यक्रमासाठी अंदाजे खर्च |
|---|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था कमानी, स्टेज सजावट व अनुशंगीक खर्च | १,५०,५२५.०० | २,००,०००.०० |
| ०२. | निमंत्रण पत्रिका हॅन्डबील छपाई इ. खर्च | देणगी छपाई | ४०,०००.०० |
| ०३. | प्रवचनकार /कीर्तनकार इ. चे मानधन व प्रवासभाडे खर्च मिरवणुक, बँड, इत्यादी खर्च | १,४२,४१४.०० | २,००,०००.०० |
| ०४. | बोर्डस्, बॅनर्स व इतर किरकोळ खर्च | १०,२५०.०० | २५,०००.०० |
| ०५. | चहा,नाष्टा,फराळ व शेवटच्या दिवशी भंडारा इ.चा खर्च | २,४३,५१०.०० | २,५०,०००.०० |
| ०६. | कंत्राटी कर्मचारी खर्च | ० | १५,०००.०० |
| | **एकूण खर्च** | **५,४६,६९९.००** | **७,३०,०००.००** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



तसेच मागील वर्षी श्रावणमासाचे पारायणाव्यतीरीक्त माहे जानेवारी २०११ मध्ये महापारायण सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावर्षीही तशा प्रकारचे पारायण सोहळा आयोजित करणे बाबत विनंती होऊ शकते.

मागील वर्षी श्रावण मासातील पारायण ग्रामस्थांचे आग्रहास्तव १६ गुंढे जागेत घेण्यात आले होते. यावर्षी अंदाजे ३००० वाचक बसले असता तेथे जागेची अडचण निर्माण झाली होती. यावर्षी पारायणार्थींचे सख्येत वाढ होण्याची शक्यता आहे.

सदरचे पारायण आयोजित करणे निश्चीत झालेवर, पारायणात भाग घेणा-यांची नांव नोंदणी करावी लागेल, प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी फोनवरुन संपर्क साधुन त्यांची तारीख, वार, बिदागी, प्रवास खर्च इ. निश्चीत करावा लागेल. प्रवचनकार, कीर्तनकार निश्चित झालेवर त्यांना पत्र पाठविणे, त्यानुसार निमंत्रण पत्रिका तयार करणे, छपाई करुन घेणे, इ. कामे करावी लागतील.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रावण मासातील पारायण आयोजित करणे बाबत तसेच पारायण घेणे निश्चीत झालेस या कामी संस्थानला येणारे अंदाजे रु ७,३०,००० चे खर्चाबाबत तसेच सदरचे पारायणाची जागा निश्चीती बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी रविवार, दि.३१/०७/२०११ ते सोमवार दि.०८/०८/२०११ अखेर श्रावण मासानिमित्त श्री साईसच्चरित पारायण सोहळा संस्थानचे १६ गुठे जागेत आयोजित करणेस व याकामी येणारे अंदाजे रुक्कम रुपये ७,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**विषय नं.१२६** **अ) मासिक मानधन तत्वावर सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री एकनाथ नानासाहेब वाघ, माजी प्रशासकीय अधिकारी याचा दि. २७.०४.२०११ रोजीचा अर्ज.**

**ब) सेवानिवृतीनंतर मासिक मानधन तत्वावर सेवेची मुदतवाढ मिळणेबाबत श्री प्रभाकर भिकोबा बोरावके, प्रशासकीय अधिकारी यांचा दिनांक ७.०५.२०११ रोजीचा अर्ज**

**प्रस्ताव-** **अ)** श्री.एकनाथ नानासाहेब वाघ, माजी प्रशासकीय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी दि. १६/०४/२०११ रोजीचे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"दि.०१ जुलै १९९५ पासून मी संस्थान मध्ये सेवेत आहे. संस्थानचे नियमाप्रमाणे सेवानिवृत्तीसाठी विहीत वयोमान पूर्ण होत असल्याने मी दि.३० एप्रिल २०११ अखेर संस्थान सेवेतून निवृत्त होत आहे. या अगोदर वयोमान पूर्ण झालेमुळे संस्थान सेवेतून निवृत्त झालेले संस्थानचे काही विभाग प्रमुख, प्रशासकिय अधिंकारी व इतर यांना त्यांचे विनंतीनुसार सेवानिवृत्तीनंतर मासिक मानधन तत्वावर संस्थान सेवेत मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. कृपया माझे निष्कलंक व प्रामाणिक सेवेचा विचार करुन मलाही सेवानिवृत्तीनंतर मानधन तत्वावर इतरांप्रमाणे एक वर्षे कालावधीसाठी सेवेची संधी मिळणेस विनंती आहे. संस्थान देईल त्या मानधनावर नेमून देईल ते काम करण्यास मी संमत आहे." अशी विनंती केली आहे.

सदर अर्जावर " संस्थान सेवेत १६ वर्षे उत्तम पध्दतीने काम केले असल्याने श्री.एकनाथ वाघ यांना एक वर्षे मुदतवाढ देणेबाबत मा. विश्वस्त मा. अशोक खांबेकर साो, डॉ. गोंदकर साो, मा. सुरेशराव वाबळे साो. मा. पांडूरंग अभंग साो. मा. शैलेश कुटे साो तसेच मा. श्रीमती अलका ताई शेज्वळ यांनी शिफारस केलेली आहे.

यापुर्वी सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे सेवतून सेवानिवृत्ती झालेले कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार व संस्थानच्या आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधनावर नेमणुका दिलेल्या आहेत.

| अ. नं. | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व पदनाम | सेवानिवृत्तीचे वेळेचा विभाग | सेवानिवृतीची तारीख | कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचा कालावधी व पदनाम | प्रतिमहा मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. सुभाष किसन जगताप<br>प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०६/२००७ | ०१ वर्ष<br>**प्रशासकिय अधिकारी** | **२०,०००/-** |
| ०२ | श्री. प्रल्हाद गंगाधर शेळके<br>पाणीपुरवठा विभाग प्रमुख | पाणी पुरवठा<br>विभाग प्रमुख | ३१/०३/२००९ | ०२/०१/२००९ पासून<br>०३/०४/२०१० अखेर<br>**पाणीपुरवठा प्रमुख** | **१५,०००/-** |
| ०३ | श्री.प्रकाश तुकारामपंत जोशी<br>प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०४/२००९ | ०६ महिने<br>**विशेष कार्य अधिकारी** | **२१,०००/-** |
| ०४ | श्री.जयपाल राज<br>वाहनचालक | मुंबई कार्यालय | ३१/१२/२००८ | ०३/०१/२०१० पासून<br>०२/०१/२०१२ अखेर<br>**वाहनचालक** | **७,०००/-** |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०५ | श्री.प्रकाश रामचंद्र खोत. अधीक्षक,कँटीन विभाग. | कँटीन विभाग. | २२/०९/२००९ | दि.०९/०८/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विनंती अर्ज अमान्य करण्यात आला. |
| ०६ | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण. अधीक्षक, साभनि विभाग. | साभनि विभाग. | ३१/०५/२०१०. | अर्ज अमान्य करण्यात आला. |
| ०७ | श्री.प्रकाश रामचंद्र रत्नपारखी अधीक्षक, द्वारावती निवासस्थान. | द्वारावती निवासस्थान. | ३०/०६/२०१० | अर्ज अमान्य करण्यात आला. |

श्री. एस.एन.गर्कल विधी अधिकारी यांनी आरक्षण कोटयातून प्र.अ.पदावर पदोन्नतीने नेमणूंक मिळणेकामी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, श्री. एकनाथ वाघ माजी प्रशासकिय अधिकारी यांना एकत्रित मानधनावर एक वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देणेबाबत विचार होणेस विनंती.

**ब)** श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके, प्रशासकिय अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांनी दि. ०७/०५/२०११ रोजीचे अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"मी दि.२२/०३/१९७८ पासून संस्थान मध्ये सेवेत आहे. संस्थानचे नियमाप्रमाणे सेवानिवृत्तीसाठी विहीत वयोमान पूर्ण होत असल्याने मी दि.३१ मे २०११ अखेर संस्थान सेवेतून निवृत्त होत आहे. सध्या माझ्या मुलाचे इंजिनिअरिंग प्रथम वर्षाचे शिक्षण चालू आहे. या अगोदर वयोमान पूर्ण झालेमुळे संस्थान सेवेतून निवृत्त झालेले काही विभाग प्रमुख, प्रशासकिय अधिकारी व इतर यांना त्याचे विनंतीनुसार सेवानिवृत्तीनंतर मासिक मानधन तत्वावर संस्थान सेवेत मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. कृपया माझे निष्कलंक व प्रामाणिक सेवेचा विचार करुन मलाही सेवानिवृत्तीनंतर मासिक मानधन तत्वावर इतरांप्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी सेवेची संधी मिळणेस विनंती आहे. संस्थान देईल त्या मानधनावर मी काम करण्यास संमत आहे. " अशी विनंती केली आहे.

श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके हे सध्या प्रशासकिय अधिकारी या पदावर सेवेत आहेत. त्यांचे वयास दि.३१/०५/२०११ अखेर ६० वर्षे पूर्ण होत असल्याने त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/७२९२/२०११ दि.२३/०२/२०११ अन्वये संस्थान सेवेतून दि.३१/०५/२०११ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून सेवानिवृत्त करण्यात येत असलेबाबत संस्थान नियमाप्रमाणे नोटीस बजावण्यात आलेली आहे.

यापुर्वी सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान ६० वर्षे पुर्ण झाल्यानंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे सेवतून सेवानिवृत्ती झालेले कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार व संस्थानच्या आवश्यकतेनुसार खालीलप्रमाणे कंत्राटी पध्दतीने एकत्रित मासिक मानधनावर नेमणुका दिलेल्या आहेत.

| अ. नं. | सेवानिवृत्त कर्मचा-यांचे नांव व पदनाम | सेवानिवृत्तीचे वेळेचा विभाग | सेवानिवृत्तीची तारीख | कंत्राटी पध्दतीने नेमणूकीचा कालावधी व पदनाम | प्रतिमहा मानधन रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री. सुभाष किसन जगताप प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०६/२००७ | ०१ वर्ष **प्रशासकिय अधिकारी** | **२०,०००/-** |
| ०२. | श्री. प्रल्हाद गंगाधर शेळके पाणीपुरवठा विभाग प्रमुख | पाणी पुरवठा विभाग प्रमुख | ३१/०३/२००९ | ०२/०१/२००९ पासून ०३/०४/२०१० अखेर **पाणीपुरवठा प्रमुख** | **१५,०००/-** |
| ०३. | श्री.प्रकाश तुकारामपंत जोशी प्रशासकिय अधिकारी | प्रशासन शाखा | ३०/०४/२००९ | ०६ महिने **विशेष कार्य अधिकारी** | **२१,०००/-** |
| ०४. | श्री.जयपाल राज वाहनचालक | मुंबई कार्यालय | ३१/१२/२००८ | ०३/०१/२०१० पासून ०२/०१/२०१२ अखेर **वाहनचालक** | **७,०००/-** |
| ०५. | श्री.प्रकाश रामचंद्र खोत. अधीक्षक,कँटीन विभाग. | कँटीन विभाग. | २२/०९/२००९ | दि.०९/०८/२००९ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विनंती अर्ज अमान्य करण्यात आला. | |
| ०६. | श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण. अधीक्षक,साभनि विभाग. | साभनि विभाग. | ३१/०५/२०१०. | अर्ज अमान्य करण्यात आला. | |
| ०७. | श्री.प्रकाश रामचंद्र रत्नपारखी अधीक्षक,द्वारावती | द्वारावती निवासस्थान. | ३०/०६/२०१० | अर्ज अमान्य करण्यात आला. | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| | निवासस्थान. | | | |

श्री. एस.एन.गर्कल विधी अधिकारी यांनी आरक्षण कोटयातून प्र.अ.पदावर पदोन्नतीने नेमणूंक मिळणेकामी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके , प्रशासकीय अधिकारी यांचे विनंती अर्जानुसार यांना एकत्रित मासिक मानधनावर दोन वर्षे वर्षे कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देणेबाबत विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री. एकनाथ नानासाहेब वाघ व श्री प्रभाकर भिकोबा बोरावके, माजी प्रशासकिय अधिकारी यांना रुपये २१,०००/- प्रति महा या एकत्रित मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी विशेष कार्य अधिकारी (Officer on Special Duty) या पदावर नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

**याचवेळी संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता रिक्त होणाऱ्या प्रशासकीय अधिकारी या पदांवर शासनाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे मार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार पदावरील कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे, याकामी प्रस्ताव शासनास सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१२७** **श्री.चंद्रकान्त जयवंत रणशूर कंत्राटी पध्दतीने सल्लागार बांधकाम विभाग यांचे मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री. चंद्रकान्त जयवंत रणशूर यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/४४९/२००० दि. ०४/०२/२००० अन्वये दि.१४/१२/१९९९ पासून संस्थानचे बांधकाम विभागाकडे पुढील आदेश होईपावेतो "कन्सलटंट " या पदावर एकत्रित रु. ७०००/-मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती. त्यानुसार ते दि.१४/१२/१९९९ ते ३०/०९/२००४ अखेर पर्यंत कामावर हजर होते. दि.०१/१०/२००४ ते ११/०५/२००५ अखेर पर्यंत त्यांचे घरगुती अडचणी मुळे कामावर आले नाही. त्यानंतर श्री. रणशूर यानी दि.३०/०४/२००५ रोजीच्या अर्जाने कामावर घेणेबाबत विनंती केली सदरचे अर्जातील त्यांची विनंती व मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०५/२००५ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/८२७२/२००५ दि.०४/०८/२००५ अन्वये त्यांची कंत्राटी पध्दतीने 'सल्लागार' म्हणून नेमणूक करण्यात आली असून ते दि.१२/०५/२००५ रोजी कामावर हजर झाले आहेत. त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१७९/२०१० दि.०४ /०६/२०१० अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि.११/०५/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे. त्यांचे बाबत माहिती पुढील प्रमाणे आहे.

**अ)** श्री. रणशूर हे सेवानिवृत्त नायब तहसीलदार (सरकारी कर्मचारी ) असून पेन्शनर आहेत.

**ब)** त्यांची जन्मतारीख दि.०३/०९/१९४१ असून त्यांचे वय सध्या ६९ वर्षे ०७ महिने इतके आहे.

**क)** श्री. रणशूर यांची नेमणूक रु.७०००/- या एकत्रित मानधनावर करण्यात आलेली असून त्यांना आतापर्यंत त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली असून त्यांची कंत्राटी पध्दतीची एकूण सेवा **१०** वर्षे ०९ महिने इतकी झालेली आहे. दरम्यानचे कालावधी मध्ये त्यांना दोन वेळा मानधनात वाढ करण्यात आलेली आहे. व त्यांना सध्या प्रतिमहा एकत्रित रु.८५००/- इतके मानधन देण्यात येत आहे.

श्री. रणशूर यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता आहे किंवा कसे, तसेच त्यांना मुदतवाढ देण्यात यावी अगर कसे याबाबत वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यानुसार " श्री. रणशूर यांचे काम समाधान कारक असून, सध्या भूसंपादन कक्षाकडे ते कंत्राटी सल्लागार म्हणून काम करीत असतांना शिरडी विकास योजनेतील संस्थानसाठी आरक्षीत असलेल्या आरक्षण क्र.३४ व आरक्षण क्र.३९ या दोन भूसंपादनाचे सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यवाही करीत आहेत. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार थेट जमीन खरेदीसाठी असणारी आवश्यक कार्यवाही पार पाडीत आहेत. या व्यतिरिक्त शिरडी येथील गाळपेर जमीन, पाटबंधारे खात्याची जमीन, मौजे नांदुर्खी बुद्रुक, मौजे येसगांव येथील जमिनी संस्थानला विकास प्रकल्पासाठी उपलब्ध व्हाव्यात म्हणून कार्यवाही करीत आहेत. त्यामुळे भूसंपादन कक्षासह ते सध्या बांधकाम विभागाकडील विविध प्रस्तावाच्या संबंधाने करीत असलेल्या कामकाजाचे स्वरुप पहाता त्यांना एक वर्ष मुदतवाढ देणेस व त्यांचे मानधनात यथोचित वाढ करणेस हरकत नाही. " असे अभिप्राय वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांनी दिले आहेत.

उपरोक्त 'अ' 'ब' 'क' तसेच वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे श्री. रणशूर यांचे बाबत अभिप्राय विचारात घेता त्याचे मुदतवाढ व मानधनवाढीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.चंद्रकान्त जयवंत रणशूर कंत्राटी पध्दतीने सल्लागार बांधकाम विभाग यांना दि.११/०५/२०११ पासून पुढे तीन महिने मुदवाढ देण्यात यावी तदनंतर त्यांचे वाढत्या वयाचा विचार करुन त्यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**विषय नं.१२८** **श्री एम.ई लोहकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी मुंबई कार्यालय यांचा मुदतवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** श्री एम.ई. लोहोकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफिसर ऑन स्पेशल डयूटी तथा प्र.प्रमुख मुंबई कार्यालय यांनी त्यांचे दि.१५/०३/२०११ रोजीचे अर्जात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"मी कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असतांना कार्यालयात कार्यालयीन नियमांचे व शिस्तीचे पालन केले जाते. तसेच या कार्यालयात येणाऱ्या साईभक्तांना संस्थानची प्रकाशने , माहिती व सर्व सुविधा तत्परतेने, सहृदयतेने उपलब्ध करुन दिल्या जातात. मा.मुख्यमंत्री, मंत्री व मा.सचिव यांच्याकडील सभेस उपस्थिती, तसेच महत्वाच्या शासकीय सभांना उपस्थित होतो. माझ्याकडे असलेले प्रत्येक काम मी गुणात्मक, परिणामकारकरित्या, अत्यंत कमी वेळात समन्वय साधून पूर्ण केले आहे. साईनिकेतन इमारतीचे नव्याने बांधकाम व विस्तारीकरण याकरीता शासनाची अनुमती नजिकच्या काळात प्राप्त होईल. या इमारतीचे बांधकाम व विस्तारीकरणाच्या मंजूरीकरीता म्हाडा, बृहंमुंबई महानगरपालीका शासन अशा अनेक स्तरावर समन्वय साधावा लागणार आहे. तसेच साईनिकेतन भाडेकरु,आर्किटेक्ट व विधिज्ञ यांच्या समवेतसुध्दा संपर्क ठेवावा लागणार आहे. याबाबतचे अभिलेख, भाडेकरुसोबतचे करार, इमारतीचे अभिलेख यांचे व्यवस्थीत जतन करावे लागणार आहे हे काम करतांना अनेक स्तरावर पुढील ३ वर्षाच्या कालावधीसाठी समन्वय व संपर्क ठेवावा लागणार आहे. मी सुमारे चार वर्षे संस्थानची उत्तम सेवा करीत आहे. महाराष्ट्र शासनाने ६ व्या वेतन आयोगानुसार सेवानिवृत्त वेतन धारकांना ४० टक्के सेवानिवृत्ती वेतन वाढ दिलेली आहे. त्या धरतीवर मला संस्थान देत असलेल्या वेतनावर ४० % वाढ मंजूर करावी व एक वर्ष मुदतवाढ द्यावी ही विनंती. " असे नमूद केलेले आहे.

श्री लोहोकरे यांची दि.०१/०८/२००७ पासून संस्थानचे मुंबई कार्यालयात ऑफिसर ऑन स्पेशल डयूटी या पदावर रु.१५,०००/- मासिक मानधनावर प्रथमत: एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यापूढे नेमणूक कालावधी संपल्यावर त्यांना वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने आहे त्याच मासिक मानधनावर मुदतवाढ देण्यात आलेली आहे. आता त्यांचे नेमणूकीचे मुदतवाढीचा कालावधी दि.३१/०५/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे.

श्री लोहोकरे यांचेमार्फत शासकीय पत्रव्यवहार, शासनाकडे पाठविलेले प्रस्ताव / प्रकरणे याबाबत पाठपुरावा करण्यात येतो. तसेच मा.अध्यक्ष सो, मा.ना.विखे पा. तसेच कार्यकारी अधिकारी यांचे मंत्रालय भेटीचे वेळी आवश्यकत्या कागदपत्र व माहितीसह श्री लोहोकरे हजर असतात.

श्री लोहोकरे हे शासकीय सेवेत होते. सेवेत असतांना त्यांनी अधीक्षक पदापासून ते प्रशासकीय अधिकारी या पदावर कामे केलेली असून सेवानिवृत्तीचे विहीत वयोमान पूर्ण झाल्यामुळे ते शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांना शासकीय नियमाप्रमाणे पेन्शन मिळत आहे. आज मितीस त्यांचे वय ६२ वर्षे ०५ महिने आहे.

श्री लोहोकरे यांना नेमणूकीपासून रु.१५,०००/- एकत्रित मासीक मानधन देण्यात येत आहे. त्यांनी एक वर्ष मुदतवाढ व वेतनाच्या ४० % (रु.६०००/-) मासिक मानधनात वाढ मिळणेबाबत म्हणजे दरमहा एकत्रित रु.२१,०००/- मासिक मानधन मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी श्री लोहोकरे यांना एक वर्ष मुदतवाढ व मानधनाच्या ४० % (रु.६०००/-) इतकी वाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६५** **श्री एम.ई लोहकरे, कंत्राटी पध्दतीने ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी मुंबई कार्यालय यांचे सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांची सेवा दि.३१/०५/२०११ पासून संपुष्टात आणण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१२९** **श्रीरामपूर येथील भूसंपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मुदतवाढीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता भू-संपादन करणेकामी दि.१५-१६-१७ जुलै २००० रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार मा. उपविभागीय अधिकारी महसूल श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली दि.०२/०८/२००० पासून एक कक्ष सुरु करण्यात आलेला आहे. या कक्षाकडे कंत्राटी पद्धतीने खालील कर्मचारी देण्यात आलेले असून त्यांना त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मानधन देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे पद | हुद्दा | संख्या | मासिक एकत्रीत वेतन / मानधन रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | नायब तहसीलदार | कंन्सल्टंट | ०१ | रु.७०००/- |
| ०२ | अव्वल कारकुन संवर्गातील | अव्वल कारकुन | ०१ | रु.४५००/- |
| ०३ | लिपीकाचे कामासाठी | कंत्राटी कुशल कामगार | ०४ | रु.४०००/- |
| ०४ | कार्यालयीन कामकाजासाठी शिपाई | कंत्राटी अकुशल कामगार | ०१ | किमान वेतनानुसार हजेरी |
| | | **एकुण** | **०७** | |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



जा.नं.एसएसएस वशी ०१/६३०२ व ६३०३/२०१० दि. २०/१२/२०१० अन्वये सदर भू-संपादन कक्ष व कक्षात काम करीत असलेले कर्मचारी यांना देण्यात आलेली सहा महिन्याची मुदतवाढ दि.३०/०४/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे.

मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपुर यांनी दि.२२/०३/२०११ रोजीचे पत्राने सदर कक्षाकडे भूसंपादनाची खालीलप्रमाणे प्रकरणे चालू आहेत असे कळविले आहे.

| **अ क** | **भूसंपादन संस्थेचे नांव** | **दि.२५/१०/२०१० रोजी शिल्लक प्रकरणे** |
|---|---|---|
| १ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी (आ.क्र.३४,आ.क्र.३९,स.नं.१४८/१ पै चे प्रस्तावासंदर्भात) | *०३ + (०१) |
| २ | शिर्डी नगरपंचायत शिर्डी (शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्प संदर्भात) | ०२ |
| ३ | जागतिक बँक प्रकल्प, अ.नगर (अ.नगर-मनमाड रस्ता चौपदरीकरण व बाहयवळण रस्ता संदर्भात) | ०६ |
| ४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी (शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातील रस्त्यांचे संदर्भाने ) | **१५ ( प्रस्तावित )** |

उपरोक्त भूंसपादनाची प्रकरणे पूर्ण करणेसाठी सदर कक्षास व कक्षाकडे काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दि.३०/०४/२०१२ पर्यंत १२ महिने मुदतवाढ मिळणेबाबत मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर यांनी मागणी केलेली आहे.

तसेच, मा.उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांनी त्यांचे पत्रात नमूद केलेली संस्थान संबंधीत कामे पूर्ण करणेसाठी सदर कक्षास व कक्षाकडे काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना दि.३१/०७/२०११ पर्यंत ०३ महिने मुदतवाढ देण्याबाबत संस्थानचे वरिष्ठ मुख्य अभियंता बांधकाम यांनी अभिप्राय दिलेले आहेत.

तरी मा. उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग श्रीरामपूर यांचे पर्यवेक्षणाखाली कार्यरत असलेल्या भूसंपादन कक्षास व या कक्षाकडील कंत्राटी कर्मचा-यांचे मुदतवाढीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामपूर येथील भूसंपादन कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर दि.३०/०४/२०११ पासून पुढे तूर्त तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१३०** **श्रीमती माने स्वाती रामदास यांना सहाय्यक शिक्षक (माध्यमिक) या पदाची वेतनश्रेणी देणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिर या विद्यालयाकडील इयत्ता ८ वी ते १० वी (माध्यमिक विभागासाठी) श्रीमती.माने स्वाती रामदास यांची जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१३०१०/२००८ दिनांक ०४/०९/२००८ अन्वये शिक्षणसेवक म्हणून कामावर हजर झाल्याच्या तारखेपासून ते दिनांक ३०/०४/२०११ या ०३ शैक्षणिक वर्षांच्या कालावधीसाठी दरमहा रुपये ४,०००/-इतक्या मानधनावर नेमणूक करण्यांत आलेली होती.

सदर शिक्षणसेवक माध्यमिक शाळा संहिता भाग ८ वा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १३ ऑक्टोबर, २००० अन्वये पृष्ठ क्रमांक ५०४ अ.क्र. (८) नियमाप्रमाणे ०३ वर्ष कालावधी दिनांक ३०/०४/२०११ अखेर पूर्ण होत असल्याने, त्यांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सहा.शिक्षक (माध्यमिक) वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० देय होत आहे. सदर वेतनश्रेणीस त्या पात्र होत आहे. त्यांचे काम समाधानकारक आहे. त्यांना सदर वेतनश्रेणी देणेस हरकत नाही.

श्रीमती.माने यांना शैक्षणिक वर्ष माहे मे २०११-१२ पासून सहा.शिक्षक (माध्यमिक) वेतनश्रेणी देय होत आहे.

**निर्णय क्र.४६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिक्षणसेवक माध्यमिक शाळा संहिता भाग ८ वा महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांकः एसएसएन १०९९/(३४०/९९) माशि-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई दिनांक १३ ऑक्टोबर, २००० अन्वये पृष्ठ क्रमांक ५०४ अ.क्र. (८) नियमाप्रमाणे ०३ वर्ष कालावधी दिनांक ३०/०४/२०११ अखेर पूर्ण होत असल्याने, त्यांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून सहा.शिक्षक (माध्यमिक) वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० नेमणूक देण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना/प्राचार्या,कन्या विद्या मंदिर)

---

**विषय नं. १३१** **श्री अतूल एकनाथ वाघ, कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांचे मुदतवाढी बाबत**

**प्रस्ताव-** श्री. अतुल एकनाथ वाघ, कंत्राटी कनिष्ठ-अभियंता वाहन विभाग यांनी दि.१९/०५/२०११ रोजी अर्ज करुन "माझी दि.०९/०६/२००७ पासून कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता ( मशिनरी दुरुस्ती व देखभाल) या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. मला देण्यात आलेल्या मुदतवाढीचा कालावधी दि.०८/०६/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे. तरी माझे प्रमाणेच नेमणूका असलेल्या बांधकाम, प्रसादालय या विभागातील इतर कंत्राटी कनिष्ठ-अभियंते यांना देण्यात आलेल्या मुदतवाढी प्रमाणेच माझेही सेवेची मुदतवाढ करावी" अशी विनंती केली आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



श्री. अतुल एकनाथ वाघ, यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४८०/२००७ दि.०९/०६/२००७ अन्वये वाहन विभागाकडे कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ-अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल ) या पदावर नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर नेमणूकीचा कालावधी संपुष्ठात आल्यानंतर त्यांना वेळावेळी मुदतवाढ व मानधनात वाढ करण्यात आलेली आहे.

त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-०१/३९४६/२०१० दि. १९/०७/२०१० अन्वये देण्यात आलेली मुदतवाढ दि.०८/०६/२०११ अखेर संपुष्ठात येत आहे. सध्या त्यांना एकत्रित मानधन रु.१३,०००/- देण्यात येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/११/२०१० रोजीचे सभेमध्ये बांधकाम विभाग व प्रसादालयाकडे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य /मशिनरी दुरुस्ती व देखभाल ) या पदावरील कंत्राटी अभियंत्यांना मुदतवाढ देणे किंवा स्थायी पदावर नेमणूका देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय क्र.९३४ - कनिष्ठ अभियंते (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल ) या पदावर नेमणूका देण्यासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन कार्यवाही करणेत यावी. जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेल्या कनिष्ठ अभियंते यांना पूर्वीचेच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी , असा झालेला आहे.

सदर निर्णयानुसार उपरोक्त कनिष्ठ अभियंते (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल) यांना दि. ०८/१२/२०१० पासून जाहीराती नुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत पूर्वीच्याच अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

तसेच संबंधीत कनिष्ठ अभियंते यांना कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) , सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) व अधिक्षक (मोटर वाहन) या पदावर पदस्थापना करणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर केलेला आहे.

तरी, श्री. अतुल एकनाथ वाघ कंत्राटी कनिष्ठ अभियंता (दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांनाही इतर कंत्राटी कनिष्ठ अभियंता (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल) यांचे प्रमाणेच पूर्वीचेच अटी-शर्तीवर मुदतवाढ देणेबाबत विचार होणेस विनंती.

**निर्णय क्र.४६८** **यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री अतूल एकनाथ वाघ, , कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मशिनरी दुरुस्ती व देखभाल) वाहन विभाग यांना दिनांक ९/०६/२०११ पासून पूर्वीचेच अटी शर्तीवर दिनांक ३०.०६.२०११ अखेर मुदतवाढ देण्यात यावी.**

**याचवेळेस स्थापत्य आणि मशिनरी दुरुस्ती व देखभाल या पदांवर काम करणारे कनिष्ठ अभियंते यांची संस्थानमध्ये कंत्राटदारांमार्फत व एकत्रित मानधनावर झालेली सेवा विचारात घेऊन १०२६ कंत्राटी कामगारांप्रमाणे श्री.मधुकर परशराम गव्हाणे , श्री.गिरीष एकनाथ चोळके, श्री.अजय शिवराम पांडे, श्री.अमृत गंगाधर जगताप, श्री.अतुल एकनाथ वाघ, श्री.स्वप्निल बाबासाहेब गायकवाड व श्री.गंगाधर शंकर जाधव कंत्राटी कनिष्ठ अभियंते यांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनब्रॅण्ड अधिक ग्रेड वेतन देऊन ते सध्या काम पहात असलेल्या स्थायी मंजूर पदांवर दिनांक ०१/०७/२०११ पासुन पदस्थापना करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

---

**विषय नं. १३२** **जावकविभागकरीता फ्रँकिंग मशिन खरेदीबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२१.११.२०१० निर्णय क्र.९२६ नुसार प्रशासन शाखा - जावक विभागास आवश्यक असणारे कोरस कंपनीचे मॉडेल नं. Kores IJ-९० एक नग फ्रॅंकिंग मशिन देणगी स्वरुपात मिळाल्यास देणगी अथवा कोटेशन मागवून खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.८,२०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचा प्रस्ताव दि.२०.०४.२०११ रोजी पुढील कार्यवाही करणेकामी खरेदी विभागास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार फ्रॅकिंग मशिन खरेदीकामी कोरस कंपनीच्या अधिकृत वितरकांकडून सिलबंद निविदा मागविणेकामी, निविदा सुचनेच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन जाहिरात वर्तमानपत्रातून जनसंपर्क अधिकारी यांचे मार्फत प्रसिद्ध करणेस खरेदी विभागाकडील दि.२२.०४.२०११ रोजीचे टिपणीन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरची मंजुर टिपणी व जाहिरातीचा मसुदा वर्तमानपत्रात प्रसिद्ध करणेकामी दि.०२.०५.२०११ रोजी जनसंपर्क कार्यालयाकडे पाठविली असता, मा.प्रशासकिय अधिकारी सो. यांनी कोरस कंपनीचे अहमदनगर जिल्ह्यातील अधिकृत विक्रेते असल्यास इतर ठिकाणच्या जिल्ह्याचे विक्रेत्यांना टेंडर भरता येईल का? जाहिरातीचा उपयोग होईल का? असा शेरा लिहिल्यामुळे सदरचा प्रस्ताव जनसंपर्क कार्यालयाकडून इकडेस परत पाठविण्यात आला.

सदरबाबत आस्थापना विभागप्रमुख यांचेशी दि.०५.०४.२०११ रोजी चर्चा केली असता, त्यांनी जाहिरात देऊन काहीएक उपयोग होणार नसून सदरचे मॉडेल नं. Kores IJ-९० हे फ्रॅकिंग मशिन कोरस

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



कंपनीचे पुणे येथील अधिकृत वितरक यांचेकडेच उपलब्ध असून ते हे मशिन परदेशातून मागविणार असलेबाबत कळविले आहे.

मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेमध्ये कोटेशन मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे. परंतू मा.मुख्यलेखाधिकारी यांनी कोरस या कंपनीच्या सर्व मशिन्स (Coin Sorting, Loose नोट मशिन, बंडल नोट मशिन इ.) दक्षिणा मोजणीमध्ये वापरल्या जातात. प्रत्येक दक्षिणा मोजणीचे वेळी कंपनीचे प्रतिनिधी मशिनची देखभाल व दुरुस्तीसाठी उपस्थित असतात. फ्रॅकिंग मशिन कोरस कंपनीकडूनच घेतल्यास देखभाल व दुरुस्तीसाठी उपयोग होईल. तसेच कोरस इंडिया लि., पुणे हे फ्रॅकिंग मशिन परदेशातून मागविणार असल्याने व कंपनीचे वितरक एकमेव असल्याने जाहिरातीवर खर्च करणे योग्य ठरणार नाही. असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी कोरस कंपनीचे मॉडेल नं. Kores IJ-९० हे फ्रॅकिंग मशिन परदेशातून मागविणार असल्याने जाहिरात न देता, निविदा न मागविता थेट कोरस कंपनीचे एकमेव अधिकृत वितरक मे. कोरस इंडिया लि.,पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रु.८,२०,०००/-/-+टक्सेस मात्रस मान्यतेस्तव सादर.

**निर्णय क्र.४६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरस कंपनीचे मॉडेल नं. Kores IJ-९० हे फ्रॅकिंग मशिन परदेशातून मागविणार असल्याने जाहिरात न देता, निविदा न मागविता थेट कोरस कंपनीचे एकमेव अधिकृत वितरक मे. कोरस इंडिया लि.,पुणे यांचेकडून खरेदी करणेस व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रु.८,२०,०००/-/-+ टॅक्सेस मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग/अधिक्षक,खरेदी विभाग)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वळेचे विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१** **संस्थान मालमत्तेचा विमा उतरविणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादीचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक ११ जुलै, २०१० ते १० जुलै, २०११ या कालावधीसाठी मे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ७,११,००१/- इतकी रक्कम अदा करुन सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचाऱ्यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक १० जुलै, २०११ रोजी पूर्ण होत आहे. तरी त्यापुढील दिनांक ११ जुलै, २०११ ते १० जुलै, २०१२ अखेरच्या कालावधीसाठी विमा उतरविणेकामी मा. व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(ब)** यासाठी राष्ट्रीयकृत सार्वजनिक सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना नियोजित होणाऱ्या सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

(१) दि न्यू इंडिया एश्योरेन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर (राष्ट्रीयकृत)
(२) युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लि., शाखा शिर्डी (राष्ट्रीयकृत)
(३) ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी लि., शाखा संगमनेर (राष्ट्रीयकृत)
(४) नॅशनल इंन्शुरन्स कंपनी लि., शाखा कोपरगांव (राष्ट्रीयकृत)

उपरोक्त कंपन्यांकडून प्राप्त होणारी दरपत्रके आजचे सभेसमोर उघडुन उपस्थित प्रतिनिधी बरोबर समक्ष चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय होणेकामी सादर.

याकामी सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रकात विमा खाती रक्कम रु. ४०,८२,०००/- एवढी तरतूद केलेली आहे.

**निर्णय क्र.४७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान व रुग्णालयाकडील मालमत्तेचा विमा उतरविणेकामी स्वतंत्रपणे उपरोक्त चारही राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांकडून बंद लिफाफ्यामध्ये दरपत्रके मागवून घ्यावीत व दिनांक १० जुलै, २०११ पूर्वी होणाऱ्या उपसमिती /समिती सभेपूढे उघडून चर्चा/वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा असे ठरले.** (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी/वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२** **नवीन एक स्विफ्ट डिजायर,एक बोलेरो,एक बोलेरो पिकअप व एक तवेरा रुग्णवाहिका अशी एकून चार वाहने खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत**

**प्रस्ताव-** दि.१३/०२/२०११ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.११५ (अ) अन्वये, जाहिर लिलावाने विक्री करावयाच्या १४ वाहनांपैकी अ.नं.०५ व अ.नं. ०६ ही दोन वाहने वगळता उर्वरीत १२ वाहने जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी. या वाहनांऐवजी नवीन दोन ईनोव्हा, एक स्विफ्ट डिजायर, एक बोलेरो,

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दोन रुग्णवाहीका एक मालवाहतुक अशी एकुण सात वाहने खरेदी करण्यात यावी, जाहीर लिलावाची प्रक्रीया पुर्ण झालेनंतर शासनाचे माहितीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा, असे ठरले आहे.

वरील निर्णयानुसार, एक स्विफ्ट डिजायर वाहन खरेदी करीता जा.नं.एसएसएस/वाहन/९४९/२०११, दि.१७/०५/२०११ ने, एक महिंद्रा बोलेरो व एक महिंद्रा बोलेरो पिकअप अशी दोन वाहने खरेदी करीता जा.नं.एसएसएस/वाहन/९४८/२०११, दि.१७/०५/२०११ ने तसेच एक तवेरा रुग्णवाहीका वाहन खरेदी करीता जा.नं.एसएसएस/वाहन/९४७/२०११ दि.१७/०५/२०११ ने खालील प्रमाणे अधिकृत डिलर्स यांचेकडुन निविदा बोलावण्यात आल्या होत्या.

| **एक स्विफ्ट डिजायर करीता** | **एक महिंद्रा बोलेरो व एक महिंद्रा पिकअप करीता** | **एक तवेरा रुग्णवाहीका करीता** |
|---|---|---|
| १. सेवा ॲटोमोटीव्ह प्रा. लि., नाशिक | १. श्री राम ऑटोमोबाईल्स, अ.नगर | १. साईदिप कार्स प्रा. लि., अ.नगर |
| २. शानकार्स प्रा. लि., नाशिक. | २. जितेंद्र मोटर्स, प्रा.लि., नाशिक. | २. सोहम मोटर्स, औरंगाबाद. |
| ३. कांकरीया ॲटोमोबाईल्स प्रा. लि., संगमनेर. | ३. N.B.S. इंटरनॅशनल, लि., मुंबई<br>४. महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि.मुंबई | ३. जितेंद्र व्हिल्स (एन) प्रा. लि., नाशिक. |

तथापि उत्पादक कंपनीकडून टाकण्यात आलेल्या निर्बंधानुसार, कंपनीकडून नेमुण दिलेल्या कार्यक्षेत्रा बाहेर वाहन देता येत नसल्याने महिंद्रा बोलेरो व महिंद्रा पिकअप करीता महिंद्रा & महिंद्रा कंपनी व अहमदनगर जिल्ह्याचे अधिकृत डिलर श्रीराम ॲटोमोबाईल्स, अहमदनगर यांचेकडुन निविदा प्राप्त झालेली असुन तवेरा रुग्णवाहीका खरेदी कामी अहमदनगर जिल्ह्याचे अधिकृत डिलर साईदिप कार्स प्रा. लि. यांनीच निविदा दिलेली आहे. उर्वरित डिलर्स यांनी निविदा देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. प्राप्त झालेल्या निविदा खालील प्रमाणे.

**अ) एक स्विफ्ट डिजायर वाहन खरेदी करीता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|
| १. सेवा ॲटोमोटीव्ह प्रा. लि., नाशिक | -११/०६/२०११ | ई-मेल निविदा |
| २. कांकरीया ॲटोमोबाईल्स प्रा. लि., संगमनेर. | -११/०६/२०११ | ई-मेल निविदा |

**ब) एक महिंद्रा बोलेरो व एक बोलेरो पिकअप अशी दोन वाहने खरेदी करीता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|
| १. श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर | ३१७०-२०/०५/२०११ | उघडलेली निविदा |
| २. महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि. मुंबई | ४४७६-१०/०६/२०११ | उघडलेली निविदा |

**क) एक तवेरा रुग्णवाहीका खरेदी करीता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **आवक नं. / दिनांक** | |
|---|---|---|
| साईदिप कार्स प्रा. लि., अहमदनगर | ३८९७-०३/०६/२०११ | उघडलेली निविदा |

नवीन एक स्विफ्ट डिजायर, एक महिंद्रा बोलेरो, एक बोलेरो पिकअप तसेच एक तवेरा रुग्णवाहीका वाहने खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.

**अ) एक स्विफ्ट डिजायर (ZDI) वाहन खरेदी करीता देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **वाहनाची किंमत (रु.)** Extended warranty सह | **चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर (रु.)** |
|---|---|---|
| १. सेवा ॲटोमोटीव्ह प्रा. लि., नाशिक | ७,१२,०६३.०० | **७,१२,०६३.००** |
| २. कांकरीया ॲटोमोबाईल्स प्रा. लि., संगमनेर. | ७,१३,७७६.०० | ७,१३,७७६.०० |

**ब) एक महिंद्रा बोलेरो (SLX) वाहन खरेदी करीता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **वाहनाची किंमत (रु.)** | **चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर (रु.)** |
|---|---|---|
| १. श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर | ६,३५,९००.०० | ६,३५,९००.०० |
| २. महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि. मुंबई | ५,९३,५०८.०० | **५,९३,५०८.००** |

**क) एक महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन खरेदी करीता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता:-**

| **निविदासादरकर्त्याचे नांव** | **वाहनाची किंमत (रु.)** | **चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर (रु.)** |
|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| १. श्री राम ऑटोमोबाईल्स, अहमदनगर | ४,९५,९००.०० | ४,९५,९००.०० |
| २. महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि. मुंबई | ४,५७,३७१.०० | **४,५७,३७१.००** |

**ड) एक तवेरा रुग्णवाहीका खरेदी करीता देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता:-**

| निविदासादरकर्त्यांचे नांव | वाहनाची किंमत (रु.) | चर्चा/ वाटाघाटी अंती देऊ केलेले दर (रु.) |
|---|---|---|
| साईदिप कार्स प्रा. लि., अहमदनगर | ६,४१,७९४.०० | ६,४१,७९४.०० |

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन,खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**अ) एक स्विफ्ट डिजायर (ZDI) वाहन खरेदी करणे कामी निम्नतम दर असलेले मे.सेवा ॲटोमोटीव्ह प्रा. लि., नाशिक यांनी रुपये ७,०१२,०६३/- दर मात्र देऊ केले तथापि मे.सेवा ॲटोमोटीव्ह प्रा. लि., नाशिक यांचे प्रतिनिधी श्री अमित साळी यांनी स्विफ्ट डिजायर वाहनांकरीता मागणी अधिक असल्याने वाहनाचा पुरवठा आदेश मिळालेनंतर संस्थानकरीता वाहन उपलब्ध होण्यास अंदाजे ५ महिन्याचा कालावधी लागेल असे दुरध्वनीवरुन कळविले होते.सबब वाहन त्वरीत उपलब्ध होणेसाठी याकामी फेरकोटेशन मागविण्यात यावेत असे ठरले.**

**ब) एक महिंद्रा बोलेरो (SLX) व एक महिंद्रा पिकअप वाहन खरेदी करणे कामी निम्नतम दर असलेले महिंद्रा & महिंद्रा कंपनी लि. मुंबई यांचे अनुक्रमे निम्नतम दर रु.५,९३,५०८/- मात्र व रु.४,५७,३७१/- मात्र मान्य करण्यात येऊन पुरवठा आदेश सोबत पुर्ण रक्कमेचा डी.डी. देण्यात यावा असे ठरले.**

**क) नवीन एक तवेरा रुग्णवाहीका वाहन खरेदी न करता त्याऐवजी टाटा विंगर रुग्णवाहीका वाहन खरेदी करण्यात यावी,त्यासाठी कोटेशन मागणी करणेत यावी.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **संस्थान निधीतून विकसित करण्यात येत असलेल्या चारी नं ११ वरील रस्त्याचे कामासाठी अतिक्रमित झोपडपट्टीधारकांचे पुनःर्वसन करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुसार व गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे नियामक मंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील गोदावरी उजवा तट कालवा वितरीका क्रमांक ११ बंदिस्त करुन, त्यावरुन संस्थान खर्चाने रस्ता विकसीत करणेस मान्यता मिळालेली असून, याकामी नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी पाच वर्षाचे कराराने काही शर्तीना अधिन राहून विषयांकित रस्ता विकसित करणेसाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

उपरोक्त निर्णयांस व मान्यतेस अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस अधिनियमातील तरतुदीनुसार, सदर रस्ता विकसित करणेसाठी संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये ०७.३० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव सादर करणेत आलेला असून, सदर प्रस्ताव मान्यतेस्तव विचाराधीन आहे.

**(ब)** दरम्यानचे कालावधीत, मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील चारी क्रमांक ११ वरील रस्ता विकसित करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेत येऊन, बांधकाम ठेकेदारास दिनांक ०८ मार्च, २०११ रोजी कार्यादेश पारित करणेत आलेला असून, बांधकाम ठेकेदाराने रस्त्याचे बांधकामास सुरुवात केलेली आहे. तथापि, वर नमुद केलेप्रमाणे जलसंपदा विभागाकडील (नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक) यांचेकडील दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीचे ना हरकत प्रमाणपत्रात, चारी बंदिस्त करुन रस्ता विकसीत करणेकामी जलसंपदा विभागाचे मालकीचे जागेत अतिक्रमण असल्यास ते संस्थानने स्व:खर्चाने काढून टाकावे तसेच भविष्यात अतिक्रमण होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी अशा अटी नमूद केलेल्या आहेत.

तसेच दिनांक ०८ एप्रिल, २०११ रोजी मा. सल्लागार परिषदेच्या बैठकीमध्ये, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी विषयांकित प्रस्तावावर चर्चा करुन, पाटबंधारे खात्यामार्फत चारी क्रमांक ११ लगत, उत्तर बाजूस असलेली अतिक्रमणे हटविणेबाबत यथोचित कार्यवाही तातडीने करणेबाबत निर्देश दिलेले होते.

त्यानुसार, मा. शाखाधिकारी, सिंचन शाखा, शिर्डी यांनी दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी चारी क्रमांक ११ लगत उत्तर बाजूस असलेल्या एकूण ७५ अतिक्रमित झोपडपट्टीधारकांना, त्यांनी केलेले अतिक्रमण ०७ दिवसांचे आत हटवून पाटबंधारे खात्याची जागा खाली करुन देणेबाबत नोटीसा दिलेल्या आहेत.

**(क)** मा. शाखाधिकारी, सिंचन शाखा, शिर्डी यांनी दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी दिलेल्या नोटीशीस प्रत्युत्तर व अतिक्रमण हटविण्यास विरोध म्हणून एकूण ७५ अतिक्रमणधारकांनी मा. वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालय, कोपरगांव यांचे न्यायालयात रे.मु.नं. १३७/२०११ नुसार ताकीद मनाई हुकूम मिळावा म्हणून दावा दाखल केला आहे. त्यास अनुसरुन, मा. शाखाधिकारी, सिंचन शाखा, शिर्डी यांनी मा. न्यायालयाने अतिक्रमण हटविणेस तूर्त मनाई हुकूम दिला आहे, असे समक्ष सांगितले आहे.

मा. शाखाधिकारी, सिंचन शाखा, शिर्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार अतिक्रमणाबाबत अशी वस्तुस्थिती आहे की, गोदावरी उजवा तट कालवा चारी क्रमांक ११ च्या मध्यापासून उत्तर बाजूस पाटबंधारे खात्याची

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



१२ मीटर हद्द आहे. या पाटबंधारे खात्याचे १२ मीटर हद्दीपलीकडे, उत्तरेस १४ मीटर जागा शेती महामंडळाची आहे. या जागांपैकी पाटबंधारे खात्याची १२ मीटर हद्दी सोडून उत्तरेच्या बाजूने ०२ मीटर हद्दीमध्ये तसेच शेती महामंडळाचे जमिनीमध्ये एकूण ७५ झोपडपट्टीवासियांनी अतिक्रमण केलेले आहे.

तसेच अतिक्रमणधारकांनी दाखल केलेल्या दाव्यात नमुद केलेनुसार, या सर्व अतिक्रमणधारकांची १५ फुट x २० फुट या आकाराची वीट, माती, पत्रा अशा पक्क्या बांधकामाची वीज जोडणीसह घरे आहेत. सदर घरांना मौजे निमगांव कोऱ्हाळे ग्रामपंचायतीने मिळकत नंबर दिलेले असून, सन २००१ पासून ग्रामपंचायतीचे असेसमेंट उतारे त्यांचे नांवे आहेत व ते ग्रामपंचायतीचा मिळकत कर ही भरत आहेत.

चारी क्रमांक ११ लगत, उत्तर बाजूस असलेल्या या ७५ अतिक्रमणधारकांनी दाव्यात नमुद केलेनुसार, पर्यायी जागा व व्यवस्था करावी, नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केलेली आहे. त्यानुसार, या ७५ अतिक्रमित झोपडीधारकांना पुनःर्वसनासाठी ३०० चौरस फुट मोकळी जागा / जमीन द्यावयाची ठरल्यास, अंतर्गत रस्ते व इतर बाबींसह अंदाजे ३० आर खुली जागा / जमीन उपलब्ध करुन द्यावी लागेल.

तथापि, अतिक्रमित झोपडपट्टीधारकांच्या पुनःर्वसनसाठी संस्थान मालकीची जमीन उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास, मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ चे कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम (३) .. .. विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रामित करण्यात येणार नाही या तरतुदीनुसार मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस प्रस्ताव सादर करावा लागेल.

**निर्णय क्र.४७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४** **श्री सुरेश सखाराम डांगे व श्री उत्तम सखाराम डांगे यांची मौजे कनकूरी येथील गट नं. ११५ पैकी मधील क्षेत्र ०० हे ०२ आर जमिनी खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री. सुरेश सखाराम डांगे व श्री. उत्तम सखाराम डांगे, राहणार कनकुरी, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी, तालुका राहाता येथील गट नंबर ११५ पैकी मधील क्षेत्र ०० हे ०२ आर ही जमीन संस्थानने खरेदी घ्यावी म्हणून दिनांक २६ मार्च, २०११ रोजीचे विनंती अर्जाने प्रस्ताव दिला आहे. सदर अर्जासोबत जोडलेल्या गट नंबर ११५ च्या ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता, खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे :

| अ.नं. | गावाचे नांव / गट नंबर | ७/१२ नुसार गट नंबरचे एकूण क्षेत्र हे-आर-चौमी | भोगवटादार सदरी असलेल्या नोंदी | इतर हक्कातील नोंदी |
|---|---|---|---|---|
| ०१ | कनकुरी / गट नंबर ११५ | ०१-०५-००<br>००-०५-०० पोख<br>**०१-१०-००**<br>आकार<br>रुपये ०३=५० | **सुरेश सखाराम डांगे (अर्जदार)**<br>**उत्तम सखाराम डांगे (अर्जदार)**<br>**क्षेत्र ०-०२ आ. ०.१०**<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्त-व्यवस्था, शिर्डी<br>क्षे ००-९६-१६ आ ३.२०<br>गबाजी / जनार्दन कृष्णा जपे<br>क्षे ००.०१.५०<br>पांडूरंग तात्या थेटे क्षे ००.०१.५०<br>तुळशीराम / भिमराज / आनंदा देवराम शिंदे क्षे ००.०१.५०<br>कैलास / भास्कर निवृत्ती जगताप<br>क्षे ००.०७.०० (पोखसह) | ०१. तुकडे बंदी तुकडे जोड विरुध्द व्यवहार.<br>०२. को.क्रे.सो.इ.प.क.घे.<br>०३. कनकुरी वि.का.स.सो. इ.प.क.घे.<br>०४. कनकुरी वि.का.स.सो. इ.प.क.घे. पांडुरंग तात्या हिश्श्याचे.<br>०५. न.विहीर-१ १९९०-९१<br>**०६. न.विहीर समाईक उत्तम व सुरेश स.डांगे १०.३.९४** |

**(ब) जमिनीची भौगोलिक स्थिती :**

उपरोक्त अर्जात नमुद केलेप्रमाणे, श्री. डांगेची यांची कनकुरी शिवारात साईबाबा संस्थानच्या पाणी पुरवठा करणाऱ्या तळयाच्या पश्चिमेस, तळयाच्या पश्चिम बाजुकडील भराव भिंतीच्या लगत दोन गुंठे जमीन आहे. सदर जमिनीत विहीर आहे, पण ती आज बुजत आलेली आहे.

अर्जदार श्री. डांगे यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे, त्यांची जमीन संस्थानच्या संयुक्त पाणीपुरवठा साठवण तलावाचे पश्चिमेस लगत आहे. तसेच सदरचे गट नंबरमध्ये, वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संस्थान मालकीचे क्षेत्र ०० हे ९६ आर १६ चौमी आहे. त्यामुळे अर्जदार यांची जमीन संस्थानचे वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी उपयुक्त ठरणार आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**(क) जमिनीची किंमत :**

अर्जदार श्री. डांगे यांनी दिनांक २६ मार्च, २०१० रोजी दिलेल्या विनंती अर्जात, जमिनीचा दर रक्कम रुपये २,५०,०००/- मात्र (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार मात्र) प्रति आर / गुंठा मिळावा म्हणून विनंती केलेली आहे.

सन २०११ च्या शासकीय मुल्यांकन तक्त्यानुसार, सदर जमिनीचा (गट नंबर ११५) चा दर रुपये जिरायत जमीन या शीर्षाखाली रुपये १२ लाख मात्र प्रति हेक्टर असा दर्शविला असून, त्यानुसार जमिनीचा प्रति आर रुपये १२,०००/- मात्र इतका येत आहे.

यापुर्वी कनकुरी शिवारातील श्री. विठ्ठल तुकाराम पवार यांची गट नंबर ११६ पैकी क्षेत्र ०० हे २१ आर जमीन माहे मे, २०१० रक्कम रुपये १,७५,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करणेत आलेली आहे.

**(ड) कायदेशीर बाबीबाबत :**

श्री. डांगे यांनी त्यांचे मालकीचे क्षेत्र ०२ आर संस्थानने खरेदी करावे म्हणून विनंती अर्ज दिलेला आहे. सदर जमीन खरेदीमुळे तुकडे बंदी तुकडे जोड कायद्याचा भंग होत आहे. त्यामुळे श्री. डांगे यांची जमीन खरेदी करावयाची ठरल्यास मा. दुय्यम निबंधक, राहाता तसेच संस्थान वकील यांचा अभिप्राय घेणेत येईल. मा. दुय्यम निबंधक, राहाता यांनी सकारात्मक अभिप्राय दिल्यास श्री. डांगे यांची जमीन खरेदी करणेस कुठलीही अडचण येणार नाही.

तरी उपरोक्त प्रस्तावांस अनुसरुन, खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती आहे :

०१. श्री. सुरेश सखाराम डांगे व श्री. उत्तम सखाराम डांगे यांची मौजे कनकुरी येथील गट नंबर ११५ पैकी मधील त्यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०० हे ०२ आर खरेदी करणेत यावे किंवा कसे,

०२. सदरहू जमीन खरेदी करण्याचे ठरल्यास, जमिनीचे दराबाबत अर्जदार यांचेशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन निर्णय घेणे.

०३. उपरोक्त जमीन खरेदी करावयाची ठरल्यास, जमीनमालकांस जो दर मान्य होईल, त्या दरानुसार जमिनीची खरेदी करणेस, जमीन खरेदी करणेपुर्वी मा. दुय्यम निबंधक, राहाता व संस्थान वकिल यांचा अभिप्राय घेणे, सर्च रिपोर्ट घेणे व त्या अनुषंगाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करणे तसेच खरेदीखत नोंदविणेसाठी मुद्रांक व नोंदणी शुल्क भरणे, वकील फी आदा करणे आदि व इतर अनुषंगिक कामांसाठी येणाऱ्या योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

**निर्णय क्र.४७३ आजचे सभेत श्री सुरेश सखाराम डांगे व श्री उत्तम सखाराम डांगे यांची मौजे कनकूरी उपस्थित होते. त्यांचेशी सभेने चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी रुपये २ लाख प्रति आर हा दर देऊ केला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन. श्री सुरेश सखाराम डांगे व श्री उत्तम सखाराम डांगे यांची मौजे कनकूरी येथील गट नं. ११५ पैकी मधील क्षेत्र ०० हे ०२ आर जमिनी रुपये २ लाख प्रती आर या दराने खरेदी करण्यात यावे, तसेच प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे येणाऱ्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५ श्री साईनाथ व श्री साईबाबा लॉण्ड्री विभागाकरीता केमिकल्स व डिटर्जंट खरेदी करणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा रुग्णालय व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नवीन लॉन्ड्री कार्यान्वित करणेकामी मा.व्यवस्थापन सभा दि. १०/०१/२००८ नि.क्र.३१ चे सभेत मान्यता मिळाली होती, मा.व्यवस्थापन सभा दि.२१/०६/२००९ नि.क्र.५१७ चे सभेतील निर्णयानुसार मे.रामसन्स गारमेंट फिनीशींग, बँगलोर यांचेकडुन विविध प्रकारच्या मशिनरी खरेदी करुन लॉन्ड्री विभाग दिनांक ०१/०४/२०११ रोजी कार्यान्वित झालेला आहे.

लॉन्ड्री विभाग नविनच असल्याने केमीकल्सचा खप माहित नसल्याने सुरवातीस मा.व्यवस्थापन सभा दि.१३/०२/२०११ चे सभेतील निर्णय क्रमांक ३८ अन्वये रु.३२७००/- केमीकल्सची खरेदी निन्मत्तम दराने मे.मिनीटेक हायजीन मेकर्स, मुंबई यांचेकडुन खरेदी केलेली होती. सदरचे केमीकल्सची मागणी करताना साधारणतः सहा महिने पुरु शकेल इतका साठा हिशोबात धरुन मागणी करणेत आलेली होती, परंतु लॉन्ड्री विभाग कार्यान्वित झाल्यापासुन होणाऱ्या खपाचा विचार करता असलेले केमीकल्स साधारणतः २ ते ३ महिने पुरु शकेल इतक्या साठयाचे आहे. लॉन्ड्री विभागास केमीकल्सचा तुटवडा भासु नये म्हणुन पुन्हा केमीकल्स खरेदीचा प्रस्ताव आहे.

संस्थानचे नविन भक्तनिवास विभागामधील लॉन्ड्री केमीकल्स खरेदीकामी मा.व्यवस्थापन सभा दि.२६/०३/२०११ चे सभेतील निर्णयानुसार रुग्णालयाचे लॉन्ड्री विभागासाठी लागणारे केमीकल्स देखील त्याच दराने खरेदी करण्यात यावे असे ठरले आहे, तेव्हा त्याच मंजुर दराने जी नवीन भक्तनिवास विभागाने खरेदी केलेली आहे ती केमीकल्स मंजुर दराने खरेदी करता येईल तर जी केमीकल्स नवीन भक्तनिवास विभागाने खरेदी केलेली नाही ते कोटेशन मागवुन खरेदी करता येतील.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**अ- मंजुर दराने खरेदी करण्याची केमीकल्स**

| अ.नं. | तपशील | आवश्यक किलोग्रॅम/लिटर | अंदाजे दर रु./पै. | एकुण किंमत रु./पै. |
|---|---|---|---|---|
| १ | नॉक्स १०० | ४०० किलो | ८८.०० | ३५२००.०० |
| २ | नॉक्स बुस्ट | ८०० किलो | ४६.०० | ३६८००.०० |
| ३ | नॉक्स सोर | ३०० किलो | ४८.०० | १४४००.०० |
| | | | **एकुण किंमत** | **८६,४००.००** |

**ब- कोटेशन मागवुन खरेदी करावयाचे केमीकल्स**

| अ.नं. | तपशील | आवश्यक किलोग्रॅम/लिटर | अंदाजे दर रु./पै. | एकुण किंमत रु./पै. |
|---|---|---|---|---|
| १ | नॉक्स वुल | १०० लिटर | १९७.०० | १९७००.०० |
| २ | एमरॉल | ५० लिटर | ८८.०० | ४४००.०० |
| ३ | बि.एस.आर | ५० लिटर | ५०.०० | २५००.०० |
| ४ | नॉक्स लिक्वीड ब्लीच | ३०० लिटर | ८५.०० | २५५००.०० |
| ५ | निळ | १०० लिटर | ३०.०० | ३०००.०० |
| | | | **एकुण किंमत** | **५५,१००.००** |

उपरोक्तप्रमाणे टेबल **अ** मधील केमीकल्स मे. मिनीटेक हायजीन मेकर्स, मुंबई यांचेकडुन मंजुर दराने खरेदीकामी एकुण रु.८६,४००/- इतका खर्च येईल.

तरी टेबल **ब** मधील केमीकल्स कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.५५१००/- इतक्या खर्चास मान्यता असावी व टेबल अ मधील केमीकल्स खरेदीकामी मे.मिनीटेक हायजीन मेकर्स,मुंबई यांना कार्यादेश देण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७४ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे टेबल अ मधील केमीकल्स मे. मिनीटेक हायजीन मेकर्स, मुंबई यांचेकडुन मंजुर दराने खरेदी करणेस व याकामी येणारे एकुण रु.८६,४००/- खर्चास तसेच टेबल ब मधील केमीकल्स कोटेशन मागवुन खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु.५५१००/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६ संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा करणेचे नियमावली बाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे सर्व कायम कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांना संस्थानचे दोन्ही रुग्णालयात बाह्य रुग्ण व अंतरुग्ण म्हणून मोफत उपचार देण्यात येतात. संस्थानचे दोन्ही रुग्णालयात जर रुग्णास फरक पडत नसेल व त्यास पुढील उच्च उपचाराची आवश्यकता असेल किंवा संस्थानचे दोन्ही रुग्णालयात ज्या उपचाराची सुविधा उपलब्ध नाही अशा रुग्णांना संस्थानने मान्य केलेल्या रुग्णालयात पुढील उपचारांसाठी संस्थानचे डॉक्टरांकडून शिफारस करण्यात येत असते.

संस्थानचे रुग्णालयात उपचार घेत असतांना जी औषधे आपणाकडे उपलब्ध आहे ती त्यांना मोफत देण्यात येतात व जी औषधे आपणाकडे उपलब्ध नाहीत ती त्यांना बाहेरुन विकत घ्यावी लागतात तर बाहेरील रुग्णालयात उपचार घेत असतांनी सर्वच औषधे ती बाहेरुन विकत घ्यावी लागतात.

संस्थानचे सर्व कायम कर्मचारी व त्यांचे अवलंबीतांसाठी लागणारी औषधे खरेदीकामी होणाऱ्या खर्चाची बीले संस्थानकडे वैद्यकिय परतावा मिळणेकामी सादर करत असतात. त्यापैकी एका आर्थिक वर्षात रु.१०,०००/- पर्यंतची बीले ही वैद्यकिय संचालक यांचे अधिकारात मंजूर करण्यात येत असतात परंतु जर त्या आर्थिक वर्षात रु.१०,०००/- पेक्षा जास्त रक्कमेची बीले परतावा मिळणेकामी सादर केली तर ती संस्थान वैदयकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छानणी करुन अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ११/०९/२००४ चे सभेतील निर्णय क्रमांक १९ अन्वये अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकिय बीले वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांनी तपासून त्यांचे शिफारशीनूसार अंतीम मंजूरीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत असतात.

उपरोक्त कार्यपध्दतीप्रमाणे अशी जादा वैद्यकिय बीले मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०३/२०११ चे सभेपुढे मान्यतेसाठी एकूण १७ बीले मान्यतेसाठी ठेवली असता त्यावर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"सध्या प्रलंबीत असलेल्या बीलांचा परतावा करण्यात यावा. मात्र यापुढे येणारे जादा वैद्यकिय बीलांच्या परताव्याबाबत वैद्यकिय अधिकारी, संस्थान अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्रित बैठक घेऊन, शासकिय कर्मचाऱ्यांना वैद्यकिय बीलांचा परतावा करणेबाबत काय पध्दती आहे याबाबत चौकशी करुन सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करावा असे ठरले."

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



त्यानूसार महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्रमांक एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ दि.१९ मार्च २००५ अन्वये शासनाची खालील प्रमाणे औषधांवरील खर्चाची प्रतीपुर्तीची नियमावली दिलेली आहे.

**त्यानूसार :-**

**१. औषधोपचारावरील खर्चाची प्रतीपूर्ती :-** वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय राहील.

**२. खाजगी रुग्णालयातील वास्तव्यावरील खर्चाची प्रतीपूर्ती :-** प्रस्तुत शासन निर्णयामधील तक्ता "ब" मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| अ. क्र. | खाजगी रुग्णालयातील वास्तव्याचा प्रकार | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करावयाचा प्रचलित दर | वास्तव्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती करावयाचा सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | जनरल वार्ड (सर्व सामान्य कक्ष) | वेतनाच्या टप्प्याप्रमाणे ९०%,८५%,८०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९५% अनुज्ञेय |
| २ | जनरल वार्डच्या (सर्व सामान्य कक्षाच्या) बाजूचा बाथरुम नसलेला कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ९०% अनुज्ञेय |
| ३ | बाथरुमसह स्वतंत्र कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६५% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय |
| ४ | बाथरुमसह डबल बेडेड कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ६०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% अनुज्ञेय |
| ५ | बाथरुमसह वातानुकुलित कक्ष | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% | प्रत्यक्ष खर्चाच्या सरसकट ७५% |
| ६ | अतिदक्षता कक्ष (ICU) | प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% | १००% |

(विशेष टिप - वरील तक्ता "ब" मधील अनुक्रमांक ५ येथे नमूद केलेला बाथरुमसह वातानुकुलित कक्ष हा केवळ जे अधिकारी विमानप्रवासासाठी पात्र आहेत, त्यांना अनुज्ञेय राहील.)

३. महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांमधील तरतूदींच्या अधीन राहून रु.४०,०००/- पर्यंतच्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीचे मंजूरीचे अधिकार संबंधीत विभागाच्या विभागप्रमुखांना प्रदान करण्यात येत आहेत

४. प्रचलित पध्दतीनुसार रु.२०,०००/- वरील वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीस एक विशेष बाब म्हणून मंजूरी देण्याबाबतची प्रकरणे सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभागास सादर केली जात होती, आता रु.४०,०००/- वरील वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयांमधील तरतूदींच्या अधीन राहून मंजूरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभागप्रमुखांना देण्यात येत आहेत.

५. विहीत तरतूदीत न बसणाऱ्या प्रकरणी काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपूर्तीस मान्यता द्यावयाची असल्यास अशा प्रकरणी निर्णय घेण्यासाठी पुढे नमूद केल्याप्रमाणे समिती गठीत करण्यात येत असून या समितीकडे अशी प्रकरणे निर्णयार्थ सादर करण्यात यावीत.

अ) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग - अध्यक्ष
ब) सचिव (व्यय),वित्त विभाग - सदस्य
क) संबंधित प्रशासकिय विभागांचे सचिव - सदस्य
ड) महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई - सदस्य
ई) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई - सदस्य
फ) उप सचिव (रुग्णसेवा), सार्वजनिक आरोग्य विभाग - सदस्य सचिव

संस्थानचे कर्मचाऱ्यास परतावा मंजूर करणेपूर्वी सध्याची असलेली वैद्यकिय देखभाल नियमावली महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाचे उपरोक्त शासन निर्णय क्रमांक एमएजी १०९९/ प्र.क्र.४०/ आरोग्य ३ दि.२९ मार्च १९९९ चा आधार घेऊन नियमावली तयार करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे संस्थान कर्मचाऱ्यांना आतापर्यंत वैद्यकिय बीलांची छानणी करुनच बीले अदायगीसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात येतात.

महाराष्ट्र शासनाचे नियमावली व संस्थानमध्ये सध्या असलेली नियमावली यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा फरक दिसून येतो.

| अ.नं. | शासन नियमावली | संस्थान नियमावली |
|---|---|---|
| १ | रु.४०,०००/- पर्यंतचे रक्कमेची बीले मंजूर करण्याचा अधिकार संबंधीत विभागप्रमुख यांना आहे. | रु.१०,०००/- पर्यंतचे बीले मंजूर करण्याचा अधिकार विभाग प्रमुख (वैद्यकिय संचालक) यांना आहे. |
| २ | वेतनश्रेणीचे वर्गीकरण न करता औषधोपचारावरील प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम सरसकट अनुज्ञेय आहे. | नियमावली प्रमाणे बीलांची छानणी करुन काही रुग्णामध्ये १००% तर काही रुग्णांमध्ये त्यापेक्षा कमी ७०%,८०%,९०% याप्रमाणे अनुज्ञेय होत असलेली रक्कम देण्यात येते. |
| ३ | रु.४०,०००/- पेक्षा वरील खर्चाची बीले वैद्यकिय प्रतीपूर्तीसाठी मंत्रालयीन प्रशासकिय विभाग प्रमुख यांना | संस्थान विश्वस्थ समिती मंडळ हे शासन नियुक्त समिती आहे व रु.१०,०००/- पेक्षा वरील सर्व खर्चाची बीले मंजूर करण्याचा अधिकार |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | |
|---|---|---|
| | देण्यात आलेले आहे. तर काही अपवादात्मक परिस्थितीत विशेष बाब म्हणून उपरोक्त नं .५ मध्ये गठीत केलेल्या समिती कडे निर्णयार्थ पाठविण्यात येतात. | समितीस आहे. |

उपरोक्त परिस्थितीचा विचार करता संस्थानची कार्यपध्दती व शासनाची कार्य पध्दती यामध्ये विशेष असा काही फरक आढळून येत नाही. तेंव्हा संस्थानची सध्या असलेली सन १९९९ ची नियमावली नूसार प्रकरणे छनणी करुन मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यापूर्वी मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर साहेब व मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी साहेब यांना दाखवून अंतिम मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्याची कार्यप्रणाली तसीच चालू ठेवावी असे नम्र मत आहे.

**निर्णय क्र.४७५ यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानची कार्यपध्दती व शासनाची कार्य पध्दती यामध्ये विशेष असा काही फरक नसल्याने संस्थानची सध्या असलेली सन १९९९ ची नियमावली नूसार प्रकरणे छाननी करुन मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यापूर्वी मा.विश्वस्त डॉ.ए.भा.गोंदकर व मा. विश्वस्त डॉ.प्यारेलाल तिवारी यांना दाखवून अंतिम मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्याची कार्यप्रणाली चालू ठेवावी, असे ठरले.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७ 2 KVA युपीएस च्या बॅटरीज बदलणेबाबत**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटल मधील जी. आय. सी. यु., पॅथोलॉजी विभाग व ब्लड बँक करीता इकडील पुरवठा आदेश क्र. १२३२० दि. ११/०९/२००६ अन्वये मे. कन्सुल कन्सॉलीडेटेड प्रा. लि. मुंबई या कंपनीकडुन ०६ नग ०२ के. व्ही. ए. क्षमतेचे यु. पी. एस खरेदी करणेत आले आहे. सदर यु. पी. एस. जी. आय. सी. यु. विभागात ०४ नग, पॅथोलॉजी विभाग ०१ नग व ब्लड बँक विभागात ०१ नग कार्यान्वीत करणेत आले असुन यु. पी. एस. करीता कंपनीने दिलेला ०१ वर्षांचा वॉरंटी संपलेला आहे.

सध्या जी. आय. सी. यु विभागातील यु. पी. एस. व्यवस्थित काम देत नसल्याचे सदर विभागाने त्यांचे पत्र क्र. ८१ दि. २३/०४/२०११ अन्वये कळविले आहे. सदर यु.पी.एस. तपासणी केली असता बॅटरीज खराब झाल्याचे निदर्शनास आले. सदर नवीन ४८ नग बॅटरीज खरेदी करणेकामी सर्व करांसहीत एकुण रु. १,२४,२५८/- (अक्षरी रु. एक लाख चोवीस हजार दोनशे अठ्ठावन्न मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. यु.पी.एस. खरेदी केल्यापासुन सदर बॅटरीज आज पावेतो बदलणेत आलेल्या नाहीत. अशा प्रकारच्या बॅटरीजचा पुरवठा करु शकणाऱ्या विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन सदर १२ व्होल्ट / १७ ए. एच. क्षमतेच्या बॅटरीज निम्नतम दराने खरेदी करता येतील व जुन्या बॅटरीज संस्थानचे रेकॉर्ड विभागाकडुन उच्चतम दराने विक्री करता येतील असे मत आहे.

तरी २ KVA यु. पी. एस. करीता १२ व्होल्ट / १७ ए. एच. क्षमतेच्या ४८ नग बॅटरीज बदलणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. १,२४,२५८/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७६ यावर सविस्तर चर्चा होऊन, २ KVA यु. पी. एस. करीता १२ व्होल्ट / १७ ए. एच. क्षमतेच्या ४८ नग बॅटरीज बदलणेकामी विविध पुरवठाधारकांकडुन कोटेशन मागवुन निम्नतम दराने बॅटरीज खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. १,२४,२५८/- चे खर्चास तसेच जुन्या बॅटरीजची संस्थानचे रेकॉर्ड विभागामार्फत उच्चतम दराने विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८ ११ महिने कालावधीकरीता तात्पूरते नेमणूकीस असलेल्या परिचारक/परिचारिका यांची मुदतवाढ संपूष्टात येत असलेबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६६१ नुसार संस्थानचे दोन्ही रुग्णालयांसाठी १०० बिंदू नामावलीप्रमाणे प्रवर्गातील व इतर वर्गवारीमधील परिचारिकांची रिक्त पदे भरण्यासाठी वर्तमान पत्रांत जाहिरात देऊन अर्ज मागणी करणेत यावी. जाहिरातीनुसार पदे भरण्यास काही कालावधी लागणार असल्याने सध्या ११ महिने कालावधीसाठी नेमणूक केलेल्या परिचारक / परिचारीका यांना त्यांची मुदत संपलेपासून ०६ महिने अथवा जाहिरातीनुसार पदे भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सध्याचेच अटी-शर्तीवर दरमहा रु. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले आहे. त्यास अनुसरुन, एकूण २४ उमेदवारांना ०६ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली होती.

दोन्ही रुग्णालयांसाठी बिंदू नामावलीनुसार जात प्रवर्गाप्रमाणे आवश्यक तेवढया एकूण ६७ स्टाफनर्सची पदे भरणेकामी दि. २५/१२/२०१० रोजीचे दै. लोकमत या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागणी करण्यात आलेले आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



स्टाफनर्सचे पदासाठी जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जांवर निर्णय घेणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. च्सध्या ०६ महिने कालावधीकरीता कार्यरत असलेल्या परिचारक/परिचारीका यांना त्यांची मुदत संपलेपासून पुढे ०५ महिने अथवा जाहिरातीव्दारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत सध्याचेच अटी-शर्तीवर दरमहा रु. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढ देण्यात यावी. तसेच प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करुन जाहिरातीनुसार सर्व पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात यावी. लेखी परिक्षेमध्ये किमान ७०% गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवारास प्रात्यक्षिक परिक्षेकरीता बोलविण्यात यावे. प्रात्यक्षिक परिक्षेतून प्रत्येक प्रवर्गासाठी गुणांनुसार एका पदाकरीता पहिले ०५ उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात यावे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, ०६ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या परिचारक/ परिचारीका यांना दि. १९/०२/२०११ व दि. ०४/०५/२०११ रोजीचे मंजूर टिपणीनुसार त्यांची मुदत संपलेपासून पूढे ०५ महिने अथवा जाहिरातीव्दारे पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत सध्याचेच अटी / शर्तीवर दरमहा रु. १०,०००/- एकत्रित वेतनावर मुदतवाढी देण्यात आलेल्या आहे. त्यांच्या मुदतवाढीचा तपशील पुढीलपमाणे-

| अ नं | नाव | पहिली नेमणूक ११ महिने | | पहिल्यांदा मुदतवाढ | | ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ | | ०५ महिन्यांसाठी मुदतवाढ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हजर तारीख | मुदत संपलेची तारीख | हजर तारीख | मुदत संपेलेची तारीख | हजर तारीख | मुदत संपलेची तारीख | पासून | मुदतवाढ संपण्याची तारीख |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | श्रीमती. सुनिता शिवशंकर कुभार | २३/०९/०८ | २२/०८/०९ | २५/०८/०९ | २४/०७/१० | २८/०७/१० | २७/०१/११ | २८/०१/११ | २७/०६/११ |
| २ | श्री चांगदेव पंढरीनाथ काळे | २४/०९/०८ | २३/०८/०९ | २६/०८/०९ | २५/०७/१० | २८/०७/१० | २७/०१/११ | २८/०१/११ | २७/०६/११ |
| ३ | श्री विशाल निळकंठ कुलकर्णी | २६/०९/०८ | २५/०८/०९ | २८/०८/०९ | २७/०७/१० | ३०/०७/१० | २९/०१/११ | ३०/०१/११ | २९/०६/११ |
| ४ | कु. प्रतिमा रामचंद्र कोळगे | २६/०९/०८ | २५/०८/०९ | २८/०८/०९ | २७/०७/१० | ३०/०८/१० | २८/०२/११ | ०१/०३/११ | ३१/०७/११ |
| ५ | कु. रिटा मॅन्युएल मुन्तोडे | २७/०९/०८ | २६/०८/०९ | २९/०८/०९ | २८/०७/१० | ०१/०८/१० | २८/०२/११ | ०१/०३/११ | ३१/०७/११ |
| ६ | कु आशुमती संपत सदाफुले | २९/०९/०८ | २८/०८/०९ | ३१/०८/०९ | ३०/०७/१० | ०२/०८/१० | ०१/०२/११ | ०२/०२/११ | ०१/०७/११ |
| ७ | कु. मनिषा स्टिफन आवारे | २९/०९/०८ | २८/०८/०९ | ३१/०८/०९ | ३०/०७/१० | ०२/०८/१० | ०१/०२/११ | ०२/०२/११ | ०१/०७/११ |
| ८ | कु. कांचन विनायक शिंदे | ०१/१०/०८ | ३०/०८/०९ | ०२/०९/०९ | ०१/०८/१० | ०५/०८/१० | ०४/०२/११ | ०५/०२/११ | ०४/०७/११ |
| ९ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | ०१/१०/०८ | ३०/०८/०९ | ०२/०९/०९ | ०१/०८/१० | ०४/०८/१० | ०३/०२/११ | ०४/०२/११ | ०३/०७/११ |
| १० | श्रीमती सारीका फकीरा बनसोडे | ०३/१०/०८ | ०२/०९/०९ | ०५/०९/०९ | ०४/०८/१० | २४/०८/१० | २३/०२/११ | २४/०२/११ | २३/०७/११ |
| ११ | श्री. आशिष शरद सुर्यवंशी | ०४/१०/०८ | ०३/०९/०९ | ०६/०९/०९ | ०५/०८/१० | ०८/०८/१० | ०७/०२/११ | ०८/०२/११ | ०७/०७/११ |
| १२ | कु. आशा रमेश जगताप | २२/१०/०८ | २१/०९/०९ | २४/०९/०९ | २३/०८/१० | २६/०८/१० | २५/०२/११ | २६/०२/११ | २५/०७/११ |
| १३ | श्री. राहुल प्रकाश ओहोळ | ०७/११/०८ | ०६/१०/०९ | ०९/१०/०९ | ०८/०९/१० | ११/०९/१० | १०/०३/११ | ११/०३/११ | १०/०८/११ |
| १४ | श्रीमती अलका भि. बिराजदार | ०६/१०/०८ | ०५/०९/०९ | ०६/०१/१० | ०५/१२/१० | ०८/१२/१० | ०७/०६/११ | ०८/०६/११ | ०७/११/११ |
| १५ | कु. प्राजक्ता दिपक जाधव | ३०/१२/०८ | २९/११/०९ | ०२/१२/०९ | ०१ /११/१० | ०४/११/१० | ०३/०५/११ | ०४/०५/११ | ०३/१०/११ |
| १६ | कु. रुपाली अशोक आरखडे | ०१/०१/०९ | ३०/११/०९ | ०३/१२/०९ | ०२/११/१० | ०५/११/१० | ०४/०५/११ | ०५/०५/११ | ०४/१०/११ |
| १७ | कु. सरीना एडवर्ड आढाव | ०२/०१/०९ | ०१/१२/०९ | ०४/१२/०९ | ०३/११/१० | ०५/११/१० | ०४/०५/११ | ०५/०५/११ | ०४/१०/११ |
| १८ | श्रीमती. विजया उज्वल शेळके | ०५/०१/०९ | ०४/१२/०९ | ०८/१२/०९ | ०७/११/१० | १०/१ १/१० | ०९/०५/११ | १०/०५/११ | ०९/१०/११ |
| १९ | श्रीमती. कावेरी सुदाम म्हस्के | ०८/०१/०९ | ०७/१२/०९ | ११/१२/०९ | १०/११/१० | १३/११/१० | १२/०५/११ | १३/०५/११ | १२/१०/११ |
| २० | सौ रुथ निलेश श्रीवास्तव | १९/०१/०९ | १८/१२/०९ | २१/१२/०९ | २०/११/१० | २३/११/१० | २२/०५/११ | २३/०५/११ | २२/१०/११ |
| २१ | कु. शुभदा राफायल गायकवाड | ०२/०२/०९ | ०१/०१/१० | ०४/०१/१० | ०३/१२/१० | ०६/१२/१० | ०५/०६/११ | ०६/०६/११ | ०५/११/११ |
| २२ | कु. कविता योसेफ पंडीत | ०२/०२/०९ | ०१/०१/१० | ०४/०१/१० | ०३/१२/१० | ०६/१२/१० | ०५/०६/११ | ०६/०६/११ | ०५/११/११ |
| २३ | श्री. रवी आगुस्तीन मुन्तोडे | ०१/०१/०९ | ३०/११/०९ | ०५/०२/१० | ०४/०१/११ | ०७/०१/११ | ०६/०७/११ | ०७/०७/११ | ०६/१२/११ |

उपरोक्त तक्त्यातील अ.नं. १ ते २३ चे परिचारक / परिचारीका यांची मुदत तक्त्यातील स्तंभ क्र.१० मध्ये दर्शविलेल्या दिनांकास संपुष्टात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेत निर्णय क्र. ६६१ नुसार दि.२५/१२/२०१० रोजीचे दैनिक लोकमत या वर्तमान पत्रातील जाहिरातीस अनुसरुन, स्टाफ नर्स पदाचे भरतीकरीता प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ५६४ उमेदवारांना दि. ०६/०४/२०११ रोजीचे ५० गुणांच्या लेखी परिक्षेकरीता बोलावण्यात आले होते. त्यापैकी ३३९ उमेदवार या परिक्षेस हजर होते. लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या एकूण १९० उमेदवारांना दि. २७,२८/०४/२०११ रोजीचे दोन्ही रुग्णालयांत घेण्यात येणाऱ्या ४० गुणांचे प्रात्यक्षिक परिक्षेस बोलावण्यात आले होते. त्यापैकी १७८ उमेदवार या प्रात्यक्षिक परिक्षेस हजर होते. परिक्षेस हजर असलेल्या सर्व उमेदवारांचे मुळ प्रमाणपत्र तपासण्यात आले. त्यातून दोन उमेदवार अपात्र आढळले.

प्रवर्गानुसार प्रात्यक्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांनुसार गुणयादी तयार करुन, सदर यादी लिफाफ्यात वैद्यकिय संचालक यांचे समक्ष दि. २९/०४/२०११ रोजी सिलबंद केली. सदर गुणयादी मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये उघडून पुढील कार्यवाही होणेसाठी काहीसा कालावधी लागणार आहे. रुग्णालयांत रुग्णांना सेवा पुरविणेसाठी परिचारक / परिचारीका यांची

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



आवश्यकता आहे. त्यामुळे भरती प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी लागणाऱ्या कालावधीमध्ये उपरोक्त तक्त्यामधील ज्या परिचारक / परिचारीका यांची मुदतवाढ संपुष्टात येईल व ज्यांचेबाबतीत वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय संचालक यांनी काम समाधानाकारक आहे असा अभिप्राय दिलेला असेल, अशा परिचारक / परीचारीका यांना टप्याटप्याने मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने मुदतवाढ देता येईल. तसेच उपरोक्त तक्त्यामधील ज्या परिचारक / परिचारीका यांचे काम असमाधानकारक आहे, असा अभिप्राय वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय संचालक यांनी दिलेला असेल, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करता येईल, असे मत आहे.

**निर्णय क्र.४७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक २५.१२.२०१० रोजीचे जाहिरातीस अनुसरुन मुलाखतीव्दारे प्रवर्गानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास वैद्यकीय संचालक, रुग्णालये यांचे अहवालानुसार सध्या ११ महिने कालावधीसाठी कार्यरत असलेल्या आवश्यक परिचारिका /परिचारक यांना पूढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९ श्री साईबाबांचे मूळ फोटोचे मॅटपेट (मॅटेलाईझड ) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर छपाईबाबत**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१.११.२०१० चे सभेतील निर्णय क्र. ८६२ नुसार मे. टॅको व्हीजन्स् प्रा.लि.मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१२०१९ /२०११दि. ०८.०२.२०११ अन्वये खालीलप्रमाणे फोटो छपाई कामाचा पुरवठा आदेश देणेत आलेला आहे.

| अ.नं | फोटोचे नाव | छपाई संख्या | मंजूर दर रुपये पैसे | रक्कम रुपये | संस्थान देणगी मुल्य रु. पै. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात १४" x २०" | २,००,००० | २.६० | ५,२०,०००/- | ०३ |
| ०२ | पालखी फोटो ४ रंगात साईज २०" x २८" | १,००,००० | ५.२५ | ५,२५,०००/- | ०७ |

वरील आदेशीत श्री साईबाबांचे मुळ फोटोंना मॅटपेट (मॅटेलाईझड्) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर छपाई करुन तयार केले आहे.

मे. साईग्रस फाऊन्डेशन, मुंबई यांनी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक - २१.०५.२०११ चे सभेत दिनांकः- २०.०५.२०११ चे पत्र सादर केले त्यात खालीलप्रमाणे सोबतचे नमुन्याप्रमाणे श्री साईबाबांचे मुळ

फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड्) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर तयार करुन सभेत सादर केले. सदरचे श्री साईबाबांचे मॅटपेट (मॅटेलाईझड्) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. सदर पत्रावर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषय सभेत सादर करणेस निर्देशित केले आहे.

खालील अ,ब व क मध्ये नमुद केलेप्रमाणे मे. साईग्रस फाऊन्डेशन, मुंबई श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड्) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर चांगल्या प्रकारचे फोटो ग्राफ, उत्कृष्ट डिझाईन, आकारबद्ध , चांगल्या प्रकारचा उच्च दर्जाचा कागद वापरुन छपाई करुन सुबक आकर्षक तयार केले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं | तपशिल | छपाई संख्या | छपाई दर रुपये | एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|
| अ) | श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड् फिनिश) पोस्टर ७ फोटोंचासंच (७ पेजेस ) आकार २०" x २८" | १,००,००० | २१/- | २१,००,०००/- |
| ब) | श्री साईबाबांचे ७ पेजेसचे ( ७ फोटो ) डिलक्स वॉल कॅलेंडर २०१२ मॅटपेट (मॅटेलाईझड् फिनिश) आकार २०" x२८" | ३०,००० | २२५/- | ६७,५०,०००/- |
| क) | श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट(मॅटेलाईझड् फिनिश ) पोस्टर ७ फोटोंचा संच (७ पेजेस ) आकार २०"x १४" | १,००,००० | १२.६० | १२,६०,०००/- |
| | | | एकूण रु. | १,०१,१०,०००/- |

मे.साईग्रेस फाऊन्डेशन, मुंबई यांनी श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड् ) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर छपाई कामी विशेष तंत्रज्ञान वापरुन तयार करण्यात आलेले आहे.

साईभक्तांना संस्थानव्दारा वरील प्रमाणे श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड् ) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर उपलबध करुन देणे असल्याने पोस्टर ॲण्ड कॅलेंडर वर संस्थानचे नाव,संस्थान लोगो, देणगी मूल्य छपाई करुन घ्यावे लागेल.

वरील "अ","ब"व"क" मध्ये नमुद केलेनुसार साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड् ) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर छपाईकामी रु. १,०१,१०,०००/- इतका अपेक्षित खर्च येणार आहे.

उपरोक्त "अ","ब"व"क" मध्ये नमुद केलेप्रमाणे साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड्) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर छपाईकामी नामांकित प्रेसधारकांकडून दरपत्रके मागविणेस व त्याकामीचे रु. १,०१,१०,०००/- मात्र चे अपेक्षित खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साईग्रेस फाऊंडेशन, मुंबई यांचेकडून श्री साईबाबांचे मूळ फोटोचे मॅटपेट (मॅटेलाईझड ) पोस्टर ॲण्ड कॅलेंडर खालीलप्रमाणे छपाई करुन घेण्यात यावी असे ठरले.**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| अ.नं | तपशिल | छपाई संख्या | मंजूर दर रु.पै | एकूण रक्कम रुपये | देणगी मुल्य रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| अ. | श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड ) पोस्टर आकार २०"x२८" | | | | |
| ०१. | श्री साईबाबा समाधी मंदिर फोटो | २५००० | | | |
| ०२. | श्री साईबाबा गुरुस्थान फोटो | २५००० | | | |
| ०३. | श्री साईबाबा पालखी फोटो | २५००० | | | |
| ०४. | व्दाराकामाईत बसलेले बाबा फोटो(जुना) | २५००० | | | |
| ०५. | श्री साईबाबा व्दारकामाई नवीन (धुनीसमोर) | २५००० | | | |
| ०६. | श्री साईबाबा भिक्षा फोटो | २५००० | | | |
| ०७. | श्री साईबाबा चेहरा फोटो | २५००० | | | |
| | एकूण संख्या | १७५००० | २१/- | ३६७५०००/- | २५/- |
| ब) | श्री साईबाबांचे ७ पेजेसचे ( ७ फोटो ) डिलक्स वॉल कॅलेंडर २०१२ मॅटपेट (मॅटेलाईझड् फिनिश) आकार २०" x२८" | ५००० | २२५/- | ११,२५,०००/- | २३०/- |
| क) | श्री साईबाबांचे मुळ फोटोस मॅटपेट (मॅटेलाईझड)पोस्टर आकार २०"x१४" | | | | |
| ०१ | श्री साईबाबा समाधी मंदिर फोटो | २५००० | | | |
| ०२. | श्री साईबाबा गुरुस्थान फोटो | २५००० | | | |
| ०३ | श्री साईबाबा पालखी फोटो | २५००० | | | |
| ०४ | व्दाराकामाईत बसलेले बाबा फोटो(जुना) | २५००० | | | |
| ०५ | श्री साईबाबा व्दारकामाई नवीन (धुनीसमोर) | २५००० | | | |
| ०६ | श्री साईबाबा भिक्षा फोटो | २५००० | | | |
| ०७. | श्री साईबाबा चेहरा फोटो | २५००० | | | |
| | एकूण संख्या | १७५००० | १२.६० | २२,०५०००/- | १५/- |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १०** **शिर्डी ग्रामस्थ /पालक यांचे शैक्षणिक बस फी व इतर बाबतचे निवेदनाबाबत**

**प्रस्ताव-** शिर्डीतील पालक, ग्रामस्थ, पदाधिकारी आणि विद्यार्थी यांनी दि.२५/०५/२०११ रोजी सकाळी १०.०० वा. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल, शिर्डी या ठिकाणी मोर्चा आणुन निवेदन सादर केले. या निवेदनात खालीलप्रमाणे मागण्या लवकरात लवकर पुर्ण करण्यात याव्या अशी विनंती केली आहे.

१. स्थानिक मुलांना प्रवेशासाठी प्राधान्य दिलेच पाहिजे.
२. मुलांची फी वाढ रद्द झालीच पाहिजे.
३. स्कुल बसची फी कमी केलीच पाहिजे.
४. कन्या शाळेत ०५ वी पासुन सेमी इंग्लिश वर्ग चालू झालेच पाहिजे.
५. कन्या शाळेतील मुलींसाठी स्कुल बस सेवा सुरु झालीच पाहिजे.
६. साईबाबा संस्थानने नवीन वर्गखोल्या तयार केल्याच पाहिजे.

उपरोक्त प्रमाणे निवेदन कर्त्यांनी मागणी केलेली असून सोबत पालकांचे स्वाक्षरीसह निवेदन दिलेले आहे.

याबाबत इंग्लिश मिडीयम स्कुल विभागाशी निगडीत असलेले मुदयांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

**मागणी नुसार मुद्या :-**

**१. स्थानिक मुलांना प्रवेशासाठी प्राधान्य दिलेच पाहिजे.**

**खुलासा:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी संचलीत शैक्षणिक संकुलात प्रथम कर्मचारी पाल्य, त्यानंतर शिरडी गावातील व परिसरातील नियमानुसार वयात बसलेल्या स्थानिक मुलांना प्रवेशासाठी प्राधान्य नेहमीच दिले जाते.

**२. मुलांची फी वाढ रद्द झालीच पाहिजे.**

**खुलासा:-** इतर परिसरातील इंग्रजी माध्यमांच्या शाळेची शैक्षणिक फी विचारात घेता श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलची शैक्षणिक फी अल्पप्रमाणात आहे. सामान्य व्यक्तींना फी भरणे परवडू शकेल अशी आहे. शिवाय ज्यु. के.जी वर्ग वगळता इतर वर्गांची शैक्षणिक फी दोन टप्यात स्विकारली जाते. यापुर्वी सन २००४-०५ मध्ये शैक्षणिक फी वाढविण्यात आली होती. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.२४.०५.२००८ रोजीचे सभेतील विषय नं.०२ निर्णय क्रमांक ४१५ नुसार सन २००८-२००९ या शैक्षणिक वर्षात शालेय शुल्कात वाढ करण्यात आली होती, तद्नंतर आर्थिक वर्ष २००८-०९ व २००९-१० मध्ये झालेल्या ऑडीट अहवालामध्ये रुपये ४२,२९,४७५.५० मात्र व ६५,५४,०४२.०० मात्र इतकी तुट दर्शविली असून, त्यामध्ये सदरची तुट कमी करणेबाबत ऑडीट अहवालामध्ये उपाययोजना करणेबाबत सुचित केले होते.

सन २००८-०९ व २००९-१० च्या ऑडीट अहवालामध्ये इंग्लिश मिडीयम स्कुलच्या उत्पन्न खर्चातील तुट कमी करणेसाठी सूचना करणेत आली आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १३.०२.२०११ निर्णय क्रमांक १०४ नुसार शैक्षणिक शुल्कात वाढ करणेत आली आहे. शैक्षणिक शुल्काचा तुलनात्मक तक्ता माहितीसाठी सादर करीत आहे.

**१) इतर परिसरातील शाळा व श्री साईबाबा इं.मि.स्कुलमध्ये सन २०१० ते २०११ अखेर शालेय शुल्काची रक्कम खालीलप्रमाणे होती.**

| अ. नं. | वर्ग | ओम गुरुदेव इं.मि.स्कुल,कोकमठाण | सेवा निकेतन, कोपरगाव | शारदा इं.मि.स्कुल, कोरपरगाव | सेंन्ट जॉन स्कुल, राहाता | प्रिती सुधाजी इं.मि.स्कुल, राहाता | श्री साईबाबा इं.मि.स्कुल ,शिरडी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| १ | ज्यु.केजी | ४००० | ------ | ६००० | ६२०० | ४५०० | २००० |
| २ | सि.केजी | ४००० | ------ | ६००० | ६२०० | ५००० | २००० |
| ३ | इ.१ली | ३७५० | ५३५० | ६००० | ५००४ | ५५०० | २२०० |
| ४ | इ.२री | ३७५० | ५३५० | ६००० | ५१२४ | ६००० | २२०० |
| ५ | इ.३री | ४००० | ५३५० | ६००० | ५६६४ | ६५०० | २३०० |
| ६ | इ.४थी | ४००० | ५३५० | ६००० | ५८४४ | ७००० | २३०० |
| ७ | इ.५वी | ४२५० | ६८०० | ६५०० | ६२१६ | ७५०० | २५०० |
| ८ | इ.६वी | ४२५० | ६८०० | ६५०० | ६२८८ | ८००० | २५०० |
| ९ | इ.७वी | ४५०० | ६८०० | ६५०० | ६३६० | ८५०० | २५०० |
| १० | इ.८वी | ४७५० | ६८०० | ७००० | ६५५२ | ९००० | ३००० |
| ११ | इ.९वी | ४७५० | ६८०० | ७००० | ६६२४ | ९५०० | ३००० |
| १२ | इ.१०वी | ४७५० | ६८०० | ७५०० | ७८६० | ११००० | ३१०० |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३.०२.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १०४ नुसार सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षात शालेय शुल्कात खालीलप्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

| अ. नं. | वर्ग | ओम गुरुदेव इं.मि.गुरुकुल कोकमठाण २०११-१२ | सेवा निकेतन कोपरगाव २०११-१२ | शारदा इं.मि. स्कूल, कोपरगाव २०११-१२ | सेंन्ट जॉन स्कुल, राहाता २०११-१२ | प्रिती सुधाजी इंग्लिश मिडीयम स्कूल,राहाता २०११-१२ | **श्री साईबाबा इं.मि.स्कुल ,शिरडी २००४-०५** | **श्री साईबाबा इं.मि.स्कुल ,शिरडी २००८ते ११** | ***श्री साईबाबा इं.मि.स्कुल सन २०११-२०१२*** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** | **०८** | **०९** | **१०** |
| १. | ज्यु.केजी | ६००० | ------ | ६००० | ४३२० | ६००० | **१३००** | **२०००** | **३०००** |
| २. | सि.केजी | ६००० | ------ | ६००० | ४८६० | ६५०० | **१३००** | **२०००** | **३०००** |
| ३. | इ.१ ली | ६५०० | ५३५० | ६००० | ५००४ | ७००० | **१४००** | **२२००** | **३२००** |
| ४. | इ.२ री | ६५०० | ५३५० | ६००० | ५१२४ | ७५०० | **१४००** | **२२००** | **३२००** |
| ५. | इ.३ री | ७५०० | ५३५० | ६००० | ५६६४ | ८००० | **१६००** | **२३००** | **३३००** |
| ६. | इ.४थी | ७५०० | ५३५० | ६००० | ५८४४ | ८५०० | **१६००** | **२३००** | **३३००** |
| ७. | इ.५वी | ८५०० | ५४०० | ६५०० | ६२१६ | ९००० | **२०००** | **२५००** | **३५००** |
| ८. | इ.६वी | ८५०० | ५४०० | ६५०० | ६२८८ | ९५०० | **२०००** | **२५००** | **३५००** |
| ९. | इ.७ वी | ९००० | ५४०० | ६५०० | ६३६० | १०००० | **२१००** | **२५००** | **३५००** |
| १०. | इ.८वी | ११००० | ५४०० | ७००० | ६५५२ | १०५०० | **२३००** | **३०००** | **४०००** |
| ११. | इ.९वी | ११००० | ५४०० | ७५०० | ६६२४ | ११००० | **२३००** | **३०००** | **४०००** |
| १२. | इ.१०वी | ११००० | ५४०० | ७५०० | ७८६० | १२५०० | **२३००** | **३१००** | **४१००** |

**३. स्कुल बसची फी कमी केलीच पाहिजे.**

**खुलासा :-** सन २००४- ०५ पर्यंत स्कुलबस फी ही इतर शाळेपेक्षा अल्पप्रमाणत होती. दि. १०.०५.२००८ रोजी मा. व्यवस्थापन उपसमितीने सुचविल्याप्रमाणे सध्याचे बस शुल्कात ३०% ने वाढ करण्यात आली होती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी अंतर्गत असलेले वाहन विभागाकडील खर्चाचे आकडेवारीनुसार स्कुलबससाठी सन २०१०-११ मधील स्कुलबस शुल्क व एकूण खर्च याबाबतचा तपशिलवार तक्ता खालील प्रमाणे आहे.

| स्कुलबसने ये-जा करणारी | स्कुलबस इंधन, दुरुस्ती खर्च , | एकुण जमा झालेले | तूट |
|---|---|---|---|

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| एकुण विद्यार्थी संख्या | कर्मचारी पगार, विमा खर्च व टॅक्स खर्च | स्कुलबस शुल्क | |
|---|---|---|---|
| १०४८ | २३,९२,०८६.०० | १३,९४,३००.०० | ९,९७,७८६.०० |

स्कुलबस इंधन, दुरुस्ती खर्च , कर्मचारी पगार, विमा खर्च व टॅक्स खर्च स्कूलबसवरील एकूण खर्च रुपये २३,९२,०८६.०० चे तुलनेत तूट ४१% टक्के आहे. जमा होणाऱ्या बस शुल्काच्या तुलनेत हे प्रमाण ७१% आहे. सबब लेखापरिक्षणातील अभिप्राय लक्षात घेता सध्याचे बसशुल्कात ७०% वाढ केल्यास स्कुलबसवर होणारा खर्च भरुन निघावा यासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६.०३.२०११ रोजीचे सभेत विषय नं. ३६ निर्णय क्र. २३६ अन्वये मान्यता मिळाली त्यानुसार खालीलप्राणे स्कुलबस फी मध्ये वाढ करण्यात आली आहे.

| अ.नं. | बसस्टॉपचे नांव | शाळेपासून अंतर कि.मी. | सन २००४-०५ स्कूलबस फी | सन २००८ ते ११ स्कूलबस फी | सन २०११-१२ स्कूलबस फी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रुई बारहाते वस्ती | १५ कि.मी. | १७५० | २२७५.०० | ३८७०.०० |
| ०२ | निमगांव / निघोज/सावळीविहीर | ०५ कि.मी. | १२०० | १५६०.०० | २६५०.०० |
| ०३ | राहाता | ०५ कि.मी. | १२०० | १५६०.०० | २६५०.०० |
| ०४ | पिंपळवाडी | ०७ कि.मी. | १२०० | १५६०.०० | २६५०.०० |
| ०५ | बन (बिरेगांव) | ०५ कि.मी. | १००० | १३००.०० | २२१०.०० |
| ०६ | नांदुर्खी | ०७ कि.मी. | १००० | १३००.०० | २२१०.०० |
| ०७ | कनकुरी | ०४ कि.मी. | १००० | १३००.०० | २२१०.०० |
| ०८ | डोऱ्हाळे | ०८ कि.मी. | ------- | १८२०.०० | ३०९०.०० |
| ०९ | चारी ११ / पोलीस स्टेशन | ०३ कि.मी. | ------- | १३००.०० | २२१०.०० |
| १० | श्रीखंडे वस्ती / गोदावरी वसाहत | ०२ कि.मी. | १००० | १३००.०० | २२१०.०० |
| ११ | लुटे वस्ती | ०४ कि.मी. | १००० | १३००.०० | २२१०.०० |
| १२ | शिरडी / परिसर | ०३ कि.मी. | ९०० | ११७०.०० | १९९०.०० |
| १३ | चांदेकसारे (पानमळा वस्ती) | १६ कि.मी. | ------ | २४८०.०० | ४२२०.०० |

**६. श्री साईबाबा संस्थानने नवीन वर्गखोल्या तयार केल्याच पाहिजे.**

**खुलासा** :- शाळेच्या मागील बाजूस असलेल्या चिल्ड्रन पार्कमध्ये बांधकाम विभागामार्फत ५ वर्ग / खोल्याचे बांधकाम चालू झालेले आहे जुलै अखेर पूर्ण होईल असे बांधकाम विभागप्रमुख यांचेकडून समजते.

उपरोक्त परिस्थीतीचा विचार करता वरील निवेदनकर्त्यांना सदरचा विषय धोरणात्मक असल्याने व मा.व्यवस्थापन समितीचे अखत्यारीत असल्याने तो मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे ठेवणेत येईल व पुढील निर्णय मा. व्यवस्थापन समितीत घेणेत येईल असे सांगणेत आले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर,

**निर्णय क्र.४७९ सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. ११** **नवीन टायर्स खरेदी करणे बाबत**

**प्रस्ताव-** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायरचा एकुण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एमएच-१७/ के-९३७० | टाटा १५१०/ स्कुलबस | ४२,४२६ | 9-00-20 | अपोलो (अमर डिलक्स) | ०२ |
| २. | एमएच-१७/ सी-८८५१ | टाटा १५१०/ स्कुलबस | ७६,१२५ (दोन वेळेस रिमोल्डींग करुन) | 9-00-20 | अपोलो (अमर डिलक्स) | ०६ |
| ३. | एमएच-१७/ टी-८५०४ | टाटा १५१०/ न.भ.नि. बस | ४४,५३३ | 10-00-20 | अपोलो (अमर डिलक्स) | ०२ |
| ४. | एमएच-१७/ के-९९०९ | महिंद्रा कॅम्पर मालवाहतुक | ५४,०२९ | 235-75-R15 | ब्रिजस्टोन | ०२ |
| ५. | एमएच-१७/ टी-२८०९ | टाटा ACE- मालवाहतुक | ३२,५४९ | 145-80-R12 | अपोलो | ०५ |
| | | | | | **एकुण टायर्स** | **१७** |

वरील प्रमाणे पाच वाहनांकरीता १७ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी कामी रु.१,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु.एक लाख साठ हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



उपरोक्त वाहनांकरीता नवीन टायर्स अपोलो व ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे पाच वाहनांकरीता नवीन १७ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१,६०,०००/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख साठ हजार) मात्रचे खर्चास मान्यते करीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे पुढील निर्णया करीता सविनय सादर.

**निर्णय क्र.४८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे पाच वाहनांकरीता आवश्यक असणारे अपोलो व ब्रिजस्टोन कंपनीचे नवीन १७ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) अपोलो व ब्रिजस्टोन कंपनीचे अधिकृत डिलरकडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.१,६०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२** **श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांचा मुदवाढ व मानधनवाढ मिळणेबाबतचा अर्ज**

**प्रस्ताव-** श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) यांनी दि.२५/०५/२०११ रोजी अर्ज सादर करुन त्यात त्यांनी " मी माहे फेब्रुवारी २००६ पासून कंत्राटी पध्दतीने मोजणीदार म्हणून काम करीत आहे. मी गेल्या पाच वर्षाच्या कालावधीत त्यांनी संस्थानने खरेदीसाठी प्रस्तावित केलेल्या जमिनींची मोजणी करुन वस्तुस्थितीदर्शक नकाशे तयार करुन दिलेले आहेत. तसेच भू-संपादनाकामी आवश्यक असणारे नकाशे, माजनी इ.साठी सहकार्य करीत आहे. तसेच सध्या बांधकाम विभागासह भूसंपादन कक्षास आवश्यक असणारे मोजणी नकाशे आणणे, खरेदीखतासाठी आवश्यक जमिनींची प्राथमिक मोजणी करणे, जमिनींची खरेदी झाल्यानंतर शासकीय मोजणी करणेसाठी मोजणी अर्ज सादर करणे शासकीय कार्यालयातून आवश्यकतेप्रमाणे नकाशे उतारे आणणे इ.कामे पार पाडीत आहेत. माझी मुदतवाढीची नेमणूक आदेश क्र. जा.नं.एसएसएस वशी ०१/४३४८/२०१० दि.१६/०८/२०१० अन्वये वाढविलेली मुदतवाढीची मुदत दि.१३/०६/२०११ रोजी संपत आहे. तरी मला एक वर्ष मुदतवाढ व मानधन रु.१०,०००/- मिळणेस विनंती केलेली आहे. "

उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांनी " श्री वराळ यांचे कामाचे स्वरुप व सध्या भुसंपादन कक्षाकडे सुरु असणारे कामकाज पाहता तूर्त त्यांना एक वर्ष मुदतवाढ देणेस व त्यांचे मानधनात मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार यथोचित वाढ करणेस हरकत नाही. " असे अभिप्राय दिलेले आहेत.

श्री वराळ यांची जा.नं.एसएसएस वशी ०१/४५०४/२००६ दि.०३/०४/२००६ अन्वये संस्थानचे बांधकाम विभागाकडे कंत्राटी पध्दतीने मोजणीदार म्हणून मासिक एकत्रित रु.७०००/- मानधन नेमणूक करण्यात आलेली असून त्यांना वेळोवेळी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यांना मा.व्य.स.चे दि.०४/०७/२०१० रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस वशी ०१/४३४८/२०१० दि.१६/०८/२०१० अन्वये देण्यात आलेली एक वर्ष मुदतवाढ दि.१३/०६/२०११ रोजी संपुष्ठात येत आहे. सध्या त्यांना एकत्रित रु.८०००/- मानधन देण्यात येत आहे.

श्री वराळ यांची जन्मतारीख दि.०१/०३/१९४४ असून त्यांचे आज रोजी वय ६७ वर्षे ०३ महिने आहे.

उपमुख्य अभियंता बांधकाम विभाग यांचे अभिप्राय विचारात घेता पूर्वीच्याच अटी-शर्तीवर दि.१४/०६/२०११ पासून एक वर्ष मुदतवाढ व मानधन वाढीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गबाजी सखाराम वराळ, कंत्राटी मोजणीदार (सर्व्हेअर) बांधकाम विभाग यांना दि.१३/०६/२०११ पासून पुढे तीन महिने मुदवाढ देण्यात यावी तदनंतर त्यांचे वाढत्या वयाचा विचार करुन त्यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये असे ठरले.** (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३** **वैद्यकिय संचालक पदावर नेमणूक करणेबाबत डॉ.नानासाहेब सारंगधर म्हस्के, उपवैद्यकिय संचालक यांचा अर्ज.**

**प्रस्ताव-** डॉ.एन.एस.म्हस्के यांनी दि. १९/०२/२०११ रोजी मा. अध्यक्ष सो., श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, यांचेकडे सादर केलेल्या अर्जाने खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

मी दि.०६/०८/२००७ पासून उपवैद्यकिय संचालक या पदावर काम करत आहे. मागील १० महिन्यांपासून मी वैद्यकिय संचालक या पदाचे अतिरिक्त कामकाज करत आहे. वैद्यकिय संचालक या पदाकरीता माझ्या अर्जाचा विवार करावा. मी प्रतिमहा रु. ७५,०००/- मानधनाची अपेक्षा करतो.

याआधी वैद्यकिय संचालक हे पद भरणेकामी महाराष्ट्र टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमान पत्रामध्ये दि. १३/१०/२०१० रोजी जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर पदाची प्रस्तावित शैक्षणिक पात्रता एमबीबीएस / एमडी/एमएस + डीएचअे / एमएचअे / एमफील अशी आहे. त्यानुसार मुलाखतीकरीता हजर असलेल्या ०४ उमेदवारांच्या दि. ०५/१२/२०१० रोजी मा. व्यवस्थापन समितीसमोर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



मुलाखती घेण्यात आलेल्या असून, त्यापैकी डॉ. (ब्रिगे.) श्रीमती सरोज मुखर्जी (व्हीएसएम) पुणे यांची वैद्यकिय संचालक या पदावर निवड करण्यात आली होती.

डॉ. अजित सिंग राणा, इंदोर यांना वैद्यकिय संचालक या पदासाठी प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेले असून, त्यांनी मासिक एकत्रित रु. ९०,०००/- इतके मानधनाची मागणी केलेली आहे.

डॉ. (ब्रिगे.) श्रीमती सरोज मुखर्जी (व्हीएसएम) पुणे यांना जा. नं. एसएसएस/ एसएसबीएच / ५६२२/२०१० दि. २०/१२/२०१० अन्वये एकत्रित रु. ७५,०००/- मात्र या मानधनावर वैद्यकिय संचालक या पदावर नेमणूक आदेश देण्यात आलेला आहे. तसेच दि. १८/०१/२०१० रोजी ई-मेल सोबत नेमणूक आदेशाची कॉपी स्कॅनव्दारे पाठविण्यात आलेली आहे. तथापि, त्यांनी इकडील कार्यालयाकडे ई-मेलव्दारे संपर्क करुन, मासिक मानधन रु. एक लाख पंधरा हजार देणेत यावे. सुसज्ज निवासव्यवस्था हाऊस किपींग सुविधेसह द्यावे.ऑफिस वापरासाठी एक कार ड्रायव्हरसह द्यावी.अनुभवी व शिक्षीत सेक्रेटरी मिळावा, आदि. मागण्या केलेल्या होत्या. त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३/०२/२०११ रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत सदर प्रस्तावाची नोंद घेण्यात आलेली आहे.

डॉ. एन. एस. म्हस्के, यांची दिनांक ०६/०८/२००७ पासून संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डीकडे **उपवैद्यकिय संचालक** या पदावर प्रतिमहा रुपये ३०,०००/- एकत्रित मानधनावर एक वर्षाचे कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असून, त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| संपूर्ण नाव | : | डॉ. नानासाहेब सारंगधर म्हस्के |
| शैक्षणिक पात्रता | : | एमबीबीएस, डीसीएच |
| जन्मतारीख व वय | : | ०३/०६/१९४३ वय:६७ वर्षे ९ महिने |
| मानधनावर हजर तारीख व झालेली सेवा | : | ०६/०८/२००७ ३ वर्षे ७ महिने |
| सेवेत दाखल पदनाम | : | उप वैद्यकिय संचालक |

डॉ.एन.एस.म्हस्के यांना वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या आहेत. सध्या त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०७/०८/२०१० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६५९ नुसार दि. ०६/०८/२०१० ते दि.०५/०८/२०११ या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून, त्यांना सध्या एकत्रित मानधन रु. ५५,०००/- देण्यात येत आहे.

डॉ. एन. एस. म्हस्के यांचेकडे दि. ०५/०४/२०१० पासून वैद्यकिय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला असून, त्यांनी दि. १९/०२/२०११ रोजीचे अर्जान्वये वैद्यकिय संचालक या पदावर नेमणूक करुन, प्रतिमहा रु. ७५,०००/- मानधन देण्याची विनंती केली आहे.

तरी, डॉ. एन.एस. म्हस्के, उपवैद्यकिय संचालक यांचे अर्जावर निर्णय होणेकरीता उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. एन. एस. म्हस्के, उप वैद्यकिय संचालक यांचेकडे वैद्यकिय संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला असल्याने त्यांना एकत्रित रुपये ५५,०००/- ऐवजी रुपये ६५,०००/- मानधन देण्यात यावे, तसेच डॉ. एन. एस. म्हस्के यांना उप वैद्यकिय संचालक, या पदावर पूर्वीचेच अटी शर्तीवर दिनांक ०६/०८/२०११ ते दि.०५/०८/२०१२ या एक वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.** (कार्यवाही-वैद्यकीय संचालक/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १४** **मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथील पी.आय.एल.नं. १८/ २०११ श्री.राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर व इतर विरुध्द दि.स्टेट ऑफ महाराष्ट्र.**

**प्रस्ताव-** १) श्री राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर रा.शिर्डी व संदिप विजय कुलकर्णी रा. वडाळा महादेव यांनी पी.आय.एल. नं. १८/२०११ ( पब्लीक इंटरेस्ट लिटीगेशन ) जनहित याचीका मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर दि. २४/०२/२०११ रोजी दाखल केलेली असून १) स्टेट ऑफ महाराष्ट्र, मुंबई २) श्री साईबाबा संस्थान, शिर्डी. ३) मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे, सो. अध्यक्ष ४) मा.श्री शंकररावजी कोल्हे सो. ५) मा.श्री राधाकृष्ण विखे पा. सो. व इतर विश्वस्त यांना प्रतिवादी केले आहे.

**रिट पिटीशन मध्ये अर्जदाराने खालील बाबी नमुद केलेल्या आहेत.**

मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे निवडी बाबत अनेक आरोप आहेत. त्याच प्रमाणे गैरकारभारा बाबतही आनेक आरोप आहेत. विश्वस्तांची नेमणूक अधिनियमाचे कलम ५(२) चे विरुध्द आहे. अर्जदार हे श्री साईबाबांचे निस्सीम भक्त आहेत. अर्जदार नं. १ शिर्डी येथील रहीवासी व अर्जदार नं. २ प्राध्यापक आहे. त्यांनी नोकरीचा राजीनामा देवून शेती व्यवसाय वडाळा येथे पहात आहे. त्यांचे विरुध्द कोणत्याही फौजदारी केसेस नाहीत.

२) जनतेचे हिताचे उपक्रम राबविणेचे दृष्टीने ट्रस्टला प्रशासन व्यवस्थापन नियंत्रण होणेसाठी शासनाने Ordinace The Shirdi Sansthan of Shri Sai baba at Shirdi तयार केला. सदरचे Ordinace चे रुपांतर Maharashtra Act No XIV २००४ मध्ये The Shree Saibaba Trust

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



( Shirdi) Act २००४ मध्ये झाले. सदर कायद्याचे कलम ५ नुसार संस्थानसाठी १३ पेक्षा कमी कमी नसलेले सदस्यांची Management Committee मा. चेअरमन व व्हाईस चेअरमन यांना बरोबरच स्थापन करणेची तरतुद आहे.

**३)** दि.१७/०८/२००४ कायदा अस्तीत्वात आला ६ दिवसांचे आत Committee of Management अस्तित्वात आली. अशा प्रकारे दि. २३/०८/२००४ रोजी १६ सदस्यांचे नेमणूक करणेत आलेबाबत जाहिर प्रकटन प्रसिध्द झाले. The Shree Saibaba Trust ( Shirdi) Amendment Act २००४ जानेवारी २००५ मध्ये अस्तीत्वात आला. Maharastra Act No IV २००५ अन्वये मुळ अधिनियमाचे सेक्शन ५ मध्ये दुरुस्ती करणेत आली. संस्थानसाठीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन नियुक्तीबाबत निकष, गुणवत्ता ठरविणेत आली. सदस्यांपैकी ८ पेक्षा कमी ( व्हाईस चेअरमन सह ) नाही असे सदस्यांकडे शैक्षणीक गुणवत्ता व्यावसायीक किंवा विशेष नैपुण्य असावे कायदा, व्यवस्थापनातील, वैद्यकीय क्षेत्र, अशा क्षेत्रातील ज्ञान असावे अशी तरतुद करणेत आली . त्या अनुषंगाने कमीटीचे पुनर्गठण होणे आवश्यक होते. असे अर्जदाराचे म्हणणे आहे. परंतू जवळ जवळ सर्व राजकीय व्यक्तींची नेमणूक सदस्य म्हणून करणेत आली श्री जयंतराव ससाणे, श्री शंकरराव कोल्हे, श्री अभंग साहेब हे विधान सभेचे माजी सदस्य आहेत. तर श्री राधाकृष्ण विखे मंत्री आहेत.

**४)** शासना कडून विश्वस्त नेमणूकीसाठी इच्छूक असलेल्या व्यक्तीची नांवे मागविण्यात आलेली नाही. त्याच प्रमाणे नावाची छाननी केली नाही. त्यामुळे उमेदवार फौजदारी केसेसशी संबंधीत आहे काय ? याबाबत माहिती मिळालेली नाही. शासनाने त्यांची नेमणूक कशी केली ? हे कळू शकत नाही. बहुतांशी लोक राजकारणी आहेत. असे दिसून येते. व त्या पार्श्वभुमीवरच त्यांची नेमणूक झालेली दिसून येते.

अधिनियमाच्या ७ (१) प्रमाणे सदस्यांची नेमणूक ३ वर्षासाठी आहे. सरकारी गॅझेट मध्ये नविन विश्वस्तांची नेमणूक प्रसिध्द होईपावेतो पुर्वीच्या विश्वस्तांची मुदतवाढ आहे. व गॅझेटमध्ये प्रगटन प्रसिध्द होताच मुदत संपुष्टात येईल अशी तरतुद आहे. अशा प्रकारे नियुक्ती ३ वर्षाची आहे. काही नियंत्रणा-पलीकडचे परिस्थीती मध्ये कमीटी नेमण्यास उशिर झाल्यास ३ वर्षाचा कालावधी वाढवता येईल, अशी तरतूद आहे. अपवादात्मक परिस्थीतीमध्ये सदरची वाढ होऊ शकते.

**५)** दि. २३/०८/२००४ रोजी स्थापन झालेल्या समितीचा कार्यकाळ ३ वर्षाचा होता परंतू त्यानंतर शासनाने नविन कमिटी तयार केली नाही. दि. २३/०८/२००४ रोजी स्थापन झालेली कमीटीचे सुधारीत कायद्यानंतर पुनर्घटन झालेले नाही. सन २००४ च्या आद्यादेशाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. ३ वर्षासाठी नेमण्यात आलेली कमिटी ६ वर्षापेक्षा अधिक काळ कार्यरत राहाणे हे अर्जदाराच्या कल्पना शक्ती पलीकडचे आहे.

व्यवस्थापन समीतीचे विरुध्द अनेक तक्रारी आहेत. संस्थानचा कारभार त्यांनी स्वत:चा वैयक्तीक कारभार म्हणून करीत आहेत, सामनेवाले नं. ३ ते १७ यांचा ६ -१/२ वर्षाचा कार्यकाळास , कायदेशीरपणा, अचुकता यांस अर्जदाराचे आव्हान आहे.

**६)** मा.विश्वस्तांची नेमणूक २००५ च्या सुधारीत कायद्याप्रमाणे निकषावर झालेली नाही. कमिटी नेमणूकीसाठी इच्छूक असलेल्या व्यक्तींना निमंत्रीत करुन नेमणूक केलेली नाही. नेमण्यात येणाऱ्या सदस्यांच्या नांवाची छाननीही करण्यात आलेली नाही. सत्तेवर असलेल्या लोकांची नेमणूक करणेत आलेली आहे. सुधारीत अधिनियमाचे कलम ५ लावणेत आलेले नाही. त्यांच्या नेमणूका रद्द होण्यास पात्र आहे. त्यांच्या नेमणूका पुढे चालू ठेवू नये. त्यांची नेमणूक रद्द व्हावी. विश्वस्तांचा गैरव्यवस्थापना मध्ये जनतेचे व संस्थेचे नुकसान होत आहे. संस्थान कोट्यावधी रुपयांचा खर्च करीत असले तरी संस्थानच्या विकासासाठी सदर खर्च होत नाही. अहमदनगर जिल्ह्यातील राजकारणी व्यक्ती कडून चालविण्यात येणाऱ्या तथाकथीत संस्थेकडून संस्थेच्या पैशाचा विनियोग होत आहे. अर्जदाराने कोणत्या अधिकाराखाली ते विश्वस्त म्हणून काम पाहात आहेत, याबाबत खुलासा करावा. त्यांचे नेमणूक बाबतचे दि. २३/०८/२००४ चे नोटी फिकेशन रद्द व्हावे. मध्यंतरीचे काळात संस्थानचे विश्वस्त म्हणून काम पहाणेसाठी मनाई हुकूम मिळावा. शासनाने नविन कमिटी नेमण्यात यावी अशा आशयाचे प्रस्तुतची जनहीत याचीका श्री राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर यांनी संस्थानच्या व मा.विश्वस्तांचे विरुध्द मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केली आहे.

**७)** सदरचे रिट हे जनहित याचीका म्हणून दाखल केलेले आहे. संस्थानचे व्यवस्थापन चांगले व्हावे यासाठी प्रस्तुतची याचीका दाखल केलेली आहे. याचीकेची संपुर्ण फी स्वत: सहन केलेली आहे. असेही प्रस्तुतचे अर्जात नमुद केलेले आहे. सदरचे रिट अर्जाची समन्स बजावणी मा.कोर्टा मार्फत व अर्जदारा मार्फत संस्थान कार्यालयाकडे झालेली आहे. संस्थानला प्राप्त झालेले रिट पिटीशनच्या अर्जाचे प्रती मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, व सर्व मा.विश्वस्तांना पाठविण्यात आल्या आहे.

**८)** प्रस्तुतचे पी.आय.एल मध्ये सामनेवाले नं. २ संस्थानसाठी कार्यकारी अधिकारी यांना पक्षकार केलेले आहे. संस्थानचे वतीने मा.कोर्टात कामकाज पहाणे कामी संस्थान पॅनलवरील ॲड. श्री आर. एन.

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



धोर्डे यांना जा.क्र. एसएसएस वशी - विधी /३५५/२०११ दि. १५/०४/२०११ चे पत्राने कामकाज पहाणेसाठी विनंती करण्यात आली आहे. त्यासोबत वकीलपत्रही दिलेले आहे.

**९)** प्रस्तुत केस प्रामुख्याने मा.विश्वस्तांची नेमणूक रद्द होणेबाबतची आहे. सामनेवाले नं. ३ ते १७ संस्थान विश्वस्त आहेत. करीता मा.कोर्टात पक्षकार मा.विश्वस्तांना वकिलपत्र व म्हणणे देखील दाखल करावे लागणार आहे. (त्याप्रमाणे सामनेवाले विश्वस्तांचे वकीलपत्र श्री होन यांचेकडे पोहोच आहेत) यापुर्वी रिट पिटीशन नं. ४६४०/२००७ राजेंद्र उत्तमराव शेळके विरुध्द महाराष्ट्र शासन या केस मध्ये ॲडव्होकेट श्री व्ही.डी.होन, औरंगाबाद यांनी मा.विश्वस्तांचे वतीने कामकाज पाहीले आहे.

तरी मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व मा.विश्वस्तांचे वतीने श्री व्ही.डी.होन, ॲडव्होकेट यांची नेमणूक करणेस व त्याकामी मा.विश्वस्तांचेवतीने वकील फी कामकाजाचे येणाऱ्या वकील फी व इतर अनुषंगीक येणा-या खर्चाचे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथील पी.आय.एल.नं. १८/ २०११ श्री.राजेंद्र भाऊसाहेब गोंदकर व इतर विरुध्द दि.स्टेट ऑफ महाराष्ट्र करिता मा.कोर्टात मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व मा.विश्वस्तांचे वतीने कामकाज पहाणेकामी श्री व्ही.डी.होन, ॲडव्होकेट यांची नेमणूक करणेस व त्याकामी येणाऱ्या वकील फी व इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही-विधी अधिकारी )

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १५** **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ किर्तनकार व कलाकार निश्चिती करणे, बिदागी निश्चित करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडी तर्फे श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०११ हा दि.१४/०७/२०११ ते दि.१६/०७/२०११ अखेर तीन दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम :-** उत्सवात ३ दिवस नारदीय पध्दतीने किर्तन कार्यक्रम होत असतात. मागील रामनवमी उत्सवात ३ दिवसाचे किर्तनासाठी रु. ९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. खालील ३ कीर्तनकारांनी श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०११ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणून संस्थानकडे अर्ज केलेले आहेत, त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | किर्तनकार नांव | बिदागी बाबत |
|---|---|---|
| ०१. | ह.भ.प. मंदार गंगाधर व्यासबुवा,<br>साई सदन नं. १ / ३ रा मजला, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ ,<br>डोंबिवली (पू) जि ठाणे. फोन नं.०२५१-२४४४५१६<br>मो.९५९४२५६५७० / ९८६९६२८९८६ | संस्थान देईल ती |
| ०२. | ह.भ.प. गंगाधर नरहर व्यासबुवा<br>साई सदन नं. १ / ३ रा मजला, जुना आयरे रोड, मढवी शाळेजवळ ,<br>डोंबिवली (पू) जि ठाणे. फोन नं.०२५१-२४४४५१६<br>मो.९५९४२५६५७० / ९८६९६२८९८६ | संस्थान देईल ती |
| ०३ | ह.भ.प. माधवराव तुकारामपंत आजेगांवकर, श्री केशव कृपा, कौस्तुभ मंगल कार्यालय, श्री संत दासगणु नगर, कारेगांव रोड, परभणी ३ ४३१ ४०१. मो.नं. ९४२१९८३०५१. | संस्थान देईल ती |

उपरोक्त पैकी किर्तन कार्यक्रम कोणास द्यावा या बाबतचा निर्णय व्यवस्थापन समितीचे होणेस विनंती.

**ब) कलाकार कार्यक्रम :**

प्रत्येक उत्सवात तिन दिवस संगीत गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन संस्थान मार्फत करण्यात येत असते. गुरुपौर्णिमा-२०११ चे उत्सवात खालील प्रमाणे- **१४** कलाकारांनी कार्यक्रम मिळणे बाबत अर्ज केलेले आहेत. त्यांची तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नांव | कार्यक्रम तपशील | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री रमेश रावतेकर,<br>१ अपूर्वा अपार्टमेंट, प्लॅाट नं.१६, स.नं.८२/१ बी, सहकार नगर नं.१, पर्वती पुणे- ४११००९<br>मो. नं. ९३७३२८४०७६ | विविध गायन कार्यक्रम | | रक्कम मागणीचा उल्लेख नाही. |
| ०२ | कैलास हरेकृष्णदास, ७९, प्रशांत नगर, हनुमान मंदिराजवळ, कातोल रोड, नागपूर-४४००१३, मो.नं.०९८२३७२१५६३. | भजन संध्या कार्यक्रम | ७ | संस्थान देईल ती रक्कम |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | प्रभाकर कारेकर<br>१४/सी बालगोविंद हौसींग सोसायटी ,<br>स्टारसिटी सिनेमा जवळ, माहीम, मुंबई-<br>४०० ०१६. टेलीफॅक्स- ४३०१४६६ | भजन संध्या कार्यक्रम | ७ | रक्कम मागणीचा उल्लेख नाही. |
| ०४ | कु. नम्रता प्रमोद गायकवाड, द्वारा पं. प्रमोद प्रभाशंकर गायकवाड, सनई वादक, शहनाई भवन, ३४४, कसबा पेठ पुणे- ४११ ०११.<br>मो.नं. ९४०३३५९३६१, ९४२२३२४५२५. | शहनाई सितार वादनाचा कार्यक्रम | १० | संस्थान देईल ती रक्कम |
| ०५ | सौ. संगीता गुणेश पारनेरकर, अध्यक्षा, ओम पूर्णवादी संगीत कला अकादमी, जीवन कला मंदिर, गुरुवाडा, पारनेर, जि. अहमदनगर.<br>मो.नं.- ८००७००६४६४. | भजन संध्या कार्यक्रम | ६ | १५०००/- |
| ०६ | अध्यक्ष, श्री खुटादेवी देवस्थान, तरवळे शिरोडा, फोंडा- गोवा. | अपार महिमा साईंचा नाटकाचा प्रयोग | - | रक्कम मागणीचा उल्लेख नाही. |
| ०७ | सौ. श्रध्दा चं. शुक्ल, दत्तनिवास, महात्मा फुले रोड, डोंबिवली (पश्चिम) - ४२१ २०२.<br>मो.नं. ९८९२३५८५६६. | भागवत सप्ताह | | रक्कम मागणीचा उल्लेख |
| ०८ | चारुशीला बेलसरे, ९, अनुदत्त सोसायटी, पुणे-३८. मो.नं.- ९०११०२४१८४ | विविध गीत गायन | | ३०,०००/- |
| ०९ | श्री किशोर सुदाम सासवडे, मु.पो. प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदनगर<br>मो.नं. ९९२२२५७०५९. | विविध गीत गायन | १५ | २१००१/- |
| १० | श्रीमती वनिता बजाज, जी-४८ / १३९, पश्चिम विहार (सईद गांव), नवी दिल्ली.<br>मो.नं. - ०९२१०४०४४९०, ३५०७८०१३३. | भजन संध्या कार्यक्रम | ७ | संस्थान देईल ती रक्कम |
| ११ | सोना जाधव, २१० / ३, नंद नगर, दिगंबर जैन मंदिरा जवळ, इंदौर - ४५२ ००३. मो.नं. - ९३०१५५१९३१, ९७१३९०९०९०. | भजन संध्या कार्यक्रम | १० | ३१०००/- |
| १२ | श्री गिरीधारी कुमावत, आंचल जादूगर, उदयपूर, राजस्थान.<br>मो.नं. ०९९२८०७७०७६, ७७०९७७४७३० | जादूचे प्रयोग | ४० | संस्थान देईल ती रक्कम |
| १३ | डॉ. सौ. मंगला सुधीर आपटे, मधुरा अपार्टमेंट, कमला नेहरु पार्क मागे, एरंडवणे, पुणे- ४११ ००४. फो.नं. ०२०-२५६५७८९८ | भजन संध्या कार्यक्रम | ८ | संस्थान देईल ती रक्कम |
| १४ | सौ. केतकी विलास देवचके, १०८,अभिषेक - बी, जी.डी. आबेकर मार्ग, नायगांव, दादर (पूर्व) मुंबई - ४०० ०१४. मो.नं. - ९८२१३२३२३६, | मंगळागौरीचे पारंपारिक खेळाचा कार्यक्रम | १० | संस्थान देईल ती रक्कम |

उपरोक्त पैकी गुरुपोर्णिमा-२०११ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी कलाकार/ मानधनासह निश्चीती बाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४८४ यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुपोर्णिमा-२०११ चे उत्सवाचे तीन दिवसाचे कालावधीसाठी कलाकार / मानधनासह निश्चीती स्थानिक विश्वस्त समिती सभेत करण्यात यावी असे ठरले.**

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) व अधिक्षक, (मोटार वाहन) पदावर पदस्थापना देणेबाबत .**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२१/११/२०१० निर्णय क्र.९३४ मध्ये कनिष्ठ अभियंते (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल) या पदांवर नेमणूका देण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन कार्यवाही करणेत यावी. जाहितातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत कंत्राटी पध्दतीने नेमण्यात आलेले कनिष्ठ अभियंते यांना पूर्वीचे अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार सर्वश्री. श्री.मधुकर परशराम गव्हाणे, श्री.गिरीष एकनाथ चोळके, श्री.अजय शि. पांडे, श्री.स्वप्निल बाबासाहेब गायकवाड, श्री.गंगाधर शंकर जाधव कंत्राटी पध्दतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) व श्री.अमृत गंगाधर जगताप, यांना कनिष्ठ-अभियंता (दुरस्ती व देखभाल) या पदावर

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



दि.०८/१२/२०१० पासून पुढे कनिष्ठ अभियंते (स्थापत्य, दुरुस्ती व देखभाल) या पदावर जाहीरातीनुसार पदे भरण्याची कार्यवाही होईपर्यंत पूर्वीच्याच अटी-शर्तीवर मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शासन निर्णय क्र.सासंवि-२००९/४३३/ (३७/०९) का.सोळा, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२. दि.०७ ऑगस्ट २००९ श्री साईबाबा संस्थान कर्मचारी आकृतीबंधास मान्यता मिळालेली असून त्यानुसार बांधकाम विभागाकडील कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) प्रसादालयाकडील कनिष्ठ-अभियंता (मशिनरी दुरूस्ती देखभाल) व वाहन विभागाकडील अधिक्षक (मोटार वाहन) या रिक्त पदांचा गोषवारा खालीलप्रमाणे -

| पदनाम | वेतनबॅंड + ग्रेड वेतन | स्थायी मंजुर पदे | स्थायी भरलेली पदे | स्थायी रिक्त पदे | प्रस्तावीत शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| Jr.Engineer कनिष्ठ अभियंता (बांधकाम) | वेतनबॅंड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० सदर वेतनबॅंड नुसार सुरुवातीचे एकूण वेतन रु.२२,३२०/- | १० | ०३ | ०७ | 1) Age not more than 28 yrs.<br>2) D.C.E. / B.E.Civil from any recognized university<br>3) MS-CIT or Govt. prescribed equivalant computer operating course with min.75 Marks<br>4) Experience of 5 yrs in Government or Local Body or in a reputed Engineering Concern in same capacity or equivalent |
| Asst.Mechanical Engineer सहाय्यक अभियंता (मेकॅनिकल) | वेतनबॅंड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० सदर वेतनबॅंड नुसार सुरुवातीचे एकूण वेतन रु.२३,७१५/- | ०३ | -- | ०३ | 1) Age not more than 35 yrs.<br>2) B.E. Mechanical / D.M.E. + Min.05 yrs. Experience in contineus process Plant + Maintenance |
| Superintendent Automobile अधिक्षक (मोटार वाहन) | वेतनबॅंड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४४०० सदर वेतनबॅंड नुसार सुरुवातीचे एकूण वेतन रु.२३,७१५/- | ०१ | -- | ०१ | 1) Age not more than 35 yrs.<br>2) Degree / Diploma in Automobile or Mechanical Engineering from a recognized University / Board<br>3)Experience of 8 yrs.as Dy./ Asst. Engineer in Automobile. |

कनिष्ठ अभियंते (स्थापत्य व दुरूस्ती देखभाल) व अधिक्षक (मोटार वाहन) पदावर सध्या कामे पहात असलेल्या कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे -

| **अ.नं.** | **कर्मचाऱ्याचे नाव** | **पदनाम** | **शैक्षणिक पात्रता** | ठेकेदारामार्फत कामावर आल्याची तारीख / संस्थान सेवेत एकत्रित मानधनावर आल्याची तारीख | **एकत्रित मानधन** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.मधुकर परशराम गव्हाणे | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | Dip.in Civil Engg. | जुलै-२०००/ ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |
| ०२ | श्री.गिरीष एकनाथ चोळके | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | Dip.in Civil Engg. | जाने.१९९९/ ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |
| ०३ | श्री.अजय शिवराम पांडे | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | Dip.in Civil Engg. | जाने.१९९९/ ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |
| ०४ | श्री.अमृत गंगाधर जगताप | कनिष्ठ अभियंता (दुरूस्ती व देखभाल) | Dip.in Mech. Engg., MS-CIT | जून-१९९९/ ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |
| ०५ | श्री.अतुल एकनाथ वाघ | कनिष्ठ अभियंता (दुरूस्ती व देखभाल) | Dip. in Mech. Engg, MS-CIT | १२/०४/२००४/ ०९/०६/२००७ | रु.१३,०००/- |
| ०६ | श्री.स्वप्निल बाबासाहेब गायकवाड | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | Dip.in Civil Engg. | ०१/०८/२००५ / ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |
| ०७ | श्री.गंगाधर शंकर जाधव | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | Dip.in Civil Engg. | ०१/०४/२००४ ०८/१२/२००६ | रु.१३,०००/- |

उपरोक्त कर्मचारी हे संस्थान मार्फत एकत्रित मानधनावर कामावर घेण्या अगोदर कंत्राटदारामार्फत कुशल कर्मचारी व सन-२००६ पासून एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने 'कनिष्ठ

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



अभियंता' स्थापत्य या पदावर बांधकाम विभागाकडे व 'कनिष्ठ अभियंता 'दुरुस्ती व देखभाल या पदावर प्रसादालय विभागाकडे व तसेच वाहन विभागाकडे कामे करत आहेत.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समिती दि.१९/०९/२००९ रोजीचे सभेतील निर्णयान्वये मंजुर आकृतीबंधानुसार एकत्रित मानधनावरील १०२६ कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि.२५/०४/२००९ व दि.२८/०४/२००९ रोजी ज्या त्या पदावर पदस्थापना देण्यात आलेली आहे.

उपरोक्त कनिष्ठ अभियंते या कर्मचा-यांच्या नेमणूका या संस्थान कर्मचारी आकृतीबंधात नमूद करण्यात आलेल्या रिक्त स्थायी पदावर कंत्राटी पध्दतीने करण्यात आलेल्या आहेत व त्या पदाची कामे आणि जबाबदा-या ते पार पाडीत आहेत. सदर कर्मचा-यांना संबंधीत ज्या त्या पदावर काम करण्याचा किमान ५ वर्षाचा संस्थानमधील कामाचा अनुभव आहे. त्यांना स्थायी कर्मचाऱ्यांप्रमाणे सार्वजनिक सुट्टया, किरकोळ तसेच अर्जित रजा, सानुग्रह अनुदान तसेच वैद्यकीय सवलती देण्यात येतात.

मा. शंकरराव गेणूजी कोल्हे सो. उपाध्यक्ष श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी यांनी मा. अध्यक्ष सो यांचे नांवे दि. १५/०४/२०११ रोजी पत्र दिले असून त्यामध्ये " ०१. श्री अजय शिवराम पांडे व इतर ०६ कनिष्ठ अभियंते (स्थापत्य/ दुरुस्ती देखभाल) यांनी संस्थान सेवेत कायमस्वरुपी नेमणूकी मिळाव्यात म्हणून विनंती केली आहे. सदर ०७ कनिष्ठ अभियंते हे जास्तीतजास्त १२ वर्षे व कमीतकमी ०५ वर्षापासून आपले संस्थानकडे कार्यरत आहेत. जाहीरात देऊन घेण्यात आले तर दोन अडचणी निर्माण होतील. (०१) फार अर्ज येतील (०२) वरिल ०७ कनिष्ठ अभियंत्याची वयाची मर्यादा जास्त झाल्याने त्यांना स्वीकारता येणार नाही. सदर वरील ०७ कनिष्ठ अभियंत्याचा विषय मिटींगपुढे ठेवण्यात यावा ही विनंती. " असे सूचित केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे स्थापत्य व दुरुस्ती व देखभाल तसेच अधिक्षक (मोटार वाहन) या पदावर काम करणारे सदरील कनिष्ठ अभियंते यांची संस्थान मध्ये कंत्राटदारामार्फत व एकत्रित मानधनावर झालेली सेवा विचारात घेऊन १०२६ कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे उपरोक्त स्तंभ क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड अधिक ग्रेड वेतन देऊन ते सध्या काम पहात असलेल्या स्थायी पदावर पदस्थापना करता येईल. व त्याव्यतिरिक्त उर्वरित रिक्त रहाणा-या स्थायी पदावर कनिष्ठ-अभियंते यांच्या नेमणूका जाहीरात देऊन निवड पध्दतीने करता येईल. तरी सदरचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, स्थापत्य व मशिनरी दुरुस्ती व देखभाल या पदावर काम करणारे सदरील कनिष्ठ अभियंते यांची संस्थान मध्ये कंत्राटदारामार्फत व एकत्रित मानधनावर झालेली सेवा विचारात घेऊन १०२६ कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे उपरोक्त स्तंभ क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनबँड अधिक ग्रेड वेतन देऊन ते सध्या काम पहात असलेल्या स्थायी मंजूर पदावर दिनांक ०१ / ०७/२०११ पासून पदस्थापना करण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७** **सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत माजी सैनिकांमधून पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतन व ईगल आय एन्टरप्राईज यांचे सर्व्हिस चार्जेस दर वाढीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे संरक्षण विभागास आवश्यकतेनुसार व मागणीप्रमाणे दि.०१-०५-२०११ ते दि.३०-०४-२०१३ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे. मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडीया) प्रा.लि.,पुणे, मे.ईगल आय एन्टरप्राईज, दमन (यु.टी.) मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि.,मुंबई, मे.रक्षक सिक्युरिटी फोर्स, पुणे व मे.जी.के.सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०३-२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२११ नुसार नेमणूक करणेत आलेली आहे. त्याप्रमाणे संबंधीत सुरक्षा एजन्सीमार्फत संस्थानचे संरक्षण विभागास दि.०१-०५-२०११ पासून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुरविणेत येत आहेत. त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये झालेल्या चर्चा/वाटाघाटीत ठरलेनुसार खालीलप्रमाणे वेतनदर देणेत येत आहे.

| अ. नं. | वर्गवारी | सुरक्षा कर्मचारी संख्या | वेतनदर/किमान वेतन दर (रुपये) प्रतिदिनी. | सर्व्हीस चार्जेस कॉ.३ चे रक्कमेवर ०.५०% | संस्थान पी.एफ़ एडीएम चार्जेस सह कॉ.३ चे रक्कमेवर १३.६१% | सर्व्हीस टॅक्स कॉ.४ ते ५चे रक्कमेवर १०.३०% | एकूण वेतन दर (रुपये) प्रति दिनी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १. | **सुरक्षा अधिकारी** (माजी सैनिक /कुशल) | ०५ | ३८५.०० | १.९२ | ५२.४० | ४५.२५ | ४८४.५७ |
| २. | **सुरक्षा सुपरवायझर** (माजी सैनिक /अर्धकुशल) | १५ | २८९.३३ | १.४५ | ३९.३८ | ३४.०१ | ३६४.१७ |
| ३. | **सशस्त्र सुरक्षा रक्षक** (माजी सैनिक /कुशल) | ४७ | २६५.७९ | १.३३ | ३६.१७ | ३१.२४ | ३३४.५३ |

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | **सुरक्षा गार्ड** (माजी सैनिक अकुशल) | ७३ | २१९.१० | १.१० | २९.८२ | २५.७२ | २७५.७४ |
| ५. | **सुरक्षा गार्ड** (पुरूष/स्त्री) (सिव्हीलियन अकुशल) | ४०० | १८८.१३ | ०.९४ | २५.६० | २२.११ | २३६.७८ |
| | **एकूण-** | **५४०** | -- | -- | -- | -- | -- |

तथापि, उपरोक्त पाचही सुरक्षा एजन्सीमार्फत वर्क ऑर्डरप्रमाणे पुरेशे संख्येने माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड पुरविणेत येत नाही. त्यामुळे सुरक्षा कामात अडचणी निर्माण होत आहे. त्याबाबत संबंधीत सुरक्षा एजन्सींना विचारणा केली असता, त्यांनी उपरोक्त वेतनदरामध्ये माजी सैनिक सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड उपलब्ध होऊ शकत नाही असे सांगितले आहे.

त्यानंतर मे ईगल आय एन्टरप्राईज, महाद्वार सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर यांनी दि.११-०६-२०११ रोजीचे पत्रान्वये सुरक्षा कर्मचाऱ्यांचे वेतनात व एजन्सीचे सर्व्हिस चार्ज रक्कमेत वाढ करून मिळावी अशी विनंती केली आहे. त्यात त्यांनी " आम्ही सुरक्षा एजन्सीचे निविदेत खालीलप्रमाणे प्रतिदिनी वेतनदर मिळावेत अशी मागणी केली होती.

| अ.नं. | वर्गवारी | प्रतिदिनी दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | माजी सैनिक सुरक्षा अधिकारी | ४१०.०० |
| २. | माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर | ३१७.०० |
| ३. | माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक | २७१.०० |
| ४. | माजी सैनिक सुरक्षा गार्ड | २५०.०० |
| ५. | सुरक्षा गार्ड सिव्हीलियन (स्त्री/पुरूष) | १६०.०० |

तसेच प्रॉव्हीडंट फंड प्रशासकीय चार्जेसह-१२%, सर्व्हिस टॅक्स-१०.३०%, व सर्व्हिस चार्ज-५.००% याप्रमाणे रक्कम मिळावी अशी मागणी केली होती. तथापि, कार्यालयीन आदेशानुसार खालीलप्रमाणे प्रतिदिनी वेतनदर संस्थानकडून देण्यात आले आहेत.

| अ.नं. | वर्गवारी | प्रतिदिनी दर (रूपये) |
|---|---|---|
| १. | माजी सैनिक सुरक्षा अधिकारी | ३८५.०० |
| २. | माजी सैनिक सुरक्षा सुपरवायझर | २८९.३३ |
| ३. | माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक | २६५.७९ |
| ४. | माजी सैनिक सुरक्षा गार्ड | २१९.१० |
| ५. | सुरक्षा गार्ड सिव्हीलियन (स्त्री/पुरूष) | १८८.१३ |

तसेच सर्व्हिस चार्ज ०.५०% इतका देण्यात आलेला आहे. माजी सैनिकांना इतरत्र मासिक वेतन जादा मिळत असल्यामुळे माजी सैनिक मिळणेस अडचणी निर्माण होत आहे. संस्थानने दिलेल्या प्रतिदिनी वेतनदरांमध्ये कुठलीही एजन्सी माजी सैनिक पुरविणेस तयार होणार नाही. तरी निविदेत भरलेप्रमाणे प्रतिदिनी वेतनदर व चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे सर्व्हिस चार्ज ३% याप्रमाणे देण्यात यावा. म्हणजे माजी सैनिक पुरवठा करणेस कुठलीही अडचण निर्माण होणार नाही. माजी सैनिक कमी संख्येने पुरवठा होत असलेने, संस्थानकडून होणारी दंडात्मक कारवाई करणेत येऊ नये ही विनंती" असे म्हटलेले आहे.

सबब, मे.ईगल आय एन्टरप्राईज, महाद्वार सिक्युरिटी यांचेमार्फत संस्थानचे मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक (इतर सर्व एजन्सीजकडील माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक मे.ईगल आय एन्टरप्राईज यांचेकडे वर्ग करून) व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना सध्या देण्यात येत असलेल्या वेतनदरात अनुक्रमे रूपये ५.२१/- व रूपये ३०.९०/- प्रतिदिनी इतकी वाढ करून, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक यांना रू.२७१.००/-व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना रू.२५०.००/-प्रतिदिनी याप्रमाणे सुधारीत वेतनदर त्याचप्रमाणे त्यांना सध्या देणेत येत असलेल्या सर्व्हिस चार्जेसमध्ये १.५०% इतकी वाढ करून, दि.०१-०६-२०११ पासून २.००% याप्रमाणे सुधारीत सर्व्हिस चार्जेस रक्कम दयावयाची किंवा कसे? याबाबत निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे माजी सैनिक कंत्राटी सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना सुधारीत वेतनदर व मे.ईगल आय एन्टरप्राईज यांना सुधारीत दराने सर्व्हिस चार्जेस रक्कम दयावयाची झाल्यास संस्थानवर प्रतिमहिना रूपये १, १३, ५३०/- व प्रतिवर्षी रूपये १३, ६२, ३६०/- इतका आर्थिक भार पडेल.

**निर्णय क्र.४८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन,सिक्यूरिटी एजन्सीज मार्फत पुरविणेत येणाऱ्या कंत्राटी माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना सध्या देण्यात येत असलेल्या वेतनदारात अनुक्रमे रुपये ५.२१ व रुपये ३०.९० प्रतिदिनी इतकी वाढ करुन, माजी सैनिक सशस्त्र सुरक्षा रक्षक यांना रुपये २७१.०० प्रतिदिनी व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना रुपये २५०.०० प्रतिदिनी**

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



**याप्रमाणे सुधारित वेतनदर दिनांक ०१.०६.२०११ पासून देणेत यावे,असें ठरलें. त्याचप्रमाणे मे.ईगल आय एन्टरप्राईज यांना सध्या देणेत येत असलेल्या सर्व्हिस चार्जेसमध्ये १.५०% इतकी वाढ करुन दिनांक १.०६.२०११ पासून २.००% याप्रमाणे सुधारित सर्व्हिस चार्जेस रक्कम देणेस मान्यता देण्यात आली. तसेच सर्व एजन्सीकडील सर्व सशस्त्र सुरक्षा गार्ड माजी सैनिक ाे.ईगल आय एन्टरप्राईज दमन (यु.टी.) यांचेमार्फत घेणेत यावे, असें ठरले.** (कार्यवाही-कामगार अधिकारी )

---

**विषय नं.१८** **श्री.कैलास निवृत्ती जेजुरकर व श्री.विजय बाजीराव पठारे यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमधे सहा. शिक्षक पदावर कायम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** शिक्षणसेवक श्री.कैलास निवृत्ती जेजुरकर व श्री.विजय बाजीराव पठारे यांचेबाबत वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे

| अ. नं. | नाव व पदनाम | शिक्षण | नेमणूक तारीख | परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात येण्याची तारीख | कामाबाबतचा प्राचार्या यांचा अभिप्राय | संस्थान सेवेत कायम करावयाचे पदनाम व वेतनबँड + ग्रेड वेतन | वैद्यकीय पात्रता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | श्री.कैलास निवृत्ती जेजुरकर शिक्षण सेवक माहिती तंत्रज्ञान (माध्यमिक) | BCS, MCM | ०४/०९/२००८ | ३०/०४/२०११ | श्री.जेजुरकर यांचे काम समाधानकारक असुन, त्यांची वर्तणूक चांगली आहे. तरी सहा.शिक्षक माहिती तंत्रज्ञान (माध्यमिक) या पदावर कायम करणेस हरकत नाही. | सहा.शिक्षक माहिती तंत्रज्ञान (माध्यमिक) वेतनबँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन ४३०० | दि.१०/०९/२००८ चे प्रमाणपत्रा नुसार पात्र |
| २) | श्री.विजय बाजीराव पठारे शिक्षण सेवक माहिती तंत्रज्ञान (प्राथमिक) | BCS | ०४/०९/२००८ | ३०/०४/२०११ | श्री.पठारे यांचे काम समाधानकारक असुन, त्यांची वर्तणूक चांगली आहे. तरी सहा.शिक्षक माहिती तंत्रज्ञान (प्राथमिक) या पदावर कायम करणेस हरकत नाही. | सहा.शिक्षक माहिती तंत्रज्ञान (प्राथमिक) वेतनबँड ५२००-२०२०० + ग्रेड वेतन २८०० | दि.१९/०९/२००८ चे प्रमाणपत्रा नुसार पात्र |

दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ सर्व्हीस रेग्युलेशन ॲक्ट १९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL

(2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub sections on (3) & (4) he shall, on completion of this probation period of two years, be deemed to have been confirmed.

(3) if in the opinion of the Management, the work or behavior of any probationer during the period of his probation, is not satisfactory, the Management may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice.)

श्री जेजुरकर व श्री पठारे यांचे काम समाधानकारक असल्याने उपरोक्त नियमावलीतील तरतूद विचारात घेता जेजुरकर व पठारे यांना स्तंभ क्र.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पदनाम व वेतनबँड देऊन संबंधीत पदावर दि.०१/०५/२०११ पासून संस्थान सेवेत कायम करणेच्या विषयावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र४८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मधील तरतूदीनुसार श्री.कैलास निवृत्ती जेजुरकर व श्री.विजय बाजीराव पठारे, सहाय्यक शिक्षक यांचे काम समाधानकारक असल्याने उपरोक्त प्रस्तावातील स्तंभ क्र. ७ स्तंभ क्र.७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे पदनाम व वेतनबँड देऊन संबंधीत पदावर दि.०१/०५/२०११ पासून संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.**

(कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**विषय नं.१९** **श्रीमती आशा साहेबराव राशिनकर, सहा.शिक्षीका (मराठी) माध्यमिक यांना संस्थान सेवेत कायम करणे बाबत.**

**प्रस्ताव-** श्रीमती आशा साहेबराव राशीनकर यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३९९/२००९ दि.३१ जाने २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलीत श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डीकडे सहाय्यक शिक्षिका (मराठी) माध्यमिक या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



नेमणूक करण्यात आलेली आहे. या पदावर दोन वर्षाचे परिवीक्षाधीन कालावधीसाठी रु.५५००-१७५-९००० या वेतन श्रेणीवर नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा दोन वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी खाली त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या तारखेस संपुष्टात येत आहे.

| अ.नं | कर्मचारी नांव | शिक्षण | प्रत्यक्ष कामावर हजर झालेची तारीख | परिवीक्षाधीन कालावधी संपुष्टात येत असल्याची तारीख | वैद्यकीय अधिक्षक यांचे वैद्यकिय दृष्ट्या पात्र असलेबाबत प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती आशा साहेबराव राशीनकर | एम.ए. बी.एड. | ०३/०२/२००९ | ०२/०२/२०११ | दि.३१.०१.२००७ चे प्रमाणपत्रानुसार पात्र |

उपरोक्त श्रीमती आशा साहेबराव राशीनकर यांचे काम व वर्तणूक चांगली असून ते प्रमाणिक आहेत. त्यांचे काम समाधानकारक असुन ते हुकूमाप्रमाणे व योग्य रीतीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतीही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. त्यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.

दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMEN OF PRIVATE SCHOOL.

(२) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub section on (३) & (४) he shall, on completion of this probation period of two years, be deemed to have been confirmed.

(३) if in the opinion of the management, the work or behavior of any probationer during the period of his probation, is not satisfactory, the management may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice (or salary of one month in lieu of notice )

उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार श्रीमती आशा साहेबराव राशीनकर, सहाय्यक शिक्षिका यांना दि.०३/०२/२०११ पासून सुधारीत वेतन बँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३०० नुसार देऊन संस्थान सेवेत कायम करणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४८८ यावर सविस्तर चर्चा होऊन, दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन्स ऑफ रेग्युलेशन ॲक्ट,१९७७ व रुल्स १९८१ मधील कलम नं.५ मधील तरतूदीनुसार श्रीमती आशा साहेबराव राशीनकर, सहाय्यक शिक्षिका यांना दि.०३/०२/२०११ पासून सुधारीत वेतन बँड ९३००-३४८०० + ग्रेड वेतन रु.४३०० नुसार देऊन संस्थान सेवेत कायम करण्यात यावे असे ठरले.** (कार्यवाही-प्राचार्या,इंग्लिश मिडीयम स्कूल/अधिक्षक,आस्थापना विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं २०. Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेमार्फत वेबसाईटवर Online Darshan सुविधा सुरु करणेबाबत..**

**प्रस्ताव-** जगभरातील श्री साईभक्तांना श्रींचे समाधीचे दर्शनाची सुविधा घरबसल्या इंटरनेटव्दारे घेता यावी यासाठी Tata Communications, Ltd., Mumbai यांचेमार्फत संस्थानने सदर सुविधा दिनांक ०१/०१/२००७ उपलब्ध करुन दिलेली आहे. यासाठी संस्थानने कुठल्याही प्रकारचा खर्च केलेला नसून फक्त Tata Communications, Ltd., Mumbai यांचे अधिकृत वेबसाईटवर सदरची लिंक उपलब्ध करुन दिलेली आहे. श्री साईभक्तांचा वेबसाईटवर लाईव्ह दर्शन बघण्यासाठी वाढणारा ओघ व पुरविण्यात येणाऱ्या लाईव्ह दर्शनला येणाऱ्या अडचणी यामुळे कधी-कधी श्री साईभक्तांसाठी लाईव्ह दर्शन उपलब्ध होत नाही. श्री साईभक्तांची लाईव्ह दर्शनाची मागणी दिवसें-दिवस वाढत असून त्यांची मागणी पूर्ण होत नाही असे लक्षात आलेले आहे. त्यामुळे वेबसाईटवर पर्यायी लाईव्ह दर्शन उपलब्ध करणे गरजेचे वाटते.

Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai हे श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम करत असून त्यांनी दिनांक २४/०५/२०११ रोजीचे ई-मेलव्दारे वेबसाईटवर लाईव्ह दर्शन सुविधा ३ ते ५ वर्षासाठी लाईव्ह सिग्नल मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी दिवसें-दिवस श्री साईभक्तांचे लाईव्ह दर्शनची मागणीचा ओघ पाहता सदर प्रस्तावित केले प्रमाणे ३ वर्षासाठी वेबसाईटवर लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावे असे नम्र मत आहे.

यामुळे श्री साई भक्तांची गैरसोय होणार नाही. तसेच सदर प्रस्तावामध्ये नमूद केलेप्रमाणे Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai हे सदरची सुविधा संस्थानचे व त्यांचे वेबसाईटवर उपलब्ध करुन देणार आहे. यासाठी संस्थानला कुठल्याही प्रकारचा खर्च येणार नसून ते संस्थानला प्रती वर्षी रक्कम रुपये १२,००,०००/- मात्र रॉयल्टी देणेस तयार आहे. त्यामुळे Vistaas

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



Digital Media Private Ltd., Mumbai यांना तीन वर्षांकरीता सदर सुविध उपलब्ध करुन देण्यात यावी असे नम्र मत आहे. या पूर्वी Tata Communications, Ltd., Mumbai यांचे वेबसाईटवर श्रींचे लाईव्ह दर्शनची लिंक Non-Exclusive basis वर देण्यात आलेली असून ते संस्थानला कुठल्याही प्रकारची रॉयल्टी देत नाही.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे, Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांना वेबसाईटवर श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेच्या निर्णयार्थ सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र. ४८९ यावर सविस्तर चर्चा होऊन, Vistaas Digital Media Private Ltd., Mumbai यांचेमार्फत तीन वर्षाकरीता वेबसाईटवर Online Darshan सुविधा सुरु करण्यात यावी. त्यांचेकडून प्रती वर्षी रक्कम रुपये १२,००,०००/- + टॅक्स मात्र रॉयल्टी घेण्यात यावी. तसेच सदरचे सिग्नल संस्थानचे व त्यांचे अधिकृत संकेतस्थळावर दाखविण्यास मान्यता देण्यात आली**

(कार्यवाही-आय.टी विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१ श्री साईबाबा मल्टिमिडिया थीम पार्क प्रकल्पांतर्गत उभारणेत यावयाच्या लेजर-शो उभारणीचे आवश्यक बांधकामासाठी निविदा मागविणेबाबत.. ..**

**प्रस्ताव-** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयानुंसार, संस्थानमार्फत मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील जमिनींमध्ये श्री साईबाबा गार्डन प्रकल्प उभारणेचे प्रस्तावित आहे.

या श्री साई गार्डन प्रकल्पांतर्गत पहिल्या टप्प्यात लेजर-शो उभारणीसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५ डिसेंबर, २०११ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ९७४ नुसार, ".. .. याकामी Laservision Mega~Media Ltd., Hong Kong या संस्थेस Letter of Intent देणेत यावे व या संस्थेशी करावयाचे करारनामे व इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता त्वरीत करण्यात यावी, त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्यवहारासंबंधीत कामाचा अनुभव असणाऱ्या विधिज्ञांची सेवा घेणेत यावी. प्रकल्पासाठी आवश्यक असणारे बांधकाम व इतर बाबींच्या पूर्ततेसाठी आर्किटेक्ट यांनी संस्थेशी समन्वय साधून काम त्वरीत सुरु करावे. उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा मल्टिमिडिया थीमपार्क प्रकल्प उभारणीस व त्यासाठी येणाऱ्या योग्य त्या अनुषंगिक सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. "

सदर निर्णयानुसार, **Laservision Mega~Media Ltd., Hong Kong** या संस्थेस लेजर-शो उभारणीसाठी अंदाजे भारतीय रक्कम रुपये २४.७५ कोटी मात्रचा कार्यादेश देणेत येऊन, दिनांक १२ मे, २०११ रोजी करारनामा ही करणेत आलेला आहे. लेजरव्हिजन या संस्थेने कामकाजास सुरुवात केलेली आहे.

**(ब)** उपरोक्त निर्णयात नमुद केलेप्रमाणे, लेजर-शो उभारणीसाठी आवश्यक असणारी बांधकामे व इतर बाबींच्या पुर्ततेसाठी थीम पार्क प्रकल्पाचे वास्तुविशारद मे. माथूर काप्रे असोसिएटस्, नवि दिल्ली यांचे प्रतिाधिी आर्किटेक्ट उदय काप्रे यांनी मा. व्यवस्थापन समितीचे २६ मार्च, २०११ रोजीचे सभेत सादरीकरण केले. या सभेत निर्णय क्रमांक २२१ नुसार, प्रस्तावित साई गार्डन प्रकल्पाचे बांधकाम आराखडयामध्ये सुधारणा करण्याचे दृष्टीने आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांचे मार्गदशन घेणेत यावे, असे ठरले.

वरील निर्णयाुसार, आर्किटेक्ट पुष्कर कानविंदे, पुणे यांनी दिनांक १९ मे, २०११ रोजी लेजर-शो उभारणीकामी करणेत यावयाच्या बांधकामाबाबत आपला अहवाल सादर केला. सदर अहवाल थीम पार्क प्रकल्पाचे आर्किटेक्ट उदय काप्रे यांचेकडेस योग्य व उचित कार्यवाहीसाठी त्वरीत पाठविणेत आला.

तसेच तद्नंतर, दिनांक २५ मे, २०११ रोजी नवी दिल्ली येथे मे. माथूर काप्रे असोसिएटस् यांचे कार्यालयात मा. अध्यक्षसाो., मा. विश्वस्त डॉ. गोंदकर साो., मा. विश्वस्त श्री. कुटे साो., वरिष्ठ मुख्य अभियंता यांचे उपस्थितीत बांधकाम आराखडयाबाबत सविस्तर चर्चा करणेत आली. सदर चर्चेत ठरलेप्रमाणे, आर्किटेक्ट उदय काप्रे यांनी तूर्त लेजर-शो उभारणीसाठी करावयाचे बांधकाम व इतर अनुषंगिक बाबींबाबत आवश्यक ते बदल करुन नव्याने बांधकाम आराखडे व या बांधकामासाठी अंदाजे पूर्णांकित रक्कम रुपये ३२.७५ कोटी खर्चाचे अंदाजपत्रक व त्यासोबत निविदेचा मसुदा तयार सादर केला आहे.

श्री साईबाबा थीम पार्क हे निव्वळ मनोरंजनात्मक बाग-बगीचा म्हणून विकसित करण्यात यावे, या सुचनेनुसार आर्किटेक्ट यांनी सदर प्रकल्पात लेजर-शोसाठी आवश्यक असलेले सिव्हील वर्क, लेजर-शोसाठी प्रेक्षागृह, प्रेक्षागृहाचेखाली भविष्यात सुरु करावयाचे आय-मॅक्स थिएटरसाठीचे स्ट्रक्चरल बांधकाम, प्रतिक्षागृह, प्रसाधनगृहे, बगीचा देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक असणारी स्टोअर व कर्मचाऱ्यांसाठी स्टाफ रुम, बुकिंग काऊंटर्स, पाथ-वे, संरक्षक भिंत आदिं कामांचा समावेश आहे. तसेच

Generated by Foxit PDF Creator © Foxit Software
http://www.foxitsoftware.com For evaluation only.



बांधकामामध्ये भविष्यात आवश्यक त्या ठिकाणी लिफ्ट व एक्सलेटर्स बसविणेसाठी तरतुदीचा समावेश आहे.

तरी श्री साईबाबा मल्टिमिडिया थीम पार्क प्रकल्पांतर्गत लेजर शो उभारणीकामी आवश्यक असणारे अंदाजित रक्कम रुपये ३२.७५ कोटी मात्रचे बांधकाम करणेसाठी सिलबंद निविदा मागविणेस व त्याकामी विहीत पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता मिळणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.४९०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावास मान्यता देणेत आली. याकामी येणाऱ्या अनुषंगिक योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.४९१** मा. विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या.

०१) साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिक नियतकालीक माहे जुलै-ऑगष्ट २०११ ते माहे मे-जून २०१२ तसेच दसरा विशेषांक मराठी व हिंदी-इंग्रजी ची छपाई मे.टॅको व्हीजन्स्, प्रा.लि., मुंबई यांनी मागील वर्षाचेच मंजूर दराने करुन देणेस तयार असल्याचे आजचे सभेपुढे सांगितले. त्यावर चर्चा होऊन सदर छपाईचे काम त्यांना देण्यात यावे असे ठरले. तसेच छपाई कामी येणारे रक्कम रु. २०,००,८३०/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

०२) साईप्रसादालयातील साईभक्तांना प्रसाद भोजन वाढणाऱ्या कर्मचाऱ्यांची शिफ्ट बदल होत असतांना प्रसाद भोजन घेणाऱ्या साईभक्तांस थांबावे लागणार नाही याबाबत अधिक्षक, प्रसादालय यांनी दक्षता घ्यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

०३) संस्थान प्रकाशित श्री साईलीला मासिक प्रकाशनास विलंब होत असल्याने श्री मोहन जगन्नाथ यादव, जनसंपर्क अधिकारी यांचेवर श्री साईलीला मासिक प्रकाशनाची जबाबदारी सोपविण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

०४) श्री साईबाबा दैंनंदिनी -२०१२ लवकरच प्रकाशित होत असून सदर दैनदिनीची मागणी नोंदविण्याबाबत जगातील सर्व साई मंदिरांना वेबसाईटवर आवाहन करावे.
(कार्यवाही-अधिक्षक, प्रकाशने विभाग/आय.टी. विभागप्रमुख)

०५) श्री साईबाबा हॉस्पिटल येथील आय.सी.सी.यू मधील परिचारिकांना मुंबई येथील बॉम्बे हॉस्पिटल अथवा अन्य नामांकित हॉस्पिटलमध्ये ट्रेनिंगसाठी पाठविण्यात यावे. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०६) श्री विश्वनाथ सजन कोते,शिर्डी यांनी त्यांचे व त्यांच्या पत्नीच्या मालकीच्या मौजे नांदूर्खी बुद्रुक येथील गट न.२५० पैकी मधील क्षेत्र ०१ हे.४६ आर गट नं. २५३ मधील क्षेत्र ०२ हे ३७ आर (पोटखराब्यासह) व गट नं. २५४ मधील ०१ हे ६० आर अशी जमिन संस्थानने खरेदी कराव्यात म्हणून समक्ष अर्ज दिला आहे. सदर अर्जाबाबत ही जमिनीची स्थानिक मा.विश्वस्तांनी प्रत्यक्ष पहाणी करुन उचित निर्णय घ्यावा असे ठरले (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र ३३८ ते ४९१ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)